# कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प : समाजशास्त्रीय अभ्यास

## [JALSWARAJYA PRAKALP IN KOLHAPUR DISTRICT : SOCIOLOGICAL STUDY]

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक आणि सामाजिक शास्त्रांतर्गत

पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीकरिता

सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

प्रा. संभाजी मनग्यानी गावडे

एम.ए.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हुपरी

मार्गदर्शक

डॉ. एन. डी. जत्राटकर

एम.ए.पीएच.डी

प्रपाठक व समाजशास्त्र विभाग प्रमुख

देवचंद महाविद्यालय

अर्जूननगर, (जि. कोल्हापूर)



फेब्रुवारी २०११

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रांतर्गत (समाजशास्त्र) या विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी **श्री.संभाजी मनग्यानी गावडे** यांनी "कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधाचे काम पूर्णपणे वस्तुस्थितीवर आधारित असून या विषयातील त्यांचे हे महत्वाचे आणि मूळ योगदान आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

मी अशी शिफारस करतो की, सदर शोधप्रबंध पुढील कार्यवाहीसाठी स्वीकारावा.

ठिकाण ः

**डॉ. एन.डी.जत्राटकर**

मार्गदर्शक

दिनांक ः

प्रपाठक व समाजशास्त्र विभागप्रमुख,

देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर.

# प्रतिज्ञापत्र

मी **श्री. संभाजी मनग्यानी गावडे** या प्रतिज्ञापत्राद्वारे घोषित करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाच्या समाजशास्त्र या विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी "**कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास**" या विषयावर माझा शोधप्रबंध सादर करीत आहे.

सदर शोधप्रबंध मी **डॉ. एन.डी. जत्राटकर** यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून घोषित करतो की, सदरच्या शोधप्रबंधात नमूद असलेली माहिती सत्य असून ती आजवर मी कोठेही प्रकाशित केलेली नाही तसेच कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर केलेली नाही.

ठिकाण ः **प्रा. संभाजी मनग्यानी गावडे**

दिनांक ः **संशोधक**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प ः समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर करीत असताना मला खूप आनंद होत आहे. सदर संशोधन कार्यास सुरूवात केल्यापासून ते पूर्ण करेपर्यंत मला अनेक व्यक्ती व संस्थांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य मिळाले त्या सर्वांच्याबद्दल ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

'जलस्वराज्य' हा विषय नवीन असून याच्यावर यापूर्वी कोणीही संशोधन केलेले नसल्यामुळे व या विषयावर लिखीत साहित्यही फारसे उपलब्ध नसल्यामुळे खूपच अडचणी आल्या पण या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. एन.डी. जत्राटकर यांनी मला धैर्य देऊन संशोधनाला योग्य दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य अतिशय कुशलतेने केलेले आहे. त्याबद्दल त्यांच्यासाठी मी नम्रपणे कृतज्ञता व्यक्त करतो.

मला पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने जी संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी विद्यापीठाचे माननीय कुलगरू व इतर पदाधिकारी तसेच समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व त्यांचे इतर सहकारी यांचा आभारी आहे.

ज्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वतः काबाडकष्ट करून मला शिक्षण दिले व माझ्या संशोधन कार्यासही सतत प्रेरणा व आशीर्वाद दिले ती माझी आई श्रीमंती, वडील कै.मनग्यानी, मोठे भाऊ-भावजय शिवाजी-शोभा, तानाजी-सुरेखा, नेताजी-अनिता व बहीण शांताबाई, माझ्या सासूबाई तानीबाई व सासरे रायगोंडा यांचा मी शतशः ऋणी आहे

संशोधन करण्यास संस्थेची परवानगी मिळवून देण्यापासून ते संशोधन करीत असताना येणाऱ्या विविध प्रकारच्या अडचणी दूर करण्यासाठी ज्यांनी मला मोलाचे सहकार्य केले ते आमचे प्राचार्य डॉ. टी.एस. पाटील यांचा मी ऋणी आहे.

शालेय जीवनात ज्यांच्या अध्यापन कौशल्याचा ठसा माझ्या मनावर कोरला गेला ते माझे गुरूवर्य श्री.एस.एल. कांबळे सर यांचेही मला मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यापासून ज्यांनी मला वेळोवेळी अनेक प्रकारची मदत केली व माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मला प्रेरणा दिली ते माझे

गुरूवर्य प्रा.एस.ए. वडगावे व ज्यांनी मला नेहमीच शैक्षणिक प्रगती करण्यास मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले ते माझे मित्र प्रा.डॉ.पी आय.भोसले यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करतो.

'जलस्वराज्य प्रकल्प' हा नवीन विषय घेऊन संशोधन करीत असताना मला माहिती उपलब्ध करून देण्यापासून ते प्रेरणा देण्यापर्यंत ज्यांनी मोलाचे सहकार्य केले ते मान.नानासो गाठ (माजी अध्यक्ष जि.प.कोल्हापूर), रेंदाळ जलस्वराज्य प्रमुख मान. श्री.शिवाजीराव पाटील (बापू), मान. श्री.रावसो तांबे (सरपंच), श्री.संभाजीराव वाघे व त्यांचे सर्व सहकारी, कोल्हापूर जिल्हा परिषदेतील जलस्वराज्य विभागातील सर्व शासकीय अधिकारी, सर्व सहाय्यकारी संस्थेचे पदाधिकारी व संशोधनासाठी निवडलेल्या कोल्हापूर जिल्हयातील २५ गावामधील सर्व सरपंच, ग्रामविकास अधिकारी आणि जलस्वराज्याच्या विविध समितींचे पदाधिकारी, ग्रामदूत या सर्वांचे मी आभार मानतो.

जलस्वराज्याचे तत्कालीन विभागीय सुलभीकर्ता मान. श्री.इंद्रजित देशमुख व जलस्वराज्य विभाग मुंबई येथील मान. एम.जी. जोगदंडसाहेब यांचेही संशोधनकामी मोलाचे मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

या संशोधनकामात वेळोवेळी मदत करणारे महाविद्यालयातील माझे सहकारी प्रा. डॉ.व्ही.ए.माने, प्रा.देवानंद सोनटक्के, प्रा.शिवानंद भंडारे, प्रा.आर.आर.साळुंखे, प्रा.बी.आर.नदाफ व इतर सर्व सहका-यांचा मी आभारी आहे.

प्राथमिक माहिती मिळविण्यास सहकार्य करणारे माझे विद्यार्थी सुनिल करडे, सर्जेराव वाघे, अमोल पाटील व माझा पुतण्या अमोल गावडे यांचेही आभार.

अतिशय महत्वाचे म्हणजे माझी पत्नी सौ.मंगल व मुले मयुर आणि तृप्ती यांचा माझ्या संशोधनाच्या काळात अनेक कौटुंबिक जबाबदा-या शिरावर घेऊन कौटुंबिक वातावरण नेहमी आनंददायी ठेवले व मला नेहमी प्रेरणा दिली.

सदर शोधप्रबंध वेळेवर व सुबक टाईप करून दिल्याबद्दल श्री.फारूक शिकलगार व श्री.हरी पाटील यांचे व संशोधनासाठी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केले त्यांचेही मी आभार मानतो.

प्रा.संभाजी मनग्यानी गावडे

# अनुक्रमणिका


| | | पान क्र. |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | |
| | प्रतिज्ञापत्र | |
| | ऋणनिर्देश | |
| | अनुक्रमणिका | |
| | सारणींची यादी | |
| | नकाशे | |
| १. | प्रस्तावना | १–३० |
| २. | पध्दतिशास्त्र | ३१–४४ |
| ३. | साहित्याचे परिशीलन | ४५–६८ |
| ४. | तथ्यसंकलनाचे विश्लेषण भाग - I (जलस्वराज्य प्रकल्पाविषयी संबंधित घटकांच्या प्रतिक्रिया) | ६९–१२८ |
| ५. | तथ्यसंकलनाचे विश्लेषण भाग - II (जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी आणि प्रकल्पानंतरच्या परिस्थीतीच्या तुलनात्मक अभ्यासाचे विश्लेषण) | १२९–३२१ |
| ६. | गोषवारा | ३२२–३३७ |
| ७. | निष्कर्ष व शिफारशी | ३३८–३४३ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३४४–३४८ |
| | परिशिष्टे | |
| | १. छायाचित्रे | ३४९–३५२ |
| | २. घोषवाक्ये | ३५३–३५६ |
| | ३. मुलाखत अनुसूची | ३५७–३९१ |

# सारणीची यादी


| सारणी क्र. | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| ४.१ | सहाय्यकारी संस्था व गावे | |
| ४.२ | लोकवर्गणी दिलेले ग्रामस्थ | |
| • | **ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीतील अध्यक्ष व सचिवांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.३ | गावातील महिलांच्या सहभागाविषयी | |
| ४.४ | मीटर पध्दतीविषयी | |
| ४.५ | गावातील गटारीसंबंधी | |
| ४.६ | कच-याच्या व्यवस्थापनाविषयी | |
| ४.७ | सांडपाणी निचरा पध्दतीबाबत | |
| ४.८ | शौचालय बांधण्यामधील अडथळयाविषयी | |
| • | **महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.९ | सदस्यांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेविषयी | |
| ४.१0 | गावच्या पाणी प्रश्नाविषयी | |
| ४.११ | गावातील महिलांच्या दर्जाविषयी | |
| • | **सामाजिक लेखा परीक्षण समितीतील अध्यक्ष व सचिवांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.१२ | जलस्वराज्य प्रकल्पाच्या कार्यातील व निर्णय प्रक्रियेतील महिलांच्या सहभागाविषयी | |
| ४.१३ | जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीबाबत | |
| ४.१४ | जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामाच्या दर्जा व गुणवत्तेबाबत | |
| ४.१५ | जलस्वराज्य प्रकल्पाच्या आराखडयाविषयी | |
| ४.१६ | गावातील पाईपलाईन व बांधकामातील त्रुटीविषयी | |
| ४.१७ | जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामाच्या पारदर्शकतेविषयी | |

| सारणी क्र. | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| • | **ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.१८ | जलस्वराज्य प्रकल्प काळातील जलसंधारण कामाविषयी | |
| ४.१९ | ग्रामदूतांना मिळणा-या मानधनाविषयी | |
| ४.२0 | मानधनाबाबतच्या ग्रामदूतांच्या अपेक्षाविषयी | |
| ४.२१ | कुटुंबाकडून सांडपाण्याचा निचरा कसा केला जावा याविषयी | |
| ४.२२ | शौचालय बांधण्यासाठी ग्रामदूतांचे ग्रामस्थांना मार्गदर्शनाविषयी | |
| • | **दुर्बल घटकातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.२३ | महिलांच्या बचत गटातील सहभागाविषयी | |
| ४.२४ | मीटर पध्दतीविषयी | |
| ४.२५ | ग्रामसभामधील उपस्थितीविषयी | |
| ४.२६ | घरातील स्वतंत्र नळजोडणीविषयी | |
| ४.२७ | घरातील शौचालयाच्या सुविधेविषयी | |
| ४.२८ | घरगुती सांडपाणी निचरा पध्दतीविषयी | |
| • | **महिला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया** | |
| ४.२९ | ग्रामसभामधील उपस्थितीविषयी | |
| ४.३0 | विविध स्पर्धांमधील महिलांच्या सहभागाविषयी | |
| ४.३१ | पाणी व शौचालयाच्या प्रश्नाविषयी | |
| ४.३२ | जलस्वराज्य कालावधीत दिलेल्या प्रशिक्षणाच्या लाभाविषयी | |
| ४.३३ | मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत जागृतीविषयी | |
| ४.३४ | मुलांच्या शाळेतील पालकसभेला हजर राहण्याविषयी | |
| ४.३५ | राजकीय निवडणूक लढविलेल्या महिलांविषयी | |
| ४.३६ | राजकीय गटातटावरील परिणामाविषयी | |
| ४.३७ | घरातील शौचालयाच्या सुविधेविषयी | |
| ४.३८ | हागणदारी मुक्ततेविषयी | |

# तीर्थस्वरूप
# शिवाजीराव गावडे

**माझे शिक्षण हीच**
**आपल्या आयुष्याची**
**स्वप्नपूर्ती मानणाऱ्या**
**माझ्या वडील भावास**





# जलस्वराज्य

शुद्ध पाणी स्वच्छ गाव

प्रकरण - १ ले

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ नवीन धोरणानुसार राज्यात सुरू असलेले कार्यक्रम

१.२.१ पाणी पुरवठा

१.२.२ स्वच्छता

१.३ जलस्वराज्य प्रकल्पाची प्रार्श्वभूमी व स्वरूप

१.३.१ पार्श्वभूमी

१.३.२ जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरूप

१.३.३ जलस्वराज्य प्रकल्पाची उद्दिष्टये

१.३.४ जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम

१.३.५ जलस्वराज्य प्रकल्पाची रचना (रूपरेषा)

१.३.६ जलस्वराज्य प्रकल्पातील टप्पे

१.३.७ प्रकल्पचक्र

१.३.८ ग्रामपंचायत निवडीचे निकष

१.४ जलस्वराज्य प्रकल्प अंमलबजावणीसाठीची गाव पातळीवरील यंत्रणा

## प्रकरण १ ले

# प्रस्तावना

### १.१ प्रस्तावना ः-

भारत हा खेडयांचा देश असून शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये जवळ जवळ ७.५० लाख खेडी असून त्यांचे संपूर्ण जीवन शेतीव्यवसायावरच अवलंबून आहे. भारतीय शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण शेतकरी दैवाधिन बनला आहे. गेल्या पाच दशकापर्यंत सर्व ऋतू बहुतांशी वेळेवर होत असत. त्यामुळे फक्त मान्सून पावसाचा विचार करावयाचा झाला तर ४ महिने कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत असे. शेती मुबलक प्रमाणात असली तरी लोकसंख्येचा भार म्हणावा तेवढा नव्हता. वर्षातून एकच पण सर्वप्रकारची पिके घेतली जात असत त्यामुळे जमिनीचा कस टिकून राहून पिकेही चांगल्या प्रकारे पिकत असत. विशेषतः नैसर्गिक पाण्याबरोबरच शेतीला शेणखताचा मोठया प्रमाणात वापर केला जात असल्याने जमिनीची सुपिकता वाढीस लागे. त्यामुळे पूर्वीचा शेतकरी जरी कष्टाळू असला तरी एकदा पिक घेतले की, तो राजासारखा फिरावयास मोकळा असे. खेडयाची शेतीवर आधारित अर्थव्यवस्था ही देशाची अर्थव्यवस्था निर्धारीत करीत असे आणि आजही ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. म्हणूनच ग्रामीण शेती व्यवसाय हा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये औद्योगिक विकास आणि शेती व्यवसायाला चालना देण्याचे धोरण स्वीकारले आणि त्यादृष्टीने कार्यवाही सुरू झाली. भारतामध्ये एका बाजूने जिथे जिथे उद्योगधंदे सुरू झाले, तिथे तिथे औद्योगिकरण वाढू लागले त्यामुळे स्थलांतर व शहरीकरणाला वेग आला. शहरीकरणाच्या प्रकियेतून अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले, तर दुस-या बाजूने निसर्गाचे चक्र अनियमित फिरू लागले आणि शेती व्यवसायासाठी व पिण्यासाठी पुरेशा पाण्याचे जे नियोजन हवे होते त्याबाबतीत मात्र थोडेसे दुर्लक्ष झालेले दिसून येऊ लागले.

भारतामध्ये लोकसंख्येच्या वाढीने वेग घेतला. स्वतंत्र भारताने लोकसंख्येवर नियंत्रण ठेवून जन्मदर व मृत्यूदराचे उद्दिष्ट निश्चित केले. पण १९७५ पर्यंत आणि आज देखील ते उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. उलट लोकसंख्येमध्ये अधिक वेगाने वाढ

होऊन ती आज जवळ जवळ ११0 कोटी पर्यंत पोहचली आहे. अर्थात भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळ जवळ ७0 टक्के लोकसंख्या खेडयामध्ये राहते आणि एवढया मोठया लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याची सोय करणे आवश्यक असले तरी त्या बाबतीत शासनाकडून जेवढया प्रमाणात सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्या होत्या तेवढया दिल्या गेल्या नाहीत. किंबहुना ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागाकडेही पिण्याच्या पाण्याच्याबाबतीत शासनाने दुर्लक्षच केले असेच म्हणावे लागेल. विशेषतः भारतामध्ये पडणारा मान्सूनचा पाऊस हा पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी पुरेसा आहे एवढेच नव्हे तर त्यातून शेतीच्या पाण्याचा प्रश्नदेखील सुटू शकेल. भारत स्वतंत्र झाल्यापासून शासन दरबारी ग्रामीण पाणीपुरवठासारख्या योजना उपलब्ध असल्या तरी त्या योजनांची अंमलबजावणी जेवढया सक्षमतेने, नियोजन बध्दपध्दतीने आणि काटेकोरपणे व्हावयास पाहीजे होती ती झाली नाही. पावसाच्या पाण्याने वाहणा-या नदया, नाले, तुडूंब भरणा-या विहीरी किंवा खोदलेल्या कुपनलिका यांचा काही दिवसासाठीच उपयोग केला जातो. पण त्यातील पाणी संपले की, पिण्याच्या पाण्याच्या नियोजनाच्या बाबतीत कोणतीच यंत्रणा निर्माण केली नसल्याचे आढळते. विशेषतः पडणा-या पावसाचे पाणी वेगवेगळया पध्दतीने अडवून जलाशय तयार केले तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. परंतु पावसाचे पाणी साठविण्याच्या योजनाच आपल्याकडे याअगोदर अस्तित्वात नव्हत्या. पण अलिकडे बंधारे व जलाशय निर्माण करण्यासाठी शासनाकडून योजना आखल्या गेल्या आहेत. या योजनापैकी बहुतांशी योजना त्यातील गलथानपणामुळे अपयशी ठरलेल्या आहेत. साहजिकच मूळ प्रश्न न सोडविता त्यातील गुंता आणि तीव्रता अधिकाअधिक वाढताना दिसते. अर्थात या सर्व योजनांचा विचार करताना त्यातून आलेल्या अपयशातून नवनवीन योजना पुढे आल्या. पण या योजनामध्ये शासन यंत्रणेचा सहभाग अधिक प्रमाणात असल्याने यशापेक्षा अपयशच अधिक प्रमाणात आले. कारण एकूण शासकीय यंत्रणेतील वेगवेगळया घटकांचा या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन, त्या प्रश्नाबदद्ल न वाटणारी तीव्रता आणि त्यांच्यामध्ये निर्माण झालेली पैसे खाण्याची सवय यामुळे या योजनांची कार्यवाही जेवढया सक्षमतेने व्हावयास पाहिजे होती तेवढी ती न झाल्याने ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागामध्येही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा अधिक तीव्र बनला.

ग्रामीण भागातील लोकांना मैलोमैली जाऊन पिण्याचे पाणी आणावे लागे यावेळी होणारी पुरूषांच्यापेक्षा स्त्रियांची पायपीट ही एक नवीनच गंभीर समस्या बनली. महाराष्ट्रात तर अनेक जिल्हयामध्ये टॅंकरने पाणी पुरवठा करण्यात येतो. एवढेच नव्हे तर

पावसाळा सुरू झाला तरी काही जिल्हयामध्ये टॅकरने पाणी पुरवठा करावा लागतो. यावर होणारा अवाढव्य खर्च ही देखील एक गंभीर समस्या आहे. अर्थात सर्वच पातळीवर आणि सर्वच बाजूने निर्माण झालेला हा पाण्याचा गंभीर प्रश्न अधिक तिव्रतेने लोकांना जाणवू लागला. साहजिकच परत नव्याने या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष्य गेले.लोकांच्या आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न हे एक महाआव्हान शासनासमोर निर्माण झाले. लोकांच्या भवितव्याच्यादृष्टिने आणि राज्याच्या अस्तित्वासाठी हा प्रश्न सोडविणे महत्वाचे वाटल्यानेच फक्त शासनाच्या सहभागानेच नव्हे तर या योजनेमध्ये शासन यंत्रणेबरोबरच स्थानिक लोकांच्या पुढाकाराने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नव्याने निर्माण झालेली किंवा आखण्यात आलेली जी एक आशावादी योजना म्हणून जिच्याकडे पाहिले जाते तिलाच '' **जलस्वराज्य प्रकल्प** '' म्हणून ओळखले जाते.

अर्थात ही योजना नेमकी कोणत्या स्वरूपाची आहे हे आपण पुढे पाहणारच आहोत पण दरम्यानच्या काळात पाण्याच्या भीषण टंचाईला सामोरे जावे लागणार आहे हे लक्षात घेऊनच केंद्र शासनाने आणि महाराष्ट्र शासनाने देखील सर्वच पातळीवर जलव्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे हे ओळखूनच विविध प्रकारच्या योजना कार्यान्वित केल्या. त्याचबरोबर पाण्याची टंचाई भासू नये यासाठी अतिशय सोप्या मार्गांचाही वापर कसा करता येईल याबाबतीतही शासनाने वेळोवेळी लोकांचे प्रबोधन केले आहे. विशेषतः ज्यामध्ये घराच्या छतावर पडणारे पाणी मुरविण्याची व्यवस्था करणे, विहीरींचे पुनर्भरन करणे, मोठया संख्येने आणि खोलवर कुपनलिका खोदण्यावर नियंत्रण आणणे व पाणलोट क्षेत्र निर्माण करणे इ. चा समावेश होतो. अर्थात या गोष्टींच्या पुर्ततेसाठी शासकीय योजनांच्याबरोबरच ग्राम पातळीवर सभा, चर्चासत्रे, कार्यशाळा, जलयात्रा यासारखे उपक्रम राबवून त्यातील सर्वसामान्य लोकांचा सहभाग अधिकाधिक वाढेल यासाठी लोकजागृती करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही आदर्श पाणलोट क्षेत्रांना भेटी देवून आपणही असा आदर्श निर्माण करावा असा लोकमानस तयार करणे अतिशय महत्वाचे आहे. याबरोबरच नाले, ओढे, नदया यांच्यावर बंधारे बांधून पाणी अडविणे , उथळ झालेले नाले, ओढे, नदया, तलाव खोल करून त्याची पाणी साठवण क्षमता वाढविणे , जमिनीची सातत्याने होणारी धूप थांबविण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणे यासारख्या गोष्टी पाणी समस्येवर विशिष्ट मर्यादेत उपयुक्त ठरू शकतात.

महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याची समस्या, स्वच्छता, कुपनलिका व विहिरीतील पाण्याची पातळी खाली जाणे या सारख्या निर्माण झालेल्या समस्यांचा विचार करून ते प्रश्न

सोडविण्यासाठी केल्या जाणा-या या उपाययोजनांचा विचार केला असला तरी गुजरात मध्येही पाण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, बिघडलेले आरोग्य आणि शासकीय उपक्रमामध्ये लोकसमुदायाचा नसणारा सहभाग या सर्व समस्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने लोकसहभागाच्या माध्यमातून वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे प्रयोग करण्यात आलेले आहेत हे खालील उदाहरणावरून दिसून येईल.

❖ 'शाश्वत मानवी विकास फोरमसाठी किनारपट्टीवरील चांगले उपक्रम' या व्यासपीठामार्फत आयोजित "People Participation in Water Construction/Gujrat – India." या विषयांतर्गत रूपा अबदी देसाई आणि भारती मेहता यांनी लिहिलेल्या "Locala Salution : Recarge of Welths/Khatiawar – India" या १६ नोव्हेंबर २000 च्या लेखामध्ये गुजरात सरकार, कच्छ आणि सौराष्ट्र येथील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर योग्य उपाययोजना करण्यामध्ये अपयशी ठरले. वर्षानुवर्षे प्रत्येक उन्हाळयात कच्छ आणि सौराष्ट्रमधीळा ग्रामीण आणि शहरी भागामध्ये पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागे. अर्थात पाण्याची पातळी खाली जाईल तसे ही समस्या अधिक तीव्र होई. या समस्येवर कायमचा तोडगा म्हणून सरकारी यंत्रणेने ट्रक्स आणि ट्रेनच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी घेतली. या भागातील लोकांना सतत वरूणदेव आणि सरकारी टॅकर्सवर अवलंबून राहावे लागे म्हणून काही भागातील लोकांनी पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी आपल्या हातात घेतली.

अ) कच्छ जिल्हयातील समुद्र किनारपट्टीवर असणा-या गांधीग्राम या खेडयाला १९९0 च्या दशकामध्ये पिण्याच्या पाण्याच्या समस्येला गंभीरपणे तोंड दयावे लागले. जमिनीतील पाण्याची पातळी समुद्रसपाटीपेक्षाही खाली गेलेली होती. याचे कारण पाण्याचा झालेला अधिक उपसा आणि समुद्राचे पाणी जमिनीखालील पाण्यामध्ये अधिक प्रमाणात झिरपलेले होते. या खेडयातील ग्रामस्थांनी 'ग्रामविकास मंडळ' नावाचा एक ग्रामविकास संघ स्थापन केला. या मंडळाने बॅंकेकडून कर्ज घेतले आणि ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्त श्रमदान केले. या श्रमदानातूनच गावाजवळच्या हंगामी नदीवर पाणी अडविण्यासाठी बंधारा बांधण्यात आला. या बंधा-याबरोबरच ग्रामस्थांनी जलसंधारण प्रकल्पदेखील हाती घेतला. या दोन्ही पाणी अडविण्याच्या उपक्रमामुळे ग्रामस्थांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळू लागले आणि ४00 हेक्टर जमीन यापूर्वी नापीक होती ती लागवडीखाली आलेली आहे.

ब) सौराष्ट्रच्या भावनगर जिल्हयातील खोपला झुणका या दोन खेडयांच्याबाबतीत देखील पावसाच्या पाण्याची साठवण करून ठेवण्याच्या दृष्टीने लोकांनी घेतलेला पुढाकार हे एक महत्वाचे उदाहरण आहे.

क) १९९५ ते १९९८ या दरम्यान भावनगर विद्यापीठातील तत्कालीन कुलगुरू प्रोफेसर विद्युत जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणात सहभाग घेऊन पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. समुद्र किनारपट्टीवरील भावनगर शहर पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला अतिशय गंभीरपणे तोंड देत होते. प्रोफेसर विद्युत जोशींनी पुढाकार घेऊन विद्यापीठ परिसरामध्ये एक पाझर तलाव खोदला. या प्रकल्पामध्ये विद्यापीठातील ६५0 विद्यार्थी, २४५ शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी स्वखुशीने श्रमदान केले. या प्रयोगाचा फायदा असा झाला की, पुढील येणा-या मान्सूनमध्ये विद्यापीठातील आणि विद्यापीठालगत असणा-या परिसरातील सर्व कुपनलिकांचे मोठया प्रमाणात पुर्नभरण झाले आणि तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. [१]

वरील प्रकारच्या उदाहरणावरून लोकसहभाग अतिशय महत्वाचा आहे. हे दिसून आले असले तरी पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अंमलबजावणीसाठी लोकसहभाग वाढण्यासाठी श्री.एन.एल. संथनाम यांनी आपल्या “Community Participation in Rural Water Supply and Sanitation Pragrammes” या लेखामध्ये काही सूचना केलेल्या आहेत त्या अशा -

१. कोणत्याही उपक्रमामध्ये लोकसहभाग अत्यावश्यक असून उपक्रमाची यशस्विता लोकसहभागावर अवलंबून असते. अर्थातच उत्सफूर्त लोकसहभागाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. त्यामुळेच सामाजिक जनजागृती वाढीस लागून जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

२. स्वच्छता आणि पाणी पुरवठयाची तरतूद करताना योग्य तंत्रज्ञान आणि तेथील लोकसमुदाय हे प्रमुख घटक विचारात घेणे आवश्यक आहे. लोकांच्या विचार विनिमयातूनच योग्य तंत्रज्ञान निश्चित करावे.

३. उपक्रमाच्या संपूर्ण नियोजन प्रक्रियेत गावपातळीचा दृष्टीकोन असला पाहिजे. ज्या ठिकाणी लोक राहतात तेथून नियोजनाला सुरूवात करावी. ज्यांच्यासाठी उपक्रम राबविला जाणार आहे तो निर्णयकर्ता असला पाहिजे.

४. लोकसहभाग उपक्रमात विकास प्राधिकरणाची भूमिका सहाकार्याची, सल्लागाराची व समर्थकाची असावी. [२]

ग्रामीण व शहरी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन विविध प्रकारे प्रयत्न करते. त्यामध्ये लोकांनी विहिर व कुपनलिकांचे पुनर्भरण करावे यासाठी देखील ते मार्गदर्शन करीत असते. या पुनर्भरण पध्दतीचा अवलंब केलेले उदाहरण विद्युत जोशी आणि एच.सी. दुबे यांनी १३ जुलै १९९९ रोजी शाश्वत मानवी विकास फोरमसाठी किनारपट्टीवरील चांगलेच उपक्रम या व्यासपीठामार्फत आयोजित "Local Solution: Recharge of Well/Kathiwar - India" या पाठविलेल्या लेखामध्ये जमिनीतील पाण्याचे कृत्रिमरित्या पुनर्भरण यशस्वीरित्या करण्याच्या एका पध्दतीचे दोन एन.जी.ओ.नी दोन वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत. त्यातील एका स्वाध्याय परिवार या संस्थेने किनारपट्टीवरील जुनागड जिल्हयात काम केलेले आहे तर दुस-या एका VRTI एन.जी.ओ.ने गुजरातमधील दुस-या किनारपट्टीवरील भावनगर जिल्हयामध्ये काम केलेले आहे.

स्वाध्याय परिवाराने अनुसरलेल्या पुनर्भरण पध्दतीमध्ये पावसाचे पडणारे पाणी शेतामध्ये असणा-या नैसर्गिक पाणी प्रवाहाची (ओहळ) दिशा बदलून ज्या विहिरीचे पुनर्भरण करावयाचे आहे त्या विहिरीपासून ५ फूट अंतरावर खणलेल्या ५×४×६ फूट आकाराच्या खड्डयामध्ये आणून पोहचविले जाते. जमिनीच्याखाली दोन फूट अंतरावर एक पाईप टाकून ती त्या खड्डयाला आणि विहिरीला जोडली जाते. पडण्या-या पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहाद्वारे त्या खड्डयात साठविले जाते. त्या खड्डयात जमणारा गाळ आणि माती त्या खड्डयाच्या तळाला साचून बसते आणि स्वच्छ पाणी पाईपद्वारे खड्डयातून विहिरीमध्ये पडते.

यावरून एका विहिरीचे पुनर्भरण होतेच पण त्याचबरोबर शेजारच्या शेतामध्ये असणा-या विहिरीतील पाण्याची पातळदेखील वाढलेली दिसते. याबरोबरच या पध्दतीने अनेक विहिरींना क्षारयुक्त पाणी मिळते आणि क्षारयुक्त पाण्यातून स्वच्छ पाणी मिळते.

VRTI या एन.जी.ओ.नी कुपनलिकांचे पुनर्भरण करण्याच्या अत्याधुनिक पध्दतीचा अवलंब करून भावनगर जिल्हयातील रूपावती खेडयाला पाणी पुरविण्याचा यशस्वी प्रयोग केलेला आहे. [३]

एकंदरीत भारत देशाला आणि संपूर्ण जगाला भेडसावणा-या अन्नधान्य, लोकसंख्या, इंधन, पर्यावरण, भयानक स्वरूपात फैलावलेला एडस् रोग आणि अलिकडेच नवीन पण गंभीर स्वरूपात उभा ठाकलेला 'स्वाईन फ्ल्यू' यासारख्या समस्येबरोबरच किंबहुना या सर्वापेक्षा अतिशय महत्वाचा आणि गंभीर असा 'पाणी प्रश्न' आहे. पाणी ही

एकूण मानवी जीवनाबरोबरच सर्व जीवमात्रांची आवश्यक गरज असून ती पुरेशा प्रमाणात भागविणे आवश्यक आहे, पण सगळया जगासमोर 'पाणी टंचाई' हाच प्रश्न गंभीर बनला आहे. आज तरी जागतिक एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ १.२ अब्ज लोक पाणी टंचाईने हैराण झालेले आहेत आणि ही परिस्थिती अशीच राहिली तर येत्या दोन - तीन दशकामध्ये जगातील $\frac{1}{3}$ लोकसंख्या पाण्याच्या शोधात असेल असा पाणी तज्ज्ञांचा अंदाज आहे. याच पाणी प्रश्नाची उकल करताना डॉ. आर. बी. भांडारकर लिहीतात की, "पृथ्वीच्या पृष्ठभागापैकी ७२% भाग हा सागर व महासागरांनी व्यापलेला आहे. पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी ९८% पाणी महासागर, हिमकोष तसेच हिमनदयामध्ये आहे. महासागरातील पााणी क्षारयुक्त आणि खारट असल्याने तसेच हिमकोष व हिमनदयातील पाणी बर्फरूपात असल्याने मानवाच्या वापरासाठी उपयोगात येऊ शकत नाही. म्हणजेच उर्वरीत १-२% पाणी मानवी जीवनाला आपल्या दैनंदिन वापरासाठी उपयोगात आणता येते. भारतात सरासरी पर्जन्यमान ११७0 मि. मीटर आहे. जीवसृष्टीला आवश्यक असे  गोडे पाणी एकूण उपलब्ध पाण्याचा एक छोटा भाग आहे. त्याची जपणूक करणे काळाची गरज आहे. वाढत्या सिमेंट कॉक्रीटच्या जंगलामुळे , पाण्याच्या गैर वापरामुळे दिवसेंदिवस पाणी ही बिकट समस्या बनत चालली आहे. पाणी या नैसर्गिक साधन संपत्तीचा नाश करून साधलेला विकास हा अल्पजिवी ठरेल. पुढील पिढयांची समृध्दीच नव्हे तर अस्तित्वच धोक्यात येईल. त्यासाठी जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरले पाहिजे, तेंव्हाच जलसंवर्धन होऊन विकास साध्य होईल."[४] दत्ता देसाई यांनी आपल्या 'जलयुध्द की जलक्रांती?' या पुस्तकामध्ये पाणी प्रश्नावरती मत मांडताना म्हटले आहे की, " जगात आज वर्षाला दरडोई ६६00 घन मीटर एवढे पाणी स्त्रोत उपलब्ध आहेत. ते इ.स. २0२५ पर्यंत ४८00 घन मीटर एवढे होतील. असा 'वर्ल्ड वॉटर कौन्सिल' चा अंदाज आहे.१९९५ मध्ये जगातील ३५% म्हणजेच २१0 कोटी लोक पाणी टंचाईत जगत होते. २0२५ पर्यंत हे प्रमाण ५0% (४00 कोटी लोक ) एवढे होईल असे म्हटले जाते."[५]

जगासमोर निर्माण झालेल्या या पाणी टंचाईच्या प्रश्नाचा विचार करताना एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे पाण्याचे उत्पादन करता येत नाही, तथापि त्याचा नियोजनबध्द साठा, त्याचा योग्य आणि आवश्यक वापर, पुनर्वापर यासारख्या गोष्टी मात्र माणसाच्या हातात आहेत आणि त्या माणसाने कसोशिने करणे क्रमप्राप्त आहे नव्हे तर काळाची गरज आहे.

अपुरा आणि असमान पाऊस, पाण्याचा दुरूपयोग, पाण्याचा बेसुमार वापर, पर्जन्यकाळात पाण्याचा वेगाने होणारा निचरा यासारखी कारणे पाणी समस्या अधिक गंभीर बनविण्यास जबाबदार आहेत. अपु-या पर्जन्यमानावर खात्रीचा कोणताही एक उपाय नाही, तथापि असलेल्या पाण्याचा सुनियोजित वापर करणे हा एक महत्वाचा उपाय ठरू शकतो.

भारतातील पाण्याच्या टंचाईचे भिषण स्वरूप स्पष्ट करताना डॉ. सर्जेराव साळुंखे यांनी आपल्या ' जल व्यवस्थापन एक आव्हान 'या दि. २७ डिसेंबर २००० च्या दै. सकाळच्या लेखामध्ये असे नमूद केले आहे की, "१९८० मध्ये मध्यप्रदेशात ३६,४२० गावे पाण्याशिवाय होती. तिच संख्या १९८२ मध्ये ५०,००० आणि १९८५ मध्ये ६४,५६५ वर गेली तर गुजरात मध्ये पाणी टंचाई ग्रस्त गावे १९७९ मध्ये ३८४४ होती. १९८६ मध्ये १२,२५० वर गेली आणि महाराष्ट्राचा विचार करता १९७९ मध्ये १७,११२ गावे पाणी टंचाई ग्रस्त होती , १९८४ मध्ये २३,००० झाली. १९९२ मध्ये ती २९१५७ इतकी झाली. २००१ मध्ये महाराष्ट्रातील १८,००० गावे आणि ११,००० वाडयांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागले."[६]

वरील प्रातिनिधीक आकडेवारी लक्षात घेता भारतात पाण्याच्या दुर्भिक्षतेचा प्रश्न किती उग्र रूप धारण करीत आहे हे लक्षात येते. त्यामुळे जल व्यवस्थापनाला पर्यायच नाही. किंबहुना ती एक आवश्यक गरज आहे.

याचप्रमाणे पाण्याची केवळ टंचाई हीच मानवाची महत्वाची समस्या नाही तर पाणी उपलब्ध आहे पण ते अशुध्द असेल आणि स्वच्छतेचा अभाव असेल तर त्याचा मानवी आरोग्यावर अतिशय गंभीर परिणाम होऊ शकतो हे डिसूझा यांच्या लेखावरून समजून येईल.

ए.एल.डिसूझा यांच्या १९८५ च्या योजना मासिकामधील "The International Drinking Water Supply and Sanitation" या लेखामध्ये पिण्याचे पाणी सुरक्षित नसल्याने आणि मानवी विष्टेच्या योग्य विल्हेवाटीच्या अभावामुळे वेगवेगळया रोगांचा प्रादुर्भाव होतो. अशुध्द पाणी आणि अस्वच्छतेमुळे जगामध्ये जवळजवळ ५०० दशलक्ष लोक अंशतः आंधळे, २५० दशलक्ष लोक हत्तीरोगाने ग्रासलेले, २०० दशलक्ष लोकांना लघवीचा त्रास, १६० दशलक्ष लोक हिवतापाने ग्रासलेले असून, १०० दशलक्ष लोकांना अतिसार झालेला आहे. भारतामध्ये तर औषधोपचाराचा प्रत्येक वर्षाचा होणारा खर्च ४५०० दशलक्ष रूपये एवढा आहे असा उल्लेख आहे.[७]

याचप्रमाणे ए.के. चक्रवर्ती यांनी मार्च १९९१ च्या 'Indian Jornal of Public Health' मधील आपल्या लेखामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि स्वच्छतेचबाबत जो उल्लेख केलेला आहे तो असा की, "१९८१ ते १९८९ ही दहा वर्षे 'आंतरराष्ट्रीय पाणी पुरवठा आणि स्वच्छता दशक' म्हणून जाहिर झाले. भारतात १ एप्रिल १९८१ ते ३१ मार्च १९९९ हा कालावधी आंतरराष्ट्रीय पाणी पुरवठा आणि स्वच्छता दशक म्हणून जाहीर झाला. या दशकाच्या प्रारंभी भारतात नागरी भागातील ७७% आणि ग्रामीण भागातील ३१% लोकसंख्येला सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा उपलब्ध होता. पण स्वच्छतेच्या बाबतीत मात्र परिस्थीती अत्यंत निराशाजनक होती. नागरी भागातील फक्त २७% लोकसंख्येला तर ग्रामीण भागातील केवळ ०.५% लोकसंख्येला स्वच्छताविषयक सोयी उपलब्ध होत्या."[८]

पावसाचे अल्प प्रमाण व भूगर्भातील पाण्याची घटती पातळी यामुळे संपूर्ण महाराष्ट्राला कृषी आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी अवर्षणग्रस्त तालुक्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यासंदर्भात पाण्याची टंचाई आणि नियोजनाचा अभाव याविषयी मुकूंद घारे आपल्या 'सहभागीय पाणलोट क्षेत्र विकास हस्तग्रंथात' असे म्हणतात की, "महाराष्ट्रात भूपृष्ठावरील पाणी म्हणून ४३४९ अब्ज घनफूट (७५% अवलंबित्व) एवढे पाणी उपलब्ध आहे त्यापैकी २४६८ अब्ज घनफूट एवढे पाणी वापरता येते. उर्वरीत पाणी गोदावरी, तापी, कृष्णा आणि कोकणातील पश्चिम वाहिन्या नदयामधून महाराष्ट्राबाहेर जाते. यापैकी गोदावरी व कृष्णा या नदयामधून वाहणारे पाणी बंगालच्या उपसागराला तर तापी व कोकणातील पश्चिम वाहीनी नदयामधील पाणी अरबी समुद्रास जावून मिळते."[९]

यावरून महाराष्ट्रातील पाण्याच्या दुर्भिक्षतेची कल्पना येते. महाराष्ट्रातील दुष्काळाबाबत दत्ता देसाई यांनी आपल्या 'जलयुध्द् की जलक्रांती?' या पुस्तकामध्ये असे विवेचन केले आहे की, "महाराष्ट्रात साधारणपणे दर ७ ते १० वर्षांनी मोठया दुष्काळाचा फेरा येतो.त्यात ३० ते ६५% ग्रामीण जनता होरपळून निघते. याशिवाय दर २ ते ३ वर्षांनी 'छोटे'(!)स्थानिक दुष्काळ पडत असतात आणि जी वर्षे अधिकृतपणे दुष्काळी नसतात म्हणजेच चांगल्या पावसाची असतात अशा वर्षात देखील महाराष्ट्रातील किमान २ ते २५ टक्के खेडी दुष्काळात होरपळत असतात हे आहे स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राचे चित्र."[१०]

महाराष्ट्र शासनाच्या 'जलस्वराज्य' या पुस्तिकेतील माहितीनुसार [११] सन १९६० पासून ते २००२ पर्यंत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्यासाठी रू.१६,६०० कोटी खर्च करण्यात आले होते. राज्यातील २८,५०० ग्रामपंचायतीत ३.६० लाख योजना म्हणजे सरासरी ३३ कुटुंबामागे एक योजना व एक ग्रामपंचायतीमागे १२ योजना आखल्या, १९९७ ते २००० या ३ वर्षाच्या काळात १६.६१ लाख शौचालये बांधली, ३०,००० किलोमीटर गटार बांधकाम करण्यात आले.एवढेच नाहीतर राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी खोदलेल्या विंधन विहीरींची एकूण लांबी २० हजार किलोमीटर इतकी आहे. पण एवढे सारे करूनही ग्रामीण जनतेचा पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न सुटला नाही.

ग्रामीण समाजातील पाण्याची टंचाई लक्षात घेऊन महाराष्ट्र शासन ग्रामीण जनतेपर्यंत पिण्याचे पाणी पोहचविण्यासाठी खालीलप्रमाणे यंत्रणा राबवित असून त्यासाठी केवळ एका वर्षाच्या पगारापोटी होणारा खर्च असा आहे.

**सारणी क्र. १.१**

| अ.क. | यंत्रणा | कर्मचारी संख्या | खर्च (वार्षिक पगार) |
|---|---|---|---|
| १. | मंत्रालय (पा. पु. व स्वच्छता विभाग) | १८० | रू.३ कोटी |
| २. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १२,००० | रू.८० कोटी |
| ३. | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | १६०० | रू.१५ कोटी |
| ४. | जिल्हा परिषद | ३७०० | रू.५५ कोटी |
| | एकूण | १७,४८० | रू. १५३ कोटी |

**संदर्भ**ः- 'जलस्वराज्य' माहिती पुस्तिका

वरील प्रमाणे पाणी पुरवठा यंत्रणेवर खर्च झाला असला तरी मूळ पाणी पुरवठयाचा प्रश्न सुटला नाहीच. उलट या योजनेच्या सुरूवातीनंतर जी परिस्थिती दिसून येते ती अशी आहे की, २८,५०० ग्रामपंचायतीतील ८६,६८१ मनुष्य वस्त्यांपैकी २५,५०० वस्त्यांना पुरेसे पाणी ( प्रत्येक माणसाला प्रत्येक दिवसाला ४० लि. पाणी अपेक्षित आहे) मिळत नाही. दरवर्षी सरासरी २०,००० वस्त्यांना पाणी टंचाईची झळ पोहोचते. दरवर्षी सरासरी

५,५०० वस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा होतो. दरवर्षी टंचाईच्या तात्पुरत्या उपाययोजनावर सरासरी रू. १०० कोटी खर्च होतो.

वरील प्रमाणे योजना राबवित असताना साधन सामुग्रीच्या देखभालीसाठी दरवर्षी किमान रू. ८०० कोटी इतका खर्च आवश्यक आहे. त्यापैकी देखभाल दुरूस्तीसाठी सरकारी मदत रू. २०० कोटी मिळते. पाणीपट्टी आकारणी रू. २०० कोटी इतकी होते. तर वसूली केवळ रू. १२० कोटी होते. बाकी पैसा उपलब्ध नाही म्हणजेच राज्यातील ५.५७ कोटी ग्रामीण जनता दररोज ४० लिटर शुध्द पाणी मिळविण्यासाठी केवळ ६ पैसे देते. ५ जणांचे एक कुटुंब २०० लिटर पाण्यासाठी केवळ ३० पैसे देते म्हणजे १ लिटरला ०.१५ पैसे एवढी आकारणी होताना दिसते तर बाटलीबंद पाण्यासाठी मात्र आम्ही १ लिटरला रू. १० ते १५ सहज देतो.

एकूणच पाण्याच्या अनेक योजना अयशस्वी होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सर्वच बावतीत शासनावर अवलंबून राहण्याची जनतेला लागलेली सवय हे आहे. सन १९६० पूर्वी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी शासनाचा हस्तक्षेप अगदी कमी होता. १९६० नंतर मात्र शासनाचे पुरवठा आधारीत कार्यक्रम सुरू झाले.तथापि या कार्यक्रमामध्ये जनतेची मागणी काय आहे? किंवा जनतेची गरज काय आहे? याचा विचार केला जात नव्हता तर जेवढी मोठी योजना,जेवढा जास्त खर्च तेवढी लोकांची जास्त सेवा अशा प्रकारची मानसिकता नेत्यापासून ते जनतेपर्यंत सर्वांचीच झाली. याचा परिणाम असा झाला की, ज्या जनतेसाठी पाणी दयावयाचे त्या जनतेचाच कार्यक्रमात सहभाग नसे. कारण ही 'योजना शासनाची आहे, आमची नाही' अशी जनतेची भावना झाली. त्यामुळे येथे योजना महत्त्वाची नव्हती तर पाणी महत्वाचे होते. अशा या विचारामुळे जरी विहीरीचे,बोअरवेलचे पाणी कमी झाले तरी त्याचे बळकटीकरण किंवा पुनर्भरण करीत न बसता नवीन बोअर मारायचा किंवा नवीन योजनाच आणायची अशीच मानसिकता राहिली.त्यामुळे येथे केवळ पैसाच खर्च होत राहिला पण जनतेचा मूळ पाणीप्रश्न सुटला नाही.

म्हणूनच शासनाने १९६० पासून राज्यात राबविलेल्या पिण्याच्या पाण्याच्या व स्वच्छतेच्या योजनांच्या यशापयशाचा आढावा घेतल्यानंतर राज्यातील पिण्याचा पाण्याचा व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या धोरणामध्ये बदल करण्याचे ठरविले. दि.२७ जुलै २००० च्या शासन आदेशान्वये मागणी आधारीत व लोकसहभागातून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेचे धोरण संपूर्ण राज्यासाठी स्विकारले. "लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग" हे या नवीन धोरणाचे ब्रीदवाक्य ठरविण्यात आले.

## १.२ नवीन धोरणानुसार राज्यात सुरू असलेले कार्यक्रम :-

(लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग)

### १.२.१ पाणीपुरवठा :

१) राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमाखालील निधीतून घ्यावयाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधा.

२) ४ जिल्हयासाठी केंद्रशासन पुरस्कृत 'क्षेत्र सुधारणा पथदर्शी प्रकल्प'

३) ३ जिल्हयासाठीचा जर्मन शासन प्रणित 'आपलं पाणी' प्रकल्प.

४) सर्व ३३ ग्रामीण जिल्हयासाठी 'स्वजलधारा' कार्यक्रम.

### १.२.२ स्वच्छता :

१) संत 'गाडगेबाबा ग्राम स्वच्छता'अभियान.

२) ३३ जिल्हयासाठी केंद्रशासन पुरस्कृत 'संपूर्ण स्वच्छता अभियान' कार्यक्रम .

३) राज्य शासनाचा 'हागणदारी हटाव' कार्यक्रम व त्यातून साकारलेला केंद्रशासन पुरस्कृत **निर्मल ग्राम पुरस्कार**.

वरील प्रकारच्या कार्यक्रमाबरोबरच अलिकडे महाराष्ट्र शासनाने जागतिक बँक अर्थसहाय्यित २६ जिल्हयासाठी 'जलस्वराज्य प्रकल्प' राबविण्याचे धोरण आखून त्याची अंमलबजावणी सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत मागणी आधारित व लोकसहभागातून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेचे धोरण स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र शासनाने राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडे केंद्रशासनामार्फत प्रस्ताव सादर केले.त्यापैकीच "जलस्वराज्य" हा जागतिक बँकेला सादर केलेला प्रकल्प आहे.

## १.३ जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी व स्वरूप :-

### १.३.१ पार्श्वभूमी :

महाराष्ट्र शासनाच्या "शासन निर्णय क्र.जस्वप्र २००३/प्र.क्र.३५५३/पा.पु.११ मंत्रालय, मुंबई ४०००३२ मधील"[१२] संदर्भानुसार :—

केंद्र शासनाने जलस्वराज्य प्रकल्प जागतिक बँकेला सादर केल्यानंतर जागतिक बँकेचे पाहणीपथक प्रथमतः २ जानेवारी २००२ रोजी प्राथमिक तपासणीसाठी महाराष्ट्रात आले. त्याच काळात राज्यात सुरू असलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या प्रभावामुळे हा प्रस्तावित ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्प मागणी आधारीत व

लोकसहभागातून राबविण्यासाठी राज्यात पोषक वातावरण निर्माण होत आहे अशी त्यांची खात्री झाली व त्यांनी सविस्तर “प्रकल्प अंमलबजावणी योजना” तयार करण्याच्या सुचना दिल्या. जलस्वराज्य हा प्रकल्प संपूर्णता नवीन धोरणावर आधारीत असल्याने या नवीन धोरणाची ‘क्षेत्रीय’ अंमलबजावणी ही ‘पथदर्शी’ तत्वावर करून व त्यातून दिसून येणा-या अडचणीचा वेळीच विचार करून प्रकल्प तयार व्हावा असे जागतिक बँकेने सूचित केले.

जागतिक बँकेच्या सूचनेनसार राज्य शासनानेही या कामासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात एक विशेष कक्ष गठीत करून या प्रकल्पाची तयारी सुरू केली. राज्य शासनाने या प्रकल्पासाठीचे शासनाचे सर्व अधिकार प्रधान सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली ‘गठीत शक्ती प्रदान समितीला’ बहाल केले. तसेच राज्यातील ठाणे,उस्मानाबाद व सातारा या तीन जिल्हयातील ३० पथदर्शी ग्रामपंचायतीची विविध निकषाद्वारे निवड केली. त्यामधून आलेला अनुभव, अडचणी विचारात घेऊन व त्यापासून योग्य बोध घेऊन राज्यातील ग्रामस्थांच्या मतानुसार प्रस्तावित प्रकल्पाचा आराखडा ठरविण्यात आला.

राज्य शासनाने ‘प्रकल्प अंमलबजावणी योजना’ (Project Implimentation Plan) तयार करून जागतिक बँकेला सादर केल्यानंतर जागतिक बँकेचे पडताळणी पथक ८ मे २००३ रोजी महाराष्ट्रात आले. या पथकाने प्रकल्प अंमलबजावणी योजना ही जागतिक बँकेच्या निकषानुसार असून ती राबविणे शक्य आहे. याची खात्री करून पुढील वाटाघाटीसाठी राज्य शासनाच्या प्रतिनिधींना निमंत्रित केले. दि. ३ जुलै ते ८ जुलै २००३ या कालावधीत प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत चर्चा करून प्रकल्प अंमलबजावणी योजना व प्रकल्प कराराचा मसुदा बनविला. चर्चेतून अंतिम केलेल्या प्रकल्प अंमलबजावणी योजनेनुसार राज्य शासन व जागतिक बँक यांच्यातील प्रकल्प करारावर (Project Agreement ) दि. ३० सप्टेंबर २००३ रोजी सहया करण्यात आल्या.

- <u>जिल्हयांची निवड व निकष</u> ः

जलस्वराज्य हा प्रकल्प दि. ३१/१२/०३ ते दि. ३०/०९/०९ या पूर्वनियोजित कालावधीनुसार राज्यातील २६ जिल्हयात राबविण्यात आलेला असला तरी तो एकदम सर्व जिल्हयात सुरू झालेला नसून प्रथमतः प्रकल्प तयारीच्या वेळी निवडलेल्या ठाणे,उस्मानाबाद व सातारा या तीन पथदर्शी जिल्हयात व प्रकल्प अंमलबजावणी योजनेत अंतर्भूत असलेल्या निकषानुसार संबंधित जिल्हयातील पिण्याचे पाणी,टंचाईची तीव्रता व गुणवत्ताबाधित गावे,

मागासवर्गीय तथा आदिवासींचे जिल्हयातील प्रमाण आणि जिल्हयात सुरू असलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व यशवंत ग्रामसमृध्दी योजना या राज्यशासनाच्या लोकसहभागावर आधारीत योजनामध्ये त्या त्या जिल्हयात झालेल्या कामाचे प्रमाण याचा संपूर्ण विचार करून गुणानुक्रमे पहिल्या टप्प्यात ९ जिल्हे व या जिल्हयांची प्रगती पाहून दुस-या टप्प्यात १७ जिल्हयांची निवड करण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे -

**प्रथम चरण जिल्हे (पहिला टप्पा)**

| | | |
|---|---|---|
| १) ठाणे | २) उस्मानाबाद | ३) सातारा |
| ४) यवतमाळ | ५) चंद्रपूर | ६) नाशिक |
| ७) बुलढाणा | ८) नागपुर | ९) सांगली |

**व्दितीय चरण जिल्हे (दुसरा टप्पा)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) रत्नागिरी | २) सिंधूदूर्ग | ३) कोल्हापूर | ४) सोलापूर | ५) लातूर |
| ६) बीड | ७) परभणी | ८) जालना | ९) हिंगोली | १0) वाशिम |
| ११) अकोला | १२) नंदूरबार | १३) जळगाव | १४) वर्धा | १५) भंडारा |
| १६) गोंदिया | १७) गडचिरोली | | | |

सर्वसाधारणपणे वरीलप्रमाणे जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्र्वभूमी दिसून येते.

## १.३.२ <u>जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरूप</u> ः

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत प्रकाशित केलेल्या 'जलस्वराज्य'या पुस्तिकेमध्ये जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरूप खालीलप्रमाणे विशद केलेले आहे.[१३]

- <u>जलस्वराज्याची व्याख्या व अर्थ</u> ः

महाराष्ट्र शासनाच्या जलस्वराज्य पुस्तिकेमध्ये ः "जल म्हणजे पाणी म्हणजे स्वच्छता आणि राज्य याचा अर्थ असा की, आपल्या गावातील पिण्याचे पाणी आणि स्वच्छता कामात महत्त्वाचे निर्णय आपण सर्वांनी मिळून एकत्र चर्चा करून घेणे म्हणजे जलस्वराज्य." अशी व्याख्या केलेली आहे.

डॉ.सुधीर भोंगळे यांनी आपल्या 'विकासवाटा' या ग्रंथात जलस्वराज्य संकल्पनेचे असे विवेचन केले आहे की, "खरे म्हणजे शासन मुक्ती म्हणजे स्वराज्य.प्रत्येकाचे आपले राज्य म्हणजे स्वराज्य.हे माझे राज्य आहे असे प्रत्येकाला वाटणे म्हणजे सर्वांचे राज्य

आणि हेच रामराज्य. सर्वांची सत्ता जिथे साकारते त्याला स्वराज्य म्हणतात. स्वराज्याचे शास्त्र नित्य विकास पावते. त्याची पध्द्त देशकालनुरूप बदलत राहिली तरीही त्याची मूलतत्त्वे चिरंतन व शाश्वतच राहतात.ही तत्त्वे वापरून ग्रामीण भागातील खेडयापाडयांचा पाणी व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्याच्यादृष्टिने जागतिक बँकेने 'जलस्वराज्य' हा कार्यक्रम आखला आहे."[१४]

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राज्याच्या ग्रामीण भागात पिण्याचे पाणी व स्वच्छता यासाठी जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. लोकसहभागाच्या माध्यमातून लोकांना सक्षम करून पाणी व स्वच्छतेशी निगडीत प्रश्नांची सोडवणूक लोकामार्फत करण्याची संकल्पना या प्रकल्पाच्या अग्रभागी आहे. यासाठी ग्रामीण जनतेमध्ये आवश्यक कौशल्ये विकसित करणे, अस्तित्वातील कौशल्याचा वापर करून त्यामध्ये वाढ घडवून आणणे, विकासाच्या प्रक्रियेत नियोजन, अंमलबजावणी आणि स्वमालकी या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे इ.बाबीवर जलस्वराज्य प्रकल्पात विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत या सर्व प्रक्रियेच्या माध्यमातून ग्रामीण जनतेमध्ये निर्माण झालेल्या सामाजिक,आर्थिक व तांत्रिक कौशल्यांचा ग्रामीण विकासासाठी निरंतर उपयोग करून घेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

### १.३.३ जलस्वराज्य प्रकल्पाची उद्दिष्टये ः

१. गावातील प्रत्येकाला शुध्द् व पुरेसे पाणी नियमित मिळावे व स्वच्छता सुविधा मिळावी.

२. प्रत्येकाचे म्हणणे ऐकले जाईल अशा संस्था गावामध्ये विकसीत करणे आणि प्रत्येकाला विशेषता गरीब लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे.

३. या संस्थामध्ये महिलांना सहभागी करून घेऊन त्यांचे सक्षमीकरण करणे. स्वतःचे विचार मांडण्यासाठी व गावातील इतर अडचणी सोडविण्यासाठी महिलांचा क्षमता विकास करणे.

४. वैयक्तिक घरगुती व परिसर स्वच्छता सवयीमध्ये बदल करून गावातील लोकांचे आरोग्य सुधारणे.

५. गावातील लोकाशी संवाद साधून त्यांच्या गरजा काय आहेत? हे जाणून घेऊन व निधीचा योग्य वापर करून गावपातळीवरील यंत्रणा चांगल्या रितीने कार्यान्वित करणे.

६. पाडयावरील लोकांना पाणी आणि स्वच्छता सुविधा व इतर विकासाच्या संधी

मिळविण्यासाठी सक्षम करणे.

१.३.४ **जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम** ः

वरील उद्देश साध्य करण्यासाठी व प्रकल्पाचा निधी मिळविण्यासाठी ग्रामस्थांना खालील नियमांचे पालन करावे लागेल.

१. **निर्णय प्रक्रियेत क्रियाशील सहभाग** ः-

निर्णय प्रक्रियेमध्ये आपली मते मांडण्यासाठी गावातील प्रत्येक नागरीकाने आपला हक्क बजावला पाहिजे.

या नियमाच्या चौकटीत राहूनच सर्व यंत्रणांना काम करावे लागेल. उदा. आमची लोकवर्गणी एखादा ठेकेदार किंवा इतर संस्था भरेल असा ठराव ग्रामसभेला करता येणार नाही.

२. **पारदर्शकता ठेवणे** ः-

प्रकल्पाचा निधी गावातील सर्वांचा असेल. प्रत्येकाला प्रकल्पाची माहिती व नोंदी पाहण्याचा हक्क असेल, गावानेच ग्रामसभेमध्ये समिती सदस्य निवडावेत. खरेदी संदर्भातील निर्णय सर्वांच्या समोर घ्यावेत जेणेकरून सर्वांना या संधीचा लाभ घेता येईल आणि चांगल्या गुणवत्तेचा फायदा करून घेता येईल. त्याचप्रमाणे पैसे वाचविण्यासाठी गुणवत्तेकडे लक्ष न देणे व एखादया कामासाठी ठरविलेला निधी इतर कामासाठी वापरणे यासारख्या गोष्टी घडता कामा नयेत.

३. **आपली मालकी, आपली जबाबदारी** ः-

प्रकल्पाचे नियोजन, व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेख करणे व निधीचे योग्य व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ग्रामस्थांची राहील. या सर्व जबाबदा-या ग्रामस्थांनी उचलल्या तर प्रकल्प आपला असल्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण होईल. प्रकल्पाविषयी स्वमालकीची जाणीव लोकांच्या मनामध्ये निर्माण व्हावी म्हणून लोकवर्गणीची अट टाकण्यात आली आहे.

४. **सर्वसमावेशकता** ः-

या प्रकल्पात महिला, गरीब, पिडीत व अपंग लोकांच्या गरजांचा विचार केला जाईल. पाणी व स्वच्छता आणि बांधकामाचे ठराव तयार करताना आदिवासी लोक व पर्यावरण यांचाही विचार करावा. ग्रामसभेमध्ये तांत्रिक पर्याय निवडण्यामध्ये, प्रकल्प अमलबजावणीमध्ये व प्रकल्प प्रगतीच्या निरीक्षणात महिला मुख्य भूमिका निभावतील.

५ . **आर्थिक जबाबदारी** ः-

कोणताही व्यवहार करताना आर्थिक नोंदी ठेवाव्यात व त्या नोंदी तपासणीसाठी (ऑडीट) उपलब्ध करून दयाव्यात. लोकांनी व प्रकल्पातील इतर समितीतील सदस्यांनी त्या नोंदी वेळोवेळी तपासाव्यात.कमीत कमी भांडवली खर्च, देखभाल दुरूस्तीसाठी सोपी आणि कमीत कमी खर्चाची उपाययोजना निवडणे.

१.३.५ **जलस्वराज्य प्रकल्पाची रचना (रूपरेषा)** ः

एखादया गावाची प्रकल्पासाठी निवड झाल्यानंतर सुरूवातीसच ग्रामपंचायत व जिल्हापरिषद यांच्यामध्ये एक सर्वसमावेशक करार करण्यात येईल. प्रकल्प ज्या तत्वावर आधारित आहे त्या तत्वांचा या करारात समावेश असेल. हा करार झाल्यानंतर गावाला सुरूवातीसच 'क्षमता बांधणी निधी' देण्यात येईल.या निधीतून गावाने सर्व ग्रामस्थांच्या जनजागृतीचे काम करावयाचे आहे.प्रकल्पात पुढे जे खर्चाचे प्रस्ताव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्या दरम्यान मान्य करण्यात येतील ते ग्रामपंचायत कृती आराखडयाची जोडपत्रे म्हणुन वेळोवेळी सदर करारास जोडली जातील.

१. **ग्रामपंचायत कृती आराखडा** ः-

ग्रामपंचायत कृती आराखडयामध्ये खालील प्रश्नांचा समावेश असेल.

- क्षमता विकास, महिला सक्षमीकरण, गावाच्या मुलभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि पर्यावरण स्वच्छता.
- जलस्वराज्य प्रकल्पात गावाच्या सार्वजनिक सहभागाने गावक-यांना आवश्यक असणा-या सोयी सुविधांचे नियोजन व अंमलबजावणी आवश्यक आहे.पण अशा प्रकारे प्रस्तावित सोयी सुविधा सर्वांच्या विचारानेच, सर्वांना परवडणा-या, पर्यावरणास पूरक व शाश्वत टिकणा-या असाव्यात. यासाठी एक ग्रामपंचायत कृती आराखडा तयार करण्यात येईल.

२.**आर्थिक परिस्थिती** ः-

- सर्वसाधारणतः प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर १५ वर्षांनी किती लोकसंख्या असेल याचा अंदाज करून पाणी पुरवठा सुविधांची आखणी करावी. यात प्रत्येकाला ४० लिटर पर्यंत पाणी मिळेल असे नियोजन करावे. जनगणनेच्या आकडेवारीबरोबरच सहभागी मूल्यांकन पध्दतीने संकलित केलेल्या प्रत्येक वर्षाच्या लोकसंख्या वाढीच्या माहितीच्या आधारावर सद्याची लोकसंख्या काढावी. जर गावाला दरडोई ४० लिटरपेक्षा जास्त पाणी पुरवठा सुविधा हव्या असतील तर अतिरिक्त खर्च गावाला करावा लागेल. वैयक्तिक नळजोडणी

घ्यावयाची असेल तर आपल्या घरापर्यंत पाईपलाईन आणण्यासाठी होणारा खर्च त्या व्यक्तीला करावा लागेल.

- पाणी व स्वछता सुविधांच्या मुख्य खर्चात लोकवर्गणीच्या माध्यमातून गावातील सर्व कुटुंबे सहभागी होतील.
- क्षमता बांधणी उपप्रकल्पातून बचत केलेली रक्कम फक्त क्षमता बांधणी उपक्रमासाठीच वापरता येईल.
- पाणी पुरवठा व स्वछतेच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक कुटुंबाकडून दरमहा पाणीपटटी जमा करावयाची आहे. या जमा रकमेतून पाणीपुरवठा योजना आणि स्वच्छता सुविधा पुरविण्याचा व देखभाल दुरूस्तीचा खर्च भागवावयाचा आहे. देखभाल व दुरूस्तीच्या खर्चामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

- वारंवार होणारे खर्च (वीज बील, रसायने, कर्मचा-यांचे पगार)
- विविध उपांगाची देखभाल व दुरूस्ती आणि हत्यारे व अवजारे यांची खरेदी
- विजपंप दुरूस्ती व बदलणे
- पाण्याच्या स्त्रोताचा विमा उतरविणे
- घसारा

### १.३.६ <u>जलस्वराज्य प्रकल्पातील टप्पे</u> ः

जलस्वराज्य प्रकल्पातील गावांना शुध्द व नियमित पाणी पुरवठा करणे ही एक महत्वाची योजना असून जलस्वराज्य प्रकल्पाचे एकूण चार टप्प्यामध्ये विभाजन करून ही योजना यशस्वी करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

**१. नियोजन -**

जलस्वराज्य प्रकल्पासाठी जेंव्हा एखादया गावाची निवड होते तेंव्हा त्या गावामध्ये सुरूवातीला ग्रामसभेमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती व सामाजिक लेखा परीक्षण समिती या मुख्य समितींची व इतर उपसमित्यांची निवड केली जाते. या समित्यामध्ये गावातील सर्व स्तरातील लोक, अनुभवी व्यक्ती व ज्यांचे ध्येय पाणी पुरवठा व स्वच्छता संबंधित अडचणी दूर करणे हे आहे. अशा लोकांची निवड केली जाते. ग्रामपंचायत कृती आराखडा तयार केल्यानंतर पाणी, स्वच्छता, क्षमता बांधणी व महिला सक्षमीकरण या संदर्भातील लोकांची मते इच्छा - आकांक्षा स्पष्ट होतात.

➢ **तरतूदी -**

▪ सर्व समावेशक आर्थिक करारावर सहया करण्यात येतील.

▪ जलस्वराज्य प्रकल्पासाठी नवीन बॅंक खाते उघडणे.

▪ वॉर्ड व वस्ती बैठका, ग्रामसभा, महिला ग्रामसभा यांच्या माध्यमातून गावातील सर्व घटकांचा प्रकल्पात समावेश असेल.

▪ गाव पातळीवरील संस्थासाठी प्रकल्पातील माहिती देणा-या शिबीरांचे आयोजन केले जाईल.

▪ गावपातळीवर सभांचे / चर्चांचे आयोजन करणे.

➢ **कामाचे स्वरूप -**

▪ जिल्हा सुलभीकरण चमूकडून (DFT) जोडधंदा करणारे व सहाय्यक व्यावसायिक संस्थाची माहिती गोळा करणे.

▪ सहाय्यक संस्थेबाबत करार करणे.

▪ स्त्रोत निश्चित करण्यासाठी व सुविधांची अंदाजपत्रके आराखडे तयार करण्यासाठी तांत्रिक सेवा पुरवठादाराची निवड करणे.

▪ गावातील यंत्रणा व सामाजिक स्तर यांचा अभ्यास करणे.

▪ पाण्याचे अंदाजपत्रक व पीक पध्दतीचा आढावा घेणे.

▪ अस्तित्वात असलेल्या पाणी, स्वच्छता आणि पुनर्भरण सुविधांची माहिती संकलित करणे.

▪ गावात उपलब्ध असलेल्या वेगवेगळया कौशल्य प्राप्त लोकांची यादी तयार करणे.

▪ ग्रामसभेमध्ये विविध समित्यांची निवड करणे.

▪ ग्रामसभेमध्ये सदस्य व कर्मचारी, सर्व समित्या व संस्था यांचा क्षमता विकास करणे. अभ्यास सहली व प्रशिक्षणाच्या माध्यमातून जलस्वराज्याचे नियम, त्यातील त्यांच्या भूमिका आणि प्रकल्प नियोजन याबद्दल संपूर्ण माहिती देणे.

▪ पाणी व स्वच्छतेची मागणी व सद्याची परीस्थिती यातील फरकांची पडताळणी सहभागी मूल्यांकन पध्दतीनुसार करणे.

▪ ग्रामसभेत चर्चा करूनच पाणी व स्वच्छतेच्या पर्यायांची निवड करणे.

▪ देखभाल व दुरूस्तीचा आराखडा तयार करणे.

▪ गाव कृती आराखडा व सामाजिक लेखा परीक्षण अहवालास ग्रामसभेमध्ये मंजूरी देणे.

## २. मूल्यमापन -

■ जिल्हा पडताळणी व सनियंत्रण चमूकडून कार्यालयीन मूल्यमापन करणे.

■ प्रत्यक्ष पाहणीद्वारे जिल्हा पडताळणी व सनियंत्रण चमूकडून मूल्यमापन करणे.

■ अंतिम मूल्यमापन करणे.

■ ग्रामपंचायत, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व उपसमित्यांचा अमलबजावणीसाठी क्षमता विकास करणे.

■ मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मूल्यमापनास व खर्चास सहमती घेणे.

## ३. अंमलबजावणी -

■ अंमलबजावणीचे वेळापत्रक व श्रमदानाच्या नियोजनाचा आराखडा तयार करणे.

■ साहित्य व कारागीर मिळविणे.

■ बांधकाम साहित्य व पूर्ण झालेल्या बाबींची गुणवत्ता तपासणीचे निकष प्राप्त करून घेणे व नियमित तपासणीचे नियोजन करणे.

■ ग्रामपंचायत कृती आराखडयामध्ये दिलेल्या गुणवत्तेप्रमाणे काम होत आहे किंवा नाही यासाठी कामावर देखरेख करणे.

■ देखभाल दुरूस्तीचा सविस्तर आराखडा तयार करणे.

■ उर्वरित लोकवर्गणीची रक्कम जमा करणे. पुढील सहा महिन्यासाठी पाणीपट्टी गोळा करणे.

■ प्रकल्प पूर्णत्व अहवाल जिल्हा पडताळणी व सनियंत्रण चमूला सादर करणे.

## ४. देखभाल व दुरूस्ती -

■ गावातील पाणी पुरवठा संबंधी सर्व बावतीतील देखभाल आणि दुरूस्ती करणा-या व्यक्तिला प्रशिक्षण देणे आणि देखभालीसाठी साधने पुरविणे.

■ पाणी पुरवठासंबंधी कामाचे वाटप व कार्यवाही यांचे वेळापत्रक तयार करणे.

■ पाणीपट्टी नियमितपणे वसूल करणे.

■ पाणीपट्टीच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे.

■ पाणीपट्टी न देणा-यावर काय कारवाई करावयाची हे ग्रामसभेमध्ये ठरविणे.

■ देखभालीचे नियोजन व सुविधेत अडचणी निर्माण झाल्यास तात्काळ दखल घेणारी यंत्रणा निर्माण करणे.

- देखभाल व दुरूस्तीवर देखरेख करणे.
- विविध स्त्रोतातील पाण्याचे प्रमाण व दर्जा यांची तपासणी करणे.

### १.३.७ प्रकल्पचक्र ः

जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबवित असताना प्रकल्पांतर्गत येणा-या विविध उपक्रमांची कार्यवाही, कामाचे नियोजन, अंमलबजावणी आणि एकूण देखभाल दुरूस्ती या कामानुसार केली जाते ते टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.न. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १. | नियोजन | ६ महिने |
| २. | अंमलबजावणी | ९ महिने |
| ३. | देखभाल दुरूस्ती | ३ महिने |
| | एकूण | १८ महिने |

### १.३.८ ग्रामपंचायत (गाव) निवडीचे निकष ः

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी होऊ इच्छिणा-या गावांनी प्रस्ताव पाठविल्यानंतर जिल्हा परिषदेच्या संबंधित कार्यालयाकडून खालील निकषांच्या आधारे त्या गावांची निवड केली जाते ते निकष असे आहेत.

१. सद्याची पाणी उपलब्धता = २५ गुण
२. पाणी अशुध्दता (नैसर्गिक + मानवनिर्मित) = २५ गुण
३. दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या प्रमाण = १० गुण
४. मागासवर्गीय लोकसंख्या प्रमाण = १० गुण
५. आदिवासी लोकसंख्या प्रमाण = १० गुण
६. सद्याची पाणीपट्टी वसूली = १० गुण
७. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, शिवकालीन पाणी साठवण योजना, महात्मा फुले जल अभियान, यशवंत ग्रामसमृध्दी इ.योजनेतील लोकसहभाग = ०५ गुण
८. भूजल अधिनियम अंमलबजावणी = १० गुण

**एकूण** = १०० गुण

## १.४ जलस्वराज्य प्रकल्प अंमलबजावणीसाठीची गावपातळीवरील यंत्रणा ः-

जलस्वराज्य प्रकल्पासाठी एखादया गावाची निवड झाल्यानंतर त्या गावात ग्रामसभेमार्फत गावातीलच लोकांच्या विविध समित्या स्थापन करून प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाते. अर्थातच या कार्यवाहीसाठी ज्या समितींची स्थापना केली जाते त्या विविध समितींची रचना आणि भूमिका खालीलप्रमाणे दिसून येते.

### गावपातळीवरील संस्था

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये कोणताही निर्णय घेत असताना प्रथम तो विषय महिला ग्रामसभेपुढे व नंतर तो विषय ग्रामसभेपुढे ठेवून त्यांची मंजूरी घेतली जाते व मगच पुढील कार्यवाही होते.

**१. महिला ग्रामसभा** ः

गावातील सर्व महिला मतदारांची ही ग्रामसभा असून या ग्रामसभेमध्ये प्रकल्पाच्या विविध समितीमध्ये कोणत्या महिलेने प्रतिनिधित्व करावे हे ठरवितात आणि खालील प्रमाणे निर्णय घेतात.

- सामुहीक निर्णय प्रकियेत सर्व महिलांना सहभागी करून घेणे.
- ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजिक लेखा परीक्षण समिती व उपसमित्यामध्ये महिलांना समिती प्रमुख म्हणून निवडणे.
- महिला सक्षमीकरण आराखडा निश्चित करणे.

**२. ग्रामसभा** ः

ग्रामसभेचे गावातील सर्व स्त्री,पुरूष मतदार हे सदस्य असतात . या ग्रामसभेला प्रकल्पाच्या संदर्भात खालील निर्णय घेण्याचे अधिकार असतात.

- प्रकल्पाच्या सुवर्ण नियमावलीचे पालन होईल हे पाहणे.
- प्रकल्पात सहभागी व्हायचे की नाही ते ठरविणे.
- गावपातळीवरील संस्थासाठी सदस्यांची निवड करणे.
- ग्रामपंचायतीने महिला ग्रामसभेचे नियमित आयोजन करणे,त्याचे ठराव लिहून सभेने घेतलेले निर्णय मुख्य ग्रामसभेत मांडणे.
- गावपातळीवरील कोणत्या क्षमतांची वाढ करणे आवश्यक आहे ते ठरविणे.
- किमान खर्चाच्या व कमीत कमी देखभाल दुरूस्ती खर्च असणा□या गावकृती

आराखडयाला अंतिम मान्यता देणे.

- सेवा पुरवठादारांची निवड करणे.
- खरेदी व निधीचे व्यवस्थापन करणे.

**३. ग्रामपंचायत :**

गावातील प्रौढ मतदाराकडून ग्रामपंचायतीवर निवडून गेलेले प्रतिनिधी हे ग्रामपंचायतीचे सदस्य बनतात. या ग्रामपंचायतीला जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी खालील महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

- प्रकल्पात सहभागी होण्याबाबत अर्ज सादर करणे, गावातील सर्वापर्यंत प्रकल्पाची माहिती पोहोचेल याची खात्री करणे.
- वेगळे बॅंक खाते उघडणे व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन झाल्यावर ते समितीच्या नावे करणे.
- प्राथमिक क्षमता बांधणी उपक्रमाचा आराखडा तयार करून उपक्रम राबविणे. यात महिला जागृती कार्यक्रमाचाही समावेश करणे.
- संघटन व क्षमता बांधणी यासाठी सहाय्य करणा-या संस्था व जोडधंदा करणा-यांची नेमणूक करणे.
- समित्यांची स्थापना व कामकाज सुरळीतपणे चालण्यास मदत करणे.
- निधीसाठी विनंती अर्ज देणे व निधी स्वीकारणे .
- ग्रामसभा, महिला ग्रामसभा व पाडा यांची बैठक बोलाविणे.
- सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या अहवालानुसार योग्य ती कारवाई करणे.
- जमा झालेल्या पाणीपट्टीतून देखभालीची व दुरूस्तीची व्यवस्था अचूक ठेऊन सुविधाटिकावू व कार्यक्षम ठेवणे.
- प्रकल्प खाते, ग्रामपंचायत देखभाल दुरूस्ती खात्यात विलीन करणे.

**४. महिला विकास समिती : रचना व भूमिका -**

➢ **रचना :**

या समितीत

- कमीत कमी १२ व जास्तीत जास्त २४ सदस्य असले पाहिजेत.
- कमीत कमी ७५ टक्के महिला सदस्य असाव्यात.
- महिला मंडळे व बचत गटातील महिला सदस्य असतील.

➢ अध्यक्ष , सचिव व खजिनदार हे या समितीचे पदाधिकारी असून ते पदाधिकारी निवडत असताना त्या महिलाच असल्या पाहिजेत याची खबरदारी घ्यावी लागते .

➢ **भूमिका** ः

- महिला ग्रामसभा बोलविणे व महिला सक्षमीकरण आराखडा तयार करणे .
- पाणी व स्वच्छता याविषयी आपले म्हणणे काय आहे ते ग्रामसभेपुढे मांडणे .
- पाणी व स्वच्छतेसंबंधित गरजांची पडताळणी करताना व नियोजन करताना महिलांना सहभागी करून घेणे .
- महिलांची निवड करून त्यांना जोडधंदा शिकण्यासाठी प्रशिक्षण देणे .
- ग्रामपंचायत व सर्व समित्या यांच्याशी संपर्क व संवाद राखणे .

**५ . सामाजिक लेखा परीक्षण समिती ः रचना व भूमिका –**

➢ **रचना** ः

या समितीत

- कमीत कमी १२ किंवा जास्तीत जास्त २४ सदस्य असतील .
- त्यापैकी एक तृतियांश सदस्य ग्रामपंचायत सदस्यांतून निवडलेले असतील .
- ५0% सदस्य महिला असतील .
- हिशोब व नोंदिच्या कामाचा अनुभव असलेला किमान एक सदस्य असेल .
- बांधकाम क्षेत्राचा अनुभव असलेला किमान एक सदस्य असेल .
- एकच व्यक्ती एकाच वेळी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आणि सामाजिक लेखा परीक्षण समिती या दोन समित्यांची सदस्य असू शकणार नाही .

➢ **पदाधिकारी** ः या समितीत अध्यक्ष व सचिव हे दोनच पदाधिकारी असतात .

➢ **भूमिका** ः

सामाजिक लेखा परीक्षण समितीला प्रकल्प प्रक्रियेवर देखरेख करणे व जलस्वराज्याच्या नियम जसे सहभागी कार्यपध्दती, पारदर्शकता, मालकी व जबाबदारी सर्व समावेशकता आणि आर्थिक जबाबदारी याचे पालन करणे या नियमाच्या अधिन राहून या जबाबदा-या पार पाडाव्या लागतात . तसेच सामाजिक लेखा परीक्षण समितीला वेळोवेळी जिल्हा परिषद व ग्रामसभेमध्ये अहवाल सादर करावे लागतात . या अहवालावर ग्रामसभेमध्ये चर्चा करून पुढील कार्यवाही काय असेल हे निश्चित केले जाते . लेखा

परीक्षण अहवालावर चर्चा करण्यासाठी सामाजिक लेखा परीक्षण समिती आवश्यकतेनुसार विशेष ग्रामसभा बोलावू शकते.

याचप्रमाणे ही समिती खालील बाबीसंदर्भात अधिक दक्ष असते.

- निधीचा योग्य वापर
- खरेदी व्यवहारात पारदर्शकता
- बांधकामातील प्रगती
- साहित्याचा निर्धारित कामासाठी उपयोग
- गावकृती आराखडयानुसार प्रकल्प अमलबजावणी
- अभिलेख पूर्ण आहेत किंवा नाहीत यावर लक्ष देणे
- योजनेचा लाभ गावातील सर्व घटकांपर्यंत खास करून गरीब व पिडीत लोकांपर्यंत पोहचत आहे की, नाही हे पाहणे.
- महिला, आदिवासी व इतर पिडीत लोक प्रकल्पातील सर्व टप्प्यामध्ये, निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत का नाही हे पाहणे.
- गावाला एखादी बाब गंभीर वाटत असेल तर त्यावर लेखा परीक्षण समिती आपले अभिप्राय देईल.

**६. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ः रचना व भूमिका -**

ही समिती प्रकल्पातील महत्त्वाची समिती असून या समितीकडून प्रकल्पाची अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणी व्हावी म्हणून तिची विशेष पध्द्तीने रचना केली जाते. तसेच विशेष भूमिका आणि अधिकार असतात.

➢ **रचना** ः

या समितीत

- कमीत कमी १२ सदस्य व जास्तीत जास्त २४ सदस्य असले पाहिजेत.
- कमीत कमी एक तृतियांश सदस्य ग्रामपंचायत सदस्यातून निवडलेले असावेत.
- ५0 टक्के महिला सदस्य असल्या पाहीजेत.
- गावपातळीवरील महिला मंडळ, युवक मंडळ अशा संस्थाना प्रतिनिधीत्व असले पाहीजे.
- महिला सदस्यामध्ये ३0 टक्के मागासवर्गीय महिला असल्या पाहिजेत.
- समितीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदारांची निवड करताना महिलांना प्राधान्य दयावे.

➢ **पदाधिकारी** ः

या समितीमध्ये प्रामुख्याने अध्यक्ष, सचिव व खजिनदार हे तीन प्रमुख पदाधिकारी असावेत अशी रचना केलेली असते.

➢ **भूमिका** ः

● ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समिती ही प्रकल्पातील एक प्रमुख संस्था आहे. प्रकल्प नियोजन अंमलबजावणी व व्यवस्थापन यामध्ये सर्व ग्रामस्थ सहभागी होत आहेत की नाही हे पाहण्याची जबाबदारी या समितीची असते यासंदर्भातील कार्यवाही योग्य पध्दतीने होते की नाही हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसभा आणि ग्रामपंचायत यांच्यावर असते.

➢ **अधिकार व कर्तव्ये** ः

● गावातील पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधा यांची सद्यस्थिती समजून घेणे व अडचणीवर चर्चा करून व त्यावर उपाय सुचविणे.
● पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्थेचे विविध पर्याय शोधणे.
● उपसमित्यामध्ये समन्वय राखणे.
● लोकवाटा व पाणीपटट्टी हे वेळेवर जमा होतील हे पाहणे.
● दुरूस्ती व देखभाल यासाठी विविध कामे करवून घेणे,त्यात योग्य समन्वय राखणे.

## ❖ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या उपसमित्या ः-

➢ **रचना** ः

ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या तीन उपसमित्या असून त्यांची रचना व भूमिका अशी आहे.

● सर्व साधारण प्रत्येक उपसमित्यामधील सदस्यांची संख्या ४ ते ६ इतकी असावी. त्यापैकी किमान ५0% सदस्य महिला असाव्यात.

अ) **खरेदी समिती** ः

**भूमिका -**

● गाव कृती आराखडयाची अमलबजावणी करताना लागणा-या विविध वस्तुंच्या (साहित्य व अवजारे) किमती बाजारपेठेतून मिळविणे.
● कोटेशन व बिलांची पडताळणी करून ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे शिफारस करणे.

● प्रकल्प अमलबजावणीसाठी लागणा-या सर्व साहित्याचा दर्जा तपासून खरेदी करणे.

**ब) हिशोब समिती ः**

**भूमिका -**

● गाव कृती आराखडयानुसार निधीचा वापर केला जात आहे की, नाही याची खात्री करणे.

● खरेदी संदर्भातील कागदपत्रे उदा. कोटेशन, बिले इ. ची छाननी करून ती नियमानुसार आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करणे.

● साहित्य पुरवठादारांना त्यांचे पैसे देणे.

● पैशाचे योग्य व्यवस्थापन करून सर्व खर्चाच्या निधीच्या नोंदी व्यवस्थित ठेवलेल्या आहेत की, नाही याची खात्री करणे.

● हिशोब लिहणा-याची नेमणूक करणे.

**क) देखरेख समिती ः**

**भूमिका -**

● बांधकामावर देखरेख करून करारातील तपशीलानुसारच बांधकामातील मोजमापे आणि दर्जा राखला जात आहे की, नाही याची खात्री करणे.

● कामगारांना सल्लागारांना व कंत्राटदारांना त्यांचे पैसे देण्याची शिफारस हिशोब समितीला करणे.

● प्रकल्प अमलबजावणीत सहभागी असणा-या सर्व लोकामध्ये समन्वय राखणे.

**७. बहुग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ः**

➢ **रचना ः**

या समितीची रचना आणि भूमिका खालील प्रमाणे निश्चित केलेली असते.

● कमीत कमी १२ सदस्य व जास्तीत जास्त २४ सदस्य संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मधून निवडलेले असावेत.

● जर सर्व गावे एकाच तालुक्यातील असतील तर या समितीच्या कामावर पंचायत समिती देखरेख ठेवेल. जर गावे एकापेक्षा जास्त तालुक्यातील असतील तर जिल्हा परिषद (जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता समिती) देखरेख ठेवेल.

➢ **भूमिका ः**

- समान वाटप तत्वावर आधारित पाण्याचा पुरवठा होईल असे नियोजन तयार करणे.
- हिशोब व नोंदी ठेवणे.
- कंत्राटदार व अन्य सेवा मिळविणे.
- प्रकल्पांची अमलबजावणी व प्रकल्प निधीचे व्यवस्थापन करणे.
- सार्वजनिक सुविधांची दुरूस्ती व देखभालीची कामे पाणीपट्टीतून करणे.

**८. आदिवासी पाडा पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ः**

या समितीची रचना आणि भूमिका खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

➢ **रचना ः**

या समितीत

- कमीत कमी १२ व जास्तीत जास्त २४ सदस्य असले पाहिजेत.
- कमीत कमी ७५% सदस्य हे आदिवासी समुहाचे असावेत.
- ५०% सदस्य हे महिला असाव्यात.
- महिला मंडळ, युवक मंडळ व स्थानिक स्वयंसेवी संस्थांना प्रतिनिधीत्व असले पाहिजे.
- आवश्यकतेनुसार दोन किंवा अधिक पाडे एकत्र येऊन बहुपाडा पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तयार करावी.
- समितीचे अध्यक्ष , सचिव व खजिनदारांची निवड करतांना महिलांना प्राधान्य दयावे.

➢ **भूमिका ः**

- निधी जमा करण्यासाठी पाडा समितीचे बँक खाते उघडणे.
- उपलब्ध सुविधेत सुधारणा व नव्या सुविधांची (गरजेनुरूप) मागणी करणे.
- सहभागी पध्दतीने पाडयावरील पाणी व स्वच्छता यासंबंधी सद्य परिस्थिती पुढे आणणे.
- पाडा स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्थेचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत ते शोधणे.
- ५% लोकवर्गणी जमा करणे.
- दुरूस्ती व देखभालीसाठी कामे करवून घेणे व त्यात ताळमेळ राखणे.

# संदर्भ


१. Wise Coastal Practices for sustainable Human Development Forum, People's participation in water conservation/Gujrat – India. Posted by : Rupa Abdi Desai and Bharati Mehta 16 Nov. 2000, In Response To : Local Solutions : recharge of wells/Kathiwar – India [Vidyut Joshi and H.C. Dube] downloaded from the website : www.Jalswarajya @ mahawssd.gov.in

२. Santhnam M.L., article Published in 'Social Change' March 1989, val. 19, No.1

३. Wise Coastal Practices for sustainable Human Development Forum, Local Solutions : recharge of wells/Kathiawar – India. Posted by: Vidyut Joshi and H.C. Dube, 13 July 1999. Downloaded from the website: www. Jalswarajya @mahawssd. gov.in

४. नारायणराव डी.एल., योजना, अंक ११, जलव्यवस्थापन काळाची गरज, भांडवलकर आर. बी., जून २00७ पृ. क्र. ४२.

५. देसाई दत्ता ः जलयुध्द की जलक्रांती?, दुसरी आवृत्ती, लोकवाङःमय गृह. मुंबई , फेब्रुवारी २00५ , पृ. क्र. 0६.

६. साळुंखे सर्जेराव, 'जलव्यवस्थापन एक आव्हान' दैनिक सकाळ दि. २७ डिसेंबर २000.

७. D'souza A.L. article on "The International Drinking Water supply and Sanitation Decade" is Published in yojana, June 1st, vol.15, 1985, P.16-17.

८. Chakrawati A.K., article on "Drinking Water Supply and Sanitation Decade in India" Indian Journal of Public Health, vol.xxxv, No.1, Jan – March, 1991, P.P. – 4.

९. घारे मुकूंद ः 'सहभागीय पाणलोट क्षेत्र विकास हस्तग्रंथ' अफार्म प्रकाशन पुणे, एप्रिल २००० पृ. क्र. ३.

१०. देसाई दत्ता , उनि. पृ. क्र. १०१

११. 'जलस्वराज्य' पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ः महाराष्ट्र शासन, पृ.क्र. २ व ३.

१२. शासन निर्णय क्र. जस्वप्र २००३/प्र.क्र. ३५५३/पृ.क्र. ११ मंत्रालय मुंबई ४०००३२.

१३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन, 'ग्रामस्थासाठी प्रकल्प कार्य वाहिची पुस्तिका - प्रकल्प आणि यंत्रणा, मे २००५ , पृ. क्र. ३.

१४. भोंगळे सुधीर ः विकासवाटा, प्रथमावृत्ती, सुशांत प्रकाशन, पुणे. २००५ पृ.क्र.१९

प्रकरण २ रे

# पध्दतिशास्त्र

२.१ प्रस्तावना

२.१.१ अध्ययन विषयाची निवड

२.१.२ अध्ययन विषयाचे महत्व

२.१.३ अध्ययन विषयाची उद्दिष्टये

२.१.४ गृहितकृत्ये

२.१.५ अध्ययन क्षेत्र

२.१.६ अध्ययन कालावधी

२.१.७ अभ्यासाच्या मर्यादा

२.२ संशोधन पध्दती

२.२.१ प्रस्तावना

२.२.२ नमुना निवड

२.२.३ तथ्यसंकलनाचे स्त्रोत

## प्रकरण २ रे

# पध्दतीशास्त्र

### २.१ प्रस्तावना ः-

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर अभ्यास करण्यात आलेला आहे. अर्थात कोणताही अभ्यास करीत असताना तो अधिक वैज्ञानिक आणि वस्तुनिष्ठ होण्यासाठी वास्तव स्वरूपातील तथ्यसंकलन होणे आवश्यक असते. कारण तथ्यसंकलन जेवढे वस्तुनिष्ठ तेवढेच त्या अभ्यासातून काढले जाणारे निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ असतात. समाजशास्त्रामध्ये वेगवेगळया घटनांचा, समस्यांचा, परिस्थितीचा किंवा विविध प्रकारे निर्माण करण्यात आलेल्या समाजहितांसाठीच्या प्रकल्पांचाही अभ्यास केला जातो. अर्थात वेगवेगळया विषयांचा अभ्यास केला जात असताना संशोधक वेगवेगळया प्रकारच्या संशोधन अभ्यासपध्दतींचा अवलंब करीत असतात. कारण एकाच अभ्यास पध्दतीने सर्व प्रकारच्या घटना किंवा समस्यांचा अभ्यास करता येत नाही किंवा एखादया अभ्यासाला सर्व प्रकारच्या अभ्यासपध्दती लागू होत नाहीत म्हणजेच एखादा अभ्यासविषय हाच अभ्यास पध्दती निश्चित करीत असतो आणि म्हणूनच संशोधक अभ्यासविषयाच्या अनुषंगाने अभ्यासपध्दती निश्चित करून संशोधन करीत असतात.

अर्थात संशोधन म्हणजे काय? याचा विचार करताना थेऊडरसन आणि थेऊडरसन म्हणतात "संशोधन म्हणजे सर्वसामान्य तत्वे किंवा नियम मांडण्याच्या हेतूने एखादया समस्येचा पध्दतशीरपणे व वस्तूनिष्ठ दृष्टीकोनातून केलेला प्रयत्न होय."[१]

याचप्रमाणे वैज्ञानिक अभ्यासपध्दतीचा उहापोह करताना थेऊडरसन आणि थेऊडरसन म्हणतात "वैज्ञानिक अभ्यासपध्दती म्हणजे निरीक्षण, प्रयोगपध्दती, सामान्यीकरण, पडताळणी याद्वारे प्राप्त केलेल्या वैज्ञानिक ज्ञानाची विशिष्ट पध्दतीने केलेली बांधणी किंवा रचना होय."[२]

प्रस्तुत शोधप्रबंधामध्येही वैज्ञानिक अभ्यासपध्दतीचा आधार घेऊनच अभ्यास करण्यात आलेला आहे आणि हया संशोधन अभ्यासपध्दतीचा अवलंब करताना खालील महत्वाच्या मुद्दयांचा आधार घेण्यात आलेला आहे.

## २.१.१ अध्ययन विषयाची निवड

भारत हा खेड्डयांचा देश असून शेती हा खेडयातील लोकांचा व्यवसाय आहे की, ज्यामुळे भारत देशाचा उल्लेख खेड्डयांचा देश म्हणून केला जातो. एवढेच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा शेती व्यवसाय हा कणा मानला जातो. तथापि शेती व्यवसाय पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होता. मात्र अलिकडे नैसर्गिक चक्रच अनियमित झाल्याने शेतीला मिळणाऱ्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्याहीपेक्षा माणसाला पिण्याचे पाणी मिळणे ही देखील एक अधिक गंभीर समस्या बनली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नैसर्गिक स्त्रोते आटू लागली तर मानवनिर्मित स्त्रोते निर्माण करूनही माणसाची पिण्याच्या शुध्द व पुरेशा पाण्याची गरज भागेनाशी झाली. म्हणूनच यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने विविध प्रकारे प्रयत्न केले असले तरी एका नव्या प्रकल्पाची उभारणी करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच 'जलस्वराज्य' प्रकल्पाच्या संदर्भात प्रस्तुत शोधप्रबंधात यशापयशाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

"भारत देश भौगोलिक दृष्टया तलाव, नद्या, समुद्र आणि निसर्ग यांनी संपन्न असलेला देश आहे. एक दोन प्रांत वगळता सर्वत्र पावसाचे प्रमाणही समाधानकारक आहे. केरळ, आसाम, कोकण, गोवा यासारख्या राज्यात भरपूर पाऊस आहे तर राजस्थान, गुजरात व थरचे वाळवंट इथे पाऊस फारच कमी आहे. भागामध्ये अत्यंत कमी पाऊस आहे तेथे पावसाचे छतावरील पाणी साठविण्यासाठी हौद, कुंड व जोहडसारखे तलावही बांधल्याचे पहावयास मिळते."[३]

महाराष्ट्राचा विचार केल्यास "पूर्वी महाराष्ट्र हा तलावांचा प्रदेश म्हणून ओळखला जात होता. पण कालांतराने माणसांनी स्वत:च्या स्वार्थासाठी निसर्गावर आक्रमण करावयला सुरूवात केली. वृक्षतोड मोठया प्रमाणात केली. पूर्वीच्या तलावांच्याकडे फारसे लक्ष न दिल्यामुळे ते तलाव कालांतराने गाळाने भरून गेले. कित्येक तलावात भराव घालून ते बुजवून त्यावर लोकांनी इमारती बांधल्या."[४]

अलिकडे मानवी समाजाची पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढतच आहे. आज उद्योगधंदयासाठी, ऊर्जानिर्मितीसाठी व जलसिंचनासाठी पाण्याची मोठया प्रमाणात मागणी आहे. लोकसंख्या वाढेल तसे पिण्यासाठीही पाणी मोठया प्रमाणात हवे आहे. पण अलीकडे निसर्गही अनियमित झाला असल्याने पाण्याची टंचाई दिवसेंदिवस वाढतच आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील सर्व गोष्टीचा विचार करून पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आतापर्यंत कोटयावधी रूपये खर्चही केले. पण तरीही अनेक गावातील लोकांची पाण्यासाठीची भटकंती थांबली नाही. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लोकांचा दिवसातील बराच वेळ खर्च होत आहे. त्यामुळे शासनाने २७ जुलै २००० पासून पुरवठा आधारित धोरणानुसार कार्यक्रम न देता मागणी व लोकसहभागावर आधारित कार्यक्रम देण्यास सुरूवात केली. या नवीन धोरणानुसार महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वजलधारा, शिवकालीन पाणी साठवण योजना व आपलं पाणी यासारख्या अनेक योजना प्रमाणेच 'जलस्वराज्य' ही एक नवीन योजना (प्रकल्प) आहे.

'जलस्वराज्य' प्रकल्पामध्ये प्रामुख्याने पिण्याचे पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण या बाबींना अधिक प्राधान्य देऊन हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. तथापि जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला का? या प्रकल्पाला अपेक्षित असा लोकसहभाग मिळाला का? प्रकल्पित गावातील अस्वच्छता, रोगराई या समस्या सुटण्यास प्रकल्पाची किती मदत झाली? महिलांचे सक्षमीकरण करण्यात या प्रकल्पाला कितपत यश आले? अर्थात शासनाने ज्या उद्देशाने ही योजना सुरू केली त्याला कितपत यश मिळाले? या व इतर अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्याच्या उददेशाने 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास' या संशोधन विषयाची निवड केली आहे.

## २.१.२ अध्ययन विषयाचे महत्व

महाराष्ट्र शासनाने अगदी सुरूवातीपासूनच ग्रामीण भागाच्या विकासाकडे आणि विशेषता दुर्गम भागातील गावांच्या विकासाकडे अधिक लक्ष दिलेले आहे. विशेषत: मानवाला अधिक आरोग्यदायी आणि सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी ज्या वेगवेगळया योजना राबविल्या गेल्या त्यामध्ये शुध्द व पुरेसे पाणी आणि स्वच्छता या सुविधा देण्यावर भर दिला. परंतु अलिकडे स्वच्छतेच्या दृष्टीने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, संपूर्ण स्वच्छता अभियान, हागणदारी हटाव व निर्मल ग्राम पुरस्कार यासारख्या योजना चालू आहेत. तर पाण्याच्या संदर्भात १९७२- ७३ पासून केंद्रशासनाच्या 'वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत' व राज्य शासनाच्या 'किमान गरजा कार्यक्रमांतर्गत' ग्रामीण

पाणी पुरवठा योजना सुरू होती. पण त्यामध्ये ग्रामीण जनतेचा पुरेसा सहभाग नसल्यामुळे या योजनांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे केंद्रशासनाने वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी एप्रिल १९९९ मध्ये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. व राज्य शासनाने २७ जुलै २000 पासून जुन्या पुरवठा आधारीत धोरणाऐवजी मागणी व लोकसहभागावर आधारित आपलं पाणी, शिवकालीन पाणी साठवण योजना आणि स्वजलधारा यासारख्या योजना कार्यान्वित केल्या तर याच धोरणाच्या आधारे २६ जिल्हयासाठी 'आमचं गाव आमचं पाणी' आणि 'स्वच्छतेतून समृध्दीकडे' या तत्वावर आधारलेला 'जलस्वराज्य' प्रकल्प सुरू करून एक पाऊल पुढे टाकले आहे.

२७ जुलै २000 पूर्वीच्या योजनांच्यामध्ये 'शासनाचा पुढाकार त्यात लोकांचा सहभाग' असे धोरण होते पण या 'जलस्वराज्य' प्रकल्पामध्ये 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' असे धोरण ठरविले. या प्रकल्पामध्ये प्रामुख्याने ग्रामस्थांना शुध्द व पुरेसे पाणी, संपूर्ण स्वच्छता व महिला सक्षमीकरण या बाबींच्यावर अधिक भर दिला जात आहे. म्हणूनच या प्रकल्पाचे नेमके स्वरूप कसे आहे? हा प्रकल्प कशाप्रकारे खेडयांच्या पर्यंत जाऊन पोहोचणार आहे? हा प्रकल्प कसा कार्यान्वित होणार आहे? यामध्ये समाज आणि शासन यांच्या नेमक्या कोणत्या भूमिका असणार आहेत? आणि या प्रकल्पाच्या परिपूर्ततेसाठी एकूण कामाचे नियोजन आणि नियंत्रण कशाप्रकारचे असणार आहे? एकूण या प्रकल्पाचे यशापयश अभ्यासण्याच्या दृष्टिकोनातून असणारे महत्व लक्षात घेऊनच हा विषय निवडलेला आहे.

### २.१.३ <u>अध्ययन विषयाची उद्दिष्टये</u>

महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाच्या अनेक प्रकारच्या समस्या असून त्यापैकी पिण्याचे पाणी ही एक महत्वाची आणि गंभीर समस्या आहे. या समस्येची सोडवणूक करण्यासाठी शासनाने आतापर्यंत अनेक प्रयत्न केले आहेत पण त्यामध्ये फारसे यश आलेले नाही.त्यामुळे शासनाने जुन्या पुरवठा आधारित धोरणाऐवजी लोकसहभागावर आधारित धोरण आखले. या बदलत्या धोरणानुसार ग्रामीण जनतेचा पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविलेल्या अनेक कार्यक्रमापैकी महाराष्ट्रातील जनतेला मनापासून आवडलेला 'जलस्वराज्य' हा एक महत्वाचा प्रकल्प आहे. हा विषय अतिशय जिव्हाळयाचा, महत्वाचा आणि अभ्यासाच्यादृष्टीने आवश्यक वाटल्यानेच 'कोल्हापूर

जिल्यातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास’ हा संशोधन विषय निवडला आहे. या संशोधन विषयाची खालील उद्दिष्टये समोर ठेऊन अभ्यास केलेला आहे.

१. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी झालेल्या गावामधील प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या पूर्वीची व नंतरची परिस्थिती अभ्यासणे.

२. जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील, वाडी - वस्तीवरील लोकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळाले का? याचा अभ्यास करणे.

३. जलस्वराज्य प्रकल्पामुळे ग्रामस्थांना घर व परिसर नियमित स्वच्छ ठेवण्याची सवय लागली का? याचा अभ्यास करणे.

४. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाले का? याचा अभ्यास करणे.

५. गावातील गरीब व दुर्बल घटक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होतात का? याचा अभ्यास करणे.

६. जलस्वराज्य प्रकल्पाला ग्रामस्थांचा सहभाग कितपत मिळाला? याचा अभ्यास करणे.

७. जलस्वराज्य प्रकल्पातील शासनाची भूमिका अभ्यासणे.

८. जलस्वराज्य प्रकल्पाचे यशापयश अभ्यासणे.

## २.१.४ गृहितकृत्ये

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकासाचा एक भाग म्हणून शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा, स्वच्छता आणि महिला सक्षमीकरण या गोष्टींच्यावर भर देऊन हा प्रकल्प कार्यान्वित केला. या प्रकल्पाच्या संदर्भात शासकीय यंत्रणा, सहाय्यकारी संस्था आणि ग्रामस्थ या तीन घटकांचा यामध्ये अधिक सहभाग असल्याचे दिसून येते. वरील तिन्ही पातळीवरून नेमकी कोणती भूमिका घेतली जात आहे? हा प्रकल्प सुरू करण्यामागचा शासनाचा कोणता हेतू आहे? या प्रकल्पाचे एकूण स्वरूप, अंमलबजावणी आणि यशापयशाच्या संदर्भात संशोधकाने आपल्या प्राथमिक निरीक्षण आणि अभ्यासाच्या आधारे काही महत्वाची गृहित कृत्ये मांडून अध्ययन केलेले आहे.

१. शासकीय योजनांच्याबददल ग्रामीण जनतेमध्ये जागृती आणि आपुलकी निर्माण करण्यात हा प्रकल्प यशस्वी झालेला आहे.

२. या प्रकल्पामुळे ग्रामसभांना बळकटी आलेली आहे.

३. गावातील गटतट, हेवेदावे कमी होऊन विकास कामात लोकांचा सहभाग वाढण्यास मदत झालेली आहे.

४. गावामध्ये स्वच्छता, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होण्यास मदत झालेली आहे.

५. या प्रकल्पामुळे गावातील महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत झालेली आहे.

६. या प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी, शिक्षक, तरूण मंडळे, महिला बचत गट व सहकारी संस्थांचा मोलाचा वाटा आहे.

७. जलस्वराज्य प्रकल्प परिपूर्ण करण्यासाठी शासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आहे.

### २.१.५ अध्ययन क्षेत्र

'जलस्वराज्य' हा प्रकल्प महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये राबविला जात आहे. संशोधक हा कोल्हापूर जिल्हयातील असून इतर कोणत्याही जिल्हयाचा अभ्यास करण्यापेक्षा आपल्या जिल्हयाचा अभ्यास करणे त्यांना महत्वाचे आणि संयुक्तिक वाटणे स्वाभाविकच आहे. विशेष म्हणजे कोल्हापूर जिल्हा भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण आहे. तथापि इतर जिल्हयापेक्षा कोल्हापूर जिल्हयातील गावांशी संपर्क ठेवणे हे भौगोलिकदृष्टया सोयीचे आहे. याचप्रमाणे सदर संशोधनाला योग्य न्यायही देता येणे सहज शक्य असल्यानेच कोल्हापूर जिल्हयाची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड केलेली आहे.

### २.१.६ अध्ययन कालावधी

जलस्वराज्य प्रकल्पाच्या अभ्यासासाठी कोल्हापूर जिल्हा हे अध्ययन क्षेत्र म्हणून निवडण्यात आले. कोल्हापूर जिल्हयाची भौगोलिक रचना एकसारखी नसून जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी झालेली गावे एकमेकापासून दूर आहेत. अर्थातच तथ्यसंकलनासाठी एखादया गावात गेल्यानंतर त्या गावातील शासकीय अधिकारी व उत्तरदाते एकाचवेळी भेटत नव्हते. त्यामुळे एका एका गावाला ३ ते ४ वेळा भेटी दयाव्या लागल्या. त्यामुळे अध्ययनासाठी निवडलेल्या २५ गावांमधून माहिती संकलित करण्यासाठी बराच वेळ दयावा लागला.

संशोधन प्रक्रिया सुरू करण्यापासून ते शोध प्रबंध सादर करण्यापर्यंतचा कालावधी सुरूवातीला जुलै २००७ ते जुलै २०११ हा चार वर्षांचा अपेक्षित धरलेला होता. परंतु एकूण अभ्यासाचा विस्तार आणि येणाऱ्या अडचणींचा विचार करून कॉलेजच्या

कामकाजाची वेळ सोडून मिळेल तो वेळ आणि दिवस तथ्य संकलन करण्यासाठी आणि शोधप्रबंधाचे काम पूर्ण करण्यासाठी अगदी जिद्दीने झोकून दिल्यानेच अपेक्षित धरलेल्या (जुलै २०११) वेळेच्या आत शोध प्रबंधाचे काम पूर्ण केले गेले.

## २.१.७ अभ्यासाच्या मर्यादा

जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास करीत असताना संशोधकाने काही विशिष्ट हेतू समोर ठेऊन अगदी आत्मविश्वासाने हा विषय निवडून व माहिती संकलित करून वस्तुनिष्ठ परिस्थिती जाणून घेण्याचा आणि अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु प्रत्यक्ष अभ्यासाच्या दृष्टीने माहिती संकलीत करीत असताना ज्या मर्यादा आढळून आल्या त्या खालीलप्रमाणे --

१. संशोधकाने ज्या ज्या खेडयांची तथ्यसंकलित करण्याच्या दृष्टीने निवड केली त्या सर्वच खेडयातील घटकांच्याकडून वस्तुनिष्ठ माहिती पुरविली गेली असेलच असे नाही.

२. समिती, पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये माहिती पुरविण्याच्या दृष्टीने समन्वय असलेला आढळला नाही.

३. प्रत्येक खेडयाला भेटी देऊन प्रश्नसूचीच्या आधारे मुलाखत घेऊन मिळविलेली माहिती आणि प्रकल्पाची प्रक्रिया चालू असल्यामुळे संशोधकाने जेंव्हा शोधनिबंध सादर केलेला आहे तेंव्हा त्या माहितीमध्ये फरक पडणार आहे. उदा.बचत गटाची संख्या, शौचालयांची संख्या.

४. जलस्वराज्य प्रकल्प हा नव्याने सुरू केला असल्यामुळे या संकल्पनेसंबंधी/ प्रकल्पासंबंधी शासनाकडून फक्त माहिती पुस्तिका व प्रकल्प कार्यवाहीची मार्गदर्शिका प्रकाशित केलेली आहे. पण या संदर्भात जेवढे लिखित साहित्य उपलब्ध असावयास पाहिजे होते ते आढळले नाही आणि संशोधकाच्या माहितीप्रमाणे या विषयावर कोणी तज्ज्ञ व्यक्तीने देखील सविस्तर लिखाण फारसे केलेले नाही. परंतु कोल्हापूर जिल्हयातील बोरपाडळे (ता.पन्हाळा) या खेडयातील जलस्वराज्य प्रकल्पाचा एम.फील साठी केलेला अभ्यास वगळता इतर कोणी संशोधन केल्याचे माहित नाही. संशोधकाने हा विषय सर्व प्रथम संशोधनास घेतला असल्याने उपलब्ध माहिती शिवाय पुरेशी आणि संदर्भासहित माहिती देणे अशक्य आहे.

तथापि संकलित केलेल्या वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारेच सविस्तर, सूक्ष्म आणि वस्तुनिष्ठ संशोधन करून शोधप्रबंध पूर्ण केलेला आहे. परंतु हा प्रकल्प कार्यान्वित असल्याने काळानुसार होणारा बदल ग्राहय धरला तर संशोधक ज्या एका विशिष्ट परिस्थीतीमध्ये जे निष्कर्ष मांडतील ते त्या परिस्थीतीत योग्य आणि वैज्ञानिकदृष्टया वस्तुनिष्ठच असतील. त्यामुळे या प्रकल्पाच्या प्रगतीमध्ये होणारा बदल संशोधकाने ग्राहयच धरलेला आहे.

## २.२ संशोधन पध्दती

### २.२.१ प्रस्तावना

अध्ययनासाठी निवडलेल्या 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाच्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी अगोदरच निश्चित केलेल्या खेडयांची प्रथम पाहणी करून एकूण संशोध्य विषयाच्या संदर्भातील लोकांची जाणीव जागृतीही तपासून पाहण्यात आली. अर्थात महाराष्ट्र शासनाने नव्याने सुरू केलेल्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टीने महत्वाचे आणि आवश्यक असणाऱ्या पुरेसे व शुध्द पाणी आणि स्वच्छता या नियोजित जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास करणे अवघड आहे तरी संशोधकाने आपल्या अभ्यासाचे क्षेत्र कोल्हापूर जिल्हा निश्चित करून निवडलेल्या खेडयांचा अभ्यास करून वस्तुनिष्ठ माहिती मिळवून वैज्ञानिक अभ्यास पध्दतीला कुठेही बाधा न पोहचविता तटस्थ वृत्तीने अध्ययन विषयाला योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे.

### २.२.२ नमुना निवड

एकंदरीत कोणत्याही विषयाचा अभ्यास करीत असताना तो अधिक वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक व्हावा यादृष्टीने प्रत्येक संशोधक प्रयत्न करीत असतो. अर्थात याही विषयाच्या संदर्भात संशोधकाने आपला अध्ययन विषय अतिशय वस्तुनिष्ठपणे अभ्यासण्यासाठी समाजशास्त्रामध्ये ज्या अनेक वैज्ञानिक अभ्यासपध्दती आणि अध्ययन तंत्रे उपलब्ध आहेत त्यापैकी नमुना तंत्राचा अवलंब केलेला आहे. संशोधकाने आपल्या अभ्यासाला एक वैज्ञानिक रूप देण्याच्या आणि योग्य न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून नमुना निवड तंत्रातील सहेतुक यादृच्छिक निवड पध्दतीचा अवलंब करून तथ्यसंकलन केलेले

आहे. संशोधकाने सहेतुक निवड पध्दतीचा चार पातळीवर अवलंब करून नमुना निवड केलेली आहे.

१. <u>जिल्हा</u>

महाराष्ट्रामध्ये एकूण ३५ जिल्हे असून जलस्वराज्य हा प्रकल्प महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये सुरू आहे. या २६ जिल्हयातून सहेतुक यादृच्छिक निवड तंत्राचा अवलंब करून 'कोल्हापूर जिल्हयाची' निवड केली आहे. अर्थात संशोधकाला अनेक दृष्टीकोनातून कोल्हापूर जिल्हा हा आपला व अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचा वाटल्यानेच या जिल्हयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

२. <u>तालुका</u>

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा हा अनेक बाबतीत महत्वाचा आहे. विशेषत: क्रिडा , सांस्कृतिक क्षेत्र, व्यापार आणि सहकार याबाबतीतही नावारूपाला आलेला जिल्हा आहे. या जिल्हयाला वैविध्य स्वरूपातील निसर्ग लाभला आहे. या जिल्हयामध्ये बारा तालुके असून या सर्व बारा तालुक्यामध्ये एकूण ११९६ गावे आहेत. तथापि ११९६ गावांपैकी ११५ गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू आहे. अर्थात तालुका निवडीच्या बाबतीत जनगणना तंत्राचा अवलंब करून सर्वच्यासर्व म्हणजे १२ तालुक्यांची संशोधकाने अध्ययनासाठी निवड केलेली आहे.

३. <u>गावे</u>

कोल्हापूर जिल्हयामध्ये १२ तालुके असून या १२ तालुक्यामध्ये एकूण ११५ गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू आहे. अर्थात प्रत्येक तालुक्यामध्ये प्रकल्प सुरू असणारी गावे ही कमी अधिक प्रमाणात असून एका तालुक्यामध्ये एकच गाव तर दोन तालुक्यामध्ये प्रत्येकी ३ गावे या प्रकल्पामध्ये सहभागी झालेली आढळली.

संशोधकाला १२ तालुक्यातील २५ खेडयांचा अभ्यास करावयाचा असल्याने त्यांनी १२ तालुक्यातील २२% (२१.७३%) प्रमाणे २५ खेडयांची सहेतुक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड केलेली आहे. जर २0% प्रमाणे खेडयांची निवड केली गेली असती तर सर्वच तालुके समप्रमाणात नमुना निवडीसाठी सक्षम नसल्याने म्हणजे राधानगरी (३खेडी), शिरोळ (३ खेडी) व शाहूवाडी (१ खेडे) प्रकल्पित असल्याने या तीन तालुक्यांना निवडीमध्ये संधीच मिळाली नसती म्हणून अभ्यासाच्या सोयीसाठी व सर्व तालुक्यांना समान न्याय देण्याच्या दृष्टीनेच २२% (२१.७३%) प्रमाणे २५ खेडयांना

संधी देऊन त्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या ठिकाणी वैज्ञानिकतेला कुठेही बाधा आणलेली नाही. म्हणूनच हा अभ्यास अधिक समतोल ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

४. उत्तरदाते

संशोधकाने संशोध्य अभ्यासासाठी निवडलेल्या २५ खेडयामधून उत्तरदात्यांची निवड केलेली आहे. अर्थात जलस्वराज्य प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने काही महत्वाची उद्दिष्टये समोर ठेऊन एक यंत्रणा निर्माण केलेली आहे की, ज्या यंत्रणेमध्ये शासन पातळीवरील आणि स्थानिक पातळीवरील अनेक घटक सहभागी झालेले आहेत. विशेषत: जिल्हा परिषदेमधील शासकीय अधिकारी, सहाय्यकारी संस्था, ग्रामपंचायत सरपंच, जलस्वराज्य प्रकल्पाच्या प्रमुख तीन समितीचे पदाधिकारी (ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजिक लेखा परीक्षण समिती) हिशोबनीस, ग्रामदूत यांचा सहभाग महत्वाचा आहे. अर्थात वरील सर्व घटक हे अभ्यासातील उत्तरदाते असून ज्या घटकांची सदस्यसंख्या अधिक आहे त्यांच्यामधून सहेतुक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने समप्रमाणात उत्तरदात्यांची निवड ग्राहय धरूनच त्यांच्याकडून माहिती संकलित केलेली आहे.

याबरोबरच सदर अभ्यासामध्ये या प्रकल्पामध्ये महिलांना आणि दुर्बल घटकांना संधी मिळालेली आहे का? या बाजूवरही संशोधकाने अधिक लक्ष केंद्रीत केलेले आहे.

## २.२.३ तथ्यसंकलनाचे स्त्रोत

कोणत्याही शास्त्रातील केल्या जाणाऱ्या संशोधन अभ्यासप्रक्रियेमध्ये तथ्यसंकलनाला अतिशय महत्व आहे. एवढेच नव्हे तर संशोध्य अभ्यासाविषयाशी निगडीत तथ्ये जेवढी अधिक विश्वासार्ह आणि वास्तव स्वरूपाचे असतील तेवढे त्या संशोधनाला महत्व येते. संशोधक आपल्या संशोध्य अभ्यासाविषयाच्या अनुषंगाने योग्य असणारे तथ्य संकलनाचे तंत्र वापरून माहिती संकलित करीत असतो तथापि तथ्यसंकलन करावयाच्या पध्दतीनुसार त्या तथ्यसंकलनाच्या भागाचे अ) प्राथमिक स्त्रोत आणि ब) दुय्यम स्त्रोत असे दोन प्रकार असून या दोन्ही पध्दतीने तथ्यसंकलन केले जाते. अर्थात संशोधकाने आपल्या अध्ययन विषयाला अनुसरून या दोन्ही पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

अ) <u>प्राथमिक स्त्रोत</u>

संशोधक जेंव्हा आपल्या अध्ययन विषयाच्या अनुषंगाने तथ्यसंकलन करीत असतो तेंव्हा तो उत्तरदात्यांच्याकडून समोरासमोर वेगवेगळया प्रश्नांच्या माध्यमातून माहिती मिळवित असतो. किंवा जेंव्हा तो घडणाऱ्या घटनांचे प्रत्यक्ष डोळयाने अवलोकन करून जी माहिती मिळवितो त्या माहिती मिळविण्याच्या पध्दतीला प्राथमिक स्त्रोत म्हणतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, संशोध्य अभ्यासाविषयाच्या निमित्ताने संशोधक जेंव्हा मुलाखत तंत्राच्या आधारे किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाने तथ्यसंकलित करतो किंवा त्या संदर्भातील माहिती मिळवितो त्या तथ्यसंकलनाच्या किंवा माहिती मिळविण्याच्या पध्दतीला तथ्यसंकलनाचे प्राथमिक स्त्रोत असे म्हटले जाते.

संशोधकाने प्राथमिक स्त्रोताच्या खालील दोन पध्दतीने तथ्यसंकलन केलेले आहे.

- **मुलाखत तंत्र**

सामाजिक शास्त्रामध्ये आणि विशेषत: समाजशास्त्रामध्ये संशोधन अभ्यास पध्दतीच्या अनेक पध्दती आणि तंत्रे उपलब्ध आहेत. संशोधक आपल्या अभ्यासाच्या स्वरूपानुसार संशोधन पध्दतीचा किंवा संशोधन तंत्राचा अवलंब करीत असतो. सदर संशोध्य अभ्यासाविषयाच्या संदर्भात माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने मुलाखत तंत्राचा अवलंब केलेला आहे. मुलाखत तंत्राचे संरचनात्मक आणि असंरचनात्मक असे दोन प्रकार पडतात. यापैकी संशोधकाने संरचनात्मक मुलाखत पध्दतीचा अवलंब केलेला आहे. संरचनात्मक मुलाखत म्हणजे संशोधन विषयाशी निगडीत सांगोपांग आणि सखोल अशी माहिती मिळविण्यासाठी अगोदरच तयार केलेली प्रश्नांची निश्चित स्वरूपाची यादी की, ज्या प्रश्नांच्या आधारे संशोधक संशोध्य विषयाशी निगडीत उत्तरदात्यांची मुलाखत घेऊन माहिती संकलित करतो. तर असंरचनात्मक मुलाखत म्हणजे संशोध्य विषयाशी निगडीत अगोदरच निश्चित स्वरूपाची प्रश्नांची यादी तयार केली जात नाही तर अनौपचारीक पध्दतीने संशोध्य विषयाशी निगडीत उत्तरदात्यांला त्या विषयाला अनुसरून काही प्रश्न विचारून माहिती मिळविली जाते. या प्रकारात संशोधक आणि उत्तरदाता यांच्यामध्ये कोणतीही चाकोरीबध्द चर्चा न होता फक्त विषयाला अनुसरून प्रश्नोत्तराच्या पध्दतीचा अवलंब केला जातो.

सदर संशोध्य अभ्यासामध्ये संशोधकाने अधिकाधिक वस्तुनिष्ठ, सत्य आणि वैज्ञानिक माहिती संकलित व्हावी म्हणून मुलाखत तंत्राच्या संरचनात्मक पध्दतीचा अवलंब

केलेला आहे. ती माहिती मिळवित असताना संशोधकाने तटस्थवृत्ती ठेऊन अधिकाधिक वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तर काही वेळा संशोधकाने उत्तरदात्यांच्या बरोबर अनौपचारीक गप्पा मारून, चर्चा करून देखील माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- **निरीक्षण**

नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रातील संशोधन अभ्यास पध्दतीमधील निरीक्षण पध्दत अतिशय महत्वाची आहे. बऱ्याचवेळा मुलाखत, प्रश्नावली, सर्वेक्षण इ. अभ्यास पध्दतीपेक्षा निरीक्षण ही वैज्ञानिकदृष्टया महत्वाची मानली जाणारी पध्दत आहे. निरीक्षण पध्दतीखेरीज इतर पध्दतींच्यामध्ये माहिती संकलित केली जाते पण ती सत्य व वस्तुनिष्ठ असेलच असे नाही. कारण उत्तरदाते जी माहिती पुरवितात त्यावरच आपण विश्वास ठेवतो. त्यामुळे बऱ्याचवेळा सदोष निष्कर्ष निघण्याची दाट शक्यता असते. पण निरीक्षण पध्दतीमध्ये निरीक्षण स्वत: संशाधकाने केलेले असल्याने त्यावर त्याचा अधिक विश्वास असतो. म्हणून संकलीत केलेल्या माहितीची विश्वासार्हता देखील अधिक उच्च दर्जाची असते. त्यामुळे त्या अभ्यासामध्ये अधिक वस्तुनिष्ठता आणि वैज्ञानिकता दिसून येते. सदर संशोध्य अभ्यासामध्ये मुलाखती बरोबरच निरीक्षणावरही भर देऊन अधिक वास्तव आणि सत्य माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात संशोधकाने आपल्या अभ्यासातील वैज्ञानिकता, वस्तुनिष्ठताा टिकवून सत्य माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ब) <u>दुय्यम स्त्रोत</u>**

संशोध्य अभ्यासाला वस्तुनिष्ठ स्वरूप प्राप्त करून देत असतानाच त्यातील सत्यता आणि विश्वासार्हता अधिक स्पष्ट करण्यासाठी आणि आपल्या अभ्यासाला अधिक बळकटी आणण्यासाठी प्राथमिक स्त्रोताबरोबरच दुय्यम स्त्रोताचाही अवलंब केलेला आहे. कोणत्याही संशोधन अभ्यासपध्दतीमध्ये जेवढे महत्व प्राथमिक स्त्रोताला आहे किंबहुना तेवढेच महत्व दुय्यम स्त्रोताला आहे.दुय्यम स्त्रोत म्हणजे संशोधकाने स्वत: प्रत्यक्ष संकलित केलेली माहिती नव्हे तर संशोधन विषयाशी निगडीत उपलब्ध लिखित साहित्याच्या /

साधनाच्या आधारे संशोधक जी माहिती मिळवितो याच लिखीत साधन सामुग्रीचा उल्लेख संशोधनाचे दुय्यम स्त्रोत म्हणून केला जातो.

संशोधकाने आपल्या संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोताबरोबरच दुय्यम स्त्रोतावरही अधिक भर दिलेला आहे. कारण संशोधकाचा संशोधन विषय हा संशोधनाच्या कालखंडामध्ये शासकीय पातळीवर आणि स्थानिक पातळीवर अतिशय चर्चेचा विषय असून शासनाने जलस्वराज्य प्रकल्प हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. त्यामुळे संशोधकाने आपल्या अध्ययन विषयामध्ये संशोधन करताना त्याला अधिक बळकटी यावी म्हणून पुढील महत्वाच्या दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केलेला आहे. विशेषत:दुय्यम स्त्रोतांच्या इतर कोणत्याही मार्गापेक्षा लिखीत साधन सामुग्रीचा मोठया प्रमाणात उपयोग करून घेतलेला आहे.

१. संबंधित विषयाशी निगडीत ग्रंथ
२. शासकीय परिपत्रके
३. प्रकल्प अहवाल
४. माहिती पुस्तिका
५. संशोधन नियतकालीके
६. ग्रामपंचायत कार्यालय अहवाल
७. वृत्तपत्रे लेख
८. अप्रकाशित शोधप्रबंध
९. इंटरनेटद्वारे मिळविलेली माहिती इ.
१०. नकाशे व छायाचित्रे इ.

अशाप्रकारे उपलब्ध लिखित साहित्याचा अवलंब करून संशोधकाने आपले संशोधनकार्य अधिक उच्च दर्जाचे कसे होईल यादृष्टीने प्रयत्न केलेले आहेत.

# संदर्भ


१. Ahuja Ram : Research Methods, Rawat Publication Jaipur 2001, Page No. 19.

२. Ahuja Ram : Research Methods, Rawat Publication Jaipur 2001, Page No. 20.

३. शहा सुरेखा ः महाराष्ट्राचे जलनायक, पहिली आवृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, जानेवारी २००६, पृ.क्र. ८.

४. शहा सुरेखा, तत्रैव पृ.क्र. ९.

प्रकरण ३ रे

# साहित्याचे परिशीलन


३.१ प्रस्तावना

३.२ ग्रंथ

३.३ एम.फिल्.शोधप्रबंध

३.४ मासिके

३.५ वर्तमानपत्रे

३.५.१ दै.लोकसत्ता

३.५.२ दै.सकाळ

३.५.३ दै.पुढारी

३.५.४ दै.लोकमत

३.५.५ दै.तरूणभारत

## प्रकरण ३ रे

# साहित्याचे परिशीलन

### ३.१ प्रस्तावना

संशोधकाने 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प ः समाजशास्त्रीय अभ्यास' या संशोध्य अभ्यासाशी निगडीत आणि उपयुक्त असे लिखाण ज्या वेगवेगळया ग्रंथातून, एम.फिल. लघु शोधप्रबंध(अप्रकाशित), मासिके आणि वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेले आहेत. त्या लिखित साहित्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

### ३.२ ग्रंथ

१. **'सहभागीय पाणलोटक्षेत्र विकास हस्तग्रंथ' :** या ग्रंथातील 'पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमास महाराष्ट्रात असणारा वाव' या प्रकारणात मुकूंद घारे यांनी साधन संपत्ती व मानवी जीवनातील परस्पर संबंधाची ओळख भारतीय समाजाला प्राचीन काळापासून कशी आहे हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. या लेखात महाराष्ट्रावर दृष्टिक्षेप टाकत असताना पडीक जमीन, पाणी (पर्जन्यमान) जमिनीची धूप, पाणलोट उपाययोजना यासारख्या अनेक मुद्दयांची चर्चा केली आहे.

२. **'माझे गाव-माझे तीर्थ' :** या ग्रंथात मा.आण्णा हजारे यांनी 'राळेगणसिध्दी' या आदर्श गावाच्या विकासाची वाटचाल स्पष्ट केली आहे. गावाचा विकास करीत असताना येणाऱ्या अडचणी, गावाचे प्रश्न सोडविण्याचे मार्ग, त्यामधील लोकसहभाग, या लोकसहभागातून पाणलोट क्षेत्र विकास, दारूबंदी, कुटुंब नियोजन, शिक्षण, आरोग्य यासारखे उपक्रम कसे राबविले हे विस्ताराने मांडलेले आहे.

३. **'हिवरे बाजार ची यशोगाथा' :** या ग्रंथात सुरेशचंद्र वारघडे यांनी हिवरे बाजार या गावाने दुष्काळासारख्या समस्येवर मात करून पाण्याचे नियोजन, व्यसनमुक्त गाव, स्वच्छ व सुंदर गाव यासारखे उपक्रम लोकसहभागातून राबवून लोकांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावून आपल्या गावाचा आदर्श देशासमोर कसा ठेवला आहे याचा आढावा घेतला आहे.

४. **'तलावांची भारतीय परंपरा (अनुवादक - प्रदीप भलगे ) :** या ग्रंथात देशाच्या विविध भागात असणारे विविध प्रकारचे तलाव, तलाव बांधण्याची कला अवगत असणाऱ्या जाती जमाती, सामाजिक जाणीवेतुन व पवित्र भावनेतून या तलावांचे व त्यातील

पाण्याच्या शुध्दतेची काळजी घेणाऱ्या भारतीय परंपरा याविषयी अनुपम मिश्र यांनी सविस्तर विचार मांडलेले आहेत.

५. **'पेटलेले पाणी - पेटणारे पाणी'** : या ग्रंथात अनिलराज जगदाळे यांनी लोकांना पाण्याविषयी शास्त्रीय माहिती देऊन, सद्या पाणी कसे आणि किती उपलब्ध आहे? दिवसेंदिवस भेडसावणारी पाण्याची वाढती समस्या, त्यावरील उपाय सांगितले आहेत. तसेच सद्या पाण्याबाबतच्या काही चुकीच्या काही धोरणाविषयी लोकजागृती करणे व प्रत्येक नागरिकाने, गावाने उपलब्ध असणाऱ्या पाण्याचे संधारण, संरक्षण व काटकसरीने वापर कसा करावा याचे मार्गदर्शन केले आहे.

६. **'प्रश्न पाण्याचा, आपल्या सर्वांचा'** : या ग्रंथात संपादक एस.जी.गौतम यांनी पाणी व पर्यावरण या विषयाबाबत ज्ञान असणाऱ्या व देशाच्या पाणी, पर्यावरण यासारख्या महत्वाच्या विषयांच्या समित्यांचे प्रमुख म्हणून कार्यरत असणाऱ्या अनिल अगरवाल (सेंटर फॉर सायन्स ॲन्ड एन्व्हॉर्यनमेंट, नवी दिल्ली), व.ज. वसोया (वॉटर मॅनेजमेंट फोरम, अहमदाबाद, गुजरात) ए.विद्यानाथन (तामिळनाडू) यासारख्या तज्ञ लोकांचे अनुभव व वैचारिक लेख प्रसिध्द केले आहेत. सदर विविध लेखामधून विविध राज्यामधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा सोडविला आहे व कसा सोडविला जाऊ शकतो हे सांगितले आहे.

७. **'जलयुध्द की जलक्रांती'** : या ग्रंथात दत्ता देसाई यांनी जागतिक पटलावरील पाणी या विषयाबाबत सांगत असताना पाणी हा विषय आता आंतरराष्ट्रीय पातळीवर कसा आला आहे? पाण्यामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या उतरल्यामुळे पाण्याला सोन्याचे मोल कसे आले आहे? याबाबत सविस्तर भाष्य केले आहे. तसेच भारताची जलनिती आणि नदी जोड योजनेबाबतही सविस्तर चर्चा केली असून महाराष्ट्रातील पाणीप्रश्न कसा आहे व त्याला पर्याय कोणकोणते आहेत याबाबत सविस्तर मांडणी केलेली आहे.

८. **'दुष्काळ भेडसावतोय'**: या ग्रंथात मुकूंद धाराशिवकर यांनी पाणी प्रश्न, पाणी साठविण्याच्या विविध पध्दती, नागरी समाजाचा पाणी प्रश्न याबाबत सविस्तर चर्चा केलेली असून देशातील विविध राज्यामध्ये पाणी प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या समतल चर, पुनर्भरण, राजस्थानातील जोहड, फड पध्दत व रायगड पायथा आणि भागवत पध्दत यासारख्या अनेक यशस्वी प्रयोगाची सविस्तर माहिती दिली आहे. शासनाची जलनिती, पाण्याचे व्यवस्थापन व पाणी प्रश्न सोडविण्यासाठी वैयक्तिक उपाययोजना याबाबतही सविस्तर चर्चा केली आहे.

९. **'Water'** : या इंग्रजी ग्रंथामध्ये निलिमा राजवैद्य आणि दिलीपकुमार मार्कंडे यांनी 'पाणी' या विषयावर गांभीर्याने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबतीत ते असे म्हणतात की, पाणी हे मानव, पशुपक्षी, प्राणी व वनस्पती यांच्यासाठी आवश्यक आहेच पण त्याचबरोबर कारखाने, दळणवळण, शेती आणि इतर कारणासाठीही महत्वाचे आहे. त्यामुळे भूतलावर जरी **¾** भाग पाणी आहे असे आपण म्हणत असलो तरी अलिकडे पाण्याची टंचाई भासत आहे. अर्थात पाण्याचे गोडे पाणी आणि खारे पाणी असे दोन प्रकार असून गोडे पाण्याचे प्रमाण फारच कमी आहे आणि मनुष्य याच पाण्याचा दैनंदिन जीवनासाठी वापर करतो. तथापि जे पाणी आपल्याला मिळते त्याची एका बाजूने टंचाई भासत असून दुसऱ्या बाजूने ते प्रदूषित बनत आहे. पाण्याशिवाय कोणताही जिवमात्रा टिकून राहणे अवघड झाले आहे. कारण मनुष्य भूतलावर उपलब्ध असणाऱ्या पाण्यापैकी केवळ १% पाणी आपल्या जीवनासाठी वापरतो तर बाकीचे पाणी कारखाने, वाहतूक किंवा अन्य कारणासाठी वापरले जाते.

या ग्रंथामध्ये लेखकाने पाणी, त्याचे महत्व, जीवमात्राशी संबंध, त्याची होत जाणारी टंचाई, पाणी प्रदूषित होण्याचे मार्ग, पाण्याचा गैरवापर, पाणी शुध्दीकरण पध्दती एक पारंपारिक शुध्दीकरण आणि दोन अलिकडच्या नवीन पध्दती. पाण्याचे व्यवस्थापन, नगरपालिकेच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन, त्याच्या विविध प्रक्रिया, कारखान्याच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन आणि गरजेनुसार पाणी मिळविण्याच्या विविध मार्गाचे व्यवस्थापन अशा अनेक मुद्दयांच्यावर प्रकाश टाकून एकूण जीवमात्रा आणि पाण्याची आवश्यकता आणि महत्व शिवाय भविष्यामध्ये निर्माण होणाऱ्या पाण्याच्या विकट प्रश्नांची चिंता अशा अनेक प्रश्नांच्यावर अभ्यास करून पाणी म्हणजेच जीवन हे परत एकदा जाणवून देण्यासाठी 'पाणी' या विषयावर आपले मौलिक विचार मांडलेले आहेत.

१०. **'विकासवाटा'** : या ग्रंथातील 'जलस्वराज्य : संकल्पना' या प्रकरणामध्ये सुधीर भोंगळे यांनी जलस्वराज्य कार्यक्रम कसा पुढे आला? या कार्यक्रमाचे उद्दिष्ट काय आहे? यामधून जागतिक बँकेची अपेक्षा काय आहे? गावातील जनतेकडून बँकेची अपेक्षा काय आहे? स्वराज्य म्हणजे काय? वगैरे सर्व प्रश्नांचा आढावा घेतला आहे.

याच ग्रंथात त्यांनी 'दुष्काळी प्रदेशातील सिंचन', 'आंतरराष्ट्रीय सिंचन आयोग', 'दुष्काळावरची उपाययोजना', भूजल विधेयकाची गरज, हातपंपाच्या नवग्रहांची शांती, स्वच्छ व शुध्द पाण्याची नवी दृष्टी, जलसंवर्धनाची चळवळ यासारख्या महत्वाच्या विषयावर थोडक्यात पण सखोल माहिती दिली आहे.

११. **'महाराष्ट्राचे जलनायक'** : या ग्रंथात सुरेखा शहा यांनी महाराष्ट्रात पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कार्य करणाऱ्या संस्था व काही व्यक्तिंच्या कार्याचा परिचय करून दिला आहे. या संस्था व व्यक्तिंच्या माध्यमातून बांध, बंधारे, तलाव, पाझर तलाव, शेततळी, वनराई बंधारे, वृक्षारोपण, पिण्याचे पाणी, समन्यायी पाणी वाटप, ठिबक सिंचन, जलपुनर्भरण, जलपुनर्वापर, जलनियोजन, शिवकालीन पाणीपुरवठा योजना, सांडपाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर, पाण्याची काटकसर, कमी पावसाच्या प्रदेशात कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड, जलजागृतीसाठी महिला व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, पंचतारांकित हॉटेल्स व कारखान्यातून होणाऱ्या पाण्याच्या बेसुमार वापराबद्दल जनजागृती यासारख्या अनेक विषयावर महाराष्ट्रातील डॉ.माधवराव चितळे, श्री.पोपटराव पवार, श्री.विठ्ठल कामत, श्री. वेणू गोपाल रेड्डी व सौ.मनिषा म्हैसकर यासारख्या अनेक महनीय व्यक्ती काम करीत आहेत त्याचा आढावा येथे घेतला आहे.

१२. **'भारतीय जलसंस्कृती : स्वरूप आणि व्याप्ती'** : या ग्रंथात रा. श्री. मोरवंचीकर यांनी जलसंस्कृती म्हणजे काय? जलसंस्कृतीच्या अभ्यासाची आवश्यकता कशी आहे तसेच ग्रामीण संस्कृतीची विनाशाकडे वाटचाल कशी होत आहे हे स्पष्ट केले आहे.

या ग्रंथाच्या शेवटी मोरवंचीकर यांनी आपल्या निरीक्षणाच्या आधारे काही मते मांडली आहेत ती अशी -

I. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जी प्रचंड जलाशये निर्माण झाली त्या जलाशयासाठी ज्यांनी आपल्या जमिनी दिल्या त्यांना शासनाने जमिनीच्या बदल्यात पैसा दिला आहे पण ज्यांनी जमिनी दिल्या त्यांना त्याचा मोबदला पैशात न देता जमिनीच्या स्वरूपात देवून त्यांचे जलाशयाच्या लाभक्षेत्रातच पुनर्वसन करावे.

II. पाण्याच्या दुर्भिक्षावर व भूजल पातळी खोल जाण्यावर उपाय म्हणजे पाण्याचा गैरवापर थांबविणे, पीकपध्दतीची पुनर्रचना करणे, पाण्याचा अधिकाधिक पुनर्वापर करणे वगैरे.

याच ग्रंथात त्यांनी नूतन जलसंस्कृती व जलनिती या संदर्भातही विवेचन केलेले आहे.

## ३.३ एम.फिल. शोधप्रबंध

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकासाच्या संदर्भात विशेषत: पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण या संदर्भात विविध योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. सर्वच योजना

ग्रामीण समाजाशी आणि विकास या संकल्पनेशी निगडीत असल्याने समाजशास्त्राच्या संशोधकांनी यासंदर्भातील वेगवेगळया विषयावर एम.फिलसाठी स्वतंत्र अभ्यास करून लघु शोधप्रबंध सादर केलेले आहेत. अर्थात ग्रामीण विकासाच्या संदर्भातील महाराष्ट्र शासनाने कार्यान्वित केलेला जलस्वराज्य प्रकल्प महत्वाचा असून या विषयाशी निगडीत असणाऱ्या वेगवेगळया विषयावर ज्या ज्या अभ्यासकांनी या अगोदर जे शोधप्रबंध विद्यापीठांना सादर केलेले आहेत त्यांचा येथे थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

१. **<u>कु.शोभा पाटील</u>** यांनी " ग्रामीण महाराष्ट्रातील पाणी पुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे व्यष्टी अध्ययन" या विषयावर संशोधन करून डिसेंबर २००६ मध्ये एम.फिल. पदवीसाठी लघुशोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सादर केलेला आहे. सदर लघुशोधप्रबंधामध्ये पाणी पुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छतेच्या संदर्भात जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची झालेली अंमलबजावणी आणि त्यामुळे घडून आलेला सामाजिक आणि पर्यावरणीय बदलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोधप्रबंधामध्ये त्यांनी मांडलेली उद्दिष्टये व काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

➢ **अभ्यासाची उद्दिष्टये :-**

संशोधिकेने अध्ययनासाठी खालील महत्वाची उद्दिष्टये निश्चित केलेली आहेत.

१. महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या स्वरूपाचा आणि त्याच्या वैशिष्टयांचा अभ्यास करणे.
२. जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची कशी अंमलबजावणी झाली याचा अभ्यास करणे.
३. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात घडून आलेल्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

➢ **निष्कर्ष :-**

संशोधिकेने जैन्याळ गावचा उपरोक्त विषयावर संशोधन करण्यासाठी जे तथ्यसंकलन केले त्या तथ्याच्या विश्लेषणाच्या आधारे त्यांनी जे निष्कर्ष मांडले ते खालीलप्रमाणे -

१. जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे.
२. स्वच्छ, शुध्द तसेच पर्याप्त पिण्याच्या पाणी पुरवठयाची सोय गावाात करण्यात आली आहे.
३. गावातील सर्व कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे आणि शौचालयाचा नियमित वापर होतो.
४. घनकचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली आहे.
५. गावातील रस्ते स्वच्छ व सुंदर बनविण्यात आले आहेत.
६. गावातील बहुतांश गटारी बंदिस्त असून योग्य त्या ठिकाणी शोषखडडे् आहेत त्यामुळे सांडपाण्याची उत्तम व्यवस्था आहे.
७. वरील बाबीमुळे जैन्याळ गावातील पर्यावरण मानवी आरोग्याला पोषक असे बनविण्यात आले आहेत.
८. पर्यावरण संवर्धन, स्त्रियांचे सबलीकरण आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत.
९. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाविषयी तसेच सामाजिक जीवनातही महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.

२. <u>कविता कोनवडेकर</u> यांनी 'जलसंरक्षण योजनेचा प्रभाव : कोल्हापूर जिल्हयातील शिवकालीन पाणी साठवण योजनेचा अभ्यास' या विषयावर अध्ययन करून एम.फिल पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे जून २००७ मध्ये लघु शोधप्रबंध सादर केला आहे. सदर लघुशोधप्रबंधामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठयाच्या विविध योजना राबवून पाणी टंचाईची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करीत असते. त्यापैकीच शिवकालीन पाणी साठवण योजना ही एक महाराष्ट्र शासनाची नवी योजना आहे. या योजनेअंतर्गत विहीर, बोअरवेल पुनर्भरण तसेच पावसाचे वाया जाणारे पाणी अडवून जलधारण क्षमता वाढविण्यावर, पावसाचे पाणी संकलित करण्यावर भर देऊन लोकांना पाणी उपलब्ध करून दिले जाते. लोकांना या योजनेद्वारे उन्हाळयात पिण्यासाठी पाणी मिळते का? लोकांच्या या योजनेविषयी काय प्रतिक्रीया आहेत हे जाणून घेणे व शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या अंतर्गत करण्यात आलेल्या

उपाययोजनांचा अभ्यास करून या योजनेच्या प्रभावाचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आहे .

➢ **अभ्यासाची उद्दिष्टये :-**

१. शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत गावांची निवड कोणत्या निकषानुसार करण्यात येते याचा अभ्यास करणे .

२. अभ्यासासाठी निवडलेल्या गावामध्ये सदर योजनेअंतर्गत नेमकी कोणती कामे करण्यात आली आहेत याचा अभ्यास करणे .

३. सदर योजना आणि तिचा प्रभाव यासबंधीच्या गावकऱ्यांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास करून पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी या योजनेचा कोणता परिणाम झाला याचा अभ्यास करणे .

➢ **निष्कर्ष :-**

१. शिवकालीन पाणी साठवण योजनेमुळे उपलब्ध झालेल्या स्त्रोतातून सध्या लोकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत आहे .

२. पावसाचे टाकीत साठविलेले पाणी बहुसंख्य उत्तरदाते पिण्यासाठी वापरत नाहीत तर टाकीशेजारील लोकच हे पाणी खर्चासाठी वापरतात .

३. विहीर व बोअरवेल पुनर्भरणामुळे लोकांना उन्हाळयात पाणी पिण्यास उपलब्ध होत असल्याचे दिसून आले .

४. शिवकालीन पाणी साठवण योजनेमुळे हलसवडे व अंबपवाडी गावात पाणी टंचाई भासत नसल्याचे दिसून आले .

५. सादळे मादळे गाव उंच डोंगरावर असल्यामुळे पावसाचे पाणी जलद गतीने वाहून जाते . या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मध्यम प्रमाणात सुटला आहे . अंबपवाडी व सादळे मादळे गावातील उत्तरदात्यांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्ण सुटण्यासाठी नदीचे पाणी स्कीमद्वारे यावे असे वाटते .

६. शिवकालीन पाणी साठवण योजनेचा मुख्य हेतु पावसाचे वाया जाणारे पाणी अडविणे साठविणे जमिनीची जलसंधारण क्षमता वाढविणे, विहीर बोअरवेल पुनर्भरण करणे व उन्हाळयात लोकांना पिण्यास पाणी उपलब्ध करून देणे . तसेच टँकरग्रस्त गावे टँकरमुक्त करणे हा हेतू बहूतांशी प्रमाणात साध्य झाल्याचे दिसून आले आहे . तसेच शासनाचा शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत विविध

प्रकल्प राबवून टँकरग्रस्त व टंचाईग्रस्त गावांना पिण्यास पाणी उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम अतिशय चांगला व स्तुत्य असा आहे.

३. <u>शीला रामपुरे</u> यांनी "ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि त्यांचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली आणि कोल्हापूर जिल्हयातील दोन निवडक गावांचा अभ्यास" या विषयावर एम.फिल. पदवीसाठी डिसेंबर २००६ मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे शोधप्रबंध सादर केलेला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाचा आढावा घेताना असे दिसून आले की, भारतातील ग्रामीण भागात वर्षानुवर्षे स्वच्छता, पाणी व आरोग्याच्या बाबतीत अनेक गंभीर समस्या आहेत. या गंभीर समस्या दूर करून ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, स्वच्छता व पाणी पुरवठा वगैरेबाबत गाव पातळीवर सुधारणा करण्याच्या उद्देशाने सन २०००-२००१ पासून महाराष्ट्र शासनाने संत गाडगेबाबा अभियानाची सुरूवात केलेली आहे. या अभियानाचे चांगले परिणाम काही ग्रामीण भागात दिसून येऊ लागल्यामुळे या अभियानामध्ये महिलांचा सहभाग किती आहे? या अभियानाचे ग्रामीण पर्यावरणाच्या संवर्धनासाठी महिलांचे किती योगदान आहे? याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टये :-**

शिला रामपुरे यांनी सदर विषयावर संशोधन करण्यासाठी काही महत्वाची उद्दिदष्टये समोर ठेऊन त्या आधारे तथ्यसंकलन केलेले आहे. एकूण तथ्यसंकलनाच्या विश्लेषणाच्या आधारे काही महत्वाचे निष्कर्षही मांडलेले आहेत.

१. सांगली व कोल्हापूर जिल्हयातील दोन निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानातील महिलांचा सहभाग अभ्यासणे.
२. ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण महिलांवरील प्रभाव / परिणाम अभ्यासणे.
३. निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाच्या ग्रामीण पर्यावरणावरील प्रभावांचे परीक्षण करणे.

- **निष्कर्ष :-**

१. शेळकेवाडी गावातील रस्ते अभियानापूर्वी कच्चे होते पण अभियान कालावधीत लोकसहभागातून व लोकवर्गणीतून गावातील रस्ते चांगले व स्वच्छ केले.
२. अभियानातून शेळकेवाडीत एकूण ७८० मी. लांबीची गटारी बांधण्यात आल्या.

३. कोरेगावात अभियान काळात ४३९ कुटुंबानी सांडपाण्यावर परसबागा तयार केल्या व गावात ६000 मीटर लांबीच्या गटारी बांधल्या.

४. अभियानापूर्वी शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्हीही गावात कचऱ्याचे साम्राज्य होते पण अभियान काळात लोकसहभागाद्वारे सर्व कचरा नष्ट केला व गावात अनुक्रमे १0 व ६७ कचरा कुंडया ठेवण्यात आल्या.

५. शेळकेवाडी या गावात अभियान काळात घरे, शाळा, ग्रामपंचायत कार्यालये, देवालये इ. गुलाबी रंगाने रंगविलेल्या आहेत. तसेच त्यांची स्वच्छताही ठेवली जाते. कोरेगावातही घरांची, रस्त्यांची, शाळा, सार्वजनिक इमारत व परिसराची नियमित स्वच्छता ठेवली जाते.

६. शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावात पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये योग्य प्रमाणात टी.सी.एल. पावडर टाकून पाणी शुध्द केले जाते. घरामध्ये सर्वच जण पिण्याचे पाणी उंचावर ठेवतात व पाणी घेण्यासाठी वाघराळयाचा वापर करतात.

७. शेळकेवाडी या गावात प्रत्येक कुटुंबाने ५0 झाडे याप्रमाणे झाडे लावून ती जतनही केली आहेत. तसेच कोरेगावातही प्रत्येक कुटुंबाने ३२ झाडे लावून ती जतन केली आहेत.

८. शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील ग्रामस्थांनी वृक्षतोड बंदीचा निर्णय घेतला आहे.

९. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावात प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

१0. शेळकेवाडी व कोरेगाव ही दोन्ही गावे १00 % हागणदारीमुक्त झाली आहेत.

११. शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावात पर्यावरण संवर्धनासाठी बायोगॅस/गोबरगॅस व निर्धूर चूलींचा वापर करण्याबाबत प्रबोधन केल्यामुळे हळूहळू त्याचा वापर करण्याचे प्रमाण वाढत आहे.

४. <u>राजेंद्र धोंडीराम कदम</u> यांनी "जलस्वराज्य अभियान : लोकसहभागाद्वारे बोरपाडळे गावचा विकास: एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावर संशोधन करून जून २00९ मध्ये एम.फिल पदवीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे शोधप्रबंध सादर केलेला आहे. संधोधकाने प्रस्तुत प्रवंधामध्ये कोल्हापूर जिल्हयामध्ये

जलस्वराज्य अभियान राबविलेल्या ११५ गावांपैकी एक प्रातिनिधिक गाव म्हणून बोरपाडळे (तालुका-पन्हाळा) गावाचा अभ्यास केलेला आहे. लोकांच्या सहभागातून अभियान कितपत यशस्वी झालेले आहे. या जलस्वराज्याच्या अभियानामुळे गावामध्ये व लोकांच्या मानसिकतेमध्ये कोणकोणते बदल घडून आले आहेत याचा परामर्श या लघुशोधप्रबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

➢ **संशोधनाची उद्दिष्टये व निष्कर्ष :-**

संशोधकाने काही महत्वाची उद्दिष्टये समोर ठेऊन त्या उद्दिष्टांच्या आधारे संशोधन करून तथ्यविश्लेषनाच्या आधारे निष्कर्ष मांडलेले आहेत ती उद्दिष्टये व निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१. पर्यावरण व मानवाचा भौतिक विकास यांचा घनिष्ट संबंध अभ्यासणे.
२. निसर्गाबाबत व एकूणच नैसर्गिक साधन संपत्तीबावत समाजात किती जागृती आहे याची माहिती घेणे.
३. स्वच्छतेबाबत लोकांमध्ये झालेला बदल अभ्यासणे.
४. लोकसहभागाने अनेक जनहितार्थ प्रकल्प राबविले जात आहेत याबाबत माहिती करून घेणे.
५. पाण्याबाबत भविष्यकाळात येणाऱ्या भीषण पाणी टंचाई व एकंदरीत पर्यावरणाबाबत बाबींचा अभ्यास करणे.
६. लोकसहभागातले अडथळे राजकीय, जातीय वगैरे काय आहे हे पाहणे.
७. वरील संदर्भात सरकारी योजनांचा पुरेपूर वापर करून सदर योजना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे राबविली आहे काय? याबाबत अभ्यास करणे व उपाययोजना सुचविणे.

➢ **निष्कर्ष -**

१. लोकसहभाग व सामूहिक पध्दतीने निर्णय घेण्याची प्रक्रिया अस्तित्वात येताना दिसत आहे.
२. पाणी, स्वच्छता, रस्ते व गटारी विविध सेवांची उपलब्धता होत आहे.
३. गावातील लोक शौचालयाचा नियमित वापर करू लागले आहेत.
४. लोकांमध्ये पर्यावरण जागृतीबावत ज्ञान वाढत आहे.

५. समाज व सरकारी यंत्रणा यांच्यातील 'भागीदारी' बळकट होण्यास मदत होत आहे.

६. स्त्रिया व युवक-युवती एकत्र येत आहेत. त्यांच्यामध्ये विचार विनिमय व देवाण घेवाणीची प्रक्रिया होत आहे.

७. बोरपाडळे गावातील मानसिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व व्यावसायिकदृष्टया सकारात्मक बदल होताना दिसत आहे.

## ३.४ मासिके

**१) योजना जून २००६ :** या मासिकातील **'ग्रामीण पेयजल व मलनि:सारण'** या लेखामध्ये श्रीमती वसंत सुनिला यांनी केंद्रसरकारने व राज्यसरकारने ग्रामीण भागाला पेयजल पुरवठा करण्यासाठी राबविलेल्या गतिमान ग्रामीण पेयजल (ARWSP) योजना, भारतनिर्माण, स्वजलधारा योजना व मलनि:सारणासाठी राबविलेल्या विविध योजनांची उद्दिष्टये, त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा, त्यासाठी केलेली गुंतवणूक व त्याला मिळालेले यश व अपयश याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

**२) योजना (जून २००६) : 'जल व्यवस्थापनातील नवे शोध'** ( अनुवाद ग.ल.कर्वे ) या लेखात जागतिक जल दिनाच्या निमित्ताने जेनि इर्फट व पार्थ जे. शहा यांनी केरळ राज्यातील ओळवना या ग्रामपंचायतीने गेली वीस वर्षे पाणी पुरवठयाच्या योजना स्वत: तयार करून त्याची योग्य अंमलबजावणी करून आपला पाणी प्रश्न कसा सोडविला? व दक्षिण दिल्लीमधील संगमविहार येथील एका कॉलनीतील लोकांनी आपला पाणीप्रश्न कसा सोडविला याचा आढावा घेतलेला आहे. वरील दोन्ही ठिकाणच्या अनुभवावरून निष्कर्ष काढताना एखादी मोठी पाणी पुरवठा योजना असण्यापेक्षा छोटया पाणी पुरवठा योजनांवर विसंबून राहता येईल का? व स्थानिक रहिवाशांकडून अशा योजना बनवण्यासाठी, अंमलबजावणी व परिचालनासाठी सहकार्य मिळेल का? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

**३) योजना (जून २००६) : 'जलसंस्कृती आणि नियोजन'** या लेखात डॉ. जी.पी. सुर्वे यांनी पृथ्वीतलावरील पाणी साठा, विविध देशातील पाणीप्रश्न, भूगर्भातील पाण्याची घटत जाणारी पातळी, दूषित पाण्यामुळे होणारे आजार व मरणाऱ्यांची संख्या इ. गोष्टींचा आढावा घेऊन महाराष्ट्र शासन ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राबवित असलेल्या विविध योजनांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

४) **योजना (ऑगस्ट २००६) : 'जलसमस्या स्वरूप व उपाय'** या लेखात दिलीप काळे यांनी भारतातील जल समस्याबाबत चर्चा करताना, विविध राज्यातील पाणी समस्या, पाणी समस्येमागील नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांचा आढावा घेऊन १) पाण्याकडे बघण्याच्या मानसिकतेमध्ये बदल होणे आवश्यक आहे. २) सिंचनाकडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन असावा. ३) पाण्याचा पुनर्वापर ४) पाण्याचा गैरवापर टाळून स्त्रोताचे नुतनीकरण करणे आवश्यक ५) कमी पाण्यावरील पिकावर जगण्यास शिका. यासारखे अनेक उपाय सुचविले आहेत.

५) **योजना (ऑगस्ट २००६) : 'पाण्याचा थेंब थेंब वाचवू या'** या लेखात धोंडीरामसिंह राजपूत यांनी पाणीप्रश्न, पाण्याचे महत्व, पाणी वाचविण्याची जबाबदारी कोणाची आहे? पाण्याची बचत कोणकोणत्या प्रकारे करता येईल? याची सविस्तर मांडणी केलेली आहे.

६) **योजना (ऑगस्ट २००६) : 'छतावरील पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण : काळाची गरज'** या लेखात राजपूत यांनी दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याची खोल खोल जाणारी पातळी, पाण्याचा बेसुमार वापर यामुळे पाण्याची भासणारी तीव्र टंचाई यावर एक महत्वाचा उपाय म्हणून छतावरील पावसाच्या पाण्याचे पुनर्भरन करणे ही आजची गरज कशी आहे व त्याचे फायदे काय आहेत याबाबत सविस्तर मांडणी केलेली आहे.

७) **योजना (डिसेंबर २००६) : 'पर्यावरण प्रदूषणाच्या विळख्यात'** या लेखात डॉ. गोवर्धन खेडकर यांनी प्रदूषण ही एक जागतिक समस्या कशी आहे? प्रदूषण म्हणजे काय? प्रदूषण कोणकोणत्या प्रकारे होते? प्रदूषणाचे परिणाम काय होतात? या प्रदूषणावर कसे नियंत्रण आणता येईल? यावर कोणत्या उपाय योजना करता येतील याबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

८) **योजना (डिसेंबर २००६) : 'महिलांच्या सशक्तीकरणात शिक्षणाची भूमिका'** या लेखात प्रा. संदिपकुमार चौधरी यांनी सशक्तीकरण ही संकल्पना विशद करून सशक्तीकरणात कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो? या सशक्तीकरणात शिक्षणाची भूमिका किती महत्वाची आहे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

९) **योजना (जून २००७) : 'जलव्यवस्थापन काळाची गरज'** या लेखात डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी जागतिक पाणीप्रश्न, जलव्यवस्थापनात पाणलोट कार्यक्रमांतर्गत मृदू व जलसंधारणासाठी भारत सरकारद्वारे केले जाणारे प्रयत्न, त्यामधील लोकसहभागाचे महत्व स्पष्ट करून आपल्या देशात शासन व जनतेच्या मदतीने कोणते उपाय योजल्यास पाणीप्रश्न सुटेल याबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

**१०) लोकराज्य (जून २००७) ः 'ग्रामस्वच्छतेची नवी परंपरा'** या विषयासंबंधीत मुलाखतीत आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन) यांनी काही वर्षापासून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाला महाराष्ट्रामध्ये चांगले यश कसे प्राप्त झाले? निर्मल ग्राम अभियानात महाराष्ट्राला देशामध्ये सलग तीन वर्षे अव्वल स्थान टिकविण्यासाठी याचा कसा फायदा झाला? हे मोकळेपणाने सांगितले आहे.

**११) लोकराज्य (जून २००७) : ' स्वच्छतेचा वेळू गेला गगनावरी'** या लेखात सुधीर ठाकरे (सहसचिव, महाराष्ट्र शासन) यांनी ग्रामस्वच्छता आणि हागणदारी मुक्ती या दोन्ही उपक्रमात महाराष्ट्राने देशात अग्रस्थान कसे कायम राखले? निर्मलग्राम अभियानात महाराष्ट्राने देशपातळीवर जी नेत्रदीपक कामगिरी केलेली आहे त्याचे मूळ महाराष्ट्रात निर्मल ग्राम अभियानापूर्वीपासून सुरू असलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या यशस्वी उपक्रमात कसे आहे याचा आढावा घेतला आहे.

**१२) लोकराज्य (जून २००७) : 'किमया लोकसहभागाची'** या आपल्या लेखात संजीवकुमार (सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन) यांनी निर्मलग्राम अभियानात महाराष्ट्राला सातत्याने मिळणाऱ्या अभूतपूर्व यशाच्या मागे 'लोकसहभाग' हा किती महत्वाचा आहे याचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

**१३) लोकराज्य (जून २००७) : 'प्रबोधनाचे यश'** या मुलाखतीत विश्वास धुमाळ (प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांनी महाराष्ट्राला निर्मलग्राम योजनेत जे भरघोस यश मिळाले त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्र शासनाने टी.व्ही, रेडीओ, पथनाटय, पुस्तिका, वेगवेगळया जनजागृती फेऱ्या व भिंतीवरील घोषवाक्ये इ. माध्यमाद्वारे ग्रामीण जनतेचे योग्य प्रकारे प्रबोधन करण्यासाठी अथक प्रयत्न केलेले आहेत.

**१४) लोकराज्य (नोव्हेंबर २००७) : 'महिला विकासाची त्रिसूत्री'** या लेखात डॉ.सुरेखा मुळे यांनी महिलांसाठी स्वतंत्र धोरण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे असे म्हटले आहे. या राज्याने या धोरणामध्ये महिलावरील अत्याचार निराकरण, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्त्री संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील अन्य क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यावर कसा भर दिला आहे याचे विवेचन केले आहे.

**१५) लोकराज्य (नोव्हेंबर २००७) : 'गावागावात सारं निर्मलतेचं वारं'** या लेखात संजय कदम यांनी निर्मलग्राम योजनेपूर्वी महाराष्ट्रातील ग्रामीण भागात असणारी अस्वच्छतेची समस्या आणि ही योजना सुरू झाल्यामुळे विविध मार्गाने लोकांचे जे प्रबोधन झाले त्यामुळे

ग्रामीण लोक अस्वच्छता आणि रोगराईच्या निर्मूलनासाठी कसे प्रयत्न करीत आहेत आणि यातून आपली कशाप्रकारे मुक्तता करून घेण्यासाठी धडपड करीत आहेत? याचे विश्लेषण करून महाराष्ट्राला निर्मलग्राम योजनेमुळे मिळालेल्या यशाच्या संदर्भात त्यांनी सविस्तर वर्णन केलेले आहे.

१६) **लोकराज्य (मे २००८) : 'पाण्याच्या समान वाटपासाठी भूजल कायदा'** या विषयावरील मुलाखतीत अजित पवार (महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री) यांनी 'राज्यातील नागरीकांना पाण्याच्या गरजेनुसार समान वाटप करण्याचे राज्य सरकारचे ध्येय असून त्यासाठी विशेष भूजल कायदयाचा आराखडा जलसंपदा विभागाकडून तयार केला जात आहे. व येत्या दीड-दोन महिन्यात मंत्रीमंडळ या कायदयाच्या मसुदयावर विचार करेल असे सांगितले.

१७) **'जलसंपदा' प्रासंगिक वार्तापत्र' : श्रीयूत आर.पी. झेंडे** (संपादक, मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रकल्प संचालक जि.प.कोल्हापूर) यांनी फेब्रुवारी २००८ च्या 'जलसंपदा' जलस्वराज्य वार्तापत्रामध्ये 'मिणचे खुर्दच्या महिलांची जलक्रांती' या लेखात भुदरगड तालुक्यातील मिणचे खुर्द या गावातील महिलांनी पुढाकार घेऊन जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून मीटर पध्दती स्विकारून आपल्या गावाची विजबिलाची व पाण्याची बचत कशी केली आणि सर्वांना समान व पुरेसे पाणी कसे मिळत आहे. शिवाय सध्या ११७% पाणीपट्टी वसूली करणारे हे गाव कसे आहे याची सविस्तर माहिती दिली आहे.

१८) **'जलसंवाद', मासिक (डिसेंबर२००८) : 'जलसाक्षरता आवश्यक'** या लेखात 'पाण्याचे महत्व, पाण्याची टंचाई व या टंचाईमुळे भविष्यकाळात येणारी संकटे लक्षात घेऊन पाण्याबद्दल जेवढे ज्ञान लोकांपर्यत पोहचविता येईल तेवढे पोहचविले पाहिजे. ज्ञानामुळे समस्या सुटण्यास मदत होते' असे मत महाले व भांदे यांनी व्यक्त केले आहे.

## ३.५ <u>वर्तमानपत्रे</u>

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या विषयाशी निगडीत दै.लोकसत्ता, सकाळ, पुढारी, लोकमत व तरूण भारत (कोल्हापूर) या दैनिक वृत्तपत्रांच्यामधून 'पाणी' या विषयावर प्रासंगिक लेख, तज्ज्ञांची मते आणि संशोधनपर लेख प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांचा थोडक्यात गोषवारा -

### ३.५.१ दै.लोकसत्ता -

१. दै. लोकसत्तेच्या **लोकरंग** या पुरवणी अंकामध्ये दि.१६/१२/०७ रोजी अभिजित

घोरपडे यांनी आपल्या 'रंग-ढंग पाण्याचे' या सदरामधील **'पाण्याला पर्याय'** या लेखात हवा, पाणी, जमीन आणि सूर्यप्रकाश यांची तुलना करून कोणती गोष्ट नसली तरी जीवसृष्टी टिकेल म्हणजेच कोणत्या गोष्टीला पर्याय आहे? कोणत्या गोष्टीला पर्याय नाही? याची सविस्तर मांडणी करून पाण्याला पर्याय नाही असे सांगताना त्यांनी पाणी स्वच्छ, प्रदूषणविरहीत व नैसर्गिक अवस्थेत ठेवण्याचे आवाहन केले.

२. दि.३०/०४/०८ रोजी प्रभाकर कुलकर्णी यांनी आपल्या **'भारत निर्माण: केवळ स्वप्नच?'** या लेखात ग्रामीण विकासकार्यात गावकऱ्यांचा सक्रीय सहभाग असावा यासाठी पंचायत राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. पण नोकरशाहीचे वर्चस्व व आमदार-खासदारांची लुडबूड यामुळे तिचे यश संदिग्ध राहिले आहे आणि पर्यायाने ग्रामीण विकासातून देशाच्या विकासाच्या शक्यताही प्रश्नचिन्हांकित राहिल्या आहेत. असे मत व्यक्त केले आहे.

- **दैनिक लोकसत्तेतील पत्रकार अभिजीत घोरपडे यांनी सुरू केलेल्या 'मरणासन्न नद्या' या सदरामध्ये जे लेख लिहिले त्याचा थोडक्यात घेतलेला आढावा खालीलप्रमाणे -**

३. दि.०८/०५/०८ रोजी **'मासेमारीवर कुऱ्हाड अन् आरोग्याच्या समस्या !'** या लेखात दुषित पाण्यामुळे मच्छिमारांचे जगण्याचे साधन नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. नदीपात्रात घेतल्या जाणाऱ्या कलिंगडे-काकडयांच्या पिकामध्ये लक्षणीय घट होत आहे. चिखल्या, त्वचारोगाचे प्रमाण अधिक आणि हगवण, काविळीच्या साथी नित्याच्याच झाल्या आहेत. नद्यांच्या घाण पाण्यात डास वाढून मलेरिया व इतर साथींचा धोका वाढत आहे असे स्पष्ट मत मांडले आहे.

४. दि.१२/०५/०८ रोजी **'दहामाही-बारमाही ते जेमतेम पाचमाही!'** या लेखात पूर्वी उन्हाळयातही प्रवाही असलेल्या नद्या आता हिवाळयातच आटतात, जंगलाची भरपूर तोड होत असून धुळयातील २०-२५ वर्षापूर्वीचा हिरवागार सातपुडा आता पूर्णपणे बोडखा झालेला आहे. परीणामी जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले आहे व नद्यांना पाणीच मिळत नसल्यामुळे त्या आटू लागल्या आहेत.तसेच भूजलाचा उपसा वाढल्याने नद्यांना मिळणारे पाणी आता आणखी कमी झाले आहे. यासारख्या अनेक मुद्दयावर आपले विचार मांडले आहेत.

५. दि.१३/०५/०८ रोजी **'नाले ओढयांचे अस्तित्व संपविण्याचा उद्योग!'** या लेखात अनेक लहानमोठे नाले बुजविण्याचे काम आजही सुरू आहे. नाले व नद्यांवरील अतिक्रमणामुळे अनेक लहान मोठया नाल्यांना सर्रास पूर येत आहेत. नद्यांची पूररेषा, पात्रात बांधकाम न करण्याच्या सर्व नियमांचे उल्लंघन होत आहे. गेल्या तीन वर्षामध्ये राज्यात पुराची तीव्रता वाढूनही अतिक्रमणांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे असे मत मांडले आहे.

६. दि. १४/०५/०८ रोजी **'कारण नदी वाहतच नाही'** या लेखात नद्या वाहत नसल्याने वाळूनिर्मिती व पात्राचे शुध्दीकरण थांबले आहे. धरणामधून विशिष्ट पर्यावरणीय प्रवाह सोडणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत आहे. पाण्याअभावी गाळ वाहून जात नसल्याने नद्या व नाल्यांची पात्रे गाळामुळे उथळ होत आहेत. नदीतील अनेक जीवांना जगणे मुश्किल झाले असून माशांच्या स्थलांतरामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. अशा विविध मुद्दयावर भाष्य केले आहे.

७. दि. १६/०५/०८ रोजी **'नद्याबाबत लढणाऱ्या कार्यकर्त्यांना ताकद हवीय!'** या लेखात राज्यातील नद्यांची स्थिती सुधारण्यासाठी कुठे नद्या वाहत्या करण्यासाठी तर कुठे त्या प्रदूषण मुक्त करण्यासाठी कार्यकर्ते कशाप्रकारे प्रयत्न करीत आहेत याची माहिती देवून या प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या कमी असल्यामुळे नद्यांची स्थिती सुधारण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत असे सांगून या कार्यकर्त्यांच्या कार्यात लोकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

८. दि. १७/०५/०८ रोजी **'दुष्काळ आणि महापूरावरील विजयाचा मंत्र!'** या लेखात धुळे जिल्यातील शिरपूर परिसरात ओढे नाले खोल व रूंद करून जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरविण्याचा प्रयोग केला जात असल्यामुळे भुजलाचे प्रमाण वाढले व ओढयामध्ये सुध्दा जास्त काळ पाणी टिकू लागले आहे. त्यामुळे असे प्रयोग मोठया प्रदेशावर झाल्यास नद्यासुध्दा प्रवाही होण्याचा फायदा मिळू शकेल असा आशावाद व्यक्त केला आहे.

- <u>मान्यवर विचारवंताची मते</u>

दै.लोकसत्तेमध्ये अभिजित घोरपडे यांनी सुरू केलेल्या **'मरणासन्न नद्या'** या सदराखाली 'मी आणि नदी' या विषयावर ज्या मान्यवर तज्ज्ञांची मते मागविण्यात आली होती त्याचा थोडक्यात आशय असा.

९. दि.२०/०५/०८ रोजी बाळासाहेब विखे-पाटील यांनी **'नदी व पाण्याच्या प्रश्नावरून यादवीचा धोका'** असल्याचे सांगितले आहे. त्यांनी या लेखात वाळू उपसण्याचा पर्यावरण, अर्थकारण व शेतीच्या पाणी उपलब्धतेवर विपरीत परीणाम होत आहे. वाळू माफियांना राजकारण्यांचे संरक्षण मिळत असल्याने त्यांच्यावर कारवाई कशी होणार? असा प्रश्न उपस्थित केला, उत्पादन घटले तरी चालेल, पण कारखाान्यांच्या जलशुध्दीकरणाबाबत काटेकोर रहावे, राजकीय पक्ष सत्तेच्या मागे असल्याने त्यांच्याकडून अपेक्षा करणे व्यर्थ आहे असे सांगून या सर्वामध्ये तरूणच बदल घडवेल; असा आशावाद व्यक्त करून तरूणांना आपला पाठिंबा असल्याचे सांगितले आहे.

१०. दि. २१/०५/०८ रोजी ज्येष्ठ विचारवंत प्रा.एन.डी. पाटील यांनी **'नदीच्या दूरावस्थेबाबत निवडणूकीत जाब विचारा!'** या लेखात दारिद्रय, बेरोजगारी, महागाई इतकाच नदीप्रदूषण व त्या न वाहण्याचे प्रश्न गंभीर आणि तातडीचे आहेत, नद्यासारखे नैसर्गिक स्त्रोत बिघडताना पाहणारे सरकारच सर्वात मोठे गुन्हेगार आहे. नदीप्रदूषणाने बाधित लोकांकडे पाण्याचे नमुने तपासणीचे अधिकार द्या व या खटल्यासाठी त्यांनाच 'ज्युरी' नेमा असे म्हंटले आहे.

११. दि. २२/०५/०८ रोजी माजी केंद्रिय ऊर्जामंत्री सुरेश प्रभू यांनी **'दुर्दैवाने नद्या व पाणी हे प्राधान्याचे मुद्दे नाहीत!'** या लेखात राज्यकर्त्यांना खुर्ची टिकवून ठेवण्यासाठीच नदी आणि पाण्याची आठवण होते. नद्या प्रदूषित करण्याबाबत उद्योगधंदे, नगरपालिका, महानगरपालिका या प्रामुख्याने दोषी आहेत. माणसाने नद्यांचे प्रवाहानुसार वागायला हवे. प्रवाह आपल्यानुसार बदलतील हा हट्ट आता थांबवायला हवा. एकूण मृत्यूपैकी दोन-तृतीयांश मृत्यूंना दूषित पाणी कारणीभूत ठरण्याचा धोका आहे. असा इशारा दिला आहे.

१२. दि. २३/०५/०८ रोजी ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी **'नशेत बेहोश सरकार, अन् नद्याकाठच्या गावांचा ऱ्हास'** या लेखात सरकार व वाळू माफिया पैसा व सत्तेच्या नशेत बेहोश आहेत. त्यामुळे नद्याकाठच्या गावांचे पर्यायाने राज्याचे व पर्या वरणाचे कधीही न भरून निघणारे नुकसान होत आहे. क्षुल्लक प्रश्नावरून सरकार व विरोधकामध्ये खडाजंगी होते पण या प्रदूषित पाण्याच्या ज्वलंत प्रश्नावर ते बोलत नाहीत हे दुर्दैव आहे. त्यामुळे नवयुवकांनाच या संकटावर स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागेल असे त्यांनी भाष्य केले आहे.

१३. दि. १७/०८/०९ रोजी मिलिंद बेंबळकर यांनी **'पाणी पुरवठा योजना बंद का पडतात'** या लेखात आजच्या पाणी पुरवठा योजनांची अवस्था व त्याची कारणे सांगून पाणीपुरवठा योजना सुव्यवस्थित चालण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते, चांगल्या दर्जाच्या रसायनांची आवश्यकता असते, जलकुंभावर मिटर बसविणे आवश्यक असते व जनता जलसाक्षर होणे आवश्यक आहे असे उपाय सांगितले आहेत.

### ३.५.२ दैनिक सकाळ

**✓ सकाळ**

१. दि.२५/०७/०७ रोजीच्या **'ग्रामस्वच्छतेवरही विकारांची छाया'** या संपादकीय लेखात महाराष्ट्र शासनाने चालू केलेल्या व देशामध्ये अतिशय नावलौकीक मिळविलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामध्ये ज्या गावांनी राज्य, विभाग किंवा जिल्हा स्तरावराची बक्षिसे पटकाविली आहेत तेथील सद्य परिस्थिती काय आहे? बक्षिस मिळविलेले वर्ष आणि आज यामध्ये काही फरक पडला आहे का? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी 'सकाळ न्यूज नेटवर्कने' एक सर्वेक्षण करून वस्तूस्थितीचे विवेचन केले आहे.

२. दि.१०/०३/०८ रोजी विश्वास पाटील यांनी **'कुठे पाण्याचा अतिवापर ; कुठे टंचाईचे चटके'** या लेखात कोल्हापूर जिल्हयातील सिंचनाची विसंगती स्पष्ट करताना ते म्हणतात की, कोल्हापूर जिल्हयात पाणी मुबलक उपलब्ध झाल्याने त्याच्या वापराबाबत येथील शेतकरी जागरूक नाही. त्यामुळे शिरोळ, हातकणंगले तालुक्यासह अनेक गावातील नदीकाठच्या जमिनी क्षारपड बनल्या आहेत. त्याचे क्षेत्र वर्षाला वाढते आहे. म्हणजेच आपणच आपली जमीन निव्वळ बेफिकीरीने नासवून टाकत आहोत. परंतू त्याबाबत अजूनही म्हणावे तेवढे गांभीर्य लोकामध्ये नाही असे मत मांडले आहे.

**✓ दैनिक ॲग्रोवन**

३. दि. १२/०४/०८ रोजीच्या अंकात दूषित पाण्यासंदर्भात ॲग्रोवनसाठी लेख मागविले होते त्या लेखामधून औद्योगिकरणामुळे उदयोगधंदयाची वाढ झाली मात्र त्याबरोबर निसर्गाचा ऱ्हास होऊ लागला. वेगवेगळया कारखान्यातील ॲसिडयुक्त, केमिकलयुक्त पाणी नदीपात्रात सोडले जाते. त्याचा परिणाम मानवी जीवनावरच नाही तर प्राण्यावरही होत आहे. सरकारला पाण्याबाबत जे साध्य करावयाचे आहे त्याची सुरूवात शालेय

अभ्यासक्रमातून करावी. विज्ञानाच्या पुस्तकात त्याचा समावेश असावा. प्रसारमाध्यमांनी यासाठी जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्याकडे पाणी दूषित होऊ नये यासाठी आवश्यक असलेल्या इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. म्हणूनच पाणी दूषित होऊ नये म्हणून सगळयांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असा एकत्रित सूर विविध तज्ज्ञांच्या अनेक विचारातून स्पष्ट झालेला आहे.

४. दि. ०७/०७/०९ च्या अंकात एकनाथ पाटील यांनी **'पाणी नियोजन : कल करे सो आज'** या लेखात पाणी प्रश्नाचे गंभीर स्वरूप स्पष्ट करून आपण शेतीच्या पाण्याचे नियोजन, ग्रामीण भागातील पाण्याचे नियोजन, नागरी भागातील पाण्याचे नियोजन कसे केले पाहिजे व सार्वजनिक सहभागातून पाणी नियोजन कसे करता येईल? हे सांगितले आहे.

५. दि. ३०/०७/०९ च्या अंकात गोपाल हागे व मनजीतसिंग शीख यांनी **'सामूहिक श्रमदानातून साधली कोंटीच्या गावकऱ्यांनी प्रगती'** या लेखात बुलढाणा जिल्हयातील खामगाव तालुक्यातील कोंटी या गावाने लोकसहभाग, स्थानिक प्रशासन व वनविभागाच्या मदतीने वनसंरक्षण व जलसंधारणाचे आदर्शवत काम करून जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळवून आपल्या गावाचे नाव राज्याच्या नकाशावर ठळकपणे कसे आणले आहे हे सांगितले.

६. दि. १५/०८/०९ च्या अंकात उमाशंकर मिश्र (अनुवाद ः अनिकेत कोनकर ) यांनी **'राजुखेडी गावाने मिळविले विकास कामाद्वारे नवे स्वातंत्र्य!'** या लेखात मध्य प्रदेशच्या सिहोर जिल्हयातील राजुखेडी या गावाची ४-५ वर्षापूर्वीची परिस्थीती व आजची स्थिती याची माहिती देताना त्या गावाला 'समर्थन' नावाच्या स्वयंसेवी संस्थेची मदत कशी झाली व नंतर गावातील शौचालय, विजेचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा सोडवला व स्वयंसहाय्यता गटांच्या मदतीने महिलांचे सक्षमीकरण कसे झाले आहे याची माहिती दिली आहे.

७. दि. १९/१२/०८ रोजी सुनिल चव्हाण यांनी **'चिमुकल्या सिक्कीममध्ये स्वच्छतेचे नवे शिखर'** या लेखात सिक्कीम या राज्याने वीज, पाणीपुरवठा व संपूर्ण स्वच्छता यासारख्या सर्वच बाबतीत देशापुढे कसा आदर्श ठेवला आहे याची माहिती देऊन एकूण देशामध्ये अजूनही किती लोकांच्याकडे शौचालय सुविधा नाही हे सांगितले आहे. लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी लोकशिक्षण व गंभीर जनजागृती व्हायलाच हवी असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

### ३.५.३ <u>दैनिक पुढारी</u>

१. दि. ०२/०३/०८ रोजी डॉ.सुधीर भोंगळे यांनी **'पेटलेले पाणी'** या लेखात देशातील विविध राज्ये पाण्याचा वापर अनिर्बंध पध्द्तीने कसा करत आहेत. त्यांच्यावर केंद्रशासनाचे अंकुश कसे नाही? राज्य सरकारनाही शेतकरी वर्ग हा नेहमीच दारिद्रय अवस्थेत दुबळा, पिचलेला, कर्जबाजारी, लाचार आणि अगतिक हवा आहे का? असा प्रश्न उपस्थित करून पुढे ते म्हणतात की, शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती महत्वाची आहे याचे उत्तर सरकारने देण्याची वेळ आता आली आहे. असे मत व्यक्त करून त्यांनी पीक पध्दतीची शिस्त कशी अनिवार्य आहे व घटना दुरूस्तीचे आव्हान काय आहे हेही सांगितले आहे.

२. दि. ०९/०३/०८ रोजी डॉ.सुधीर भोंगळे यांनी **'पेटलेले पाणी'** भाग २ या लेखात महाराष्ट्राने सिंचनाच्या क्षेत्रात महाराष्ट्राच्या निर्मितीपासून जी प्रगती केली आहे तिचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

३. दि. २३/०३/०८ रोजी डॉ. सुधीर भोंगळे यांनी **'पेटलेले पाणी'** या सदरात 'अप्पर वर्धा धरण व विदर्भाचा विकास' या लेखात '१७ नोव्हेंबर १९९५ रोजी घेतलेल्या शंकरराव चव्हाणांच्या मुलाखतीच्या आधारे अप्पर वर्धा धरण व्हावे यासाठी मान. शंकरराव चव्हाणांनी केलेले प्रयत्न व हे धरण होऊ नये म्हणून विदर्भातील काही लोकांचा व नेत्यांचा झालेला प्रचंड विरोध तसेच गडचिरोली जिल्हयातील इंचमपल्ली व भोपालपट्टनम या प्रकल्पानाही विदर्भातील पुढाऱ्यांनी केलेला विरोध या सारख्या मुद्दयांचे विवेचन केलेले आहे.

४. दि. २३/०३/०८ रोजी अनिल टाकळकर यांनी **'स्वच्छ सुंदर शहराचे मारेकरी'** या लेखात 'फोर्ब्ज' या नियतकालीकाने प्रसिध्द केलेल्या जगातील सर्वाधिक अस्वच्छ शहरांच्या यादीत मुंबई व दिल्लीचा समावेश असणे भारतीयांच्या दृष्टीने शरमेची बाब आहे. भारतातील सर्वच शहरांची अशी दयनीय अवस्था का व्हावी? ज्याच्यावर याची प्रामुख्याने जबाबदारी आहे, ते लोकप्रतिनिधीच शहराच्या विद्रुपीकरणात भर टाकत असतील तर ते अधिक धक्कादायक नव्हे काय? असा प्रश्न उपस्थित करून पुढे संघटित जनमताचा दबाव आणि स्वयंशिस्त यांच्या आधारे सामूहिक निर्धारातूनच हे चित्र बदलू शकते असा आशावाद अनिल टाकळकर यांनी व्यक्त केला आहे.

५. दि. २२/०३/०९ रोजी खलील अन्सारी यांनी **'जलसिंचन'** या लेखात जागतिक आढावा घेताना गेल्या ५० वर्षातील जगाची प्रगती, विविध शोधांमुळे मानवाचे वाढलेले

आयुर्मान, वाढलेली लोकसंख्या परिणामी पर्यावरणाचे संतूलन बिघडून झालेले प्रदूषित जलस्त्रोत यासारख्या समस्या कशा निर्माण झाल्या आहेत हे सांगून या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक महानगरामध्ये रेनवॉटर हार्वेस्टींग अनिवार्य करावे, महानगरातील सांडपाण्याची व्यवस्था ही पूर्णत: कार्यक्षमतेची असणे आवश्यक आहे. जलस्त्रोताचे संवर्धन ही काळाची गरज असून यामध्ये प्रत्येक नागरिकांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे. लोकशिक्षणाचा भाग म्हणून ही जबाबदारी पर्यावरणप्रेमी/समाजकारणी/राजकारणी तसेच लोकप्रतिनिधींनी उचलावी असे उपाय सांगितले आहेत.

६. दि. ३०/०८/०९ रोजी रा.ना. रक्तवान यांनी आपल्या '**निसर्गदत्त पाण्याचे योग्य उपयोजन**' या लेखात निसर्गता पावसाचे मिळणारे शुध्द पाणी कमी खर्चात कसे मिळवायचे? छतावरील पावसाचे पाणी कसे मिळवायचे? त्याला कोणकोणती साधने लागतात याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

### ३.५.४ <u>दैनिक लोकमत</u>

१. दि.२०/०८/०९ रोजी रमेश पाटील यांनी आपल्या '**बचत गटाची चळवळ ...महिलांना देतेय उभारी**' या लेखात आजपर्यंत केवळ 'रांधा, वाढा अन् उष्टी काढा' यामध्येच आपले जीवन व्यतीत करणाऱ्या महिलांनी बचत गटाची नवसंजीवनी कशी मिळाली आहे व याचा कोल्हापूर जिल्हयातील पावणेचार लाख महिलांना कसा फायदा झाला आहे हे सांगितले आहे.

### ३.५.५ दैनिक तरूण भारत (कोल्हापूर)

१. दि. १९/०६/०७ रोजी डॉ.राजेंद्रसिंह राणा यांनी जिल्हा परीषद कोल्हापूरच्या जलस्वराज्य प्रकल्प विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करीत असताना 'भविष्यातील पाण्याची टंचाई टाळण्यासाठी पाण्याची बचत करा' असे आवाहन करून ते म्हणाले की, जेवढे पाणी आपण वापरतो तेवढे पाणी, जमिनीत मुरण्यासाठी प्रयत्न केल्यास पाणी टंचाईवर मात करता येईल.

## संदर्भ

**ग्रंथ :-**


१. घारे मुकूंद ः ' सहभागीय पाणलोटक्षेत्र विकास हस्तग्रंथ', अफार्म प्रकाशन, ३ सी शंकरशेठ रोड पुणे ,२००० .

२. हजारे आण्णा ः माझे गाव - माझे तीर्थ , राळेगणसिध्दी परिवार प्रकाशन, राळेगणसिध्दी, २००२ .

३. वारघडे सुरेशचंद्र ः हिवरे बाजार ची यशोगाथा , हिवरे बाजार परिवार प्रकाशन, हिवरेबाजार, २००३ .

४. मिश्र अनुपम (अनुवादक - प्रदिप भलगे) ः तलावांची भारतीय परंपरा, साकेत प्रकाशन, ११५ . म.गांधीनगर, स्टेशनरोड, औरंगाबाद, २००३ .

५. जगदाळे अनिलराज ः पेटलेले पाणी - पेटणारे पाणी, सुमेरू प्रकाशन डि-६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), २००४ .

६. गौतम एस.जी (संपादक) ः 'प्रश्न पाण्याचा आपल्या सर्वांचा', साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर -१२,२००४ .

७. देसाई दत्ता ः 'जलयुध्द की जलक्रांती', प्रकाश विश्वासराव लोकवाङ्‌मय गृह, प्रभादेवी मुंबई, २००५ .

८. धाराशिवकर मुकूंद ः दुष्काळ भेडसावतोय? उपाय तुमचे --- तुमचेच पाणी!, मनोविकास प्रकाशन, पुणे - ३०, २००५ .

९. Rajvidya Neelima and Markandey Dilip kumar : 'Water' Kulbhushan Nangia A.P.H. Publishing Corporation, New Delhi, 2005.

१०. भोंगळे सुधीर ः 'विकासवाटा', सुशान प्रकाशन १०, योजनगंधा सोसायटी, शिवतीर्थ नगर, कोथरूड , पुणे, २००५ .

११. शहा सुरेखा ः 'महाराष्ट्राचे जलनायक' , सुमेरू प्रकाशन डी-६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), २००६ .

१२. मोरवंचीकर रा.श्री. ः 'भारतीय जलसंस्कृती', सुमेरू प्रकाशन डी-६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), २००६ .

**मासिके :-**


१. वसंत सुनिला ः 'ग्रामीण पेयजल व मलनि:सारण' योजना मासिक, (जून २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई , पान नं. २ ते ७.

२. कर्वे ग.ल. ः 'जल व्यवस्थापनातील नवे शोध' योजना मासिक, ( जून २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई , पान नं. ८ व १२.

३. सुर्वे जी.पी. ः 'जल संस्कृती आणि नियोजन' योजना मासिक, (जून २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई , पान नं. ९ ते १२.

४. काळे दिलीप 'जलसमस्या - स्वरूप व उपाय' योजना मासिक, (ऑगस्ट २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई , पान नं. ७१,७२,७५.

५. राजपूत धोंडीरामसिंह 'पाण्याचा थेंब थेंब वाचवू या' योजना मासिक, (ऑगस्ट २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई, पान नं. ७६, ७८.

६. राजपूत ः 'छतावरील पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण' योजना मासिक, (ऑगस्ट २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई, पान नं. ७७ व ७८.

७. खेडकर गोवर्धन ः 'पर्यावरण प्रदूषणाच्या विळख्यात' योजना मासिक, ( डिसेंबर २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई, पान नं. ६७ ते ७०.

८. चौधरी संदिपकुमार ः 'महिलांच्या सशक्तीकरणात शिक्षणाची भूमिका', योजना मासिक, (डिसेंबर २००६), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई , पान नं. ७३ ते ७५.

९. भांडवलकर आर.बी. 'जलव्यवस्थापन काळाची गरज' योजना मासिक, (जून २००७), प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी मुंबई, पान नं. ४२ ते ४४.

१०. पाटील आर.आर. (मा.उपमुख्यमंत्री) 'ग्रामस्वच्छतेची नवी परंपरा' लोकराज्य मासिक, (जून २००७), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई पान नं. १२.

११. ठाकरे सुधीर ः (सह सचिव, महाराष्ट्र शासन) 'स्वच्छतेचा वेलू गेला गगनावरी' (मुलाखत) लोकराज्य मासिक, ( जून २००७) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं.१५ ते १९.

१२. संजीवकुमार ः 'किमया लोकसहभागाची' लोकराज्य मासिक, (जून २००७), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं.२० व २१.

१३. धुमाळ विश्वास ः 'प्रबोधनाचे यश' लोकराज्य मासिक, (जून २००७), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं.२२ व २३.

१४. मुळे सुरेखा ः 'महिला विकासाची त्रिसूत्री' लोकराज्य मासिक, ( नोव्हेंबर २००७), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं.३२ व ३३.

१५. कदम संजय ः 'गावागावात सारं , निर्मलतेचं वारं' लोकराज्य मासिक, ( नोव्हेंबर २००७), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं. २८ व २९.

१६. देशपांडे पद्मभूषण ः 'पाण्याच्या समान वाटपासाठी भूजल कायदा' लोकराज्य मासिक,(मे २००८),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पान नं.३ ते ५.

१७. झेंडे आर.पी. ः (संपादक) 'मिणचे खुर्दच्या महिलांची जलक्रांती' 'जलसंपदा' जलस्वराज्य प्रासंगिक वार्तापत्र, (ऑगस्ट २००८), अक्षर मुद्रणालय, जिल्हा परिषद कोल्हापूर.

१८. महाले व भांदे ः 'जलसाक्षरता आवश्यक' 'जलसंवाद' मासिक, (डिसेंबर २००८), दत्ता देशकर व प्रदिप चिटगोपेकर प्रकाशन औरंगाबाद, पान नं. १२ ते १५.

प्रकरण ४ थे

# तथ्यसंकलनाचे विश्लेषण भाग - I

(जलस्वराज्य प्रकल्पाविषयी संबंधित घटकांच्या प्रतिक्रिया)

४.१ प्रस्तावना

४.२ शासकीय अधिकारी

    ४.२.१ जिल्हा संचालक व जिल्हा समन्वयक

    ४.२.२ विविध चमू

    ४.२.३ पंचायत समिती पातळीवरील गठीत चमू

४.३ सहाय्यकारी संस्था

४.४ जलस्वराज्य कार्यालय

    ४.४.१ प्रस्तावना

    ४.४.२ ग्रामपंचायतीतील विविध सुविधाबाबतची माहिती

    ४.४.३ प्रकल्पित गावातील स्थानिक यंत्रणेतील घटक

४.५ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

    ४.५.१ प्रस्तावना

    ४.५.२ पदाधिकाऱ्याची वैयक्तिक माहिती

    ४.५.३ पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

४.६ महिला विकास समिती

    ४.६.१ प्रस्तावना

    ४.६.२ अध्यक्ष व सचिवांची वैयक्तिक माहिती

    ४.६.३ पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

४.७ सामाजिक लेखा परीक्षण समिती

    ४.७.१ प्रस्तावना

    ४.७.२ अध्यक्ष व सचिवांची वैयक्तिक माहिती

    ४.७.३ पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

४.८ ग्रामदूत

    ४.८.१ प्रस्तावना

    ४.८.२ ग्रामदूताची वैयक्तिक माहिती

    ४.८.३ ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया

४.९ दुर्बल घटक

    ४.९.१ प्रस्तावना

    ४.९.२ वैयक्तिक माहिती

    ४.९.३ दुर्बल घटकांच्या प्रतिक्रिया

४.१० महिला सक्षमीकरण

    ४.१०.१ प्रस्तावना

    ४.१०.२ उत्तरदात्या महिलांची वैयक्तिक माहिती

    ४.१०.३ सक्षमीकरणाविषयी महिला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया

## प्रकरण ४थे

# तथ्यसंकलनाचे विश्लेषण भाग - I

## (जलस्वराज्य प्रकल्पाविषयी संबंधित घटकांच्या प्रतिक्रिया)

### ४.१ प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण जनतेचा पिण्याचे पाणी व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक बॅंक अर्थसहाय्यित 'जलस्वराज्य' हा प्रकल्प सन २००२ मध्ये महाराष्ट्रामध्ये सुरू झाला. सुरूवातीला ३ जिल्हयातील ३० पथदर्शी ग्रामपंचायतीची निवड केली. नंतर या निवडलेल्या पथदर्शी ग्रामपंचायतीमध्ये जलस्वराज्य प्रकल्प राबवित असताना आलेले अनुभव व अडचणींचा विचार करून त्यामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या व त्यानंतर महाराष्ट्राच्या २६ जिल्हयात जलस्वराज्य प्रकल्प राबविला गेला.

महाराष्ट्रातील या २६ जिल्हयातीलच कोल्हापूर हा एक जिल्हा. कोल्हापूर जिल्हयासाठी जलस्वराज्य प्रकल्प जुलै २००४ मध्ये मंजूर झाला व सप्टेंबर २००४ पासून प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरूवात झाली. कोल्हापूर जिल्हयामध्ये जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी शासनाच्या पाणीपुरवठयाच्या विविध योजना राबविल्या जात होत्या व सद्याही राबविल्या जात आहेत. परंतु जलस्वराज्य प्रकल्प मात्र इतर योजनांची तुलना करता त्याचे उद्‌देश, नियम, अटी इ. मुळे अगदी वेगळा व आदर्शवत ठरलेला आहे.

जलस्वराज्य प्रकल्पात गावाची गरज, गावाचा विकास कार्यक्रमातील यापूर्वीचा सहभाग व भौगोलिक स्थिती यांचा अभ्यास हा 'गावसहभागी मूल्यांकन पध्दती' द्वारे केला जातो. ग्रामस्थांच्या सहभागाने व सहकार्यानेच गावाच्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतही निश्चित केले जाते. हा प्रकल्प चिरंतनकाल टिकण्यासाठी गावाचा सहभाग व त्यांची क्षमता वाढावी म्हणून या जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांची क्षमता बांधणी केली जाते. त्यासाठी ग्रामस्थांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. आदर्श गावांना भेटी, अभ्यासदौरे, पाणी स्वच्छता, पर्यावरण, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता याबाबत माहिती देऊन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण केली जाते. महिलांना कायदे विषयक, आरोग्य विषयक आणि व्यावसायविषयक प्रशिक्षण व माहिती दिली जाते. महिलांचे बचत गट निर्माण करून त्यांना बीजभांडवल पुरवून स्वत:च्या पायावर उभे करण्याचे कामही जलस्वराज्य प्रकल्पाद्वारे केले जाते.

वरील सर्व गोष्टींच्याबरोबरच प्रकल्पित गावातील पाणी व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेतील शासकीय अधिकारी, ग्रामपंचायतीने निवडलेल्या सहाय्यकारी संस्थेचे पदाधिकारी, ग्रामपंचायत व ग्रामसभेने निवडलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजिक लेखा परीक्षण समितीचे पदाधिकारी, समिती सदस्य, जलस्वराज्य हिशोबनीस व ग्रामदूत हे सर्व घटक महत्वाचे आहेत. या घटकांच्या प्रामाणिक प्रयत्नाशिवाय जलस्वराज्य प्रकल्प यशस्वी होऊच शकत नाही. कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्पातील निवडलेल्या गावांचा अभ्यास करण्यासाठी वरील प्रत्येक घटकांसाठी एक स्वतंत्र मुलाखत अनुसूची तयार करून प्रत्येक घटकाला प्रत्यक्ष भेटून त्यांची मुलाखत घेऊन अभ्यासासाठी आवश्यक व महत्वाची माहिती संकलित करून त्या माहितीच्या आधारे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे केलेले आहे.

## ४.२ शासकीय अधिकारी

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' हे नवीन सूत्र स्विकारून हा प्रकल्प राबविण्यात येत असला तरी या प्रकल्पाची ग्रामपातळीवर योग्यप्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी शासन यंत्रणाही तेवढीच महत्वाची आहे. कारण शासनाच्या सकारात्मक सहभागाशिवाय योजना यशस्वी होऊ शकणार नाही. म्हणूनच हया प्रकल्पात जे शासकीय घटक कार्यरत आहेत त्याचे थोडक्यात स्वरूप असे आहे.

### ४.२.१ जिल्हा संचालक व जिल्हा समन्वयक -

जलस्वराज्य प्रकल्पाचा जिल्हा संचालक म्हणून संबंधित परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व प्रकल्पाचा जिल्हा समन्वयक म्हणून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी यांना महाराष्ट्र शासनाने घोषित केलेले आहे.

### ४.२.२ विविध चमू -

हया प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी १) जिल्हा सुलभीकरण चमू २) जिल्हा पडताळणी व सनियंत्रण चमू ३) जिल्हा आर्थिक व्यवस्थापन चमू ४) जिल्हा प्रशासन चमू असे चार चमू जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात गठीत करण्यात आलेले आहेत.

### ४.२.३ पंचायत समिती पातळीवरील गठीत चमू -

पंचायत समिती स्तरावर आवश्यकतेप्रमाणे या प्रकल्प अंमलबजावणीला सहाय्य करण्यासाठी पंचायत समितीत कार्यरत असलेले गट विकास अधिकारी, उपअभियंता

(पाणीपुरवठा) व विस्तार अधिकारी (पंचायत अथवा आरोग्य) या तीन अधिकाऱ्यांचा एक चमू गठीत करण्यात आलेला आहे.

जलस्वराज्य प्रकल्प अंमलबजावणीसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग नेमण्याचे सर्व अधिकार जिल्हा संचालक व प्रकल्प समन्वयक यांना महाराष्ट्र शासनाने दिलेले आहेत. शिवाय ग्रामस्तरावर ग्रामपंचायती अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ च्या कलम ४९ अन्वये ग्रामपंचायत अंतर्गत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत हा प्रकल्प कार्यान्वित करून मागणी आधारीत व समूह सहभागातून राबविण्यात येत आहे.

- **<u>जलस्वराज्य प्रकल्पाविषयी शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया</u> -**

कोल्हापूर जिल्हयामध्ये सुरू असलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी करीत असताना शासकीय अधिकाऱ्यांना आलेले अनुभव, अडचणी, लोकसहभाग व लोकांची मानसिकता वगैरे गोष्टीबावत मुलाखतीद्वारे माहिती संकलीत केलेली आहे. या यंत्रणेतील एकूण शासकीय अधिकाऱ्यांपैकी प्रातिनिधीक स्वरूपात दोन शासकीय अधिकाऱ्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली त्यापैकी १ पुरूष अधिकारी व १ स्त्री अधिकारी आहेत. दोन्हीही अधिकाऱ्यांच्यामते कोल्हापूर जिल्हयामध्ये सुरू असलेल्या स्वजलधारा, भारतनिर्माण, राजीव गांधी पेयजल योजना व यासारख्या इतर योजनांच्यापेक्षा जलस्वराज्य प्रकल्प हा अधिक लोकाभिमुख आहे.

- **<u>कालावधीविषयी</u> -**

जलस्वराज्य प्रकल्प १८ महिन्याच्या निर्धारीत कालावधीत २०% गावांनी पूर्ण केला असे स्त्री अधिकाऱ्याने सांगितले तर पुरूष अधिकाऱ्याने एकाही गावाने प्रकल्प पूर्ण केला नाही अशी माहिती पुरविली. सदर जलस्वराज्य प्रकल्प निर्धारीत वेळेत पूर्ण न होण्याची शासकीय अधिकाऱ्यांनी तांत्रिक कामे वेळेवर होत नाहीत भौगोलिक व नैसर्गिक अडचणी (महापूर वगैरे), गावातील राजकारण, निधी वेळेवर न मिळणे, मालमत्तेचे दर वाढणे इ. कारणे सांगितली आहेत. अर्थात कालावधीसंदर्भात विचारले असता स्त्री अधिकाऱ्याने १८ महिने हा कालावधी योग्य असल्याचे सांगितले तर पुरूष अधिकाऱ्याने ३० महिन्याचा कालावधी असला पाहिजे असे मत व्यक्त केले.

- **<u>महिला दुर्बल घटकाच्या प्रतिसादाविषयी</u> -**

गावातील दुर्बल घटकांच्या महिलांचा या प्रकल्पास किती प्रतिसाद आहे असे विचारले असता दोन्हीही अधिकाऱ्यांनी महिलांचा प्रतिसाद अतिशय चांगला मिळाल्याचे सांगितले. दोन्हीही अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या उद्दिष्टाप्रमाणे गावातील गरीब व दुर्बल

घटकातील लोकांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात आहे असे सांगून त्यांनी प्रकल्पासाठी सहाय्यकारी संस्थांच्याकडून मिळणाऱ्या सहकार्याबाबत व त्यांच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले, याच बरोबर त्यांनी प्रकल्पाच्या धोरणानुसार लोकवर्गणीमध्ये सर्व जनतेचा सहभाग असल्याचे स्पष्ट केले.

● **पाणी व स्वच्छतेविषयी** -

प्रत्येक ग्रामपंचायतीने पाणीपट्टी १००% वसूल होण्यासाठी १) पाणीपट्टी वसूलीचे काम महिला बचत गटाकडे दयावे. २) दर महिन्याला पाणीपट्टी वसूल करावी. ३) पाणी वापरासाठी वैयक्तिक मीटरपध्दतीचा अवलंब करावा. ४) विशिष्ट तारखेपर्यंत पाणीपट्टी न भरल्यास ताबडतोब नळकनेक्शन तोडले जावे. असे दोन्ही शासकीय अधिकाऱ्यांचे मत आहे.

याचप्रप्रमाणे घरगुती सांडपाण्याचा उपयोग लोकांनी परसबागासाठी करावा असे दोघांचेही मत असून प्रकल्पातील केवळ २५ ते ३० % गावांनीच सांडपाण्याचे व्यवस्थापन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्प राबवित असताना गावातील राजकीय गटातटाचा अडथळा हा काही प्रमाणात असतोच असे स्पष्ट करून त्यांनी एकूणच जलस्वराज्य प्रकल्प ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय चांगला आहे असे मत व्यक्त केले.

## ४.३ सहाय्यकारी संस्था

कोल्हापूर जिल्हयामधील ११५ गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू आहे. या गावांना दैनंदिन नियोजन व अंमलबजावणी यामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी सहाय्यकारी संस्थांची नेमणूक जिल्हा परिषदेकडून केली जाते. कोल्हापूर जिल्हयांमध्ये ९ सहाय्यकारी संस्था कार्यरत असून या प्रत्येक संस्थेकडे कमी जास्त प्रमाणात गावे आहेत. प्रकल्पित गावाने कोणत्या सहाय्यकारी संस्थेची मदत घ्यावयाची हे ठरविण्याचे अधिकार त्या-त्या ग्रामपंचायतीला असतात.

या सहाय्यकारी संस्था गाव पातळीवर काम करीत असताना त्यांना आलेले अनुभव, अडचणी याबाबत माहिती घेण्यासाठी एक स्वतंत्र प्रश्नावली तयार करून त्याआधारे ९ पैकी ५ सहाय्यकारी संस्थाप्रमुखांची मुलाखत घेऊन माहिती संकलित करण्यात आली. त्याचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे...

**<u>सहाय्यकारी संस्था व गावे</u>**

**सारणी क्र - ४.१**

| अ.क्र. | सहाय्यकारी संस्थेचे नांव | संस्थेअंतर्गत असणाऱ्या गावांची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. गोमुख ट्रस्ट, पुणे | १३ |
| २. | द ब्रेन फाऊंडेशन, वारणानगर | १८ |
| ३. | श्री. अंबाई कृषी व ग्रामीण विकास संस्था, उत्तूर | १० |
| ४. | सिध्दपूष्प अकॅडमी, कोल्हापूर | १९ |
| ५. | क्वॉलिटी मॅनेजमेंट सर्व्हिस (आय) प्रायव्हेट लि. | १० |
| | एकूण | ७० |

सारणी क्र. ४.१ मध्ये दाखविलेल्या ५ सहाय्यकारी संस्था प्रमुखांचे वय, लिंग, धर्म, जात, शिक्षण व वैवाहिक स्थिती पाहता पाच सहाय्यकारी संस्थेमधील ३ (६०%) संस्थाप्रमुखांचा वयोगट १८ ते ४० वर्षे आहे. तर २ (४०%) संस्थाप्रमुखांचा वयोगट ४१ ते ६० वर्षे आहे. १ (२०%) संस्थाप्रमुख स्त्री असून ४ (८०%) संस्थाप्रमुख पुरूष आहेत. म्हणजेच स्त्रियांच्या तुलनेत पुरूष संस्थाप्रमुखांचे प्रमाण हे जास्त आहे.

या पाचही सहाय्यकारी संस्थेचे संस्थाप्रमुख हिंदू धर्माचे असून त्यापैकी ३ (६०%) संस्थाप्रमुख खुल्या प्रवर्गातील आहेत तर २ (२०%) संस्थाप्रमुख हे इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत. तसेच हे सर्व पाचही संस्थाप्रमुख उच्चशिक्षित आहेत ४ (८० %) संस्थाप्रमुख विवाहीत असून १ (२० %) संस्थाप्रमुख अविवाहीत आहेत.

- **<u>जलस्वराज्य प्रकल्पाच्या कालावधीविषयी</u>** -

जलस्वराज्य प्रकल्पाच्या निर्धारीत कालावधीविषयी विचारले असता ४ (८०%) सहाय्यकारी संस्थाप्रमुखांनी निर्धारीत १८ महिने कालावधी कमी आहे. तर एका (३०%) संस्थाप्रमुखांनी प्रकल्पासाठीचा निर्धारीत १८ महिने कालावधी पुरेसा आहे असे सांगितले. यावरून असे स्पष्ट होते की, निर्धारीत १८ महिन्याचा कालावधी कमी असून तो वाढविणे आवश्यक आहे. अर्थात कालावधी वाढला पाहिजे म्हणणाऱ्या ४ संस्थाप्रमुखापैकी ३ (७५%) संस्थाप्रमुखांनी दोन वर्षे इतका कालावधी असला पाहिजे असे मत व्यक्त केले

तर एका (२५%) संस्थाप्रमुखांनी प्रकल्पासाठी दोन वर्षे सहा महिने इतका कालावधी असला पाहिजे असे सांगितले.

- <u>ग्रामस्थांच्या प्रतिसादाविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पाला ग्रामस्थांचा किती प्रतिसाद मिळाला हया विचारलेल्या प्रश्नाला ४(८०%) संस्थाप्रमुखांनी ग्रामस्थांचा प्रतिसाद समाधानकारक मिळाल्याचे सांगितले तर एका(२०%) संस्थाप्रमुखांनी प्रतिसाद समाधानकारक नसल्याचे सांगितले. या प्रकल्पाला महिलांचा प्रतिसाद मात्र १००%असल्याचे मत पाचही संस्थाप्रमुखांनी व्यक्त केले.

- <u>ऐक्यभाव वाढीविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील लोकांच्यामध्ये ऐक्यभाव वाढण्यास मदत झाली की नाही याबाबत विचारलेल्या प्रश्नाला ३(६०%) सहाय्यकारी संस्थाप्रमुखांनी ऐक्यभाव वाढण्यास मदत झाल्याचे तर २ (४०%) संस्थाप्रमुखांनी काही प्रमाणात ऐक्यभाव वाढण्यास मदत झाल्याचे सांगितले.

- <u>लोकवर्गणीमधील ग्रामस्थांच्या सहभागाविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पासाठी ग्रामस्थांकडून जमा होणाऱ्या १०% लोकवर्गणीसंदर्भात ग्रामस्थांनी किती प्रमाणात सहभाग दाखविला याविषयी ३ (६०%) संस्थाप्रमुखांनी सर्वांचा सहभाग असल्याचे तर २ (४०%) संस्थाप्रमुखांनी काही लोकांचा सहभाग नसल्याचे मत व्यक्त केले.

- <u>कचरा व्यवस्थापनाबाबत</u> -

जलस्वराज्य प्रकल्प सुरू असलेल्या गावामधील कचऱ्याच्या व्यवस्थापनाविषयी विचारले असता ४(८०%)संस्थाप्रमुखांनी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले आहे असे उत्तर दिले तर एका(२०%)संस्थाप्रमुखांनी कचरा व्यवस्थापन केले असल्याचे सांगितले.

- <u>सांडपाण्याचा निचरा पध्दतीविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्प सुरू असलेल्या गावामध्ये सांडपाण्याचा निचरा कशाप्रकारे केला जातो याविषयी विचारले असता ३ (६०%) सहाय्यकारी संस्थाप्रमुखांनी सांडपाण्याचा वापर परसबागासाठी केला जातो असे सांगितले तर २ (४०%) सांडपाणी गटारीत सोडले जाते असे सांगितले.

## ४.४ जलस्वराज्य कार्यालय

### ४.४.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्प राबवित असताना स्थानिक पातळीवर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती व सामाजिक लेखापरिक्षण समिती या तीन महत्वाच्या समित्यांची निवड केली जाते. या समित्यामार्फत जरी प्रकल्प राबविला जात असला तरी या प्रकल्पासाठी शासनाकडून येणारे अनुदान, ग्रामस्थांच्याकडून जमा होणारी लोकवर्गणी व वेळोवळी प्रकल्पावर होणारा खर्च यांच्या सविस्तर नोंदी ठेवण्यासाठी गावामध्ये एक स्वतंत्र जलस्वराज्य कार्यालय स्थापन केलेले असते. या कार्यालयामध्ये सर्व प्रकारच्या जमाखर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी हिशोबनीस हा एक सचिव म्हणून कार्यरत असतो.

- **हिशोबनीस**

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'जलस्वराज्य' प्रकल्पाची योग्यपध्दतीने आणि काटेकोरपणे अमलबजावणी होण्याच्या दृष्टीने लोकांना सहभागी करून घेण्यात आले. गावपातळीवर हा प्रकल्प सक्षमरित्या राबविण्यासाठी संपूर्ण जबाबदारी गावावर टाकण्यात येते. अर्थात वेगवेगळी कामे पाहणारे वेगवेगळे घटक असतात उदा. ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजिक लेखा परीक्षण समिती आणि ग्रामदूत यांची निवड ग्रामसभेमध्येच होते. याबरोबरच आणखी एका महत्वाच्या घटकाची ग्रामसभेमध्ये निवड होते तो घटक म्हणजे हिशोबनीस. हिशोबनीस हा या प्रकल्पासाठी होणाऱ्या सर्व प्रकारच्या जमाखर्चाच्या नोंदी (हिशोब) ठेवण्याचे काम करीत असतो. शिवाय आर्थिक दृष्टीकोनातून आवश्यक त्या इतर गोष्टींची कागदोपत्री नोंदी ठेऊन त्या संदर्भातील अहवाल वेळोवेळी जिल्हा परीषद कार्यालयाला सादर करीत असतो.

कोल्हापूर जिल्हयामध्ये एकूण ११५ गावामध्ये हा प्रकल्प सुरू असून या प्रत्येक गावात एक हिशोबनीस असतो. अभ्यासासाठी ज्या २५ गावांची निवड केली आहे त्या प्रत्येक गावातील जलस्वराज्य कार्यालयात जाऊन हिशोबनीसाकडून त्या त्या जलस्वराज्य ग्रामपंचायतीमध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत याविषयी आणि एकूण प्रकल्प यशस्वी करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेविषयीची माहिती मिळविली.

### ४.४.२ ग्रामपंचायतीतील विविध सुविधाबाबतची माहिती

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील ग्रामपंचायतीमध्ये कोणकोणत्या सुविधा आहेत आणि कोणत्या सुविधा नाहीत या संदर्भातील माहिती संकलित केलेली आहे.

याचप्रमाणे पाण्याचे स्त्रोत आणि पाणी स्त्रोताचे गावापासूनचे अंतर, पाणीपट्टी वसूलीचे नेमके चित्र काय आहे? याबाबतीत संशोधकाला जी माहिती मिळाली ती खालीलप्रमाणे...

**१. संगणक सुविधा -**

निवडलेल्या एकूण २५ गावातील ९ (३६ %) ग्रामपंचायतीकडे संगणक सुविधा आहे तर १६ (६४ %) ग्रामपंचायतीकडे अजूनही संगणक सुविधा उपलब्ध झालेली दिसून आली नाही.

**२. शौचालय सुविधा -**

शासनाने सुरू केलेल्या ग्रामस्वच्छता आणि पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अंमलबजावणीच्या प्रक्रियेच्या यशाचे एक महत्वाचे प्रगतीचे पाऊल म्हणजे निवडलेल्या सर्वच २५ ग्रामपंचायतीमध्ये शौचालय सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून आले.

**३. पाणी स्त्रोत -**

भारतीय खेडी आजही नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या पाण्यावर अवलंबून आहेत. विशेषत: दुर्गम आणि डोंगर माथ्यावर वसलेल्या खेडयातील ग्रामस्थांना दूरवरून नदी, विहीर किंवा झऱ्याचे पाणी आणावे लागते. पण गेल्या १0-१५ वर्षामध्ये ज्या गावांच्यामध्ये थोडयाफार प्रमाणात बदल होऊन प्रगती झाली आणि शासनाच्या विविध पाणी पुरवठयाच्या योजना सुरू झाल्या तेंव्हापासून मात्र त्याच विहीरीचे, नदीचे, झऱ्याचे पाणी पाईपलाईनद्वारे गावांच्या एखादया उंच भागावर साठवण टाकी बांधून त्यामध्ये भरणा करून नळजोडणी पध्दतीने प्रत्येक घराला पाणी पुरवठा केला जातो. अर्थात संशोधकाने निवडलेल्या २५ गावापैकी १५ (६0%) गावांच्या पाणीपुरवठा योजनेचा स्त्रोत नदी असून ७(२८%) गावांचा पाणी स्त्रोत विहीर आहे. २(0८%) गावांचा पाणी स्त्रोत झरा आहे तर एका (४%) गावांचा पाणी स्त्रोत हा तलाव आहे.

यावरून हेच स्पष्ट होते की, बहुतांशी गावांना जो पाणी पुरवठा केला जातो त्याचे मुख्यस्त्रोत नदी आहे.

**४. पाणी स्त्रोताचे गावापासून अंतर -**

वेगवेगळया गावांना नदी, विहीर, झरा, तलाव यापासून पाणी पुरवठा होत असला तरी प्रत्येक गावाचे पाण्याच्या स्त्रोतापासूनचे अंतर हे भिन्न भिन्न असलेले आढळले. २५ गावापैकी २0 (८0%) गावांचे पाण्याच्या स्त्रोतापासूनचे अंतर १ ते ४ कि.मी. इतके असलेले आढळले. तर ५ (२0%) गावांचे पाण्याच्या स्त्रोतापासूनचे अंतर ५ ते ८ कि.मी. एवढे असलेले आढळले.

यावरून हे स्पष्ट होते की, पाणी ही माणसाची दैनंदिन आणि आवश्यक गरज आहे. म्हणूनच पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर कितीही असले तरी गावाला पाणी पुरवठा करणे ही ग्रामपंचायतीची महत्वाची जबाबदारी आहे. हे काम बहुतेक सर्वच ग्रामपंचायती करीत असतात.

**५. पाणीपट्टी वसूली -**

ग्रामपंचायती गावासाठी पाणी पुरवठयाच्या वेगवेगळया योजना राबवून गावाला पाणी पुरवठा करीत असतात. अर्थात या योजना राबविण्यासाठी आलेला खर्च गृहीत धरता आणि नियमितपणे होणारा वेगवेगळया प्रकारचा (देखभाल दुरूस्तीचा) खर्च विचारात घेता कोणत्याही ग्रामपंचायतीला हा खर्च करणे अशक्य असते. म्हणूनच प्रत्येक कुटुंबावर पाणीपट्टी आकारली जाते आणि या पाणीपट्टी वसूलीतून जमा झालेल्या पैशातूनच सर्व खर्च पाहिला जातो. पाणीपट्टी वसूलीच्याबाबतीत काही कुटुंबाच्याकडून बऱ्याच वेळेला हेळसांड होते, चाल ढकल केली जाते तर काहीजण हेतूपुरस्पर पाणीपट्टी भरण्याचे टाळत असतात.

संशोधकाला त्यांनी निवडलेल्या २५ गावातून जी माहिती मिळाली त्यातील केवळ ३ (१२%) ग्रामपंचायतीची पाणीपट्टी १००% वसूल होत असल्याचे दिसून आले तर २२ (८८%) ग्रामपंचायतीची पाणीपट्टी वसूली ही १००% पेक्षा कमी असल्याचे दिसून आले.

यावरून हेच स्पष्ट होते की, लोकांना पाणी वापरावयास पाहिजे पण पाणीपट्टी द्यावयास नको. लोकांच्या या प्रवृत्तीमुळेच अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होत असतात. किंबहुना अशी प्रवृत्ती बहुतांशी लोकांच्याकडे असेल तर योजना ठप्प होण्याची दाट शक्यता असते.

**४.४.३ <u>प्रकल्पित गावातील स्थानिक यंत्रणेतील घटक</u> -**

जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामसभेत ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती व सामाजिक लेखा परीक्षण समिती हया समित्या तसेच हिशोबनीस, ग्रामदूत हे स्वतंत्र घटक निवडले जातात. हया घटकामार्फत जलस्वराज्य प्रकल्पाची पूर्ण अंमलबजावणी झाल्यानंतर तो अधिकृतपणे ग्रामपंचायतीकडे निर्गमित केला जातो. त्यानंतर मात्र हा प्रकल्प अधिक सक्षमरित्या राबविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची म्हणजेच अगदी सरपंचापासून ते स्वच्छता कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांची सामूहिक असते. अर्थात या सर्व घटकांच्या संदर्भातील मिळालेली माहिती ही पूर्णपणे प्रत्येक

गावातील जलस्वराज्य कार्यातील सचिव म्हणजेच 'हिशोबनीस' यांनी पुरविली आहे. या सर्व घटकांचे थोडक्यात विश्लेषण खालीलप्रमाणे.

१. **हिशोबनीस**

- **वयोगट -**

हिशोबनीसाचे वय किती असावे याबाबतीत शासनाची कोणतीही विशिष्ट अशी अट नाही म्हणूनच २५ गावातील हिशोबनीसांचा वयोमानानुसार विचार करता २५ हिशोबनीसांपैकी ४ (१६%) हिशोबनीस १८ ते २७ या वयोगटातील आहेत. १४ (५६%) २८ ते ३७ वयोगटातील, ५ (२0%) ३८ ते ४७ वयोगटातील, तर २ (८%) हिशोबनीस ४८ ते ५७ वयोगटातील आहेत.

अर्थातच २८ ते ३७ या वयोगटातील हिशोबनीसांचे प्रमाण हे निम्म्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून आले.

- **शैक्षणिक पात्रता -**

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महत्वाच्या असणाऱ्या हिशोबनीसाच्या निवडीबाबत कोणत्याही शैक्षणिक पात्रतेच्या निश्चित अशा अटी नाहीत. अर्थात २५ हिशोबनीसांपैकी १ (४%) हिशोबनीस ८ वी ते १0 वी पर्यंत शिक्षण घेतलेले असून ९ (३६%) हिशोबनीस ११ वी ते १२ वी झालेले आहेत. १३ (५२%) हिशोबनीस पदवीपर्यंत तर २ (८%) हिशोबनीस हे पदव्युत्तरपर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

यावरून असे दिसून येते की, ८ वी ते १0 वी पासून ते पदव्युत्तरपर्यंत शिक्षण घेतलेले लोकही कमी जास्त प्रमाणात हिशोबनीसची महत्वाची जबाबदारी पार पाडण्यास उत्स्फूर्तपणे पुढे आलेले आहेत.

- **लिंगभेद -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामध्ये जे हिशोबनीस निवडले गेले त्यांच्याबाबतीत जशी वयाची आणि शिक्षणाची अट नाही त्याचप्रमाणे हिशोबनीस हा घटक पुरूष असावा की, स्त्री असावी? असा कोणताही नियम नाही म्हणूनच २५ हिशोबनीसांपैकी २ (८%) स्त्रिया तर २३ (९२%) पुरूष हिशोबनीस आहेत.

विशेष म्हणजे जलस्वराज्य प्रकल्पातील हिशोबनीस या पदाची सक्षमरित्या जबाबदारी पेलण्यासाठी स्त्रियादेखील पुढे येत आहेत आणि आपली पात्रता सिध्द करू पहात आहेत. हे त्यांच्यादृष्टीने या प्रकारातील महत्वाचे योगदान म्हणावे लागेल.

- **धर्म** -

जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत २५ गावातील हिशोबनीसांची माहिती संकलित केल्यानंतर असे आढळून आले की, २५ हिशोबनीसांच्यापैकी २४ (९६%) हिशोबनीस हिंदू धर्मीय असून १ (४%) हिशोबनीस हे मुस्लिम धर्मीय आहेत.

अर्थात शासनाच्या प्रकल्पामध्ये ग्रामपातळीवर कोणत्याही प्रकारचा धर्मभेद न करता सर्व धर्मियांना समान संधी आहे म्हणूनच २५ गावातील एका गावामध्ये मुस्लिम धर्मिय हिशोबनीसांची निवड झालेली दिसून येते.

- **जातप्रवर्ग** -

संशोधकाने निवडलेल्या २५ गावातील हिशोबनीसांची जातीनिहाय माहिती संकलित केल्यानंतर असे आढळून आले की, २५ गावातील हिशोबनीसांपैकी १९ (७६%) हिशोबनीस खुल्या प्रवर्गातील असून १ (४%) अनुसूचित जातीमधील आहेत २ (८%) भटक्या जमातीतील आहेत तर ३ (१२%) हिशोबनीस हे इतर मागास वर्गीय या प्रवर्गातील आहेत.

वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, ग्रामपातळीवर हिशोबनीसांची निवड करीत असताना त्या त्या गावामध्ये असणाऱ्या वेगवेगळया जातीतील प्रतिनिधींना संधी देण्यात आलेली आहे. अर्थात खुल्या प्रवर्गातील हिशोबनीसांची संख्या मात्र सर्वच बाबतीत अधिक प्रमाणात असल्याचे दिसून आले.

**२. सरपंच**

- **लिंगभेद** -

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील सरपंच या पदाविषयी विचारलेल्या प्रश्नाला हिशोबनीसांनी जी माहिती पुरविली ती अशी आहे की, २५ गावांपैकी १३ (५२%) गावामध्ये स्त्रिया सरपंच आहेत तर १२ (४८%) गावामध्ये पुरूष सरपंच आहेत. याचा अर्थच हा की, आरक्षणाच्या योजनेचा महिलांनी फायदा उठविलेला दिसून येते. किंबहुना यामुळे त्यांच्या सक्षमीकरणाला एक संधी मिळाली.

- **शैक्षणिक पात्रता** -

एकूण २५ गावामधील २५ सरपंचांपैकी ७ (२८%) सरपंचाचे शिक्षण १ ली ते ७ वी पर्यंत, ७ (२८%) सरपंचाचे शिक्षण ८ वी ते १0 वी पर्यंत, ४ (१६%) सरपंचाचे शिक्षण ११ वी ते १२ वी पर्यंत, ५ (२0%) सरपंचाचे शिक्षण पदवीपर्यंत, तर २ (८%) सरपंचाचे शिक्षण पदव्युत्तर पर्यंत झालेले आहे.

- **<u>पुरूष सरपंच</u> -**

२५ गावामधील १२ (४८%) पुरूष सरपंचापैकी एका (४%) सरपंचाचे शिक्षण १ ली ते ७ वी पर्यंत, ४ (१६%) सरपंचाचे शिक्षण ८ वी ते १0 वी पर्यंत, ३ (१२%) सरपंचाचे शिक्षण ११ वी ते १२ वी पर्यंत, २ (८%) सरपंचाचे पदवीपर्यंत, तर २ (८%) सरपंचाचे पदव्युत्तर पर्यंत शिक्षण झाल्याचे आढळून आले.

- **<u>स्त्री सरपंच</u> -**

याचप्रमाणे निवडलेल्या २५ गावामधील १३ महिला सरपंचापैकी ६ (२४%) सरपंच १ ली ते ७ वी पर्यंत, ३ (१२%) सरपंच ८ वी ते १0 वी पर्यंत, १ (४%) सरपंच ११ वी ते १२ वी पर्यंत, तर ३ (१२%) सरपंच तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या दिसून आले.

यावरून असे दिसून आले की, ग्रामीण भागाकडे १ ली ते ७ वी पासून ते पदवीपर्यंत शिक्षण असलेल्या महिला कमी जास्त प्रमाणात राजकीय सत्तास्थानी आहेत.

**३. उपसरपंच**

- **<u>लिंगभेद</u> -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावापैकी ३ (१२%) गावामध्ये स्त्रिया उपसरपंच आहेत तर २२ (८८%) गावामध्ये पुरूष उपसरपंच आहेत.

या आकडेवारीवरून हे स्पष्ट होत की, स्त्री सरपंचाच्या तुलनेत स्त्री उपसरपंचाची संख्या फारच कमी असलेली आढळली. तर पुरूष उपसरपंचाची संख्या ही पुरूष सरपंचापेक्षा अधिक प्रमाणात असलेली दिसून आली.

- **<u>शैक्षणिक पात्रता</u> -**

एकूण २५ गावामधील २५ उपसरपंचापैकी २ (८%) उपसरपंच निरक्षर आहेत. ७(२८%) उपसरपंचाचे शिक्षण १ ली ते ७ वी पर्यंत, ९ (३६%) उपसरपंच ८ वी ते १0 वी पर्यंत, ४(१६%) उपसरपंच ११ वी ते १२ वी पर्यंत, २(२८%) उपसरपंच पदवी पर्यंत, तर १(४%) उपसरपंच पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

थोडक्यात उपसरपंच पदावर निरक्षर व्यक्तीपासून ते उच्चशिक्षित लोकही विराजमान झाले आहेत.

- **<u>पुरूष उपसरपंच</u> -**

२५ गावामधील २२(८८%) पुरूष उपसरपंचापैकी १(४%) उपसरपंच निरक्षर आहेत. ७(२८%) उपसरपंच १ ली ते ७ वी पर्यंत, ८ (३२%) उपसरपंच ८ वी ते १0

वी पर्यंत, ४ (१६%) उपसरपंच ११ वी ते १२ वी पर्यंत, १ (४%) उपसरपंच पदवीपर्यंत, तर १ (४%) उपसरपंच पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

यावरून २२ गावातील पुरूष उपसरपंचापैकी निरक्षर, पदवीपर्यंत व पदव्युत्तर शिक्षण असलेल्या उपसरपंचापेक्षा ८ वी १0वी या स्तरातील शिक्षण असलेल्या उपसरपंचाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते.

- **स्त्री उपसरपंच -**

याचप्रमाणे २५ गावामधील केवळ ३ महिला उपसरपंचापैकी १ (४%) उपसरपंच निरक्षर आहेत. १ (४%) उपसरपंच ८ वी ते १0 वी पर्यंत शिकलेल्या आहेत. तर १ (४%) उपसरपंच पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत.

**४. ग्रामपंचायत सदस्य**

- **लिंगभेद -**

२५ गावामधील २५ ग्रामपंचायतीतील एकूण ग्रामपंचायत सदस्य संख्या २५३ आहे. त्यामध्ये ८५ (३३.६0%) महिला सदस्या आहेत. तर १६८ (६६.४0%) पुरूष सदस्य आहेत. अर्थात महिलांच्या तुलनेत पुरूषांचे प्रमाण जरी जास्त असले तरी शासनाच्या महिलांसाठी ३३% राखीव जागेच्या धोरणाप्रमाणे महिलांची संख्या योग्यच असल्याचे दिसते.

- **शैक्षणिक पात्रता -**

२५ गावामधील एकूण २५३ ग्रामपंचायत सदस्यांपैकी १६ (६.३३%) ग्रामपंचायत सदस्य निरक्षर आहेत. ५५ (२१.७४%) सदस्य १ ली ते ७ वी पर्यंत, ९५ (३७.५५%) सदस्य ८ वी ते १0 वी पर्यंत, ४३ (१७%) सदस्य ११ वी ते १२ वी पर्यंत, ३४ (१४%) सदस्य पदवीपर्यंत, तर १0 (३.९५%) ग्रामपंचायत सदस्य पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

यावरून हेच स्पष्ट होते की, ८ वी ते १0 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या ग्रामपंचायत सदस्यांचे प्रमाण सर्वात जास्त असून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या उच्चशिक्षितांचे प्रमाण हे कमी आहे.

**५. ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी**

- **लिंगभेद -**

एकूण २५ गावामध्ये केवळ ३७ स्वच्छता कर्मचारी असल्याचे दिसून आले. या ३७ कर्मचाऱ्यांमध्ये १७ (४५.९५%) महिला स्वच्छता कर्मचारी आहेत. तर २0

(५४.०५%) पुरूष स्वच्छता कर्मचारी आहेत. अर्थात गावांच्या संख्येच्या तुलनेत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे.

- **<u>शैक्षणिक पात्रता</u> -**

एकूण २५ गावामधील ३७ स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये १५ (४०.५४%) स्वच्छता कर्मचारी निरक्षर आहेत. १८ (४८.६५%) स्वच्छता कर्मचारी १ ली ते ७ वी पर्यंत तर ४ (१०.८१%) स्वच्छता कर्मचारी ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये बहुतांशी कर्मचारी निरक्षर तर उर्वरीत कर्मचाऱ्यांचे शिक्षण देखील १० वी च्या आतच आहे.

- **<u>जात प्रवर्ग</u> -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामधील एकूण ३७ स्वच्छता कर्मचाऱ्यांपैकी १(२.७०%)स्वच्छता कर्मचारी खुल्या जात प्रवर्गातील, ३५(९४.६०%) कर्मचारी अनुसुचित जात प्रवर्गातील तर १ (२.७०%) कर्मचारी इतर मागास वर्गीय जात प्रवर्गा तील आहे.

यावरून हेच स्पष्ट होते की, खुल्या व इतर मागास वर्गीय प्रवर्गातील स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी तर अनुसूचित जात प्रवर्गातील स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रमाण खूपच जास्त असल्याचे दिसून आले.

**६. ग्रामपंचायत पाणी वितरण कर्मचारी**

- **<u>लिंगभेद</u> -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामध्ये एकूण ३८ पाणी वितरण कर्मचारी असून त्यापैकी सर्वच्या सर्व म्हणजे ३८(१०० %) पाणी वितरण कर्मचारी पुरूषच आहेत.

पाणी वितरण व्यवस्थेमध्ये एकही महिला कर्मचारी नसण्याचे कारण काय? असे संशोधकाने विचारले तेंव्हा पाण्याची टंचाई अधिक असल्याने वेळी अवेळी शिवाय रात्रीदेखील पाणी सोडावे लागते म्हणून महिलांची नियुक्ती केली नसल्याचे सांगण्यात आले.

- **<u>शैक्षणिक पात्रता</u> -**

एकूण २५ गावामधील ३८ पाणी वितरण कर्मचाऱ्यांमध्ये ३(७.८९%) कर्मचारी निरक्षर आहेत. १८ (४७.३७%) कर्मचारी १ ली ते ७ वी पर्यंत शिकलेले आहेत. तर १७ (४४.७४%) कर्मचारी ८ वी ते १० वी शिक्षण घेतलेले आहेत.

- **<u>जातप्रवर्ग</u> -**

एकूण ३८ पाणी वितरण कर्मचाऱ्यांपैकी २0(५२.६३) कर्मचारी खुल्या जात प्रवर्गातील,७(१८.४२%) कर्मचारी अनुसूचित जात प्रवर्गातील,२(५.२६%) कर्मचारी भटक्या जमातीतील आहेत तर ९(२३.६९%) कर्मचारी इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत.

पाणी वितरण कर्मचाऱ्यांमध्ये खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण जास्त तर भटक्या जमातीतील कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसून आले.

७. **ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी**

- **<u>लिंगभेद</u> -**

संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामधील ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचाऱ्यांची एकूण संख्या ६२ आहे. त्यामध्ये महिला कर्मचारी केवळ १(१.६१%) असून तर पुरूष कर्मचारी ६१ (९८.३९%) आहेत.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडणुकीसाठी जरी ३३% राखीव जागा असल्या तरी कर्मचारी भरतीमध्ये पुरूषांचेच वर्चस्व असून स्त्रीयांना मात्र या संधीपासून डावलल्याचे दिसून आले.

- **<u>शैक्षणिक पात्रता</u> -**

२५ गावातील ग्रामपंचायत कार्यालयातील ६२ कर्मचाऱ्यांमध्ये ३(४.८४%) कर्मचारी निरक्षर , २१ (३३.८७%) १ ली ते ७ वी शिक्षण घेतलेले, २५ (४0.३२%) ८ वी ते १0 वी पर्यंत शिक्षण घेतलेले, ४ (६.४५%) ११ वी ते १२ वी पर्यंत शिकलेले, ६(९.६८%) पदवीपर्यंत शिकलेले तर ३(४.८४%) कर्मचारी पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

यावरून असे दिसून येते की, ग्रामपंचायतीमध्ये नोकरीकडे उच्च शिक्षितांचा कल कमी आहे तर १0 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाण जास्त आहे.

- **<u>जातप्रवर्ग</u> -**

२५ गावातील ग्रामपंचायत कार्यालयातील एकूण ६२ कर्मचाऱ्यांमध्ये ३७ (६९.६८%) कर्मचारी खुल्या जात प्रवर्गातील, ११(१७.७४%) कर्मचारी अनुसूचित जातीतील, ६(९.६८%) कर्मचारी भटक्या जमातीतील आहेत तर ८ (१२.९0%) कर्मचारी इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत.

यावरून ग्रामपंचायत कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त तर भटक्या जमातीतील कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे आढळले.

**८. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती**

- **लिंगभेद -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीतील एकूण सदस्य संख्या ३५२ आहे. त्यामध्ये १७७ (५०.२८%) महिला सदस्य आहेत तर १७५ (४९.७२%) पुरूष सदस्य आहेत. अर्थात पुरूष सदस्य आणि महिला सदस्य यांचे प्रमाण जवळपास सारखेच आहे.

- **शैक्षणिक पात्रता -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीतील एकूण ३५२ सदस्यांपैकी २७ (७.६७%) सदस्य निरक्षर आहेत, ११८ (३३.५२%) सदस्य १ ली ते ७ वी पर्यंत, १२५ (३३.५१%) सदस्य ८ वी ते १० वी पर्यंत, ३४ (९.६५%) सदस्य ११ वी ते १२ वी पर्यंत, ४० (११.४०%) सदस्य पदवीपर्यंत तर केवळ ८ (२.२७%) सदस्य पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता या समितीमध्ये गावातील १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या सदस्यांचे प्रमाण जास्त आहे तर उच्च शिक्षण घेतलेल्या सदस्यांचे प्रमाण कमी आढळून आले.

- **जातप्रवर्ग -**

२५ गावातील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमध्ये एकूण ३५२ सदस्यांपैकी खुल्या जात प्रवर्गातील २१९(६२.२२%) सदस्य, अनुसूचित जातीतील ७१ (२०.१७%) सदस्य, भटक्या जमातीतील १७ (४.८३%) सदस्य तर इतर मागास वर्गीय प्रवर्गातील ४५ (१२.७८%) सदस्य आहेत.

यावरून असे निदर्शनास आले की, या समितीमध्ये इतर प्रवर्गाच्या तुलनेमध्ये खुल्या जात प्रवर्गातील सदस्यांचे प्रमाण खूपच जास्त आहे. तर भटक्या जमातीतील सदस्यांचे प्रमाण खूपच कमी आहे.

९. **महिला विकास समिती**

- **लिंगभेद -**

अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण २५ गावामधील महिला विकास समितीतील एकूण सदस्य संख्या ४१६ आहे. या ४१६ सदस्यामध्ये ३५२ (८४.६२%) महिला सदस्य आहेत तर केवळ ६४ (१५.३८%) पुरूष सदस्य आहेत. या समितीमध्ये महिलांचे प्रमाण अधिक असणे स्वाभाविकच आहे कारण ही समिती महिला विकासासाठीच आहे म्हणूनच पुरूष सदस्य संख्या फारच कमी आहे.

- **शैक्षणिक पात्रता -**

महिला विकास समितीतील एकूण ४१६ सदस्यापैकी २७(६.४९%) सदस्य निरक्षर आहेत, १५0(३६.0६%) सदस्य १ ली ते ७ वी, १५५(३७.२६%) सदस्य ८ वी ते १0 वी, ४९(११.७७%) सदस्य ११ वी ते १२ वी पर्यंत, २१(६.९८%) सदस्यांचे पदवीपर्यंत तर ६ सदस्यांचे पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण झाल्याचे आढळून आले.

वरील आकडेवारीवरून असा निष्कर्ष निघतो की, महिला विकास समितीमध्ये १0 वी पर्यंत शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण एकूण महिला सदस्यांच्या तुलनेत जास्त आहे तर उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांचे प्रमाण कमी असलेले आढळले.

- **जातप्रवर्ग -**

महिला विकास समितीच्या एकूण ४१६ सदस्यांमध्ये २४६(५९.१३%)सदस्य खुल्या प्रवर्गातील, ७0(१६.८३%)सदस्य अनुसूचित जातीमधील,२७(६.४९%) सदस्य भटक्या जमातीतील तर ७३(१७.५५%)सदस्य इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत.

वरील आकडेवारी असे दर्शविते की, महिला विकास समितीच्या एकूण सदस्यांमध्ये सर्वात जास्त सदस्य खुल्या प्रवर्गातील असून सर्वात कमी सदस्य भटक्या जमातीतील आहेत आणि विशेष म्हणजे अनुसूचित जाती आणि इतर मागास वर्गीयना सर्वसाधारण समान असेच प्रतिनिधीत्व मिळालेले दिसते.

१0. **सामाजिक लेखा परीक्षण समिती**

- **लिंगभेद -**

अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण २५ गावामधील सामाजिक लेखा परीक्षण समितीतील सदस्यांची एकूण संख्या ३६५ आहे. हया एकूण ३६५ सदस्यामध्ये १७२ (४७.१२%) सदस्य महिला आहेत तर १९३ (५२.८८%) सदस्य पुरूष आहेत.

- **शैक्षणिक पात्रता -**

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण ३६५ सदस्यांपैकी केवळ ५ (१.३७%) सदस्य निरक्षर आहेत, ९८ (२६.८५%) सदस्य १ ली ते ७ वी शिकलेले , १३५ (३६.९८%) सदस्य ८ वी ते १0 वी शिक्षण झालेले ६0 (१६.४४%) सदस्य ११ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले, ५0 (१३.७0%) सदस्यांचे पदवीपर्यंत शिक्षण तर १७(४.६६%) सदस्यांचे पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण झाल्याचे दिसून येते.

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण सदस्यामध्ये सर्वात जास्त सदस्यांनी ८ वी ते १0 वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे तर सर्वात कमी सदस्य निरक्षर आहेत. विशेष म्हणजे या समितीमध्ये १७ सदस्यांनी पदव्युत्तर पातळी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे त्यांच्या ज्ञानाचा निश्चितच या प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी उपयोग होऊ शकेल.

- **जातप्रवर्ग -**

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण ३६५ सदस्यांपैकी २३१(६३.२९%) सदस्य खुल्या प्रवर्गातील आहेत.५६(१५.३४%)सदस्य अनुसूचित जातीतील, १४(३.८४%) सदस्य भटक्या जमातीतील तर ६४(१७.५३%) सदस्य इतर मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत.

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण सदस्यांमध्ये खुल्या प्रवर्गातील सदस्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे तर भटक्या जमातीतील सदस्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसून येते. याही समितीमध्ये अनुसूचित जाती आणि इतर मागास वर्गीय ना कमी अधिक प्रमाणात समसमान असे प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

**११. ग्रामदूत**

- **लिंगभेद -**

अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण २५ गावामध्ये १३९ ग्रामदूत असून या १३९ ग्रामदूतामध्ये ८३ (५९.७१%) महिला तर ५६ (४0.२९%) पुरूष ग्रामदूत आहेत.

या प्रकल्पाच्या सर्व समितीतील महिला व पुरूष सदस्यांची संख्या पाहिली तर पुरूषांची संख्या अधिक आढळली पण 'ग्रामदूत' या पदाच्याबाबतीत मात्र पुरूषांच्यापेक्षा महिलांची संख्या अधिक आढळली.

- **शैक्षणिक पात्रता -**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील एकूण १३९ ग्रामदूतांपैकी २(१.४४%) ग्रामदूत निरक्षर,३२(२३.0२%)ग्रामदूतांचे १ली ते ७वी पर्यंत शिक्षण, ६0(४३.१७%)

ग्रामदूतांचे ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण, २६ (१८.७०%) ग्रामदूतांचे ११ वी ते १२ वी पर्यंत, १६ (११.५१%) ग्रामदूतांचे पदवीपर्यंत, तर ३ (०२.१६%) ग्रामदूत हे पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण पूर्ण केलेले असल्याचे दिसून आले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, ग्रामदूत म्हणून काम करण्यास उच्चशिक्षित लोकांनी कमी पसंती दाखविली तर १० वी पर्यंत शिक्षण झालेल्या लोकांनी मात्र यामध्ये अधिक सहभाग दाखविला आहे.

- **जातप्रवर्ग -**

१३९ ग्रामदूतामधील सर्वात जास्त ८५ (६१.१५%)ग्रामदूत खुल्या जात प्रवर्गातील, २० (१४.३९%) ग्रामदूत अनुसूचित जातीमधील, २६ (१८.७०%) ग्रामदूत इतर मागास वर्गीय जात प्रवर्गातील तर सर्वात कमी ८ (५.७६%) ग्रामदूत भटक्या जमातीतील असल्याचे दिसून आले.

## ४.५ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

### ४.५.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्पातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती एक प्रमुख व महत्वाची समिती आहे. प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी व व्यवस्थापनामध्ये सर्वांचा सहभाग आहे की, नाही हे पाहण्याची सर्व जबाबदारी हया समितीची आहे. त्याचप्रमाणे गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधा यांची सद्यस्थिती समजावून घेऊन अडचणीवर चर्चा करणे व त्यावर उपाय सुचविण्याचे काम ही समिती करते.

पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्थेचे विविध पर्याय शोधण्याची जबाबदारी हया समितीची असते. या समितीमध्ये असणाऱ्या तीन उपसमित्यामध्ये (खरेदी समिती, हिशोब समिती, व देखरेख समिती) समन्वय राखणे, लोकवाटा व पाणीपट्टी वेळेवर कशी जमा होईल याकडे लक्ष देणे, देखभाल व दुरूस्ती यासाठी विविध कामे करवून घेणे आणि त्यामध्ये योग्य तो समन्वय राखण्याचे काम ही समिती करते.

अर्थात हया महत्वाच्या समितीचे काम, त्यांना आलेला अनुभव, अडचणी व त्यांच्या प्रतिक्रिया समजावून घेण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीसाठी एक स्वतंत्र मुलाखत अनुसूची तयार करून अभ्यासासाठी निवडलेल्या गावातील हया समितीच्या अध्यक्ष व सचिवाकडून (प्रमुखाकडून) जी माहिती मिळाली त्या माहितीच्या आधारे केलेले विश्लेषण असे --

४.५.२ <u>पदाधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती</u> -

या समितीमध्ये प्रमुख असणारे समितीचे अध्यक्ष व सचिव यांची वय, लिंगभेद, शैक्षणिक पात्रता, धर्म, जात, वैवाहिक स्थिती आणि व्यवसायाच्याद्वारे जी माहिती मिळाली ती खालीलपमाणे -

१. **वयोगट** -

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या एकूण २५ अध्यक्षापैकी १४ (५६%) अध्यक्ष १८ ते ४० वर्षे वयोगटातील, ९ (३६%) ४१ ते ६० या वयोगटातील, आणि २ (८%)अध्यक्ष ६१ वर्षाच्या पुढील आहेत. तर हया समितीच्या २५ सचिवांपैकी १९ (७६%)सचिव १८ ते ४० वर्षे वयोगटातील आणि ६ (२४%) सचिव ४१ ते ६० वयोगटातील आहेत.

२. **लिंगभेद** -

२५ अध्यक्षापैकी ५ (२०%) अध्यक्ष स्त्रिया आहेत आणि २० (८०%) अध्यक्ष पुरूष आहेत. तर २५ सचिवापैकी १५ (६०%) सचिव स्त्रिया आणि १० (४०%) सचिव पुरूष आहेत. यावरून असे दिसून येते की, अध्यक्षांच्यामध्ये पुरूषांचे प्रमाण जास्त आहे तर सचिवांच्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

३. **शैक्षणिक पात्रता** -

२५ अध्यक्षापैकी १ (४%) अध्यक्ष निरक्षर, ५ (२०%) १ ली ते ७ वी, ८ (३२%) ८ वी ते १० वी आणि ११ (४४%) अध्यक्ष हे पदवीपर्यंत शैक्षणिक पात्रता असलेले आहेत तर एकूण २५ सचिवामध्ये २ (८%) सचिव निरक्षर, ४ (१६%) १ ली ते ७ वी, ११ (४४%) ८ वी ते १० वी आणि ८ (३२%) सचिव पदवीपर्यंत शिकलेले आहेत.

४. **धर्म** -

समितीच्या २५ अध्यक्षामधील २३ (९२%) अध्यक्ष हिंदू धर्माचे आणि २ (८%) अध्यक्ष जैन धर्माचे आहेत तर २५ सचिवामधील २२ (८८%) सचिव हिंदू धर्माचे, २ (८%) जैन धर्माचे आणि १ (४%) सचिव नवबौध्द आहेत. या समितीमध्ये हिंदू धर्मीय अध्यक्ष व सचिवांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले.

५. **जातप्रवर्ग** -

२५ अध्यक्षापैकी २० (८०%) अध्यक्ष खुल्या प्रवर्गातील, २ (८%) अनुसूचित जातीतील, १ (४%) भटक्या जमातीतील आणि २ (८%) अध्यक्ष इतर मागास वर्गीय या जात प्रवर्गातील आहेत तर २५ सचिवापैकी १८ (७२%) सचिव खुल्या प्रवर्गातील ,

४ (१६%) अनुसूचित जातीतील आणि ३ (१२%) सचिव इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत.

६. **वैवाहिक स्थिती -**

२५ अध्यक्षामध्ये २४ (९६%) अध्यक्ष विवाहित आणि १ (४%) अध्यक्ष अविवाहित आहेत तर २५ सचिवामध्ये २४ (९६%) सचिव विवाहित आणि १ (४%) सचिव अविवाहित आहेत.

७. **व्यवसाय -**

समितीच्या एकूण २५ अध्यक्षामध्ये १६ (६४%) अध्यक्ष शेती व्यवसाय करणारे, ३ (१२%) अध्यक्ष हया गृहिणी, ३ (१२%) अध्यक्ष व्यापार करणारे आणि ३ (१२%) अध्यक्ष नोकरी करणारे आहेत तर २५ सचिवामध्ये ११ (४४%) सचिव शेती करणारे, ९ (३६%) सचिव हया गृहिणी, २ (८%) सचिव व्यापार करणारे, १ (४%) सचिव शिक्षण घेत आहेत आणि २ (८%) सचिव नोकरी करणारे आहेत.

### ४.५.३ पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबवित असताना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या २५ गावातील अध्यक्ष आणि सचिवांच्या लोकवर्गणी, सहाय्यकारी संस्थांचे सहकार्य, महिलांचा सहभाग यासारख्या विषयाबाबतच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

१. **लोकवर्गणीसंबंधी -**

जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणी व यशस्वितेसाठी गावातील किती टक्के ग्रामस्थांना लोकवर्गणी दिली याबाबत पदाधिकाऱ्यांच्यावर (अध्यक्ष आणि सचिव) प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

**सारणी क्र. ४.२**

| अ.क्र. | लोकवर्गणी दिलेले ग्रामस्थ | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | ५० % | ०२ (०४%) |
| २. | ७५ % | २१ (४२%) |
| ३. | १०० % | २७ (५४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.२ च्या आधारे एकूण ५० उत्तरदात्यामधील २ उत्तरदात्यांनी ५०% ग्रामस्थांनी, २१ उत्तरदात्यांनी ७५% ग्रामस्थांनी आणि २७ उत्तरदात्यांनी १००% ग्रामस्थांनी लोकवर्गणी दिली असल्याची माहिती मिळाली.

लोकवर्गणीच्या संदर्भात विचार करता २१ उत्तरदात्यांनी ७५% लोकांनी लोकवर्गणी जमा केली असे सांगितले तर २७ उत्तरदात्यांनी १००% लोकांनी लोकवर्गणी जमा केली असे सांगितले, तथापि २१ उत्तरदात्यामध्ये एका उत्तरदात्याने आणि २७ उत्तरदात्यामध्ये एकाने चुकीची माहिती पुरविली असल्याचे जाणवते. अन्यथा प्रत्येक प्रगटात उत्तरदात्यांची संख्या समान असावयास हवी होती.

२. <u>सहाय्यकारी संस्थांच्या सहकार्याबाबत</u>

जलस्वराज्य प्रकल्पासाठी सहाय्यकारी संस्थाचे सहकार्य समाधानकारक मिळाले का? या विचारलेल्या प्रश्नावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्ष व सचिवांच्या प्रतिक्रिया -

एकूण ५० उत्तरदात्यापैकी ३८ (७६%) उत्तरदात्यांनी सहाय्यकारी संस्थेचे सहकार्य समाधानकारक मिळाले असे सांगितले तर १२ (२४%) उत्तरदात्यांनी सहाय्यकारी संस्थेचे सहकार्य समाधानकारक मिळाले नसल्याचे सांगितले.

३. <u>समितीतील सदस्यांच्या सहकार्याबाबत</u>

जलस्वराज्य ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीतील सदस्यांच्या सहकार्याबाबत विचारले असता एकूण ५० उत्तरदात्यापैकी ४२ (८४%) उत्तरदात्यांनी समितीतील सदस्यांचे सहकार्य समाधानकारक मिळाले असल्याचे सांगितले तर ८ (१६%) उत्तरदात्यांनी समितीतील सदस्यांचे सहकार्य समाधानकारक मिळाले नसल्याचे सांगितले.

४. <u>गावातील महिलांच्या सहभागाविषयी</u>

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गावातील महिलांच्या सहभागाविषयी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे दिसून आल्या.

**सारणी क्र - ४.३**

| अ.क्र. | महिलांचा सहभाग | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | समाधानकारक | ४८ (९६%) |
| २. | असमाधानकारक | ०२ (०४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र.४.३ च्या आधारे एकूण ५० उत्तरदात्यापैकी ४८ उत्तरदात्यांनी महिलांचा सहभाग समाधानकारक असल्याचे तर २ उत्तरदात्यांनी महिलांचा सहभाग समाधानकारक मिळाला नसल्याचे सांगितले. यावरून जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिलांचा सहभाग अतिशय चांगला असल्याचे दिसून येते.

५. <u>जलस्वराज्य प्रकल्पाच्या कालावधीबाबत</u>

जलस्वराज्य प्रकल्पासाठी १८ महिन्यांचा कालावधीविषयी ५० उत्तरदात्यापैकी १३ (२६%) उत्तरदात्यांनी प्रकल्पास १८ महिने कालावधी पुरेसा आहे असे सांगितले तर ३७ (७४%) उत्तरदात्यांनी हा कालावधी पुरेसा नाही असे सांगितले.

संशोधकाने हा कालावधी पुरेसा नाही असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांना हा कालावधी किती असावा? असा प्रश्न विचारला असता ३७ उत्तरदात्यापैकी १९ उत्तरदात्यानी २४ महिने, १४ उत्तरदात्यांनी ३० महिने तर ४ उत्तरदात्यांनी ३० महिन्यापेक्षा जास्त कालावधी असावा असे उत्तर दिले.

अर्थातच ५० पैकी ३७ उत्तरदात्यांनी जादा कालावधीची अपेक्षा केलेली आहे. तेंव्हा या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी या कालावधीचा शासन पातळीवर विचार होऊन तो वाढवून देणे अधिक संयुक्तिक आहे. असे निरीक्षणाअंती संशोधकाचे मत बनलेले आहे.

६. <u>मीटर पध्दतीविषयी</u> -

पाणी वितरणासाठी मीटर पध्दतीचा अवलंब करणार का? हया विचारलेल्या प्रश्नाला उत्तरदात्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया दर्शविणारी सारणी -

**सारणी क्र. ४.४**

| अ.क्र. | मीटर पध्दतीविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | मीटर पध्दतीचा अवलंब करणार | १८ (३६%) |
| २. | मीटर पध्दतीचा अवलंब करणार नाही | १५ (३०%) |
| ३. | अजून याबाबत निर्णय झालेला नाही | १७ (३४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.४ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यामधील १८ उत्तरदात्यांनी गावात पाणी वितरणासाठी मीटर पध्दतीचा अवलंब करणार आहे असे

सांगितले. १५ उत्तरदात्यांनी मीटर पध्दतीचा अवलंब करणार नसल्याचे सांगितले तर १७ उत्तरदात्यांनी अजून याबाबत ग्रामसभेत निर्णय झालेला नसल्याचे सांगितले.

मीटर पध्दतीचा अवलंब करणार नाही व अजून याबाबत ग्रामसभेत निर्णय झालेला नाही असे म्हणणाऱ्या ३२ उत्तरदात्यांना त्यामागील कारण विचारले असता या उत्तरदात्यांनी काही लोकांना मीटर पध्दतीमुळे पाणीपट्टी भरपूर भरावी लागेल असे वाटते तर काही लोकांना मीटर पध्दती चांगली आहे पण मीटर खरेदी करणे व जोडणे याचा खर्च परवडत नसल्यामुळे त्याला गावातून विरोध होतो असे सांगितले तेंव्हा प्रत्येक गावाने मीटर पध्दतीचा स्वीकार केला तरच गावातील प्रत्येकाला नियमित व पुरेसे पाणी मिळेल व पाण्याचीही उधळपट्टी थांबेल हे लक्षात घेता निरिक्षणाअंती संशोधकाचे असे मत झाले आहे की, प्रथमत: मीटर पध्दतीमुळे पाणीपट्टी खूप भरावी लागेल हा लोकांचा गैरसमज दूर करून मीटर पध्दतीचे फायदे त्यांना पटवून दयावेत व शासनाने सुरूवातीला एकदा लोकांना ही चांगली सवय लागण्यासाठी अनुदानातून प्रत्येक कुटुंबाला मीटर देता येईल का? याचा विचार करावा.

७. **सार्वजनिक नळजोडणी बाबत**

गावातील दुर्बल घटकातील कुटुंबासाठी सार्वजनिक नळजोडणी (Public Stand) करणार का? या विचारलेल्या प्रश्नाला एकूण ५० उत्तरदात्यांपैकी १७ (३४%) उत्तरदात्यांनी दुर्बल घटकासाठी सार्वजनिक नळ जोडणार असल्याचे सांगितले तर ३३ (६६%) उत्तरदात्यांनी सार्वजनिक नळ जोडणार नसल्याचे सांगितले.

८. **गाव हागणदारीमुक्त झाले की नाही याविषयी**

आपले गाव हागणदारीमुक्त झाले आहे का? याप्रश्नाला ५० उत्तरदात्यांपैकी ३७ (७४%) उत्तरदात्यांनी गाव हागणदारीमुक्त झाले आहे, ३ (६%) उत्तरदात्यांनी गाव हागणदारीमुक्त झाले नाही तर १० (२०%) उत्तरदात्यांनी गाव हागणदारीमुक्त होण्याचे अंशत: राहिले आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. यावरून या प्रकल्पामुळे गावे हागणदारीमुक्त होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून आले.

९. **गावातील गटारीसंबंधी**

गावात गटारीची सोय किती टक्के केलेली आहे? असा प्रश्न अध्यक्ष व सचिवांना विचारला तेंव्हा ज्या प्रतिक्रिया मिळाल्या त्या अशा -

**सारणी क्र. ४.५**

| अ.क्र. | गटारीच्या सोयीविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | २५% | ०२ (४%) |
| २. | ५०% | १० (२०%) |
| ३. | ७५% | ३० (६०%) |
| ४. | १००% | ०८ (१६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.५ वरून असे आढळून येते की, एकूण ५० उत्तरदात्यामधील २ उत्तरदात्यांनी गावातील २५% भागात गटारीची सोय असल्याचे सांगितले. १० उत्तरदात्यांनी ५०% भागात, ३० उत्तरदात्यांनी ७५% भागात, तर ०८ उत्तरदात्यांनी १०% गावात गटारीची सोय असल्याचे सांगितले.

**१०. कचऱ्याच्या व्यवस्थापनाविषयी**

गावातील कचऱ्याच्या व्यवस्थापनाविषयी प्रतिक्रिया -

**सारणी क्र. ४.६**

| अ.क्र. | कचऱ्याचे व्यवस्थापन | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक कंपोष्ट खते तयार केली जातात | २७(५४%) |
| २. | सार्वजनिक कंपोष्ट खते तयार केली जातात | १० (२०%) |
| ३. | बायोगॅस प्रकल्पासाठी वापर केला जातो | ०४ (०८%) |
| ४. | कोणत्याच पध्दतीचा अवलंब केला जात नाही | ०९ (१८%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.६ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यापैकी २७ उत्तरदात्यांनी आपल्या गावात कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी वैयक्तिक कंपोष्टखतपध्दतीचा, १० उत्तरदात्यांनी सार्वजनिक कंपोष्टखत पध्दतीचा, ४ उत्तरदात्यांनी बायोगॅस प्रकल्पासाठी अवलंब केला जातो. तर ९ उत्तरदात्यांनी कोणत्याही पध्दतीचा अवलंब केला जात नसल्याचे सांगितले. म्हणजेच ग्रामस्थ आपल्या सोयीनुसार विशिष्ट जागी कचरा टाकतात व ग्रामपंचायत तो कचरा गोळा करून गावाबाहेरील एखादया खड्डयात टाकते असे सांगितले.

## ११. <u>सांडपाणी निचरापध्दतीबाबत</u>

सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी कोणत्या पध्दतीचा अवलंब केला जातो? या विचारलेल्या प्रश्नाला खालीलप्रमाणे प्रतिक्रिया मिळाल्या.

**सारणी क्र. ४.७**

| अ.क्र. | सांडपाण्याचा निचरा | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | शोषखड्डयात सोडले जाते | ०९ (१८%) |
| २. | गटारीत सोडले जाते | २६ (५२%) |
| ३. | शेतीसाठी वापर | ०२ (०४%) |
| ४. | परसबाग व शेती | ०५ (१०%) |
| ५. | शोषखड्डा व गटार | ०८ (१६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.७ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ९ उत्तरदात्यांनी आपल्या गावातील सांडपाणी शोषखड्डयात सोडले जाते असे सांगितले, २६ उत्तरदात्यांनी सांडपाणी गटारीत सोडले जाते, २ उत्तरदात्यांनी सांडपाणी शेतीसाठी वापरले जाते, ५ उत्तरदात्यांनी सांडपाणी परसबाग व शेतीसाठी तर ८ उत्तरदात्यांनी सांडपाणी शोषखड्डा व गटारीत सोडले जात असल्याचे सांगितले.

## १२. <u>शौचालय बांधण्यामधील अडथळयाविषयी</u>

महाराष्ट्र शासनाची १००% शौचालयाची अट पूर्ण करण्यामध्ये प्रामुख्याने कोणती अडचण आली? या विचारलेल्या प्रश्नाला खालीलप्रमाणे प्रतिक्रिया मिळाली.

**सारणी क्र. ४.८**

| अ.क्र. | शौचालयाबाबत अडचणी | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | पैसा नाही | १८ (३६%) |
| २. | जागा नाही | ०५ (१०%) |
| ३. | मानसिकता नाही | ०५ (१०%) |
| ४. | पैसा नाही व जागा नाही | १६ (३२%) |
| ५. | पैसा नाही व मानसिकता नाही | ०६ (१२%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.८ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यांपैकी १८ उत्तरदात्यांनी गावात १००% शौचालय होण्यामध्ये लोकांच्याकडे पैसा नाही ही अडचण प्रामुख्याने असल्याचे सांगितले, ५ उत्तरदात्यानी लोकांच्याकडे शौचालय बांधण्यासाठी जागा नाही, ५ उत्तरदात्यांनी लोकांची शौचालय बांधण्याची मानसिकता नाही, १६ उत्तरदात्यांनी लोकांच्याकडे शौचालय बांधण्यासाठी पैसाही नाही व जागाही नाही अशी अडचण असल्याचे सांगितले तर ६ उत्तरदात्यांनी लोकांच्याकडे शौचालय बांधण्यासाठी पैसाही नाही आणि मानसिकताही नाही ही अडचण असल्याचे सांगितले.

यावरून असे स्पष्ट होते की, ग्रामीण भागामध्ये लोकांना शौचालय बांधण्यास प्रवृत्त करीत असताना बहुतांशी लोकांच्या समोर प्रामुख्याने पैसा आणि जागेचा प्रश्न असल्याचे दिसून येते. संशोधकांच्या असे निरीक्षणास आले की खेडयामध्ये लोकांचे घर कितीही मोठे असले तरी घरामध्ये शौचालय बांधण्याची त्यांची मानसिकता नसल्यामुळे किंवा त्यांना ते पटत नसल्यामुळे ते जागा नसल्याचे कारण पुढे करतात.

## ४.६ महिला विकास समिती

### ४.६.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्पातील महिला सक्षमीकरणासाठी निर्माण केलेली महिला विकास समिती एक महत्वाची समिती आहे. महिला विकास समिती मुंबई ग्रामपंचायत कायदा कलम ४९ अन्वये ग्रामसभेतच गठीत केली जाते. प्रामुख्याने महिला सक्षमीकरण, आर्थिक विकास आणि पाणी पुरवठा व स्वच्छता या क्षेत्रात महिलांचा सक्रीय सहभाग वाढविण्याचे काम ही समिती करीत असते. अशी समिती प्रत्येक गावात कार्यरत असते. अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील महिला विकास समितीचे एकूण ४१६ सदस्य आहेत. या सदस्यामध्ये ३५२ (८४.६२%) महिला आणि फक्त ६४ (१५.३८%) पुरूष आहेत.

जलस्वराज्य प्रकल्पातील हया महत्वाच्या समितीच्या कार्याची, अनुभवांचा व अडचणींची माहिती मिळविण्यासाठी स्वतंत्र अशी मुलाखत अनुसूची तयार केली. अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावांना भेटी देऊन त्या गावातील महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांची मुलाखत अनुसूचींच्या आधारे मुलाखत घेऊन संकलित केलेल्या माहितीचे खालीलप्रमाणे विश्लेषण केलेले आहे.

४.६.२ **अध्यक्ष व सचिवांची वैयक्तिक माहिती** :-

महिला विकास समितीचा हेतू महिलांचा सक्रीय सहभाग वाढावा व त्यांचे सक्षमीकरण व्हावे हाच आहे. अर्थात हया समितीचे अध्यक्ष आणि सचिव महिलाच आहेत. या पदाच्यासाठी पुरूषांना अजिबात वाव दिलेला नाही हे विशेष आहे.

१. **वयोगट** :-

या समितीच्या एकूण २५ अध्यक्षापैकी १८(७२%) अध्यक्ष १८ ते ४० वर्षे वयोगटातील, ६ (२४%) ४१ ते ६० वर्षे वयोगटातील, आणि १ (४%) अध्यक्ष हे ६१ वर्षाच्या वरील आहेत आणि एकूण २५ सचिवापैकी २१ (८४%) सचिव १८ ते ४० वर्षे वयोगटातील असून ४ (१६%) सचिव ४१ ते ६० वयोगटातील आहेत.

यावरून असे दिसून येते की, १८ ते ४० या तरूण वयोगटातील अध्यक्ष व सचिव यांची संख्या अधिक असून ६१ वर्षापेक्षा अधिक वयाचे अध्यक्ष एकटेच आहेत.यावरून हेच स्पष्ट होते की,आजकाल तरूण पिढींचा विकासात्मक कार्याकडे अधिक कल वाढलेला आहे.

२. **शिक्षण** :-

महिला विकास समितीच्या एकूण २५ अध्यक्षांमध्ये ५(२०%) अध्यक्ष १ ली ते ७वी पर्यंत शिकलेले आहेत. १५(६०%) ८ वी ते १० वी पर्यंत, १(४%)अध्यक्ष ११ वी पर्यंत, ३(१२%) पदवी पर्यंत, आणि १(४%) अध्यक्ष पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत आणि २५ सचिवामध्ये ६(२४%) सचिव १ ली ते ७ वी पर्यंत शिकलेले, ९(३६%)८वी ते १० वी पर्यंत, ४(१६%) ११ वी ते १२ वी पर्यंत, तर ६(२४%) सचिव हे पदवीपर्यंत शिकलेले आहेत.

३. **धर्म** :-

महिला विकास समितीच्या एकूण २५ अध्यक्षापैकी २२(८८%)अध्यक्ष हिंदू, २ (८%) जैन आणि १(४%) अध्यक्ष हे ख्रिश्चन धर्माचे आहेत.तर २५ सचिवापैकी २३(९२%) सचिव हिंदू , १(४%) सचिव मुस्लिम आणि १(४%) सचिव हे जैन धर्माचे आहेत.

४. **जातप्रवर्ग** :-

महिला विकास समितीतील एकूण २५ अध्यक्षामध्ये १५(६०%) अध्यक्ष खुल्या जातप्रवर्गातील आहेत. १(४%)अनुसूचित जातीमधील, १(४%)भटक्या जमातीतील आणि८(३२%)अध्यक्ष इतर मागास वर्गीयजात प्रवर्गातील आहेत.तर २५ सचिवापैकी

१४ (५६%)सचिव खुल्या जातप्रवर्गातील आहेत. २ (८%)अनुसूचित जातीतील, १ (४%)भटक्या जमातीतील आणि ८ (३२%)सचिव हे इतर मागास वर्गीय हया प्रवर्गातील आहेत.

५. <u>**आर्थिक स्थिती**</u> ः-

महिला विकास समितीतील एकूण २५ अध्यक्षामध्ये १३ (५२%) अध्यक्ष आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण असून आणि १२ (४८%) अध्यक्ष हे स्वयंपूर्ण नसल्याचे आढळले. तर २५ सचिवामध्ये १३ (५२%) सचिव आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण असून १२ (४८%) सचिव स्वयंपूर्ण नसल्याचे आढळले.

६. <u>**बचत गटातील पद**</u> ः-

महिला विकास समितीतील २५ अध्यक्षापैकी २०(८०%) अध्यक्ष बचत गटाचेही अध्यक्षपद भूषवित आहेत.२ (८%)अध्यक्ष बचत गटाचे सचिव आणि ३ (१२%) अध्यक्ष बचत गटाचे केवळ सदस्य आहेत.तर २५ सचिवामध्ये ९ (३६%) सचिव बचत गटाचे अध्यक्ष आहेत.९ (३६%) सचिव बचत गटाचेही सचिव आहेत, ४ (१६%) सचिव बचत गटाचे सदस्य आहेत तर ३ (१२%) सचिव हे बचत गटात सहभागी झालेले नाहीत.

महिला विकास समितीच्या अध्यक्ष आणि सचिव असणाऱ्या महिलांना कार्याच्या माध्यमातून सन्मान, प्रतिष्ठा मिळाली आहेच, त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाची निर्मिती केली गेली. बचत गटामध्येही अध्यक्ष म्हणून पद भूषविणाऱ्या स्त्रीया हया मोठया संख्येने महिला विकास समितीच्या अध्यक्षा असलेल्या आढळल्या. तर महिला विकास समितीच्या २५ सचिवांपैकी ९ सचिव महिला बचत गटाच्या अध्यक्षा तर महिला विकास समितीच्या ९ सचिव महिला बचत गटाच्याही सचिव म्हणूनच काम करताना आढळतात.

यावरून हेच स्पष्ट दिसून येते की, या प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांचे केवळ सक्षमीकरण झाले नाही तर विविध कार्यामध्ये सहभागी होऊन त्यांच्यामधील नेतृत्व गुणाचाही विकास होताना आढळतो. त्यांना संधी दिली की, त्या आपली प्रतिमा कशी निर्माण करू शकतात आणि समाज विकासामध्ये आपले महत्वाचे योगदान देऊ शकतात याचीच प्रचिती येते.

### ४.६.३ <u>पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया</u> (अध्यक्ष - सचिव)

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देऊन प्रत्येक गावामध्ये स्वतंत्र महिला विकास समिती स्थापन केली आहे. या महिला विकास समितीच्या

पदाधिकाऱ्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाचे कामकाज व महिला सक्षमीकरणाविषयी दिलेल्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

१. **<u>सदस्यांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेविषयी</u>** -

महिला विकास समितीतील किती महिला सदस्या आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण (अर्थार्जन करणाऱ्या) आहेत? असा प्रश्न महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांना विचारला असता त्यांनी जी माहिती दिली ती खालीलप्रमाणे -

**सारणी क्र. ४.९**

| अ.क्र. | आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण महिला सदस्यांचे प्रमाण | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | २५% | १३ (२६%) |
| २. | ५0% | २८ (५६%) |
| ३. | ७५% | 0७ (१४%) |
| ४. | १00% | 0२ (0४%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

वरील सारणी क्र. ४.९ वरून असे निदर्शनास येते की, एकूण ५0 उत्तरदात्यांपैकी १३ उत्तरदात्यांनी आपल्या समितीतील २५% महिला सदस्या आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण आहेत असे सांगितले, २८ उत्तरदात्यांनी ५0% महिला, ७ उत्तरदात्यांनी ७५% महिला तर २ उत्तरदात्यांनी १00% महिला आर्थिदृष्टया स्वयंपूर्ण आहेत असे सांगितले.

२. **<u>महिला विकास समितीतील सदस्यांच्या मानधनाविषयी</u>** -

खेडयातील महिला हया रोजगार बुडवून किंवा घरकाम सोडून मिटींग किंवा कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यास उत्सुक नसतात असे जाणवल्यामुळे संशोधकाने समिती सदस्यांच्या मानधनाबाबत महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांची मते जाणून घेण्यासाठी जो प्रश्न विचारला त्याआधारे मिळालेली माहिती अशी की, निवडलेल्या २५ गावातील एकूण ५0 उत्तरदात्यामधील ४0(८0%) उत्तरदाते समिती सदस्यांना मानधन असले पाहिजे या विचाराचे आहेत तर १0(२0%) उत्तरदाते हे सदस्यांना मानधनाची आवश्यकता नाही अशा विचाराचे आहेत.

यावरून जलस्वराज्य प्रकल्पाच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये, बैठकामध्ये गावातील महिला सक्रिय सहभागी होण्यासाठी त्यांना थोडेफार मानधन देणे आवश्यक आहे असा

बहुतांशी उत्तरदात्यांचा सूर निघाल्याचे दिसून आले. अर्थात ज्या ४०उत्तरदात्यांनी मानधन असले पाहिजे असे सांगितले त्यापैकी ३६ उत्तरदात्यांनी महिला विकास समितीतील महिला सदस्यांना महिन्याला किमान ३०० ते ५०० रू.पर्यंत मानधन दिले पाहिजे असे मत मांडले तर ४उत्तरदात्यांनी किमान ५०१ते १००० रू.पर्यंत मानधन दिले पाहिजे असे मत मांडले.

यावरून असे दिसून आले की, ५०१ ते १००० रू. मानधन सदस्यांना दिले पाहिजे असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या खूपच कमी तर महिलांचा बुडणारा रोजगार विचारात घेऊन व गावाची गरज लक्षात घेऊन किमान ३०० ते ५०० रू. पर्यंत तरी मानधन मिळाले तर महिला सदस्य सक्रिय होतील असे मत बहुसंख्य उत्तरदात्यांचे आहे.

३. <u>स्वत: ची मते मांडू शकणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण</u> –

महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांमधील किती पदाधिकारी स्वत: ग्रामस्थांसमोर एखादया कार्यक्रमामध्ये किंवा सभेमध्ये आपले विचार बिनधास्तपणे मांडू शकतात याबाबत माहिती घेतली असता ५० उत्तरदात्यामधील ४०(८०%) उत्तरदाते कोणत्याही कार्यक्रमामध्ये आपले विचार बिनधास्तपणे मांडू शकतात पण १०(२०%) उत्तरदात्यांना सभेमध्ये विचार मांडता येत नाहीत असे निदर्शनास आले.

४. <u>अंधश्रध्दा निर्मूलनासंबंधी</u>

शहराच्या तुलनेत ग्रामीण भागामध्ये अंधश्रध्देचे प्रमाण जास्त असल्यामुळे हया प्रकल्पाच्या निमित्ताने गावातील अंधश्रध्दा दूर करण्याचे काम महिला विकास समितीमार्फत केले की नाही याबाबत विचारलेल्या प्रश्नाला ५० उत्तरदात्यांमधील ३५(७०%)उत्तरदात्यांनी आपण समितीमार्फत गावात अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केले आहे असे सांगितले तर १५(३०%) उत्तरदात्यांनी गावात समितीमार्फत अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केले नसल्याचे सांगितले.

यावरून जलस्वराज्य प्रकल्पित सर्वच गावामध्ये जरी अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य झाले नसले तरी अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम केलेल्या गावांचे प्रमाण मात्र निश्चितच समाधानकारक असल्याचे दिसून येते.

५. <u>गावच्या पाणी प्रश्नाविषयी</u>

जलस्वराज्य प्रकल्पाचे मूळ उद्दिष्ट गावाला शुध्द व पुरेसे पाणी देणे हे असल्यामुळे या प्रकल्पामुळे गावचा पाणी प्रश्न पूर्णार्थाने सुटला का? याविषयी उत्तरदात्यांनी दिलेली माहिती खालीलप्रमाणे

**सारणी क्र. ४.१०**

| अ.क्र. | पाणी प्रश्नाविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | गावचा पाणी प्रश्न पूर्णपणे सुटला | ४० (८०%) |
| २. | गावचा पाणी प्रश्न सुटला नाही | ०७ (१४%) |
| ३. | काही प्रमाणात पाणी प्रश्न सुटला | ०३ (०६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.१० वरून असे दिसून येते की, ५० उत्तरदात्यामधील ४० उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावचा महत्वाचा पाणी प्रश्न सुटला असे सांगितले तर ७ उत्तरदात्यांनी अद्याप गावचा पाणी प्रश्न सुटला नसल्याचे सांगितले तर ३ उत्तरदात्यांनी या प्रकल्पामुळे गावचा पाणी प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे असे सांगितले. यावरून हेच स्पष्ट होते की अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामधील ८०% गावांचा पाण्याचा प्रश्न कायमपणे सुटला आहे तर उर्वरित गावामधील पाणी प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे.

६. <u>गावातील महिलांच्या दर्जाविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पाचे महिला सक्षमीकरण व महिलाना समाजामध्ये दर्जा प्राप्त करून देणे हे महत्वाचे उद्दिष्ट असल्यामुळे खरोखरच जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील महिलांच्या दर्जामध्ये सुधारणा होण्यास मदत झाली का? याविषयी उत्तरदात्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया अशा आहेत.

**सारणी क्र. ४.११**

| अ.क्र. | महिलांच्या दर्जाविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | महिलांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली | ३५ (७०%) |
| २. | महिलांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली नाही | ०२ (०४%) |
| ३. | काही प्रमाणात मदत झाली | १३ (२६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.११ वरून असे दिसून येते की, ५० उत्तरदात्यांपैकी ३५ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांचा दर्जा सुधारण्यास खूपच मदत झाली असे

सांगितले , २ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांच्या दर्जामध्ये काहीही फरक पडला नाही तर १३ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांच्या दर्जामध्ये काही प्रमाणात सुधारणा झाली असे सांगितले .

यावरून बहुतांशी उत्तरदात्यांच्या मते जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील महिलांच्यामध्ये सुधारणा होऊन त्यांच्या दर्जामध्ये देखील दिवसेंदिवस वाढ होण्यास मदत झाली आहे असा निष्कर्ष निघतो .

७ . <u>नेतृत्वाच्या आवडीबाबत उत्तरदात्यांची प्रतिक्रिया</u> -

महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिव पदावर असणाऱ्या उत्तरदात्यांना स्वत:ला नेतृत्व करावयास आवडते की नाही? याबाबत माहिती विचारली असता ५0 उत्तरदात्यांमधील ४८ (९६%) उत्तरदात्यांना नेतृत्व करावयास आवडत असून २ (४%) उत्तरदात्यांनी मात्र नेतृत्व करावयास आवडत नसल्याचे सांगितले .

यावरून महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिव पदावर काम करणाऱ्या बहुतांशी उत्तरदात्यांना मूळातच मनापासून नेतृत्व करावयाला व विकास कामामध्ये भाग घ्यावयास आवडत असल्याचे दिसून आले .

८ . <u>स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यत्वाविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत महिला विकास समितीचे अध्यक्ष व सचिव सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्यत्व भूषवित आहेत की नाहीत हे जाणून घेताना असे निदर्शनास आले की, ५0 उत्तरदात्यांपैकी ८ (१६%) उत्तरदाते सद्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य असून ४२ (८४%) उत्तरदाते मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य नाहीत .

९ . <u>गावातील राजकीय गटतटाविषयी</u> -

जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील गटतट कमी करून ग्रामविकासामध्ये सर्व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा अशी शासनाची अपेक्षा असल्यामुळे संशोधकाने उत्तरदात्यांना जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील गटातटा विषयी विचारलेल्या प्रश्नाला ५0 उत्तरदात्यामधील २८ (५६%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील गटतट कमी झाले आहेत व ५ (१0%) उत्तरदात्यांनी मते गटतट कमी झाले नाहीत तर १७ (३४%)उत्तरदात्यांच्यामते काही प्रमाणत गावातील गटतट कमी होण्यास जलस्वराज्य प्रकल्पाची मदत झाली असल्याचे सांगितले .

यावरून जलस्वराज्य प्रकल्पामुळे जरी १००% गावातील गटतट कमी झाले नसले तरी ५०% पेक्षा अधिक गावतील गटतट कमी झाले असून सुमारे ३५ %गावातील गटतट काही प्रमाणात झाले आहेत ही देखील समाधानाचीच बाब असल्याचे दिसून येते.

१०. <u>शौचालयाविषयी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया -</u>

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गाव १००% हागणदारीमुक्त होणे अपेक्षित असल्यामुळे ग्रामस्थांना शौचालय बांधण्यास प्रवृत्त केले जाते पण त्याचवेळी किती महिला विकास समितीच्या अध्यक्ष व सचिवांच्या घरी शौचालय आहे याविषयी मिळालेली माहिती अशी की, ५० उत्तरदात्यांपैकी ४८(९६%) उत्तरदात्यांच्या घरी शौचालय असून केवळ २(४%) उत्तरदात्यांच्या घरी शौचालय नाही.

याबाबतीत महत्वाची व विशेष बाब ही की, महिला विकास समितीच्या ४८ उत्तरदात्यांनी प्रथमता स्वत:च्या घरी शौचालय बांधला व नंतर इतरांनाही प्रवृत्त केले ही समाधानाची बाब आहे. पण २ उत्तरदात्यांनी मात्र अजूनही स्वत:च्या घरी शौचालय बांधलेले नाही.

वरील ४८ उत्तरदात्यांपैकी २२(४५.८३%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीच घरी शौचालय बांधले होते तर २६(५४.१७%) उत्तरदात्यांनी मात्र जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून झालेल्या प्रबोधनामुळे व नेतृत्वाची जबाबदारी ओळखून प्रकल्पकाळात शौचालय बांधल्याचे सांगितले.

## ४.७ <u>सामाजिक लेखा परीक्षण समिती</u>

### ४.७.१ <u>प्रस्तावना</u> -

सामाजिक लेखा परीक्षण समिती, मुंबई ग्रामपंचायत कायदा कलम ४९ अन्वये ग्रामसभेत गठीत केली जाते. हया समितीचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे व्यवहार वेळोवेळी तपासून ग्रामसभेमध्ये सादर करणे व अंतर्गत आढावा घेणे हे आहे. ही समिती जलस्वराज्य प्रकल्पासाठी मिळालेल्या निधीचा योग्य वापर होत आहे का? खरेदी व्यवहारात पारदर्शकता आहे का? बांधकामाची प्रगती, साहित्याचा निर्धारित कामासाठी उपयोग होत आहे का? हया प्रकल्पाचा लाभ गावातील सर्व घटकापर्यंत विशेषत: गरीब लोकापर्यंत पोहचत आहे की नाही? हया व इतर अनेक बाबींवर लक्ष ठेवते.

जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास करीत असताना गावातील वरील विविध बाबींबाबत माहिती मिळविण्यासाठी 'सामाजिक लेखा परीक्षण समितीशी संबंधित' अशी

स्वतंत्र मुलाखत अनुसूची तयार केली. संशोधकाने अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावातील जलस्वराज्य प्रकल्पाच्या 'सामाजिक लेखा परीक्षण समितींच्या' अध्यक्ष व सचिवाकडून मुलाखत अनुसूचीद्वारे जी माहिती संकलित केली त्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे -

### ४.७.२ <u>अध्यक्ष व सचिवांची वैयक्तिक माहिती</u>

**१. <u>वयोगट</u> -**

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण २५ अध्यक्षांपैकी १८(७२%) अध्यक्ष १८ ते ४० वर्षे वयोगटातील आहेत, ५(२०%) ४१ ते ६० वर्षे वयोगटातील, आणि २ (०८%) अध्यक्षांचे वय हे ६१ वर्षाच्या पुढील आहे. तर २५ सचिवांपैकी १९(७६%) सचिव १८ ते ४० वर्षे वयोगटातील आणि ६(२४%) सचिव ४१ ते ६० वर्षे वयोगटातील आहेत. यावरून इतर वयोगटांच्या तुलनेत १८ ते ४० वर्षे वयोगटातील अध्यक्ष आणि सचिवांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.

**२. <u>लिंगभेद</u> -**

एकूण २५ अध्यक्षांपैकी ८(३२%) अध्यक्ष स्त्रिया असून १७(६८%) अध्यक्ष पुरूष आहेत. तर २५ सचिवांपैकी १५(६०%) सचिव स्त्रिया असून १०(४०%) सचिव पुरूष आहेत. अर्थात येथे अध्यक्षांच्यामध्ये पुरूष तर सचिवांच्यामध्ये स्त्रिया जास्त असल्याचे दिसून येते.

**३. <u>शिक्षण</u> -**

२५ अध्यक्षांपैकी १(०४%) अध्यक्ष निरक्षर, २(०८%) १ ली ते ७ वी पर्यंत, १० (४०%) ८ वी ते १० वी पर्यंत, ६ (२४%) ११ वी ते १२ वी पर्यंत, ४ (१६%) पदवी पर्यंत, तर २ (८%) अध्यक्ष पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत. तर २५ सचिवांपैकी ६(२४%) सचिव १ ली ते ७ वी पर्यंत, ३(१२%) ८ वी ते १० वी, ७ (२८%) ११ वी ते १२ वी पर्यंत, ५ (२०%) पदवी पर्यंत, आणि ४(८%) सचिव पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

**४. <u>धर्म</u> -**

२५ अध्यक्षांमध्ये २४(९६%) अध्यक्ष हिंदू धर्माचे आहेत आणि १(४%) अध्यक्ष जैन धर्माचे आहेत. तर २५ सचिवांमध्ये २०(८०%) सचिव हिंदू, ३ (१२%) मुस्लिम, आणि २(८%) सचिव जैन धर्माचे आहेत. अर्थात इतर धर्मांच्या तुलनेत हिंदू धर्माचे अध्यक्ष व सचिवांचे प्रमाण खूपच जास्त आहे.

५. जातप्रवर्ग -

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या एकूण २५ अध्यक्षांमध्ये २१(८४%) अध्यक्ष खुल्या प्रवर्गातील आहेत २(८%) अध्यक्ष भटक्या जमातीतील आहेत आणि २(८%) अध्यक्ष इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत. तर २५ सचिवामध्ये १६(६४%) सचिव खुल्या प्रवर्गातील, २(८%) सचिव अनुसूचित जातीतील, १(४%) भटक्या जमातीतील आणि ६ (२४%) सचिव इतर मागास वर्गीय जात प्रवर्गातील आहेत. अर्थात येथे इतर जातप्रवर्गाच्या तुलनेत खुल्या जात प्रवर्गातील अध्यक्ष व सचिवांचे प्रमाण जास्त आहे.

६. वैवाहिक स्थिती -

२५ अध्यक्षांमध्ये २१(८४%)अध्यक्ष विवाहित आणि १(४%) अध्यक्ष अविवाहित आहेत.तर २५ सचिवामध्ये २४(९६%) सचिव विवाहित आहेत तर १ (४%) सचिव अविवाहित आहेत.

७. व्यवसाय -

एकूण २५ अध्यक्षांमध्ये १६(६४%) अध्यक्ष शेती, ४(१६%) अध्यक्ष गृहिणी, १ (४%) अध्यक्ष व्यापार आणि ४ (१६%) अध्यक्ष नोकरी करतात. तर २५ सचिवामध्ये १० (४०%) सचिव शेती, ९ (३६%) गृहिणी, १ (४%) व्यापार, १ (४%) शिक्षण घेत असून ४ (१६%) सचिव नोकरी करतात.

४.७.३ पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया

जलस्वराज्य प्रकल्पामधील सामाजिक लेखा परीक्षण समिती एक महत्वाची समिती आहे. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत असणाऱ्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आणि महिला विकास समितीच्या मार्फत केल्या जाणाऱ्या कामकाजावर देखरेख ठेवणे व त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून योजना अधिक सक्षम करणे हे या समितीचे काम आहे.

या समितीच्या अध्यक्ष आणि सचिव यांनी प्रकल्पाशी निगडीत लाभ महिलांचा सहभाग, कामाची प्रगती व दर्जा इ. बाबतीत खालीलप्रमाणे प्रतिक्रिया दिलेल्या आहेत.

१. जलस्वराज्य प्रकल्पाच्या लाभाच्या संदर्भात

अभ्यासासाठी निवडलेल्या ५० उत्तरदात्यांमध्ये ४४(८८%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाचे लाभ सर्वांना मिळाले आहेत असे सांगितले तर ६(१२%) उत्तरदात्यांनी प्रकल्पाचे लाभ काही लोकांना (शेतीवाडीवर वस्ती असणाऱ्या ग्रामस्थांना)

मिळाले नाहीत असे सांगितले. अर्थात काही लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाचा लाभ मिळाला नाही हे खरे असले तरी बहुतांशी लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाचे विविध लाभ मिळाले असल्याचे दिसून आले.

२. **प्रकल्पाच्या कार्यातील व निर्णयप्रक्रियेतील महिलांच्या सहभागाविषयी**

**सारणी क्र. ४.१२**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | महिला सहभागी होतात | ३५ (७0%) |
| २. | महिला सहभागी होत नाहीत | १५ (३0%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

सारणी क्र. ४.१२ च्या आधारे एकूण ५0 उत्तरदात्यांमधील ३५ उत्तरदात्यांच्या मते जलस्वराज्य प्रकल्पाच्या कार्यात व निर्णय प्रक्रियेत महिला सहभागी होतात तर १५ उत्तरदात्यांच्या मते प्रकल्प कार्यात व निर्णय प्रक्रियेत महिला सहभागी होत नाहीत. यावरून प्रकल्प कार्यातील व निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग जरी १00% नसला तरी तो समाधानकारक आहे असे म्हणता येईल.

३. **प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीबाबत**

**सारणी क्र. ४.१३**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | समाधानकारक आहे | ४५ (९0%) |
| २. | समाधानकारक नाही | 0५ (१0%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

सारणी क्र. ४.१३ वरून ५0 उत्तरदात्यांपैकी ४५ उत्तरदात्यांच्यामते प्रकल्पाच्या कामाची प्रगती समाधानकारक आहे तर ५ उत्तरदात्यांच्यामते प्रकल्पाच्या कामाची प्रगती समाधानकारक नाही. अर्थात यावरून जलस्वराज्य प्रकल्पाचे काम वेगाने व समाधानकारक असल्याचे दिसून येते.

४. प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत

सारणी क्र. ४.१४

| अ.क्र. | कामाचा दर्जा व गुणवत्तेविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | उत्तम आहे | १६ (३२%) |
| २. | चांगली आहे | ३० (६०%) |
| ३. | बरी आहे | ०४ (०८%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.१४ वरून ५० उत्तरदात्यांपैकी १६ उत्तरदात्यांनी प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता उत्तम असल्याचे सांगितले, ३० उत्तरदात्यांनी प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगली असल्याचे सांगितले तर ४ उत्तरदात्यांनी दर्जा व गुणवत्ता बरी असल्याचे सांगितले. यावरून प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता फार चांगली नसली तरी तुलनेने समाधानकारक असल्याचे दिसून येते.

५. जलस्वराज्य प्रकल्पाच्या आराखडयाविषयी

सारणी क्र. ४.१५

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | आराखडा लोकांच्याबरोबर चर्चा करून बनविलेला आहे. | ४७ (९४%) |
| २. | आराखडा लोकांच्याबरोबर चर्चा करून बनविलेला नाही. | ०३ (०६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.१५ वरून असे दिसून येते की, ५० उत्तरदात्यांपैकी ४७ उत्तरदात्यांच्यामते जलस्वराज्य प्रकल्पाचा आराखडा लोकशाही पध्द्तीने सर्वांशी चर्चा करून बनविलेला आहे तर ३ उत्तरदात्यांच्यामते प्रकल्पाचा आराखडा सर्वांशी चर्चा करून बनविलेला नाही. अर्थात बहुतांशी उत्तरदात्यांच्या मतांचा विचार करता जलस्वराज्य प्रकल्पाचा आराखडा हा सर्वांना सामावून घेऊन सर्वांशी विचार विनिमय करूनच बनविला असल्याचे दिसून येते.

## ६. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सुधारणा करण्याविषयी

अभ्यासासाठी निवडलेल्या ५० उत्तरदात्यांपैकी १८(३६%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे सांगितले तर ३२(६४%) उत्तरदात्यांनी प्रकल्पामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. अर्थातच हा प्रकल्प चांगला असून यामध्ये काही बदल करावयाची आवश्यकता नाही असेच बहुतांशी उत्तरदात्यांनी सांगितले. पण ज्यांना या प्रकल्पामध्ये सुधारणा हवी असे वाटते त्यांनी गावात बंदिस्त गटारीची आवश्यकता असल्याचे सांगितले. शिवाय पाईप लाईन बसवित असताना गावातील सर्व रस्ते खराब होत असल्यामुळे त्या रस्त्यांसाठीही शासनाकडून निधी पुरविला जावा असे सांगितले.

## ७. गावातील पाईपलाईन, बांधकामातील त्रुटीविषयी

**सारणी क्र. ४.१६**

| उत्तरदाते | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | त्रुटी आढळल्या | १५ (३०%) |
| २. | त्रुटी आढळल्या नाहीत | ३५ (७०%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.१६ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यांपैकी १५ उत्तरदात्यांच्या मतानुसार पाईपलाईन व बांधकामात त्रुटी असल्याचे तर ३५ उत्तरदात्यांनी पाईपलाईन व बांधकामात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी नसल्याचे सांगितले. अर्थात शासनाच्या नियमाप्रमाणे पाईपलाईन जमिनीत ३ फूट खोल असणे आवश्यक होते, पण ती कमी खोलीवर टाकलेली होती ही महत्वाची त्रुटी आढळली. पण नंतर त्यामध्ये सुधारणा करून जमिनीत ३ फूट खोलीवर पाईपलाईन टाकण्यात आल्या.

## ८. जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामाच्या पारदर्शकतेविषयी

**सारणी क्र. ४.१७**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | पारदर्शकता आढळली | ४४ (८८%) |
| २. | पारदर्शकता आढळली नाही | ०६ (१२%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र.४.१७ मधील ५० उत्तरदात्यांपैकी ४४ उत्तरदात्यांनी प्रकल्पाच्या कामात पारदर्शकता आढळल्याचे सांगितले तर ६ उत्तरदात्यांनी पारदर्शकता आढळून आली नसल्याचे सांगितले. सहा उत्तरदात्यांनी प्रकल्पाच्या कामात पारदर्शकता आढळली नाही असे म्हंटले असले तरी तुलनात्मकदृष्टया पारदर्शकता आढळली म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे यावरून प्रकल्पाच्या कामात पारदर्शकता होती असेच म्हणता येईल.

## ४.८ <u>ग्रामदूत</u>

### ४.८.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामीण जनतेचा दिसून येणारा प्रतिसाद, त्यांची उपक्रमशीलता, त्यांच्यात वाढणारी जबाबदारीची जाणीव यांचा विचार करता दिर्घकाळ ग्रामविकासाच्या प्रक्रियेत स्थानिक पातळीवर सल्ला व मार्गदर्शन निरंतरपणे उपलब्ध होण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामसभेमध्ये ग्रामदूतांची निवड केली जाते. या ग्रामदूतांना त्यांच्या भूमिका व जबाबदारीविषयी आवश्यक ते प्रशिक्षण देऊन त्यांचा गावाच्या सर्वांगिण विकासासाठी मार्गदर्शक, समूह संघटक, प्रेरक व समन्वयक म्हणून उपयोग करून घेतला जातो.

जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामदूतांचा गावातील प्रत्येक व्यक्तिशी, कुटुंबाशी जवळचा संबंध येत असल्यामुळे त्यांच्याकडून लोकांची मानसिकता, त्यांचे प्रश्न व त्यांच्या प्रतिक्रिया याविषयी माहिती संकलित करण्यासाठी एक स्वतंत्र मुलाखत अनुसूची तयार केली.

प्रत्येक गावातून दोन ग्रामदूत याप्रमाणे २५ गावातील एकूण ५० ग्रामदूताकडून मुलाखत अनुसूचीद्वारे जी माहिती मिळाली त्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे

### ४.८.२ ग्रामदूताची वैयक्तिक माहिती -

**१. <u>वयोगट</u> -**

एकूण ५० ग्रामदूतापैकी ४४(८८%) ग्रामदूत १८ ते ४० वर्षे वयोगटातील आहेत. ५(१०%) ग्रामदूत ४१ ते ६० या वयोगटातील आहेत. तर १(२%) ग्रामदूत हे ६१ वर्षापेक्षा जास्त वय असलेले आहेत.

वयोगटानुसार पाहता १८ ते ४० हया तरूण वयोगटातील ग्रामदूतांचे प्रमाण हे इतर वयोगटाच्या तुलनेत खूपच जास्त आहे. याचा अर्थच हा की, या सामाजिक कार्यामध्ये तरूणांचा सहभाग वाढताना दिसतो.

२. <u>शिक्षण -</u>

५0 ग्रामदूतापैकी ९ (१८%) ग्रामदूत १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत, १८ (३६%) ग्रामदूत ८ वी ते १0 वी पर्यंत, ९ (१८%) ग्रामदूत ११ वी ते १२ वी पर्यंत, ११ (२२%) ग्रामदूत पदवी पर्यंत, तर 0३ (0६%) ग्रामदूत हे पदव्युत्तर पातळीपर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.

ग्रामदूत या पदावर असणाऱ्या घटकांचा विचार करताना असे स्पष्ट दिसते की, या प्रकल्पामध्ये सुशिक्षित व उच्चशिक्षित चांगल्या पदवीधर तरूणांचे प्रमाण वाढताना आढळून येते.

३. <u>लिंगभेद -</u>

एकूण ५0 ग्रामदूतापैकी ३२ (६४%) ग्रामदूत हया स्त्रिया असून १८ (३६%) ग्रामदूत पुरूष आहेत. लिंगभेदाच्या आधारे ग्रामदूत हया पदाचा विचार करता स्त्री समानता व स्त्री सबलीकरण हया संकल्पानाचा परीणाम म्हणून हया प्रकल्पात खऱ्या अर्थाने ग्रामदूत हे पद अधिक प्रमाणात महिलांच्याकडून भूषविताना दिसून येते. म्हणून ही स्त्री सबलीकरणाची नांदीच म्हणावी लागेल.

४. <u>विवाह -</u>

५0 ग्रामदूतापैकी ३६ (७२%) ग्रामदूत विवाहीत आहेत तर १४ (२८%) ग्रामदूत अविवाहीत आहेत. हया प्रकल्पामध्ये ग्रामदूताची भूमिका पार पाडण्याची संधी अविवाहीतांना देखील दिली जाऊन त्याच्या कार्यक्षमतेला अधिकाधिक वाव दिला जाताना दिसतो.

५. <u>धर्म -</u>

५0 ग्रामदूतापैकी ४५ (९0%) ग्रामदूत हिंदू धर्माचे आहेत ३ (६%) ग्रामदूत मुस्लिम धर्माचे, १ (२%) ग्रामदूत जैन धर्माचे तर १ (२%) ग्रामदूत हे बौध्द धर्माचे आहेत. धर्माच्या आधारे विचार करता हिंदू धर्माच्या ग्रामदूतांचे प्रमाण खूपच जास्त आहे. याचे कारण संशोधकाने निवडलेल्या २५ गावामध्ये तुलनेने हिंदू धर्मिय लोक बहुसंख्यांक आहेत म्हणून त्यांना मिळणारे प्रतिनिधीत्व देखील अधिक आहे.

६. <u>जातप्रवर्ग -</u>

५0 ग्रामदूतापैकी २८ (५६%) ग्रामदूत खुल्या प्रवर्गातील आहेत. ५ (१0%) ग्रामदूत अनुसूचित जातीतील. ६ (१२%) ग्रामदूत भटक्या जमातीतील, तर ११ (२२%) ग्रामदूत हे इतर मागास वर्गीय या प्रवर्गातील आहेत.

जात प्रवर्गाच्या आधारे ग्रामदूत या पदाचा विचार करता सर्वात कमी ग्रामदूत अनुसूचित जातीतील आहेत तर सर्वात जास्त ग्रामदूत खुल्या प्रवर्गातील आहेत. त्यामुळेच खुल्या प्रवर्गातील ग्रामदूतांना या प्रकल्पात काम करण्याची संधी अधिक प्रमाणात मिळाली असल्याचे दिसून येते.

७. आवड -

५० ग्रामदूतापैकी ४५ (९०%) ग्रामदूत स्वच्छेने व त्यांना आवड असल्यामुळे ग्रामदूत म्हणून काम करीत आहेत. तर ५ (१०%) ग्रामदूत हे गावातील इतरांच्या आग्रहाखातर ग्रामदूत म्हणून काम करीत आहेत.

**४.८.३ ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया -**

जलस्वराज्य प्रकल्पामधील ग्रामदूत हा एक महत्वाचा घटक असून जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या विविध समित्या व ग्रामस्थ यांच्यामधील एक महत्वाचा दुवा म्हणून तो काम करीत असतो. जलस्वराज्य प्रकल्पाची गावामध्ये अंमलबजावणी करीत असताना विविध कामाच्या निमित्ताने त्याचा गावातील प्रत्येक कुटुंबाशी जवळचा संबंध येत असतो . त्यामुळे गावामध्ये प्रकल्प राबवित असताना विविध उपक्रमाबाबत ग्रामस्थांचा प्रतिसाद कसा मिळाला याबाबत ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे.

आज सामाजिक विकासात्मक कार्यामध्ये लोकांची इच्छा व आवड वाढलेली आहे आणि ग्रामदूत या पदाच्या बाबतीत तरूण वर्ग अधिक आकर्षित झाला आहे. त्यामुळे निश्चितच नजिकचा भविष्याकाळ विकासाच्या दृष्टिने उज्वल आहे.

**१. प्रकल्प काळातील जलसंधारण कामाविषयी -**

**सारणी क्र. ४.१८**

| अ.क्र. | जलसंधारणाबाबत प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | जलसंधारणाची कामे झाली | २७(५४%) |
| २. | जलसंधारणाची कामे झाली नाहीत | २३(४६%) |
| | एकूण - | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.१८ वरून असे दिसून येते की, एकूण ५० ग्रामदूतापैकी २७ ग्रामदूतांनी प्रकल्पकाळात जलसंधारणाची कामे झाली आहेत असे सांगितले तर २३ ग्रामदूतांनी प्रकल्पकाळात जलसंधारणाची कामे झाली नाहीत असे सांगितले.

२. ग्रामदूतांना मिळणाऱ्या मानधनाविषयी -

**सारणी क्र. ४.१९**

| अ.क्र. | ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | मानधनाबाबत समाधानी | २४ (४८%) |
| २. | मानधनाबाबत असमाधानी | २६ (५२%) |
| | एकूण - | ५० (१००%) |

वरील सारणी क्र.४.१९ वरून असे दिसून येते की, एकूण ५० ग्रामदूतापैकी २४ ग्रामदूतांनी मिळणाऱ्या मानधनावर समाधानी असल्याचे सांगितले तर २६ ग्रामदूतांनी मिळणाऱ्या मानधनाबाबत असमाधान व्यक्त केले.

एकंदरीत मिळणाऱ्या मानधनावर समाधानी असणाऱ्या ग्रामदूतांच्या तुलनेत असमाधानी असणाऱ्या ग्रामदूतांचे प्रमाण जास्त आहे. म्हणूनच मानधनाच्याबाबतीत उत्तरदात्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा खालीलप्रमाणे.

३.मानधनाबाबतच्या ग्रामदूतांच्या अपेक्षा दर्शविणारी सारणी

**सारणी क्र. ४.२०**

| अ.क्र. | मानधन | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | ४०० ते ५०० रू | १० (३८.४६%) |
| २. | ६०० ते ७०० रू | ०५ (१९.२३%) |
| ३. | ८०० ते १००० रू | ११ (४२.३१%) |
| | एकूण - | २६ (१००%) |

(टीप - येथे मानधनाबाबत असमाधानी असणाऱ्या ग्रामदूतांच्याच प्रतिक्रिया दिलेल्या आहेत )

वरील सारणी क्र.४.२० वरून असे दिसून येते की, एकूण २६ ग्रामदूतापैकी १० ग्रामदूतानी किमान ४०० ते ५०० रू. मानधन असावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ५ ग्रामदूतानी ६०० ते ७०० रू. मानधन असावे तर ११ ग्रामदूतानी ८०० ते १००० रू. मानधन असावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावरून असे दिसून येते की, ८00 ते १000 रू.पर्यंत मानधन असावे अशीच अपेक्षा बहुतांशी ग्रामदूतांनी व्यक्त केलेली आहे.

**४.ग्रामपंचायतीच्या सांडपाणी निचरा पध्दती विषयी -**

५0 ग्रामदूतांपैकी ४५(९0%) ग्रामदूतांनी ग्रामपंचायतीमार्फत गावातील सांडपाणी गटारीद्वारे गावाबाहेर सोडले जाते असे सांगितले. ४(८%) ग्रामदूतांनी ग्रामपंचायत गावातील सांडपाण्याचा उपयोग शेतीसाठी करते असे सांगितले तर एका (२%) ग्रामदूतांनी ग्रामपंचायत सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करते असे सांगितले.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, पाण्याची तीव्र टंचाई असून देखील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याकडे कल असणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या अगदीच कमी असल्याचे दिसून येते.

**५. कुटुंबाकडून सांडपाण्याचा निचरा कसा केला जावा याविषयी -**

**सारणी क्र. ४.२१**

| **अ.क्र.** | **सांडपाणी निचरा पध्दती** | **उत्तरदाते** |
|---|---|---|
| १. | शोषखड्डयात सोडावे | 0९(१८%) |
| २. | परसबागसाठी वापर करावा | ३६(७२%) |
| ३. | गटारीत सोडावे | 0५(१0%) |
| | एकूण - | ५0 (१00%) |

सारणी क्र. ४.२१ वरून असे दिसून येते की, एकूण ५0 ग्रामदूतांपैकी 0९ ग्रामदूतांनी सांडपाणी शोषखड्डयात सोडावे असे मत व्यक्त केले. ३६ ग्रामदूतांनी सांडपाण्याचा परसबागासाठी वापर करावा असे सांगितले तर ५ ग्रामदूतांनी सांडपाणी गटारीत सोडावे असे मत व्यक्त केले. अर्थातच सर्वात जास्त म्हणजे ३६(७२%) ग्रामदूतांनी सांडपाणी परसबागासाठी वापरणे सर्वच दृष्टीने अधिक फायदेशीर असल्याचे मत व्यक्त केले.

**६.उघडयावरील हागणदारी बाबत -**

५0 ग्रामदूतांपैकी ३४(६८%) ग्रामदूतांनी ग्रामस्थ उघडयावर शौचास जात नाहीत असे सांगितले तर १६(३२%) ग्रामदूतांनी अजूनही ग्रामस्थ उघडयावर शौचास जातात अशी माहिती दिली.

आजही जरी अल्प प्रमाणात ग्रामस्थ उघडयावर शौचास जात असले तरी तुलनेने जास्तीत जास्त गावातील हागणदारी बंद झालेली आहे. कारण बहुतांशी लोकांच्यामध्ये हागणदारीमुक्त गावाच्या संकल्पनेविषयी निश्चितच जागरूकता निर्माण झाली असून उघडयावर शौचास जाणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही असे त्यांना वाटत असावे.

**७.शौचालय बांधण्यासाठी ग्रामदूतांचे ग्रामस्थांना मार्गदर्शन -**

**सारणी क्र. ४.२२**

| अ.क्र. | शौचालय प्रकाराविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | शोषखड्डयाचे शौचालय | २८(५६%) |
| २. | सेप्टीक टॅकचे शौचालय | ०४(०८%) |
| ३. | बायोगॅसचे शौचालय | १८(३६%) |
| | एकूण - | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.२२ वरून असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या ५० ग्रामदूतापैकी २८ ग्रामदूतांनी ग्रामस्थांना शोषखड्डयाचे शौचालय बांधण्याचे मार्गदर्शन केले. ४ ग्रामदूतांनी सेप्टीक टॅकचे शौचालय बांधण्याविषयी मार्गदर्शन केले. १८ ग्रामदूतांनी बायोगॅसचे शौचालय बांधण्याबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. यामध्ये फक्त ४ ग्रामदूतांना ग्रामस्थांनी सेप्टीक टॅकचे शौचालय बांधावे असे वाटते तर सर्वात जास्त ग्रामदूतांना ग्रामस्थांनी शोषखड्डयाचे शौचालय बांधणे अधिक फायदयाचे आहे असे वाटते. पण प्रत्यक्षात जेंव्हा ग्रामस्थांनी शौचालये बांधली तेंव्हा मात्र २१(४२%) ग्रामदूतांनी शोषखड्डयाचे शौचालय बांधल्याचे सांगितले. १७(३४%) ग्रामदूतांनी सेप्टीक टॅकचे शौचालय बांधल्याचे सांगितले तर १२(२४%) ग्रामदूतांनी बायोगॅस शौचालय बांधल्याचे सांगितले यावरून हेच स्पष्ट होते की, जरी शोषखड्डयाचे शौचालय (२८) व बायोगॅसचे शौचालय(१८) बांधण्याचा सल्ला दिला असला तरी प्रत्यक्षात सेप्टीक संडास बांधण्याकडेच ग्रामस्थांचा कल असल्याचे दिसून आले.

**८.स्वच्छतेबाबत ग्रामस्थांच्या प्रतिसादाविषयी -**

एकूण ५० ग्रामदूतांपैकी ४९(९८%) ग्रामदूतांनी स्वच्छतेबाबत लोकांचा चांगला प्रतिसाद असल्याचे सांगितले तर एका (२%) ग्रामदूतांनी स्वच्छतेबाबत ग्रामस्थांचा अल्प

प्रतिसाद मिळाला असे सांगितले. यावरून जवळपास १00% लोकांचा स्वच्छतेबाबत प्रतिसाद अगदीच चांगला असून लोकांना आरोग्याचे व स्वच्छतेचे महत्व पटू लागले आहे.

**९. उकिरडयासंबंधी ग्रामदूतांची प्रतिक्रिया -**

एकूण ५0 ग्रामदूतांपैकी २३ (४६%) ग्रामदूतांनी उकिरडे अजूनही गावातच आहेत असे सांगितले आहेत तर २७ (५४%) ग्रामदूतांनी गावात उकिरडे नाहीत अशी माहिती पुरविली.

यावरून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण आरोग्य चांगले राहण्यासाठी घर व परिसर स्वच्छता, रस्ते व गटार सफाई, सांडपाण्याचे निर्मूलन यासारखे उपाय सांगितले आहेत त्यामुळे गावातील अस्वच्छतेचा अड्डा म्हणजे उकिरडा. या उकिरडयाचे प्रमाणही हळूहळू कमी होत असल्याचे दिसून येते.

## ४.९ <u>दुर्बल घटक</u>

### ४.९.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्पाचा मुख्य हेतू गावातील सर्व घटकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि दुर्बल घटक (अनु. जाती व दारिद्रय रेषेखालील घटक) हया योजनांच्यापासून दूर राहणार नाहीत याची दक्षता घेणे हा आहे. अर्थातच त्यांच्यापर्यंत सर्व प्रकारच्या सुविधा पोहोचल्या पाहिजेत यावर शासनाचा अधिक भर आहे. म्हणूनच जलस्वराज्य प्रकल्पाच्या सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचल्या का? त्यांना ग्रामविकास प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले गेले आहे का? याविषयी प्रत्येक गावातील दोन याप्रमाणे २५ गावातील ५0 दुर्बल घटकांना प्रत्यक्ष भेटून जी माहिती मिळविली ती खालीलप्रमाणे -

### ४.९.२ <u>वैयक्तिक माहिती</u>

**१. <u>वयोगट -</u>** अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण ५0 उत्तरदात्यांपैकी १७ (३४%) उत्तरदाते १८ ते ४0 वर्षे वयोगटातील आहेत, २९ उत्तरदाते (५८%) ४१ ते ६0 वयोगटातील तर ४ (८%) उत्तरदाते ६१ वर्षांच्या पुढील आहेत.

**२. <u>लिंगभेद -</u>** ५0 उत्तरदात्यांमधील ८ (१६%) उत्तरदाते स्त्रिया असून ४२ (८४%) उत्तरदाते पुरूष आहेत.

**३. <u>शिक्षण -</u>** ५0 उत्तरदात्यांपैकी १0 (२0%) उत्तरदाते निरक्षर, २३ (४६%) १ ली ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेले, १२ (२४%) ८ वी ते १0 वी पर्यंत , ३ (६%) ११ वी

ते १२ वी पर्यंत, १(२%)पदवी पर्यंत तर १(२%) उत्तरदाते हे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

४. <u>धर्म -</u> ५० उत्तरदात्यांपैकी ४३ (८६%) उत्तरदाते हिंदू धर्माचे आहेत तर ७ (१४%) उत्तरदाते बौध्द धर्माचे आहेत. अर्थातच याबाबतीत बौध्द धर्माच्या उत्तरदात्यांच्या तुलनेत हिंदू धर्माच्या उत्तरदात्यांची संख्या जास्त आहे. (या सदंर्भात अधिक स्पष्टीकरण देणे आवश्यक वाटते की, हिंदू धर्मामधील उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक असले तरी त्यामध्ये हिंदूमधील महार हया घटकांचा मोठया प्रमाणात समावेश आहे. कारण त्यांनी बौध्द धर्म स्वीकारलेला नाही. म्हणून त्यांचा उल्लेख हिंदू-महार असा केला गेल्याने येथे त्यांचा समावेश हिंदू धर्मात करण्यात आलेला आहे.)

५. <u>जातप्रवर्ग -</u> ५० उत्तरदात्यांपैकी १० (२०%) उत्तरदाते खुल्या प्रवर्गातील आहेत. ३० (६०%) अनुसूचित जातीतील आहेत. ४ (८%) भटक्या जमातीतील आहेत तर ६ (१२%) उत्तरदाते इतर मागास वर्गीय प्रवर्गातील आहेत. यावरून अनुसूचित जातीतील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त तर भटक्या जमातीतील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे आढळून आले.

### ४.९.३ <u>दुर्बल घटकांच्या प्रतिक्रिया</u> -

**प्रस्तावना ःः-**

जलस्वराज्य प्रकल्पाचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे दुर्बल घटकांना प्रकल्पाच्या अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेऊन त्यांच्यापर्यंत प्रकल्पाचे सर्व लाभ पोहचविणे हे होते. हया उद्दिष्टांची पूर्तता कितपत किंवा कशी झाली आहे. याबाबत दुर्बल घटकातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

**१. दुर्बल घटकातील (कुटुंबातील) महिलांच्या बचत गटातील सहभागाविषयी**

**सारणी क्र. ४.२३**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | महिला बचत गटात सहभाग आहे | ३८ (७६%) |
| २. | महिला बचत गटात सहभाग नाही | १२ (२४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.२३ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ३८ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील महिला हया महिला बचत गटात आहेत. तर १२ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकही महिला बचत गटात सहभागी झालेली नाही. अर्थात ज्या उत्तरदात्यांच्या कुटुंबातील महिलांचा बचत गटात सहभाग आहे अशा ३८ उत्तरदात्यांमधील १७(४४.७४%) उत्तरदात्यांच्या कुटुंबातील महिला जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीपासूनच बचत गटात आहेत तर २१(५५.२६%) उत्तरदात्यांच्या कुटुंबातील महिलांनी जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर महिला बचत गटात सहभाग घेतला आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून दुर्बल घटकातील महिलांचे विविध प्रकारे प्रबोधन केल्यामुळे त्यांच्यामधील बहुसंख्य महिला बचत गटामध्ये सहभागी झाल्याचे दिसून आले.

**२. दुर्बल घटकांच्या लोकवर्गणीतील सहभागाविषयी**

एकूण ५० उत्तरदात्यांमधील २७(५४%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाची लोकवर्गणी दिलेली असून २३(४६%) उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाची लोकवर्गणी दिलेली नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, जलस्वराज्य प्रकल्पाविषयी लोकांच्या मनामध्ये स्वमालकीची जाणीव निर्माण व्हावी म्हणून शासनाने जी १०% लोकवर्गणीची अट घातलेली आहे त्याची तंतोतंत अंमलबजावणी झालेली नसल्याचे दिसून येते.

**३. वाढीव पाणीपट्टीविषयी**

एकूण ५० उत्तरदात्यांधील २५(५०%) उत्तरदात्यांना जलस्वराज्य प्रकल्पानंतर आपणास वाढीव पाणीपट्टी भरावी लागणार आहे याची माहिती आहे तर २५(५०%) उत्तरदात्यांना आपणास वाढीव पाणीपट्टी भरावी लागणार आहे याची अजिबात माहिती नाही.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, दुर्बल घटकातील ५०% लोकांच्यापर्यंतच जलस्वराज्य प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर वाढीव पाणीपट्टी भरावी लागणार आहे. याची माहिती पोहोचली आहे.

४.	मीटर पध्दतीविषयी

सारणी क्र. ४.२४

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | मीटरपध्दती योग्य आहे | ४२ (८४%) |
| २. | मीटरपध्दती अयोग्य आहे | ०८ (१६%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.२४ वरून ५० उत्तरदात्यांमधील ४२ उत्तरदात्यांनी मीटरपध्दती योग्य आहे असे सांगितले तर ८ उत्तरदात्यांनी मीटरपध्दती अयोग्य असल्याचे सांगितले. दुर्बल घटकातील बहुसंख्य उत्तरदात्यांना मीटर पध्दतीचे महत्व पटले असल्याचे दिसून आले. यावरून मीटरपध्दतीला गरीबांचा विरोध असतो असे सरसकट विधान करणे चुकीचे असल्याचे सिध्द होते.

५.	ग्रामसभामधील उपस्थिती विषयी

सारणी क्र. ४.२५

| अ.क्र. | ग्रामसभा उपस्थिती | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची उत्तरदात्यांची संख्या | जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | ग्रामसभांना उपस्थित राहात होतो/आहे | २८ (५६%) | ४२ (८४%) |
| २. | ग्रामसभांना उपस्थित राहात नव्हतो/नाही | २२ (४४%) | ०८ (१६%) |
| | एकूण | ५० (१००%) | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.२५ वरून ५० उत्तरदात्यांमधील २८ उत्तरदाते जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ग्रामसभांना उपस्थित राहात होते तर २२ उत्तरदाते ग्रामसभांना उपस्थित राहात नव्हते पण जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून ४२ उत्तरदाते ग्रामसभांना उपस्थित राहात आहेत तर केवळ ८ उत्तरदाते मात्र ग्रामसभांना उपस्थित राहात नाहीत.

यावरून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधनामुळे दुर्बल घटकातील लोकांची मानसिकता बदलून त्यांची ग्रामसभामधील उपस्थिती दिवसेंदिवस समाधानकारक वाढत असल्याचे दिसून आले.

**६. घरातील स्वतंत्र नळजोडणीविषयी**

**सारणी क्र. ४.२६**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची उत्तरदात्यांची संख्या | जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर उत्तरदात्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | स्वतंत्र नळजोडणी आहे. | २१ (४२%) | ३७ (७४%) |
| २. | स्वतंत्र नळजोडणी नाही. | २९ (५८%) | १३ (२६%) |
| | एकूण | ५० (१००%) | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.२६ वरून असे दिसून येते की, एकूण ५० उत्तरदात्यांपैकी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी २१ उत्तरदात्यांच्या घरी स्वतंत्र नळजोडणी होती. तर २९ उत्तरदात्यांच्या घरी स्वतंत्र नळजोडणी नव्हती. पण जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणी नंतर ३७ उत्तरदात्यांच्या घरी स्वतंत्र नळजोडणी आहे तर १३ उत्तरदात्यांच्या घरी मात्र अजूनही स्वतंत्र नळजोडणी नाही.

यावरून असे दिसून येते की,जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीच्या तुलनेत जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून दुर्बल घटकांचे प्रबोधन व त्यांच्यामधील अस्मिता जागृत केल्यामुळे बहुसंख्य दुर्बल घटकातील लोक या ना त्याप्रकारे प्रयत्न करून घरी स्वतंत्र नळजोडणी घेऊन पाण्यासाठीची वणवण संपवित असल्याचे दिसून आले.

**७. जलस्वराज्य प्रकल्प व गाव सुधारणा याविषयी**

५० उत्तरदात्यांमधील ४७(९४%) उत्तरदात्यांना जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावात सुधारणा किंवा सोयीसुविधा उपलब्ध झाल्याचे वाटते पण ३(६%) उत्तरदात्यांना मात्र जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावात सुधारणा किंवा सोयीसुविधा निर्माण झाल्या नाहीत असे वाटते पण बहुसंख्येचा विचार करता जलस्वराज्य प्रकल्पाची गावात अंमलबजावणी

झाल्यामुळे भौतिक सुधारणा व लोकांच्या मानसिकतेमध्ये परिवर्तन करण्यामध्ये प्रकल्प यशस्वी झाल्याचे दिसून येते.

### ८. घरातील शौचालयाच्या सुविधेविषयी

**सारणी क्र. ४.२७**

| अ.क्र. | शौचालयाबाबत प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी घरी शौचालय असलेले उत्तरदाते | १८ (३६%) |
| २. | जलस्वराज्य प्रकल्पानंतर घरी शौचालय बांधलेले उत्तरदाते | २५ (५०%) |
| ३. | ज्यांच्या घरी शौचालय नाही असे उत्तरदाते | ०७ (१४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र.४.२७ वरून असे लक्षात येते की, ५० उतरदात्यामधील १८ उत्तरदात्यांच्या घरी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीच शौचालय बांधलेला होता, २५ उत्तरदात्यांच्या घरी जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर शौचालय बांधण्यात आला तर ७ उत्तरदात्यांच्या घरी अजूनही शौचालय नाही.

यावरून जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची दुर्बल घटकातील शौचालयाची संख्या पाहता जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर केलेल्या प्रबोधनामुळे, ग्रामपंचायत समिती यांच्यामार्फत केलेल्या आर्थिक सहकार्यामुळे व इतर अनेक कारणामुळे शौचालयाच्या संख्येत समाधानकारक वाढ झालेली आहे तर काही कुटुंबाकडे अजूनही शौचालय नसले तरी ते सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत असल्याचे दिसून आले.

### ९. घरगुती सांडपाणी निचरा पध्दतीविषयी

**सारणी क्र. ४.२८**

| अ.क्र. | सांडपाणी निचरा पध्दती | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | सांडपाणी गटारीत सोडतो | ३० (६०%) |
| २. | सांडपाणी परसबागेसाठी वापरतो | ०८ (१६%) |
| ३. | सांडपाणी शोषखड्डयात सोडतो | १२ (२४%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.२८ वरून ५० उत्तरदात्यांपैकी ३० उत्तरदाते आपल्या घरातील सांडपाणी गटारीत सोडतात. ८ उत्तरदाते घरातील सांडपाणी परसबागेसाठी वापरतात तर १२ उत्तरदाते घरातील सांडपाणी शोषखड्डयात सोडतात. यावरून घरातील सांडपाणी गटारीत सोडण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.

## ४.१० महिला सक्षमीकरण

### ४.१०.१ प्रस्तावना

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिला सक्षमीकरणाला अधिक प्राधान्य देण्याचे प्रयोजन आहे. अर्थात महिला सक्षमीकरण म्हणजे जलव्यवस्थापन,स्वच्छता आणि गावाच्या सर्वांगिण विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे होय. हा सहभाग वाढवित असताना गावातील महिलांनी संघटित होऊन स्वयंसहाय्यता बचत गट निर्माण करणे महत्वाचे आहे. याचबरोबर सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण महिलांनी आपल्या आवडीच्या व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेऊन कौशल्य वाढवावे आणि याच प्रशिक्षणाच्या आधारे त्यांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा अशीही यामध्ये अपेक्षा आहे.

जलस्वराज्य प्रकल्पाच्या उद्दिष्टाप्रमाणे गावातील महिलांच्यामध्ये जागृती झाली आहे का? महिला ग्रामविकास कार्यात सहभागी होत आहेत का? जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांनी स्वत:च्या विकासाबरोबरच समाजाचा विकास करण्यासाठी कोणते प्रयत्न केले आहेत? याचा अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र महिला सक्षमीकरणावर आधारित मुलाखत अनुसूची तयार केली. प्रत्येक गावातून २ महिला याप्रमाणे २५ गावातील एकूण ५० महिलाकडून तयार केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली. त्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे

### ४.१०.२ उत्तरदात्या महिलांची वैयक्तिक माहिती -

जलस्वराज्य प्रकल्पाचा गावातील महिलंच्यावरील प्रभाव, त्यांच्यामध्ये घडून आलेले परिवर्तन आणि त्यांना मिळालेले लाभ अभ्यासण्यासाठी प्रत्येक गावातील दोन महिलांची निवड करण्यासाठी यादृच्छिक नमूना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला. २५ गावातील एकूण ५० महिलांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे

१. <u>वयोगट</u> -

एकूण ५० महिला उत्तरदात्यापैकी ४० (८०%) उत्तरदात्या महिला १८ ते ४० वर्षे वयोगटातील आहेत तर १० (२०%) उत्तरादात्या महिला ४७ ते ६० वर्षे वयोगटातील आहेत.

२. <u>शिक्षण</u> -

५० महिला उत्तरदात्यापैकी ५ (१०%) महिला उत्तरदात्या निरक्षर आहेत. १४ (२८%) उत्तरदात्या १ ली ते ७ वी पर्यंत, २३ (४६%) ८ वी ते १० वी पर्यंत, ३ (६%) ११ वी ते १२ वी पर्यंत तर ५ (१०%) महिला उत्तरदात्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे.

यावरून एकूण उत्त्तरदात्यांमध्ये ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या महिला उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे तर निरक्षर महिलांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसून आले.

३. <u>धर्म</u> -

५० महिला उत्तरदात्यापैकी ४५ (९०%) उत्तरदात्या हिंदू धर्मातील आहेत. ३ (६%) मुस्लिम धर्मातील, १ (२%) जैन धर्मातील तर १ (२%) बौध्द धर्मातील उत्तरदाती आहेत. अर्थातच एकूण उत्तरदात्यामध्ये हिंदू धर्मातील महिला उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त असून जैन व बौध्द धर्मातील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात कमी आहे.

४. <u>जातप्रवर्ग</u> -

महिला सबलीकरणाच्या संदर्भात ज्या ५० महिला उत्तरदात्यांची मुलाखत घेतली त्या उत्तरादात्यापैकी ३६ (७२%) महिला उत्तरदात्या खुल्या जात प्रवर्गातील आहेत. ५ (१०%) उत्तरदात्या अनुसूचित जातीतील आहेत. २ (४%) उत्तरादात्या भटक्या जमातीतील आहेत तर ७ (१४%) उत्तरदात्या इतर मागास वर्गीय आहेत.

मुलाखतीसाठी ज्या ५० महिलांची निवड केली त्यामध्ये खुल्या प्रवर्गातील महिला उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वात जास्त असून भटक्या जमातीतील महिला उत्तरदात्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

**४.१०.३ सक्षमीकरणाविषयी महिला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया -**

जलस्वराज्य प्रकल्पाची गावामध्ये अंमलबजावणी करीत असताना शासनाने मीहिला सक्षमीकरणाला अधिक प्राधान्य दिले आहे. महिलांच्यामध्ये बचत गटाविषयी, पाणी व स्वच्छतेविषयी व ग्रामसभांना उपस्थित राहण्याविषयी जागृती करणे व विविध स्पर्धा घेऊन

महिलांचा व्यक्तिमत्व विकास घडविणे आणि त्यांना विविध प्रशिक्षणाचा लाभ मिळवून देणे या सारखी उदि्दष्टये ठरविण्यात आली. सदर उदि्दष्टाबाबत प्रत्यक्षात अंमलबजावणी कशी झाली? आणि महिलांना याचा कितपत लाभ मिळाला याबाबत प्रातिनिधिक महिला उत्तरदात्यांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्या खालीलप्रमाणे -

**१. ग्रामसभांना महिला उत्तरदात्यांच्या उपस्थितीविषयी**

**सारणी क्र. ४.२९**

| अ.क्र. | ग्रामसभा | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी | जलस्वराज्य प्रकल्पानंतर |
|---|---|---|---|
| १. | उपस्थित उत्तरदात्या | ३0 (६0%) | ४८ (९६%) |
| २. | अनुपस्थित उत्तरदात्या | २0 (४0%) | 0२ (0४%) |
| | | ५0 (१00%) | ५0 (१00%) |

वरील सारणी क्र. ४.२९ वरून असे दिसून येते की, एकूण ५0 महिला उत्तरदात्यांपैकी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ग्रामसभांना फक्त ३0 महिला उत्तरदात्या उपस्थित राहत होत्या तर जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर मात्र ग्रामसभांना महिला उत्तरदात्यांची उपस्थिती ४८ एवढी झाली म्हणजेच ती १८ नी वाढली. याचप्रमाणे ग्रामसभांच्या अनुपस्थितीचा विचार करता जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी महिलांच्या अनुपस्थितीचे प्रमाण २0 एवढे होते. तर प्रकल्पानंतर तीच संख्या अवघी २एवढी झाली. म्हणजे गैरहजर राहण्याचे प्रमाण १८ नी घटलेले दिसते.

यावरून हेच स्पष्ट होते की, महिलांच्यामध्ये निश्चितच जलस्वराज्य प्रकल्पाबाबत जाणीव जागृती निर्माण झालेली असून या योजनेचे आणि महिला सक्षमीकरणाचे महत्व त्यांना पटलेले आहे.

**२. विविध स्पर्धामधील महिलांच्या सहभागाविषयी**

जलस्वराज्य प्रकल्पित गावामध्ये प्रकल्पापूर्वी व नंतर ज्या विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या स्पर्धामध्ये ५0 महिला उत्तरदात्यांचा सहभाग कसा होता हे सारणी क्र. ४.३0 वरून स्पष्ट होते.

**सारणी क्र. ४.३०**

| अ.क्र. | महिलांचा सहभाग | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी | जलस्वराज्य प्रकल्पानंतर |
|---|---|---|---|
| १. | सहभागी महिला | ०५ (१०%) | ३६ (७२%) |
| २. | सहभागी न झालेल्या महिला | ४५ (९०%) | १४ (२८%) |
| | एकूण | ५० (१००%) | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.३० वरून ५० महिला उत्तरदात्यामधील केवळ ०५ महिला जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी गावातील विविध स्पर्धामध्ये सहभागी होत होत्या. तर ४५ महिला स्पर्धेमध्ये सहभागीच होत नव्हत्या. पण जलस्वराज्य प्रकल्प गावात सुरू झाल्यानंतर आयोजित केलेल्या विविध स्पर्धेमध्ये ३६ महिलांनी सहभाग घेतला तर केवळ १४ महिलांनी मात्र कोणत्याच स्पर्धेमध्ये सहभाग घेतला नसल्याचे दिसते. म्हणजेच स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण ३१ ने वाढलेले आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी गावातील महिलांच्यामध्ये सार्वजनिक कार्यक्रमात व स्पर्धेत सहभागी होण्याबाबत असणारी भिती जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून झालेल्या प्रबोधनामुळे कमी झाली आणि महिलांचा स्पर्धेमधील सहभाग वाढला.

**३. पाणी व शौचालयाविषयी**

जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी प्रकल्पित गावामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांचे विशेषता महिलांचे खूप हाल होत होते. घागरभर पाण्यासाठी महिलांना रानोमाळ तासन्‌तास भटकावे लागत असे. तसेच जीवाची पर्वा न करता विहिरीमध्ये उतरावे लागत असे. या पाण्यावरून भांडणे देखील होत. पाण्याप्रमाणेच घरी शौचालय नसल्यामुळे महिलांना उघडयावर शौचास जावे लागत असल्यामुळे अतिशय अपमानित जीवन त्यांना जगावे लागत असे. तसेच उघडयावर शौचास बसल्यामुळे रोगराईलाही सर्वांना सामोरे जावे लागत असे. त्यामुळेच गावाने जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभाग घेतला आहे म्हणून जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील पाणी व शौचालयाचा प्रश्न सुटला का? असा प्रश्न विचारला असता ५० उत्तरदात्या महिलांच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

### सारणी क्र. ४.३१

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | पाणी व शौचालयाचा प्रश्न सुटला | ४९ (९८%) |
| २. | पाणी व शौचालयाचा प्रश्न सुटला नाही. | ०१ (०२%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.३१ वरून असे दिसून येते की, एकूण ५० महिला उत्तरदात्यांपैकी ४९ उत्तरदात्यांनी गावचा पाणी व शौचालयाचा प्रश्न सुटला आहे असे सांगितले तर केवळ १ उत्तरदात्या महिलेने अजूनही पाणी व शौचालयाचा प्रश्न सुटला नाही असे सांगितले. म्हणजेच जलस्वराज्य प्रकल्पामुळे खेडयातील पाणी व शौचालयाचा प्रश्न जवळजवळ सुटला आहे असेच म्हणावे लागेल.

जलस्वराज्य प्रकल्पामुळेच आपणास सार्वजनिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळाली असे आपणास वाटते का? असा महिला उत्तरदात्यांना प्रश्न विचारला असता एकूण ५० महिला उत्तरदात्यांपैकी ४८ महिलांनी 'होय' असे उत्तर दिले. तर केवळ २ महिलांनी 'नाही' असे उत्तर दिले. यावरून वरील आकडेवारीची तुलना करता जलस्वराज्य प्रकल्पामुळेच महिलांना सार्वजनिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळाली असे स्पष्ट दिसते कारण त्यांची संख्या ४८ एवढी असलेली दिसून येते.

**४. बचत गटातील सहभागाविषयी**

एकूण ५० महिला उत्तरदात्यांपैकी ४६ (९२%) महिला उत्तरदात्या बचत गटात सहभागी आहेत तर केवळ ४ (०८%) महिला बचत गटात सहभागी झालेल्या नसल्याचे आढळले. यावरून महिलांचे बचत गटातील सहभागाचे प्रमाण अतिशय समाधानकारक असल्याचे दिसून आले.

**५. जलस्वराज्य कालावधीत दिलेल्या प्रशिक्षणाच्या लाभाविषयी**

### सारणी क्र. ४.३२

| अ.क्र. | प्रशिक्षणाबाबत प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षणाचा लाभ घेतला | ३५ (७०%) |
| २. | प्रशिक्षणाचा लाभ घेतला नाही | १५ (३०%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.३२ वरून ५0 महिला उत्तरदात्यांपैकी ३५ महिला उत्तरदात्यांनी प्रकल्प कालावधीतील प्रशिक्षणाचा लाभ घेतला तर १५ महिला उत्तरदात्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नाही.

जलस्वराज्य प्रकल्प काळात महिलांना विविध प्रबोधनात्मक व व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात आले. हया प्रशिक्षणाचा लाभ घेऊन महिलांनी आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनावे अशी अपेक्षा असली तरी प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या ३५ महिला उत्तरदात्यांपैकी २0(५७.१४%) महिला उत्तरदात्यांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू केला आहे तर १५ (४२.८६%) उत्तरदात्यांनी केवळ प्रशिक्षण घेतले पण स्वतंत्र व्यवसाय चालू केला नाही.

थोडक्यात प्रशिक्षणाचा लाभ घेऊन स्वतंत्र व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांचे प्रमाण जरी कमी असले तरी स्वतंत्र व्यवसाय न करणाऱ्यांच्या तुलनेत ते जास्त आहे.

**६. बॅंकेतील आर्थिक व्यवहाराविषयी**

बचत गटातील महिलांच्या बॅंकेतील व्यवहाराविषयी असे दिसून आले की, ५0 उत्तरदात्या महिलांपैकी ४३(८६%) महिला उत्तरदात्या बॅंकेत एकटया जातात तर 0७(१४%) महिला बॅंकेत एकटया कधीही गेलेल्या नाहीत.

**७. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी**

ग्रामीण भागातील महिलांना रांधा, वाढा, उष्टी काढा या पारंपारिक मानसिकतेतून बाहेर काढून बाहय जगाची ओळख करून देणे, तिच्या क्षमतेचा विकास करणे, तिला पुरूषांच्या बरोबरीने सार्वजनिक कार्यामध्ये सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिला सक्षमीकरणांतर्गत महिलांचे प्रबोधन, प्रशिक्षण व अभ्यासदौरे आयोजित केले. हया सर्वांचा परिणाम म्हणून घरामध्ये मुलांचा सांभाळ करणारी, त्यांच्या प्रगतीसाठी धडपडणारी ही स्त्री उंबरठा ओलांडून मुलांच्या शाळेतील प्रगतीबाबत किती जागृत (दक्ष) आहे हे खालील सारणीवरून स्पष्ट होईल.

**सारणी क्र. ४.३३**

| अ.क्र. | मुलांच्या प्रगतीविषयी | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | मुलांच्या शाळेत जाणा-या महिला | ३९ (७८%) |
| २. | मुलांच्या शाळेत न जाणा-या महिला | ११ (२२%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

वरील सारणी क्र. ४.३३ वरून असे दिसून येते की, एकूण ५० महिला उत्तरदात्यांपैकी ३९ महिला आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीची चौकशी करण्यासाठी शाळेत जातात तर ११ महिला मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत चौकशी करण्यासाठी कधीही शाळेत गेलेल्याा नाहीत.

यावरून खेडयापाडयातील बहुतांशी महिला आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत जागृत असल्याचे दिसून येते.

## ८. मुलांच्या शाळेतील पालकसभेला हजर राहण्याविषयी

**सारणी क्र. ४.३४**

| अ.क्र. | पालकसभेला हजर राहण्याविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | स्वत: जाते | २६ (५२%) |
| २. | पती जातात | २० (४०%) |
| ३. | दोघेही जातो | ०४ (०८%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.३४ वरून असे दिसून येते की, ५० महिला उत्तरदात्यामधील २६ महिला आपल्या मुलांच्या शाळेतील पालकसभेला स्वत: जातात, २० महिलांनी मुलांच्या शाळेतील पालकसभेला आपले पती जात असल्याचे सांगितले तर ४ महिलांनी मुलांच्या शाळेतील पालकसभेला आम्ही दोघेही जातो असे सांगितले.

यावरून कुटूंबात मलांच्यासाठी दक्ष असणाऱ्या महिला आता शाळेतील आपल्या मुलींच्या प्रगतीची माहिती घेण्यासाठी घराबाहेर पडू लागल्या आहेत.

## ९. राजकीय निवडणूक लढविलेल्या उत्तरदात्या महिला

**सारणी क्र. ४.३५**

| अ.क्र. | निवडणुका संदर्भात | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | निवडणूक लढविलेल्या महिला | ०५ (१०%) |
| २. | निवडणूक न लढविलेल्या महिला | ४५ (९०%) |
| | एकूण | ५० (१००%) |

वरील सारणी क्र. ४.३५ वरून असे दिसून येते की, ५0 महिलापैकी केवळ 0५ महिलांनी आतापर्यंत निवडणूका लढविलेल्या आहेत तर ४५ महिलांनी आतापर्यंत एकही निवडणूक लढविलेली नाही.यावरून राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग खूचप कमी असल्याचे दिसून येते.

**१०. गटतटावरील परिणामाविषयी**

**सारणी क्र. ४.३६**

| अ.क्र. | प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | गटतट कमी झाले | २९ (५८%) |
| २. | गटतट कमी झाले नाहीत | ११ (२२%) |
| ३. | आम्हाला माहिती नाही | १0 (२0%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

सारणी क्र. ४.३६ वरून असे दिसून येते की, एकूण ५0 महिला उत्तरदात्यापैकी २९ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील गटतट कमी झाले असे सांगितले, ११ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील गटतट कमी होण्यास काहीही मदत झाली नाही असे सांगितले तर १0 उत्तरदात्या महिलांनी गटतट कमी झाले किंवा वाढले याबाबत काहीही माहिती नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.यावरून हेच स्पष्ट होते की, बहुतांशी उत्तरदात्यांच्यामते जलस्वराज्यमुळे गावातील गटतट कमी झाले आहेत.

**११. घरातील शौचालयाच्या सुविधेविषयी प्रतिक्रिया**

**सारणी क्र. ४.३७**

| अ.क्र. | शौचालय सुविधा | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | शौचालय आहे | ४९ (९८%) |
| २. | शौचालय नाही | 0१ (0२%) |
| | एकूण | ५0 (१00%) |

सारणी क्र. ४.३७ वरून असे स्पष्ट होते की, ५० उत्तरदात्या महिलांपैकी ४९ उत्तरदात्यांच्या घरी शौचालय आहे तर केवळ एकाच उत्तरदात्यांच्या घरी शौचालय नसल्याची माहिती पुरविली गेली.

## १२. हागणदारी मुक्ततेविषयी

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गावाला शुध्द व पुरेसे पाणी देणे हे जसे उद्दिष्ट आहे त्याचप्रमाणे गाव हागणदारी मुक्त करणे हे देखील उद्दिष्ट असल्यामुळे त्याविषयी महिला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया

**सारणी क्र. ४.३८**

| अ.क्र. | हागणदारीविषयी प्रतिक्रिया | उत्तरदाते |
|---|---|---|
| १. | हागणदारी बंद झाली | ३० (६०%) |
| २. | काही प्रमाणात हागणदारी आहे | २० (४०%) |
| | एकूण | ५० (१००%) |

सारणी क्र. ४.३८ वरून असे दिसून येते की, ५० महिला उत्तरदात्यांपैकी ३० उत्तरदात्यांनी आपल्या गावातील उघडयावरील हागणदारी बंद झाली असे सांगितले तर २० उत्तरदात्यांनी अजूनही काही प्रमाणात आपले गाव हागणदारी मुक्त झाले नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

यावरून गावे १००% हागणदारी मुक्त होण्यासाठी लोकांच्यामध्ये अजुनही स्वच्छता व आरोग्याविषयी जाणीव जागृती करणे आवश्यक आहे.

प्रकरण ५ वे

# तथ्यसंकलनाचे विश्लेषण भाग - II

(जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीच्या आणि प्रकल्पानंतरच्या परिस्थितीच्या तुलनात्मक अभ्यासाचे विश्लेषण)

५.१ प्रस्तावना
५.२ भादवण (तालुका - आजरा)
५.३ कडगाव (तालुका - भुदरगड)
५.४ करडवाडी (तालुका - भुदरगड)
५.५ मिणचे खुर्द (तालुका - भुदरगड)
५.६ निष्णप - कुंभारवाडी (तालुका - भुदरगड)
५.७ करंबळी (तालुका - गडहिंग्लज)
५.८ निवडे (तालुका - गगनबावडा)
५.९ कुंभोज (तालुका - हातकणंगले)
५.१0 मौजे मुडशिंगी (तालुका - हातकणंगले)
५.११ रेंदाळ (तालुका - हातकणंगले)
५.१२ बामणी (तालुका - कागल)
५.१३ कसबा सांगाव (तालुका - कागल)
५.१४ सुळकूड (तालुका - कागल)
५.१५ नंदवाळ (तालुका - करवीर)
५.१६ आंबवडे (तालुका - पन्हाळा)
५.१७ चव्हाणवाडी (तालुका - पन्हाळा)
५.१८ माले (तालुका - पन्हाळा)
५.१९ पैजारवाडी (तालुका - पन्हाळा)
५.२0 पोखले (तालुका - पन्हाळा)
५.२१ सातार्डे (तालुका - पन्हाळा)
५.२२ पिंपळवाडी (तालुका - राधानगरी)
५.२३ सरूड (तालुका - शाहुवाडी)
५.२४ निमशिरगाव (तालुका - शिरोळ)

## प्रकरण ५ वे

# तथ्य संकलनाचे विश्लेषण - II

## (जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची आणि प्रकल्पानंतरच्या परिस्थितीच्या तुलनात्मक अभ्यासाचे विश्लेषण)

### ५.१ प्रस्तावना

संशोधकाने संशोधनासाठी 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प : समाजशास्त्रीय अभ्यास' हा अभ्यासविषय निवडला. कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यामधून एकूण ११५ गावे या जलस्वराज्य प्रकल्पात सहभागी झाली होती. त्यापैकी २५ गावांची संशोधकाने अभ्यासासाठी निवड करून त्या प्रत्येक गावाला वारंवार भेटी दिल्या आणि मुलाखत अनुसूची व निरीक्षणाद्वारे विविध उत्तरदात्यांकडून सविस्तर माहिती संकलित केली. तथापि संशोधन पूर्ण होईपर्यंत तेऊरवाडी (तालुका - चंदगड) व पारदेवाडी (तालुका - भुदरगड) या दोन गावांनी या प्रकरणासाठी आवश्यक असणारी माहितीच पुरविली नाही म्हणून शेवटी २३ गावांच्या संकलीत केलेल्या माहितीच्या आधारे सदर प्रकरणामध्ये संशोधकाने पाणी व्यवस्थापन, आरोग्य व ग्रामस्वच्छता आणि महिला सक्षमीकरण हया प्रमुख विषयाबरोबरच इतर अनेक विषयासंबंधी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी आणि जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर संबंधित गावामध्ये कोणकोणते परिवर्तन झाले याचा तुलनात्मक आढावा घेतला आहे.

## १. भादवण (तालुका - आजरा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - फेब्रुवारी २००६ व जलस्वराज्य ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत तारीख - मे २०१०)**

### १. लोकसंख्या :-

(टीप : जिल्हयातील निवडलेल्या सर्व गावांची लोकसंख्या, कुटुंबसंख्या व दारिद्रय रेषेखालील कुटुंबसंख्या ही सन २००१ च्या जनगणनेच्या आधारे घेतलेली आहे)

भादवण या गावची एकूण लोकसंख्या ३२९४ असून त्यामध्ये १४९९ स्त्रीया आणि १७९५ पुरूष आहेत. तसेच एकूण ५८० कुटुंबसंख्या असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या १३३ आहे.

## २. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

भादवण गावाची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. ग्रामपंचायतीकडे १ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ पाणी वितरण कर्मचारी आहेत. तथापि ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधांचा मात्र अभाव आढळला.

## ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- भादवण गावात **जलस्वराज्य प्रकल्प सुरू होण्यापूर्वी** ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामविकासाबाबत जागृती नव्हती, ग्रामपंचायतीमार्फतदेखील ग्रामस्थांच्यामध्ये स्वच्छता, आरोग्याबाबत जागृती करण्यासाठी प्रयत्न झाले नव्हते, ग्रामसभांना ग्रामस्थांची उपस्थिती खूपच कमी होती, गावातील महिलांच्यामध्येही जागृती नसल्यामुळे बचत गटांची संख्या कमी होती व सार्वजनिक कार्यक्रमामधील त्यांचा सहभागही कमी असे. त्याचप्रमाणे गावात शौचालयांची संख्याही खूपच कमी होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** - जलस्वराज्य समिती व सहाय्यकारी संस्थेमार्फत ग्रामस्थांच्या घरोघरी जाऊन पिण्याच्या पाणी वापराबाबत, सांडपाणी निर्मूलन, स्वच्छता व महिला सक्षमीकरणाबाबत जागृती करण्याचा प्रयत्न केला व लोकांना शौचालय बांधण्याचे आवाहन केले. ग्रामस्थांना ग्रामविकासाचे महत्व कळावे व त्यांचा ग्रामविकासकार्यात सहभाग वाढावा यासाठी ग्रामविकासामध्ये आदर्श ठरलेल्या जैन्याळ (ता.कागल) व कांबळवाडी (ता.राधानगरी) या गावांना अभ्यासदौरे आयोजित केले. तसेच महिलांना बचत गटाबाबत व व्यवसायाबाबत प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे म्हणून वारणानगर येथील महिला उद्योगसमूहाला अभ्यासदौरा आयोजित केला. अभ्यासदौऱ्याला गावातील तरूणांनी, महिलांनी व ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला व अभ्यासदौऱ्यानंतर गावात सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रमात, लोकवर्गणी गोळा करण्यात व लोकांना शौचालय बांधण्यास प्रवृत्त करण्यात चांगले सहकार्य केले.

या दौऱ्याचा परिणाम म्हणून १. गावात महिला बचत गटांची संख्या वाढली. २. गाव स्वच्छ झाले. ३. गाव हागणदारीमुक्त होण्यास मदत झाली. ४.लोकवर्गणीचा वाटा वेळेत जमा झाल्यामुळे जलस्वराज्य प्रकल्पाला गती मिळाली.

## ४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

### अ) <u>पिण्याचे पाणी :-</u>

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** भादवण गावाला २ कि.मी. अंतरावरील हिरण्यकेशी नदीवरून पाणी पुरवठा होत होता. पाणी पुरवठा योजना जुनी असल्यामुळे जॅकवेलची पडझड झाली होती. जलवाहिन्यांना वारंवार गळती, पाणी साठवण टाकीमध्ये किरकोळ बिघाड झाले होते. योजनेमध्ये वारंवार बिघाड होत असल्यामुळे अनियमित पाणी पुरवठा होत होता. अनियमित व अपुरा पाणी पुरवठा होत असल्यामुळे पाण्यासाठी ग्रामस्थांचे खूप हाल होत व त्यांच्यामध्ये भांडणतंटाही होत असे. गावात एक तलाव होता पण त्यामधील पाणी अशुध्द असल्यामुळे त्यामधील पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जात नसे. गावात दोन विहिरी व दोन बोअरवेल होते पण पाणी दिवसेंदिवस कमी कमी होऊ लागले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्याचे महत्व व त्याच्या वापराबाबत प्रबोधन केले. ग्रामस्थांच्याकडून १0% लोकवर्गणी जमा केली. या प्रकल्पांतर्गत नवीन योजना न देता शासनाने बळकटीकरणासाठी परवानगी दिली. पूर्वीची हिरण्यकेशी नदी हाच जलस्त्रोत निश्चित करून जॅकवेल दुरूस्ती, जलवाहिन्या दुरूस्ती व आवश्यकता भासेल त्या ठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. साठवण टाकीचीही किरकोळ दुरूस्ती करून त्याचे रंगकाम करण्यात आले. गावातील अंतर्गत जलवाहिन्यांचीही दुरूस्ती, आवश्यक त्या ठिकाणी नवीन जलवाहिन्या व व्हॉल्व बसविण्यात आले. पाणी वितरण कर्मचाऱ्यांना पाणी शुध्दीकरण, ओ.टी. टेस्ट वगैरे बाबत प्रशिक्षण देण्यात आले.

या सर्वांचा **<u>परिणाम</u>** म्हणून ग्रामस्थांना नियमित शुध्द व पुरेशा प्रमाणात पाणी मिळू लागल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिला व पुरूषांचे होणारे हाल थांबले असून त्यांच्यामधील भांडणतंटाही कमी झाला आहे.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये ४९५ खाजगी नळजोडण्या होत्या तर १४ सार्वजनिक नळ होते. गावामधील ८५ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे त्यांना सार्वजनिक नळावरील किंवा विहिरी व बोअरवेलचे पाणी भरण्यासाठी सतत भटकावे लागे त्यामुळे त्यांचा बराचसा वेळ पाण्यासाठी खर्च होत असे. गावामध्ये पाण्याची कमतरता असूनसुध्दा ग्रामस्थांच्यामध्ये पाणी वापराबाबत जागृती नसल्यामुळे आणि बहुतांशी खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात होते. गावामधील काही लोक नळांना वीजपंप बसवून पाणी खेचत असल्यामुळे काही कुटुंबाच्या नळांना पुरेसे पाणी मिळत नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: गावामधील सर्व ग्रामस्थांचे (महिला-पुरूष) पाणी वापराबाबत व स्वतंत्र नळजोडणी घेण्याबाबत प्रबोधन केले. ग्रामस्थांचे योग्य प्रबोधन झाल्यामुळे प्रत्येक कुटुंबाने खाजगी नळजोडणी व काही कुटुंबानी दोन नळजोडण्या घेतल्यामुळे गावात एकूण ५९१ नळजोडणी झाल्या. गावामध्ये एकही सार्वजनिक नळ जोडला नाही. प्रत्येक कुटुंबाकडून नळाला तोटी बसवून पाणी भरून झाल्यानंतर नळ बंद केला जातो. त्यामुळे पाणी वाया जात नाही.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू. ३६० होती तर सार्वजनिक नळासाठी रू. ७५ होती. पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. गावातील पाणीपट्टी वसूलीचे प्रमाण ७५% होते. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्या कुटुंबाची नळजोडणी बंद केली जात असे. गावामध्ये प्रत्येक कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे व १००% पाणीपट्टी वसूली होत नसल्यामुळे देखभाल दुरूस्ती वेळच्यावेळी करणे ग्रामपंचायतीला अशक्य होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** पाणीपट्टी वेळेत भरण्याबाबत ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ५०० करण्यात आली. गावामध्ये एकही सार्वजनिक नळजोडणी नसल्यामुळे सार्वजनिक पाणीपट्टी नाही. पाणीपट्टी वसूली वर्षातून एकदा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जाते. ग्रामस्थांचे योग्य प्रबोधन व पुरेसा पाणीपुरवठा होत असल्यामुळे पाणीपट्टी वसूली समाधानकारक होत आहे.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये १२०० मीटर लांबीच्या गटारी असल्यातरी संपूर्ण गाव गटारमुक्त होण्यासाठी जादाच्या ८०० मीटर गटारीची आवश्यकता होती. गावामध्ये एकच स्वच्छता कर्मचारी असल्यामुळे गटार सफाई वेळच्यावेळी होत नव्हती. त्यामुळे गटारी तुंबून सांडपाणी कुजल्यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरत असे तर काही भागात गटारीच नसल्यामुळे सर्व सांडपाणी रस्त्यावर पसरत असे. गावामध्ये अनेक ठिकाणी उकिरडे असल्यामुळे त्यातील पाला पाचोळा गटारीत पडून गटारी तुंबत असत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले. गावामध्ये प्रकल्पकाळात लोकसहभागातून सर्व गटारींची स्वच्छता व गटारी नसलेल्या भागात सांडपाणी जाण्यासाठी चर खोदण्यात आली. गावामध्ये ३०० मीटर लांबीच्या गटारी बांधण्यात आल्या. प्रबोधनामुळे ग्रामस्थ आपल्या हद्दीतील गटारी तुंबणार नाहीत याची काळजी तर घेतातच पण त्याचबरोबर १-२ महिन्यातून एकदा लोकसहभागातून ग्रामस्वच्छता व गटार स्वच्छता केली जाते शिवाय गावामधील ७५ कुटुंबानी सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी केला आहे.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये ग्रामस्वच्छता कर्मचारी एकच असल्यामुळे रस्त्याची साफसफाई २ ते ३ महिन्यातून एकदा केली जात असे. गावामध्ये एकही कचरा कोंडाळी नसल्यामुळे ग्रामस्थ घरातील सर्व केरकचरा उकिरडयात किंवा रस्त्याच्या कडेला टाकत. गावामध्ये अनेक ठिकाणी उकिरडे असल्यामुळे गावाच्या अस्वच्छतेत भर पडे. ओल्या व सुक्या कचऱ्याचे ढीग वेळोवेळी उचलले जात नसल्यामुळे गावात डासांचे प्रमाण वाढून रोगराईला निमंत्रण मिळे. तरीदेखील ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामस्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे त्यांचे सहकार्य मिळत नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र ग्रामस्थांच्या विशेषत: महिलांच्या कोपरासभा घेऊन घरोघरी स्वच्छता संदेश पोहचवून ग्रामस्वच्छतेबाबत त्यांचे प्रबोधन करण्यात आले. ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेची व ग्रामविकासाची आवड निर्माण व्हावी म्हणून ग्रामविकासाचे आदर्श उपक्रम राबविलेल्या कांबळवाडी (ता.राधानगरी) व जैन्याळ (ता.कागल) या गावांना अभ्यासदौरा आयोजित केला. अभ्यासदौऱ्यामध्ये सहभागी

झालेल्या गावामधील महिला, पुरूष व तरूणवर्गावर सकारात्मक प्रभाव पडल्यामुळे त्यांच्यामार्फत गावामध्ये वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. त्याचबरोबर ग्रामपंचायतीनेही गावात ८ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेवल्या असून त्यातील कचरा वेळच्यावेळी उचलला जात आहे. गावामधील प्रत्येक कुटुंबातील महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन एक प्रकारे ग्रामस्वच्छतेच्या कार्यात आपले योगदान देत आहेत.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये एकूण ५८० कुटुंबापैकी केवळ २९८ कुटुंबाकडे शौचालये होती तर गावामध्ये फक्त दोनच सार्वजनिक शौचालये होती. गावामधील २८२ कुटुंबाकडे शौचालये नसल्यामुळे व सार्वजनिक शौचालयाची संख्याही कमी असल्यामुळे बहुतांशी लोक उघडयावरच शौचास जात. या उघडयावरील हागणदारीमुळे गावाच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. घरी शौचालये नसल्यामुळे महिला व वृध्द व्यक्तींचे खूप हाल होत असत. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्यामुळे शौचालयांची स्वच्छता व वापर व्यवस्थित होत नसे त्यामुळे तो अनेकदा नादुरूस्त असे. काही कुटुंबानी आर्थिक परिस्थीती नसल्यामुळे तर काही कुटुंबानी गावात पाण्याची टंचाई असल्यामुळे शौचालये बांधली नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र ग्रामस्थांचे शौचालय बांधण्याबाबत विविध प्रकारे प्रबोधन करण्यात आले. गावामध्ये आणखी जादा २३१ कुटुंबांनी शौचालये बांधल्यामुळे एकूण ५२९ शौचालये झाली तर गावामधील शौचालय नसणाऱ्या कुटुंबासाठी आणखी १४ सार्वजनिक शौचालये बांधल्यामुळे एकूण १६ सार्वजनिक शौचालये झाली. परिणामी गावातील रोगराईचे प्रमाणही कमी झाले आणि गाव हागणदारीमुक्त झाल्यामुळे गावाला शासनाचा रू. २ लाखाचा निर्मलग्राम पुरस्कारही मिळाला.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिलांच्या सुप्तगुणांचा विकास होण्यासाठी व त्यांना व्यवसायाबाबत मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन केले नसल्याने

महिलांच्यामध्ये आत्मविश्वास कमी होता त्यामुळे बहुतांशी महिला सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत नसत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावामधील महिलांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यावर अधिक भर देण्यात आला. महिलांच्या क्षमता विकासासाठी त्यांना क्षमताबांधणी प्रशिक्षण देण्यात आले. महिलांच्यासाठी व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण, बचत गटाबाबत माहिती आणि विविध व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले. एकूण गावामध्ये राबविण्यात आलेल्या जाणीव जागृती व इतर विविध प्रशिक्षणामुळे महिलांच्यामध्ये आत्मविश्वास व उत्साह निर्माण झाला.

**ब) <u>स्पर्धा</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी फारसे प्रयत्न झाले नव्हते. सार्वजनिक कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याबाबत महिलांना वाटणारी भिती व संकोच कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न झाले नसल्यामुळे गावात आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये महिलांचा सहभाग अतिशय कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर प्रामुख्याने भर देण्यात आला. महिलांच्यामध्ये आत्मविश्वास व धाडस निर्माण होण्यासाठी सुरूवातीला काही कार्यक्रम, प्रबोधनात्मक व्याख्याने आयोजित केली. महिलांच्या सुप्तगुणांना संधी मिळावी म्हणून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सुरूवातीला सर्व स्तरातील महिला निसंकोचपणे स्पर्धेत सहभागी व्हाव्यात म्हणून महिलांच्या स्वतंत्र स्पर्धा आयोजित केल्या. महिला विचारप्रवण बनाव्यात यासाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व काव्य स्पर्धा आयोजित केल्या तसेच निरक्षर व वयोवृध्द महिलांनीही स्पर्धेमध्ये सहभागी होऊन तरूण महिलांना प्रोत्साहित करावे म्हणून उखाणे, जात्यावरील ओव्या वगैरे स्पर्धा आयोजित केल्या. लहानापासून थोरापर्यंत सर्व महिलांनी स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे म्हणून रांगोळी, झिम्मा फुगडी, धावणे वगैरे स्पर्धा आयोजित केल्या. या सर्व स्पर्धांमध्ये गावातील सर्व स्तरातील महिला चांगल्या संख्येने सहभागी झाल्या.

**ब) <u>बचत गट</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये स्वयंसहाय्यता महिला बचत गटांची संख्या २३ होती. अनेक कुटुंबातील महिला बचत गटामध्ये सहभागी झाल्या नव्हत्या. हया महिलांनी बचत गट स्थापन करावा यासाठी विशेष असे प्रयत्न केले नव्हते. गावामध्ये सुरू

असलेल्या बचत गटातील महिलांनाही योग्य मार्गदर्शन व दिशा मिळत नसल्यामुळे त्यांच्यामध्येही मरगळ आली होती. गावातील सर्व बचत गट एकत्र येऊन आदर्श उद्योग समुहाला भेटी देणे किंवा सामुहिक कार्यक्रमाचे आयोजन करणे यासारखे उपक्रम राबविले जात नव्हते. बचत गटातील महिलांच्यासाठी गावात व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित केले नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील प्रत्येक घराघरापर्यंत महिला बचत गटाची संकल्पना पोहचविणे व महिलांना बचत गट स्थापन करण्याबाबत प्रशिक्षण देण्याचे काम महिला विकास समितीने व सहाय्यकारी संस्थेने सुरू केले. गावामध्ये पूर्वीपासून सुरू असलेल्या बचत गटातील महिलांना एकत्र करून त्यांच्या बचत गटाच्या स्थितीची व कामकाजाची माहिती घेतली. त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. पूर्वीपासून सुरू असणाऱ्या बचत गटातील महिलांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. इतर महिलांनाही बचत गटाचे महत्व पटवून देऊन त्यांना बचत गट स्थापन करण्यास प्रोत्साहन व मदत केली. सर्व बचत गटांचा एक महासंघ बनवून त्यांच्यामार्फत गावात ग्रामस्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्याबाबत जागृती करण्यात आली. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून केलेल्या जागृतीमुळे गावात नवीन २८ बचत गट स्थापन होऊन एकूण ५१ बचत गट कार्यरत झाले.

### ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये ग्रामविकास कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत उदासिनता होती. दुर्बल घटकातील लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायतीकडून अपेक्षित असे प्रयत्न झाले नव्हते. दुर्बल घटकातील सर्व लोकांच्यामध्येही एकजूट व जाणीव जागृती नसल्यामुळे त्यांचे प्रश्न सुटू शकले नव्हते. दुर्बल घटकातील बहुसंख्य लोक आपले प्रश्न मांडण्यासाठी किंवा ग्रामविकास कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी कधीही ग्रामसभेमध्ये जात नव्हते. बहुसंख्य लोकांना त्यांच्यासाठी असणाऱ्या पिण्याचे पाणी, शौचालये, बचत गट व शिक्षण वगैरेबाबत शासनाकडून मिळणा-या सोयी सवलतींची पुरेशी माहिती नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकातील लोकांचे सक्षमीकरण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. स्त्री-पुरूषांना एकत्र

करून त्यांच्यासाठी शासनाच्या असणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती देण्यात आली. दुर्बल घटकातील कुटुंबाना शौचालये बांधण्यासाठी असणारे शासनाचे अनुदान मिळवून देण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्पाच्या समितीच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत करण्यात आली. महिलांचे प्रबोधन करून स्वतंत्र बचत गट स्थापन करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांचे जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून चांगले प्रबोधन झाल्यामुळे ग्रामसभेमध्ये त्यांची उपस्थिती वाढली, तसेच हळूहळू ते ग्रामविकास कार्यामध्येही सहभागी होऊ लागले. दुर्बल घटकातील सर्वांना शुध्द व स्वच्छ पाणी मिळू लागले आहे.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातून व शासनाच्या अनुदानातून गावात विविध विकासकामे जरी झाली असली तरी त्याची सर्व माहिती ग्रामस्थांच्यापर्यंत पोहचत नव्हती. ग्रामस्थांच्यामध्येही फारशी जागृती नसल्यामुळे ग्रामविकासासाठी शासनाकडून किती अनुदान आले? त्या अनुदानातून कोणती विकासकामे झाली? याबाबत सखोल माहिती मागितली जात नव्हती. ग्रामविकासाच्या कार्यात गावातील सर्व लोक एकजूटीने सहभागी होत नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीपासूनच ग्रामस्थांच्या कोपरासभा व सभा घेऊन त्यांचे विविध प्रकारे प्रबोधन करण्यात आले. गावात वारंवार ग्रामसभा घेऊन त्यामध्ये ग्रामविकास कामाबाबत सर्वानुमते निर्णय घेतले जाऊ लागले. शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची माहिती सर्वांच्यापर्यंत पोहचविली जाऊ लागली.

**जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाला खालीलप्रमाणे अनुदान मिळाले**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,३९,१५0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ४१,0५,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,0७,७५0=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ४,८८,६२0=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000=00 |
| ६. | तंटामुक्त गाव पुरस्कार (जाहीर) | ४,00,000=00 |
| | **एकूण** | **५६,४0,५२0=00** |

## २ . कडगाव - ( तालुका - भुदरगड )

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - नोव्हेंबर २००६ व हस्तांतरीत तारीख - एप्रिल २००९ )**

**१ . <u>लोकसंख्या</u> :-**

कडगाव या गावची एकूण लोकसंख्या २९९८ असून त्यामध्ये १५४३ स्त्रिया व १४५५ पुरूष आहेत . तसेच एकूण ६00 कुटुंबसंख्या असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ११५ आहे .

**२ . <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-** कडगावची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे . ग्रामपंचायतीकडे ३ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ पाणी वितरण कर्मचारी आहेत . तथापि ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा मात्र नाही .

ग्रामपंचायत समितीतील एकूण सदस्य संख्या ९ असून ३ स्त्री सदस्य व ६ पुरूष सदस्य आहेत . ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच पदावर खुल्या प्रवर्गातील पुरूषच असून त्यांचे शिक्षण अनुक्रमे बी . ए . व २ री झालेले आहे .

**३ . <u>अभ्यासदौरा</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कडगाव गावातील तरूण मंडळे, महिला व इतर ग्रामस्थ ग्रामविकास कार्यात सहभागी व्हावीत आणि त्यांच्यामध्ये जाणीव जागृती व्हावी म्हणून त्यासाठी अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता . गावातील तरूण मंडळाचा ग्रामविकास कार्यात सहभाग खूप कमी होता . गावातील महिला व इतर ग्रामस्थांची ग्रामसभा, ग्रामस्वच्छता वगैरे कार्यक्रमाप्रसंगी उपस्थिती खूपच कमी होती . लोकांच्यामध्ये स्वच्छता, जलसंवर्धन, महिला सक्षमीकरण, इ . बाबत विशेष जागृती नव्हती .
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र सर्व ग्रामस्थांच्यामध्ये पर्यावरणविषयक व आरोग्यविषयक, जनजागृती करण्यासाठी प्रयत्न सुरू केले . गावातील लोकांना ग्रामविकासाबाबत आवड निर्माण व्हावी, त्याचे महत्त्व कळावे म्हणून ग्रामस्वच्छता, महिला सक्षमीकरण वगैरे विषयात आदर्श ठरलेल्या कांबळवाडी (तालुका राधानगरी) या गावाला अभ्यासदौरा आयोजित केला .

या सर्वांचा **परिणाम** म्हणून अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील महिला, तरूण व विविध सेवाभावी संस्थाचे सदस्य व जलस्वराज्य समिती सदस्य सहभागी झाले. कांबळवाडी गावातील ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सौरउर्जा प्रकल्प वगैरे उपक्रम पाहून ग्रामस्थ प्रभावित झाले. अभ्यासदौऱ्यानंतर गावातील ग्रामसभांना महिला व तरूणांची उपस्थिती वाढली. गावात महिला बचत गटांची संख्याही वाढू लागली. ग्रामस्वच्छता, लोकवर्गणी गोळा करणे व लोकांचे शौचालय बांधण्याबाबत प्रबोधन करण्याच्या कामी गावातील तरूण मंडळाची व महिलांची मदत मिळू लागली. सामान्य ग्रामस्थही शौचालय बांधून घेऊन सहकार्य करू लागले.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात १ कि.मी.अंतरावरील वेदगंगा नदीवरून नळपाणीपुरवठा योजना राबविली होती. सदर नळपाणीपुरवठा योजना जुनी असल्यामुळे जॅकवेल नादुरूस्त, मुख्य जलवाहिनीना वारंवार गळती व साठवण टाकीस मोठी गळती असल्यामुळे ग्रामस्थांना पूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत नव्हता तर उंचवटयावरील नळांना खूपच कमी पाणी मिळत असे. ग्रामस्थांना दोन दिवसातून एकदाच पण तेही अपूरे पाणी मिळत असल्यामुळे ते वारंवार ग्रामपंचायतीकडे तक्रार करीत असत. गावात केवळ १ लाख लिटर क्षमतेची साठवण टाकी होती. पण तिलाही मोठी गळती असल्यामुळे ४0 टक्के पाणी वाया जात असे. गावात जलशुध्दीकरण केंद्र नसल्यामुळे पाणी शुध्दीकरणासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचाच वापर केला जात असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांनी वेदगंगा नदी हाच जलस्त्रोत निवडला व जुन्या जॅकवेलची दुरूस्ती केली. ज्या मुख्य जलवाहिन्यांना वारंवार गळती होत होती त्या काढून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. गावातील जुन्या साठवण टाकीला खूपच गळती असल्यामुळे त्यामध्ये दुरूस्ती न करता २ लाख लिटर क्षमतेची नवीन साठवण टाकी बांधण्यात आली. गावामधील आवश्यक तेथील जलवाहिन्या बदलून नवीन टाकण्यात आल्या. पाणी शुध्दीकरणासाठी मात्र टी.सी.एल. पावडरचाच वापर करण्यात येत आहे. गावात सर्व ठिकाणी समान पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थ समाधानी आहेत.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात एकूण ३५0 खाजगी नळजोडण्या व ७ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावातील बहुतांशी खाजगी व सर्व सार्वजनिक नळांना तोटया नसल्यामुळे पाणी वाया जात होते. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी वापराबाबत जागृती नव्हती. ज्या घरात नळ नाही अशा कुटुंबाना व ज्या उंचवटयावरील नळांना पुरेशा दाबाने पाणी येत नव्हते अशा कुटुंबातील सदस्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यामुळे गावात ४१६ खाजगी नळजोडण्या झाल्या तर १0 सार्वजनिक नळजोडण्या जोडल्या आहेत. प्रबोधनामुळे ग्रामस्थांनी खाजगी नळांना तोटी बसविली असून सार्वजनिक नळाचेही तोटीद्वारेच पाणी भरले जाऊ लागल्यामुळे पाणी वाया जाणे थांबले. ग्रामस्थांना समान दाबाने व पुरेसा पाणीपुरवठा होऊन त्यांची पाण्यासाठीची वणवण थांबली आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू.३६0 तर सार्वजनिक पाणीपट्टी रू.७५ होती. पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. गावाची पाणीपट्टी वसूली ६0 % होती. गावाला समाधानकारक पाणीपुरवठा होत नसल्यामुळे व ग्रामस्थांच्यामध्ये जागृती नसल्यामुळे १00% पाणीपट्टी वसूली होत नव्हती. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यांची नळजोडणी तात्पुरत्या काळासाठी बंद करावी अशी तरतुद असली तरी त्याचा प्रभावीपणे वापर केला जात नव्हता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीपासूनच पाणी वापराबाबत, पाणीपट्टी दराबाबत व पाणीपट्टी वेळच्यावेळी भरण्याबाबत ग्रामस्थांचे चांगल्या प्रकारे प्रबोधन करण्यात आले. ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू.४00 व सार्वजनिक पाणीपट्टी रू.१५0 ठरविण्यात आली असून पाणीपट्टी वसूली वर्षातून एकदा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जाते. पाणीपट्टी वेळेत न भरणा-या ग्रामस्थांची नळजोडणी रद्द करण्याची कारवाई काटेकोरपणे करण्याचे ग्रामसभेमध्ये ठरले आहे. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांना शुध्द व पुरेसे

पाणी नियमितपणे मिळू लागल्यामुळे व पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर प्रभावीपणे कारवाई केली जाऊ लागल्यामुळे ९५% पाणीपट्टी वसूली होत आहे.

५. <u>आरोग्य</u> -

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये एकूण ७०० मीटर लांबीच्या गटारी होत्या व जवळपास जादाच्या ७०० मीटर गटारींची आवश्यकता होती. गावातील ज्या भागात गटारीच नव्हत्या तेथील ५०% भागात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदल्या होत्या पण उर्वरित भागात कोणतीच व्यवस्था केली नसल्यामुळे सांडपाणी सर्वत्र पसरले जाऊन दलदल व डासांचा प्रादुर्भाव वाढत असे. कडगावामध्ये तीन स्वच्छता कर्मचारी असले तरी संपूर्ण गावातील गटारींची स्वच्छता करण्यात ते कमी पडत असल्यामुळे गावातील विविध भागात गटारी तुंबलेल्या असत व ज्या गटारी उपसलेल्या असत तो कचरा दिर्घकाळ तसाच पडलेला असल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये नाराजी असे. ग्रामस्थांच्यामध्येही सार्वजनिक स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे सामुदायिक ग्रामस्वच्छता किंवा गटारस्वच्छता कार्यक्रम आखले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे व ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक स्वच्छतेबाबत व्याख्यान व माहितीपट याव्दारे प्रबोधन करून लोकसहभागातून गावात ग्रामस्वच्छता कार्यक्रम राबवून गटारी सफाई व गटारी नसलेल्या भागात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदण्यात आल्या. गावामध्ये जादा ३०० मीटर गटारी बांधण्यात आल्या. गावामध्ये कोठेही सांडपाणी तुंबून दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव होणार नाही याची खबरदारी ग्रामस्थ व ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारीही घेऊ लागले.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्ता सफाई व कचरा उचलण्याचे काम केवळ ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यामार्फतच केले जात होते पण ग्रामस्वच्छता कर्मचारी संख्येने कमी असल्यामुळे ते काम समाधानकारक व वेळच्यावेळी होत नव्हते. गावामध्ये ग्रामपंचायतमार्फत एकाही ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळी ठेवली नसल्यामुळे ग्रामस्थ सर्व प्रकारचा केरकचरा उकिरडयात व रस्त्याच्या कडेला टाकत. रस्त्याच्या कडेला

टाकलेला केरकचरा वेळेत न उचलल्यामुळे वारा व जनावरांच्यामुळे तो सर्वत्र पसरून संपूर्ण गाव अस्वच्छ दिसत असे तसेच ओला कचरा कुजत असल्याने दुर्गंधी व रोगराई पसरत असे. बहुतांशी ग्रामस्थांचा पशूपालन हा व्यवसाय असल्यामुळे घराशेजारीच जनावरांचे गोठे व उकिरडे असत. त्यामुळे गावाच्या अस्वच्छतेत भरच पडे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे विविध प्रकारे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले व ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांनाही योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले.

याचा **परिणाम** असा झाला की, गावातील तरूण मंडळे, महिला बचतगट व इतर स्त्री -पुरूष ग्रामस्वच्छता कार्यक्रमात सामुदायिक व उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागले. ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांमध्येही जागृती होऊन वेळच्यावेळी ग्रामस्वच्छता व कचरा उचलण्याचे काम केले जाऊ लागले. गावातील काही नागरिकांनी आपल्या मालकीचे उकिरडे गावाबाहेर नेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमास हातभार लावला. गाव नेहमीच स्वच्छ व सुंदर राहू लागल्यामुळे गावातील रोगराईचे प्रमाण कमी झाले.

**क) शौचालय :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये केवळ २२० वैयक्तिक शौचालये व ६ सार्वजनिक शौचालये होती. गावामधील ३ शाळामध्ये शौचालयाची सोय होती पण अंगणवाडयामध्ये शौचालय सुविधा नव्हती. ग्रामस्थांचे योग्य प्रकारे प्रबोधन झाले नसल्यामुळे त्यांची शौचालय बांधण्याची मानसिकता नव्हती. त्यामुळे गावातील ५० हून अधिक कुटुंबे उघडयावर शौचास जात असल्यामुळे रोगराईचे प्रमाण जास्त असे. बहुतांशी ग्रामस्थांचे शौचालयास खर्च जास्त येतो, पाणी खूप लागते, दुर्गंधी पसरते वगैरे समज-गैरसमज होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व ग्रामस्थांच्या घरोघरी जाऊन कोपरासभा घेऊन, अभ्यासदौरे काढून, माहितीपट दाखवून शौचालयाचे महत्त्व व शौचालयाबाबत असणारे गैरसमज दूर करण्यात आले. त्यांना शौचालय बांधण्यासाठी कर्जरूपाने आर्थिक सहकार्य करण्यात आले.

याचा परिणाम म्हणून गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्पकाळात ३५५ कुटुंबानी वैयक्तिक शौचालये बांधली. ग्रामपंचायतीमार्फत १३ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. गावामधील ज्या ३ अंगणवाडयामध्ये शौचालय नव्हते तेथेही ३ शौचालये

बांधण्यात आली. गावातील सर्वच लोक शौचालयाचा नियमित वापर करू लागले. घरोघरी शौचालय झाल्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत झाली तसेच गावातील स्त्रिया, वृध्द व आजारी व्यक्तींचे होणारे हाल थांबले. सन २००८ मध्ये ग्रामपंचायतीला शासनाचा रू.२ लाखाचा निर्मलग्राम पुरस्कारही मिळाला आहे.

## ६. महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिला ग्रामसभेमध्ये किंवा ग्रामविकास कार्यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होत नव्हत्या. त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती तर अतिशय कमी होती. गावातील महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध सोयीसुविधांची माहिती दिली जात नव्हती. गावातील महिलांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा व त्यांच्यामधील क्षमतांचा विकास व्हावा म्हणून विशेष असे प्रयत्न किंवा त्यांना प्रशिक्षण दिले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. गावातील महिलांना शासकीय योजनांचे माहिती प्रशिक्षण, पंचायत राज्य व व्यवसायविषयक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच बचत गट नोंदी(रेकॉर्ड) ठेवणे, स्त्री-पुरूष समभाव, किशोरी मार्गदर्शन वगैरे स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात आले. विविध प्रशिक्षण व महिलांच्यामध्ये केलेल्या जागृतीमुळे त्यांचा व्यक्तीमत्व विकास होऊन त्यांच्यात सांघिकभाव वाढीस लागला.

### ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये स्पर्धात्मक विकास व्हावा यासाठी प्रयत्न झाले नव्हते. महिलांच्या विकासासाठी गावामध्ये कुशल असे स्त्री नेतृत्व नव्हते. महिलांना स्पर्धेत भाग घेण्यास संकोच व भिती वाटत असल्यामुळे शाळकरी मुलींचा अपवाद वगळता गावातील इतर महिला सहसा स्पर्धेमध्ये सहभागी होत नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या घरोघरी जाऊन, त्यांच्या कोपरा सभा घेऊन त्यांचे विविध प्रकारे प्रबोधन करण्यात आले. गावातील महिलांच्यामध्ये धाडस निर्माण व्हावे म्हणून प्रकल्पाच्या सुरूवातीला केवळ महिलांच्या साठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमुळे व वारंवार आयोजित केलेल्या कार्यक्रमामुळे महिलांच्यामधील पुरूषांच्याबरोबरीने काम करण्याबाबत व स्पर्धेत सहभागी होण्याबाबत असणारी पारंपारिक भिती कमी झाली.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिला बचत गटाची संख्या केवळ १२ होती पण या बचत गटामध्येही सतत संपर्क नसल्यामुळे एकजिनसीपणा नव्हता. या बचत गटाच्या माध्यमातून गावात विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जात नव्हते. गावातील बचत गटांची संख्या वाढावी यासाठीही कोणाकडूनही जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नव्हते. बचत गटातील महिलांना व्यवसाय करण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन केले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमताः महिला बचत गटाबाबत गावामध्ये असणाऱ्या जागृतीचा व बचत गटातील प्रगतीचा आढावा घेतला. महिला बचत गट संकल्पना गावातील घराघरापर्यंत पोहचविण्यासाठी व प्रत्येक घरातील किमान एक तरी महिला बचत गटामध्ये सहभागी होण्यासाठी महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेने गृहभेटी, बैठका व महिला ग्रामसभांच्या माध्यमातून महिलांचे प्रबोधन केले. महिलांचे चांगले प्रबोधन झाल्यामुळे व महिलांना बचत गटांचे महत्त्व पटल्यामुळे गावात नवीन २३ महिला बचत गट स्थापन झाले. परिणामी गावात एकूण ३५ महिला बचत गट कार्यरत झाले. गावातील जुन्या व नवीन बचत गटातील महिलांना बचत गट नोंदी (रेकॉर्ड) ठेवण्याबाबत व व्यवसायाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. गावातील सर्व बचत गटांचा एक महासंघ बनवून त्यांच्यामार्फत गावातील लोकवर्गणी गोळा करणे, स्वच्छता व पाणी वापराबाबत ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले.

### ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल असणारी गावातील बहुतांशी कुटुंबे ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होत नव्हती. त्यांची ग्रामसभामधील उपस्थिती ही अतिशय कमी होती. दुर्बल घटकातील महिलांच्या बचत गटांची संख्याही अगदी कमी होती. दुर्बल घटकातील लोकांना शासकीय योजनांची माहिती व शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नव्हत्या. दुर्बल घटकांच्या विकासासाठी विशेष करून प्रयत्न झाले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानतर** गावातील दुर्बल घटकातील लोकांनाही ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकातील स्त्री व पुरूषांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विशेष सोयी

सवलतीची माहिती देऊन त्याचा त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्यात आले. हेतुपूर्वक दुर्बल घटकातील महिलांचे बचत गट स्थापन करून त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले. दुर्बल घटकातील बहुतांशी लोकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळू लागले असून त्यांना स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्त्व पटल्यामुळे त्यांच्यामधील बहुतांशी कुटुंबानी स्वतंत्र शौचालये बांधून त्यांचा ते नियमित वापर करू लागले. दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकास प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढत आहे.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात अनेक शासकीय योजना राबविल्या असल्यातरी त्यामध्ये ग्रामस्थांचा सहभाग हा खूपच कमी होता. तसेच ग्रामस्थांना जाणीवपूर्वक ग्रामविकास प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी व योजनेच्या प्रत्येक टप्प्याची माहिती देण्यासाठी प्रयत्न केले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व घटकांना (महिला, तरूण मंडळे, दुर्बल घटक इ.) ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी, त्यांच्यापर्यंत योजनेची संपूर्ण माहिती पोहचविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले तसेच योजनेचा प्रत्येक निर्णय ग्रामसभेमध्ये सर्वानुमते घेण्यात आल्यामुळे शासनाकडून आलेल्या सर्व अनुदानाचा व गावातून जमा केलेल्या लोकवर्गणीचा योग्य विनियोग झाला असल्याचे दिसून येते.

**जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावाला शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,२२,८०० =00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ५४,३५,000 =00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,३४,५00 =00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (१0%) | ६,२५,६७0 =00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000 =00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान (मंजूर) | ७,00,000 =00 |
| | **एकूण** | **७४,१७,९७0 =00** |

# ३. करडवाडी ( तालुका - भुदरगड )

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - २००६ व हस्तांतरीत तारीख - मार्च २००९)**

१. <u>लोकसंख्या</u> :-

करडवाडी गावची एकूण लोकसंख्या ११५७ असून त्यामध्ये ५८७ स्त्रिया व ५७0 पुरूष आहेत. तसेच गावात एकूण २६५ कुटुंबसंख्या असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ६८ आहे.

२. **<u>ग्रामपंचायतीची माहिती :-</u>** करडवाडी ग्रामपंचायतीची स्वतःची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. ग्रामपंचायतीकडे एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व पाणी वितरण कर्मचारी नाही. तसेच ग्रामपंचायतीकडे संगणक सुविधादेखील नाही.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण 0७ सदस्य असून त्यामध्ये २ स्त्री सदस्य व ५ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) प्रवर्गातील महिलेकडे असून त्यांचे शिक्षण १0 वी आहे. तर उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील महिलेकडे असून त्या निरक्षर आहेत.

३. <u>अभ्यासदौरा :-</u>

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** करडवाडी गावात ग्रामविकासाच्या उद्देशाने ग्रामस्थांच्यामध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला नाही. ग्रामविकासामध्ये आदर्श निर्माण केलेल्या गावाला ग्रामस्थांचा अभ्यासदौराही आयोजित केला नसल्यामुळे ग्रामसभांना ग्रामस्थांची उपस्थिती खूपच कमी असे. महिलांच्यामध्येही फारशी जागृती नसल्यामुळे महिला बचत गटांची संख्या व ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग खूपच कमी होता. ग्रामस्वच्छता, महिला सक्षमीकरण व हागणदारीमुक्त गाव या सारख्या बाबीकडे ग्रामपंचायतही गांभीर्याने पहात नव्हती. गावातील तरूण मंडळांचा ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग खूपच कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीच्या टप्प्यात समितीच्या व सहाय्यकारी संस्थेच्या मदतीने गावातील तरूण मंडळांना, महिलांना व ग्रामस्थांना एकत्र करून त्यांच्यामध्ये ग्रामविकासाची संकल्पना रूजविण्याचा प्रयत्न केला.

गावातील शाळा व अंगणवाडीमधील शिक्षक व विद्यार्थ्यांच्यामध्येही जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण या सर्वाला लोकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. ग्रामस्थांच्यामध्ये एकूण हया कामाविषयी उदासिनता जाणवली म्हणून गावातील ग्रामस्थ, तरूण मंडळे, महिला व शिक्षक यांना सहभागी करून घेऊन जैन्याळ (ता.कागल) कांबळवाडी (ता.राधानगरी) या ग्रामविकासामधील आदर्श गावांना अभ्यासदौरा आयोजित केला.

याचा **परिणाम** असा झाला की, अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील ग्रामस्थ, शिक्षक, तरूण मंडळांचे कार्यकर्ते व महिला उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या. आदर्श गावातील विकासकामे पाहून सर्वांच्यामध्ये चैतन्य निर्माण झाले. अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामसभा व ग्रामविकास कार्यक्रमातील ग्रामस्थ, तरूण व महिलांची उपस्थिती वाढली. तसेच गावात महिला बचत गटांची संख्या वाढू लागली. गावातील शौचालयांची संख्या वाढली व वारंवार सामुदायिक स्वच्छता कार्यक्रमही आयोजित केले जाऊ लागले.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात नदीवरून नळपाणी पुरवठा योजना सुरू होती. सदर नळपाणी पुरवठा योजना जुनी असल्यामुळे अनेक कारणाने ती नादुरूस्त होत असे त्यामुळे ग्रामस्थांना दोन ते तीन दिवसातून एकदा पाणी मिळत असे. गावातील लोकांना पाण्यासाठी बोअरवेल व विहिरींना जावे लागे. गावात पाणी शुध्दीकरणासाठी जलशुध्दीकरण केंद्र नसल्यामुळे केवळ टी.सी.एल. पावडर व तुरटीचा वापर केला जात असे. गावात केवळ ३0,000 लिटर क्षमतेचा जलकुंभ होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून गावापासून ४५00 मीटर अंतरावरील वेदगंगा नदीवरून नळपाणी पुरवठा योजना आणली. गावातील लोकांचे पिण्याच्या पाण्याच्या वापराबाबत प्रबोधन करण्यात आले. गावात ५0 हजार लिटर क्षमतेचा नवीन जलकुंभ बांधण्यात आला. गावातील नादुरूस्त झालेल्या पाणी वितरण वाहिन्या बदलण्याबरोबरच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना पाणी शुध्दीकरणाबाबत व वितरणाबाबत योग्य प्रशिक्षणही देण्यात आले. गावात पाणी शुध्दीकरणासाठी योग्य प्रतिच्या टी.सी.एल. पावडरचा वापर केला जाऊ लागला.

या सर्वांचा **परिणाम** म्हणून ग्रामस्थांना प्रतिदिनी व प्रतिमाणसी नियमित ४० लीटर शुध्द पाणी मिळत असल्यामुळे ते समाधानी असल्याचे आढळले.

ब) **नळजोडणी** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २६५ कुटुंबापैकी केवळ १२५ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती. गावात केवळ दोन सार्वजनिक नळजोडण्या असल्यामुळे स्वतंत्र नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्यांना पाण्यासाठी सातत्याने भटकंती करावी लागे. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याच्या वापराबाबत जाणीव जागृती नसल्यामुळे नळांना तोटी नसणे व वारंवार पाईप गळती यामुळे पाणी वाया जात असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे पाणी वापराबाबत व नवीन नळजोडणी घेण्याबाबत सातत्याने प्रबोधन केले जाऊ लागल्यामुळे गावातील स्वतंत्र नळजोडणी वाढत जाऊन ती २०५ पर्यंत गेली. गावात स्वतंत्र नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबाची संख्या ६० असली तरीही केवळ एकच सार्वजनिक नळजोडणी ठेवण्यात आली. ग्रामस्थांचे पाणी वापरबाबत प्रबोधन केले असून प्रत्येकांनी नळांना तोटी बसविली आहे व पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेतली आहे. ग्रामपंचायत कर्मचारीही नळजोडणी देत असताना ती गळती होऊन पाणी प्रदूषित होणार नाही याची काळजी घेतात.

क) **पाणीपट्टी व मीटर पध्दती** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टीचा दर रू. ३६० होता तर सार्वजनिक नळजोडणी दर रू. ७५ होता. गावातील पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. गावात ६०% पाणीपट्टी वसूली होत असे. पाणीपट्टी वेळेत न देणा-यांना दाखले दिले जात नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी दर रू. ३६० च आकारण्यात आला असून गावातील पाणीपट्टी वसूलीचे काम ग्रामपंचायती कर्मचाऱ्यामार्फत केले जाते. पाणीपट्टी वेळेत न देणाऱ्या ग्रामस्थांची नळजोडणी ताबडतोब रद्द करावी असा ग्रामसभेत निर्णय घेण्यात आला आहे.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील विविध भागात एकूण ७00 मीटर लांबीच्या गटारी असल्या तरी आणखी जादा ८00 मीटर लांबीची गटारीची आवश्यकता होती. गावात गटार नसलेल्या भागातील सांडपाणी रस्त्यावरील खडड्यामध्ये साठत असे. गावात एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे गटार स्वच्छता वेळोवेळी होत नसे. परिणामी गटार तुंबून दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढत असे. गावात कोठेही बंदिस्त गटारी नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन आपले घर व आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केल्यानंतर हळूहळू ग्रामस्थही चांगला प्रतिसाद देऊ लागले. ग्रामपंचायतही गावातील गटारी तुंबणार नाहीत याबाबत दक्ष राहू लागली. ग्रामस्थांच्या सहकार्याने गावात वारंवार सामुदायिक स्वच्छता कार्यक्रम राबविले जाऊ लागले. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावात ३00 मीटर लांबीच्या गटारी बांधण्यात आल्या असून ज्या भागात गटारी नाहीत तेथे सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढण्यात आल्या.

ब ) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत केले जात असे. ग्रामपंचायतीकडे एकही स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे वेळोवेळी ग्रामस्वच्छता होत नसे. त्यामुळे रस्ते अस्वच्छ व जागोजागी कचऱ्याचे ढीग असत. गावात कोठेही कचरा कोंडाळी नसल्यामुळे लोक रस्त्याच्या कडेला व मोकळया जागेत सर्व प्रकारचा कचरा टाकत असत. गावातील बहुतांशी ग्रामस्थांचा पशुपालन हा व्यवसाय असल्यामुळे घराशेजारीच जनावरांचे गोठे व उकिरडे असत. ग्रामस्थांच्यामध्येही ग्रामस्वच्छतेसंबंधी फारशी जागृती नसल्यामुळे सामुदायिक स्वच्छता कार्यक्रम सहसा आयोजित केले जात नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र ग्रामस्थांच्या कोपरा सभा व बैठका घेऊन त्यांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटवून सांगण्यात आले त्यांचे प्रबोधन केल्यानंतर हळूहळू ग्रामस्थही चांगला प्रतिसाद देऊ लागले. श्रमदानातून ग्रामविकास केलेल्या गावांना ग्रामस्थांचा अभ्यासदौरा आयोजित केला. गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट व शाळांच्या माध्यमातून सामुदायिक ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात

आले. गावात कोठेही जास्त काळ कचरा साचून राहू नये म्हणून ग्रामपंचायतीमार्फत तो वेळोवेळी उचलला जाऊ लागला. शाळेतील विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व सांगून शाळामार्फत ग्रामस्वच्छता कार्यक्रम राबविले जाऊ लागले.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ ४0 कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती. गावात एकही सार्वजनिक शौचालय नव्हते. गावातील शौचालय नसणाऱ्या कुटुंबातील लोकांचे शौचालय बांधण्याबाबत फारसे प्रबोधन झाले नव्हते. उघडयावर शौचास जाण्यामुळे गावात आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील ग्रामस्थांचे व विशेषता महिलांचे कोपरासभा व बैठका घेऊन शौचालय बांधण्यासाठी प्रबोधन केले. भिंतीवरील घोषवाक्ये, पोष्टर, माहितीपट व व्याख्यानाद्वारे वारंवार ग्रामस्थांना शौचालय बांधण्यासाठी आवाहन करण्यात आले. गरजूंना शौचालय बांधण्यासाठी लागणारी मदत करण्यात आली.

याचा **<u>परिणाम</u>** म्हणून गावात नवीन १४५ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली तर २ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. गावात दोन ते तीन गरीब कुटुंबामध्ये एक शौचालय बांधून त्यांचा ते नियमित वापर करू लागले. गाव हागणदारीमुक्त होण्यासाठी व लोकांचे प्रबोधन करण्यासाठी गावातील महिला बचत गट शाळेमधील शिक्षक व अंगणवाडी सेवकांची मोलाची मदत झाली आहे. गावातील प्रत्येक शाळा व अंगणवाडीमध्येही शौचालयाची सुविधा आहे. गावाला १ लाख रूपयाचे निर्मलग्राम पारितोषिक मिळाले आहे.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

### अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नव्हते. गावातील महिलांच्या विकासासाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नव्हते. महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या कल्याणकारी योजना व सोयीसुविधाबाबत माहिती नव्हती. शिवाय त्यांच्यामध्ये समन्वय व आत्मविश्वासाचा अभाव होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर प्रामुख्यांने लक्ष केंद्रित करण्यात आले. महिलांना एकत्रित करून त्यांना पाणी, स्वच्छता व आरोग्य यासारख्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांच्यासाठी शासकीय योजनांची माहिती, पंचायत राज्य प्रशिक्षण, व्यवसायविषयक प्रशिक्षण वगैरे विविध प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून गावातील महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या अनेक शासनाच्या सोयी सुविधांची माहिती झाली व त्याचा बहुतांशी महिलांनी विविध कारणासाठी लाभही घेतला. प्रशिक्षणाच्या माध्यमातून गावातील महिलांच्यामध्ये जागृती व आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांना एकत्र आणणे, त्यांना विविध कार्यक्रमात सहभागी करून घेणे वगैरेसाठी फारसे प्रयत्न झाले नव्हते. महिलांच्यामधील सुप्त गुणांना संधी मिळावी व सार्वजनिक कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याबावत असणारी भिती कमी व्हावी म्हणून त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले गेले नव्हते. गावात विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या स्पर्धामध्ये महिलांचा सहभाग हा खूपच कमी असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र गावातील महिलांच्यामध्ये जागृती निर्माण करीत असतानाच त्यांच्यामध्ये मोकळेपणा निर्माण होण्यासाठी व त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण होण्यासाठी जाणीवपूर्वक विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गावातील जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून खास महिलांच्यासाठी झिम्मा - फुगडी, रांगोळी, धावणे, संगीत खुर्ची वगैरे स्पर्धा आयोजित केल्या त्यामध्ये उत्स्फूर्तपणे महिलांनी सहभाग घेतला. स्पर्धामधील सहभागी महिलांच्यामध्ये धाडस निर्माण झाले तर इतर महिलांना स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळाली. हळूहळू गावातील विविध स्पर्धामध्ये महिला पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या.

ब) बचत गट :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वयंसहाय्यता महिला बचत गटांची संख्या केवळ ७ होती. गावातील घराघरापर्यंत बचत गट संकल्पना पोहचली नव्हती. गावातील महिलांना बचत गटाचे महत्व सांगून बचत गट स्थापन करण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले नव्हते. गावातील स्थापन झालेल्या बचत गटातील महिलांना योग्य मार्गदर्शन व

सहकार्य मिळत नव्हते. गावातील बचत गटांचे वारंवार सामुहिक कार्यक्रम होत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** घरोघरी जाऊन महिलांच्यामध्ये बचत गटाबाबत जागृती करण्याचे काम महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेने केले. गावातील महिलांच्या बैठका, कोपरासभा व महिला मेळावे आयोजित करून त्यांना विविध प्रकारची माहिती देण्यात आली. गावात नवीन बचत गट स्थापन करण्यासाठी महिलांना सर्वतोपरी मदत करण्यात आली. गावातील जुन्या व नव्या महिला बचत गटातील महिलांना विविध क्षमताविकास व व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले. गावातील व्यवसाय इच्छुक महिलांना जलस्वराज्य प्रकल्पामार्फत बीज भांडवल देण्यात आले.

## ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकातील लोकांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग खूप कमी होता. दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती खूप कमी होती. दुर्बल घटकातील लोकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले जात नव्हते. दुर्बल घटकातील बहुतांशी लोक पिण्याचे पाणी, शौचालये, रस्ते वगैरे सुविधापासून वंचित होते. दुर्बल घटकातील बहुतांशी महिलापर्यंत बचत गटांची संकल्पनाही पोहचली नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या उद्दिष्टाप्रमाणे दुर्बल घटकातील लोकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी त्यांच्या बैठका, कोपरासभा घेऊन जागृती करण्यात आली. दुर्बल घटकातील महिलांचे प्रबोधन करून त्यांना बचत गट स्थापन करण्याविषयी प्रवृत्त करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांना शौचालये बांधण्यासाठी प्रवृत्त व सहकार्य करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये हळूहळू जागृती होऊन त्यांची ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यातील उपस्थिती व सहभाग वाढला आहे.

८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** शासनाच्या विविध योजना गावामध्ये राबवित असताना ग्रामस्थांना ग्रामविकास प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. ग्रामविकासाच्या प्रक्रियेबाबत ग्रामस्थांच्यामध्येही फारशी जागृती नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यात ग्रामस्थांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामविकासाबाबत ग्रामस्थांच्यामध्ये जागृती निर्माण केली आहे.

**जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावाला शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,३१,०१०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | ३२,८६,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५०,०००=०० |
| ४. | लोकवर्गणी (१०%) | ३,९२,२५०=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | १,००,०००=०० |
| | **एकूण** | **४०,५९,२६०=००** |

# ४. मिणचे खुर्द (तालुका - भुदरगड)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मार्च २००५ व हस्तांतरीत तारीख - उपलब्ध झाली नाही)**

१. <u>लोकसंख्या</u> :-

मिणचे खुर्द गावची एकूण लोकसंख्या ११९३ असून त्यामध्ये ५९६ स्त्रिया आणि ५९७ पुरूष आहेत. तसेच गावात एकूण २१४ कुटुंबसंख्या असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ५१ आहे.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

मिणचे खुर्द गावची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा देखील आहे. पण ग्रामपंचायतीकडे एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व पाणी वितरण कर्मचारी नाही.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण ७ सदस्य असून त्यामध्ये २ स्त्री सदस्य व ५ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) प्रवर्गातील ७ वी शिक्षण झालेली महिला भूषवित असून उपसरपंच पद अनुसूचित जात (एस.सी.) प्रवर्गातील १२ शिक्षण झालेले पुरूष भूषवित आहेत.

## ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** मिणचे खुर्द गावामध्ये ग्रामस्थांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते. प्रत्येक महिन्याला ग्रामस्थांचे व महिला ग्रामसभांचे आयोजन केले जात नव्हते. ग्रामसभांना महिला व ग्रामस्थांची उपस्थिती खूपच कमी असे. ग्रामस्थांच्यामध्ये परिसर स्वच्छतेबाबत जाणीव जागृती नव्हती. गावात सामुहिक स्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जात नव्हते. गावातील महिलांच्यामध्ये जागृती नव्हती. ग्रामविकास कार्यात तरूण मंडळाचे फारसे सहकार्य नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचा जैन्याळ (ता.कागल) व वारणानगर (ता.पन्हाळा) येथे अभ्यासदौरा आयोजित केला. अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील तरूणांनी, महिलांनी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. अभ्यासदौऱ्यामुळे गावातील तरूण मंडळे, महिला व ग्रामस्थांच्यामध्ये उत्साह वाढला. ग्रामसभामधील ग्रामस्थांची व महिलांची उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. ग्रामविकासकार्यामध्ये गावातील तरूण व महिला हिरीरीने सहभागी होऊ लागल्या. गावातील बचत गटांची संख्या वाढली. गावात शौचाल्यांच्या संख्येमध्येही वाढ झाली.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावासाठी अर्धा कि.मी. अंतरावरील विहीरीमधून नळपाणी पुरवठा योजना राबविली होती. गावात पाणी व्यवस्थापन योग्य प्रकारे राबविले

नव्हते. पाणी साठवण टाकीची क्षमता १ लाख लीटर असल्यामुळे टाकी २ वेळा भरावी लागत असे. गावाला २ लाख लीटर पाणी देऊन देखील गावात उंचसखल भाग असल्यामुळे सर्व पाणी उताराकडे जात असे. त्यामुळे उंचावरील भागातील लोकांना पाण्याची टंचाई भासे. उंचावरील लोक पाणी भरण्यासाठी खड्डे काढून तांब्याने घागरीत पाणी भरत. पाण्याची टाकी भरण्यासाठी १३ तास वेळ लागे व लाईट बील महिन्याला ५५०० रू. येत असे. पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असून दररोज १ किलो टी.सी.एल. पावडर लागत असे. गावातील सर्वांना समान पाणी वितरण नसल्यामुळे लोकांच्यामध्ये खूप नाराजी होती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील काही प्रमुख लोक व ग्रामपंचायत सदस्यांनी चुये (ता.करवीर) व तळवडे (ता.सावंतवाडी) हया आदर्श गावांना भेट देऊन तेथील पाणी उपलब्धता व पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास केला. गावातील सर्व लोकांचे प्रबोधन करून ग्रामसभेमध्ये गावात मीटर पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. त्यामुळे गावाला खालील अनेक प्रकारचे लाभ झाले. गावाला केवळ ६० हजार लिटर पाणी पुरेसे होऊ लागले. गावातील प्रत्येकाला सरासरी ८० लिटर शुध्द पाणी मिळू लागले. ग्रामपंचायतीचा पाणी शुध्दीकरण खर्च निम्म्यावर आला. म्हणजेच पूर्वी दररोज १ किलो टी.सी.एल. पावडर लागत होती ती आता अर्धा किलो लागू लागली. पूर्वी सरासरी वीज बील ५५०० रू. येत होते ते आता २००० ते २२०० रू. येऊ लागले. म्हणजेच वीज बीलात बचत झाली. गावातील सर्व ग्रामस्थांना समान पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थ समाधानी आहेत.

**ब) <u>नळजोडणी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी संख्या १८० होती. सार्वजनिक नळजोडणी संख्या ०३ होती. गावाची भौगोलिक रचना उंचसखल असल्यामुळे उंचावरील भागातील नळांना पाणी येत नसल्यामुळे खड्डे काढले होते. सखल भागातील लोकांना खाजगी नळाद्वारे भरपूर पाणी मिळूनही नळाला तोटीच नसल्याने बेरचसे पाणी वाया जाई. खाजगी तसेच सार्वजनिक नळांनाही तोटी नसल्याचे आढळून आले. गावातील खाजगी नळजोडणी नसणाऱ्या ३४ कुटुंबाना व ज्यांच्या नळाला पाणी येतच नाही अशा सर्व कुटुंबाना पाण्यासाठी डोंगरकपारीतील झऱ्यावर जावे लागत होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** लोकांचे घरात नळजोडणी घेण्यासाठी प्रबोधन केले. अनेक कुटुंबानी २ नळजोडणी घेतल्यामुळे एकूण २६0 खाजगी नळजोडणी झाली. ग्रामसभेमध्ये सर्वानुमते सार्वजनिक नळजोडणी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. गावात मीटर पध्दतीचा अवलंब केल्यामुळे प्रत्येकाने आपल्या नळाला तोटी बसविली परिणामी पाण्याची बचत झाली.

क) <u>पाणीपट्टी :-</u>

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** खाजगी नळासाठी वार्षिक रू. ३६0 पाणीपट्टी होती तर सार्वजनिक पाणीपट्टी वार्षिक रू. ७५ होती. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूली केली जात असे. ग्रामस्थांना समान व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे पाणीपट्टी वसूली ६0 ते ७0% एवढीच होत होती. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यांची नळजोडणी रद्द करावी अशी तरतूद असून देखील त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात मीटर पध्दतीचा अवलंब केला असून २४000 लिटरसाठी ६0 रू पाणीपट्टी आकारली जाते. गावामध्ये एकही सार्वजनिक नळजोडणी नसल्यामुळे सार्वजनिक पाणीपट्टी नाही. पाणीपट्टी ही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत दोन महिन्यातून एकदा वसूली केली जाते. लोकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे व त्यांचे चांगल्या प्रकारे प्रबोधन झाले असल्यामुळे लोक वेळेत पाणीपट्टी भरतात त्यामुळे १00% पाणीपट्टी वसूली होते. ग्रामसभेमध्ये जो पाणीपट्टी वेळेत भरणार नाही त्याच्यावर काटेकोर दंडात्मक कारवाई करावी असा निर्णय झाला आहे.

## ५. <u>आरोग्य :-</u>

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये १000 मीटर लांबीची गटार बसविली होती तर आणखी ७00 मीटर लांबीच्या गटारीची आवश्यकता होती. गावामध्ये स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारी एकही नसल्यामुळे गटारीची स्वच्छता वेळोवेळी होत नव्हती. त्यामुळे अनेक भागातील गटारी तुंबलेल्या असत. काही भागात गटारीही बसविल्या नव्हत्या व सांडपाणी जाण्यासाठी कोणतीही तरतूद केली नसल्यामुळे ते सर्व सांडपाणी रस्त्यावरून पसरून सर्वत्र

दलदल होत असे. सांडपाण्याचे निर्मूलन कसे करावे? सांडपाण्याचे दुष्परिणाम काय होतात? याबाबत लोकांच्यामध्येही फारसी जागृती नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांना प्रथमता: सांडपाणी साचून राहिल्यामुळे होणारे रोग व त्याचे निर्मूलन कसे करावे याचे प्रबोधन करण्यात आले. गावामध्ये ज्या भागात गटारी आहेत त्या गटारींची स्वच्छता तरूण मंडळे व महिलांच्या सहकार्याने करण्यात आली तर ज्या भागात गटारीच नव्हत्या अशा भागात ५०० मीटर नवीन गटारी बसविण्यात आल्या आणि काही भागात ग्रामस्थांच्या मदतीने पाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढण्यात आली. महिन्यातून एकदा सामुहिक श्रमदानातून गटार स्वच्छता करण्याची व दररोजच्या दररोज आपल्या परिसरात सांडपाणी साचणार नाही याची खबरदारी घेण्याची लोकांना सवय लागली आहे.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारीच नसल्यामुळे गावातील रस्तासफाईचे काम सण समारंभाच्या वेळीच केले जात होते. ग्रामस्थांच्यामध्येही ग्रामस्वच्छतेबाबत जागृती नव्हती. गावात जागोजागी उकिरडे होते व त्या उकिरडयामध्येच आसपासच्या कुटुंबातील लोक कचरा टाकत होते. उकिरडयातील केरकचरा व मोकळया जागी ग्रामस्थांनी टाकलेला केरकचरा उचलला जात नसल्यामुळे तो वाऱ्यामुळे सर्वत्र पसरत असे. गावात एकही सार्वजनिक कचरा कोंडाळी नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** लोकांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी व्याख्याने, माहितीपट, पथनाटय, स्वच्छता संदेश, पोष्टर व भिंतीवरील घोषवाक्ये या माध्यमांचा वापर केला. गावातील तरूण मंडळे, शाळा, अंगणवाडी, महिला बचत गट यांचे प्रबोधन करून, त्यांच्यामार्फत लोकसहभागातून वारंवार ग्रामस्वच्छता केली जाऊ लागली. गावातील ५० घरामध्ये कचरा कुंडया आहेत तर फक्त एकाच ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळी ठेवली आहे.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील लोकांच्यामध्ये शौचालयाबाबत फारशी जागृती नव्हती. गावात १०० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती मात्र एकही सार्वजनिक शौचालय नव्हते. गावाच्या भोवताली डोंगर असल्यामुळे गावातील स्त्री-पुरूष उघडयावरच शौचास जात. घरी शौचालय नसल्यामुळे पावसाळयामध्ये महिलांचे व वृध्द लोकांचे खूप

हाल होत. ज्या कुटुंबाकडे शौचालय होते त्या कुटुंबातीलही काही लोक उघडयावर शौचास जात.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील लहान मुलापासून ते वृध्दापर्यंत विविध माध्यमांच्याद्वारे शौचालयाचे महत्व व शौचालय नसल्यामुळे होणारे दुष्परीणाम याबाबत सातत्याने प्रबोधन केले. ग्रामस्थांना शौचालय बांधण्यासाठी विविध प्रकारे मदत व दबावतंत्राचाही वापर केला. गावात जलस्वराज्य प्रकल्पकाळात नवीन १०६ कुटुंबांनी शौचालये बांधली. गावातील जी कुटुंबे आर्थिकदृष्टया दुर्बल आहेत अशा कुटुंबासाठी ८ सार्वजनिक शौचालये बांधून देऊन त्यांना शौचालयाचा वापर करण्याची सवय लावली. गावातील शाळेमध्ये व अंगणवाडीमध्येही शौचालयाची सोय करून गाव १००% हागणदारीमुक्त केले व गावाने शासनाचे रू. १ लाख चे निर्मल ग्राम पारितोषिक मिळविले.

## ६. महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिला सार्वजनिक कार्यक्रमात सहसा सहभागी होत नसत तर ग्रामविकास कार्यामध्ये महिलांचा सहभाग नगण्य होता. ग्रामसभामधील महिलांची उपस्थिती व त्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग अतिशय कमी होता. गावातील महिलांना त्याच्यासाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती नव्हती. महिलांनी घराबाहेर पडावे, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हावे व त्यांनी विविध गोष्टींचे ज्ञान संपादित करावे म्हणून प्रयत्न केले जात नव्हते. महिलांच्यासाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन केले जात नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांचे घरोघरी जाऊन, कोपरा सभा घेऊन सहाय्यकारी संस्था व महिला विकास समिती मार्फत प्रबोधन केले जाऊ लागले. गावातील महिलांना बाहय गोष्टीचे ज्ञान व महिलांनी राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती करून देण्यासाठी वारणाउद्योग समूहाला अभ्यासदौरा आयोजित करण्यात आली. गावातील महिलांच्यासाठी क्षमताबांधणी प्रशिक्षण व विविध व्यवसाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आला. त्याचा अनेक महिलांनी लाभ घेतला. महिलांच्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमामुळे व प्रशिक्षणामुळे त्यांच्यात जागृती होऊन

आत्मविश्वास निर्माण झाला महिला विविध कार्यक्रमामध्ये मोठया संख्येने सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेमध्ये पुढाकार घेऊ लागल्या. गावातील महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढून त्या नेतृत्व करू लागल्या.

ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** लोकांच्यामधील सुप्तगुणांच्या विकासासाठी जेवढया प्रमाणात विविध स्पर्धांचे आयोजन करावयास हवे होते तेवढे केले गेले नव्हते आणि त्यामध्येही महिलांचा सहभाग खूपच कमी असे. मुळातच गावातील महिला सार्वजनिक कार्यक्रमासाठी घराबाहेर पडत नसत म्हणूनच एखादया कार्यक्रमामध्ये किंवा स्पर्धेमध्ये सहभागी होणे तर अपवादानेच घडत असे. गावातील महिलांनी स्पर्धेत सहभागी व्हावे व त्यांच्या सुप्तगुणांचा विकास व्हावा म्हणून विशेष प्रयत्न केले जात नव्हते. सुरूवातीला गावातील महिलांनी मोकळेपणाने सहभागी व्हावे म्हणून महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात आला. सर्व स्तरातील महिलांना सहभागी करून घेण्यासाठी रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, संगीत खुर्ची, उखाणे, फुगडी, धावणे, वक्तृत्व, निबंध स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. खास महिलांच्यासाठी आयोजित केलेल्या स्पर्धामध्ये महिला उत्स्फूर्तपणे व मोठया संख्येने सहभागी होऊ लागल्या. आयोजित केलेल्या स्पर्धामुळे विविध वयोगटातील महिलांना आपल्यामधील सुप्तगुणांची नव्याने जाणीव झाली, त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या स्वभावात मोकळेपणा आला. गावातील प्रत्येक स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील महिला पुरूषांच्या बरोबरीने निसंकोचपणे सहभागी होऊ लागल्या.

ब) बचत गट :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिलांच्यामध्ये जागृती नसल्यामुळे केवळ ४ च स्वयंसहाय्यता महिला बचत गट होते. बहुतांशी महिलांपर्यंत बचत गटाची संकल्पनाच पोहचली नव्हती. काही महिलांना बचत गटाबद्दल सविस्तर माहिती नसल्यामुळे व त्याविषयी त्यांचे गैरसमज असल्यामुळे बचत गटात सहभागी झाल्या नव्हत्या. गावात स्थापन झालेल्या बचत गटांनाही योग्य प्रकारे मार्गदर्शन मिळत नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थानी घरोघरी जाऊन, कोपरा सभा घेऊन महिलांच्यामध्ये प्रबोधन केले. गावातील महिलांना बचत गट स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन व मदत केली जाऊ लागल्यामुळे नवीन १९ बचत गट स्थापन झाले. गावातील सर्व बचत गटातील महिलांच्यासाठी अभ्यादौरा आयोजित करून वारणा उद्योग समूहामधील महिला बचत गटामार्फत केले जाणारे विविध व्यवसाय दाखविण्यात आले. बचत गटांतील महिलांना व्यवसाय विषयक प्रशिक्षण देण्यात आले. गावातील २३ बचत गटांना जलस्वराज्य प्रकल्पामार्फत प्रत्येकी १३00 रू. प्रमाणे बीज भांडवल देण्यात आले. तसेच विविध बॅंकामार्फत कर्ज घेऊन महिला शेळी पालन, म्हैसपालनसारखा व्यवसाय करू लागल्या आहेत.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील अनेक गरीब, पिडीत व अनुसूचित जातीतील लोकांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या कल्याणकारी योजना माहित नव्हत्या. दुर्बल घटकातील बहुतांशी ग्रामस्थ ग्रामविकासकार्यामध्ये सहभागी होत नसत. शिवाय त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती कमी होती. त्यांच्यातील बहुतांशी कुटुंबाना पाण्यासाठी भटकंती करावी लागे तसेच महिलांच्यापर्यंत बचत गट संकल्पना पोहचली नव्हती शिवाय दुर्बल घटकातील बहुतांशी कुटुंबांना उघडयावर शौचास जावे लागत होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील गरीब, पिडीत व अनुसूचित जातीतील (दुर्बल घटक) लोकांना ग्रामविकास प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले म्हणूनच त्यांना एकत्र करून त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती करून देण्यात आली. या लोकांच्यामध्ये पाणी, स्वच्छता व शौचालयाबाबत जागृती करण्यात आली. त्यांच्यामधील बहुतांशी कुटुंबानी आता स्वतंत्र नळजोडणी घेतली आहे, घरी शौचालय बांधले आहे आणि ज्यांच्याकडे शौचालय नाही अशा कुटुंबातील लोक सार्वजनिक शौचालयाचा वापर करू लागले आहेत. एवढेच नव्हे तर त्यांच्यातील दुर्बल घटकातील बचत गटांची संख्याही वाढू लागली आहे.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला पाणी, गटारी, रस्ते वगैरेसाठी अनुदान मिळाले होते पण त्याची सर्व माहिती गावातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचावी म्हणून प्रयत्न केले जात नव्हते. गावाला मिळालेल्या अनुदानाचा उपयोग कसा व कोणत्या बाबीसाठी करावा याबाबत ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेतला जात नसे. ग्रामविकास कार्यामध्ये विशेषता पाणी, स्वच्छता वगैरे बाबीमध्ये लोकवाटा जमा केला जात नसे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आपलेपणाची भावना नव्हती
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाला प्राप्त झालेले अनुदान खर्च करण्यापूर्वी त्याचा निर्णय ग्रामसभेमध्ये घेण्यात येऊ लागले. अनुदानाचा जमाखर्च पाहण्यासाठी तो सर्वांना खुला ठेवण्यात आला. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाला वेळोवेळी प्राप्त अनुदानाची माहिती ग्रामस्थांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी नोटीस बोर्ड, ग्रामसभा या माध्यमांचा उपयोग केला जाऊ लागला.

**गावाला विविध विकास कामासाठी मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,०४,९३०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | २१,९१,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ८१,५००=०० |
| ४. | जमा लोकवर्गणी (१०%) | २,६५,५१७=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | १,००,०००=०० |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ५,००,०००=०० |
| | **एकूण** | **३३,४२,९४७=००** |

# ५. निष्णप - कुंभारवाडी ( तालुका - भुदरगड )

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मार्च २००५ व हस्तांतरीत तारीख - मार्च २००९)**

## १. लोकसंख्या :-

निष्णप - कुंभारवाडी गावची एकूण लोकसंख्या १५०४ असून त्यामध्ये ७३१ स्त्रिया व ७७३ पुरूष आहेत. गावात एकूण कुटुंबसंख्या २२४ असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबसंख्या ११९ आहे.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

निष्णप - कुंभारवाडी गावची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. पण ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा नाही. तसेच ग्रामपंचायतीकडे ग्रामसफाईसाठी स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी एकही नाही.

ग्रामपंचायत समिती एकूण ७ सदस्यांची असून त्यामध्ये २ स्त्री सदस्य व ५ एकूण सदस्य कार्यरत आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद पुरूष सदस्यांकडे असून त्यांचे शिक्षण १० वी व ते अनुसूचित जात (एस.सी.) प्रवर्गातील आहेत तर उपसरपंच पद स्त्री सदस्यांकडे असून त्यांचे शिक्षण ७ वी व ते खुल्या (ओपन) प्रवर्गातील आहेत.

## ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निष्णप-कुंभारवाडी गावामध्ये ग्रामस्थांसाठी अभ्यासदौ-याचे आयोजन केले नव्हते. तरूणवर्गाचा ग्रामविकास कार्यातील सहभाग खूप कमी होता. महिलांची ग्रामसभा, ग्रामस्वच्छता वगैरे कार्यक्रमातील उपस्थिती खूपच कमी असून महिला बचत गटांची संख्यादेखील खूपच कमी होती. ग्रामपंचायतीमार्फतही गावातील महिलांना व तरूणवर्गाला ग्रामविकास कार्यात गोडी वाटावी म्हणून विशेष असे प्रयत्न केले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभा बोलविण्यात आली पण त्याला गावातील महिला, तरूण व एकूणच ग्रामस्थांचा प्रतिसाद खूपच कमी मिळू लागला. त्यामुळे गावातील होतकरू व इच्छूक महिला

व तरूणांची जैन्याळ (ता.कागल) या ग्रामस्वच्छतेमध्ये आदर्श काम केलेल्या गावाला अभ्यासदौरा आयोजित केला.

याचा **परिणाम** म्हणून गावातील बहुसंख्य महिला, पुरूष व तरूणही अभ्यासदौऱ्यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. जैन्याळ मधील विविध आदर्श उपक्रमांची नोंद व प्रेरणा घेऊन त्या प्रकारचे उपक्रम गावात राबविण्यास सुरूवात केली. ग्रामसभामधील व ग्रामविकास कार्यक्रमातील ग्रामस्थांची उपस्थिती लक्षणीय वाढली. त्याचप्रमाणे महिला बचत गटांची संख्याही वाढली. आरोग्याच्या दृष्टीने गावातील शौचालयांची संख्याही वाढली.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामस्थांची गावापासून २ कि.मी. अंतरावरील डोंगरावरील झऱ्यामधून सायफन पध्दतीने गावात पिण्याचे पाणी आणण्यासाठी श्रमदानातून डोंगरावर २० हजार लिटरची दगडी टाकी बांधली होती. सुरूवातीला काही वर्षे झऱ्याचे पाणी पुरेसे ठरले पण हळूहळू लोकसंख्येतील वाढ व पाण्याचा अतिरिक्त वापर यामुळे पाण्याची टंचाई भासू लागली तर दुसऱ्या बाजूने पाण्याची साठवण क्षमताही कमी पडू लागली.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावापासून ३ कि.मी. अंतरावरील डोंगरावरील झऱ्यातून पाणी सायफन पध्दतीने आणले आहे. गावात नवीन ५५,००० लिटरची साठवण टाकी बांधण्यात येऊन गावातील घरापर्यंत पाणी पोहचविणाऱ्या नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. जलशुध्दीकरण कसे करावे याबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आले. या योजनेचा परिणाम म्हणून ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसे पाणी मिळू लागले.

### ब) नळजोडणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात एकूण ५५ खाजगी नळजोडण्या व ४ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावातील अनेक कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे व सार्वजनिक नळावरील पाण्यासाठी गर्दी असल्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नव्हते. त्यामुळे गावातील महिलांना व लहान मुलांनादेखील डोंगर दऱ्यामधून पाण्यासाठी भटकावे

लागे. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याबाबत जागृती नसल्यामुळे व नळांना तोटी नसल्यामुळे बरेच पाणी वाया जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी प्रबोधन केल्यामुळे गावातील स्वतंत्र नळजोडणींची संख्या ७१ झाली आणि गावातील सार्वजनिक नळजोडण्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या. ग्रामस्थांचे पाणी वापराबाबत प्रबोधन केल्यामुळे सर्वांनी नळांना तोटया बसविल्या आहेत.

क) पाणीपट्टी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ३६० तर सार्वजनिक पाणीपट्टी रू. ७५ होती. पाणीपट्टीची वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. ग्रामस्थांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्यामुळे व त्यांच्यामध्ये जागृती नसल्यामुळे पाणीपट्टी वसूली समाधानकारक होत नव्हती. किंबहुना पाणीपट्टी वसूली प्रभावीपणे केली जात नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: ग्रामस्थांचे पाणी वापरबाबत व पाणीपट्टी वेळच्यावेळी भरण्याबाबत प्रबोधन करण्यात आले आणि पाणीपट्टीचा दर खाजगी नळजोडणीसाठी रू. ३६० ठरविण्यात आला. पाणीपट्टी वसूलीचे काम ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा करण्याचे निश्चित केले. पाणीपट्टी वेळच्यावेळी न भरणाऱ्या कुटुंबावर कडक कारवाई करण्याचे निश्चित केले.

## ५. आरोग्य :-

अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये एकूण ३०० मीटर लांबीच्या गटारी होत्या तर ५०० मीटर गटारींची आवश्यकता होती. गावात गटारी नसलेल्या भागातील सर्व सांडपाणी रस्त्यावर पसरत असल्यामुळे दुर्गंधी व अस्वच्छतेमुळे रोगराईला पोषक वातावरण मिळत असे. गावात स्वतंत्र स्वच्छता कर्मचारीच नसल्यामुळे गटारीची साफसफाई वेळच्यावेळी होत नसे. त्यामुळे काही भागात गटारी असून त्या तुंबल्यामुळे सर्व पाणी रस्त्यावर पसरत असे. ग्रामस्थांच्यामध्येही स्वच्छतेबाबत विशेष जागृती नसल्यामुळे सामुदायिक ग्रामस्वच्छता कार्यक्रम आखले जात नव्हते.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट व एकूणच ग्रामस्थांचे सार्वजनिक स्वच्छतेबाबत प्रबोधन केल्यामुळे ग्रामस्थांच्यामार्फत सामुदायिक स्वच्छता कार्यक्रम वारंवार आखले जाऊ लागले. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावात नवीन २00 मीटर गटारी बांधण्यात आल्या. गावातील गटारी नसलेल्या भागात चर खोदून सांडपाणी साचणार नाही याची खबरदारी घेण्यात आली. ग्रामपंचायतमार्फत वेळोवळी गटारी स्वच्छ करून कीटकनाशकांची फवारणी करण्यात येऊ लागली.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्ता साफसफाई करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे वर्षातून केवळ ३ ते ४ वेळा ग्रामस्वच्छता केली जात असे. ग्रामस्थ आपल्या घरातील सर्वप्रकारचा केरकचरा उकिरडयामध्ये किंवा रस्त्याच्या कडेला टाकत असत. ग्रामस्थांनी टाकलेला केरकचरा वेळोवळी उचलला जात नसल्यामुळे वा-यामुळे व जनावरांच्यामुळे तो रस्त्यावर पसरत असे. त्यामुळे गावाच्या अस्वच्छतेत भर पडत असे. बहुतांशी ग्रामस्थांच्या मालकीचे जनावरांचे गोठे गावात होते व त्या जनावरांचे मलमूत्र गटारीतच सोडले जात असल्यामुळे गावात सर्वत्र दुर्गंधी पसरत असे.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीलाच आपले गाव स्वच्छ व सुंदर कसे व का ठेवावे याबाबत गावातील सर्व घटकांचे (महिला, पुरूष, तरूण मंडळे व विद्यार्थी) प्रबोधन करण्यात आले. ग्रामपंचायतीमार्फतही गाव स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी नियोजनवध्द प्रयत्न करण्यात येऊ लागले व जागोजागी कचरा कोंडाळी ठेऊन तो कचरा वेळच्यावेळी उचलला जाऊ लागला. गावातील सर्व महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन ग्रामस्वच्छतेच्या मोहिमेला सहकार्य करू लागल्या तसेच शाळेतील विद्यार्थ्यांच्यामार्फतही शाळेचा परिसर व गावातील रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य मिळू लागले.

ब) <u>शौचालय</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये केवळ ८९ वैयक्तिक शौचालये होती. परंतु एकही सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे घरी शौचालय नसणारे सर्व ग्रामस्थ उघडयावरच शौचास जात असत. लहान मुलांना गावातील रस्त्याच्या दुतर्फा व घराच्या शेजारीच शौचास बसविले जात असल्यामुळे रोगराईला चालना मिळत असे. ग्रामस्थांचे शौचालय

बांधण्याबाबतच्या योग्य प्रबोधनाअभावी त्यांच्यामध्ये उदासिनता वाढल्याने शौचालयाची संख्या वाढली नाही.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य समिती घरोघरी जाऊन, महिला मेळावे घेऊन, कोपरा सभा घेऊन व अभ्यासदौरा आयोजित करून ग्रामस्थांचे शौचालयाबाबत प्रबोधन त्यांच्या अडीअडीचणी समजाऊन घेऊन त्या सोडविण्यास सहकार्य केले. गावात जलस्वराज्य प्रकल्पकाळात नवीन ८४ वैयक्तिक शौचालये बांधली गेली. तसेच ५ सार्वजनिक शौचालये बांधून सर्वांना शौचालये वापर करण्याची सवय लावली. उघडयावर शौचास जाणाऱ्यावर दंडात्मक कारवाई केली जाऊ लागल्यामुळे लोक सार्वजनिक व खाजगी शौचालयाचा नियमित वापर करू लागले. परिणामी गावातील स्त्रिया, वृध्द व आजारी व्यक्तींचे हाल थांबले व रोगराईही कमी होण्यास मदत झाली. गाव हागणदारीमुक्त झाल्यामुळे गावाला १ लाख रू.चा शासनाचा निर्मलग्राम पुरस्कारही मिळाला.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

### अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निष्णप-कुंभारवाडी गावात स्त्री-पुरूषांचे प्रमाण जवळपास सारखे होते. पण ग्रामसभा व ग्रामविकास कार्यक्रमातील महिलांचे प्रमाण मात्र पुरूषांच्या तुलनेत खूपच कमी होते. गावातील महिलांच्यावर पारंपारिकतेचा पगडा असल्यामुळे त्या सार्वजनिक कार्यक्रमात व ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी होत नव्हत्या. महिलांना परपुरूषांच्याबरोबर काम करण्यास आणि गप्पागोष्टी करण्यास लाज व संकुचितपणा वाटत होता. त्यांच्यामध्ये धैर्य व आत्मविश्वासाची कमी होती. या गावच्या महिला घरातील पारंपारिक कामे व शेतातील कामे करण्यामध्ये गुंतलेल्या होत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांना विविध उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्यावर अधिक भर देण्यात आला. सहाय्यकारी संस्था व महिला विकास समितीमार्फत घरोघरी जाऊन महिलांच्या भेटी घेऊन, कोपरा बैठका घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन महिलांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी त्यांना शासकीय योजनांची माहिती, पंचायत राज्य प्रशिक्षण, स्त्री-पुरूष समभाव वगैरे विविध

प्रकारचे प्रशिक्षण दिले. अर्थातच या प्रशिक्षणाबरोबरच त्यांना विविध व्यवसाय करण्यास प्रेरणा व कर्जही उपलब्ध करून दिले.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिला पारंपारिक कार्यक्रमाव्यतिरीक्त इतर कोणत्याही कार्यक्रमामध्ये सहभागी होत नव्हत्या कारण त्यांच्यावर पुरूषांचे वर्चस्व असल्यामुळे बऱ्याच महिलांची इच्छा असली तरी त्यांना विविध सार्वजनिक कार्यक्रमात व स्पर्धेत सहभागी होता येत नव्हते. शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे स्पर्धांचे आयोजन फारच कमी केले जात असे आणि महिलांच्या स्पर्धा तर अगदीच अपवादाने आयोजित केल्या जात. गावात स्त्री-पुरूषांच्यासाठी आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये महिलांचा सहभाग खूपच कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांनी विविध कार्यक्रमात सहभागी व्हावे, त्यांच्यामधील भिती, संकोच कमी व्हावा म्हणून प्रबोधनाच्या माध्यमातून प्रयत्न केले. तसेच महिलांच्यामधील आत्मविश्वास वाढावा, मोकळेपणा यावा, त्यांना त्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांची जाणीव व्हावी व जास्तीत जास्त महिलांनी स्पर्धेत सहभागी व्हावे यासाठी महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांच्यामध्ये विविध वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विविध वयोगटातील महिला एकत्र आल्यामुळे त्यांच्यामध्ये सुसंवाद व सांघिकभावना वाढीस लागण्यास मदत झाली. स्वतंत्र स्पर्धांच्या आयोजनामुळे महिलांच्यामध्ये आत्मविश्वास व धाडस निर्माण झाल्यामुळे हळूहळू त्या पुरूषांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरू लागल्या.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये महिला बचत गटांची संख्या ०८ होती. पण या बचत गटातील महिलांच्यामध्ये समन्वय नव्हता. गावातील बचत गटामध्ये सहभागी नसणाऱ्या महिलांना बचत गटांचे महत्व पटवून देऊन त्यांना बचत गट स्थापन करण्यास प्रवृत्त करण्याचा फारसा प्रयत्न केला जात नव्हता. बचत गटामध्ये असणाऱ्या महिलांनाही या बचत गटामुळे आपणास कोणकोणते लाभ मिळू शकतात याची माहिती नसल्यामुळे त्यांच्यामध्ये मरगळ आली होती. बचत गटातील महिलांच्यासाठी प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले जात नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सहाय्यकारी संस्था व महिला विकास समितीच्या माध्यमातून गावातील महिलांच्यामध्ये जागृती निर्माण करून त्यांना महिला बचत गटांचे महत्व पटवून देण्यात आले. गावात पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेल्या महिला बचत गटांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले व प्रशिक्षण दिले. याचा परिणाम म्हणून नवीन ५ महिला बचत गट स्थापन झाले आणि यामुळे गावातील एकूण महिला बचत गटांची संख्या १३ झाली. अर्थातच या बचत गटातील महिलांना उद्योगधंदा करण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्पामार्फत बीज भांडवल पुरविण्यात आले. गावातील इच्छूक महिलांची वारणानगर (ता.पन्हाळा) येथील उद्योगसमूहाला भेट देण्यासाठी अभ्यासदौरा आयोजित करून त्यांना विविध व्यवसायाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. परिणामी गावातील काही महिला लोणचे, पापड, शेवया बनविण्याचे उद्योग उभारून स्वावलंबी झाल्या आहेत.

### ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये फारशी जागृती नसल्यामुळे ते आपल्या हक्क व कर्तव्यापासून वंचित होते. तसेच त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या अनेक सोयीसुविधा त्यांच्यापर्यंत पोहचल्या नव्हत्या. दुर्बल घटकातील लोकांचा ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग खूपच कमी होता त्याचप्रमाणे महिलांची बचत गटाबाबत देखील खूपच उदासिनता होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांप्रमाणेच दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणावरही भर दिला गेल्यामुळे सुरूवातीपासूनच दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करून त्यांचा ग्रामविकास कार्यक्रमामधील सहभाग वाढला आहे. दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. त्याचप्रमाणे महिलांनीही स्वतंत्र बचत गट स्थापन केले. दुर्बल घटकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळू लागले. त्याचप्रमाणे त्यांच्यातील आरोग्याच्याबाबतीत जागृती झाल्याने त्यांच्यातील काही कुटुंबानी स्वतंत्र शौचालये बांधली तर काही कुटुंबानी सामूहिक शौचालये बांधली.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान आले होते. पण त्या अनुदानाची माहिती सामान्य नागरिकापर्यंत पोहचत नव्हती. तसेच अनुदानाचा विनियोग कोणत्या कारणासाठी व कसा करावयाचा या संदर्भातील निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांना त्याला सहभागी करून घेतले जात नव्हते. त्यामुळे त्याना योजनेबाबत आपुलकी नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र गावातील सर्व घटकांना सहभागी करून घेण्यावर भर दिला असल्यामुळे या योजनेबाबत ग्रामस्थांच्यामध्ये आपुलकीची भावना निर्माण झाल्याचे आढळून आले.या प्रकल्पामुळे गावात विविध विकास कामासाठी खाालीलप्रमाणे शासनाचे अनुदान मिळाले.

**जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावाला शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,३०,२००=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | २१,0६,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ६२,२५0=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | २,५६,१२१=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | १,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ४,७७,२00=00 |
| | **एकूण** | **३२,३१,७७१=00** |

# ६. करंबळी (तालुका - गडहिंग्लज)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मे २००५ व हस्तांतरीत तारीख - जून २००९)**

## १. <u>लोकसंख्या</u> :-

करंबळी गावची एकूण लोकसंख्या ३२८५ असून त्यामध्ये स्त्रिया १५९१ व पुरूष १६९४ आहेत. गावात एकूण ६२३ कुटुंबसंख्या असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या १७३ आहे.

## २. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

करंबळी गावची स्वतःची ग्रामपंचायत इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये संगणक देखील आहे. ग्रामपंचायतीकडे ग्रामस्वच्छतेसाठी १ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी आहेत.

ग्रामपंचायत समिती एकूण ११ सदस्यांची असून त्यामध्ये ४ स्त्री सदस्य व ७ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर बी.कॉम पदवीप्राप्त पुरूष असून ते खुल्या (ओपन) प्रवर्गातील आहेत तर उपसरपंच पदावर १0 वी शिक्षण झालेली स्त्री असून त्याही खुल्या (ओपन) प्रवर्गातील आहेत.

## ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** करंबळी गावातील ग्रामस्थांचे ग्रामविकासाच्या दृष्टीने अभ्यासदौऱ्याचे आयोजन केलेले नव्हते. गावात प्रत्येक महिन्याला ग्रामसभा आयोजित केली जात नव्हती. पण जेंव्हा ग्रामसभा असेल तेंव्हा ग्रामस्थांची उपस्थिती समाधानकारक नव्हती. महिलांच्यामध्ये फारसी जागृती नसल्यामुळे त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती अतिशय कमी असे. ग्रामविकास कार्यात ग्रामस्थांचा आणि तरूण मंडळांचा सहभाग आणि सहकार्य मिळत नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिला, तरूण मंडळे, समिती सदस्य व ग्रामस्थ या सर्वांचा कांबळवाडी (ता.राधानगरी) व वारणानगरला (ता.पन्हाळा) अभ्यासदौरा आयोजित केला या अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामस्थांच्या मानसिकतेमध्ये बदल झाला. त्याचा परिणाम म्हणून गावात प्रत्येक महिन्याला ग्रामसभा

आयोजित केली जाऊ लागली. तसेच ग्रामसभेच्या पूर्वी महिला ग्रामसभेचेही आयोजन केले जाऊ लागले. साहजिकच ग्रामसभेमध्ये ग्रामस्थ, महिला व तरूणांची उपस्थिती वाढली. ग्रामस्वच्छता, शौचालयाबाबत प्रबोधन करणे, लोकवर्गणी जमा करणे या कार्यात गावातील तरूण मंडळाचा व महिलांचा सहभाग वाढला. गावातील बचत गटांच्या संख्येत वाढ झाल्याने महिला बचत गटाच्या माध्यमातून छोटा-मोठा व्यवसाय करू लागल्या.

## ४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात विधन विहीरीवरून नळ पाणीपुरवठा योजना होती. विंधन विहीरीतील पाणी वाढत्या लोकसंख्येला कमी पडत होते आणि उन्हाळयामध्ये तर पाण्याची खूपच टंचाई भासत होती. गावाला दोन तीन दिवसातून एकदा तेही पुरेसे पाणी मिळत नव्हते. गावातील साठवण टाकीची क्षमताही कमी असे त्यामुळे महिलांचे व ग्रामस्थांचे पाण्यासाठी हाल होत होते. पाणी शुध्द करण्यासाठी टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे. गावात ओ.टी. टेस्ट (आर्थोटोलिडीन टेस्ट) ही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत महिन्यातून एकदा घेतली जात होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावापासून १ कि.मी. अंतरावरील एम.आय. टॅंक धरणातून नळपाणी पुरवठा योजना सुरू केली. गावात १ लाख लिटर क्षमतेची नवीन साठवण टाकी (जलकुंभ) बांधण्यात आली. पाणी वितरण कर्मचाऱ्यामार्फत दररोज टी.सी.एल. पावडरचा वापर करून पाणी शुध्द केले जाते. ग्रामस्थांचे व विशेषतः महिलांचे पाणी वापराबाबत प्रबोधन करण्यात आले. पाणी वितरण कर्मचारी महिन्यातून ३ ते ४ वेळा पाणी शुध्दतेची खात्री करण्यासाठी ओ. टी. टेस्ट घेत असतो. ग्रामस्थांना दररोज प्रतिमाणसी ४० लिटर प्रमाणे शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत झाली. जलस्वराज्य प्रकल्पानंतर गावामधील भांडणतंटाही कमी झाला आहे.

### ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण ६२६ कुटुंबापैकी ३५० कुटुंबाकडेच खाजगी नळजोडणी होती तर सार्वजनिक नळजोडणी संख्या १७ होती. गावातील २७६ कुटुंबांना सार्वजनिक नळावरून किंवा गावाबाहेरील विहीर, विंधनविहीरीवरून पाणी

भरण्यासाठी भटकावे लागे. गावातील बहुतांशी कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी असे. ग्रामस्थांचे पाण्याचे महत्व व पाणी वापराबाबत प्रबोधन झाले नसल्यामुळे आणि सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे बहुतांशी नळांचे पाणी वाया जात असे. गावात सार्वजनिक नळावर सतत पाण्यासाठी भांडणतंटा होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात कोपरा सभा, विविध कार्यक्रम व प्रशिक्षणे देऊन ग्रामस्थांचे पाण्याबाबत वारंवार प्रबोधन केल्यामुळे गावातील ४५० कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली. ग्रामसभेमध्ये गावातील सर्व सार्वजनिक नळजोडणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी अजून गावात दोन सार्वजनिक नळजोडण्या आहेत. गावातील १७६ कुटुंबाकडे खाजगी स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे ते सार्वजनिक नळावर व इतर स्त्रोतावर अवलंबून आहेत. विशेष म्हणजे ग्रामस्थांचे चांगल्या प्रकारे प्रबोधन झाल्यामुळे गावातील खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी बसविल्याचे दिसून आले.

**क) <u>पाणीपट्टी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळसाठी वार्षिक पाणीपट्टी रू.४०० होती तर सार्वजनिक नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू. ९० होती. गावातील पाणीपट्टी वार्षिक पध्दतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत वसूल केली जात असे. ही पाणीपट्टी वसूली जवळ जवळ ७०% होती. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्या कुटुंबाची नळजोडणी रद्द करावी अशी तरतूद असली तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात नव्हती. तथापि थकीत पाणीपट्टी वसूल करण्यासाठी दाखले न देणे हया मार्गाचा प्रामुख्याने अवलंब केला जात असे. गावाची पाणीपट्टी १००% वसूल होत नसल्यामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा वेळेवर पगार होत नसे, वीजबील वेळेत भरले जात नसे, तसेच इतर देखभाल दुरूस्तीची कामेही वेळेत होत नसत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील खाजगी नळासाठी पाणीपट्टी रू.४०० च ठेवण्यात आली तर सार्वजनिक वार्षिक पाणीपट्टीचा दर रू. ९० च ठेवण्यात आला. गावातील पाणीपट्टी ग्रामपंचायती कर्मचाऱ्यामार्फत वार्षिक पध्दतीने वसूल केली जात असे. नवीन नळजोडणी देत असताना ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी वसूल करण्यात येऊ लागली. ग्रामसभेमध्ये पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यांची नळजोडणी रद्द करण्याची अंमलबजावणी काटेकोरपणे राबविण्याचे ठरविण्यात आले.

ग्रामस्थांना दररोज शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे ते समाधानी असल्याचे दिसून आले.

## ५. <u>आरोग्य</u> :-

### अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये ३ कि.मी. गटारी होत्या तर आणखी ७ कि.मी. गटारीची आवश्यकता होती. ग्रामपंचायतीकडे स्वच्छता कर्मचारी एकच असल्यामुळे गटारीची स्वच्छता वेळोवेळी होत नव्हती. त्यामुळे गटारी तुंबून सांडपाणी सर्वत्र पसरत असे. तसेच ज्या ७ कि.मी. भागात गटारीच नव्हत्या तेथील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीच सोय नसल्यामुळे सर्वत्र दलदल होती. याचा अर्थच हा की, ग्रामस्थांच्यामध्येही सार्वजनिक स्वच्छतेची फारशी सवय नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमता: गावातील लोकांच्यामध्ये व्याख्याने, माहितीपट, अभ्यासदौरा, स्वच्छताफेरी या माध्यमातून घर व परिसर स्वच्छतेची आवश्यकता, अस्वच्छतेचे परिणाम याबाबत जाणीव जागृती करण्यात आली.

गावामध्ये २ कि.मी. नवीन गटारी बसविण्यात येऊन गावातील तरूण मंडळे, शाळातील विद्यार्थी व ग्रामस्थांच्या मदतीने सर्व गटारी स्वच्छ करून संपूर्ण गाव स्वच्छ व सुंदर करण्यात आले. गावातील ज्या भागात गटारी नाहीत तेथील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढण्यात आले. गावातील ५० कुटुंबांनी सांडपाण्याचा उपयोग परसबागांसाठी केला आहे तर ३० कुटुंबानी सांडपाण्यासाठी शोषखड्डे काढले आहेत. ग्रामपंचायत आवश्यकता असेल तेंव्हा रोजंदारीवर स्वच्छता कर्मचारी घेऊन गटारींची सफाई करून घेते.

### ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामपंचायतीकडे एकच स्वच्छता कर्मचारी असल्यामुळे ३ ते ४ महिन्यातून एकदा रस्तासफाई केली जात असे. तर ग्रामस्थांच्यामध्येही स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे गावातील रस्ते अस्वच्छ असत. ग्रामपंचायतीने गावामध्ये कोठेही सार्वजनिक कचरा कोंडाळया ठेवल्या नसल्यामुळे ग्रामस्थ उकिरडयात किंवा कोठेही उघडयावर कचरा टाकत. तो वाऱ्यामुळे व जनावरांच्यामुळे सर्वत्र पसरत असे. गावात

ओला व सुका कचरा एकत्रच टाकला जात असे पण तो वेळोवेळी उचलला जात नसल्यामुळे कुजून सर्वत्र दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात कोपरा सभा, माहितीपट, भिंतीवर स्वच्छतेबाबत घोषवाक्य लिहून सातत्याने स्वच्छतेबाबत प्रबोधन केलेच शिवाय वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे संदेश अंगणवाडी शिक्षिका, शाळेतील विद्यार्थ्यांच्या मार्फत घरोघरी पोहचविले. ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटल्यामुळे प्रत्येक कुटुंबातील महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊ लागल्या. अंगणात सडासारवण करून रांगोळी काढू लागल्या. गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट यांच्याकडून सण समारंभ, थोर व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथीच्या निमित्ताने ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ लागल्यामुळे गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली. ग्रामपंचायतीने गावात महत्वाच्या १० ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळया ठेवल्यामुळे लोकांना कचरा कोंडाळीत टाकण्याची सवय लागली आणि तो कचरा वेळोवेळी उचलला जाऊ लागला.

**क) <u>शौचालय</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात वैयक्तिक शौचालयांची संख्या ३६० होती आणि केवळ २ च सार्वजनिक शौचालये होती. सार्वजनिक शौचालयाचा वापर व्यवस्थित होत नसल्यामुळे अनेकवेळा ती उपयोगात येत नसत त्यामुळे शौचालय नसणाऱ्या २४१ कुटुंबाना उघडयावर शौचास जावे लागे. दुर्दैवाची बाब ही की, महिलांना उघडयावर शौचास जाणे लाजीरवाणे वाटत असल्यामुळे त्यांना अंधार पडण्याची वाट पहावी लागे, त्यामुळे अनेक स्त्रियांना शौचास वेळेवर न गेल्यामुळे पोटाचे आजार होत. उघडयावरील हागणदारीमुळे पाणी प्रदूषण व रोगराईचे प्रमाण वाढले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे शौचालय बांधण्यासाठी विविध प्रकारे प्रबोधन केल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये जागृती निर्माण होऊन गावात नवीन २४१ वैयक्तिक शौचालये बांधल्यामुळे वैयक्तिक शौचालयाची एकूण संख्या ६०८ झाली. तसेच नवीन ६ सार्वजनिक शौचालये बांधल्यामुळे सार्वजनिक शौचालयांची संख्या ८ झाली. गावात दोन प्राथमिक व एक माध्यमिक शाळा असून ३ अंगणवाडया आहेत त्या प्रत्येक ठिकाणी शौचालयांची सुविधा निर्माण करण्यात आली. गावातील आता एकही व्यक्ती उघडयावर शौचास जात नसल्यामुळे गावाला शासनाचा २००९ ला २ लाखाचा निर्मल ग्राम पुरस्कार जाहीर झाला आहे.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

### अ) <u>महिला प्रशिक्षण :-</u>

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांना एकत्र करण्याचे आणि त्यांच्यासाठी कोणत्याही प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नव्हते. गावात महिला ग्रामसभांना महिलांची उपस्थिती नसल्यामुळे दर महिन्याला महिला ग्रामसभा आयोजित केली जात नव्हती. महिलांना शासकीय योजनांची व महिलांच्यासाठी असणाऱ्या सोयीसुविधांची माहिती नव्हती. बहुतांशी महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव असल्याने स्वतंत्र व्यवसाय करावा किंवा आपणही अर्थार्जन करावे अशी त्यांची मानसिकता नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य समितीने प्रत्येक घरोघरी जाऊन, कोपरा सभा घेऊन ग्रामस्थांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. गावातील महिलांच्यासाठी क्षमताबांधणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. तसेच वारणा उद्योग समुहाला अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. महिलांच्यासाठी व्यवसायिक प्रशिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. याचा परिणाम म्हणून विविध प्रशिक्षणाचा महिलांना लाभ झाला आणि त्यांच्यासाठी राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांची त्यांना जाणीव ही झाली. त्यामुळे जलस्वराज्य प्रकल्पाकडून महिला बीज भांडवल घेऊन शिवणकाम, शेळीपालन, म्हैसपालन सारखा व्यवसाय करू लागल्या.

### ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या विकासासाठी फारसे प्रयत्न केले गेले नसल्यामुळे गावामध्ये ज्या स्पर्धा आयोजित केल्या जात असत त्यामध्ये महिलांचा सहभाग अत्यंत अल्प असे. गावातील सर्व स्तरातील महिला स्पर्धेमध्ये सहभागी होतील अशा स्पर्धांचे आयोजन केले जात नव्हते. गावातील महिलांच्यावर पारंपारिक दडपण व पुरूषांचे वर्चस्व असल्यामुळे त्यांच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात दवंडी देऊन, प्रभागवार बैठका घेऊन, घरोघरी जाऊन महिलांच्यामध्ये जागृती करण्यात आली. तसेच महिलांच्यामध्ये मोकळेपणा यावा, त्यांच्यामधील सुप्तगुणांना संधी मिळावी म्हणून झिम्मा-फुगडी, लंगडी, उखाणे, जात्यावरील गाणी यासारख्या स्पर्धा घेण्यात येऊ लागल्या. गावातील पारंपारिक सण-उत्सवाच्या निमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धेमध्ये तरूण

व वयस्कर स्त्रियांही अगदी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागल्या. गावातील महिलांच्यासाठी रांगोळी, वक्तृत्व, निबंध इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये महिलांनी चांगला सहभाग घेतला. विविध स्पर्धांच्या आयोजनामुळे महिलांच्या पारंपारिक मानसिकतेमध्ये हळूहळू बदल होऊन कोणत्याही कार्यक्रमामध्ये अगदी पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिलांच्यामध्ये फारशी जागृती नसल्यामुळे महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या केवळ १0 होती. बहुतांशी महिलांच्यापर्यंत स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना, त्याचे महत्व पोहचले नव्हते. शिवाय त्या गटांना प्रेरणा देण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी व प्रशिक्षणासाठी फारसे प्रयत्न केले जात नव्हते आणि विशेष म्हणजे जे बचत गट स्थापन झाले होते त्यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील प्रत्येक घरातील महिलांना एकत्र करून त्यांना स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना व त्याचे महत्व पटवून देण्याचे काम सहाय्यकारी संस्था व महिला विकास समितीने केले. गावात महिलांच्यासाठी वारंवार विविध कार्यक्रम घेतले जाऊन वेगवेगळया क्षेत्रातील तज्ञ लोकांची व्याख्याने आयोजित केली जाऊ लागली. गावातील पूर्वीच स्थापन झालेल्या महिला बचत गटांचे बळकटीकरण करण्यात आले. गावात नवीन २0 स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन झाल्यामुळे एकूण बचत गटांची संख्या ३0 झाली. या बचत गटाच्या सहाय्याने लोकवर्गणी गोळा करणे, ग्रामस्वच्छता जागृती करणे वगैरे कामे केली जाऊ लागली.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, पिडीत व अनुसूचित जाती जमातीतील लोक ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी होत नव्हते. कारण त्यांच्यापर्यंत ग्रामसभा व इतर कार्यक्रमाची माहिती पोहचत नव्हती व जरी पोहचली तरी त्यांचा सहभाग फारच कमी असे. दुर्बल घटकातील लोक आपल्या समस्या ग्रामसभेमध्ये मोकळेपणाने मांडत नव्हतेच त्याचप्रमाणे दुर्बल घटकांना त्यांच्यासाठी असणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती नसल्यामुळे शासनाचे असणारे लाभ त्यांना मिळत नव्हते. दुर्बल घटकातील लोकांच्यापर्यंत

त्यांच्या वाडी वस्तीपर्यंत पाणी, शौचालय, गटार, रस्ते यासारख्या सुविधा पुरेशा प्रमाणात पोहचत नव्हत्या.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील गरीब, पिडीत व अनुसूचित जाती जमातीतील लोकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी प्रबोधनावर अधिक भर देण्यात आला. दुर्बल घटकांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचे काम जलस्वराज्याच्या माध्यमातून करण्यात आले. दुर्बल घटकासाठी स्वयंसहाय्यता बचत गट स्थापण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. दुर्बल घटकातील कुटुंबांना स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी, शौचालय बांधण्यासाठी विविध प्रकारचे सहकार्य करून रस्ते व गटारी सारख्या सोयी सुविधा पोहचविल्याचे दिसून आले.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाच्या विकासासाठी शासनाचे अनुदान मिळाले होते पण त्याचा विनियोग कसा करावयाचा याचा निर्णय ग्रामसभेमध्ये घेतला जात नसे. शासकीय अनुदानातून ग्रामविकास करीत असताना निर्णय प्रक्रियेमध्ये व अंमलबजावणीमध्ये ग्रामस्थांचा सहभाग नसे. शासकीय अनुदानाच्या माध्यमातून गावात राबविलेल्या विकास योजनांचे लाभार्थी जरी ग्रामस्थ असले तरी त्यांना हया योजनांबद्दल आपलेपणा वाटत नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावास मिळालेले शासनाचे अनुदान कोणत्या बाबीसाठी खर्च करावयाचे व कसे खर्च करावयाचे याचा सर्व निर्णय ग्रामसभेमध्ये घेतला जाऊ लागला. शासकीय अनुदानामध्ये १0% लोकवाटा असल्यामुळे हया प्रत्येक विकास कामात गावातील प्रत्येक नागरीकाची मालकी व त्यांच्यामध्ये त्याबाबत आपलेपणाची भावना असल्याचे दिसून आले.

**जलस्वराज्य प्रकल्पाच्या कालावधीत विविध विकास कामासाठी मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,४१,६00=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ४४,३२,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ८६,५00=00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (१0%) | ४९,000=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | **एकूण** | **५८,0९,१00=00** |

## ७. निवडे (तालुका - गगनबावडा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २00५ व हस्तांतरीत तारीख - सप्टेंबर २00९)**

### १. लोकसंख्या :-

निवडे गावची एकूण लोकसंख्या ११00 असून त्यामध्ये ५४३ व पुरूष ५५७ आहेत. त्याचप्रमाणे गावात एकूण २१६ कुटुंबसंख्या असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील ४१ कुटुंबे आहेत.

### २. ग्रामपंचायतीची माहिती :-

निवडे गावची स्वतःची ग्रामपंचायत इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये संगणक देखील आहे. तसेच ग्रामपंचायतीकडे १ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व १ पाणी वितरण कर्मचारी आहे.

ग्रामपंचायत समिती एकूण ७ सदस्यांची असून त्यामध्ये ३ स्त्री सदस्य व ४ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) प्रवर्गातील ९ वी शिक्षण झालेल्या पुरूषांकडे असून उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील १0 वी शिक्षण झालेल्या पुरूषाकडे आहे.

## ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निवडे गावातील तरूण मंडळाचा, महिलांचा व ग्रामस्थांचा गावाच्या विकासकार्यात सहभाग वाढावा, त्यांच्यामध्ये जाणीव जागृती व्हावी म्हणून फारसे प्रयत्न झाले नव्हते, त्यांच्यासाठी अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता.

याचा **<u>परिणाम</u>** म्हणून गावातील तरूण मंडळाचा व महिलांचा सार्वजनिक कार्यक्रमामध्ये/ग्रामविकासात सहभाग कमी असे. ग्रामस्थांची व महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती कमी होती. तर निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग अपवादानेच होता. स्वच्छता, पाण्याची बचत, महिला सक्षमीकरण याबाबत ग्रामस्थांच्यामध्ये जागृतीचा अभाव होता आणि महत्वाचे म्हणजे गावामध्ये गटातटाचे राजकारण होते.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत ग्रामस्थांचा अभ्यासदौरा वारणा उद्योग समूह व ग्रामस्वच्छतेतील आदर्श गाव कांबळवाडीला आयोजित केला.

याचा **<u>परिणाम</u>** असा झाला की, तरूण मंडळाच्यामध्ये ग्रामविकासाबाबत आवड निर्माण होऊन त्यांचा सहभाग वाढला. महिलांच्यामध्ये जागृती होऊन त्या सार्वजनिक कार्यक्रमामध्ये व ग्रामविकासाच्या कार्यात मोठया संख्येने सहभागी होऊ लागल्या. तसेच त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढून त्या निर्णय प्रक्रियेतही सहभागी होऊ लागल्या. एकूण ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. गावातील शाळकरी मुलापासून ते तरूण मंडळ, महिला यांच्यामध्ये स्वच्छता, पाणी, शौचालय, महिला सक्षमीकरण याबाबत जागृती झाली. गावातील गटतट कमी होऊन ग्रामविकासात सांघिक भावना निर्माण झाली.

## ४. <u>पाणी</u> :-

### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ज्या विहिरीवरून नळपाणी पुरवठा योजना गावाने राबविली होती त्या विहिरीची पडझड होऊन ती गाळाने भरली असल्यामुळे गावाला नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत नव्हता. ग्रामस्थांचा पाण्यासाठी वेळ, श्रम व पैसा खर्च होत होता. उन्हाळयामध्ये पाण्याची तीव्र पाणी टंचाई भासत असल्यामुळे ग्रामस्थांचे पाण्यासाठी हाल होत असे.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** पूर्वीच्या विहीरीमधील गाळ काढून दुरूस्तीही करण्यात आली आणि एक नवीन विहीर खोदण्यात आली. पाण्याच्या शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचा नियमित व योग्य प्रमाणात वापर केला जाऊ लागला. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत ग्रामस्थांच्यामध्ये/विशेषता महिलांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यात आली. बारमाही सुरळीत पाणी पुरवठा होऊ लागल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये समाधान आढळले. ग्रामस्थांच्या वेळ, श्रम व पैशाची बचत झाली आहे.

ब) <u>नळजोडणी</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निवडे गावामध्ये एकूण ११६ खाजगी नळजोडणी होती तर ०८ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावामधील १०० कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागे. बहुतांशी खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे पाण्याची नासाडी होत असे. एवढेच नव्हे तर पाण्याचा समान पुरवठा देखील होत नव्हता.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावामधील २०० कुटुंबाकडे खाजगी नळजोडणी आहे तर गावामध्ये ०४ सार्वजनिक नळजोडण्या आहेत. ०४ सार्वजनिक नळावर केवळ १६ कुटुंबे असल्यामुळे पाण्यासाठीची वणवण थांबली. सर्वच नळांना तोटी बसविल्यामुळे पाण्याची नासाडी थांबून सर्वांना समान पाणी पुरवठा होण्यास मदत झाली.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू. ३६० तर सार्वजनिक पाणीपट्टी रू. ७५ होती. पाणीपट्टी वसूली वार्षिक असून ती ग्रामपंचायत कर्मचांऱ्यामार्फत वसूली केली जात असे. ग्रामस्थांच्यामध्ये पाणीपुरवठयाबाबत नाराजी असल्यामुळे पाणीपट्टी नियमित भरत नसत त्यामुळे पाणीपट्टी थकबाकी वाढत होती. पाणीपट्टी वसूलीवरून गावात संघर्ष होत असे.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू.५६० तर सार्वजनिक नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू. १०० करण्यात आली. ६ महिने आगाऊ पाणीपट्टी जमा करणे व ग्रामपंचायत कर्मचांऱ्यामार्फतच पाणीपट्टी वसूली करण्याचे ग्रामसभेत ठरले. दररोज नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत असल्यामुळे

ग्रामस्थांमध्ये समाधान आढळले. पाणीपट्टी वसूलीही समाधानकारक होत असल्याने संघर्ष कमी झाला.

## ५. आरोग्य :-

### अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये २000 फूट गटारी होत्या तर अंदाजे निम्म्या भागात गटारीच नव्हत्या. ज्या भागात गटारी होत्या तेथील ग्रामस्थांच्यामध्ये गटार स्वच्छतेबाबत जागृती नसल्याने जागोजागी गटारी तुंबत असत. तर जिथे गटारी नव्हत्या तेथील सांडपाणी सर्वत्र पसरून गावात दलदल व गलिच्छ वातावरण पसरलेले असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्वच्छतेला अधिक महत्व दिले. गावामध्ये २३00 फूट नवीन गटारी बसविल्यामुळे संपूर्ण गाव गटारीयुक्त झाले. गटार स्वच्छतेबाबत ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यामुळे सहकार्य मिळू लागले. वेळोवेळी तरूण मंडळे, शाळा व ग्रामस्थांच्या कडूनही गटारी स्वच्छ ठेवण्याची काळजी घेतली जाते. ग्रामपंचायतीमार्फत गटारी तुंबणार नाहीत याची काळजी घेत जात असल्याने गावातील वातावरण शुध्द राहण्यास मदत झाली.

### ब) रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्ते चांगले पण अस्वच्छ होते. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत २ ते ३ महिन्यातून एकदा स्वच्छता केली जात असे. गावामध्ये उकिरडयांचे प्रमाण जास्त होते. गावामध्ये सार्वजनिक कचरा कोंडाळया नसल्यामुळे रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला साचलेला कचरा वेळोवळी उचलला जात नसे. एकूणच लोकांच्यामध्ये स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे लोकसहभागातून स्वच्छता केली जात नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावामधून जलवाहिनी टाकत असताना चांगले रस्ते उखडले गेले. ग्रामपंचायती मार्फत वेळोवेळी स्वच्छता केली जाऊ लागली. ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यामुळे गावातील उकिरडयांचे प्रमाण कमी झाले. गावामध्ये २५ ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळया ठेवण्यात आल्या असून वेळोवळी कचरा उचलला जातो. ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटल्यामुळे तरूण मंडळे, बचत

गट, शाळांच्यामार्फत वारंवार ग्रामस्वच्छतेचे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. महिला आपले घर व परिसर तर शाळा आपले मैदान व परिसर स्वच्छ ठेवू लागल्या.

क) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २१६ कुटुंबापैकी केवळ ८० कुटुंबाकडेच शौचालये होती तर उर्वरित १३६ कुटुंबातील लोक उघडयावर शौचास जात. गावामध्ये एकही सार्वजनिक शौचालय नव्हते. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीमध्ये शौचालयाची सुविधाच नव्हती तर गावातील प्रत्येक शाळेत एकच शौचालय होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्वच्या सर्व म्हणजे २१६ कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा झाली. गावातील उघडयावरील हागणदारी बंद झाली आणि गावचे आरोग्यमान सधारले. ग्रामपंचायतीमध्ये एक आणि गावातील शाळामध्ये जादाचे एक शौचालय बांधल्यामुळे आता प्रत्येक शाळेत २ शौचालये सुविधा झाली. गावाला निर्मलग्रामचे २ लाखाचे पारितोषिक मिळाले.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यासाठी जाणीवजागृती व व्यवसायविषयक प्रशिक्षण दिले नव्हते. महिलांच्यामध्ये जागृती नव्हती. व्यवसाय करणाऱ्या महिलांचे प्रमाण खूपच कमी होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना कायदेविषयक, बचतगट विषयक, व्यवसाय विषयक प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाचा अनेक महिलांनी लाभ घेतला. महिलांना बॅकेतील व्यवहाराविषयी व इतर माहिती मिळाली. महिलांच्यामध्ये जाणीव जागृती होऊन अनेक महिलांनी बीजभांडवल घेऊन स्वतंत्र व्यवसाय सुरू केला.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धा आयोजित केल्या जात नसल्याने गावातील स्पर्धामध्ये महिलांचा फारसा सहभाग नव्हता. महिलांनी पुढे यावे व विविध स्पर्धामध्ये सहभागी व्हावे यासाठी खास प्रयत्नही केले नव्हते. महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव व कौटुंबिक आणि सामाजिक दडपण असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांनी पुढे यावे व विविध स्पर्धामध्ये सहभाग घ्यावा म्हणून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न केल्यामुळे गावातील स्पर्धांमध्ये महिला सहभागाचे/स्पर्धकांचे प्रमाण वाढून महिला विविध बक्षीसेही पटकावू लागल्या. महिलांच्या ज्या स्वतंत्र स्पर्धा आयोजित केल्या त्यामध्ये अगदी उत्स्फूर्तपणे सुशिक्षित-अशिक्षित, तरूण-वयस्कर सर्वांनीच भाग घेतला. महिलांच्यामधील न्यूनगंड, पारंपारिक दडपण जाऊन त्यांच्या स्वभावामध्ये मोकळेपणा आला.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** बचत गटाची चळवळ निवडे गावापर्यंत पोहोचली होती पण गावामध्ये फक्त १० महिला बचत गट होते. काही बचत गट सक्रिय होते तर काही केवळ कागदावरच होते. या सर्व बचतगटामध्ये एकसंघता नव्हती. बचत गटांना विविध प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रेरणा मिळत नसल्यामुळे बचत गटामध्ये मरगळ आली होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना एकत्र करणे, मार्गदर्शन करणे, प्रशिक्षित करणे वगैरे उपक्रम राबविल्यामुळे गावातील बचत गटामध्ये जोश निर्माण होऊन ते सक्रिय झाले. गावामध्ये नवीन ५ बचत गट स्थापन झाले. त्या सर्व बचतगटामध्ये एकसंघता वाढीस लागली. बचत गटाच्या माध्यमातून जलस्वराज्यकडून व बॅकाकडून बीजभांडवल घेऊन गावातील महिला व्यवसाय करू लागल्या. महिलांच्यामध्ये स्वाभिमानाची, स्वावलंबत्वाची व आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण झाली.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकांकडे दुर्लक्ष झाले होते. दुर्बल घटकांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग आणि ग्रामसभेतील उपस्थिती कमी होती. दुर्बल घटकापर्यंत पाणी, शौचालय, गटार इ. सुविधा फारशा पोहोचल्या नव्हत्या. विशेष म्हणजे त्यांच्यात जाणीव जागृतीचाही अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकांना विकास कामामध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला त्यासाठी त्यांचे प्रबोधन केले. दुर्बल घटकांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग आणि ग्रामसभेतील उपस्थिती वाढली.

दुर्बल घटकांपर्यंत हळूहळू पाणी, शौचालय, गटार, रस्ते यासारख्या सुविधा पोहोचू लागल्या. दुर्बल घटकामध्ये जाणीव जागृती झाली.

### ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** क्षमता बांधणी, महिला सक्षमीकरण यासारख्या बाबीसाठी अनुदान मिळाले नव्हते. तसेच गावाला ग्रामविकासासाठीचे कोणतेही बक्षीस मिळाले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची गावात अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर या प्रकल्पाच्या माध्यमातून गावाला खालील विविध आर्थिक लाभ मिळाले.**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,२९,५२०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | २४,५६,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५४,०००=०० |
| ४. | जमा लोकवर्गणी (१०%) | २,९३,१३२=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्कार | २,००,०००=०० |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ५,००,०००=०० |
|  | **एकूण** | **३७,३२,६५२=००** |

## ८. कुंभोज (तालुका - हातकणंगले)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - फेब्रुवारी २००९)**

### १. लोकसंख्या :-

कुंभोज गावची एकूण लोकसंख्या १३४७३ असून त्यामध्ये ६५३१ स्त्रिया व ६९४२ पुरूष आहेत. तसेच एकूण १९१० कुटुंबसंख्या असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ४५३ आहे.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

कुंभोजची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. तसेच संगणक सुविधादेखील आहे. ग्रामपंचायतीकडे ५ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व ५ पाणी वितरण कर्मचारी आहेत.

ग्रामपंचायत समितीतील एकूण सदस्य संख्या १५ असून ४ स्त्रीया सदस्य व ११ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष असून त्यांचे शिक्षण १0 वी पर्यंत झालेले आहे तर उपसरपंच पदावर भटकी जमात (एन.टी.) प्रवर्गातील असून त्या निरक्षर आहेत.

## ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कुंभोज गावाने अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते. ग्रामस्वच्छता कार्यक्रमात ग्रामस्थांचा फारसा सहभाग नव्हता. पाणी समस्येबाबतही ग्रामस्थांच्यामध्ये उदासिनता होती. ग्रामसभामध्येही ग्रामस्थांची उपस्थिती मर्यादित होती. गावातील तरूण मंडळांचेही ग्रामविकासामध्ये फारसे सहकार्य नव्हते. गावातील महिलांची ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यक्रमातील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग फार कमी होता. एकूणच ग्रामविकासासाठी ग्रामस्थांच्यामध्ये एकजूटीचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** पहिल्या काही कार्यक्रमाना व ग्रामसभांना ग्रामस्थांची समाधानकारक उपस्थिती नव्हती. ग्रामस्थांच्यामध्ये व विशेषता महिलांच्यामध्ये फारसा उत्साह नव्हता. म्हणून गावात कोपरासभा घेऊन व नोटीस बोर्डवर लिहून गावातील इच्छूक लोकांचा (तरूण,महिला व ग्रामस्थ) कांबळवाडी (ता.राधानगरी) या ग्रामविकासातील आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. अभ्यासदौ-यामध्ये गावातील ग्रामपंचायत सदस्य, जलस्वराज्य समिती सदस्य, तरूण मंडळांचे कार्यकर्ते, महिला व ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामस्वच्छता कार्यक्रम व पाणी प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी ग्रामस्थ हिरीरीने सहभागी होऊ लागले. ग्रामसभेमधील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील ग्रामस्थांचा सहभागही वाढू लागला. तरूण मंडळांनाही श्रमदान, सर्वेक्षण व प्रबोधन कार्यक्रमामध्ये चांगला सहभाग घेतला. त्याचबरोबर गावातील महिलांनी व महिला बचत गटांनी ग्रामसभेतील उपस्थिती वाढविली तर शौचालयाबाबत प्रबोधन व स्वच्छता फेरी इ. मध्ये सक्रिय सहभाग घेतला.

ग्रामविकासासाठी गावातील गटातटाचे राजकारण बाजूला ठेऊन राजकीय पक्षांनी एकसंघता दाखविली.

### ४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

#### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावापासून ४ कि.मी. अंतरावरील वारणा नदीवरून कुंभोज गावाला पाणीपुरवठा होत होता. पाणीयोजना जुनी असल्यामुळे जॅकवेल पडझड, वीजपंप वारंवार नादुरूस्त, जलवाहिनीची वारंवार गळती होत असे व लोकसंख्येच्या प्रमाणात पाण्याच्या साठवण टाकीची क्षमताही (२.२५ लाख लिटर) कमी असल्यामुळे ग्रामस्थांना दोन ते तीन दिवसातून एकदा होणारा पाणी पुरवठा देखील अपुरा होत असे. गावात पर्यायी व्यवस्था म्हणून १२ विंधन विहिरी होत्या पण दिवसेंदिवस त्यामधील पाण्याचा साठाही कमी कमी होऊ लागला होता. त्यामुळे ग्रामस्थ व महिलांचे पाण्यासाठी हाल होत होते. परिणामी पाणी प्रश्नावरून ग्रामस्थांच्यामध्ये दूषित वातावरण निर्माण झाले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांनी सर्वानुमते वारणा नदीवरून नळपाणी पुरवठा योजना राबविण्याचे निश्चित करून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून नदीवर नवीन जॅकवेल बांधण्यात आले. नदीपासून गावापर्यंत नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. नवीन जास्त क्षमतेचे वीजपंप बसविण्यात आले. त्याचबरोबर पाणी साठवणीसाठी ३.२५ लाख लिटर क्षमतेची एक नवीन टाकी बांधली. गावातील पाणी वितरण व स्वच्छता कर्मचाऱ्यांना देखभाल दुरूस्तीचे प्रशिक्षण देण्यात आले. याचा परिणाम म्हणून ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसा (प्रतिमाणसी ४0 लिटर) पाणी पुरवठा होऊ लागला आहे. ग्रामस्थ व महिलांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबली आहे. गावातील पाणीप्रश्नावरून निर्माण झालेले वातावरण निवळले असून ग्रामस्थांच्यामध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

#### ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २३0८ कुटुंबापैकी केवळ १४00 कुटुंबाकडे खाजगी नळजोडणी होती तर सार्वजनिक नळांची संख्या ४0 होती. गावातीाल ९0८ कुटुंबे सार्वजनिक नळावर व इतर स्त्रोतावर अवलंबून होती पाण्याची टंचाई

असल्यामुळे महिला व ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण होत असे त्यातून वादविवाद वाढले जात होते. बहुसंख्य खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी (Cock) नसल्यामुळे पाणी वाया जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गावातील सार्वजनिक नळजोडणी (Public Stand) बंद करून प्रत्येक घरामध्ये स्वतंत्र नळजोडणी असावी अशी अपेक्षा आहे. परंतु प्रत्यक्षात गावामध्ये जे चित्र दिसते ते असे - गावातील २३०८ कुटुंबापैकी केवळ १४५० कुटुंबानीच वैयक्तिक नळजोडणी घेतल्याचे दिसून आले तर सार्वजनिक नळजोडणी संख्या ४० आहे. अजूनही ग्रामस्थ नवीन नळजोडणी घेत असले तरी त्याची गती मात्र खूपच मंद आहे. गावात सार्वजनिक नळजोडणी बंद करण्याबाबत ठोस अंमलबजावणीचा अभाव दिसून येतो. गावामध्ये काही सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे खूपच पाणी वाया जात आहे.

**क) <u>पाणीपट्टी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** खाजगी नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू.४५० तर सार्वजनिक नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू.७५ होती. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वसूल केली जात असे. गावाला नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये नाराजी होती त्यामुळे ते पाणीपट्टी वेळेत भरत नसत. तर काही ग्रामस्थ मुद्दाम राजकीय द्वेषापोटी पाणीपट्टी वेळेत भरत नसल्यामुळे थकबाकी वाढत जाऊन ग्रामपंचायतीला देखभाल दुरूस्ती करणे अडचणीचे होत असल्यामुळे योजना मोकडकळीस येई आणि अर्थातच वरील सर्व बाबींच्यामुळे सामान्य लोकांचे व महिलांचे पाण्यासाठी हाल होत होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू. ७५० तर सार्वजनिक नळासाठी वार्षिक पाणीपट्टी रू.१०० करण्यात आली. सदर पाणीपट्टी वसुलीचे अधिकार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनाच दिले. तसेच नवीन नळजोडणी देताना ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी घेण्यात यावी असा ग्रामसभेमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. देखभाल दुरूस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीकडेच देण्यात आली. तर ग्रामसभेमध्ये पाणीपट्टी वसुलीसाठी कडक धोरण राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये ७०५० मीटर लांबीच्या गटारी असल्या तरी आणखी ८८० मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. तसेच गावामध्ये कोठेही बंदिस्त गटारीच नव्हत्या. गावासाठी जेवढे स्वच्छता कर्मचारी पाहिजे होते त्यापेक्षा त्यांची संख्या कमी होती. उपल्ब्ध असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याही कामचुकारपणामुळे गटारींची स्वच्छता वेळोवेळी होत नव्हती. एकूणच ग्रामस्थांच्यामध्येही आरोग्याविषयी जागृती नव्हती. गावातील काही भागातील गटारी अवजड वाहन जाऊन फुटल्यामुळे निचरा व्यवस्थित होत नसे. परिणामी सांडपाण्याने खाचखळगे भरल्यामुळे दुर्गंधी, अस्वच्छता वाढली. साहजिकच गावातील डासांचे व आजारांचे प्रमाणही वाढले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावामध्ये प्रथमता ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ यांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करून त्यांना जबाबदारीची जाणीव करून दिली. ग्रामस्थ आपले घर, अंगण व परिसर स्वच्छ ठेऊ लागले आहेत. ग्रामपंचायतीने ३८० मीटर बंदिस्त गटारी बांधल्या व ज्या भागात गटारीच नाहीत तेथे सांडपाणी जाण्यासाठी ग्रामस्थांच्या श्रमदानातून चर काढण्यात आली. ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता कर्मचारी पूर्वीइतकेच आहेत. पण त्यांच्यामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण झाल्यामुळे अगदी काटेकोर वेळापत्रकानुसार गटार स्वच्छता केली जाते. वरील सर्व बाबींमुळे गावचे आरोग्यमान सुधारण्यास खूपच मदत झाल्याचे दिसते.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायत कर्मचारीच करीत असत. ग्रामपंचायतीकडे स्वच्छता कर्मचारी कमी असल्यामुळे गावातील रस्त्यावर केरकचरा, प्लॅस्टिक कागद रस्त्याच्या दुतर्फा गाजर गवत वाढलेले व कचऱ्याचे ढिग दिर्घकाळ पडून राहिल्यामुळे ते कुजून गावात दुर्गंधी पसरत असे. शिवाय गावात डुकरांचे व डासांचे प्रमाणही वाढले होते. गावातील अस्वच्छता व कचरा न उचलल्यामुळे ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांच्यामध्ये सतत वादविवाद होत असे. गावात एकही कचरा कोंडाळी नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात प्रथमता ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व प्रबोधन करण्यात आले. ग्रामस्थांचेही स्वच्छतेबाबत

प्रबोधन करून त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण केली. गावात १२ ठिकाणी कचरा कोंडाळी ठेवण्यात आल्या. गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट व ग्रामस्थांमार्फत सामूहिक ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित करून ग्रामपंचायतीला सहकार्य केले. घरामधील व परिसरातील कचरा एकत्र करून कचरा कोंडाळीत टाकण्याची सवय ग्रामस्थांना लागली आहे. ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारीही प्रामाणिकपणे आपल्या कार्यक्षमतेनुसार स्वच्छता व कचरा उचलण्याचे काम वेळोवेळी करू लागले. या प्रकल्पामुळे गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली शिवाय ग्रामस्थांना यामुळे शांतता व समाधान मिळाले.

ब) **शौचालय** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २३०८ कुटुंबापैकी १८५० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती तर १२ सार्वजनिक शौचालये होती. गावातील ४५८ कुटुंबाकडे शौचालय नसल्यामुळे काहीजण सार्वजनिक शौचालयात तर काहीजण उघडयावर शौचास जात. सार्वजनिक शौचालयाचा वापर योग्य व काळजीपूर्वक केला जात नसल्याने काही शौचालयात वारंवार बिघाड होऊन ते बंद पडत असत. गावातील प्रत्येक शाळेमध्ये व अंगणवाडीमध्ये प्रत्येकी १ शौचालय होते. उघडयावरील हागणदारीमुळे गावात व गावाबाहेर घाणीचे साम्राज्य पसरले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सदर प्रकल्पामध्ये हागणदारीमुक्त गाव या संकल्पनेला महत्व असल्यामुळे सहाय्यकारी संस्था, जलस्वराज्य समिती, शाळा व तरूण मंडळांच्यावतीने ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले.

याचा **परिणाम** असा झाला की, गावाने निर्मलग्राम स्पर्धेत भाग घेतला. गृहभेटी, सर्वेक्षण, कोपरासभा, माहितीपट इ. माध्यमांचा प्रबोधनासाठी सातत्याने वापर केला गेल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये स्वच्छता व शौचालयाबाबत जागृती निर्माण झाली. सद्या गावात वैयक्तिक शौचालये १८१० असून उर्वरित कुटुंबासाठी २० सार्वजनिक शौचालये आहेत. या सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व काळजी घेण्यासाठी ५ कुटुंबासाठी एक शौचालय अशी जबाबदारी दिली. उघडयावर एकही व्यक्ती शौचास जात नाही. परिणामी ग्रामस्थांचे आरोग्य सुधारले आणि गावाला केंद्र शासनाचे निर्मलग्रामचे ५ लाखाचे पारितोषिक मिळाले.

## ६ . महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिलांसाठी कोणत्याच प्रकारचे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे त्यांचा स्वतंत्र व्यवसाय करण्याकडे कल नव्हता . महिलांच्यामध्ये जाणीव जागृतीचा आणि आत्मविश्वास अभाव होता .

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांच्या सक्षमीकरणावर भर देऊन त्यांना क्षमताबांधणी प्रशिक्षण देण्यात येऊ लागले . महिलांना व्यवसाय प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला . महिला शेळीपालन, म्हैसपालन, शेवया तयार करणे वगैरे व्यवसाय करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनू लागल्या .

### ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये स्पर्धांचे आयोजन कमी प्रमाणात होत असे . त्यातच महिलांचा सहभाग फारच कमी होता . महिलांची स्पर्धा व पुरूषांची स्पर्धा असा भेदभाव केला जात असल्याने गावातील बहुतांशी विवाहित, मध्यमवयीन व अशिक्षित महिला स्पर्धेमध्ये सहभागी होत नसत .

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना सक्षम करण्यासाठी व त्यांची पारंपारिक मानसिकता बदलून त्यांना विविध कार्यक्रमात व स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रवृत्त व्हाव्यात म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले व त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊ लागले . परिणामी विविध कार्यक्रमामध्ये महिला बहुसंख्येने उपस्थित राहू लागल्या व कार्यक्रमात सहभागीही होऊ लागल्या . हळूहळू स्पर्धेमध्ये महिलांचे सहभागी होण्याचे प्रमाण वाढले आणि स्त्रियांची स्पर्धा व पुरूषांची स्पर्धा असा भेदभाव कमी झाला . गावामधील विविध स्तरातील महिला स्पर्धेमध्ये सहभागी होऊ लागल्या व बक्षीसेही पटकावू लागल्या . अनेकांना आपल्या अंगी असणाऱ्या विविध सुप्त गुणांची जाणीव पहिल्यांदा झाली . तर काही जणींना संसाराच्या रहाटगाडयात अडकल्यामुळे आपल्याकडील गुणांचा विसर पडला होता त्याची पुन्हा जाणीव होऊन त्या सक्रिय बनल्या .

### ब) बचत गट :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** बचत गटाची चळवळ कुंभोज गावापर्यंत पोहचली असल्यामुळे गावामध्ये ५७ महिला बचत गट होते . गावातील काही बचत गटच प्रभावीपणे

काम करीत होते तर काही बचत गट केवळ कागदावरच होते. विशेष म्हणजे त्यांच्यात सांघिक भावनेचा अभाव होता. एकाबाजूने बचत गटांना मार्गदर्शन, विविध प्रशिक्षण व प्रेरणा मिळत नव्हती. तर दुसऱ्या बाजूने गावातील अनेक गरीब व सामाजिकदृष्टया मागास महिलांच्यापर्यंत या बचत गटाबाबत माहिती पोहचत नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील पूर्वीच्या बचत गटांचे सर्वेक्षण करून, त्यांच्याशी चर्चा करून वस्तूस्थिती समजावून घेतली. गावातील अस्तित्वात असणाऱ्या पण मोडकळीस आलेल्या बचत गटांना मार्गदर्शन केले व प्रेरणा दिली. गावात दारिद्रयरेषेखालील, अनुसूचित जाती जमाती व खुल्या प्रवर्गामध्ये नवीन ५१ बचत गट स्थापन केले. गावातील एकूण १०८ बचत गटांचा एक महासंघ निर्माण केला व त्यांच्यामध्ये सांघिकभावना निर्माण केली. सर्व बचत गटातील महिलांची कोल्हापूरातील स्वयंसिध्दा प्रकल्पाला भेट आयोजित केली. बचत गटातील महिलांच्यामध्ये स्वच्छता, पाणी, आरोग्य याबाबत जाणीव जागृती झाल्यामुळे ग्रामविकासामध्ये त्यांची मोलाची मदत मिळत आहे.

### ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, पिडीत आणि अनुसूचित जाती जमातीतील लोकांची ग्रामसभेत उपस्थिती नगण्य होती. गावातील विकासकार्यांमधील दुर्बल घटकांचा सहभाग अगदीच कमी होता. गावातील पाणी, आरोग्य, गटारी, रस्ते या सुविधाही त्यांच्यापर्यंत कमी प्रमाणात पोहचत होत्या. त्यांच्या मनामध्ये ग्रामसभा, गावविकास या गोष्टीबाबत अनास्था निर्माण झाली होती. ग्रामपंचायतीचेही दुर्बल घटकांच्याकडे दुर्लक्ष होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमता: गावामधील दुर्बल घटकांचे सर्वेक्षण व वस्तुस्थितीचा अभ्यास करण्यात आला. त्यांच्या बैठका व स्वतंत्र कार्यक्रम घेऊन जाणीव जागृती करण्यात आली. दुर्बल घटकांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढू लागली. तर बचत गट, ग्रामविकास कार्यात सहभाग वाढू लागला. दुर्बल घटकांपर्यंत विविध माध्यमातून पाणी, शौचालये, रस्ते व गटारी इ. सोयी सुविधा पोहचू लागल्या.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील वेगवेगळया विकासात्मक कार्यासाठी शासकीय अनुदान जरी मिळाले असले तरी त्याचा विनियोग कसा करावा याचे अधिकार ग्रामसभेला नव्हते. तसेच क्षमताबांधणी, महिला सक्षमीकरण या बाबीसाठी अनुदान मिळाले नव्हते. गावात मंदिरे बांधण्यासाठी लोकवर्गणी जमा केली जात होती पण पाणी, स्वच्छता व गटारी यासाठी लोकवर्गणी जमा केली जात नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र गावातील पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आणि यातून ग्रामविकास साधण्यासाठी शासनाने जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाला जे ९0% अनुदान दिले व १0% लोकवाटा ग्रामस्थांनी दिला त्याचा तपशील खालीलप्रमाणे

**जलस्वराज्य प्रकल्पाच्या कालावधीत विविध विकास कामासाठी मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ५,१९,४९0=00 |
| २. | जलस्वराज्य उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ७७,६२,000=00 |
| ३. | जलस्वराज्य उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ६,0८,000=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ८,९२,८00=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ५,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ६,८१,४८५=00 |
| | **एकूण** | **१,0९,६३,७७५=00** |

# ९. मौजे मुडशिंगी (तालुका - हातकणंगले)

(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - उपलब्ध झाली नाही)

## १. लोकसंख्या :-

मौजे मुडशिंगी गावची एकूण लोकसंख्या २३६४ असून त्यामध्ये ११६५ स्त्रिया व ११९९ पुरूष आहेत. तसेच एकूण ४४२ कुटुंब संख्या असून त्यामध्ये १२९ दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

मौजे मुडशिंगीची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे व संगणक सुविधा देखील आहे. तसेच ग्रामपंचायतीकडे १ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी असला तरी स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी मात्र नसल्याचे दिसून आले.

मुडशिंगीच्या ग्रामपंचायत समितीतील एकूण सदस्य संख्या ९ असून ३ स्त्री सदस्य व ६ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी) प्रवर्गातील ७ वी शिक्षण झालेले स्त्री तर उपसरपंच पद इतर मागासवर्ग (ओ.बी.सी) प्रवर्गातील १0 वी शिक्षण झालेले पुरूष भूषवित आहेत.

## ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** मुडशिंगी गावातील महिला व ग्रामस्थांचा कोठेही अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता ग्रामस्थांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची जागृती नसल्यामुळे महिलांचा ग्रामसभेतील व महिलांचा सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग कमी होता. महिला बचत गट स्थापन करण्याबाबत त्यांच्यामध्ये उदासीनता होती. तरूण मंडळाचा ग्रामविकासातील सहभाग अल्प होता. ग्रामस्थांची ग्रामसभेतील व सार्वजनिक कार्यक्रमातील उपस्थिती व सहभाग कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांचा, तरूण मंडळांचा व महिलांचा ग्रामविकासातील सहभाग वाढावा म्हणून कांबळवाडी (ता.राधानगरी) व धामणेर (ता.कोरेगाव) येथे अभ्यासदौरा काढल्यामुळे महिलांची ग्रामसभेला उपस्थिती वाढून निर्णय प्रक्रियेतही सहभाग वाढला

शिवाय त्या सार्वजनिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊ लागल्या गावातील पूर्वीचे महिला बचत गट सक्रिय झाले व नवीन बचत गटात वाढ होऊ लागली. तरूण मंडळांचा ग्रामविकासातील सहभाग वाढला. ग्रामस्थांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढून निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. तसेच त्यांची सार्वजनिक ग्रामस्थांची कार्यक्रमातील उपस्थितीही वाढली.

## ४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** मौजे मुडशिंगी गावाला एकाच विहीरीवरून पाणी पुरवठा होत होता. ग्रामस्थांना प्रतिमाणसी २० ते २५ लीटर प्रमाणे दोन दिवसातून एकदा पाणी पुरवठा केला जात असे. गावातील बहुतांशी नळांना तोटी नसल्यामुळे पाण्याची नासाडी होत आसे. तसेच सर्वभागात समान पाणी पुरवठा होत नसे. उन्हाळयात पाणी टंचाई जास्त असल्यामुळे महिलांचे खूप हाल होत व त्यांच्यामध्ये पाण्यासाठी सतत भांडण तंटा होत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** गावाला ३ विहीरीवरून प्रतिदिनी प्रतिमाणसी ४० लिटर प्रमाणे नियमित व शुध्द पाणी पुरवठा होत आहे. पाणी वापराबाबत चांगली जागृती झाल्यामुळे नागरिकांनी प्रत्येक नळाला तोटी बसविल्यामुळे पाण्याचा अपव्यय थांबला असून सर्व भागातील ग्रामस्थांना समान पाणी पुरवठा होईल याची खबरदारी घेतली जाते. बारमाही सुरळीत पाणी पुरवठा होत असल्यामुळे महिलांचा त्रास कमी होऊन गावातील पाण्यासाठीचा भांडणतंटा कमी झाला आहे.

### ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील २५० कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती तर गावात ०७ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावातील २०० कुटुंबे पाण्यासाठी सार्वजनिक नळ व इतर जलस्त्रोतावरून पाणी भरण्यासाठी भटकंती करीत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्वच्या सर्व म्हणजे ४५० कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडण्या असल्यामुळे गावात एकही सार्वजनिक नळजोडणी नाही. गावातील लोकांनी घरोघरी नळजोडण्या घेतल्यामुळे त्यांची पाण्यासाठीची भटकंती थांबली.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी दर रू.३६० तर सार्वजनिक नळजोडणी दर रू. ७५ होता. पाणीपुरवठा नियमित नसल्यामुळे ग्रामपंचायतीची पाणीपट्टी वसूली ६०% होती. पाणीपट्टी न भरणाऱ्या ग्रामस्थांची नळजोडणी रद्द करण्याची तरतूद असली तरी पण राजकीय हस्तक्षेप व इतर कारणामुळे काटेकोर अंमलबजावणी होत नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळजोडणी पाणीपट्टी दर रू.५०० करण्यात आला तर सार्वजनिक नळजोडणीच दिली नाही. पाणीपुरवठा पुरेसा व नियमित होऊ लागल्यामुळे ग्रामस्थांनी आगाऊ ६ महिने पाणीपट्टी भरली. पाणीपट्टी नियमित न भरणाऱ्यांची नळजोडणी रद्द करण्याची काटेकोरपणे अंमलवजावणी करण्याचा ग्रामसभेत निर्धार करण्यात आला आहे.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात १५०० मीटर लांबीच्या गटारी असल्या तरी आणखी जादा २००० मीटर गटारीची आवश्यकता होती. गावातील गटार नसलेल्या भागातील सांडपाणी रस्त्यावर पसरून, साचून दुर्गंधी व डासांचा त्रास वाढला होता गावात स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे वेळोवेळी गटार स्वच्छता होत नव्हती आणि गटारसफाईसाठी लोकसहभाग नव्हता. साहजिकच अस्वच्छता व दुर्गंधीमुळे ग्रामस्थांचे आजारी पडण्याचे प्रमाण वाढले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** गावात नवीन १००० मीटर गटार बसविल्यामुळे एकूण २५०० मीटर गटारी झाल्या तरीदेखील गावात जादा १००० मीटर गटारीची आवश्यकता आहे. गटार नसलेल्या भागातही लोकसहभागातून श्रमदान करून सांडपाण्यासाठी चर काढून घेतली परिणामी दुर्गंधी व डासांचा त्रास कमी झाला. गावात स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे शाळा, तरूण मंडळे व महिलांच्यामार्फत वेळोवेळी गटार स्वच्छता केली जाते. लोकांच्यामध्ये आपल्या घरासमोरील गटार आपण स्वच्छ करण्याबाबत जागृती झाल्यामुळे गावातील अस्वच्छता कमी झाली परिणामी आजाराचे प्रमाणही कमी झाले.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे रोजंदारी कर्मचाऱ्यांमार्फत ३ ते ४ महिन्यातून एकदा विशिष्ट कार्यक्रमानिमित्ताने ग्रामस्वच्छता केली जात असे. गावात सार्वजनिक कचरा कोंडाळया नसल्यामुळे ग्रामस्थ आपले घर व अंगण स्वच्छ करून तो केरकचरा उकिरडयात किंवा कोठेही मोकळया जागेत टाकत असत. गावात उकिरडयाचे प्रमाण जास्त असल्यामुळे व गावातील कचरा वेळच्यावेळी उचलला जात नसल्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** देखील ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसलेला आढळला. रोजंदारी कर्मचारी व गावातील शाळा, तरूण मंडळे व महिला बचत गटांमार्फत वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आखले जात आहेत. ग्रामस्थांमध्ये आपले घर व अंगण स्वच्छ करण्यावरोबरच स्वत:चा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जागृती होऊन तशी त्यांना सवय लागली आहे. गावात १२ ठिकाणी सार्वजनिक कोंडाळया ठेवल्या असल्यामुळे ग्रामस्थांना केरकचरा कोंडाळीत टाकण्याची सवय लागली आहे. प्रबोधनामुळे गावातील अनेक ग्रामस्थांनी उकिरडे गावाबाहेर नेल्यामुळे व गावातील कचरा वेळच्यावेळी उचलला जात असल्यामुळे गावातील अस्वच्छता कमी होण्यास मदत झाली.

क) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील केवळ ११० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती तर एकही सार्वजनिक शौचालय नव्हते. तसेच अंगणवाडीतही शौचालय नव्हते. शौचालय नसणारी ३४० कुटुंबे व शौचालय असणाऱ्या कुटुंबातील काही ग्रामस्थ उघडयावर शौचास जात असल्यामुळे पर्यावरण, प्रदूषण व रोगराई खूप वाढली होती. विशेषता महिलांना उघडयावरील शौचास जावे लागत असल्यामुळे त्या लाजीरवाणे जीवन जगत असत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलवजावणी सुरू झाल्यानंतर** प्रबोधनामुळे गावात नवीन ३२० कुटुंबानी वैयक्तिक शौचालये बांधली. तर ग्रामपंचायतीने गावात १० सार्वजनिक शौचालये बांधली. शौचालय बांधण्याबरोबरच शौचालयाचा वापर करण्याची सवय लागल्यामुळे गावातील कोणीही उघडयावर शौचास जात नाही. गावातील प्रत्येक शाळेत व अंगणवाडीत शौचालयाची सुविधा आहे. महिला शौचालयाचा वापर करीत असल्यामुळे

स्वाभिमानी जीवन जगत आहेत. पर्यावरणाचे प्रदूषण थांबून रोगराई कमी झाली असून गावाला २ लाखाचा केंद्रशासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार मिळाला आहे.

### ६. महिला सक्षमीकरण :-

#### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यासाठी कोणत्याही प्रशिक्षणाचे आयोजन केले नव्हते. महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमतरता व आर्थिकदृष्टया स्वावलंबनाचा व जाणीव जागृतीचा अभाव होता. महिलांच्यामध्ये सर्वसाधारण ज्ञान व प्रशिक्षणाची कमतरता होती त्यामुळेच स्वतंत्र व्यवसाय व नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण कमी होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना कायदेविषयक, व्यवसाय, बचत गट, लिंग समभाव इ. भावतचे प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढून त्यातील काही महिला आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनल्या. महिलांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण होऊन त्यांच्या सर्वसामान्य ज्ञानामध्ये भर पडली. प्रशिक्षित महिलांची संख्या वाढल्याने स्वतंत्र व्यवसाय व नोकरी करणाऱ्या महिलांची संख्या वाढली.

#### ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धा घेतल्या जात नसत त्यामुळे सर्वसाधारण स्पर्धेमध्ये महिलांचा सहभाग खूपच कमी होता. महिलांनी पुढे यावे स्पर्धेत सहभाग घ्यावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले नव्हते त्यामुळे महिलांच्या सुप्तगुणांना संधी मिळत नव्हती. साहजिकच पारंपारिक कलागुणांचा ऱ्हास होतो की काय अशी परिस्थिती होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जनरल स्पर्धेमध्ये महिला पुरूषांच्याबरोबरीने स्पर्धेत उतरू लागल्या. महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले जाऊ लागले. महिलांना पुढे आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. महिलांच्यासाठी रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व गीतगायन इ. स्पर्धा ठेवल्यामूळे त्यांच्या सुप्त गुणांना संधी मिळाली. उखाणे, फुगडी, गौरी गीते इ.मुळे पारंपारिक संस्कृतीचे जतन केले जात आहे.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिला बचत गटाबाबत फारशी जागृती नसल्यामुळे गावात केवळ ०४ महिला बचत गट होते तर काही बचत गट (निष्क्रीय) कागदावरच होते. बचत गटातील महिलांना मार्गदर्शन व प्रेरणेचा अभाव होता तर असणाऱ्या बचत गटामध्ये समन्वय नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात महिला बचत गटाबाबत जागृती केल्याने नवीन १६ बचत गटांची भर पडली. निष्क्रिय बचत गटांची समस्या अभ्यासून ती दूर केल्यामुळे ते बचत गट सक्रिय झाले. बचत गटातील महिलांना विविध प्रशिक्षण, बीजभांडवल पुरवठा बाबत मार्गदर्शन व प्रेरणा दिली. गावातील सर्व बचत गटामध्ये समन्वय निर्माण होऊन सांघिकता वाढीस लागली.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकांची ग्रामसभेमधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग कमी होता. कारण त्यांच्यात जाणीव जागृतीचा अभाव होता. दुर्बल घटकांपर्यंत रस्ते, पाणी, शौचालय, गटार या सुविधा पोहचत नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** दुर्बल घटकांचे प्रबोधन केल्यामुळे ग्रामसभेमध्ये उपस्थिती वाढू लागली. शिवाय ते ग्रामविकास कार्यात हळूहळू सहभागी होऊ लागले. दुर्बल घटकांच्यामध्ये स्वच्छता, पाणी, आरोग्य याबाबत जाणीव जागृती केली त्यामुळेच त्यांच्यापर्यंत पाणी, गटार व शौचालय इ. सुविधा पोहोचू लागल्या आहेत.

## ८. <u>पर्यावरण संवर्धन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** मुडशिंगी ग्रामस्थामध्ये पर्यावरणाबाबत फारशी जागृती नसल्यामुळे लोक वृक्षतोड करीत शिवाय ते उघडयावर शौचास बसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांच्यासाठी आयोजित केलेल्या विविध व्याख्याने, प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्याचा प्रभाव पडून गाव १००% हागणदारीमुक्त तर झाले आहेच पण त्याचबरोबर हातकणंगले महामार्गापासून ते मुडशिंगी गावापार्यंत ग्रामस्थांनी श्रमदानातून २०० ते २५० झाडे लावून ती जगविण्याचे काम करून

पर्यावरणाचे संवर्धन केले आहे. तसेच गावात १ बोअर पुनर्भरण, ३ विहीरीवर बंधारा, 0३ पक्के बंधारे बांधून पाणी संवर्धनाचेही काम केले आहे.

## ९. आर्थिक लाभ :

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** मुडशिंगी गावाला क्षमताबांधणी, महिला सक्षमीकरण या गोष्टीसाठी शासनाचे अनुदान मिळाले नव्हते. तसेच ग्रामविकास कामाचे बक्षिसही मिळाले नव्हते किंवा ग्रामविकास कार्यात लोकवर्गणीही कधी जमा केली नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर मात्र** मुडशिंगी गावातील सर्व घटकांना सहभागी करून त्यांची क्षमताबांधणी करण्यावर भर दिला. त्यांना विविध प्रकारची माहिती व प्रशिक्षण दिले. प्रत्येकाच्या मनामध्ये ग्रामविकासाबाबत आपुलकीची भावना निर्माण केली. गावातील पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरणासारख्या बाबींसाठी शासनाने अनुदान दिले.

**जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावाला शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,१0,२२0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ५४,५२,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,0९,२५0=00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (१0%) | ६,३९,000=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ६,६७,११४=00 |
| | **एकूण** | **७३,७७,५८४=00** |

# १० . रेंदाळ ( तालुका - हातकणंगले )

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - जानेवारी २०१०)**

## १ . लोकसंख्या :-

रेंदाळ गावची एकूण लोकसंख्या १५६५७ असून त्यामध्ये स्त्रिया ७४५८ व पुरूष ८१९९ आहेत. तसेच गावात एकूण कुटुंबसंख्या २५५७ असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबसंख्या ३१७ आहे.

## २ . ग्रामपंचायतीची माहिती ः-

रेंदाळ गावची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. तसेच संगणक सुविधादेखील आहे. ग्रामपंचायतीकडे ४ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व ४ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी आहेत.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण १७ सदस्य असून त्यामध्ये ५ स्त्रिया सदस्य व १२ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद भटकी जमात (एन.टी.) प्रवर्गातील १० वी शिक्षण झालेल्या पुरूषाकडे तर उपसरपंच पद अनुसूचित जाती (एस.सी.) प्रवर्गातील ५ वी शिक्षण झालेल्या पुरूषाकडे आहे.

## ३ . अभ्यासदौरा ः-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** रेंदाळ गावच्या ग्रामस्थांचा ग्रामविकाससंदर्भात अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता. ग्रामस्थ एकत्र येऊन गावातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी, ग्रामस्वच्छता करण्यासाठी श्रमदान करीत नव्हते तर तरूण मंडळांचे ग्रामविकास कार्यात समाधानकारक सहकार्य नव्हते. गावातील महिलांचा ग्रामसभा, ग्रामविकास कार्यात सहभाग खूपच कमी होता. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी बचत, स्वच्छता, आरोग्य व महिला सक्षमीकरणासंदर्भात फारशी जागृती नव्हती. ग्रामपंचायतही पाणी प्रश्न, स्वच्छता, आरोग्य व महिला सक्षमीकरणासारख्या बाबीकडे गांभिर्याने पाहत नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमता: ग्रामस्थांच्या व महिलांच्या बैठका व कोपरासभा आयोजित करून प्रबोधन करण्यात आले. गावातील स्त्री - पुरूषांचा ग्रामस्वच्छता कार्यक्रमात आदर्श काम केलेल्या कवठेपिराण (ता.मिरज) या

गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. त्यामध्ये बहुसंख्येने महिला व पुरूष सहभागी झाले. अभ्यासदौऱ्याचा परिणाम म्हणून ग्रामसभामधील महिला व पुरूषांची उपस्थिती वाढली. गावात ग्रामपंचायतीमार्फत, तरूण मंडळे व महिला बचत गटामार्फत ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. त्याचप्रमाणे स्वच्छता, शौचालय, पाण्याची बचत वगैरे गोष्टीबाबत ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यासाठी शाळा, तरूण मंडळे व महिला बचत गटामार्फत प्रभातफेरी, घोषवाक्ये स्पर्धा आयोजित करणे, घरोघरी स्वच्छता संदेश पोहचविणे इ. कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. गावातील महिलांच्यासाठी स्वयंसिध्दा कोल्हापूर येथे अभ्यासदौरा आयोजित करून महिलांना उद्योगासंबंधी माहिती देण्यात आली. त्यामध्ये १0३ महिला सहभागी झाल्या होत्या.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एम.जी.पी.) ची पाचगाव पाणी पुरवठा योजना सुरू होती. सदर पाणी योजना २५ ते ३0 वर्षापूर्वीची असून पंचगंगा हया नदीमधून राबविली होती परंतु अलिकडे पंचगंगेचे पाणी मोठया प्रमाणात प्रदूषि झाले आहे. पाणी योजना जुनी असल्यामुळे जलवाहिन्या गळती, वीजपंप बिघाड, जॅकवेल नादुरूस्त वगैरे कारणामुळे ग्रामस्थांना ८ ते १0 दिवसातून एकदा पाणी मिळत होते. हया पाणी योजनेमध्ये सहभागी असणारी गावे औद्योगिक असल्यामुळे हया गावांची लोकसंख्या खूप वाढली होती त्यामुळेही पाणी पुरवठा पुरेशा प्रमाणात होत नव्हता. ग्रामस्थांना पाणी व्यवस्थित मिळत नसल्यामुळे ग्रामस्थ वेळेत पाणीपट्टी भरत नसत त्यामुळे एखादया गावांने वीजबील वेळेत भरले नाही तर पाचही गावाचा पाणी पुरवठा बंद केला जाई. त्याचा फटका सर्व ग्रामस्थांना बसे. हया पाच गावातील ग्रामस्थांना पाणीटंचाई प्रदूषित पाणी वगैरेना सातत्याने सामोरे जावे लागे. पाणी प्रश्नावरून ग्रामस्थांच्यामध्ये व राजकीय गटातटामध्ये सातत्याने संघर्ष होत असे. शिवाय पाण्यासाठी ग्रामस्थांचा वेळ, पैसा व श्रम वाया जात होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावापासून ८ कि.मी. अंतरावरील दूधगंगा हया नदीवरून पाणी आणण्याचा ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये एकमुखाने निर्णय घेतला. सदर योजना राबविण्यासाठी पडणारे कष्ट व १0% लोकवर्गणीच्या रूपाने

येणारा आर्थिक बोजा स्विकारण्याची ग्रामस्थांनी मनापासून तयारी दाखविली. नदीवर स्वतंत्र जॅकवेल, नवीन दर्जेदार कंपनीच्या जलवाहिन्या, ७५ अश्वशक्तीचे २ वीजपंप, ६ लाख लीटर क्षमतेचा जलकुंभ व स्वतंत्र जलशुध्दीकरण केंद्र इ. सुविधा गावाने जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण केल्या. गावामध्ये सर्व प्रभागात नवीन जलवाहिन्या रस्त्याच्या मध्यभागातून टाकण्यात आल्यामुळे गटारीतून गेलेल्या पाईपच्या गळतीमुळे होणारे पाणी प्रदूषण थांबले. पाणी शुध्दीकरणासाठी जलशुध्दीकरण केंद्र व टी.सी.एल. पावडरचा वापर आणि मीटर पध्दतीचा स्वीकार केल्यामुळे ग्रामस्थांना दररोज शुध्द व पुरेसे पाणी (प्रतिमाणसी ४० लीटर) मिळू लागले आहे.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २५५७ कुटुंबापैकी १६०३ कुटुंबाकडे खाजगी नळजोडणी होती तर ३० ठिकाणी सार्वजनिक नळजोडणी होती. गावातील ९५४ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे ग्रामस्थांना सार्वजनिक नळ, गावाबाहेरील विहिरी, तलाव व कुपनलिकावरून पाणी भरावे लागत असे. गावात ८ ते १० दिवसातून एकदा अनियमित वेळी येणारे पाणी यामुळे सार्वजनिक नळावर नंबरासाठी घागरी लाऊन तासन्तास बसणा-या स्त्रिया व पाणी आल्यानंतर पाणी मिळविण्यासाठी होणारी झोंबाझोंबी किंवा भांडणतंटा हे चित्र नेहमी दिसत असे. गावामध्ये पाण्याची टंचाई असूनदेखील ग्रामस्थांच्यामध्ये जागृती नसल्यामुळे बहुतांशी खाजगी नळांना व सार्वजनिक नळांना तोटया नसल्यामुळे पाणी वाया जात असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून वारंवार केलेल्या ग्रामस्थांच्या प्रबोधनामुळे व सार्वजनिक नळ जोडावयाचे नाहीत असे ग्रामसभेमध्ये ठरल्यामुळे गावात २५०० कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली. गावात एकही सार्वजनिक नळजोडणी नसल्यामुळे पाण्यावरून होणारे भांडणतंटे व पाण्याची नासाडी कमी झाली. पाणीपट्टीच्या रूपाने ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातही वाढ झाली. त्याचप्रमाणे आत्मसन्मान निर्माण झाला.

क) <u>पाणीपट्टी व मीटर पध्दती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. ३६० होता तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. ७५ होता. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा पाणीपट्टी वसूल केली जात असे. ग्रामस्थांना

८ ते १0 दिवसातून पाणी मिळत असल्यामुळे गावातील बहुतांशी सधन लोक नळाला वीजपंप जोडून पाणी खेचत असल्यामुळे अनेक गरीबांच्या नळाला पुरेसे पाणी येत नसे. ग्रामस्थांना पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे नाराजीमुळे लोक वेळच्यावेळी पाणीपट्टी भरत नसत परिणामी पाणीपट्टीची थकबाकी खूप वाढली होती. पाणीपट्टी थकबाकीमुळे ग्रामपंचायतीला देखभाल दुरूस्ती वेळेत करणे व वीजबील वेळेत भरणे शक्य नसे . परिणामी पाणी पुरवठा खंडीत केला जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये सुरूवातीला खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. ७२0 निश्चित करण्यात येऊन मीटर पध्दतीचा अवलंब केला आहे. गावाने पाणीपट्टी वसूलीचे कंत्राट महिला बचत गटाला दिले असून पाणीपट्टी बील वसूली वार्षिक न करता मासिक करण्यात आली आहे. गावाने पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर दंडात्मक कारवाई काटेकोरपणे राबविण्याचे धोरण स्विकारल्यामुळे व ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसे पाणी मिळू लागल्यामुळे पाणीपट्टीची वसूली अगदी समाधानकारक असल्याचे दिसून आले. ग्रामस्थांनी नवीन नळजोडणी घेत असतानाच ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टीही भरल्याचे निदर्शनास आले.

## ५. आरोग्य :-

### अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** संपूर्ण गावात १५00 मीटर लांब गटारीची सोय असून सांडपाणी गटारीद्वारे गावाबाहेर सोडले जात होते. गावात जादा ४५00 मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. गावात कोठेही बंदिस्त गटारी नव्हत्या. गावातील ज्या भागात गटारी नव्हत्या तेथील काही भागात सांडपाणी वाहून जाण्यासाठी चर काढल्या होत्या तर काही भागात कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर साचून सगळीकडे दलदल होत असे. गावाच्या विस्ताराच्या तुलनेमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या खूपच कमी असल्यामुळे अनेक ठिकाणी गटारी तुंबून दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव होत असे. गावातील उकिरडयामुळे व रस्त्याच्या कडेलाच टाकलेल्या कचऱ्यामुळे गटारी तुंबल्या जात.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील लोकांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करून सांडपाण्याचा परसबागासाठी वापर करण्याबाबत प्रबोधन केले. गावात प्रकल्पकाळात ७00 मीटर लांबीच्या नवीन गटारी बांधण्यात आल्या.

ग्रामस्थांनी श्रमदानातून गावातील गटार सफाई केली तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने ज्या वाडीवस्तीमध्ये अजिबात गटारीची सोय नव्हती तेथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी चर खोदण्यात आली. गावात बाजारपेठेच्या गल्लीमध्ये १०२ मीटर लांबीच्या बंदिस्त गटारी बांधण्यात आल्या. गावातील १२० कुटुंबानी सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी केला आहे. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधनामुळे ग्रामस्थ आपल्या घराभोवतालची गटार तुंबणार नाही याची काळजी घेतात तर ग्रामपंचायत कर्मचारीही गटारींची स्वच्छता व कचरा उचलण्याचे काम वेळच्यावेळी करतात व डास होऊ नये म्हणून जंतूनाशक फवारणीही करतात.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील साफसफाई ही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जात असे. गावात ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या केवळ ४ असल्यामुळे आकाराने मोठे असणाऱ्या या गावच्या रस्त्याची स्वच्छता ही एक ते दिड महिन्यातून एकदा केली जात असे. गावात केवळ दोन ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळया होत्या तर इतर ठिकाणी कचरा रस्त्याच्या कडेला, मोकळया जागेत व तलावाच्या काठावर टाकला जात असे. गावात साचलेला केरकचरा वेळच्यावेळी उचलला जात नसल्यामुळे अनेकवेळा ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांच्या तक्रारी येत. पण गावातील तरूण मंडळे किंवा ग्रामस्थ ग्रामस्वच्छता कार्यक्रमात सहसा स्वत: सहभागी होत नसत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व ग्रामस्थांच्यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करण्यात आली. कवठेपिराण गावामध्ये लोकसहभागातून राबविलेले ग्रामस्वच्छता कार्यक्रम अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातून ग्रामस्थांना दाखविण्यात आले व ग्रामस्थांना सहकार्य करण्याबाबत आवाहन करण्यात आले. अभ्यासदौऱ्याचा परिणाम असा झाला की, ग्रामस्थांच्या व तरूण मंडळांच्या मानसिकतेमध्ये खूप चांगला बदल झाला. गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट, शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांची ग्रामस्वच्छता कार्यक्रमात खूप मोलाची मदत झाली. ग्रामपंचायतीमार्फतही गावातील रस्त्यांची स्वच्छता व कचरा उचलण्याचे काम वेळच्यावेळी केले जाऊ लागले. शिवाय गावात नवीन १० ठिकाणी कचरा कोंडाळया ठेवल्या. गावातील महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन घराच्या अंगणात दररोज रांगोळया काढून गावाच्या सौंदर्यात भर टाकू लागल्या.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २५५७ कुटुंबापैकी केवळ ६३९ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती. गावात ५६ सार्वजनिक शौचालये असलीतरी त्याचा वापर व्यवस्थित केला जात नसल्यामुळे त्यापैकी ५०% शौचालये नादुरूस्त होती. गावात पाण्याची टंचाई खूप असल्यामुळे ग्रामस्थ सार्वजनिक शौचालयात भरपूर पाणी टाकत नसल्यामुळे व ग्रामपंचायतीमार्फतही वेळच्यावेळी स्वच्छता केली जात नसल्यामुळे बहुतांशी सार्वजनिक शौचालयाचा ग्रामस्थ वापर न करता उघडयावर शौचास जाणे पसंत करीत असत. गावातील मध्यवस्तीतील पडीक जागेत, रस्त्याच्या दुतर्फा व गावाबाहेर उघडयावर ग्रामस्थ व लहान मुले शौचास बसत असल्यामुळे गावाच्या आरोग्याचा भयंकर प्रश्न निर्माण झाला होता. घरी शौचालय नसल्यामुळे गावातील महिला, वृध्द व अपंग व्यक्तींचे खूप हाल होत असे. गावातील काही ग्रामस्थ घरी शौचालय असूनदेखील पाण्याची टंचाईमुळे उघडयावर शौचास जात. गावातील अनेक ग्रामस्थांनी आर्थिक परिस्थिती चांगली असूनही पाणी टंचाईमुळे शौचालय बांधले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांच्यामध्ये शौचालयाबाबत जागृती करण्यासाठी शासकीय अधिकारी, सहाय्यकारी संस्था व ग्रामपातळीवरील जलस्वराज्य समितीमार्फत विविध प्रकारे प्रयत्न करण्यात आले. ग्रामस्थांचा आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित करून शौचालयाचे प्रकार, महत्व व फायदे समजावून सांगण्यात आले. ग्रामस्थांना शौचालयाचे महत्व पटल्यामुळे व भरपूर पाणी मिळणार असल्यामुळे गावात नवीन १६७४ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली. गावातील जुने शौचालय ग्रामपंचायतीमार्फत दुरूस्त करून तेथे पाण्याची स्वतंत्र सोय करण्यात आल्यामुळे ग्रामस्थ त्याचा वापर करू लागले. गावात जुनी ५६ व नवीन ८ अशी एकूण ६४ सार्वजनिक शौचालये २४४ कुटूंबांना विभागून दिल्यामुळे त्याचा नियमित वापर ग्रामस्थ करू लागले. गावातील ३ शाळांमध्ये १० व १३ अंगणवाडीमध्ये प्रत्येकी १ शौचालय बांधल्यामुळे उघडयावर शौचास जाणे पूर्ण थांबले. गाव हागणदारीमुक्त झाल्यामुळे गावातील रोगराई कमी झाली व महिला आणि वृध्द व्यक्तींचे हालही थांबले. या सर्व बदलाचा परिणाम म्हणून व गाव हागणदारीमुक्त झाल्यामुळे गावाला शासनाचा निर्मल ग्रामचा ५ लाखाचा पुरस्कार मिळाला.

६ . **महिला सक्षमीकरण :-**

अ) **महिला प्रशिक्षण :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये जाणीव जागृती कमी असल्यामुळे महिलांचा सार्वजनिक कार्यक्रमातील विशेषता ग्रामविकास कार्यातील सहभाग खूपच कमी होता. गावातील महिलांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी सेवाभावी संस्थाकडून ग्रामपंचायतीकडून किंवा महिला बचत गटाकडूनही काही प्रयत्न झाले नव्हते. गावातील महिलांच्यामधील सुप्तगुणांचा विकास करण्यासाठी, त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध सोयी सुविधांची माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रशिक्षणाचे आयोजन केले नव्हते. गावातील काही महिला शिक्षित असल्या तरी प्रशिक्षित नसल्यामुळे किंवा त्यांच्यामधील न्यूनगंड दूर झाला नसल्यामुळे आणि त्यांना पोषक वातावरण निर्माण झाले नसल्यामुळे त्या सामाजिक कार्यात किंवा कार्यक्रमात सहभागी होत नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करण्यात आले. गावातील महिलांना त्यांच्या घरापर्यंत जाऊन अनेक बाबींची माहिती देण्यात आली. त्यांच्यासाठी कोपरासभा, महिला मेळावे आयोजित केले. तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन आयोजित केले. गावातील बचत गटातील महिलांच्यासाठी बचत गटांना चालना देण्यासाठी म्हणून प्रशिक्षण आयोजित केले. बचत गट रेकॉर्ड लिखाणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. गावातील महिलांच्यासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण, नेतृत्व विकास प्रशिक्षण, पंचायत राज प्रशिक्षण, शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षण व विविध व्यवसाय प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले. गावातील आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा लाभ गावातील अनेक महिलांनी घेतल्याने त्यांना विविध गोष्टींची माहिती मिळाली. बचत गट स्थापन करण्यास चालना मिळून विविध व्यवसायाबाबत माहिती मिळाली. महिलांच्यामध्ये असणारे न्यूनगंड कमी होऊन महिला सार्वजनिक कार्यक्रमांच्यामध्ये मोकळेपणाने सहभागी होऊ लागल्या.

ब) **स्पर्धा :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात विविध स्पर्धा आयोजित केल्या जात असत पण त्यामध्ये महिलांचा सहभाग खूप कमी असे. गावातील महिलांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्नही केले जात नव्हते व महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धाही आयोजित केल्या जात

नव्हत्या. गावातील ज्या स्पर्धेमध्ये महिलांचा समावेश असे त्यामध्येही प्रामुख्याने शाळकरी मुलींचा समावेश अधिक असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा यावा, न्यूनगंड कमी व्हावा व सुप्तगुणांना संधी मिळावी म्हणून प्रयत्न करण्यात आले. गावातील महिलांना एकत्र करून कर्तृत्ववान महिलांनी वेगवेगळया क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. गावातील महिलांच्यामध्ये सुरूवातीला स्पर्धात्मक आवड निर्माण व्हावी म्हणून महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले. उदा. संगीत खुर्ची, धावणे, लिंबू चमचा, फुगडी, खाद्यपदार्थ स्पर्धा वगैरे महिलांच्यासाठी आयोजित केलेल्या स्वतंत्र स्पर्धेत विविध वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिलांच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा आल्यानंतर गावातील विविध स्पर्धांमध्ये पुरूषांच्या बरोबरीने महिलांचा सहभाग वाढू लागला.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात ३७ बचत गट स्थापन झाले होते त्यापैकी दारिद्रयरेषेखालील बचत गटांची संख्या केवळ २ होती. गावातील बचत गटातील महिलांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव होता. नवीन बचत गट स्थापन करण्यासाठी महिलांच्यामध्ये फारशी जागृती केली जात नव्हती. गावातील सर्व बचत गटातील महिलांच्यासाठी एकत्रीत कार्यक्रमांचे आयोजन केले जात नसल्यामुळे समन्वयाचा अभाव होता. गावातील ३७ बचत गटापैकी काही बचत गट निष्क्रिय होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावामध्ये घरोघरी महिला बचत गटाची संकल्पना पोहचविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गावातील पूर्वी कार्यरत असलेल्या बचत गटांचा आढावा घेऊन त्यांना सक्रिय बनविण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले. गावातील बचत गटांना चालना देऊन बचत गट रेकॉर्ड लिखाणाबाबत महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. गावातील महिलांना विविध प्रकारचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्यामुळे गावात नवीन १७१ महिला बचत गट स्थापन झाले. यापैकी दारिद्रयरेषेखालील १३ बचत गट होते. महिला बचत गटांना विविध प्रशिक्षण व बीज भांडवल दिले गेल्यामुळे अनेक महिलांनी शेळीपालन, म्हैसपालन, शिवणकाम वगैरे व्यवसाय सुरू केले. महिला बचत गटाच्या माध्यमातून गावात महिलांच्यासाठी विविध कार्यक्रम

आयोजित केले जाऊ लागल्याने गावातील महिलांच्यामध्ये जागृती व एकसंघता निर्माण होऊ लागली आहे.

### ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग व अनुसूचित जातीमधील लोकांच्यामध्ये जागृती नव्हती. गावातील हया दुर्बल घटकातील लोकांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या सोयी-सुविधांची माहिती दुर्बल घटकातील बहुतांशी लोकांना नव्हती. दुर्बल घटकातील महिला व पुरूषांची ग्रामसभेमधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग अगदी अल्प होता. दुर्बल घटकातील बहुतांशी कुटूंबाच्याकडे शौचालय, स्वतंत्र नळजोडणी नव्हती. दुर्बल घटकातील बहुतांशी महिला बचत गटामध्ये सहभागी नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल कुटुंबाची पहाणी करण्यात येऊन त्यांच्याकडे विविध सोयी सुविधा नसण्यामागील कारणे अभ्यासण्यात आली. दुर्बल घटकातील लोकांना एकत्र करून त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध शासकीय सोयीसुविधांची माहिती देण्यात आली व त्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकातील महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली. दुर्बल घटकातील कुटुंबाना शौचालय बांधण्यासाठी शासकीय अनुदान मिळवून देण्याबरोबरच ग्रामपंचायतीमार्फत जागा व वस्तुरूपाने मदत करण्यात आली. दुर्बल घटकातील कुटुंबांना नळजोडणी घेत असताना येणाऱ्या खर्चात काही प्रमाणात सवलत देण्यात आली. दुर्बल घटाकातील लोकांच्यामध्ये केलेल्या जागृतीमुळे व सहकार्यामुळे त्यांची ग्रामसभातील उपस्थिती व ग्रामविकासातील सहभाग वाढल्याचे दिसून आले.

### ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील वेगवेगळया विकासात्मक कार्यासाठी शासकीय अनुदान मिळाले होते. पण त्याची संपूर्ण माहिती सर्व ग्रामस्थांना दिली जात नव्हती. त्यांच्या आंमलबजावणीबाबत निर्णय ग्रामसभेमध्ये घेतला जात नव्हता. ग्रामविकासकामात ग्रामस्थांचा लोकवाटा नसल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये त्या विकासकामाबद्दल आत्मियता नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील विकासकामाबावत सर्व निर्णय ग्रामसभेमध्ये घेतले जाऊ लागले. गावाला प्राप्त झालेल्या शासकीय अनुदानाची माहिती ग्रामस्थांच्यापर्यंत नोटीस बोर्ड व ग्रामसभेद्वारे पोहचविली जाऊ लागली. ग्रामविकासासाठी आलेल्या शासकीय अनुदानात १०% लोकवाटा जमा केला जाऊ लागला. त्यामुळे ग्रामविकास कामात ग्रामस्थांची आत्मियता वाढली.

**जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर गावाला प्राप्त झालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ५,१९,४४0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ३,४१,१३,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ४,२३,000=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ३८,२२,८९८=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ५,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | एकूण | ४,00,७८,३३८=00 |

## ११. बामणी (तालुका - कागल)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मार्च २00६ व हस्तांतरीत तारीख - फेब्रुवारी २00९)**

### १. लोकसंख्या :-

बामणी गावची एकूण लोकसंख्या २१६३ असून त्यामध्ये १0५३ स्त्रिया व ११0७ पुरूष आहेत. तसेच गावात एकूण ३२२ कुटुंबे असून ९१ दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत.

### २. ग्रामपंचायतीची माहिती :-

बामणी गावची स्वतःची ग्रामपंचायत इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. ग्रामपंचायतीकडे २ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व १ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी आहे पण ग्रामपंचायतीकडे संगणक सुविधेचा मात्र अभाव आढळला.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण ९ सदस्य संख्या असून त्यामध्ये ४ स्त्री सदस्य व ५ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) प्रवर्गातील ७ वी शिक्षण झालेली स्त्री भूषवित असून उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील ७ वी शिक्षण झालेले पुरूष भूषवित आहेत.

## ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** बामणी गावच्या विकासाच्या प्रक्रियेत गावातील महिला, महिला बचत गट, तरूण मंडळे यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले नव्हते. तसेच ग्रामस्थांच्यामध्ये जागृतीही नसल्यामुळे काही वेळा कोरम अभावी ग्रामसभा तहकूब कराव्या लागत होत्या. त्यामुळे ग्रामसभा नियमित होत नव्हत्या. ग्रामसभा व ग्रामविकास कार्यात तरूण मंडळांचा सहभाग खूपच कमी होता. गावातील महिलांच्यामध्ये फारशी जागृती नव्हती. त्यामुळे महिलांचा सार्वजनिक कार्यामधील सहभाग फार कमी होता. गावातील बचत गट मर्यादित स्वरूपात कार्यरत होते. ग्रामस्वच्छता, पाण्याची काटकसर, बचतीची सवय, महिला सक्षमीकरण हया संकल्पना गावामध्ये रूजल्या नव्हत्या. गावातील गटातटाच्या राजकारणामुळे विकासकामाला खीळ बसली होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात कोपरा सभा घेऊन, घरोघरी जाऊन, ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामस्थांचे ग्रामस्वच्छता, पाणी टंचाई, महिला सक्षमीकरण याबाबत प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला पण त्याला ग्रामस्थ, तरूण मंडळे व महिलांचा अतिशय अल्प प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे ग्रामस्थांच्या प्रबोधनासाठी जैन्याळ (ता.कागल) या आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. या अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील तरूण मंडळे, महिला, जलस्वराज्य समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी मोठया प्रमाणात सहभाग घेतला. जैन्याळ गावातील स्वच्छता, गटारसफाई, घरोघरी शौचालय, महिला बचत गटांनी चालू केलेले व्यवसाय, गांडूळखत प्रकल्प, कचरा कोंडाळी, सांडपाण्याचा पुनर्वापर यासारखे उपक्रम पाहिल्यानंतर सर्व ग्रामस्थ प्रभावित झाले. अभ्यासदौऱ्यावरून गावी परत आल्यानंतर बामणी ग्रामस्थांची, तरूण मंडळांची व महिलांची ग्रामसभेमधील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेमधील सहभाग वाढला. ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यासाठी, लोकवर्गणी गोळा करण्यासाठी, ग्रामस्वच्छतेसाठी तरूण मंडळांचे सहकार्य मिळू लागले. प्रबोधन व अभ्यासदौऱ्याच्या प्रभावामुळे गावातील शौचालयांची

संख्या वाढू लागली. गावातील राजकीय गटतट बाजूला ठेऊन लोक ग्रामविकासासाठी एकत्र येऊ लागले.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** बामणी गावामध्ये १ कि.मी. अंतरावरील दूधगंगा नदीवरून पाणी योजना सुरू होती. ही योजना जुनी असल्यामुळे जॅकवेलची पडझड, वीजपंपामध्ये वारंवार बिघाड, जलवाहिन्यांना गळती वगैरे कारणामुळे ग्रामस्थांना २ ते ३ दिवसातून एकदा कोणत्याही वेळी पाणी मिळत होते. अनियमित व अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे महिला व ग्रामस्थांचे हाल होत होते, पाण्याची वाट बघण्यापोटी अनेकांचा रोजगार बुडत होता. पाणी भरण्यासाठी महिलांच्यामध्ये भांडणेही होत होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे पाण्याच्या वापराबाबत व शुध्दतेबाबत प्रबोधन केले. ग्रामस्थांना पाणी योजना आपली वाटावी म्हणून लोकवर्गणीद्वारे त्यांना सहभागी करून घेतले. दूधगंगा नदी हेच जलस्त्रोत निवडून नदीवर नवीन जॅकवेल बांधले, नवीन दोन वीजपंप बसविले, नवीन चांगल्या दर्जाच्या जलवाहिन्या बसविल्या, गावात ८०,००० लिटर क्षमतेचा नवीन जलकुंभ बांधला. पाणी वितरण कर्मचाऱ्यांना पाण्याचे शुध्दीकरण, टी.सी.एल. पावडरचा वापर, ओ.टी. टेस्ट संबंधी प्रशिक्षण दिले. या सर्व प्रयत्नामुळे सर्व ग्रामस्थांना दररोज नियमितपणे शुध्द व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थांचा व महिलांचा त्रास कमी झाल्यामुळे ग्रामस्थ समाधानी आहेत.

### ब) नळजोडणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना सुरू असून केवळ २०० खाजगी नळजोडण्या होत्या. परंतु १२२ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे त्यांच्यासाठी १० सार्वजनिक नळजोडण्या होत्या. पण या सार्वजनिक नळजोडण्या अपुऱ्या पडत असल्यामुळे सार्वजनिक नळावर गर्दी होऊन महिलांच्यामध्ये पाण्यासाठी भांडणे होत असत. सार्वजनिक नळांना तोटया नसल्यामुळे व बहुतांशी खाजगी नळजोडण्यांना ही तोटी नसल्यामुळे पाणी भरून झाल्यानंतर पाणी वाया जात असे. गावातील शाळेमध्ये नळजोडणी नव्हती त्यामुळे विद्यार्थ्यांचे पाण्यासाठी हाल होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी प्रबोधन केल्यामुळे गावातील सर्व कुटुंबांनी स्वतंत्र नळजोडण्या घेतल्या. तसेच गावातील शाळेमध्येही स्वतंत्र नळजोडणी दिली. सर्व ग्रामस्थांचे प्रबोधन करून नळाला तोटी बसविण्यास त्यांना प्रवृत्त केले.

या सर्वांचा **परिणाम** म्हणून गावातील महिलांची पाण्यासाठीची भटकंती थांबली. पाण्यावरून होणारा भांडणतंटा कमी झाला. प्रत्येक नळाला तोटी बसविल्यामुळे पाण्याची बचत झाली. प्रत्येक कुटुंबाने नळजोडणी घेतल्यामुळे पाणीपट्टीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढले. घरोघरी पाण्याचा नळ आल्यामुळे दुर्बल घटक व महिलांना आत्मसन्मान मिळाला.

**क) <u>पाणीपट्टी</u>** ः-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ३६० होती तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टी रू. ७५ होती. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत वर्षातून एकदा पाणीपट्टी वसूली केली जात असे. पण ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्यामुळे ग्रामस्थ पाणीपट्टी वेळच्यावेळी भरत नसत. पाणीपट्टी न भरलेल्यांना दाखले न देणे, नळकनेक्शन बंद करणे वगैरे सारखे उपाय योजल्यास राजकीय हस्तक्षेप होत असे तसेच ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यामध्ये संघर्ष होत असे. पाणीपट्टीची थकबाकी वाढू लागल्यामुळे व देखभाल दुरूस्त्या वेळच्यावेळी होत नसल्यामुळे पाणीयोजना डबघाईला आली होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ६०० ठरविण्यात आली असून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फतच वर्षातून एकदा पाणीपट्टी वसूली करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खाजगी नळजोडणी देत असतानाच जलस्वराज्य प्रकल्पाच्या नियमानुसार ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी घेण्यात आली आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांच्यामध्ये सर्व बाबतीत जाणीव जागृती झाली. त्याचप्रमाणे ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये समाधान आहे. त्यामुळे लोक पाणीपट्टी नियमित भरतील असा आशावाद सरपंचानी व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. जे ग्रामस्थ पाणीपट्टी वेळेत भरणार नाहीत त्यांच्यावर कडक दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे ग्रामविकास अधिकाऱ्यांनी सांगितले.

## ५. आरोग्य :-

### अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी गटारीचा वापर केला जात असे. दोन स्वच्छता कर्मचाऱ्यामार्फत गावातील गटार स्वच्छता केली जात असे. गावातील काही भागात गटारी नसल्यामुळे त्या भागातील सर्व सांडपाणी सभोवतालच्या परिसरात पसरून दलदल निर्माण होत असल्याने ते आरोग्यास मारक ठरत असे. गावात जागोजागी उकिरडे असल्यामुळे तेथील केरकचऱ्यामुळे गटारी तुंबल्या जात व सांडपाणी कुजून दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले असूनदेखील ग्रामस्वच्छतेबाबत ग्रामस्थांच्यामध्ये व स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्येही फारशी जागृती नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून अभ्यासदौऱ्याचे आयोजन करून स्वच्छतेबाबत ग्रामस्थांचे व ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रबोधन केले. गावातील गटारी स्वच्छतेसाठी ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांना तरूण मंडळांचे व ग्रामस्थांचेही सहकार्य मिळू लागले. गटारी तुंबणार नाहीत याची खबरदारी प्रत्येक नागरीक घेऊ लागला. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत गावात ५०० फूट नवीन गटारी बसविल्या व जिथे गटारी नाहीत तेथील सांडपाणी निचरा होण्यासाठी ग्रामस्थांच्या सहकार्यातून चर काढण्यात आली. एकूणच लोकांच्यामध्ये स्वच्छतेबाबत जागृती झाली व प्रत्येक जण ग्रामस्वच्छता कार्यात सहभागी होऊ लागल्यामुळे गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली.

### ब) रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्ता सफाईचे व कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्याचे काम ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मार्फतच केले जात असे. ग्रामस्वच्छता ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे अशी ग्रामस्थांची मानसिकता असल्यामुळे व गावात दोनच स्वच्छता कर्मचारी असल्यामुळे गावातील रस्ता सफाई व कचरा उचलण्याचे काम वेळच्यावेळी होत नसल्यामुळे गावातील रस्त्यांवर केरकचरा, प्लॅस्टीक कागद, झाडाचा पालापाचोळा पडलेला असल्यामुळे गाव अस्वच्छ असे. ग्रामस्थांचे आपल्या घराभोवतीच उकिरडे असल्यामुळे गावातील अस्वच्छतेमध्ये अधिकच भर पडे. गावात कचरा टाकण्यासाठी कोठेही सार्वजनिक कचरा कोंडाळी नव्हती. ग्रामस्वच्छता ही स्वच्छता कर्मचाऱ्यामार्फत ३ ते ४ महिन्यातून एकदाच केली जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांना कोपरा सभा, माहितीपट, पथनाटय, भिंतीवरील घोषवाक्य, अभ्यासदौरा इ. माध्यमातून स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले. गावातील तरूण मंडळांना व महिला बचत गटांना ग्रामविकास व ग्रामआरोग्यासाठी सहकार्य करण्याबाबत त्यांचे प्रबोधन करून आवाहन केले. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देऊन त्यांना ग्रामस्वच्छतेसाठी प्रामाणिक योगदान देण्याचे आवाहन केले.

या सर्वांचा **फलीत** म्हणून गावातील तरूण मंडळ व गणेश मंडळांनी ग्रामस्वच्छता, पाणी बचत, महिला सक्षमीकरण वगैरे विषयावर ग्रामस्थांचे पथनाटय, लघुनाटिका व देखाव्याच्या माध्यमातून प्रबोधन केले. तसेच या मंडळांच्यामार्फत वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. गावातील महिला मंडळीनीही आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन गाव विकासामध्ये योगदान दिले. काही ग्रामस्थांनी आपले गावातील उकिरडे गावाबाहेर नेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमाला हातभार लावला. ग्रामपंचायतीनेही गावात ९ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेऊन लोकांना कचरा कोंडाळीत कचरा टाकण्याची सवय लावली. ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारीही १५ दिवसातून एकदा ग्रामस्वच्छता करतात.

**क) शौचालय :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण ३२२ कुटुंबापैकी केवळ २२२ कुटुंबाकडेच वैयक्तिक शौचालय असल्यामुळे व गावात एकही सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे उर्वरित १00 कुटुंबातील सदस्य उघडयावर शौचास जात. गावातील शाळेतही शौचालयाची सुविधा नव्हती. शौचालय नसणाऱ्या कुटुंबातील वृध्दांचे व महिलांचे फार हाल होत होते. विशेषता महिलांना लाजिरवाणे वाटत होते. उघडयावरील शौचामुळे गावचे आरोग्य धोक्यात आले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य समिती, ग्रामपंचायत, सहाय्यकारी संस्था, तरूण मंडळे व महिला बचत गटांनी गाव हागणदारीमुक्त ही अट पूर्ण करून जलस्वराज्य प्रकल्प यशस्वीपणे राबविण्याचा निश्चय केला. अंगणवाडी सेविका व शाळेतील शिक्षकांच्या मदतीने सर्वेक्षण करून गावातील शौचालयाची माहिती गोळा केली. शौचालय नसणाऱ्या कुटुंबाचे प्रबोधन करून त्यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांना आवश्यक ते सहकार्य करून शौचालय बांधण्यास प्रवृत्त केले. शौचालय न

बांधणाऱ्या व उघडयावर शौचालय बसणाऱ्या ग्रामस्थांवर दंडात्मक कारवाई केली जाऊ लागली.

या सर्वांचा **परिणाम** म्हणून गावातील शौचालय नसणाऱ्या १00 कुटुंबापैकी ५0 कुटुंबानी स्वतंत्र शौचालय बांधले. गावातील काही गरीब कुटुंबानी दोन कुटुंबांच्यामध्ये १ शौचालय बांधले. गावातील शौचालय नसणाऱ्या उर्वरित कुटुबासाठी ८ सार्वजनिक शौचालय बांधण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेत व अंगणवाडीमध्ये शौचालय बांधण्यात आल्यामुळे गाव हागणदारीमुक्त होऊन गावाला निर्मलग्रामचे २ लाखाचे बक्षीसही मिळाले.

## ६. महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये जाणीवजागृती निर्माण करणे, त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदविणे, त्यांना व्यवसायासाठी प्रवृत्त करणे व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी फारसे प्रयत्न केले नव्हते. गावातील महिलांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव व व्यवसायाबाबत भिती होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिला सक्षमीकरणाला अधिक प्राधान्य देऊन गावातील महिलांच्या घरोघरी जाऊन त्यांना जलस्वराज्य प्रकल्प समजाऊन सांगून त्यांचे प्रबोधन केले. सुरूवातीला गावात काही स्वयंसहाय्यता बचत गट स्थापून त्यांना काही प्रशिक्षण दिले. गावातील महिलांच्या विकासासाठी, नेतृत्वगुण विकास, क्षमता बांधणी व विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रबोधनामुळे गावातील सार्वजनिक कार्यक्रमातील, ग्रामसभातील महिलांची संख्या वाढली. ग्रामसभामध्ये, बैठकामध्ये काही धाडसी महिला आपली मते मांडू लागल्या. त्याचप्रमाणे न पटणाऱ्या गोष्टीला विरोध करू लागल्या. ग्रामविकास कामातील एखादी जबाबदारी उत्स्फूर्तपणे आपल्या शिरावर घेऊन ती यशस्वीपणे पार पाडू लागल्या.

### ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्पर्धात्मक वातावरण फारसे नव्हते परंतु गावात वर्षातून एकदा यात्रेच्या निमित्ताने काही स्पर्धा आयोजित केल्या जात. उदा. बैलगाडी शर्यती, घोडा शर्यती व रांगोळी स्पर्धा वगैरे. या स्पर्धामध्ये मोठया प्रमाणात पुरूषांचाच

सहभाग असे. स्पर्धा पहायला जाण्याचीही अनेक स्त्रियांना कुटुंबातून परवानगी मिळत नसे. महिलांना प्रेरणा देण्यासाठी म्हणून स्वतंत्र स्पर्धा आयोजित केल्या जात नसल्यामुळे स्त्रियांची चार भिंतीच्या आत घुसमट होत होती. स्त्रियांचे पारंपारिक काम म्हणजे रांधा, वाढा व उष्टी काढा हेच झाले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना एकत्र आणण्यासाठी, त्यांच्यामधील भिती, संकोच दूर करण्यासाठी व त्यांच्यामधील सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी उखाणे, जात्यावरील गाणी, झिम्मा, फुगडी, रांगोळी काढणे, मेहंदी काढणे वगैरे स्पर्धा आयोजित केल्यामुळे संस्कृतीचे जतन तर झालेच पण त्याचबरोबर महिलांच्यामध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले. सुरूवातीला महिला मोकळेपणाने स्पर्धांमध्ये सहभागी व्हाव्यात म्हणून पळणे, तीन पायाची शर्यत, लिंबू चमचा, दोरीवरील उडया वगैरे खास महिलांच्यासाठी स्पर्धा आयोजित केल्या त्याला महिलांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. या स्पर्धांमुळे मध्यमवयीन व वृध्द महिलांना आपल्याकडील असणाऱ्या पारंपारिक गुणांचे नवीन पिढीला दर्शन घडविण्याची संधी मिळाली व त्याचे त्यांना समाधान मिळाले. स्पर्धांमुळे वय व शिक्षण यामधील अंतर कमी होऊन गावातील महिलांच्यामध्ये मोकळेपणा आला. स्पर्धांमुळे महिलांच्यामधील भिती व संकोच कमी होऊन गावातील कोणत्याही स्पर्धेमध्ये पुरूषांच्याबरोबरीने त्या सहभागी होऊ लागल्या.

**क) <u>बचत गट</u> :-**

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जाऊ लागले. महिलांच्यासाठी काही योजना निर्माण करण्यात आल्या. अलीकडील काही वर्षात महिलांच्या पसंतीस उतरलेली व शहरापासून खेडयापर्यंत प्रसार पावलेली योजना किंवा चळवळ म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट. महिलांना संघटीत करून त्यांचा विकास करणारी बचत गट ही एक चळवळ आहे. या बचत गटाबाबत बामणी गावातील स्थिती खालीलप्रमाणे आढळली.

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात ११ स्वयंसहाय्यता बचत गट होते. पण गावातील सर्व बचत गटांना एकत्र आणणारा दुवा नव्हता. बचत गटातील महिलांना येणाऱ्या अडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे माध्यम नव्हते. गावात अस्तित्वात असणाऱ्या बचत गटापैकी काही बचत गट चांगले चालले होते. पण काही बचत गट

केवळ कागदावरच होते. गावातील बचत गटांच्यासाठी प्रशिक्षण, प्रेरणा व व्यवसाय मार्गदर्शन मिळत नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना एकत्र आणण्यासाठी गृहभेटी, कोपरा सभा, ग्रामसभा आयोजित करण्यात आल्या. त्याचप्रमाणे अनेक प्रबोधनात्मक व्याख्यानातून तज्ञ लोकांचे मार्गदर्शन मिळाले. गावातील सुरू असणा-या बचत गटातील महिलांचे अनुभव, अडचणी समजावून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य केल्यामुळे ते बचत गट चांगले चालू लागले. त्यातील काही धाडसी महिलांनी पुढाकार घेऊन व्यवसाय सुरू केला. गावात हळूहळू बचत गटांना पोषक वातावरण निर्माण होऊन नवीन १३ बचत गटांची स्थापना झाली, त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती-जमातीतील बचत गटांचाही समावेश आहे. बचत गटांमुळे महिलांना बचतीची सवय लागली शिवाय एकमेकांचे सुख-दु:ख समजावून घेता आले. आर्थिक व्यवहार करण्याचे तंत्र अवगत झाल्याने त्यांच्यात धाडस आले.

### ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकांची ग्रामसभेमधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग कमी होता. त्यांच्यामध्ये जाणीव जागृतीसाठी प्रयत्न केले नव्हते. दुर्बल घटकापर्यंत पाणी, शौचालय, गटार, रस्ते यासारख्या सुविधा पोहोचल्या नव्हत्या. दुर्बल घटकातील महिलांच्यामध्ये बचत गटाबाबतही फारशी जागृती नसल्यामुळे त्यांचा बचत गटातील सहभाग कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये दुर्बल घटकांनाही विकास प्रक्रियेमध्ये आणणे व त्यांच्यापर्यंत विविध सोयीसुविधा पोहचविणे हे उद्दिष्ट असल्यामुळे त्यांचे प्रबोधन करून त्यांना अभ्यासदौऱ्यामध्ये हेतूपुरस्पर सहभागी करून घेतले. त्यामुळे दुर्बल घटकांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. दुर्बल घटकातील तरूण वर्गाचा विकासाकार्यातील सहभाग वाढला. दुर्बल घटकातील महिलांची स्वयंसहाय्यता बचत गटातील संख्या वाढली. त्यांना बचतीची सवय लागली व या महिलांनी बीजभांडवल घेऊन छोटा-मोठा व्यवसाय करायला सुरूवात केली. दुर्बल घटकातील बहुतांशी कुटुंबानी घरी स्वतंत्र शौचालय, नळजोडणी घेतली आहे.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला विविध घटकांच्या क्षमता बांधणीसाठी अनुदान मिळाले नव्हते. ग्रामविकासासाठी जरी अनुदान मिळाले असले तरी त्याचा विनियोग कसा करावा याचा निर्णय ग्रामसभेमध्ये होत नसे. ग्रामस्थांना निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील सर्व घटकांना सामावून घेण्यात येऊन क्षमता बांधणीसाठी प्रयत्न केले. प्रकल्पाच्या माध्यमातून विविध उपप्रकल्पासाठी गावाला मिळालेले अनुदान, जमा लोकवर्गणी व लोकसहभागातून निर्मल ग्राम योजना यशस्वीरित्या पूर्णत्वास नेल्याबद्दल गावाला शासनाकडून मिळालेले बक्षीस याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे

**गावाला विविध विकासकामांसाठी मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,२९,५२0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ४८,७६,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५४,000=00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (९0%) | २,९३,१३२=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | **एकूण** | **६३,५२,६५२=00** |

# १२. कसबा सांगाव (तालुका - कागल)

## (जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मार्च २००५ व हस्तांतरीत झाले नाही)

१. <u>लोकसंख्या</u> :-

कसबा सांगाव गावची एकूण लोकसंख्या ९९८३ असून त्यामध्ये ४७३३ स्त्रिया व ५२५0 पुरूष आहेत. गावात एकूण २२७९ कुटुंबसंख्या असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ३५८ आहे.

२. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

कसबा सांगावची स्वतःची ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधादेखील आहे. ग्रामस्वच्छतेसाठी ग्रामपंचायतीकडे ९ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी असून ५ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी देखील आहेत.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण १७ सदस्य असून त्यामध्ये ६ स्त्री सदस्य व ११ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) प्रवर्गातील बी.ए. शिक्षण झालेली स्त्री असून उपसरपंच पदावर खुला (ओपन) प्रवर्गातील निरक्षर पुरूष कार्यरत आहेत.

३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामविकास कार्यामध्ये कसबा सांगाव गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट, भजनी मंडळ, शाळा, अंगणवाडया वगैरे सर्व घटकांचा सहभाग घेण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न केले नसल्याने व ग्रामस्थांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचेही आयोजन केले गेले नव्हते. त्यामुळे गावातील तरूण मंडळांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग फारच कमी होता. महिलांचा ग्रामविकास कार्यातील व ग्रामसभेतील सहभाग कमी होता. ग्रामस्थांचीही ग्रामसभेतील उपस्थिती कमी होती. गावात ग्रामस्वच्छता, पाण्याची बचत, महिला सक्षमीकरण या संकल्पना प्रभावीपणे पोहचल्या नव्हत्या. गटातटाच्या राजकारणामुळे विकासकार्यात अडथळे येत होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचा ग्रामविकास कार्यात सहभाग वाढावा, जलस्वराज्य प्रकल्प कार्याला सहकार्य मिळावे, त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून कांबळवाडी (ता.राधानगरी) हया ग्रामविकास कार्यामध्ये आदर्श असणाऱ्या

गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. तेथील ग्रामपंचायत पदाधिकारी व महिलांचे मार्गदर्शन घेतल्यामुळे याचा ग्रामस्थांवर सकारात्मक प्रभाव पडून गावातील तरूण मंडळांची मानसिकता बदलून त्यांचे ग्रामस्वच्छता प्रबोधन व लोकवर्गणी गोळा करणे इ. बाबीमध्ये सहकार्य मिळाले. गावातील महिलांचा ग्रामसभा, जनजागृती, स्वच्छता कार्यक्रम व बचत गटातील सहभाग वाढला. ग्रामस्थांचे लोकवर्गणी, ग्रामस्वच्छता, शौचालय बांधणे वगैरे बाबीसाठी चांगले सहकार्य मिळू लागले. शाळा, अंगणवाडीमधील शिक्षक, विद्यार्थी ग्रामविकासाच्या कार्यात, ग्रामस्वच्छता, स्वच्छताफेरी, सर्वेक्षण, पथनाटय इ. माध्यमातून ग्रामस्थांचे प्रबोधन करून जलस्वराज्य प्रकल्पासाठी सहकार्य करू लागले. गावातील वृध्द, अनुभवी लोकांचेही मार्गदर्शन व त्यांच्या क्षमतेप्रमाणे सहकार्य मिळू लागले.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कसबा सांगाव गावामध्ये ७ कि.मी. अंतरावरील दूधगंगा नदीवरून स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची नळयोजना आणली होती. योजना जुनी असल्यामुळे व अतिवृष्टीमुळे जॅकवेल पडलेले होते. तर वीजपंप क्षमता केवळ १७ एच.पी. ची होती. लोकसंख्या जास्त असल्यामुळे ७५,000 व ५0,000 लिटरचे दोन जलकुंभ असुनही पाणी साठवण क्षमता कमी पडत होती. जलशुध्दीकरण यंत्र नसल्यामुळे पाणी शुध्दीकरणासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे. वरील सर्व कारणे व जुनी पाणी वितरण यंत्रणा असल्यामुळे पाणी पुरवठा यंत्रणेत सातत्याने विघाड होत असे त्यामुळे गावात पाणी टंचाई निर्माण होऊन ४ दिवसातून एकदा पाणी मिळत असे. गावात १ सार्वजनिक तलाव ६ विहिरी व ५ विंधन-विहिरी असल्या तरी त्यांचेही पाणी दिवसेंदिवस कमी व प्रदूषित होऊ लागल्यामुळे गावापुढे पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे महिला वर्गाचे फार हाल होत होते. पिण्याच्या पाण्यासाठी हातावर पोट असणाऱ्या लोकांना रोजगार बुडवावा लागे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये गावापासून ७ कि.मी. अंतरावरील दूधगंगा नदीवरूनच पाणी आणण्याचे निश्चित करून नदीवर नवीन जॅकवेल बांधण्यात आले. ७५ हॉर्सपॉवरचे दोन नवीन वीजपंप बसविण्यात आले. गावात ५ ठिकाणी मिळून एकूण ५ लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ आहेत. पाणी

शुध्द करण्यासाठी स्वतंत्र जलशुध्दीकरण केंद्र (फिल्टर हाऊस) उभारले आहे पण ते अद्याप कार्यान्वित नाही. जुन्या नादुरूस्त सर्व जलवाहिन्या काढून तेथे चांगल्या कंपनीच्या नवीन जलवाहिन्या बसविल्या आहेत. याचा **परिणाम** असा झाला की, ग्रामस्थांना आता शुध्द व नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत असल्यामुळे त्यांच्यामध्ये समाधान असल्याचे दिसून आले. तसेच महिलांचाही पाण्यासाठी होणारा त्रास थांबला असल्याचे आढळले.

ब) **नळजोडणी** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २२७९ कुटुंबापैकी केवळ ११00 कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती तर सार्वजनिक नळजोडणींची संख्या ३५ होती. गावातील ११७९ कुटुंबांना घरी स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे पाण्यासाठी सार्वजनिक नळ, तलाव, विहिर व कुपनलिकेवर अवलंबून राहावे लागे. गावात पाण्याची तीव्र टंचाई असल्यामुळे वारंवार पाण्यावरून भांडणतंटा होत असे. गावात पाण्याची टंचाई असूनदेखील जाणीव जागृतीच्या अभावामुळे बहुतांशी खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात असल्याचे चित्र सर्रास दिसत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांना पाणी सुविधा देण्याबरोबरच त्यांचे पाणी वापराबाबत प्रबोधन करण्यालाही महत्व दिले गेले. ग्रामस्थांचे प्रबोधन करून जास्तीत जास्त लोकांनी स्वतंत्र नळजोडणी घ्यावी यासाठी प्रयत्न केले तरीही गावात केवळ १२00 कुटुंबाकडेच स्वतंत्र नळजोडणी असल्याचे दिसून आले. सार्वजनिक नळजोडण्या बंद करण्याचे शासनाचे धोरण असताना गावात अद्याप ३५ सार्वजनिक नळजोडण्या सुरू आहेत. गावात हळूहळू खाजगी नळजोडणीमध्ये वाढ होत असली तरी त्याची गती मात्र मंद असल्याचे दिसून आले.

क) **पाणीपट्टी** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कसबा सांगाव गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टी वार्षिक दर रू. ३६0 तर सार्वजनिक पाणीपट्टी वार्षिक दर रू.६0 होता. सदर पाणीपट्टी वसूली वार्षिक पध्दतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जात असे. ग्रामस्थांना नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्यामुळे पाणीपट्टी वसूली १00% होत नव्हती. पाणीपट्टी वसूलीसाठी गेलेल्या ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थांमध्ये वारंवार भांडणे होत असत. पाणीपट्टी वेळेत न देणाऱ्या ग्रामस्थांची नळजोडणी रद्द करणे, ग्रामस्थांचे ग्रामपंचायतीकडील दाखले न देणे हे जरी उपाय असले तरी राजकीय दबाव व पाणी नियमित व पुरेशा

प्रमाणात देण्यात ग्रामपंचायतीची असमर्थता यामुळे ते प्रभावीपणे राबविले जात नव्हते. परिणामी पाणीपट्टी थकबाकी वाढत जाऊन देखभाल दुरूस्तीसाठी खर्च करणे ग्रामपंचायतीलाही अशक्य झाले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ८०० ठरविण्यात आली. शिवाय खाजगी नळजोडणी देत असतानाच ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी घेण्याचा ग्रामसभेमध्ये निर्णय झाला असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वार्षिक पध्दतीने वसूली केली जाणार आहे. जे ग्रामस्थ पाणीपट्टी वेळेत भरणार नाहीत त्यांची नळजोडणी रद्द करणे हा नियम प्रभावीपणे राबविला जाणार आहे असे सांगण्यात आले.

५. आरोग्य :-

अ) गटारीची स्थिती ः-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कसबा सांगावमधील गाव भागामध्ये गटारीची सोय असली तरी गावच्या वाडीवस्तीमध्ये मात्र गटारी बसविल्या नव्हत्या. गावातील ज्या भागात गटारी नव्हत्या तेथील काही कुटुंबे सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी करीत होते. तर उर्वरित कुटुंबे उघडयावरच सांडपाणी सोडत असल्यामुळे ते सांडपाणी रस्त्यावर पसरल्यामुळे व खाचखळग्यात साठल्यामुळे परिसरात दुर्गंधी व डासांचे प्रमाणही वाढले होते. गावचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे व ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारीही पूर्ण क्षमतेने काम करीत नसल्यामुळे गटारी सफाईचे काम नियमितपणे होत नव्हते त्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये नाराजी होती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील ज्या भागात सांडपाणी जास्त व गटारी लहान होत्या तेथील लहान गटारी काढून मोठया गटारी बांधल्यामुळे सांडपाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊ लागला. गावातील ज्या वाडी वस्तीमध्ये गटारीची सोय नव्हती तेथील काही भागामध्ये नवीन गटारी बसविल्या तर उर्वरित भागामध्ये सांडपाण्यासाठी चर काढण्यात आली. त्यामुळे दुर्गंधी व डासांचा त्रास कमी झाला. ग्रामस्थांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करून त्यांना आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले त्याचा चांगला परिणाम झाल्याचे दिसून आले. गावातील ४० ते ५० कुटुंबे आपल्या घरातील सांडपाण्याचा उपयोग परसबागेसाठी करीत आहेत. विशेष

म्हणजे ग्रामस्वच्छता कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण व प्रबोधनाद्वारे ग्रामस्वच्छतेबाबतच्या त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई दीड महिन्यातून एकदा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जात असे. गावच्या आकारमानाच्या तुलनेत गावात केवळ ७ कचरा कोंडाळया होत्या गावातील ज्या ठिकाणी कचरा कोंडाळया नव्हत्या त्या भागात कचरा उघडयावरच टाकला जात असल्यामुळे तो पुन्हा वाऱ्याने व मोकाट जनावरामुळे रस्त्यावर व गटारीत जात असे. गावातील जागोजागी रस्त्याच्या दुतर्फा ग्रामस्थांच्या मालकीचे उकिरडे असल्यामुळे गाव अस्वच्छ दिसे व गटारीही तुंबून सांडपाणी रस्त्यावर पसरत असे. ग्रामस्वच्छतेसाठी ग्रामस्थांचे फारसे सहकार्य मिळत नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमता गावात कोपरा सभा घेऊन, ग्रामस्थांना, तरूण मंडळांना व महिलांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटवून देऊन ग्रामस्वच्छतेसाठी सहकार्याचे करण्याचे आवाहन करण्यात आले. गावात १३ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेऊन कचरा कोंडाळयातच टाकण्याची ग्रामस्थांना सवय लावण्यात आली. उकिरडे गावाबाहेर नेण्याचे ग्रामस्थांना आवाहन केल्यामुळे काही ग्रामस्थांनी त्याला प्रतिसाद चांगला दिला पण अजूनही काही उकिरडे गावातच असल्याचे दिसून येते. ग्रामपंचायती, तरूण मंडळे व महिला बचत गट यांच्यामार्फत गावामध्ये वारंवार ग्रामस्वच्छता केली जात असल्यामुळे गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली आहे.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण २२७९ कुटुंबापैकी केवळ ७00 कुटुंबाकडे शौचालये होती. तर गावात एकूण ८0 सार्वजनिक शौचालये होती पण सार्वजनिक शौचालयाचा वापर व्यवस्थित केला जात नसल्यामुळे त्यातील काही शौचालये नादुरूस्त होती. शौचालय नसणाऱ्या सर्व कुटुंबांना सार्वजनिक शौचालये अपुरी पडत असल्यामुळे गावातील बहुतांशी लोक उघडयावरच शौचास जात. त्यामुळे गाव व वस्तीभोवतालच्या सर्व परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले होते. घरी शौचालय नसणाऱ्या महिलांना तर फारच अपमानित जीवन जगावे लागत असे. गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये एकूण ८ शौचालये होती पण गावात १४ अंगणवाडया असून एकाही

अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा नव्हती. घरातील लहान मुलांना तर गावातील रस्त्याच्या दोन्ही बाजुला शौचास अपुरी बसविले जात असल्यामुळे गावात सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले होते. परिणामी गावात डुकरांचा, डास व माशांचा उपद्रव होऊन आजाराचे प्रमाण वाढले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांना व्याख्याने, पथनाटय, माहितीपटाच्याद्वारे गाव हागणदारीमुक्त करणे कसे आवश्यक आहे हे समजावून सांगण्यात आले. गाव हागणदारीमुक्त होण्यासाठी, लोकांना घरोघरी शौचालय बांधण्यास प्रवृत्त करण्यासाठी सहाय्यकारी संस्था, जलस्वराज्य समिती सदस्य, शाळा, अंगणवाडी शिक्षक, तरूण मंडळे, महिला बचत गटांनी खूप प्रयत्न केले.

याचा **परिणाम** म्हणून गावात नवीन वैयक्तिक ९00 शौचालये बांधण्यात आल्यामुळे वैयक्तिक शौचालयांची एकूण संख्या १६00 झाली. शिवाय नवीन २0 सार्वजनिक शौचालये बांधण्यात आल्यामुळे एकूण सार्वजनिक शौचालयांची संख्या १00 झाली. गावात ज्यांच्याकडे शौचालय नाही अशा कुटुंबांना सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे सक्तीचे केले व उघडयावर शौचास जाणाऱ्या व्यक्तिवर दंडात्मक कारवाई केली जाऊ लागली. गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळामध्येदेखील आणखी ८ शौचालयांची सोय केली. तर प्रत्येक अंगणवाडीमध्ये एक शौचालय बांधण्यात आला.

वरील सर्व कारणामुळे गाव स्वच्छ व सुंदर तर झालेच पण त्याचबरोबर गावाला शासनाचा ५ लाखाचा निर्मलग्राम पुरस्कार देखील मिळाला.

## ६. महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** अलिकडे शिक्षणाइतकेच प्रशिक्षणाला देखील तितकेच महत्व असले तरी कसबा सांगावमधील महिलांना मात्र या प्रशिक्षणाची माहिती नव्हती. महिलांच्या सक्षमीकरणासाठी गावात कोणत्याही प्रकारचे अधिकृत प्रशिक्षण आयोजित केले नव्हते.

याचा **परिणाम** म्हणून गावातील महिला ग्रामपंचायतीमध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमामध्ये मोकळेपणाने सहभागी होत नव्हत्या. महिलांना ग्रामसभेचे महत्व माहित नसल्यामुळे ग्रामसभेतील त्यांची उपस्थिती अतिशय कमी असे व उपस्थित असणाऱ्या

महिलांपैकी बहुतांशी महिला तर चर्चेमध्ये किंवा निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागीच होत नसत. गावातील महिलांच्याकडे अनेक चांगले गुण व कला असूनदेखील त्याचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हे त्यांना माहित नव्हते. गावात व्यवसाय करणाऱ्या किंवा नेतृत्व करणाऱ्या महिला खूपच कमी होत्या.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना एकत्र करून त्यांना बाहयजगाची ओळख करून देण्यात आली. त्यांना त्यांच्या अंगी असणाऱ्या गुणांची जाणीव करून देण्यात आली. गावातील महिलांना क्षमताबांधणी प्रशिक्षण म्हणजेच कायेदविषयक, पंचायत राज्यविषयक, शासकीय योजनांविषयक व लिंगसमभाव सचेतना विषयक प्रशिक्षण देण्यात आले. बचत गटातील महिलांना आर्थिक व्यवहार, एम्ब्रॉयडरी, मेणबत्ती बनविणे, शिवणक्लास, पेंटींग वगैरे अनेक स्वरूपाचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे महिलांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे त्या महिला बीजभांडवल व बॅंकाकडून कर्जे घेऊन मोठा व्यवसाय करू लागल्या.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्पर्धांचे आयोजन फार कमी प्रमाणात होत असे. ज्या स्पर्धा गावात आयोजित केल्या जात त्यामधील स्त्री-पुरूषांच्या सहभागाचा विचार करता स्त्रियांची संख्या फारच कमी असे कारण गावात स्त्रियांचे खेळ व पुरूषांचे खेळ अशी पारंपारिक वर्गवारी होती. गावातील विविध स्पर्धामध्ये भाग घेण्याची बहुतांशी महिलांची स्वत:चीच तयारी नसे, तर काही महिलांची इच्छा असून देखील कुटुंबातील सदस्यांच्या विरोधामुळे व समाजाच्या दबावामुळे त्या सहभागी होत नसत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये महिलांना केंद्रबिंदू मानले असल्यामुळे गावातील पाणी, स्वच्छता वगैरे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी महिला सहभागी होणे व त्यांनी पुढाकार घेणे महत्वाचे मानले. त्यासाठी या ग्रामीण महिलांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांच्यामधील सुप्तगुणांची त्यांना जाणीव व्हावी, त्या मोकळेपणाने कोणत्याही कार्यक्रमात सहभागी व्हाव्यात म्हणून काही विशेष प्रयत्न केले.

गावातील अशिक्षित-सुशिक्षित महिलांना सहभागी करून घेण्यासाठी लंगडी, फुगडी, उखाणे, जात्यावरील ओव्या, रांगोळी, लिंबू चमचा, पळणे इ. स्पर्धा आयोजित केल्या. त्यामध्ये सुरूवातीच्या काही स्पर्धांमध्ये महिलांची संख्या खूपच कमी होती पण हळूहळू

स्पर्धामधील महिलांचा सहभाग खूपच वाढत गेला. गावातील महिलांच्यासाठी निबंध, काव्यवाचन व वक्तृत्व स्पर्धादेखील आयोजित केल्या त्यालाही सुशिक्षित महिलांचा प्रतिसाद चांगला मिळाला. हळूहळू गावातील प्रत्येक स्पर्धेमध्ये स्त्री-पुरूष मोकळेपणाने सहभागी होऊ लागले. या स्पर्धांमुळे महिलांचा व्यक्तिमत्व विकास होण्यास व त्यांच्यामधील आत्मविश्वास वाढण्यास निश्चितच मदत झाली.

क) <u>बचत गट</u> :-

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी ज्या अनेक योजना आखण्यात आल्या यापैकी अलिकडे महिला सबलीकरणावर भर देऊन शहरापासून ते खेडयापर्यंत अतिशय वेगाने फोफावत असलेली व महिलांच्या पसंतीस उतरलेली संकल्पना म्हणजे **बचत गट**.

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** कसबा सांगावमध्ये बचत गटाची संकल्पना पोहचली होती पण समाधानकारक प्रतिसादाअभावी गावात केवळ २५ महिला बचत गट अस्तित्वात होते. गावातील बचत गटामध्ये प्रामुख्याने सुशिक्षित महिलांचा समावेश जास्त होता पण या महिला बचत गटामध्ये एकसंघता नव्हती. शिवाय बचत गटातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी फारसे प्रयत्नही केले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील घराघरापर्यंत बचत गटाची संकल्पना पोहचविली. अशिक्षित, गरीब व दुर्बल घटकातील महिलांच्यामध्ये जागृती निर्माण करून त्यांना बचत गट स्थापन करण्यासाठी प्रवृत्त केले. गावात नवीन ७५ बचत गट निर्माण झाल्यामुळे गावातील एकूण बचत गटांची संख्या १00 झाली. बचत गटातील महिलांना आर्थिक नोंदी व आर्थिक व्यवहार कसा करावा याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच गावातील एकूण बचत गटांचा एक महासंघ बनविला. बचत गटामुळे गावातील महिलांचे आर्थिक, सामाजिक व मानसिक सबलीकरण होण्यास मदत झाली. त्याचबरोबर महिलांच्यामधील बचतीची सवय वृध्दिंगत झाली. शिवाय बचत गटांच्यामुळे महिलांच्यामध्ये आत्मसन्मान व आदर निर्माण होऊ लागला आहे.

ड) <u>दारूबंदी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात देशी दारूची दुकाने व गावठी दारू विक्रीचे अनेक अड्डे होते. दारूविक्री व दारू पिणे हे राजरोस पध्दतीने सुरु असल्यामुळे गावातील थोरापासून लहानापर्यंत व अशिक्षितापासून ते सुशिक्षितापर्यंत हळूहळू दारूचे व्यसन जडू

लागले होते. गावातील गरीब, पिडीत व काबाडकष्ट करणारे लोक आपल्या मनाला व शरीराला होणाऱ्या वेदना शमविण्यासाठी दारूच्या आहारी जाऊन दारू पिऊन स्वत:च्या शरीराची व आपल्या संसाराची नासाडी करून घेत होते. दारू पिणाऱ्यांच्या घरातील बायका-मुलांना दररोज मारहाण व अपमानित जीवन जगावे लागत होते. तरीही गावात व्यसनमुक्तीसाठी फारसे प्रयत्न होत नव्हते. गावातील दारू दुकाने बंद व्हावीत असे प्रत्येकाला वाटत होते पण त्यासाठी पुढाकार घेण्यास कोणी तयार नव्हते. लोकांच्यामध्ये एकजूटीचा अभाव होता. गावातील महिलांच्यामध्येही एकसंघता नसल्यामुळे व दारू पिणाऱ्या पुरूषांच्या कुटुंबातील महिलांना योग्य मार्गदर्शन व पाठिंबा मिळत नसल्यामुळे गावात दारूबंदी होत नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांचे प्रबोधन करण्यात आले. बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्यामध्ये एकसंघता वाढीस लागली. एकमेकांच्या सुख दु:खाची देवाणघेवाण होऊ लागली त्यातून दारू पिणाऱ्या कुटुंबातील महिला व मुलाबाळांचे होणारे हाल इतर महिलांच्या लक्षात आल्यानंतर हळूहळू गावातील बहुसंख्य महिलांना दारूबंदी झाली पाहिजे असे वाटू लागले. त्यामुळे जलस्वराज्यच्या माध्यमातून प्रबोधन करण्यासाठी येणाऱ्या मार्गदर्शकांचा सल्ला घेऊन दारूबंदीसाठी मोहीम उघडली आणि मतदान पध्दतीने महिलांनी एकसंघतेच्या जोरावर गावात दारूबंदी घडवून आणली.

## ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग, पिडीत व अनुसूचित जाती जमातीतील लोकांची ग्रामसभामधील उपस्थिती खूपच कमी होती. दुर्बल घटकातील लोकांचा ग्रामविकासातील सहभाग मर्यादित होता. दुर्बल घटकातील लोकांच्यापर्यंत पाणी, गटार, रस्ता दिवाबस्ती सारख्या सुविधा पोहचत नव्हत्या. दुर्बल घटकांच्यामध्येदेखील नागरिक म्हणून हक्क व कर्तव्याबाबत जाणीव जागृतीचा अभाव असल्यामुळे त्यांना काही वेळा अपमानित जीवन जगावे लागत होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाचा मुख्य उद्देशच दुर्बल घटकांच्यामध्ये जाणीव जागृती करून त्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये सामावून घेणे हा आहे. गावातील दुर्बल

घटकांतील लोकांना एकत्र करून त्यांचे प्रश्न समजावून घेण्यात आले. त्याचबरोबर त्यांचे प्रबोधन करून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यात आली. त्यामुळे हळूहळू त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढू लागली व ते निर्णय प्रक्रियेमध्येही सहभागी होऊ लागले. स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी आर्थिक सवलत व दोन ते तीन कुटुंबामध्ये नळजोडणी घेण्याची परवानगी देण्यात आली. तसेच त्यांना शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त केले व त्यांना आर्थिक सहकार्यदेखील केले.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायतीला अनुदान मिळाले होते पण त्याचा विनियोग कसा करावा याची चर्चा ग्रामसभेमध्ये होत नव्हती. ग्रामविकास करीत असताना लोकांच्या मागणीचा फारसा विचार होत नव्हता. त्यामुळे जरी गावामध्ये विकासकामे होत असली तरी गावातील मुठभर लोकांचा फायदा होत असे तेथे सर्वांचा विचार केला जात नसे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामविकास करीत असताना प्रत्येक निर्णय हा ग्रामसभेमध्ये बहुमताने घेतला पाहिजे अशी अट प्रकल्पामध्ये असल्यामुळे सर्वानुमते ग्रामविकास करण्यात आला त्यासाठी विविध माध्यमातून गावाला मिळालेले आर्थिक लाभ खालीलप्रमाणे

**गावाला विविध विकासकामासाठी खालीलप्रमाणे अनुदान मिळाले**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ५,१६,४९0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0 %) | १,१५,८२,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ३,४९,७५0=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0 %) | ११,६२,३६0=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ५,00,000=00 |
| | **एकूण** | **१,४१,१0,६00=00** |

## १३. सुळकूड (तालुका - कागल)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - एप्रिल २०१०)**

### १. लोकसंख्या :-

सुळकूड गावची एकूण लोकसंख्या ५५०२ असून त्यामध्ये २६२२ स्त्रिया व २८८० पुरूष आहेत. गावात एकूण ९५० कुटुंबे असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या २४२ आहे.

### २. ग्रामपंचायतीची माहिती :-

सुळकूड ग्रामपंचायतीची स्वतःची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधादेखील आहे. ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या २ असून स्वतंत्र पाणी वितरण कर्मचाऱ्यांची संख्या ३ आहे.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण १३ सदस्य असून त्यामध्ये ४ स्त्री सदस्य व ९ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील स्त्रीकडे असून त्यांचे शिक्षण ५ वी झालेले आहे तर उपसरपंच पददेखील खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूषाकडे असून त्यांचे शिक्षण १२ वी झालेले आहे.

### ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सुळकूडमध्ये ग्रामविकासाच्या उद्देशाने ग्रामस्थांचा अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता. गावात प्रत्येक महिन्याला ग्रामसभा आयोजित केली जात नव्हती. पण जेंव्हा ग्रामसभा असेल तेंव्हा ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती अतिशय कमी असे तर ग्रामस्थांची उपस्थिती देखील समाधानकारक नव्हती. गटार स्वच्छता, व्यसनमुक्ती, घर तेथे शौचालय इ. बाबीबावत ग्रामस्थांच्यामध्ये जागृती नव्हती व ग्रामपंचायतही उदासिन होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: ग्रामस्थांना प्रकल्पाची माहिती देण्यासाठी ग्रामसभा, कोपरासभा आयोजित केल्या पण हया सभांना ग्रामस्थांची उपस्थिती फारच कमी व त्यांच्यामध्ये एकूणच कार्यक्रमाबाबत उदासिनता असल्याचे जाणवले. त्यामुळे ग्रामपंचायतीने सर्व ग्रामस्थांचा कवठेपिराण (जि.सांगली) या

आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला यामध्ये गावातील महिला, तरूण मंडळे व ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

याचा **परिणाम** म्हणून ग्रामविकास कार्यामध्ये गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट व शाळा इ. चा सहभाग वाढला. प्रत्येक ग्रामसभेपूर्वी स्वतंत्र महिला ग्रामसभा आयोजित केली जाऊ लागली व त्यामध्ये महिलांची उपस्थिती वाढू लागली. त्याचप्रमाणे ग्रामसभेतील ग्रामस्थांची उपस्थिती व निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग वाढला. गावात लोकसहभागातून ग्रामस्वच्छता, गटारस्वच्छता वगैरे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. गावातील महिला बचत गटांची संख्या वाढू लागली. ग्रामविकासासाठी गावातील हेवेदावे बाजूला ठेऊन लोक एकत्र येऊ लागले व विचार विनिमय करू लागले.

## ४. **पाणी व्यवस्थापन** :-

### अ) **पिण्याचे पाणी** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सुळकूड गावापासून ३००० फूट अंतरावर असणाऱ्या दूधगंगा नदीवरून पाणीपुरवठा होत होता. पण सदर पाणीयोजना २५ ते ३० वर्षापूर्वीची (जुनी) असल्यामुळे जॅकवेल पडण्याच्या स्थितीत होते तर मुख्य जलवाहिन्या कमी दाबाने वाहत असल्यामुळे गावाला पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने टाकी भरण्यासाठी खूप वेळ लागे यामुळे वीज खर्चही वाढला होता. गावात दोन ते तीन दिवसातून एकदा पाणी येत असल्यामुळे ग्रामस्थांना कपडे धुणे, आंघोळी आणि जनावरांना धुण्यासाठी व पाणी ३००० फूट अंतर चालून नदीवर जावे लागे. पाणी शुध्दीकरणासाठी जलशुध्दीकरण केंद्र (फिल्टर हाऊस) नसल्यामुळे टी.सी.एल. पावडरचा उपयोग केला जात असे. गावात ५०,००० लिटर क्षमतेचा असलेला जलकुंभ देखील नादुरूस्त होता. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याची बचत, ओघराळयाने पाणी पिणे वगैरे संबंधी जागृती नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** दूधगंगा नदीवरूनच (३००० फूट अंतर) पाणी पुरवठा योजना आणली असून जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून नदीवर नवीन जॅकवेल, नवीन जलवाहिन्या, १.५० लाख लिटर क्षमतेचा जलकुंभ व पाणी शुध्दीकरण केंद्र वगैरे सुविधा निर्माण केल्या. ग्रामसभा, कोपरासभा, गृहभेटी यांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे प्रवोधन केल्यामुळे त्यांना पाण्याची बचत,

ओघराळयाने पाणी पिणे वगैरे सवय लागल्या आहेत. ग्रामस्थांना दररोज शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे त्यांची पाण्यासाठीची वणवण कमी झाली आहे.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण ९५० कुटुंबापैकी केवळ ४०० कुटुंबाकडेच खाजगी नळजोडण्या होत्या तर १० ठिकाणी सार्वजनिक नळकोंडाळया होत्या. गावात नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नळाना पाणी आल्यानंतर गावातील ५५० कुटुंबे ही सार्वजनिक नळकोंडाळयावर विसंबून असल्यामुळे तेथे गर्दी होऊन पाणी मिळविण्यासाठी भांडण, शिवीगाळ, मारामारी सारख्या घटना सतत घडत. गावातील बहुतांशी खाजगी नळांना व सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात एकही सार्वजनिक नळजोडणी (**Public Stand**) करण्याचे नाही असा ग्रामसभेत ठराव केला. स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यामुळे गावातील ९५० कुटुंबापैकी ८११ कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली. उर्वरित कुटुंबेही हळूहळू स्वतंत्र नळजोडणी घेत असल्याचे दिसून आले. गावातीाल बहुतांशी नळांना तोटी बसवून पाणी वाया जाणार नाही याची ग्रामस्थ काळजी घेऊ लागले. ग्रामस्थांना दररोज शुध्द व पुरेसा पाणीपुरवठा होत असल्यामुळे गावातील भांडणतंटा कमी झाला आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी दर रू.३६० होता तर सार्वजनिक वार्षिक पाणीपट्टी दर रू. ७५ होता. पाणीपट्टी वसूली वर्षातून एकदा ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत केली जात असे. पाणीपट्टी वेळेत न देणाऱ्या कुटुंबांची नळजोडणी तोडण्याचा ग्रामपंचायतीचा नियम असला तरी वशिलेबाजी, राजकीय दबाव इ. कारणामुळे त्याची काटेकोर अंमलबजावणी होत नसे. पाणी पुरवठयाबाबत ग्रामस्थांच्यामधील असमाधान, गरीब परिस्थिती व राजकीय कारणामुळे लोक नियमित पाणीपट्टी भरत नसत. परिणामी पाणीपट्टीची थकबाकी वर्षानुवर्षे वाढत होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी दर रू.६०० ठरविण्यात आला. ग्रामस्थांना नळजोडणी देत असतानाच ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी घेण्याचे ग्रामसभेमध्ये सर्वानुमते

ठरले व त्याची अंमलबजावणीही केल्याचे दिसून आले. ग्रामस्थांना नियमित शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे ग्रामस्थ समाधानी असल्यामुळे ते वेळेत पाणीपट्टी भरण्यास तयार असल्याचे जाणवले. सदर पाणीपट्टी वसुली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत वर्षातून एकदा केली जाते.

## ५. <u>आरोग्य</u> :-

### अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये ३ कि.मी. गटारीची सोय होती. तर आणखी अंदाजे ११00 मीटर गटारीची आवश्यकता होती. गावातील केवळ ५% गटारीच बंदिस्त स्वरूपाच्या होत्या. तर काही भागामध्ये सांडपाणी विल्हेवाटीसाठी गटारी किंवा साध्या चरही काढल्या नसल्यामुळे जागोजागी सांडपाणी साचून दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले होते. वेळोवेळी गटारी स्वच्छ करण्याकडे ग्रामपंचायतीचे व ग्रामस्थांचेही दुर्लक्ष होते. परिणामी आजारांचे प्रमाण वाढले होते. एकूणच गावात आरोग्याबाबत जागृतीचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात १00 मीटर नवीन गटारी बसविल्या असल्या तरी आणखी अंदाजे १000 मीटर गटारींची आवश्यकता आहे पण तात्पुरते ग्रामस्थांच्या श्रमदानातून गटारी नसलेल्या ठिकाणी चर खुदाई करून घेतल्यामुळे सांडपाणी साचून होणारी दुर्गंधी व डासांचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्येही स्वच्छतेबाबत जाणीव जागृती केल्यामुळे वेळोवेळी गटारी साफ केल्या जातात. ग्रामस्थांच्यामध्येही आरोग्याबाबत जाणीव जागृती केल्यामुळे आपल्या घर व परीसरात कोठेही गटारी तुंबणार नाहीत व सांडपाणी साचणार नाही याची खबरदारी घेऊ लागले.

### ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यामार्फत केले जात होते. ग्रामपंचायतीमध्ये केवळ दोनच स्वच्छता कर्मचारी असल्यामुळे वेळच्यावेळी ग्रामस्वच्छता होत नव्हती व कचराही ३ ते ४ महिने उचलला जात नसे. शिवाय गावातील लोकांनाही सार्वजनिक स्वच्छतेची सवय नव्हती. ग्रामपंचायतीमार्फत गावात एकही कचरा कोंडाळीची सोय केली नव्हती. प्रत्येक घरातील व गोठयातील कचरा ग्रामस्थ आपआपल्या सोयीनुसार रस्त्याच्या कडेला किंवा

उकिरडयात टाकत असत. अनेक ग्रामस्थांच्या मालकीचे गावातच जागोजागी उकिरडे असल्यामुळे या उकिरडयातील कचऱ्यामुळे गावात सर्वत्र अस्वच्छता पसरत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील रस्तासफाई करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना आरोग्य प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना हक्क व कर्तव्याची जाणीवही करून देण्यात आली. तसेच ग्रामस्थांच्यामध्येही ग्रामस्वच्छतेचे महत्व व कर्तव्याची जाणीव निर्माण करून देऊन लोकसहभागातून ग्रामस्वच्छता करण्यात आली. परिणामी आता विविध तरूण मंडळे, महिला बचत गट व शाळांच्यामार्फत वारंवार गावात स्वच्छतेचे कार्यक्रम आयोजित केले जातात. शिवाय प्रत्येक घरातील महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊ लागल्या आहेत. अनेक ग्रामस्थांनी आपल्या मालकीचा गावातील उकिरडा गावाबाहेर नेऊन ग्रामस्वच्छतेला हातभार लावला आहे. ग्रामपंचायतीमार्फत गावात १0 ठिकाणी कचरा कोंडाळी ठेऊन ग्रामस्थांना स्वच्छतेची सवय लावली. तसेच कोंडाळीतील कचरा आठवडयातून एकदा उचलला जात आहे.

**ब) <u>शौचालय</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण ९५0 कुटुंबापैकी ५00 कुटुंबाकडे शौचालय होते. तर गावात सार्वजनिक शौचालय संख्या ७२ होती. शौचालय नसणाऱ्या ४५0 कुटुंबासाठी ७२ सार्वजनिक शौचालयांची संख्या कमी पडत असल्यामुळे अनेक लोक उघडयावर शौचास जात. तर काही ग्रामस्थ घरी शौचालय असूनसुध्दा बाहेर उघडयावर शौचास जात असत. गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये प्रत्येकी एक शौचालय होते तर गावातील ५ अंगणवाडीपैकी एकाही अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये सर्व ग्रामस्थांनी शासनाची हागणदारीमुक्त गाव असले पाहिजे ही अट पूर्ण करण्याचे ठरविले. गावाने निर्मलग्राम स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. ग्रामपंचायत जलस्वराज्य समिती व सहाय्यकारी संस्थेच्या सहकार्याने गावातील लोकांचे प्रबोधन केले. ग्रामस्थांच्या प्रबोधनासाठी गृहभेटी, कोपरासभा, भिंतीवरील घोषवाक्ये इ. माध्यमांचा वापर करण्यात आला. त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांच्यामार्फतही शौचालयाबाबत प्रसार करण्यात आला. गरीब कुटुंबाना शौचालय बांधण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत मदत, पंचायत समितीचे अनुदान व बॅकांचे कर्ज मिळवून दिले. गावातील तरूण मंडळांनी व बचत गटातील महिलांनीही लोकांना शौचालय

बांधण्यासाठी प्रवृत्त केले. गावामध्ये आणखी ३५३ कुटुंबानी खाजगी शौचालय बांधल्यामुळे एकूण खाजगी शौचालयांची संख्या ८५३ झाली. ज्या कुटुंबाकडे खाजगी शौचालय नाही अशा सर्व कुटुंबाचे सार्वजनिक शौचालयाचा वापर करण्याबाबत प्रबोधन केले व उघडयावर शौचास जाणा-या व्यक्तीवर ग्रामपंचायतीमार्फत दंडात्मक कारवाईस सुरूवात केली. तसेच गावातील प्रत्येक अंगणवाडीमध्ये शौचालय बांधले. यामुळे गावाचे आरोग्यमान सुधारण्यास मदत झालीच पण त्याचबरोबर गावाला शासनाचा रू. ४ लाखाचा निर्मलग्राम पुरस्कारही मिळाला.

## ६. <u>महिला सक्षमीकरण :-</u>

समाजामध्ये जवळपास ५०% संख्या असणा-या व समाजाचा एक महत्वाचा घटक असणाऱ्या महिलांना सक्षम करावयाचे असेल तर प्रथम त्यांना जगातील घडामोडींचे थोडेफार ज्ञान देणे व त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्तगुणांचा विकास करण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे, स्पर्धा आयोजित करणे आवश्यक आहे.

### अ) <u>महिला प्रशिक्षण :-</u>

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण आयोजित केले नव्हते. किंबहुना बहुतांशी महिलांना प्रशिक्षण ही संकल्पनाच माहिती नव्हती. बहुतांशी महिला एक ग्रामस्थ म्हणून असणाऱ्या आपल्या भूमिका, हक्क व कर्तव्याबाबत अनभिज्ञ होत्या. बहुतांशी महिलांना आपल्या गावामध्ये घडणाऱ्या घटनांविषयी व गावासंबंधीही पुरेशी माहिती नव्हती. महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमी होती. जवळजवळ सर्वच महिला आर्थिकदृष्टया स्वावलंबी नव्हत्या व स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्नशिलही नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यावर प्रामुख्याने भर देण्यात येऊन सामूहिक शक्तीचे महत्व व महिला शक्तीवर असणारा शासनाचा विश्वास याची जाणीव करून दिली. महिलांच्या क्षमता विकासासाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन करून त्यांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात आले. महिलांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. जाणीव जागृती व प्रशिक्षणांचा परिणाम म्हणजे गावातील महिलांच्यामध्ये आत्मविश्वास व उत्साह निर्माण झाल्यामुळे बहुतांशी महिला व महिला बचत गटांचा स्वतंत्र व्यवसाय करण्याकडे कल वाढू लागला आहे.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्पर्धांचे आयोजन फार मर्यादीत होते व त्यामध्ये महिलांचा सहभाग तर फारच कमी होता. स्पर्धेमध्ये महिला सहभागी का होत नाहीत? या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने कोणी पाहिले नव्हते. स्पर्धेमध्ये गावातील महिलांनीही सहभाग घ्यावा व महिलांच्यामधील सुप्तगुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यामधील भिती व संकोच कमी व्हावा म्हणून त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचेही फारसे प्रयत्न झाले नव्हते. गावातील सुशिक्षित-अशिक्षित व विविध वयोगटातील महिलांना एकत्रित आणण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: गावातील महिलांच्यामधील न्यूनगंड, भिती, लाज आणि संकोच कमी करण्यासाठी प्रयत्न केला. गावातील प्रत्येक महिलेला आपल्या अंगी असणाऱ्या सुप्तगुणांची ओळख होण्यासाठी व ते सुप्त गुण विकसित होण्यासाठी विविध स्पर्धांचे जाणीवपूर्वक आयोजन केले. उदा. झिम्मा-फुगडी स्पर्धा, उखाणे स्पर्धा, जात्यावरील ओवी, संगीत खूर्ची, पळणे, लिंबू चमचा, रांगोळी स्पर्धा वगैरे. या आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये शाळकरी मुलींपासून ते अशिक्षित व वयस्कर महिलांच्यापर्यंत सर्वांनी अगदी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गावामध्ये होणाऱ्या प्रत्येक स्पर्धेमध्ये पुरूषांच्या बरोबरीने अगदी निःसंकोचपणे स्त्रियाही सहभागी होऊ लागल्या. गावातील महिलांना आता स्पर्धेचे महत्व पटले असून त्या आपल्या मुलांनाही स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करू लागल्या आहेत.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिला बचत गटांची संख्या केवळ १० होती. गावतील एकूण ९५० कुटुंबातील स्त्रियांची संख्या २६२२ असूनदेखील बचत गटामध्ये सहभागी स्त्रियांची संख्या फारच कमी होती. अनेक स्त्रियांना बचत गटाविषयी साधी माहितीही नव्हती. बचत गटामध्ये जास्तीत जास्त महिलांनी भाग घ्यावा यासाठी जाणीवपूर्वक फारसे प्रयत्न झालेले नव्हते. बचत गटामध्ये असणाऱ्या महिलांच्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण, मार्गदर्शनांचे आयोजन केले जात नव्हते. बचत गटातील महिलांना कर्ज पुरवठा, स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठीची पुरेसी माहिती नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील प्रत्येक घरात जाऊन, कोपरासभा घेऊन महिलांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यासाठी प्रयत्न केले.

महिलांच्या प्रबोधनासाठी व्याख्याने व वेगवेगळया गावामध्ये व शहरामध्ये अनेक महिला एकत्र येऊन चालवत असलेले बचत गट व व्यवसायाची सोदाहरण माहिती चित्रफितीद्वारे दाखविण्यात आली. गावातील घराघरातील महिला बचत गटामध्ये सहभागी व्हाव्यात म्हणून त्यांच्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले. तर गावातील सर्व बचत गटांचा मिळून एक महासंघ बनविण्यात आला.

याचा **परिणाम** म्हणून गावातील बचत गटामध्ये सहभागी होणाऱ्या महिलांची संख्या वाढू लागली व नवीन ३८ बचत गट तयार होऊन एकूण ४८ बचत गट झाले. अनेक महिला स्वत: पुढे येऊन बचत गट कसा स्थापन करायचा? व्यवसायासाठी कर्ज कसे मिळवावयाचे व त्याची परतफेड कशी करावयाची याची माहिती घेऊ लागल्या. महिला बचत गटाच्या माध्यमातून गावातील महिला धाडसी झाल्यामुळे कोणत्याही कार्यक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपली मते मांडू लागल्या. काही बचत गटांमार्फत पिठाची गिरण, शेवया मशीन, चटणी कांडप यासारखे व्यवसाय सुरू आहेत. काही महिलांनी आपल्या कुटुंबासाठी म्हैस, शेळी आणि शिलाई मशीन खरेदीसाठी जलस्वराज्य मधील बीज भांडवल घेतले आहे व त्या कर्जाची परतफेड वेळच्यावेळी करीत आहेत.

### ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल असणारा घटक गावातील सार्वजनिक कार्यक्रमामध्ये स्वतःहून सहभागी होत नसे व त्यांना सहभागी करून घेण्यासाठी फारसा प्रयत्न झाला नव्हता. दुर्बल घटकाला ग्रामविकासाच्या कार्यात फारसी गोडी नव्हती. शिवाय यांची ग्रामसभेतील उपस्थितीही नगण्य होती. दुर्बल घटकांच्या आर्थिक गरीब परिस्थितीमुळे, राजकीय दबाव नसल्यामुळे व त्यांच्यामध्ये जाणीव जागृतीचा अभाव असल्यामुळे त्यांच्यापर्यंत पाणी, शौचालय, रस्ते, दिवाबत्ती इ. सुविधा पुरेशा प्रमाणात पोहचल्या नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकातील लोकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. दुर्बल घटकातील लोकांच्या घरोघरी भेटी देऊन, कोपरा सभा घेऊन त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. त्यांच्यापर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहचविली व त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. या लोकांच्यामध्ये जागृती होऊ लागल्यामुळे त्यांची

ग्रामसभेतील उपस्थिती व सहभाग वाढला व तसेच त्यांना त्यांच्या  हक्काची व कर्तव्याची जाणीव होऊ लागली. ग्रामपंचायतीमार्फत मदत व पंचायत समितीमार्फत अनुदान घेऊन ते आपल्या घरामध्ये नळ, शौचालय व वीजेसारख्या सुविधा घेऊ लागले. ज्या कुटुंबाना आर्थिकदृष्टया स्वतंत्र नळ घेणे व स्वतंत्र शौचालय बांधणे परवडणार नाही अशा दोन-दोन कुटुंबासाठी एक नळजोडणी, शौचालय देण्यात आले. दुर्बल घटकांच्या गल्लीपर्यंत, घरापर्यंत,  वीज, रस्ता व गटारीसारख्या सुविधा पुरविण्यात आल्या.

## ८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला पाणी, शौचालय व गटारीसाठी जरी अनुदान मिळालेले असले तरी त्याची माहिती सामान्य ग्रामस्थांच्यापर्यंत पोहचत नव्हती. ग्रामस्थांच्या गरजेनुसार व सर्वांच्या इच्छेनुसार अनुदान कोठे खर्च करावयाचे? हे ठरविण्याचा अधिकार नव्हता किंवा असल्यास तो सामान्य नागरिकाला माहित नव्हता. गावात कोणत्या बाबीसाठी किती अनुदान आले? किती खर्च केले? किती शिल्लक राहिले? याची माहिती नागरिकांच्यापर्यंत पोहचत नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र लोकसहभागातून ग्रामविकास व पारदर्शी व्यवहार हे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले. गावातील प्रत्येक नागरिकापर्यंत नोटीसबोर्ड, दवंडी, ग्रामसभा इ. च्या माध्यमातून शासनाचे मिळालेले अनुदान, खर्च व शिल्लक याची माहिती पोहचविली जाऊ लागली. ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामविकासाबाबत समाधान व्यक्त केले जाऊ लागले.

**गावाला विकास कामासाठी मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ४,१९,३२०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | ८३,९६,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,३८,०००=०० |
| ४. | जमा लोकवर्गणी (१०%) | ९,६७,७१८=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ४,००,०००=०० |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,००,०००=०० |
|  | **एकूण** | **१,१०,२१,०३८=००** |

# १४ . नंदवाळ (तालुका - करवीर)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - २००५ व हस्तांतरीत तारीख - नोव्हेंबर २००८)**

## १ . <u>लोकसंख्या</u> :-

नंदवाळ गावची एकूण लोकसंख्या १७१0 असून त्यामध्ये ७४५ स्त्रिया व ९६५ पुरूष आहेत . गावात एकूण २७७ कुटुंबे असून ३१ दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत .

## २ . <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

नंदवाळ ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे पण ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा मात्र नाही . ग्रामपंचायतीकडे एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी आणि पाणी वितरण कर्मचारी नसल्याचे आढळून आले .

नंदवाळ ग्रामपंचायत समितीही ७ सदस्यांची असून त्यामध्ये १ स्त्री सदस्य व ६ पुरूष सदस्य आहेत . ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष असून त्यांचे शिक्षण अनुक्रमे १२ वी व ७ वी असे आहे .

## ३ . <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** नंदवाळमधील ग्रामस्थांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते व ग्रामस्वच्छतेबाबत ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतही फारशी जागरूक नव्हती . गावातील तरूणांचा व महिलांचा ग्रामसभा व ग्रामविकास कार्यात सहभाग नव्हता .
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला गावातील सर्व ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यासाठी बैठका, कोपरासभा, ग्रामसभा घेण्यात आल्या . पण यामध्ये ग्रामस्थांची उपस्थिती समाधानकारक नव्हती . गावातील महिला कार्यक्रमामध्ये सहभागी होत नव्हत्या . ग्रामस्वच्छता, महिला बचत गट वगैरेबाबत लोकांच्यात उदासिनता होती . त्यामुळे ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे, ग्रामविकासाचे महत्व पटावे यासाठी जैन्याळ (ता . कागल) हया आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला . या अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील ग्रामपंचायत सदस्य, जलस्वराज्य समिती सदस्य, महिला, तरूण मंडळे व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला .

या अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामस्थांची ग्रामसभेतील व विविध कार्यक्रमातील उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. गावातील तरूण मंडळे ग्रामस्वच्छता कार्यक्रमात, लोकवर्गणी जमा करण्यात व शौचालय बांधण्यासाठी ग्रामस्थांच्या प्रबोधनकार्यात सहकार्य करू लागली. गावातील महिला ग्रामसभेस उपस्थित राहून निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ लागल्या. स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करू लागल्या. शिवाय ग्रामस्वच्छता कार्यक्रमातही सहभागी होऊ लागल्या. गावातील ग्रामस्थ आपापसातील राजकीय गटतट थोडे बाजूला ठेऊन ग्रामविकासावर चर्चा, विचारविनिमय करू लागले.

४. **<u>पाणी व्यवस्थापन</u>** :-

अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावापासून १ कि.मी. अंतरावरील विहीरीवरून पाणीपुरवठा होत असे. पण त्या विहिरीला जानेवारी ते मे या कालावधीत पाणी खूपच कमी असते. त्यामुळे गावातील दोनच कुपनलिकांवर पाण्यासाठी झुंबड उडे. पाण्यावरून गावात महिलांच्यामध्ये व काही वेळा ग्रामस्थांच्यामध्येही भांडणे व मारामाऱ्या होत. पाणी शुध्दीकरण करण्यासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी विहीर हा जलस्त्रोत निवडून नवीन विहीर खोदण्यात आली. शिवाय गावात नवीन ४ कुपनलिका खोदण्यात आल्या. गावातील पूर्वीच्या ४ कुपनलिकांचे पुनर्भरण करण्यात येऊन ग्रामस्थांचे पाणी वापराबाबत प्रबोधन करण्यात आले. पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचा व तुरटीचा योग्य प्रमाणात वापर केला जातो. गावाला दररोज प्रतिमाणसी ४0 लिटर पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये समाधान असल्याचे दिसून आले.

ब) **<u>नळजोडणी</u>** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात नळपाणी पुरवठा योजना असून १३0 कुटुंबाकडे खाजगी नळजोडणी होती. खाजगी नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबासाठी ९ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावाला पाणी टंचाईची समस्या भेडसावत असूनदेखील पाणी

बचतीबाबत जागृती नसल्यामुळे सार्वजनिक नळांना तर तोटया नव्हत्याच पण वैयक्तिक बहुतांशी नळांनादेखील तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांचे पाण्याबाबत विविध प्रकारे प्रबोधन करून त्यांना खाजगी स्वतंत्र नळजोडणी घेण्याचे आवाहन व सहकार्य केले गेल्यामुळे. गावात २४० कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेऊन प्रत्येकानी नळाला तोटी बसविली. ग्रामस्थांचे प्रबोधन करून देखील काही कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली नसल्यामुळे तात्पुरत्या कालावधीसाठी गावात ५ सार्वजनिक नळजोडणी ठेवल्या आहेत पण पाणी वाया जाऊ नये म्हणून त्यांना तोटी बसविली आहे.

क) पाणीपट्टी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू.३६० होती तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टी रू.७५ होती. सदर पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. गावातील लोक पाणीपट्टी वेळच्यावेळी भरत नसल्यामुळे पाणीपट्टीची थकबाकी वाढत चालली होती. त्यामुळे देखभाल दुरूस्ती करणे ग्रामपंचायतीला अवघड होत होते. ग्रामस्थांच्यामध्ये एकूणच पाणी योजनेबाबत नाराजी होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे सुरूवातीला विविध तज्ज्ञांच्यामार्फत पाणी बचत, पाणीपट्टी, देखभाल दुरूस्ती वगैरेबाबत प्रबोधन करण्यात आले. शिवाय ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना व पाणी पुरवठा समितीला देखभाल दुरूस्तीचे प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामसभेमध्येच सर्वानुमते खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू.४०० व सार्वजनिक पाणीपट्टी रू.१०० निश्चित करण्यात येऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फतच वर्षातून एकदा पाणीपट्टी वसूल करावी असे ठरले. या ग्रामसभेमध्ये सर्वांनी वेळेवर पाणीपट्टी भरण्याचे ठरले असून जी व्यक्ती पाणीपट्टी वेळेत भरणार नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला दिले.

## ५. आरोग्य :-

अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारीचा वापर मोठया प्रमाणात केला जात होता. गावात ७०० मीटर लांबीच्या गटारी होत्या पण

आणखी १000 मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. गावातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी परसबागा, शोषखड्डे हया पर्यायांचा कोणीही वापर केलेला नव्हता. गावात स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे व एकच कर्मचारी पाणी वितरण, ग्रामस्वच्छता वगैरे काम करीत असल्यामुळे गटारी वेळोवेळी स्वच्छ केल्या जात नसत. त्यामुळे गटारी तुंबून अनेक ठिकाणी सांडपाणी रस्त्यावर पसरत असे व आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीलाच ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटवून देऊन आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन व प्रबोधन केले. ग्रामस्थ, तरूण मंडळे व महिला बचत गटामार्फत गावात ग्रामस्वच्छता कार्यक्रमांतर्गत गटारीची स्वच्छता, गटारी नसलेल्या भागात सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी चर काढण्यात आली. गावातील १५ कुटुंबानी आपल्या घरातील सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी केला. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत गावात ३00 मीटर गटारी बसविण्यात आल्या असल्या तरी गावात आणखी ७00 मीटर गटारींची आवश्यकता आहे. ग्रामपंचायतही गटारी तुंबणार नाहीत, सांडपाणी रस्त्यावर येणार नाही याची खबरदारी घेऊ लागली आहे.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फतच केले जात असे. ग्रामपंचायतीकडे एकच स्वच्छता कर्मचारी होता त्याच्यावर पाणी वितरण करण्याची जबाबदारीही असल्यामुळे रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम वेळच्यावेळी होत नव्हते. गावातील लोकांच्यामध्येही आपल्या घराचा परिसर व आपले गाव स्वच्छ ठेवण्याबाबत फारशी जागृती नसल्यामुळे ग्रामस्वच्छतेची जबाबदारी केवळ ग्रामपंचायतीची आहे अशी त्यांची भावना होती. गावातील लोकांना आपल्या घरातील कचरा टाकण्यासाठी ग्रामपंचायतीने एकही कचरा कोंडाळी ठेवली नसल्यामुळे ग्रामस्थ आपल्या सोयीनुसार कोठेही कचरा टाकत असत. ग्रामस्वच्छता कार्यक्रमात गावातील तरूण मंडळांचा सहभाग नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य समिती, सहाय्यकारी संस्था व शासकीय अधिकाऱ्यांच्या मार्फत ग्रामस्थांचे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले. शिवाय त्यांचा ग्रामस्वच्छतेमध्ये आदर्श असणाऱ्या गावाला अभ्यासदौरा

आयोजित करण्यात आला. ग्रामपंचायतीने ग्रामस्थांची मदत घेऊन गावातील संपूर्ण स्वच्छता व गावातील केरकचरा उचलण्याचे काम केले. गावातील तरूण मंडळांचे, शाळांचे व महिलांचे ग्रामस्वच्छतेबाबत चांगले प्रबोधन झाल्यामुळे त्यांच्याकडून गावात स्वतंत्र स्वच्छता कार्यक्रम आखले जाऊ लागले. गावातील प्रत्येक घरातील महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमात हातभार लावू लागल्या. ग्रामपंचायतीनेही गावातील तीन ठिकाणी कचरा कोंडाळया ठेऊन तो वेळच्यावेळी उचलण्यास सुरूवात केली.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** - गावातील एकूण २५४ कुटुंबापैकी ८० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय असून एकही सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे शौचालय नसणाऱ्या कुटुंबातील सर्व लोक उघडयावर शौचास जात होते. ग्रामस्थांच्यामध्ये आरोग्याबाबत फारशी जागृती नसल्यामुळे उघडयावर शौचास जाणे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गैर आहे असे त्यांना वाटत नव्हते. गावातील शौचालय नसणाऱ्या कुटुंबातील महिला, वृध्द व आजारी व्यक्तींचे फार हाल होत. गावातील लहान मुलांना तर गावातील उकिरडयाभोवताली व रस्त्याच्या दोन्ही बाजूस शौचास बसविले जात असल्यामुळे गावात दुर्गंधी पसरे व वाहतुकीस अडथळे निर्माण होत असत. गावात १ शाळा व २ अंगणवाडया होत्या पण तेथे शौचालयाची सुविधा नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये हागणदारीमुक्त गाव असले पाहीजे ही अट असल्यामुळे प्रकल्पाच्या सुरूवातीपासूनच ग्रामस्थांचे शौचालय बांधण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. त्यासाठी व्याख्यानांचे आयोजन, माहितीपट दाखविणे, शासकीय अनुदान, बॅंकामार्फत कर्ज मिळवून देणे यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्रबोधनामुळे ग्रामस्थांची मानसिकता बदलण्यास मदत झाल्यामुळे गावात १७४ नवीन शौचालये बांधली गेली. एवढेच नव्हे तर गावातील शाळा व अंगणवाडीमध्येही शौचालय बांधण्यात आले. ग्राव स्वच्छ, सुंदर आणि हागणदारीमुक्त झाल्यामुळे गावातील लोकांचे आरोग्यमान सुधारण्यास मदत झाली. गावाने निर्मलग्राम स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शासनाचा निर्मलग्राम - नंदवाळ हा १ लाखाचा पुरस्कार पटकाविला.

६ . **महिला सक्षमीकरण** :-

अ) **महिला प्रशिक्षण** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये ऐक्यभाव निर्माण करण्यासाठी, त्यांच्यामध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण होण्यासाठी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी किंवा इतर बाबींसाठी महिलांच्यासाठी कोणत्याच प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नसे .

त्यामुळे गावातील महिलांच्यामध्ये जाणीव जागृतीचा अभाव होता . महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमी होती . बहुतांशी महिला सार्वजनिक कार्यक्रमामध्ये मोकळेपणाने सहभागी होत नव्हत्या . त्याचबरोबर बचत गट स्थापन करणे, व्यवसाय करणे यासारख्या गोष्टीपासून ही त्या दूर होत्या . गावातील अनेक महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या कल्याणकारी योजनाही माहीत नव्हत्या .

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिला सक्षमीकरणावर भर दिला व गावातील महिलांच्या घरोघरी जाऊन, कोपरासभा व बैठका घेऊन त्यांचे प्रबोधन करण्यात आले . त्यांच्यासाठी क्षमता बांधणी, व्यक्तिमत्व विकास व व्यवसाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले .

या सर्वांचा **परिणाम** असा झाला की, गावातील महिलांच्यामध्ये खूप चांगली जागृती होऊन त्या ग्रामसभेमध्ये, सार्वजनिक कार्यक्रमामध्ये मोकळेपणाने सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेऊ लागल्या . विविध प्रशिक्षणामुळे महिलांना बाहयजगाची ओळख, त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या सोयीसवलती कळण्यास मदत झाली . गावातील महिलांचा आत्मविश्वास उंचावला व त्या विविध व्यवसाय करण्यासाठी पुढे येऊ लागल्या .

ब) **स्पर्धा** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात ज्या स्पर्धा आयोजित केल्या जात त्यामधील महिलांचा सहभाग खूपच कमी असे . गावात स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्यांमध्ये तरूण मुली विशेषत शाळकरी मुलींचाच समावेश अधिक असे . या स्पर्धांमध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग असावा यासाठी प्रयत्न केले जात नव्हते . गावातील विवाहित व वयस्कर महिलांच्यावर सामाजिक दडपण असल्यामुळे त्या सार्वजनिक कार्यक्रमात व स्पर्धेत सहभागी होत नसत . गावातील एखादया कुटुंबातील महिलेला स्पर्धेत सहभागी होण्याची इच्छा

असली तरी तिच्या कुटुंबियाकडून विरोध होत असे. एकंदरीत महिलांच्यासाठी स्वच्छ किंवा खुले वातावरण नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** मात्र महिलांना जास्तीत जास्त संधी देण्याचा प्रयत्न केला आहे. महिलांच्यावरील सामाजिक दडपण कमी करून त्यांच्या वागण्या बोलण्यात मोकळेपणा यावा, महिलांनी कोणतीही जबाबदारी आत्मविश्वासाने स्विकारावी यासाठी विविध प्रयत्न केले ते असे -

गावातील सर्व महिलांनी विविध उपक्रमात सहभागी व्हावे म्हणून महिलांच्या स्वतंत्र स्पर्धा (धावणे, संगीत खुर्ची, उखाणे, झिम्मा फुगडी, वक्तृत्व व निबंध स्पर्धा इ.) आयोजित केल्या. गावामध्ये आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये विविध वयोगटातील सुशिक्षित व अशिक्षित महिलांनी अगदी मोकळेपणाने प्रवेश घेऊन बक्षीसेही पटकाविली. या स्पर्धेच्या निमित्ताने महिला घराबाहेर पडू लागल्या. गावातील जनरल (स्त्री-पुरूष) स्पर्धेमध्येही महिला पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या व पुरूषांच्यावर मात करून बक्षीसेही मिळवू लागल्या.

**ब) <u>बचत गट</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिला सक्षमीकरणासाठी बचत गट हे एक चांगले माध्यम असले तरी याचा प्रसार नंदवाळमध्ये फारसा झाला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे गावात केवळ ४ महिला स्वयंसहाय्यता बचत गट होते. हया बचत गटाचे कामही फारसे प्रभावी पध्दतीने चालले नव्हते. गावातील बचत गटातील महिला इतर महिलांना बचत गट स्थापन करण्यासाठी मदत करीत नव्हत्या. त्यामुळे गावातील बहुतांशी महिलांच्यापर्यंत बचत गट संकल्पनाच पोहचली नव्हती. गावातील बचत गटातील महिला ग्रामविकास कार्यामध्ये सहभागी होत नव्हत्या. शिवाय त्यांचा व्यवसायाकडे कल नव्हता. गावातील बचत गटातील महिलांना व इतर महिलांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या महिला विकास समितीने व सहाय्यकारी संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी गावातील प्रत्येक घरातील महिलांशी संपर्क साधला. त्यांना एकत्र केले व त्यांचे विविध प्रकारे प्रबोधन केले. गावातील सर्व महिलांना बचत गटाची संकल्पना, तिचे महत्व सांगून बचत गट स्थापन करण्यास सहकार्य केले जाऊ लागले. गावातील पूर्वीपासून सुरू असलेल्या महिला बचत गटांची माहिती घेऊन त्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन व प्रेरणा दिली. गावात नवीन ९

बचत गटांची स्थापना झाल्यामुळे एकूण १३ बचत गट झाले. हया सर्व १३ बचत गटांना एकत्र करून त्यांना विविध प्रशिक्षण, व्यवसायासाठी बीजभांडवल व इतर बॅंकाकडून कर्ज उपलब्ध करून दिले. त्यामुळे महिलांच्यामध्ये एक उत्साही वातावरण निर्माण झाले.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग व अनुसूचित जाती जमातीतील लोकांच्यासाठी शासनाच्या अनेक सोयीसुविधा असून देखील गावातील मूठभर लोकांनाच त्याची माहिती होती. गावातील दुर्बल घटकातील लोक विकासाच्या प्रक्रियेत मोकळेपणाने सहभागी होत नसत. या दुर्बल घटकात एकही महिला बचत गट नव्हता. गावातील बहुतांशी दुर्बल कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी, शौचालय यासारख्या सुविधा नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गावातील दुर्बल घटकांना विकासाच्या प्रक्रियेत आणणे व त्यांच्यापर्यंत विविध सोयीसुविधा पोहचविणे हे उद्दिष्ट ठरविण्यात आले. गावातील जलस्वराज्य समिती व सहाय्यकारी संस्थेमार्फत गावातील दुर्बल कुटुंबाची माहिती घेण्यात आली. दुर्बल कुटुंबाना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी समितीमार्फत प्रयत्न करण्यात आले. तसेच दुर्बल घटकातील महिलांचे बचत गट स्थापन करण्यात आले. दुर्बल घटकातील कुटुंबाना लोकवर्गणीमध्ये थोडी सवलत देण्यात आली. या कुटुंबाना शौचालय, नळजोडणी घेण्यासाठी पंचायत समिती, बॅंका व जलस्वराज्यामार्फत सहकार्य करण्यात आले.

## ८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला शासनाचे जरी अनुदान मिळाले असले तरी त्याची माहिती सामान्य माणसांना होत नव्हती व त्याचा विनियोग करण्याच्या प्रक्रियेतही तो सहभागी होत नव्हता. ग्रामविकास कार्यात लोकवर्गणीच्या माध्यमातून सामान्य नागरीक सहभागी नसे. त्यामुळे त्याला एखादया योजनेबद्दल आपुलकी वाटत नसे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व घटकातील लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले. जलस्वराज्याच्या प्रत्येक बाबीची

माहिती तळागाळातील नागरिकापर्यंत पोहचविण्यात येऊन लोकवर्गणीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांच्या मनात प्रकल्पाविषयी आत्मियता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकल्पाच्या कालावधीत गावाला विविध विकासकामासाठी मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,७०,२८०=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा) | २८,00,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५१,५00=00 |
| ४. | लोकवर्गणी (जमा) | ३,३३,४00=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | १,00,000=00 |
| | एकूण | ३५,५५,१८0=00 |

# १५. आंबवडे (तालुका - पन्हाळा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - २००६ व हस्तांतरीत तारीख - ऑगस्ट २००८)**

## १. <u>लोकसंख्या</u> :-

आंबवडे गावची एकूण लोकसंख्या १७७५ असून त्यामध्ये ६६२ स्त्रिया व ११३३ पुरूष आहेत. गावात एकूण कुटुंबसंख्या २८३ असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या ६८ आहे.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

आंबवडे ग्रामपंचायतीची स्वतःची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. मात्र ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधेचा अभाव आहे. ग्रामपंचायतीकडे एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी आणि पाणी वितरण कर्मचारी नाही.

ग्रामपंचायतीची समिती ही ९ सदस्यांची असून त्यामध्ये ३ स्त्री सदस्य व ६ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच पद हे खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूषांच्याकडेच असून त्यांचे शिक्षण अनुक्रमे एम.ए. व १0 वी असे आहे.

### ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** आंबवडे ग्रामपंचायतीमार्फत ग्रामस्थांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते. ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामस्वच्छता व आरोग्याच्याबाबत जागृती नव्हती ग्रामस्थांचा ग्रामविकासकार्यामध्येही फारसा सहभाग नव्हता आणि त्यांची ग्रामसभामध्ये उपस्थिती कमी होती. गावातील तरूण मंडळांचा व महिलांचा ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यातील सहभाग खूप कमी होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला गावातील महिला, तरूण व सर्व ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामस्वच्छता व ग्रामआरोग्याबाबत जागृती करण्यासाठी बैठका व कोपरासभा घेण्यात आल्या. पण त्यामधील ग्रामस्थांची उपस्थिती समाधानकारक नव्हती. शिवाय ग्रामसभांनाही ग्रामस्थांची उपस्थिती कमीच होती. एकूणच कार्यक्रमाबाबत ग्रामस्थांची उदासिनता दिसून आल्यामुळे सर्व ग्रामस्थांना ग्रामस्वच्छता, ग्रामआरोग्य व महिला सक्षमीकरण ही संकल्पना समजावी व त्याचे महत्व कळावे म्हणून गावातील महिला, तरूण व ग्रामस्थांचा यांचा अभ्यासदौरा ग्रामस्वच्छता व ग्रामविकासकार्यात आदर्श ठरलेल्या कवठेपिराण (ता.मिरज) या आदर्श गावाला आयोजित केला. या अभ्यासदौऱ्याला गावातील तरूण मंडळे, महिला व ग्रामस्थांचा प्रतिसाद चांगला मिळाला.

अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामस्थांचा ग्रामस्वच्छता कार्यक्रमामध्ये सहभाग वाढला. गावातील महिलांच्यामध्येही जागृती होऊन त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती व बचत गटातील सहभाग वाढला. गावातील तरूण मंडळांचे व शाळांचे ग्रामस्वच्छता व ग्रामप्रबोधन कार्यात चांगले सहकार्य मिळू लागले. शिवाय गावातील विविध राजकीय पक्षातील लोकांच्यामध्येही ग्रामविकासकार्यामध्ये एकमत होऊ लागले.

### ४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

#### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात दीड कि.मी. अंतरावरील विहिरीवरून सायफन पध्दतीने पाणी आणून नळ योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला. विहिरीला पाणी कमी असल्यामुळे गावात प्रतिदिन प्रतिमाणसी २५ लीटर पाणी पुरवठा होत होता. गावात पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल.पावडरचा वापर केला जात असे. अपुऱ्या पाणी

पुरवठयामुळे गावातील महिला, पुरूष व शाळकरी मुलांनाही पाण्यासाठी भटकावे लागे. त्यामुळे शेतमजूरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना रोजगार बुडवून तर शाळेत जाणाऱ्या मुलांना शाळा चुकवून पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकावे लागे. गावात पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून ६ बोअरवेल खोदण्यात आले पण त्यातील चार बोअरवेलना पाणीच नाही तर दोन बोअरवेलना फारच कमी पाणी आहे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांच्या संमतीने विहीर हाच जलस्त्रोत निश्चित करून गावापासून दीड कि.मी. अंतरावर एक विहीर खोदण्यात आली. या विहिरीमधील पाण्याच्या पातळीत वाढ होण्यासाठी डोंगरावरील झऱ्याचे पाणी विहिरीच्या बाजूस मुरविले जाते तसेच विहिरीच्या वरील बाजूस एक सिमेंट बंधारा बांधल्यामुळे विहिरीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. गावात पूर्वी ३५,000 लिटरची पाणी साठवण टाकी होती आता ७0,000 लिटर क्षमतेची पाणी साठवण टाकी बांधण्यात आली आहे. सद्याही गावात पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचाच वापर केला जात असला तरी टी.सी.एल. किती टाकावे? ओ.टी.टेस्ट कशी व कधी घ्यावी? याबाबत पाणी वितरण कर्मचाऱ्याला प्रशिक्षित केले आहे. गावातील सर्व ग्रामस्थांचेही पाणी वापराबाबत चांगले प्रबोधन झाले असल्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने केला जातो. ग्रामस्थांना नियमित, पुरेसे व शुध्द पाणी मिळू लागल्यामुळे त्यांचे पाण्यासाठीचे हाल थांबले असल्यामुळे ते समाधानी असल्याचे आढळले.

**ब) <u>नळजोडणी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील ११८ कुटुंबाकडे स्वतंत्र खाजगी नळजोडणी होती तर खाजगी नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबासाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून ६ सार्वजनिक नळजोडण्या होत्या. गावातील सार्वजनिक नळांचा ग्रामस्थ योग्य पध्दतीने वापर करीत नसल्यामुळे नळांना तोटी नसणे किंवा मोडणे यामुळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात असे. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याच्या वापराबाबत जागृती नसल्यामुळे व अनेकंच्या खाजगी नळांनाही तोटया नसल्यामुळे पाणी वाया जात असे. गावातील खाजगी नळ नसणाऱ्या कुटुंबाची संख्या जास्त, अवेळी व अपुरा पाणी पुरवठा आणि सार्वजनिक नळांची संख्या कमी असल्यामुळे पाणी येण्यापूर्वीच गावातील महिला सार्वजनिक नळावर नंबरसाठी घरातील भांडी ठेवत व नळांना पाणी आल्यानंतर या सार्वजनिक नळावर पाणी भरणाऱ्यांची

झुंबड उडे व अनेक वेळा भांडणतंटा व मारामाऱ्या देखील होत असत. प्रत्येक घरात स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न बुडत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांच्या बैठका घेऊन पाणी वापराबाबत व नळजोडणी घेण्याबाबत प्रबोधन करण्यात आल्यामुळे गावातील खाजगी नळजोडणी संख्या ११८ वरून १८० वर गेली. स्वतंत्र नळजोडणी घेण्याबाबत इतरांचे प्रबोधन सुरू असले तरी सद्या त्यांच्यासाठी ६ सार्वजनिक नळजोडण्या ठेवल्या आहेत. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी वापराबाबत जागृती झाल्यामुळे त्यांनी आपल्या घरगुती नळांना तोटया बसविल्या तर ग्रामपंचायतीने सार्वजनिक नळांना तोटया बसविल्यामुळे पाणी वाया जाणे बंद झाले आहे. जरी सद्या काही ग्रामस्थांच्याकडे स्वतंत्र नळजोडणी नसली तरी सातत्याने ग्रामपंचायतीमार्फत स्वतंत्र नळजोडणी घेण्याबाबत ग्रामस्थांचा पाठपुरावा केला जात असल्यामुळे हळूहळू गावातील खाजगी नळजोडणी संख्या वाढून ग्रामपंचायतीचे उत्पन्नही वाढू लागले आहे.

**क) <u>पाणीपट्टी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू. २०० व सार्वजनिक पाणीपट्टी रू.७५ होती. सदर पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. ग्रामस्थांना नियमित व पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे व काही ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे व काही ग्रामस्थांची मानसिकता नसल्यामुळे समाधानकारक पाणीपट्टी वसूल होत नव्हती. त्यामुळे वर्षाला पाणीपट्टीच्या थकबाकीत वाढ होत होती. ग्रामस्थांनी पाणीपट्टी नियमित भरावी म्हणून त्यांचे प्रबोधन करणे त्यांच्या समस्या समजावून घेणे, त्याच्यावर सर्वानुमते उपाय शोधणे याबाबत ग्रामपंचायतीमार्फतही फारसे प्रयत्न केले जात नव्हते. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यांचे पाणी तात्पुरते बंद करणे (नळतोडणे) हा जरी उपाय असला तरी त्याचाही प्रभावी वापर केला जात नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांचे वारंवार प्रबोधन करून जलस्वराज्य प्रकल्पाच्या सर्व उपक्रमामध्ये ग्रामस्थांना सहभागी करून घेतले. ग्रामसभेमध्ये प्रकल्पाच्या सर्व धोरणाबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आले. गावातील खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू. ५०० तर सार्वजनिक पाणीपट्टी रू.७५ ठरविण्यात आली. गावात स्वतंत्र नळजोडणी देत असताना ६ महिन्याची आगाऊ पाणीपट्टी जमा करण्यात येऊ लागली. गावातील पाणीपट्टी वसूली वार्षिक पध्दतीने

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फतच केली जाऊ लागली. ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसे पाणी मिळणार असल्यामुळे सुरूवातीलाच ग्रामसभेमध्ये वेळेत पाणीपट्टी न देणाऱ्या विरूध्द कडक कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. सद्या सर्व नळजोडणींना मीटर बसविणाचा ग्रामस्थांचा विचार आहे.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात फक्त ११५ मीटर लांबीच्या गटारी होत्या. तर संपूर्ण गाव गटारमुक्त होण्यासाठी जादाच्या २००० मीटर गटारींची आवश्यकता होती. गावाच्या आकारमानाचा विचार करता गटारी फारच कमी असल्यामुळे सांडपाणी सर्वत्र पसरून दलदल होऊन दुर्गंधी वातावरण निर्माण होत असे. गावात स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे व ग्रामस्थांचाही सहभाग मिळत नसल्यामुळे सांडपाणी वाहून जाण्यासाठी साध्या चरही खोदल्या नव्हत्या. गावात कोठेही बंदिस्त गटारी नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील ग्रामस्थांचे स्वच्छता व आरोग्य याविषयी वारंवार प्रबोधन करण्यात आले. त्यांना आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे व ग्रामस्वच्छता कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. गावातील शाळांनाही ग्रामस्वच्छता कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतले. गावात नवीन २१० मीटर लांबीची गटार बांधण्यात आली. ग्रामस्थांच्या व शाळेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने गावातील गटारींची स्वच्छता करण्यात आली, गावातील ज्या भागामध्ये सांडपाणी जाण्याची कोणतीच व्यवस्था नाही तेथे सांडपाणी जाण्यासाठी चर खोदण्यात आली. ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामस्वच्छतेबाबत जागृती झाल्यामुळे गटारी तुंबणार किंवा बुजणार नाहीत याची काळजी घेतली जात आहेत.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्तासफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फतच केले जात असले तरी ग्रामपंचायतीकडे एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे गावातील स्वच्छता वेळच्यावेळी होत नव्हती. परिणामी गावातील रस्ते खराब व रस्त्यावर अनेक ठिकाणी कचरा साचत असे. गावात एकाही ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळी नसल्यामुळे लोक आपल्या घरातील केरकचरा रस्त्याच्याकडेला टाकत

असत. गावात रस्त्यावर व रस्त्याच्या दोन्हीबाजूला पालापाचोळा, प्लॅस्टीक पिशव्या पडलेल्या असत. पावसाळयात या पालापाचोळयामुळे व प्लॅस्टीक पिशव्यामुळे सांडपाणी तुंबून दुर्गंधी पसरून डासांचे प्रमाण वाढत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य स्वच्छता समितीने गावातील सर्व लोकांच्या घरोघरी जाऊन, त्यांच्या वारंवार बैठका घेऊन त्यांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटवून सांगितले. व्याख्यान, पथनाटय वगैरेच्या माध्यमातून शाळेला जाणारी मुले, महिला व सर्व ग्रामस्थांच्यापर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहचविला. गावातील महिला, तरूण व शाळेतील विद्यार्थ्यांच्या मदतीने गावातील सर्व गल्ल्या व चौक स्वच्छ करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छतेचे संदेश देत असताना प्रत्येक घरामध्ये केरकचरा टाकण्यासाठी कचराकुंडी ठेवण्याचे आवाहन केले. ग्रामपंचायतही ग्रामस्थांच्या मदतीने वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आखू लागली व गोळा होणारा कचरा वेळच्यावेळी उचलला जाऊ लागला.

**क) <u>शौचालय</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीच** गावामध्ये प्रत्येकाच्या घरी शौचालय असल्यामुळे शासनाने आंबवडे गावाला निर्मलग्राम म्हणून घोषित केले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सहाय्यकारी संस्था, अंगणवाडी शिक्षिका व जलस्वराज्य समितीतील सदस्यांच्या मदतीने घरोघरी जाऊन शौचालयाबाबत सर्वेक्षण केल्यानंतर प्रत्येक घरात शौचालय असल्याचे आढळले. ग्रामस्थांचे शौचालयाच्या वापराबाबत प्रबोधन करून शौचालयातील सांडपाणी शोषखड्डयात मुरविण्याचे आवाहन केले.

## ६. महिला सक्षमीकरण :-

गावातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी राबविलेले उपक्रम व जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

**अ) महिला प्रशिक्षण :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निर्मल ग्रामच्यावेळी गावातील महिलांना एकत्र करून स्वच्छतेबाबत व शौचालय बांधून घेण्याबाबत आवाहन केले होते. गावातील महिलांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नव्हते. महिलांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा,

त्यांच्यामध्ये वैयक्तिक व राजकीय जागृती निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न केले नसल्यामुळे गावातील महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती व सार्वजनिक कार्यक्रमातील उपस्थिती खूपच कमी असे. गावातील महिलांच्यामध्ये ऐक्यभावनेचा अभाव होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमतः गावामधील महिलांना जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी करून घेण्याचे ध्येय ठरविण्यात आले. गावातील महिलांचे विविध प्रकारे प्रबोधन करून त्यांच्यासाठी क्षमता बांधणी व व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या विविध प्रशिक्षणाचा बहुसंख्य महिलांनी लाभ घेतला. प्रशिक्षणामुळे महिलांच्या मानसिकतेमध्ये हळूहळू बदल होऊन विविध कार्यक्रमातील महिलांचा सहभाग व पुढाकार वाढला.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांची स्पर्धेकडे पाहण्याची मानसिकता संकुचित असल्यामुळे विवाहीत महिला कोणत्याही स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास तयार नसत. त्यामुळे गावात आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये महिलांची संख्या फारच कमी असे. कारण त्यांना यशापयशाची भिती असल्यामुळे त्या स्पर्धामध्ये सहभागी होण्याचे टाळत असत. महिलांच्यामध्ये स्पर्धेबाबत असणारी भिती काढून टाकून त्यांना स्पर्धेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी कोणीही, कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केले नव्हते. बहुतांशी महिला स्पर्धेपासूनच दूर राहत असल्यामुळे त्यांच्यामध्ये अनेक प्रकारचे न्यूनगंड तयार झाले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील महिलांना सक्षम करण्यासाठी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व मोकळेपणा निर्माण होण्यासाठी, त्यांच्यामध्ये असणारे न्यूनगंड कमी करण्यासाठी त्यांचे प्रबोधन केले व त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊ लागले. गावात महिलांच्यासाठी स्वतंत्र संगीत खुर्ची, दोरीवरील उडया, धावणे, झिम्मा फुगडी वगैरे स्पर्धा आयोजित करण्यात येऊ लागल्या. स्पर्धेमध्ये विविध वयोगटातील बहुसंख्य महिलांनी अगदी उत्स्फूर्त सहभाग घेतल्यामुळे मोकळेपणाचे वातावरण निर्माण होऊन महिलांच्यामधील यशापयशाची असणारी भिती कमी झाली. स्पर्धेमुळे महिलांना त्यांच्या कार्यक्षमतेचा विकास करण्यासाठी उत्तेजन मिळाले.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** बचत गटाबाबत फारशी जागृती नसल्यामुळे गावात केवळ ४ महिला बचत गट होते. या महिलांना बचत गटाबाबत जागृत करण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न केले नव्हते. गावात स्थापन झालेल्या बचत गटांनाही योग्य मार्गदर्शन व प्रेरणा नसल्यामुळे त्यांच्यामध्येही मरगळ आली होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिला सक्षमीकरणावर प्रामुख्याने भर देण्यात आला. गावात महिलांच्यामध्ये बचत गटाबाबत जागृती निर्माण करण्याचे व त्यांना बचत गट स्थापन करण्यासाठी सहकार्य करण्याचे काम सहाय्यकारी संस्था व महिला विकास समितीने केल्यामुळे गावात नवीन ८ महिला बचत गट स्थापन झाले. गावातील जुन्या महिला बचत गटांचीही बैठक घेऊन त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन करण्यात आले. गावातील सर्व महिला बचत गटांना विविध व्यवसाय प्रशिक्षण देऊन, व्यवसायासाठी बीजभांडवल पुरविण्यात आले.

७. <u>**दुर्बल घटक**</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकातील लोकांचा ग्रामसभा व ग्रामविकासकार्यातील सहभाग अतिशय कमी होता. गावातील दुर्बल घटकातील लोकांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना ग्रामविकास कार्यक्रमामध्ये जाणीवपूर्वक सहभागी करून घेण्यासाठी फारसे प्रयत्नही झाले नव्हते. अनेक दुर्बल घटकातील कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नव्हती. तसेच अनेक दुर्बल घटकातील महिलांना बचत गट म्हणजे काय? हेही माहित नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकांचा स्वतंत्र सर्वे करून त्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या सोयी सवलतीची त्यांना माहिती देण्यात आली. दुर्बल घटकातील महिलांचे स्वतंत्र बचत गट स्थापन करण्यात आले. दुर्बल घटकातील कुटुंबाना शौचालय बांधण्यासाठी, नळजोडणी घेण्यासाठी विविध प्रकारचे सहकार्य सहाय्यकारी संस्थेकडून व जलस्वराज्य समितीकडून मिळू लागले. दुर्बल घटकांना वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे त्यांच्यामध्ये जागृती निर्माण झाली व त्यांचा ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढला.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** – गावात विविध विकास कामे झाली त्यासाठी शासनाचे अनुदानही मिळाले पण या अनुदानाबाबत संपूर्ण माहिती ग्रामस्थांना दिली जात नव्हती. शासनाच्या अनुदानाचा विनियोग करण्याबाबत ग्रामसभा बोलावून निर्णय घेतला जात नव्हता. विकासकामासाठी शासनाच्या अनुदानाबरोबरच ग्रामस्थांचा लोकवाटा कधी घेतला नसल्यामुळे ग्रामस्थांनाही त्या कामाबाबत आपलेपणा वाटला नव्हता. गावात क्षमता बांधणी व महिला सक्षमीकरणासाठी शासनाकडून कधीही स्वतंत्र अनुदान मिळाले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** – गावातील ग्रामविकासाच्या प्रत्येक कार्यात ग्रामस्थांना सहभागी करून घेतले जाऊ लागले. गावाला शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती विविध माध्यमाद्वारे ग्रामस्थांच्यापर्यंत पोहचविण्यात येऊ लागली व विकासकामासाठी शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या १0% रक्कम लोकवर्गणीच्या स्वरूपात जमा करण्यात येऊ लागली.

**प्रकल्पाच्या कालावधील गावाला विविध विकासकामासाठी मिळालेले अनुवाद**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,७३,५00=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ३६,७0,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ६९,७५0=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ४,0९,२५0=00 |
| ५. | प्रोत्साहन अनुदान | ५,00,000=00 |
| | **एकूण** | **४९,२२,५00=00** |

## १६ . चव्हाणवाडी (तालुका - पन्हाळा)

(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - ऑक्टोबर २००६ व हस्तांतरीत तारीख - फेब्रुवारी २००९)

### १ . लोकसंख्या :-

चव्हाणवाडी गावची एकूण लोकसंख्या ९३५ असून त्यामध्ये ४६५ स्त्रिया व ४७0 पुरूष आहेत. गावातील एकूण कुटुंबाची संख्या १५१ असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या ३५ आहे.

### २ . ग्रामपंचायतीची माहिती :-

ग्रामपंचायतीच्या मालकीची स्वतःची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. पण संगणक सुविधा नाही. ग्रामपंचायतीकडे १ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व १ पाणी वितरण कर्मचारी आहे.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण सदस्य संख्या ७ असून त्यामध्ये स्त्री सदस्य ३ व पुरूष ४ आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील स्त्री भूषवित असून त्यांचे शिक्षण १२ वी झालेले आहे तर उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष भूषवित असून त्यांचे शिक्षण १0 वी झालेले आहे.

### ३ . अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** चव्हाणवाडी ग्रामस्थांच्यामध्ये पर्यावरण, स्वच्छता व ग्रामविकासाबाबत जाणीव जागृती व्हावी म्हणून अभ्यसादौऱ्याचे आयोजन केले नव्हते. शिवाय महिलांच्या सक्षमीकरणासाठी कोणत्याही अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते. ग्रामस्थांच्यामध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी वगैरेबाबत विशेष जागृती नव्हती. ग्रामस्थांची ग्रामसभामधील उपस्थिती, ग्रामविकास कार्यातील सहभाग अतिशय कमी होता. सार्वजनिक कार्यक्रमामधील व ग्रामसभामधील महिलांची उपस्थिती व त्यामधील त्यांचा सहभाग कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची गावात अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला गावातील महिला व ग्रामस्थांना एकत्र करून प्रकल्पाचे महत्व, ग्रामस्वच्छता, शौचालय वगैरेबाबत जागृती करण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्ये महिला व ग्रामस्थांची उपस्थिती व

सहभाग अतिशय कमी होता. त्यामुळे ग्रामस्थांना ग्रामविकास कार्यात गोडी वाटावी, त्याचे महत्व त्यांना कळावे म्हणून कांबळवाडी (ता.राधानगरी) येथे अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला. तसेच महिलांच्यासाठी 'स्वयंसिध्दा' कोल्हापूर येथे अभ्यासदौरा आयोजित केला.

**अभ्यासदौऱ्यानंतर** परिणाम असा झाला की, ग्रामस्थांची व महिलांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढू लागली. ग्रामस्थांमार्फत, तरूण मंडळांमार्फत, गावातील शाळामार्फत स्वतंत्र स्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. शौचालय बांधण्यासाठी केलेल्या प्रबोधनाला ग्रामस्थ चांगला प्रतिसाद देऊ लागल्यामुळे गावातील शौचालयाची संख्या वाढू लागली. गावातील महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करू लागल्या व काही बचत गटांनी जलस्वराज्य प्रकल्पाकडून बीजभांडवल घेऊन छोटा-मोठा व्यवसाय सुरू केला आहे.

## ४. <u>पाणी व्यवस्थापन :-</u>

### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावापासून ५०० फूटावर असणाऱ्या विहीरीमधून गावाला पाणीपुरवठा होत असे. पण या विहीरीची पडझड झाल्यामुळे व विहीरीत गाळ साचल्यामुळे गावाला पुरेसा पाणी पुरवठा होऊ शकत नव्हता. प्रतिदिन प्रतिमाणसी केवळ २५ लिटर पाणीपुरवठा होत असल्यामुळे गावातील महिलावर्गाचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत असे. पाणी शुध्दीकरणासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे. ग्रामस्थांच्यामध्ये व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्येही पिण्याचे पाणी कसे वापरावे याबाबत नियोजन व जागृती नसल्यामुळे पाणी पुरवठा वेळी-अवेळी होत असे व ग्रामस्थांच्याकडून पाण्याचा अपव्यय केला जाई. गावातील साठवण टाकी क्षमता केवळ १0,000 लिटर होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाच्या मूळ पाणी स्त्रोताचे (विहीरीचे) बळकटीकरण करून गावात नवीन ३0,000 लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधण्यात आली. गावातील पाणी वितरण व स्वच्छता कर्मचऱ्याला प्रशिक्षण देऊन पाणी अशुध्द होणार नाही याची काळजी घेणे व पाणी शुध्दीकरण करण्याची प्रक्रिया, ओ.टी. टेस्ट याबाबत प्रशिक्षीत केले. तसेच गावातील ग्रामस्थांचे व विशेषता महिला वर्गाचे पाणी

वापराबाबत प्रबोधन केले. गावाला दररोज प्रतिमाणसी ४० लिटर पाणी पुरवठा होऊ लागल्यामुळे ग्रामस्थ व विशेषता महिलांच्यामध्ये समाधान दिसून आले.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** चव्हाणवाडी गावात खाजगी नळजोडणी ८० तर होती सार्वजनिक नळजोडणी केवळ १ होती. ज्या कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नाही अशा कुटुंबातील सर्व महिला - पुरूष सार्वजनिक नळावरून पाणी आणत. गावात केवळ एकच सार्वजनिक नळ असल्यामुळे पाण्यासाठी लोकांच्या रांगा लागत व अनेकवेळा पाण्यावरून भांडणेही होत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील लोकांचे वारंवार प्रबोधन करून स्वतंत्र नळजोडणी घेण्यासाठी ग्रामस्थांना प्रवृत्त केल्यामुळे प्रत्येक कुटुंबाने स्वतंत्र नळजोडणी घेतली व सद्या गावात एकही सार्वजनिक नळजोडणी नाही. त्यामुळे गावातील पाण्यावरून होणारे भांडणतंटेही बंद झाले. ग्रामस्थांचे पाण्याबाबत चांगले प्रबोधन झाल्यामुळे प्रत्येकांनी नळांना तोटया बसविल्या त्यामुळे पाण्याचा अपव्यय थांबला आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.३६० होता तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. १०० होता. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूल केली जात होती. पाणीपट्टी न देणाऱ्या कुटुंबाची नळजोडणी (नळकनेक्शन) रद्द करावी अशी तरतूद होती पण त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात नसल्यामुळे गावातील पाणीपट्टीची थकबाकी वाढली होती. ग्रामस्थ पाणीपट्टी वेळेत भरत नसल्यामुळे ग्रामपंचायतीस देखभाल दुरूस्ती करणे अवघड झाले होते. परिणामी ग्रामस्थांचे विशेषता महिलांचे पाण्यासाठी हाल होत होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला ग्रामस्थांचे पाणी, पाणीपट्टी वगैरेबाबत प्रबोधन करण्यात आले. तसेच ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू. ३६० च ठेवण्यात आली. नवीन नळजोडणी देत असतानाच ग्रामस्थाकडून ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी घेण्यात आली. सद्याही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फतच वार्षिक पाणीपट्टी वसूल केली जाते. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून

केलेल्या प्रबोधनामुळे व वेळेत पाणीपट्टी न देणाऱ्यावर काटेकोर कारवाई करण्याच्या धोरणामुळे ग्रामस्थ वेळेत पाणीपट्टी भरू लागले आहेत.

## ५. <u>आरोग्य</u> :-

### अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी केवळ १५० मीटर गटारींची सोय होती. गावातील संपूर्ण सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आणखी ११५० मीटर गटारींची आवश्यकता होती. बहुतांशी भागात गटारी नसल्यामुळे सांडपाणी सर्वत्र पसरून दलदल होऊन दुर्गंधी येत असे. आपल्या घरासभोवती कोठे सांडपाणी साचू नये म्हणून ग्रामस्थ स्वत: काही प्रयत्न करीत नव्हते. ग्रामपंचायतीकडे स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या फारच कमी असल्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत सांडपाणी कोठेही साचू नये म्हणून गटारीची वेळोवेळी स्वच्छता केली जात नसे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये स्वच्छता हया गोष्टीला महत्व देऊन गावातील सोयीसुविधाबरोबरच लोकांचे प्रबोधन करण्यावर अधिक भर देण्यात आला. गावात नवीन १५० मीटर गटारी बांधण्यात आल्या. गावातील तरूणमंडळे व इतर ग्रामस्थांच्या मदतीने ग्रामपंचायतीने वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले व ज्या ज्या भागात गटारी नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर पसरत असे तेथे सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदण्यात आल्या. गावातील १० कुटुंबानी आपल्या घराचे सांडपाणी शोषखड्डयात मुरविले आहे. तर ५ कुटुंबांनी सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी केला आहे.

### ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ एकच स्वच्छता कर्मचारी होता व ग्रामस्थांच्यामध्येही स्वच्छतेबाबत फारशी जागृती नसल्यामुळे रस्ते अस्वच्छ असत. गावात सार्वजनिक कचरा कोंडाळया केवळ ३ होत्या पण जिथे कोंडाळया नव्हत्या त्या भागातील लोक आपल्या सोयीनुसार कोठेही कचरा टाकत असत. जागोजागी टाकलेला हा केरकचरा वेळच्यावेळी उचलला जाात नसल्यामुळे रोगराईचा प्रश्न उद्‌भवत असे. गावात बहुतांशी कुटुंबांचे घराशेजारीच उकिरडे असल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे विविध प्रकारे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले. ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटण्यासाठी ग्रामस्वच्छतेमध्ये आदर्श असणाऱ्या कांबळवाडी (ता.राधानगरी) गावाला ग्रामस्थांचा अभ्यासदौरा आयोजित केला.

या अभ्यासदौऱ्याचा परिणाम म्हणून ग्रामस्वच्छतेच्या कार्यात ग्रामस्थांचे सहकार्य मिळू लागले. गावातील काही कुटुंबानी आपल्या मालकीचे असणारे गावातील उकिरडे गावाबाहेर नेऊन सहकार्य केले. गावातील प्रत्येक महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊ लागल्या. गावातील तरूण मंडळे, महिला बचत गट व शाळेचे विद्यार्थी स्वच्छता कार्यक्रमांचे आयोजन व प्रबोधनाचे काम करू लागले. गावात ५ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेऊन तो कचरा वेळच्यावेळी उचलण्याबाबत ग्रामपंचायतही दक्ष राहू लागली.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ ७६ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती तर ७५ कुटुंबाकडे स्वतंत्र शौचालय नसल्यामुळे ते ग्रामस्थ गावाबाहेर उघडयावर शौचास जात असत. प्रबोधनकार्यातील ग्रामपंचायतीचे अपुरे प्रयत्न व ग्रामस्थांचे असहकार्य यामुळे गावातील शौचालयाचे प्रमाण वाढत नव्हते. घरी शौचालय नसल्यामुळे व गावात सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे गावातील महिलांचे, आजारी माणसांचे आणि वृध्द व्यक्तींचे खूप हाल होत असे. गावातील उघडयावरील हागणदारीमुळे आजारांचे प्रमाणही वाढले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** हागणदारीमुक्त गावाला असणारे महत्व लक्षात घेऊन सुरूवातीपासूनच ग्रामस्थांच्या कोपरासभा व बैठका घेऊन प्रबोधनास सुरूवात केली. त्यासाठी व्याख्यान, अभ्यासदौरे, माहितीपट, भिंतीवरील घोषवाक्ये इ. माध्यमांचा उपयोग केला. गावात घरोघरी शौचालय बांधण्यासाठी महिला वर्गाचे मोठया प्रमाणात प्रबोधन करण्यात आले. गावातील गरीब कुटुंबाना शौचालय बांधण्यासाठी शासकीय अनुदान व बँकामार्फत कर्जपुरवठा करण्यासाठी सहकार्य करण्यात आले. गावाने निर्मलग्राम स्पर्धेत घेतलेला सहभाग, प्रबोधन कार्यात तरूण मंडळे, महिला बचत गट, शाळा इ. नी बजावलेली भूमिका व त्यांना ग्रामस्थांच्याकडून मिळालेला चांगला प्रतिसाद यामुळे गावात नवीन ७५ वैयक्तिक शौचालये बांधली गेली व गावाला ५0 हजार रूपयांचे शासनाचे निर्मल ग्रामचे बक्षीस मिळाले.

६ . **महिला सक्षमीकरण** :-

अ) **महिला प्रशिक्षण** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या विकासासाठी विशेष असे प्रयत्न केलेले नव्हते. गावातील महिलांच्या क्षमता विकासासाठी प्रशिक्षणांचे आयोजन केले नसल्यामुळे गावातील बहुतांशी महिला कोपरा सभांना, ग्रामसभांना फार कमी उपस्थित राहत होत्या. तर ज्या महिला कोपरासभा व ग्रामसभांना उपस्थित असत त्या चारचौघात बोलायला व आपले मत मांडायला घाबरत असत. गावातील महिलाना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती नव्हती. गावातील महिलांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमतरता व बाहय जगांचे ज्ञान कमी असल्यामुळे सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सहभाग व सार्वजनिक जबाबदारी स्वीकारायला तयार नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिला सक्षमीकरणाला अधिक महत्व देऊन गावातील महिलांच्या विकासासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. गावातील महिलांच्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटांना चालना देणे, बचत गट रेकॉर्ड (नोंदी) लिखाण, किशोरी मार्गदर्शन कार्यशाळा, समभाव सचेतना, पंचायतराज प्रशिक्षण व नेतृत्व विकास यासारखे प्रशिक्षण आयोजित केले त्यामध्ये महिलांचा सहभाग वाढला.

या सर्वांचा **परिणाम** म्हणून ग्रामसभेत महिलांची उपस्थिती वाढली. ग्रामसभेत व सार्वजनिक कार्यक्रमात महिला चारचौघांशी मनमोकळपणाने बोलू लागल्या व निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ लागल्या. गावातील महिलांना शासकीय योजनांची व व्यवसायाची माहिती मिळाल्यामुळे त्याचा लाभ घेण्यासाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. या सर्वामुळे गावातील महिला बचत गटांनाही चालना मिळाली.

ब) **स्पर्धा** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील बहुतांशी महिला सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत नसत. गावात कमी प्रमाणात स्पर्धांचे आयोजन केले जात असे पण त्यामध्ये पुरूषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग खूपच कमी असे. गावातील महिलांच्या सुप्तगुणांना संधी देण्यासाठी विशेष अशा स्पर्धांचे आयोजन केले जात नव्हते. गावातील सर्व स्तरातील महिला विविध कार्यक्रमात/स्पर्धात सहभागी व्हाव्यात म्हणून त्यांचे प्रवोधन किंवा अनुकूल वातावरण निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला जात नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ लागले. महिलांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील भिती, लाज किंवा संकोच कमी करण्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊ लागले. विविध स्पर्धांच्या आयोजनापूर्वी कोपरासभा, बैठकामधून महिलांचे प्रबोधन करून त्यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला. गावातील सर्व स्तरातील महिला सहभागी व्हाव्यात म्हणून रांगोळी, वक्तृत्व, मेहंदी, उखाणे, झिम्मा-फुगडी, दोरीवरील उडया, धावणे वगैरे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रकल्पाच्या सुरूवातीच्या काही स्पर्धांमध्ये महिलांची संख्या कमी होती पण नंतर स्पर्धेतील महिलांचा सहभाग वाढत गेला. गावातील इतर विविध स्पर्धांमध्येदेखील पुरूषांच्या बरोबरीने महिला सहभागी होऊ लागल्या.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ ५ च महिला बचत गट होते. बहुतांशी महिला बचत गटामध्ये स्हभागी झाल्या नव्हत्या व त्यांना सहभागी करून घेण्यासाठी फारसे प्रयत्नही झाले नव्हते. गावात बचत गटात असलेल्या सर्व महिलांचे सामुहिक कार्यक्रम होत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये समन्वय नव्हता. गावातील बचत गटातील महिला ग्रामविकासाच्या इतर कोणत्याही कार्यात सहभागी होत नसत. गावातील बचत गटातील महिलांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या घरोघरी जाऊन त्यांच्या कोपरासभा व बैठका घेऊन त्यांना बचत गट ही संकल्पना समजावून सांगितली. त्यांच्या शंकाचे निरसन केले. त्यांना बचत गट स्थापन करण्यासाठी सहकार्य केल्यामुळे गावात नवीन १० महिला बचत गट स्थापन झाले. गावातील पूर्वीच्या बचत गटांनाही मार्गदर्शन केल्यामुळे तेही चांगले सक्रिय झाले. गावातून महिला बचत गटांना मार्गदर्शन, प्रशिक्षण व बीजभांडवल दिल्यामुळे महिलांच्यासाठी एक चांगले वातावरण निर्माण झाले. गावातील बचत गटातील महिलांनी ग्रामस्वच्छता कार्यक्रमातून शौचालयाचे प्रबोधन करण्यात, लोकवर्गणी गोळा करून देण्यात व इतर जलस्वराज्य प्रकल्पाच्या विविध कार्यक्रमात मोलाचे सहकार्य केले आहे.

७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग, व अनुसूचित जाती जमातीतील लोकांच्याकडे विशेष असे लक्ष दिले नसल्यामुळे त्यांच्यापर्यंत शासकीय योजनांची/अनुदानाची माहिती पोहचली नव्हती. गावातील दुर्बल घटकातील लोकही ग्रामसभा व ग्रामविकासाच्या कार्यक्रमात कमी सहभागी होत असत. दुर्बल घटकातील बहुतांशी कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी व शौचालय यासारख्या सुविधा नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये गावातील गरीब, अपंग, व अनुसूचित जाती-जमातीतील लोकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे हे उद्दिष्ट असल्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र बैठका व कोपरासभा आयोजित करून मार्गदर्शन केले. त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. त्यांच्यामधील महिलांचे स्वतंत्र बचत गट स्थापन केले. दुर्बल घटकातील लोकांना क्षमता बांधणी प्रशिक्षण दिले. दुर्बल घटकातील लोकांना शौचालयासाठी, स्वतंत्र नळजोडणीसाठी अनुदान व सवलती देण्यात आल्या. एकूणच या लोकांचे चांगले प्रबोधन झाल्यामुळे त्यांची ग्रामसभामधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढला.

८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला विविध विकास कामासाठी शासकीय अनुदान मिळाले असले तरी त्यामध्ये ग्रामस्थांचा लोकवाटा काहीही नसल्यामुळे त्यांना त्या विकास कामाबाबत आपलेपणा वाटला नाही. गावात विविध विकासकामासाठी आलेल्या अनुदानाची माहिती ग्रामस्थांच्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था केली जात नव्हती. ग्रामविकासाबाबत निर्णय प्रक्रियेमध्ये सर्व ग्रामस्थांना सहभागी करून घेतले जात नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामविकासकामासाठी शासनाकडून ९0% अनुदान मिळाले व त्यामध्ये १0% लोकवाटा ग्रामस्थांचा असल्यामुळे त्यांना ही योजना आपली वाटू लागली. गावात विविध विकासकामासाठी आलेल्या अनुदानाची माहिती नोटीसबोर्ड, डिजीटल बोर्ड व ग्रामसभाद्वारे लोकांच्यापर्यंत पोहचविली आहे. ग्रामविकासासाठी शासनाच्या आलेल्या अनुदानाचा विनियोग कसा करावयाचा याबाबत सर्व निर्णय ग्रामसभेमध्ये सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

**गावाला प्रकल्पकाळात शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,०२,३२०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | २०,०२,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५१,०००=०० |
| ४. | लोकवर्गणी (१०%) | २,४५,०००=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ५०,०००=०० |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ४,१७,०००=०० |
| | **एकूण** | **२९,६७,३२०=००** |

# १७. माले (तालुका - पन्हाळा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - जुलै २००९)**

## १. लोकसंख्या :-

माले गावची एकूण लोकसंख्या ५३२६ असून त्यामध्ये २५७८ स्त्रिया व २७४८ पुरूष आहेत. गावात एकूण १३१२ कुटुंबे असून १७६ दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत.

## २. ग्रामपंचायतीची माहिती :-

माले ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. मात्र संगणक सुविधेचा अभाव आहे. ग्रामपंचायतीकडे २ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी आहेत.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण १३ सदस्य असून त्यामध्ये ५ स्त्री सदस्य व ८ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर अनुसूचित जातीतील (एस.सी.) स्त्री कार्यरत असून त्यांचे शिक्षण १० वी पर्यत झालेले आहे तर उपसरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष कार्यरत असून त्यांचे शिक्षण बी.कॉम पर्यंत झालेले आहे.

३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** माले गावातील ग्रामस्थांसाठी व महिलांसाठी अभ्यासदौ-याचे आयोजन केले नव्हते. ग्रामस्थांची ग्रामसभेतील उपस्थिती व महिलांचा सहभाग हा खूपच कमी होता. ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामस्वच्छता, पाणी व्यवस्थापन वगैरे बाबीबाबत जागृती नव्हती. महिलांच्यामध्येही जागृती व एकजूटीचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला ग्रामस्थांच्यामध्ये व महिलांच्यामध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला. पण लोकांच्यामध्ये उत्साह नसल्यामुळे त्यांची बैठका व ग्रामसभांना उपस्थिती कमी असे. त्यामुळे त्यांच्यामध्ये उत्साह वाढावा, त्यांना ग्रामविकास ही संकल्पना समजावी यासाठी त्यांचा कवठेपिराण (ता.मिरज) व कोल्हापूरमधील स्वयंसिध्दा उद्योग समूहाला अभ्यासदौरा आयोजित केला. त्यामध्ये गावातील महिला, पुरूष व तरूण मंडळे उत्स्फूर्तपणे सहभागी झाली.

**अभ्यासदौऱ्यानंतर** ग्रामस्थांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. तसेच महिला व दुर्बल घटकातील लोक ग्रामसभेला उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागले. ग्रामस्थ स्वच्छता कार्यक्रमामध्ये मोठया संख्येने सहभागी होऊ लागले. सर्वसाधारण महिला व दुर्बल घटकातील महिलांची बचत गटांची संख्या वाढू लागली.

४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला १.५ कि.मी. अंतरावरील विहीरीवरून पाणीपुरवठा केलेला होता. ही विहीर गाळाने भरू लागल्यामुळे पाणीसाठा कमी होत होता व विहीरीचे जलस्त्रोतही कमी झाले होते. गावाला पाण्याची टंचाई भासू लागल्यामुळे गावात १५ बोअरवेल खोदले होते पण त्यांनाही पुरेसे पाणी नसल्यामुळे लोकांचे पाण्यासाठी हाल होत होते. गावात एक तलाव होता पण त्याचा उपयोग जनावरे धुणे व कपडे धुण्यासाठी केला जात असे. गावात १,५0,000 लिटर क्षमतेची साठवण टाकी होती पण ती अपुरी पडत होती. पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल.पावडरचा वापर केला जात असे. पाण्याची ओ.टी. टेस्ट आरोग्य विभागामार्फत महिन्यातून एक वेळा केली जात होती. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याची बचत, पाण्याची शुध्दता वगैरेबाबत जाणीव जागृतीचा अभाव होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील लोकांना विशेषता महिलांना कोपरासभा व ग्रामसभांच्या माध्यमातून एकत्र करून त्यांच्यामध्ये पाणी व्यवस्थापनाबाबत जागृती निर्माण करण्यात आली. ग्रामसभेमध्ये सर्वानुमते विहीर हा जलस्त्रोत निवडून दोन विहीरीवरून पाणी पुरवठा करण्याचा निर्णय झाला. गावातील दोन्हीही विहीरीतील गाळ काढून त्यांची खोलीही वाढविण्यात आली व इतर दुरूस्ती करण्यात आली. गावातील १५ बोअरवेलपैकी ज्या बोअरवेलमध्ये किरकोळ बिघाड असतील ते दूर करण्यात आले. गावातील दोन विहीरींचे पुनर्भरण करण्यात आले. तर गावातील तलावाचा व विहीरीचा पाणीसाठा वाढावा म्हणून ५ वनराई बंधारे बांधण्यात आले.जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून पाण्याच्या साठयासाठी १,७५,000 लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात आली. पाणी शुध्दीकरणासाठी सद्याही टी.सी.एल. पावडरचाच वापर प्रमाणवध्द व काळजीपूर्वक केला जात असून महिन्यातून दोन वेळा आरोग्य विभागामार्फत ओ.टी. टेस्ट केली जाते. गावाला दररोज दरडोई ४0 लिटर शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होत असल्यामुळे लोकांच्यामध्ये समाधानाची भावना दिसून आली.

ब) <u>**नळजोडणी**</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी संख्या ४00 होती तर सार्वजनिक नळजोडणी संख्या ५ होती. स्वतंत्र नळजोडणी नसलेले लोक सार्वजनिक नळावरून, शेजाऱ्या पाजाऱ्यांना विनंती करून त्यांच्या नळावरून किंवा बोअरवेल व विहीरीवरून पाणी भरत होते. गावातील सर्वच सार्वजनिक नळांना व बहुतांशी खाजगी नळांनाही तोटी (Cock) नसल्यामुळे पाणी वाया जात होते. घरोघरी स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न बुडत असे. सार्वजनिक नळावर अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे गावात वारंवार भांडणे होत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील खाजगी नळजोडणी संख्या ५३0 झाली. गावात एकही सार्वजनिक नळजोडणी जोडली नाही. गावातील प्रत्येक नळांना तोटी बसविण्याबाबत जागृती करण्यात आली. गावात अजूनही स्वतंत्र नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांचे सातत्याने प्रवोधन सुरू आहे त्यामुळे हळूहळू स्वतंत्र नळजोडणीची संख्या वाढत आहे. खाजगी नळजोडणी संख्या वाढू लागल्यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी पाणीपट्टी वार्षिक दर रू.३६० होता तर सार्वजनिक पाणीपट्टी दर रू.७५ होता. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूल केली जात असून ही वसूली ९०% इतकी होती. पाणीपट्टी न देणा-यावर ग्रामपंचायतीमार्फत दंडात्मक कारवाई किंवा नळजोडणी रद्द करणे ही कारवाई करण्याची तरतूद होती. पण त्याची कठोरपणे कार्यवाही होत नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात सर्वानुमते खाजगी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. ३६० च ठेवण्यात आला. तर सार्वजनिक नळजोडणीच दिली नसल्यामुळे सार्वजनिक पाणीपट्टी आकारली जात नाही. गावातील पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूल केली जात असून ९३% पाणीपट्टी वसूली आहे. नवीन नळजोडणी घेणाऱ्यांची ६ महिने आगाऊ पाणीपट्टी वसूली केली जाते. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर दंडात्मक व नळजोडणी रद्द करणे अशी कडक कारवाई केली जाते.

## ५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गटारीचा वापर केला जात असला तरी गावात केवळ २ कि.मी. च गटारी होत्या. आणखी १ कि.मी. गटारींची आवश्यकता होती. गावात काही भागात गटारीच नसल्यामुळे तेथील सांडपाणी रस्त्यावर साचून आरोग्याची समस्या निर्माण होत असे. गावातील ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता कर्मचारी अपुरे असल्यामुळे वेळोवेळी गटार स्वच्छता केली जात नसे परिणामी गटारी तुंबून दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले होते. ग्रामस्थामध्येही स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे गटारी तुंबणार नाहीत याची काळजी किंवा त्याबाबत आवाज उठविला जात नसे. सांडपाण्याचा उपयोग शेतीसाठी, परसबागेसाठी करणे, सांडपाणी शोषखड्डयात मुरविणे वगैरे संकल्पना ग्रामस्थांपर्यंत पोहचल्या नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी प्रामुख्याने गटारीचाच वापर केला जात असला तरी प्रबोधनामुळे काही कुटुंबे परसबागासाठी तर काही कुटुंबे शोषखड्डयात सांडपाणी मुरवू लागल्यामुळे गावातील आरोग्याचा प्रश्न कमी झाला आहे. गावात अर्धा कि.मी. नवीन गटारी बसविल्या व

अर्धा कि.मी. भागात सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी लोकांच्या श्रमदानातून चर काढण्यात आली. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यामातून ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे व ग्रामस्थांचेही चांगले प्रवोधन झाले असल्यामुळे एकमेकांच्या सहकार्याने गटारी तुंबणार नाहीत व आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाते.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता कर्मचारी कमी असून त्यांच्यामध्ये व लोकांच्यामध्ये स्वच्छतेबाबत जागृती कमी असल्यामुळे गावातील रस्ते अस्वच्छ व जागोजागी कचऱ्यांचे ढीग असत. गावात अनेक उकिरडे असून लोक आपल्या घरातील केरकचरा हया उकिरडयातच टाकत असत. गावात १२ कचरा कोंडाळया होत्या पण अनेक लोक कचरा कोंडाळीत न टाकता त्याच्या भोवतालीच टाकत असत. ग्रामपंचायतीमार्फत १५ दिवसातून एकदा कचरा उचलला जात असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला गावातील लोकांच्यामध्ये स्वच्छतेची सवय लागावी, स्वच्छतेचे महत्व त्यांना कळावे म्हणून स्वच्छता फेरी व घरोघरी भेटी देऊन स्वच्छता संदेश त्यांच्यापर्यंत पोहचविले. ग्रामस्थांचा आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे महत्व पटल्यामुळे महिला बचत गटामार्फत, तरूण मंडळांमार्फत, शाळेतील विद्यार्थ्यांमार्फत ग्रामस्वच्छता कार्यक्रम आखले जाऊ लागले. प्रत्येक ग्रामस्थ, विशेषता महिला आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊ लागले. गावातील १५ कुटुंबांनी गावातील उकिरडा गावाबाहेर नेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमास सहकार्य केले. ग्रामपंचायत कर्मचारीही आपल्या परीने गाव स्वच्छ व सुंदर राहण्यासाठी प्रयत्न करू लागले व गावातील कचरा वेळच्यावेळी उचलू लागले.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील बहुतांशी लोकांना शौचालयाचे महत्व माहित नव्हते. ग्रामस्थांना उघडयावर शौचास बसल्यानंतर आरोग्यावर होणाऱ्या परिणामाची जाणीव नसल्यामुळे गावात एकूण २00 शौचालये होती. गावातील उर्वरित कुटुंबातील सर्व लोक उघडयावर शौचास बसत असत. उघडयावर शौचास जाणे ही स्त्रीयांच्या दृष्टीने फार मोठी शिक्षा वाटत असे. घरी शौचालय नसल्यामुळे गावातील आजारी व वृध्द लोकांचे फार हाल होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाच्या आरोग्याच्या दृष्टीने गाव हागणदारीमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. ग्रामस्थांना शौचालयाचे महत्व पटवून देण्यासाठी विविध तज्ञ लोकांची व्याख्याने, माहितीपट, अभ्यासदौरा आयोजित केला आणि भिंतीवर घोषवाक्ये लिहिली. गरीबांना शौचालय बांधण्यासाठी कर्जप्रकरणे मंजूर करून देण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत प्रयत्न करण्यात आले. वरील सर्व प्रयत्नामुळे घरोघरी शौचालय बांधण्यात आले व प्रत्येक शाळा व अंगणवाडीमध्ये प्रत्येकी १ शौचालय बांधण्यात आले. गावातील ज्या कुटुंबामध्ये शौचालय नाही असे लोक सार्व जनिक शौचालयाचा वापर करीत असल्यामुळे गावातील एकही व्यक्ती उघडयावर शौचास जात नाही म्हणून गावाला ४ मे २००७ रोजी निर्मलग्रामचा ४ लाखाचा पुरस्कार मिळाला.

## ६. महिला सक्षमीकरण :-

### अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष असे प्रयत्न केलेले नव्हते. गावातील बहुतांशी महिला पारंपारिक मानसिकतेच्या असल्यामुळे ग्रामसभेस उपस्थित राहत नव्हत्या, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होत नव्हत्या. चारचौघात एखादया बाबीविषयी आपले स्पष्ट मत मांडत नव्हत्या. महिलांच्यासाठी असणाऱ्या सोयी सवलती व शासकीय योजनांची माहिती त्यांना नव्हती. गावातील महिलांच्यामध्ये आत्मविश्वास व एकजूटीचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व महिलांना एकत्र करण्यासाठी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी आणि आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होण्यासाठी, विशेष असे प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी त्यांच्या भेटी, बैठका, कोपरा बैठका व महिला मेळावा घेण्यात आले. गावातील विविध स्तरातील महिलांच्यासाठी लिंग समभाव सचेतना, स्वयंसहाय्यता बचत गटांना चालना देणे, नेतृत्व विकास प्रशिक्षण आणि महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. हया विविध प्रशिक्षणामुळे महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती झाली. गावातील अनेक महिलांनी बचत गट स्थापन केला. गावातील महिलांच्यामध्ये जागृती व आत्मविश्वास निर्माण झाल्यामुळे त्या विविध कार्यक्रमात, ग्रामसभेस उपस्थित राहून निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ लागल्या.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामधील सुप्त गुण शोधण्याचा व त्यांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जात असे. गावात ज्या विविध स्पर्धा आयोजित केल्या जात त्यामध्ये महिलांचा सहभाग खूपच कमी असे. गावातील विविध स्तरातील महिलांच्यामध्ये असणा-या गुणांना संधी देण्यासाठी महिलांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले जात नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिला सक्षमीकरणाला अधिक महत्व देण्यात आले. लहानापासून ते थोरापर्यंत सर्व महिलांना उपयुक्त ठरतील व त्यांना त्याबाबत गोडी वाटेल अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गावातील महिला प्रथमता घराबाहेर पडून मोकळेपणाने सण उत्सव व त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या विविध प्रकारच्या स्पर्धामध्ये (झिम्मा फुगडी, उखाणे, दांडीया, धावणे, लिंबू चमचा, संगीत खुर्ची, वक्तृत्व, निबंध, रांगोळी वगैरे) सहभाग घेऊ लागल्या. या स्पर्धामुळे अनेक महिलांना त्यांच्यामधील गुणांची नव्याने ओळख होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढला. गावातील जनरल स्पर्धेमध्येही पुरूषांच्या बरोबरीने महिला सहभागी होऊ लागल्या.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ ११ महिला बचत गट होते. गावातील इतर महिलांना बचत गटाबाबत माहिती देणे, महत्व पटवून देण्याविषयी फारसे प्रयत्न कोणी करीत नव्हते. जे बचत गट होते त्यापैकी काही बचत गट सक्रिय नव्हते. गावातील दुर्बल घटकातील बचत गट नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेच्यामार्फत गावातील महिलांचे बचत गटाबाबत चांगले प्रबोधन केले व त्यांना बचत गट स्थापन करण्यास सहकार्य केले. गावात प्रकल्पकाळात नवीन २९ बचत गट स्थापन केले व जुने बचत गटही सक्रिय करून या सर्व बचत गटांचा एक महासंघ बनविण्यात आला. बचत गटातील महिलांचा स्वयंसिध्दा कोल्हापूर येथे अभ्यासदौरा आयोजित केला या दौऱ्यादरम्यान कांचनताई परूळेकर यांनी त्यांना विविध व्यवसायाबाबतचे प्रशिक्षण दिले. गावातील महिला बचत गटांना म्हैसपालन, शेळीपालन, शेवया मशीन, पिठाची गिरणी वगैरे व्यवसायासाठी जलस्वराज्य प्रकल्पामार्फत

बीजभांडवल दिले व इतर बॅंकांचे कर्ज मिळवून देण्यास मदत केल्यामुळे महिला छोटया उद्योजक बनून आत्मविश्वास वाढला व त्यांना स्वकमाईचा आनंद मिळू लागला.

## ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग, पिडीत व अनुसूचित जाती जमातीतील लोकांचा ग्रामविकासातील सहभाग अतिशय अल्प होता. त्याची ग्रामसभेतील उपस्थितीही कमी असे. दुर्बल घटकांसाठी असणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्यामुळे ते अनेक लाभापासून वंचित राहत होते. दुर्बल घटकामध्ये न्युनगंड तयार होत असे. तसेच दुर्बल घटकातील महिलांचे बचत गटही कमी होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील गरीब, अपंग, पिडीत व अनुसूचित जाती जमातीतील लोकांची सविस्तर माहिती घेण्यात आली व त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांच्यापर्यंत शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती पोहचवून त्याचा लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी सहकार्य करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांचे प्रबोधन करून त्यांना ग्रामविकसाच्या प्रक्रियेत सामावून घेऊन त्यांना शुध्द पाणी, शौचालय सुविधा, गटारीची सोय, रस्ते इ. फायदे मिळवून दिले. दुर्बल घटकातील महिलांचे स्वतंत्र बचत गट स्थापन करून त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या सोयी सवलती मिळवून दिल्या.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला विविध विकास कामासाठी शासनाचे अनुदान मिळाले होते पण त्याचा विनियोग करण्याचा अधिकार ग्रामसभेला नव्हता. ग्रामविकासामध्ये ग्रामस्थांचा लोकवाटा नसल्यामुळे त्या विकासकामाबद्दल ग्रामस्थांच्यामध्ये आपलेपणाची भावना नव्हती. परिणामी त्याचा वापर योग्य पध्दतीने न केल्यामुळे त्या सुविधा मोडकळीस येत. उदा. सार्वजनिक नळजोडणी, सार्वजनिक शौचालय इ. गावाला यापूर्वी कधीही क्षमता बांधणी व महिला सक्षमीकरण यासारख्या बाबींसाठी स्वतंत्र अनुदान मिळाले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील विविध विकासकामासाठी आलेल्या अनुदानाची माहिती ग्रामसभामधून, नोटीस बोर्डच्या माध्यमातून

लोकांच्या पर्यंत पोहचविली. अनुदानाच्या विनियोगाबाबत ग्रामसभेतच सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. पाणी व स्वच्छता या सोयी सुविधासाठी शासनाने ९0% अनुदान व ग्रामस्थांनी १0% लोकवाटा दिला.

**गावाला खालील विविध विकासकामासाठी अनुदान मिळाले**

| **अ.क्र.** | **अनुदान तपशील** | **अनुदान रक्कम** |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ४,0८,६९0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0 %) | ७४,८८,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,८१,000=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0 %) | ८,३0,000=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ४,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | **एकूण** | **१,00,0७,६९0=00** |

# १८. पैजारवाडी (तालुका - पन्हाळा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - एप्रिल २00६ व हस्तांतरीत तारीख - मार्च २0१0)**

## १. <u>लोकसंख्या</u> :-

पैजारवाडी गावची एकूण लोकसंख्या १२९९ असून त्यामध्ये स्त्रियांची संख्या ६५१ तर पुरूषांची संख्या ६४८ इतकी आहे. गावात एकूण कुटुंबसंख्या १९९ असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या ५४ आहे .

## २. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

पैजारवाडी ग्रामपंचायतीची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. पण संगणक सुविधेचा अभाव आहे. ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी एकही नाही.

ग्रामपंचायत समिती ही एकूण ७ सदस्यांची असून त्यामध्ये ३ स्त्री सदस्य व ४ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) प्रवर्गातील स्त्री भूषवित असून त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. तर उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील स्त्रीच भूषवित असून त्याही बी.एस.सी. भाग २ पर्यंत शिक्षण झालेल्या आहेत.

३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** पैजारवाडी गावातील लोकांचा सार्वजनिक कार्यक्रमात सहभाग नव्हता. शिवाय त्यांना सार्वजनिक कार्याची गोडी लागावी यासाठी प्रयत्नही केले नव्हते. गावात नियमित ग्रामसभांचे आयोजन केले जात नव्हते व ग्रामसभांना ग्रामस्थांची व विशेषता महिलांची उपस्थिती खूपच कमी असे. तरूण मंडळांचाही ग्रामविकास कार्यक्रमातील सहभाग खूपच कमी होता. गावात महिला बचत गटांची संख्या व महिला बचत गटामार्फत राबविले जाणारे कार्यक्रम खूपच कमी होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची गावात अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या सुरूवातीला गावातील लोकांना, महिलांना एकत्र करण्याचा व त्यांच्यामध्ये सामाजिक कार्याबद्दल गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण त्याला समाधानकारक प्रतिसाद मिळू शकला नाही. म्हणूनच गावातील तरूणांचे, महिलांचे व इतर नागरीकांचे प्रबोधन करून त्यांना सहभागी करून घेऊन ग्रामपंचायत व जलस्वराज्य प्रकल्प समितीने कांबळवाडी (ता.राधानगरी) या ग्रामस्वच्छतेमध्ये आदर्श कार्य केलेल्या गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. अभ्यासदौऱ्यामुळे ग्रामस्थांना ग्रामस्वच्छतेचे, शौचालयाचे व महिला बचत गटाचे महत्व समजले. तरूणांची, महिलांची व इतर नागरीकांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढला. गावात महिला बचत गटांची संख्या वाढू लागली. गावातील महिलांचा कोल्हापूरमधील स्वयंसिध्दा हया संस्थेला भेट देण्याच्या निमित्ताने अभ्यासदौरा आयोजित केल्यानंतर त्याचा प्रभाव पडून महिलांचा व्यवसाय करण्याकडे कल वाढला.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात विहिरीवरून नळपाणी पुरवठा योजना राबविली होती. गावात ४० हजार लिटर पाणी साठवण क्षमता असणारी साठवण टाकी होती. गावातील पाणी पुरवठा करणाऱ्या या विहिरीला अलिकडच्या काही वर्षात पाणी कमी असल्यामुळे ग्रामस्थांना एक दोन दिवसातून अनियमित व अपुरा पाणी पुरवठा होत होता. गावात पाणी शुध्दीकरणासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे. नळावाटे मिळणारे पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नसल्यामुळे पाण्यासाठी (विहीर व बोअरवेलना) ग्रामस्थांना व महिलांना भटकंती करावी लागे. यामध्ये विशेषता महिलांचे पाण्यासाठी खूप हाल होत होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** पैजारवाडी गावमध्ये गावापासून ९ कि.मी. अंतरावरील वारणा नदीवरून पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली. त्यासाठी ६० हजार लिटर क्षमतेची नवीन पाणी साठवण टाकी (जलकुंभ) बांधण्यात आली. सर्व ग्रामस्थांचे पाणी वापराबाबत प्रबोधन करण्यात आले. गावातील जुन्या व नादुरूस्त जलवाहिन्या बदलण्यात आल्या. पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडर व तुरटीचा वापर कसा व कधी करावा याचे पाणी वितरण कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या सर्व प्रयत्नामुळे ग्रामस्थांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी मिळू लागल्यामुळे ते समाधानी आहेत.

### ब) नळजोडणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण १९९ कुटुंबापैकी १२६ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती तर उर्वरित कुटुंबासाठी केवळ ६ सार्वजनिक नळजोडण्या असल्यामुळे ज्यांना अपुरे पाणी मिळे किंवा ज्यांना पाणी मिळत नसे अशा कुटुंबातील बायका मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी सातत्याने भटकावे लागे. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी वापराबाबत फारशी जागृती नसल्यामुळे खाजगी व सार्वजनिक नळांना तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील घरोघरी जाऊन, ग्रामस्थांच्या व महिलांच्या कोपरासभा घेऊन पाणी वापराबाबत व स्वतंत्र नळजोडण्या घेण्याबाबत प्रबोधन करण्यात आल्यामुळे एकूण १७८ कुटुंबानी घरी स्वतंत्र नळजोडणी घेतली.गावात जलस्वराज्य प्रकल्पाच्या मार्गदर्शनाप्रमाणे एकही सार्वजनिक नळजोडणी

दिली नसल्यामुळे हळूहळू सर्वजण स्वतंत्र नळजोडणी घेऊ लागले आहेत. शिवाय गावातील प्रत्येकांनी पाणी वाया जाऊ नये म्हणून नळांना तोटया बसवून घेतल्या आहेत.

क) <u>पाणीपट्टी व मीटर पध्दती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** – गावात पूर्वी खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. १८० होता तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू. ५० होता. सदर पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा केली जात असे. गावात ७०% ग्रामस्थ वेळच्यावेळी पाणीपट्टी जमा करीत असत. उर्वरित पाणीपट्टीची थकबाकी वाढू लागली होती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये सर्वानुमते खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.६०० करण्यात आला. पाणीपट्टी वसूलीचे काम ग्रामपंचायतीकडेच सोपविण्यात येऊन पाणीपट्टी वसूली वार्षिक पध्दतीने केली जाते. गावात स्वतंत्र नळजोडणी देत असतानाच ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी ग्रामस्थांच्याकडून जमा करण्यात आली. ग्रामस्थांना आता नियमित शुध्द व पुरेशा प्रमाणात पाणी मिळत असल्यामुळे ग्रामस्थांच्यामध्ये समाधान दिसून आले.

## ५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती, रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी एकही नव्हता. गावात एकच कर्मचारी ग्रामविकास अधिकाऱ्यांना मदतनीस, स्वच्छता कर्मचारी व पाणी वितरण कर्मचारी म्हणून काम करीत असल्यामुळे तो गावातील स्वच्छता ठेवण्यात, गटारीची सफाई करण्यात व कचरा वेळोवेळी उचलण्यात असमर्थ होता. ग्रामस्वच्छतेबाबत ग्रामस्थांच्यामध्येही फारशी जागृती नसल्यामुळे गावातील तरूणांच्याकडून व महिलांच्याकडून फारसे सहकार्य मिळत नव्हते. गावात गटारीच नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरच पसरलेले असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील स्त्री - पुरूष व तरूणांच्यामध्ये ग्रामस्वच्छतेबाबत, आरोग्याबाबत जागृती करण्यासाठी बैठका, कोपरासभा व गावसभा आयोजित करण्यात आल्या. ग्रामस्वच्छता व लोकसहभाग याचा संबंध

ग्रामस्थांना कळण्यासाठी कांबळवाडी (ता. राधानगरी) हया आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला.

**अभ्यासदौऱ्यामुळे** ग्रामस्थांच्यामध्ये जागृती होऊन गावातील तरूण व महिलांनी एकत्र येऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रम हाती घेतला. गावातील रस्त्यांची दुरूस्ती, रस्तासफाई व गटारसफाई करून गाव स्वच्छ व सुंदर करण्यात मदत केली. स्वच्छता फेरी व भिंतीवर घोषवाक्ये लिहून लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यात आली. गावात १० ठिकाणी सार्वजनिक कचरा कोंडाळया ठेवण्यात आल्या.

**ब) शौचालय :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात केवळ ८६ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती तर एकही सार्वजनिक शौचालय नव्हते त्यामुळे शौचालय नसणाऱ्या कुटुंबातील सर्व लोक गावाबाहेर उघडयावर शौचास जात तर लहान मुले गावातच रस्त्याच्या दुतर्फा शौचास बसत असल्यामुळे गावाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. गावातील महिलांचे व वृध्द आणि आजारी लोकांचे घरी शौचालय नसल्यामुळे खूप हाल होत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील स्त्री-पुरूष-तरूण व शाळकरी मुलांचे ग्रामस्वच्छता, घरोघरी शौचालय वगैरेबाबत बैठका, कोपरासभा, माहितीपट व सहल आयोजित करून सातत्याने प्रबोधन करण्यात आले. शौचालय बांधण्याबाबत लोकांची असणारी मत-मतांतरे व त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्यात आले.

या सर्वांचा **परिणाम** म्हणून गावात नवीन १०७ शौचालये बांधण्यात आली. तर गावात ज्यांची खूपच हलाखीची परिस्थिती होती अशा कुटुंबासाठी ०६ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. गावात शौचालय असूनही उघडयावर शौचास जाणाऱ्या ग्रामस्थांचे प्रबोधन करणे, दंड करणे व अपमानित करणे हया मार्गांचा अवलंब केला जाऊ लागल्यामुळे उघडयावरील हागणदारी पूर्णपणे बंद झाली त्यामुळे गावातील नागरीकांचे आरोग्यमान सुधारण्यास मदत झाली.

## ६ . <u>महिला सक्षमीकरण</u> :-

### अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** राज्य घटनेत महिलांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क, समान दर्जा व समान संधी देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात गावामध्ये त्याची अंमलबजावणी होत नव्हती . गावात एकूण लोकसंख्येमध्ये जवळपास ५०% महिला असून देखील त्यांच्या सक्षमीकरणासाठी फारसे प्रयत्न केले जात नव्हते . गावातील बहुतांशी महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध शासनाच्या योजना व सोयी सवलती याची माहिती नव्हती . गावातील महिलांच्यामध्ये सांघिकतेचा अभाव होता . तसेच महिलांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले जात नव्हते .

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये महिला सक्षमीकरणावर भर दिला असल्यामुळे प्रथमता गावातील महिलांना एकत्र करून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यात आली . त्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यात आल्या . गावातील महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध सोयीसुविधा, महिलांच्यासाठी असणारे कायदे इ . चे प्रशिक्षण देण्यात आले . गावातील महिलांना आरोग्यविषयक, व्यवसाय विषयक, बचत गट विषयक व व्यक्तिमत्व विकास विषयक प्रशिक्षण देण्यात आले . या प्रशिक्षणामुळे त्यांच्यामध्ये जागृती व सांघिकभावना निर्माण झाली .

### ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये जागृती नसल्यामुळे व त्यांच्या सक्षमीकरणासाठी आजपर्यंत कोणतेही प्रयत्न झाले नसल्यामुळे त्या शरीराने व मनाने दुबळया बनल्या होत्या . गावातील महिलांच्याकडे असणाऱ्या सुप्तगुणांना संधी देण्यासाठी पोषक वातावरण नव्हते . गावामध्ये आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये सहसा महिला सहभागी होत नव्हत्या . गावातील विविध स्पर्धांमध्ये पुरूषांच्या बरोबरीने महिलांनी सहभागी व्हावे अशी ग्रामस्थांचीच मानसिकता नसल्यामुळे त्यांच्याकडून विशेष असे प्रयत्न केले जात नव्हते .

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिलांच्या सक्षमीकरणावर प्रामुख्याने भर देऊन त्यांच्या जागृतीसाठी जलस्वराज्य प्रकल्पामधील महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेमार्फत प्रयत्न करण्यात आले . महिलांच्यामध्ये आत्मविश्वास वाढावा,

धाडस निर्माण व्हावे, स्वत:मध्ये असणाऱ्या सुप्तगुणांची ओळख व्हावी म्हणून त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांच्यामध्ये झालेल्या जागृतीमुळे व त्यांच्यासाठी स्वतंत्र स्पर्धांचे आयोजन केले गेल्यामुळे विविध स्पर्धांमध्ये शाळेत जाणाऱ्या मुलींपासून ते वृध्द स्त्रियापर्यत अनेकींनी मोकळेपणाने व उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गावात सातत्याने महिलांच्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमामुळे महिलांमध्ये जिद्द, इर्षा आणि धाडस निर्माण होऊ लागले. परिणामी गावातील विविध उपक्रमात महिला पुरूषांच्या बरोबरीने सहभागी होऊ लागल्या.

ब) <u>बचत गट</u> :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिला बचत गट संकल्पना गावातील महिलांच्यापर्यंत पोहचली होती. पण प्रत्यक्षात गावातील काही महिला यामध्ये सहभागी झाल्या नव्हत्या. त्यामुळे गावात केवळ ०८ महिला बचत गट होते. या बचत गटातील महिलांच्यामध्येही योग्य असा समन्वय नव्हता. गावातील इतर महिलांना बचत गट स्थापन करण्याबाबत विशेष असे प्रोत्साहन किंवा मार्गदर्शन केले जात नव्हते. गावातील बचत गटातील महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण व इतर तज्ज्ञ लोकांचे समाधानकारक मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये मरगळ आली होती.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील घराघरापर्यंत महिला बचत गट संकल्पना पोहचविण्यासाठी महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेने घरोघरी बैठका व महिला ग्रामसभांच्या माध्यमातून महिलांच्यामध्ये जागृती केली. त्यामुळे नवीन १० महिला बचत गट स्थापन झाले यामध्ये दारिद्रय रेषेखालील महिलांचाही समावेश आहे. गावातील अगोदरच स्थापन झालेल्या महिला बचत गटांच्यामध्ये बळकटी आणण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन व सहकार्य करण्यात आले. गावातील सर्व महिला बचत गटांचा एक महासंघ बनवून त्यांना विविध व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले. जलस्वराज्य प्रकल्पामार्फत व्यवसाय करू इच्छिणाऱ्या बचत गटातील महिलांना बीज भांडवलही देण्यात आले.

७. **<u>दुर्बल घटक</u>** :-

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील आर्थिक आणि सामाजिकदृष्टया दुर्बल असणारे घटक ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये फारसे सहभागी होत नव्हते. त्यांची ग्रामसभेतील उपस्थितीही खूप कमी असे. दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये जागृती करून त्यांना

ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठीही फारसे प्रयत्न केले जात नव्हते. बहुतांशी कुटुंबाकडे स्वतंत्र शौचालय व नळजोडणी नव्हती. यांच्यातील बहुतांशी लोकांना व महिलांनाही त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजना व सोयी सवलतींची माहिती नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकातील लोकांनाही ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकातील लोकांना त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. दुर्बल घटकातील महिलांना बचत गटाचे महत्व सांगून त्यांचे स्वतंत्र बचत गट स्थापन करण्यात आले. त्यांच्यामध्ये जाणीव जागृती झाल्यामुळे त्यांची ग्रामसभामधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढू लागला. दुर्बल घटकातील लोकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळू लागले. शिवाय ते शौचालयाचा नियमित वापर करू लागले आहेत.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** शासनाच्या ग्रामविकासाठी राबविलेल्या विविध योजनामध्ये गावातील सर्व घटकांना सहभागी करून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नव्हते व ग्रामस्थांच्यामध्येही ग्रामविकास प्रक्रियेमध्येही सहभागी होण्याबाबत उदासिनता होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व घटकांच्या पर्यंत प्रकल्पासंबंधी संपूर्ण माहिती पोहचवून त्यांना ग्रामविकास प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकल्पकाळात गावाला विविध प्रकल्पासाठी शासनाकडून मिळालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,१४,८00=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ५८,१५,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ६८,२५0=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ४,५७,३२0=00 |
| | एकूण | ६५,५५,३७0=00 |

# १९. पोखले (तालुका - पन्हाळा)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मे २००५ व हस्तांतरीत तारीख - सप्टेंबर २००९)**

## १. <u>लोकसंख्या</u> :-

पोखले गावची एकूण लोकसंख्या २३३१ असून त्यामध्ये १०९० स्त्रिया व १२४१ पुरूष आहेत. गावात एकूण ४०० कुटुंब संख्या असून ६५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबसंख्या आहे.

## २. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

पोखले ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. पण ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा नाही. ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी एकही नसल्याचे दिसून आले.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण ९ सदस्य असून त्यामध्ये ३ स्त्री सदस्य व ६ पुरूष सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील स्त्री कार्यरत असून त्यांचे शिक्षण १० वी झालेले आहे तर उपसरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष कार्यरत असून त्यांचे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे.

## ३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** पोखले गावात ग्रामविकासांच्या उद्देशाने ग्रामस्थांच्यामध्ये जाणीव जागृती व्हावी म्हणून अभ्यासदौऱ्याचे व्यापक प्रमाणात आयोजन केलेले नव्हते. गावात प्रत्येक महिन्याला ग्रामसभांचे आयोजन केले जात नव्हते. पण जेंव्हा ग्रामसभा असे तेंव्हा ग्रामस्थांची उपस्थिती फार कमी असे. तसेच तरूणांची व महिलांचीही उपस्थिती फारच कमी असे. ग्रामसभांची माहिती सर्व घटकांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी विशेष असे प्रयत्न केले जात नव्हते. ग्रामस्थांच्यामध्ये सार्वजनिक स्वच्छता, पाण्याची बचत, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण याबाबतीत उदासिनता होती. गावात शौचालयांची संख्या खूपच कमी होती आणि महिला बचत गटांची संख्याही कमी होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांना, महिलांना, तरूण मंडळांना एकत्र करून जलस्वराज्य प्रकल्पाची माहिती दिली. त्यांच्यामध्ये ग्रामविकासाबाबत

जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण तरीही ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामविकासाबाबत फारच उदासिनता व त्यांची ग्रामसभामधील उपस्थिती व उत्साह फारच कमी जाणवल्यामुळे त्यांना ग्रामविकासाबाबत गोडी वाटावी, त्यांचा सहभाग वाढावा यासाठी कवठेपिराण (ता. मिरज) या आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केला.

या अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील तरूण मंडळांनी, महिलांनी, विविध सेवाभावी संस्थातील सदस्यांनी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कवठेपिराण गावामध्ये राबविलेल्या स्वच्छता, गटारसफाई, शौचालय, वृक्षारोपण, गांडूळखत प्रकल्प व महिला बचत गटांचे काम पाहून पोखले ग्रामस्थांच्यामध्ये जागृती झाली व उत्साह वाढला. ग्रामसभा, कोपरासभा व विविध कार्यक्रमांना तरूण मंडळांची, महिलांची व दुर्बल घटकातील लोकांची उपस्थिती वाढली. सामुदायिक ग्रामस्वच्छता व गटार सफाई उपक्रमातील ग्रामस्थांचा सहभाग खूपच वाढला. गावातील शौचालयांची संख्याही वाढू लागली. विशेष म्हणजे गावातील महिला बचत गटांची संख्या वाढू लागली आणि गावातील हेवेदावे कमी होण्यासही मदत झाली.

## ४. <u>पाणी व्यवस्थापन :-</u>

### अ) <u>पिण्याचे पाणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावापासून १ कि.मी. अंतरावरील विहीरीवरून नळ पाणीपुरवठा योजना चालू होती. वाढत्या लोकसंख्येला या विहीरीचे पाणी कमी पडू लागल्यामुळे गावाला पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसे. त्यामुळे गावातील लोकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी आणखी १ विहीर व २ बोअरवेल्स होते पण त्यांनाही उन्हाळयात मुबलक पाणी नसल्यामुळे ग्रामस्थांचे व विशेषता महिलांचे पाण्यासाठी हाल होत होते. पिण्यासाठी, जनावरांसाठी व कपडे धुण्यासाठी पाण्याची फार टंचाई भासत असे त्यामुळे गावात पाण्याच्या प्रश्नावरून भांडणे होत. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याची बचत, शुध्द पाणी वगैरेबाबत जागृती नव्हती. गावातील जलकुंभ हा ४0,000 लिटर क्षमतेचा होता पण तो अपुरा पडत होत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून गावापासून ६.५ कि.मी. अंतरावरील नदीवरून नळ पाणीपुरवठा योजना आणली. गावामध्ये ६0,000 लिटर क्षमतेचा एक जलकुंभ बांधल्यामुळे पुरेसा पाण्याचा साठा होऊ

लागला. पिण्याचे पाणी कसे वापरावे याबाबत ग्रामस्थांचे चांगले प्रबोधन झाल्यामुळे पाण्याची बचत होऊ लागली. ग्रामपंचायत पाणी वितरण कर्मचाऱ्यांनाही पाणी वितरण पध्दती, टी.सी.एल. पावडरचा वापर, ओ.टी. टेस्ट वगैरेबाबत प्रशिक्षण दिल्यामुळे ग्रामस्थांना शुध्द व नियमित पाणी पुरवठा होऊ लागला. जलस्वराज्य प्रकल्पकाळात ग्रामस्थांचे जलसवंर्धनाबाबत प्रबोधन झाल्यामुळे ग्रामस्थांनी श्रमदानातून २ वनराई बंधारे बांधून 'पाणी आडवा पाणी जिरवा' या मोहिमेला सुरूवात केली.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण ४०० कुटुंबापैकी २०० कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती तर १० सार्वजनिक नळजोडण्या होत्या. ज्या कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नाही अशी कुटुंबे शेजाऱ्यांच्या नळावरून, सार्वजनिक नळजोडणीवरून किंवा गावातील बोअरवेल व विहीरीवरून पाणी मिळविण्यासाठी धडपडत असत. कुटुंबाला लागणारे पाणी भरण्यासाठी घरातील महिलांचा व मुलांबाळांचाही खूप वेळ व श्रम खर्च होत होते. तसेच त्यांना मानसिक त्रासही सहन करावा लागत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीला ग्रामस्थांचे अनेक प्रकारे प्रबोधन करून प्रत्येकांनी घरी स्वतंत्र नळजोडणी घ्यावी याबाबत आवाहन केले. ग्रामसभेमध्येच काही लोकांचा विरोध असूनही, बहुमताने ग्रामस्थांच्या व ग्रामपंचायतीच्या हितासाठी सार्वजनिक नळजोडणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता गावात एकही सार्वजनिक नळजोडणी नाही. ग्रामस्थांचे वारंवार प्रबोधन करूनही केवळ ५० जादा कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली आहे. स्वतंत्र नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबाचे प्रबोधन करण्याचे काम अजूनही सुरू असल्यामुळे हळूहळू ग्रामस्थ नळजोडणी घेत असल्याचे दिसून आले.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू.३७५ होती तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टी रू.७५ होती. सदर पाणीपट्टी वसूली ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत वर्षातून एकदा केली जात असे. ग्रामस्थांच्यामध्ये पाणीपट्टी वेळच्यावेळी भरण्याची मानसिकता नसल्यामुळे गावची पाणीपट्टीची थकबाकी वाढू लागली होती. ग्रामस्थांची आर्थिक गरीब परिस्थिती आणि पाणी नियमित नसणे ही दोन कारणे पाणीपट्टी

वेळेत न भरण्याची होती. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्या विरूध्द नळजोडणी बंद करणे, दाखले न देणे हे उपाय असले तरी राजकीय हस्तक्षेपामुळे त्याचा प्रभावी अमल होत नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून बहुमताने खाजगी नळजोडणी पाणीपट्टी वर्षाला रू.६00 ठरविण्यात आली. तर सार्वजनिक नळजोडणी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यामुळे सार्वजनिक पाणीपट्टी नाही. पाणीपट्टी वसूलीही ग्रामपंचायतीनेच कर्मचाऱ्यांच्यामार्फत वार्षिक पध्दतीने करण्याचा निर्णा घेण्यात आला. ग्रामस्थांना आता शुध्द व मुबलक पाणी मिळणार असल्यामुळे पाणीपट्टी नियमित देण्याबाबत त्यांचे चांगले प्रबोधन केले व जे ग्रामस्थ वेळेवर पाणीपट्टी देणार नाहीत त्यांची नळजोडणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिवाय जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामस्थांना शुध्द व मुबलक पाणी मिळत असल्यामुळे ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे नळजोडणी घेतानाच ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी भरत आहेत.

## ५. आरोग्य :-

### अ) गटारीची स्थिती :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील विविध भागात एकूण २000 फूट गटारीची सोय होती तर इतर भागासाठी आणखी २000 फूट गटारीची आवश्यकता होती. प्रत्येक घरातील सांडपाणी व जनावरांच्या मलमूत्रांच्या विल्हेवाटीसाठी गटारींची आवश्यकता असूनही ज्या भागात गटारी नाहीत तेथील सर्व सांडपाणी व जनावरांचे मलमूत्र रस्त्यावर पसरून खाच खळग्यात साचून ते कुजत असल्यामुळे गावामध्ये सर्वत्र दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढे व लोक आजारी पडत. गावात एकही स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे म्हणजेच एकच कर्मचाऱ्यावर ग्रामपंचायत कार्यालयातील काम, पाणी वितरणाची जबाबदारी व ग्रामस्वच्छतेची जबाबदारी असल्यामुळे वेळच्यावेळी गटार स्वच्छता होत नसे त्यामुळे गटारी तुंबत असत. याचे कारण गावात कोठेच बंदिस्त गटारी नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांचे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन केले त्यांना आपले घर व परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. गावात जलस्वराज्य प्रकल्प काळात नवीन २000 फूट गटारी बांधल्यामुळे संपूर्ण भागात गटारीची सोय झाली आहे. काही ग्रामस्थ आपल्या घरातील सांडपाण्याचा उपयोग

परसबागासाठी करीत आहेत. ग्रामपंचायतीकडे स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे गावातील तरूण मंडळे, शाळा व महिला बचत गटांच्या सहकार्याने गटार सफाईचे काम केले जाते. गावातील गटारी तुंबून दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव होणार नाही याची खबरदारी ग्रामस्थ व ग्रामपंचायत घेऊ लागली आहे.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्ता सफाई व कचरा उचलण्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत केले जात असे, पण ग्रामपंचायतीकडे स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी एकही नसल्यामुळे ४ ते ६ महिन्यातून एकदा सण उत्सवाच्या निमित्ताने ग्रामस्वच्छता केली जात असे. गावात एकही कचरा कोंडाळी नसल्यामुळे ग्रामस्थ आपल्या घरातील केरकचरा उघडयावरच मोकळया जागेत टाकत किंवा उकिरडयावर टाकत असत. ग्रामस्थांच्या मालकीचे गावातच जागोजागी उकिरडे असल्यामुळे गाव अस्वच्छ दिसत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचा आदर्श गावाला अभ्यासदौरा आयोजित केल्यामुळे व वारंवार त्यांचे प्रबोधन केल्यामुळे ग्रामस्थांना सार्वजनिक स्वच्छतेची जाणीव झाली. त्यामुळे गावातील तरूण मंडळांच्या व महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. महिला दररोज आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन ग्रामस्वच्छतेला हातभार लाऊ लागल्या तसेच शाळांच्या मार्फत ग्रामसफाई केली जाऊ लागली. काही ग्रामस्थांनी गावातील उकिरडे गावाबाहेर नेऊन ग्रामपंचायतीला सहकार्य केले. ग्रामपंचायतीनेही गावात ७ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेऊन ग्रामस्थांना कचरा कोंडाळीचा वापर करण्याचे आवाहन केले. हा गोळा होणारा कचरा ग्रामपंचायती मार्फत १५ दिवसातून एकदा उचलला जाऊ लागला.

क) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात ५० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती. तर केवळ एकच सार्वजनिक शौचालय होते. गावातील इतर सर्व कुटुंबे उघडयावर शौचास जात असत. पण तरीही घरोघरी शौचालय होण्यासाठी ग्रामस्थांचे फारसे प्रबोधन झाले नव्हते. तसेच त्यांना उघडयावर शौचास जाणे गैर आहे असे वाटत नव्हते. घरी शौचालय नसल्यामुळे व गावात पुरेशा प्रमाणात सार्वजनिक शौचालयेही नसल्यामुळे महिलांचे हाल होत होते. उघडयावरील शौचामुळे गावात व गावाबाहेर घाणीचे साम्राज्य होते व रोगांचे प्रमाण वाढले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे सभा, कोपरासभा घेऊन घरोघरी शौचालय बांधण्यासाठी प्रबोधन केले. भिंतीवर घोषवाक्य लिहून, पोष्टरद्वारे, माहितीपट व वारंवार व्याख्याने आयोजित करून ग्रामस्थांना शौचालय बांधण्याचे आवाहन केले. त्यांना शौचालय बांधण्यासाठी आर्थिक व इतर सहकार्य केले.

याचा <u>**परिणाम**</u> म्हणून गावात नवीन २७७ कुटुंबानी आपल्या घरी शौचालये बांधली तर ग्रामपंचायतीच्या वतीने गावात नवीन १0 सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. गावातील दुर्बल घटकातील २ ते ३ कुटुंबाच्यामध्ये एक शौचालय बांधून दिला त्याचा ते सामूहिक वापर करीत आहेत. गावात उघडयावर शौचास जाणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कारवाई केली जाऊ लागल्यामुळे आता प्रत्येकजण शौचालयाचा वापर करू लागले आहेत. गावातील शाळांमध्ये देखील शौचालयाची सुविधा निर्माण करण्यात आली. एकूणच गाव १00% हागणदारीमुक्त होऊन गावाला शासनाचे २ लाखाचे निर्मल ग्राम पारितोषिक मिळाले.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

### अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सर्व स्तरातील महिलांना एकत्र आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नव्हते. शिवाय त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने व त्यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नव्हते. महिलांना आपल्यासाठी असणाऱ्या शासनाच्या योजना कोणत्या? त्याचा लाभ कसा घेता येईल याची माहिती नव्हती. गावातील महिलांच्यावर कुटुंबाचे व समाजाचे दडपण होते, त्यांना आपल्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांची ओळख नव्हती, त्यांच्यात आत्मविश्वासाची कमतरता होती आणि विशेष म्हणजे त्यांच्यात ऐक्याचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व महिलांना एकत्र आणण्यासाठी सुरूवातीला हळदी कुंकू, महिला मेळावे यासारखे कार्यक्रम आयोजित केले. गावात करमणूकीचे कार्यक्रम आयोजित केले. तर गावासाठी प्रत्येक घराघरामध्ये जाऊन महिलांना कोपरा सभांना, ग्रामसभांना उपस्थित राहण्यासाठी आवाहन केले परिणामी सुरूवातीला कमी संख्येने व हळूहळू मोठया संख्येने महिला उपस्थित राहू लागल्या. जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांना बचत गट रेकॉर्ड लिखाण प्रशिक्षण,

स्वयंसहाय्यता बचत गटांना चालना, महिला कायदेविषयक प्रशिक्षण, पंचायत राज्य प्रशिक्षण, किशोरवयीन मुलींच्यासाठी प्रशिक्षण, विविध व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा गावातील बहुतांशी महिलांनी लाभ घेतला. या सर्वामुळे महिलांच्या ज्ञानात भर पडून त्यांचा आत्मविश्वास उंचावला. महिला विविध कार्यक्रमात सहभागी होऊन आपली मते मांडू लागल्या. जलस्वराज्य प्रकल्पाकडून बीजभांडवल घेऊन शेळीपालन, म्हैसपालन, शिवणकाम, सांडगे-पापड बनविणे व विक्री करणे इ. व्यवसाय करू लागल्या.

ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्पर्धांचे आयोजन फार कमी प्रमाणात केले जात असे ते देखील केवळ पुरूषांना डोळयासमोर ठेऊनच उदा. कुस्ती, बैलगाडी शर्यती, धावणे, पोहणे इ. वरील स्पर्धांमध्ये गावातील महिला प्रत्यक्षात प्रवेश तर घेत नव्हत्या पण त्या पहायला जाणेदेखील अयोग्य मानले जात असे. गावात रांगोळी काढणे व संगीत खुर्ची या स्पर्धेमध्ये केवळ शाळेतील लहान मुलीच सहभागी होत होत्या. महिला स्पर्धेमध्ये सहभागी होत नसल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची कमतरता होती. महिला स्वत:च स्पर्धेमध्ये कधी सहभागी झाल्या नसल्यामुळे त्यांना मुलांना स्पर्धात्मक मार्गदर्शन करताना अडचणी येत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांना संघटित करीत असतानाच त्यांच्यामध्ये मोकळेपणा निर्माण होण्यासाठी व स्पर्धेची आवड निर्माण होण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गावात जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून रांगोळी स्पर्धा, धावणे, संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा अशा अनेक स्पर्धा आयोजित केल्या त्यामध्ये सर्व वयोगटातील महिलांनी सहभाग घेतला. गावात आयोजित केलेल्या स्पर्धांमुळे गावातील महिलांच्यासाठी एक पोषक वातावरण निर्माण झाले. अनेक महिलांना याचा भविष्यकाळात लाभ होऊ लागला. गावातील वेगवेगळया मंडळाच्यामार्फत देखील स्पर्धाचे मोठया प्रमाणात आयोजन केले जाऊ लागले. त्यामध्ये स्त्री - पुरूष एकत्र स्पर्धेमध्ये उतरू लागले.

क) बचत गट :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वयंसहाय्यता महिला बचत गटांची संख्या १० असली तरी त्या बचत गटातील महिलांच्यामध्ये समन्वय नव्हता. गावातील बहुतांशी महिलांना या बचत गट संकल्पनेबाबत पुरेशी माहिती नव्हती. गावातील सर्व महिलांना

एकत्र करून त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न होत नव्हता. महिला बचत गटांना विविध प्रकारचे प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे त्यामधील काही बचत गट मोडकळीस आले होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सहाय्यकारी संस्था व महिला विकास समितीतील सदस्यांनी गावातील घरोघरी जाऊन महिलांना ग्रामसभा, कोपरा सभा, महिला मेळावे व वेगवेगळया कार्यक्रमासाठी हजर राहण्याविषयी प्रवृत्त केले. कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या महिलांना स्वयंसहाय्यता महिला बचत गट म्हणजे काय? तो कसा आवश्यक आहे? हे वारंवार पटवून देऊन त्यांना बचत गट स्थापन करण्यास प्रेरीत केले. गावातील जास्तीत जास्त महिलांना दिलेल्या विविध प्रकारच्या प्रशिक्षणामुळे ६ नवीन बचत गटांची स्थापना झाली. गावातील सर्व बचत गटांना एकत्र करून त्यांचा महासंघ बनविण्यात आला. या महिला बचत गटांना जलस्वराज्य प्रकल्पामार्फत बीजभांडवल दिल्यामुळे अनेक महिलांनी म्हैसपालन, शेळीपालन, कुकुटपालन, शिवणकाम या सारखे व्यवसाय सुरू करून अर्थार्जन करायला सुरूवात केल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मसन्मान व आत्मविश्वास निर्माण झाला.

### ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग खूपच कमी होता. दुर्बल घटकातील लोकांच्यापर्यंत ग्रामसभा, ग्रामविकासाच्या योजना यासंबधीची माहिती पोहचतच नव्हती. दुर्बल घटकातील लोकही अज्ञान व दारिद्रयामुळे गावातील राजकीय व सामाजिक घडामोडीमध्ये रस घेत नव्हते. दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती दुर्बल घटकांना नसल्यामुळे त्याचा लाभ गावातील इतर मंडळी घेत होते. दुर्बल घटकांच्यामध्ये आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव नव्हती. दुर्बल घटक हा पाणी, गटार, शौचालय, बचत गट, रस्ते व दिवाबत्ती वगैरे अनेक सोयी सुविधापासून पूर्णपणे वंचीत होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील दुर्बल घटकांचे सर्वेक्षण करून, त्यांना एकत्र करून त्यांचे प्रश्न समजावून घेतले. त्यांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. त्यांना ग्रामविकासकार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आणि त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे दुर्बल

घटकातील लोकांच्यामध्ये जागृती होऊन त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. दुर्बल घटकातील लोक निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ लागले व आत्मविश्वासाने प्रकल्पातील जबाबदारी स्विकारू लागले. दुर्बल घटकातील महिला बचत गट स्थापन करून, जलस्वराज्य प्रकल्पाकडून बीज भांडवल घेऊन, शेळीपालन, म्हैसपालन सारखे व्यवसाय करू लागले. दुर्बल घटकातील लोकांनी लोकवर्गणीची रक्कम भरली, शौचालये बांधली व अनेक कुटुंबानी ग्रामपंचायतीकडून थोडी सवलत घेऊन स्वतंत्र नळजोडणी देखील घेतल्या.

## ८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला शासनाकडून विविध विकासकामांसाठी शासकीय अनुदान आले होते. पण ते अनुदान खर्च करीत असताना ग्रामसभेसमोर मांडले जात नव्हते. ग्रामसभेची मान्यता घेतली जात नव्हती व तो खर्च सर्वांना पाहण्यासाठी खुला नव्हता. त्यामुळे ग्रामस्थ या ग्रामविकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रकल्पामध्ये सर्व कारभार पारदर्शी असणे, शासकीय अनुदान आल्यानंतर त्याची माहिती ग्रामसभेत ग्रामस्थांना देऊन त्याचा विनियोग कसा करावा याची चर्चा करून सर्वानुमते निर्णय घेणे अशा अटी असल्यामुळे व त्याचे बहुतांशी पालन झाल्यामुळे या शासनाच्या अनुदानाचा विनियोग हा योग्य कारणासाठी झाला आहे असे म्हणता येईल.

**गावाला शासनाकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | २,८६,९६0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ६९,९८,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ९५,५00=00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (१0%) | ७,५२,000=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,00,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | **एकूण** | **९0,३२,४६0=00** |

# २०. सातार्डे (तालुका - पन्हाळा)

(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - नोव्हेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - फेब्रुवारी २००९)

१. <u>लोकसंख्या</u> :-

सातार्डे गावची एकूण लोकसंख्या २७४० असून त्यामध्ये १३२९ स्त्रिया व १४११ पुरूष आहेत. गावात एकूण कुटुंब संख्या ३६३ व दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या १०० आहे.

२. <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे. ग्रामपंचायतीमध्ये स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी १ आहे. पण ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधा व स्वतंत्र स्वच्छता कर्मचाऱ्यांचा अभाव आढळला.

ग्रामपंचायत समिती ९ सदस्यांची असून त्यामध्ये स्त्री सदस्य ३ व पुरूष सदस्य ६ आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे भटकी जमात (एन.टी.) प्रवर्गातील स्त्रीकडे असून त्यांचे शिक्षण १० वी झालेले आहे. तर उपसरपंच पद अनुसूचित जात (एस.सी.) प्रवर्गातील पुरूषाकडे असून त्यांचे शिक्षण १० वी आहे.

३. <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सातार्डे ग्रामस्थांच्यामध्ये ग्रामविकासासंबंधी जागृती नसल्यामुळे ग्रामस्थांचा ग्रामसभेतील व ग्रामविकास कार्यातील सहभाग अतिशय कमी होता. तसेच तरूण मंडळांचेही ग्रामविकास कार्यात सहकार्य नव्हते. गावातील महिलांच्यामध्येही जागृती नसल्यामुळे त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग खूप कमी होता. ग्रामपंचायतही गावातील पाणी प्रश्न, स्वच्छता व आरोग्य यासारख्या गोष्टीकडे गांभीर्याने पहात नव्हती. ग्रामस्थांना ग्रामविकासकामाची महती समजावी म्हणून त्यांच्यासाठी अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील लोकांच्यामध्ये ग्रामविकासासंबंधी जागृती व्हावी म्हणून त्यांच्या कोपरासभा व सार्वजनिक सभा आयोजित करून त्यांना माहिती दिली. ग्रामविकासासंबंधी तरूण मंडळांच्या बैठका घेऊन त्यांना

संबोधित केले. गावातील महिलांच्यासाठीही कार्यक्रमाचे आयोजन केले. गावातील स्त्री, पुरूष व तरूणांचा कांबळवाडी (ता.राधानगरी) या ग्रामविकास कार्यक्रम यशस्वी राबविलेल्या गावाला आयोजित केलेल्या अभ्यासदौऱ्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. अभ्यासदौऱ्यावरून परतल्यानंतर हळूहळू सर्व ग्रामस्थांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढू लागला.

४. **<u>पाणी व्यवस्थापन</u> :-**

अ) **<u>पिण्याचे पाणी</u>** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात विहीरीवरून नळपाणी पुरवठा योजना राबविली होती. पण एप्रिल व मे महिन्यामध्ये या विहिरीचे पाणी खूपच कमी होत असल्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकावे लागे. विशेषत पाण्यासाठी महिलावर्गाचे तर खूपच हाल होत असे. खाजगी व सरकारी विहीर, बोअरवेल वगैरे जिथून मिळेल तिथून त्यांना पाणी आणावे लागत असे. सदर पाण्यावर शुध्दीकरण प्रक्रिया केलेली नसल्यामुळे ग्रामस्थ आजारी पडत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व ग्रामस्थांच्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या वापराबाबत जागृती निर्माण करण्यात आली आणि गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीतील गाळ काढून त्याची खोली वाढवण्यात आली. विहीरीपासून गावापर्यंत व गावात सर्वत्र नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. गावामध्ये ४ साठवण टाक्या बांधण्यात आल्या त्यामध्ये एकूण १,१५,000 लिटर पाणीसाठा होतो. पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडर व तुरटीचा नियमित व प्रमाणबध्द वापर केला जातो. तसेच महिन्यातून एकदा पाण्याची टाकी स्वच्छ धुतली जाते. या सर्वांमुळे ग्रामस्थांना नियमित शुध्द व पुरेसे पाणी मिळत असल्यामुळे त्यांच्यामध्ये समाधान आढळून आले.

ब) **<u>नळजोडणी</u>** :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात ३६३ कुटुंबापैकी २५२ कुटुंबाकडे खाजगी नळजोडण्या होत्या तर २ सार्वजनिक नळजोडण्या (Public Stand) होत्या. गावात स्वतंत्र नळजोडणी नसणाऱ्या कुटुंबाची संख्या १११ असल्यामुळे सार्वजनिक नळावर पाणी

भरण्यासाठी रांगा लागत व काही वेळा पाणी मिळविण्यासाठी भांडण व मारामाऱ्या होत. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी वापराबाबत फारशी जागृती नव्हती.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: पाणी, स्वच्छता व आरोग्य याविषयी ग्रामस्थांचे प्रबोधन करण्याबरोबरच त्यांना स्वतंत्र नळजोडणी घेण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्याला ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे सद्या सर्वच कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी आहे. ग्रामस्थांनी नळांना तोटया बसविल्यामुळे वाया जाणाऱ्या पाण्याचीही बचत झाली आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.३६० होता तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.७५ होता. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूल केली जात असे. पाण्याचा नियमित पुरवठा नसल्यामुळे व लोकांची वेळेत पाणीपट्टी भरण्याची वृत्ती नसल्यामुळे पाणीपट्टी थकबाकी दिवसेंदिवस वाढू लागली होती. या वाढत्या थकबाकीमुळे ग्रामपंचायतीला देखभाल दुरूस्ती वेळेत करणे अशक्य झाले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सातार्डे ग्रामसभेमध्ये खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी दर रू.४०० ठरविण्याबरोबरच गावात एकही सार्वजनिक नळजोडणी द्यावयाची नाही असा निर्णय घेण्यात आला. तसेच पाणीपट्टी नियमित न देणाऱ्यांवर काटेकोरपणे दंडात्मक कारवाई करण्याचे ग्रामसभेमध्ये ठरले. या ग्रामसभेमध्ये ग्रामसभेमध्ये ठरल्याप्रमाणे नवीन नळजोडणी देताना ग्रामस्थांच्याकडून ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टी वसूल करण्यात आली. गावातील सर्व ग्रामस्थांची पाणी वापराबाबत, पाणीपट्टीबाबत जागृती करण्यात आली.

## ५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सांडपाणी गटारीद्वारे गावाबाहेरील ओढयात सोडले जात होते. गावात १२०० मीटर लांबीच्या गटारी असून आणखी ८०० मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. गावात एकही स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे ३-३ महिने गटारींची सफाई केली जात नसे. गावातील अनेक भागात

उकिरडयामुळे, घरांच्या भिंती पडल्यामुळे किंवा गाळ व पाला पाचोळयामुळे गटारी तुंबल्यामुळे व सांडपाणी रस्त्यावरून पसरत असल्यामुळे सर्वत्र दलदल व दुर्गंधी पसरत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: गावातील स्त्री-पुरूष, तरूण मंडळे व शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले व त्यांना ग्रामस्वच्छता कार्यास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. गावातील ज्या भागात सांडपाण्याचा फार मोठा प्रश्न आहे त्या भागात ३00 मीटर लांबीच्या गटारी बांधण्यात आल्या. ग्रामस्थांच्या मदतीने गावातील गटारींची वारंवार सफाई करण्यात येऊ लागली. प्रबोधनामुळे प्रत्येक घरातील महिलांना आपल्या घराशेजारील गटारींची स्वच्छता ठेवण्याची सवय लागली. गावातील ज्या भागात सांडपाणी जाण्यासाठी कोणतीच व्यवस्था नाही अशा ठिकाणी सांडपाणी जाण्यासाठी ग्रामस्थांच्या सहकार्याने चर खोदण्यात आली.

**ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील रस्त्यांची स्वच्छता करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे एकही स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत केवळ सणा समारंभाच्यावेळीच ग्रामस्वच्छता केली जात असे. गावात एकही कचरा कोंडाळी नसल्यामुळे गावातील लोक आपल्या घरातील केरकचरा एखादया टोपलीत साठवून तो नंतर उकिरडयात टाकत असत. गावातील स्त्री-पुरूष व तरूणांच्यामध्ये स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे ते ग्रामस्वच्छता कार्यक्रम राबवित नसत. गावात अनेक कुटुंबांच्या मालकीचे उकिरडे असल्यामुळे गाव ओंगळवाणे वाटत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमता: ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी बैठका घेऊन व स्वच्छता संदेश फेरी आयोजित करून प्रबोधित केले आणि कांबळवाडी (ता.राधानगरी) गावाला अभ्यासदौरा आयोजित केला. गावात तरूण मंडळामार्फत, महिला बचत गटामार्फत, शाळामार्फत वारंवार स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊ लागले. ग्रामस्थांना वारंवार गावातील उकिरडे गावाबाहेर नेण्यासाठी विनंती व आवाहन केल्यामुळे काही जाणकार ग्रामस्थांनी आपले उकिरडे गावाबाहेर नेऊन सहकार्य केले. गावातील प्रत्येक घरातील महिलांनी दररोज आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमास हातभार लावला.

क) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** पन्हाळा तालुका कोल्हापूर जिल्हयामध्ये 'हागणदारीमुक्त गाव' या योजनेमध्ये अगोदर तेथील जागृतीने आघाडीवर आहे आणि सातार्डे हे गाव पन्हाळा तालुक्यातच येत असल्याने शौचालयाच्या बाबतीत अगोदरच थोडी जागृती झालेली होती. गावातील २६० कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती. पण १०३ कुटुंबाकडे शौचालय नसल्यामुळे ते उघडयावर शौचास जात असत. गावातील शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा नव्हती. गावातील काही कुटुंबाकडे शौचालय असून देखील पाण्याची कमतरता असल्यामुळे ग्रामस्थ उघडयावर शौचास जात.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: गावातील सर्व ग्रामस्थांचे प्रबोधन करून शौचालय बांधण्याचे व शौचालयाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. गावातील अंगणवाडी व शाळेतील शिक्षकांच्या मदतीने शौचालय असणारी कुटुंबे, शौचालय असून वापर करीत नसलेली कुटुंबे, व शौचालय नसणारी कुटुंबे यांची माहिती मिळविण्यात आली. नंतर ज्या कुटुंबाकडे शौचालये नाहीत त्यांची कारणे शोधून त्यांना सहकार्य करण्यात आले. त्यामुळे गावात १०३ नवीन शौचालय बांधल्यामुळे गाव हागणदारी मुक्त होऊन गावाला निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त झाला.

६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे महिलांच्यामध्ये पाहिजे तेवढी जागृती नव्हती. गावातील महिला ग्रामसभेमध्ये उपस्थित राहत नसत. सार्वजनिक कार्यक्रमात मोकळेपणाने सहभागी होत नसत आणि गावातील राजकीय क्षेत्रातही महिलांचा सहभाग अतिशय अल्प होता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिला सक्षमीकरणावर अधिक भर देऊन महिलांच्या जाणीव जागृतीसाठी कोपरासभा, बैठका व अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले. गावातील महिलांच्यासाठी आरोग्यविषयक प्रशिक्षण, बचत गट रेकॉर्ड (नोंदी) लिखाण प्रशिक्षण, किशोरी मार्गदर्शन कार्यशाळा, लिंगसमभाव सचेतना, पंचायत राज प्रशिक्षण नेतृत्व विकास वगैरे प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली. महिलांच्यासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचा महिलांनी खूप लाभ घेतला. प्रशिक्षणामुळे

महिलांना विविध विषयासंबंधी माहिती मिळाली व त्यांचा ग्रामविकास कार्यातील सहभाग वाढला.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्पर्धांचे आयोजन फारच कमी केले जात होते. या स्पर्धेमध्ये महिलांचा सहभाग हा अपवादानेच असे. गावातील महिला केवळ पारंपारिक सण उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी स्वतंत्र बैठका व कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. गावातील महिलांनी कोणत्याही प्रकारचे दडपण न घेता मोकळेपणाने स्पर्धा व विविध कार्यक्रमात सहभागी व्हावे म्हणून रांगोळी स्पर्धा, संगीत खूर्ची, उखाणे, धावणे वगैरे स्पर्धांचे आयोजन केले. जलस्वराज्य प्रकल्पांच्या माध्यमातून गावातील महिलांच्यामध्ये एक चांगले वातावरण निर्माण झाले असल्यामुळे विविध वयोगटातील महिलांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात १६ महिला बचत गट होते. पण या सर्व महिला बचत गटांच्यामध्ये सांघिकता नव्हती. यामधील काही बचत गट निष्क्रिय झाले होते. गावातील महिला बचत गटाच्या माध्यमातून इतर महिलांना सहभागी करून घेण्यासाठी किंवा त्यांच्या प्रबोधनासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात नव्हते. या महिला बचत गटांचा ग्रामविकास कार्यात कोणताही सहभाग नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यामध्ये स्वच्छता, पाण्याचा वापर, शौचालय व बचत गटाबाबत जागृती करण्यासाठी घरोघरी भेटी, कोपरासभा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जलस्वराज्य प्रकल्पाच्या महिला विकास समिती व सहाय्यकारी संस्थेच्या मदतीने गावात कार्यरत असणाऱ्या महिला बचत गटांच्या स्थितीबाबत आढावा घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. गावातील महिलांना बचत गट स्थापन करण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची मदत व मार्गदर्शन मिळू लागल्यामुळे गावात नवीन १२ महिला बचत गट स्थापन झाले. गावातील २६ महिला बचत गटांना जलस्वराज्य प्रकल्पामार्फत बीजभांडवल देण्यात आले. गावातील दोन महिला बचत गट शालेय पोषण आहार बनवून देतात तर इतर बचत गटातील महिला

स्वतंत्रपणे शिलाईकाम, म्हैसपालन व शेळीपालन सारखा व्यवसाय करतात. एकूणच जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील महिला बचत गटांना चालना मिळाली आहे.

## ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील दुर्बल घटकांमध्ये (गरीब, अपंग, व अनुसूचित जाती) पाणी, स्वच्छता, आरोग्य व महिला सक्षमीकरण वगैरे बाबत म्हणावी तेवढी जागृती नव्हती. दुर्बल घटकातील लोकांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या सोयी-सुविधांची माहिती नव्हती. त्यांची ग्रामसभेमधील उपस्थिती व ग्रामविकास कार्यातील सहभाग खूप कमी होता. दुर्बल घटकातील बहुतांशी लोकांच्यापर्यंत पाणी, शौचालय, रस्ते व गटारीसारख्या सोयी-सुविधा पोहचल्या नव्हत्या.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील दुर्बल घटकातील कुटुंबांचे सर्वेक्षण करून त्यांच्यासंबंधी माहिती गोळा केली. या लोकांना (महिलासह) एकत्र करून त्यांना शासनाच्या कल्याणकारी योजना, महिला बचत गट व इतर अनेक बाबींची माहिती देण्यात आली. दुर्बल घटकातील महिलांचे जाणीवपूर्वक बचत गट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण, बीजभांडवल व इतर कर्ज उपलब्ध करून दिले त्यांना शौचालय बांधण्यासाठी, नळजोडणी घेण्यासाठी मदत करण्यात आली. दुर्बल घटकातील लोकांच्यामध्ये जागृती झाल्यामुळे त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढून ते निर्णय प्रक्रियेमध्यही सहभागी होऊ लागले.

## ८. आर्थिक लाभ :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील विकासकामाबावत जे काही थोडेफार अनुदान मिळाले त्याची माहिती व त्याच्या विनियोगाबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार सामान्य ग्रामस्थांना नव्हता. गावातील सामान्य ग्रामस्थ हया सर्वच प्रक्रियेबाबत उदासिन होता. तसेच गावातील विकासकामामध्ये त्याचा वाटा नसल्यामुळे त्याच्या व्यवस्थापनाबाबत तो जागृत नसे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामविकासाच्या सर्व प्रक्रियेमध्ये ग्रामस्थांना सहभागी करून घेण्यासाठी ग्रामसभा आयोजित करणे, ग्रामसभेमध्ये शासनाकडून मिळालेल्या अनुदानाची माहिती देणे व विनियोगावावत ग्रामसभेमध्येच निर्णय

घेण्यात येऊ लागले याचप्रमाणे पाणी, स्वच्छता वगैरे विकासकामामध्ये ग्रामस्थांचे नाते जोडले गेले व ग्रामस्थ जागृत झाले.

**जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर गावाला प्राप्त झालेले अनुदान**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,0६,१५0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | ४२,00,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,१५,000=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | ५,00,000=00 |
| ५. | प्रोत्साहन अनुदान | ७,00,000=00 |
| | **एकूण** | **५८,२१,१५0=00** |

## २१. पिंपळवाडी (तालुका - राधानगरी)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - ऑक्टोबर २00५ व हस्तांतरीत तारीख - मार्च २00९)**

### १. लोकसंख्या :-

पिंपळवाडी गावची एकूण लोकसंख्या ५२७ असून त्यामध्ये स्त्रियांची संख्या २४९ व पुरूषांची संख्या २७८ आहे. गावात एकूण कुटुंबाची संख्या १0९ असून त्यामध्ये २३ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे आहेत.

### २. ग्रामपंचायतीची माहिती :-

पिंपळवाडी ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालय सुविधा आहे पण संगणक सुविधा नाही. तसेच ग्रामपंचायतीकडे १ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी आहे पण स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारी नाही.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण ७ सदस्य असून त्यामध्ये ३ स्त्री सदस्य व ४ पुरूष सदस्य कार्यरत आहेत. ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच पद खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूषांकडेच असून त्यांचे शिक्षण अनुक्रमे ७ वी व ४ थी पर्यंत झालेले आहे.

### ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** पिंपळवाडी गावच्या विकासाच्या उददेशाने ग्रामस्थांचा अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता. ग्रामस्थांच्यामध्ये पाणी व स्वच्छतेबाबत फारशी जागृती नव्हती. शिवाय ग्रामसभामध्येही ग्रामस्थांची उपस्थिती फार कमी होती. यामध्ये महिलांचे प्रमाण तर अगदीच नगण्य होते. गावातील तरूण मंडळांचा व महिलांचा ग्रामविकासामधील सहभाग खूप कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांच्यामध्ये व महिलांच्यामध्ये ग्रामविकासाबाबत आवड निर्माण व्हावी यासाठी कांबळवाडी (ता.राधानगरी) कवठेपिरान (ता.मिरज) व जैन्याळ (ता.कागल) येथे अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील बहुतांशी महिला, पुरूष व तरूण सहभागी झाले. अभ्यासदौऱ्यामुळे आदर्श गावातील विविध उपक्रमांचा खूप चांगला प्रभाव ग्रामस्थांच्यावर पडला. अभ्यासदौऱ्यानंतर ग्रामसभांना महिला, पुरूष व तरूणांची उपस्थिती वाढली. ग्रामस्वच्छता, लोकवर्गणी गोळा करणे, जलवाहिन्यासाठी चर खोदणे हया सर्व कामात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग वाढू लागला. गावातील महिला बचत गटांची संख्याही वाढू लागली.

### ४. पाणी व्यवस्थापन :-

#### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये नळपाणी पुरवठा योजना नव्हती. गाव डोंगर माथ्यावर वसलेले असून महिलांना पावसाळयात १.५ कि.मी. अंतरावरून सार्वजनिक विहिरीतून पाणी आणावे लागत असे. या विहीरीतील पाणी उन्हाळयात आटल्यानंतर शेजारील भोपळेवाडी या छोटयाशा गावातील विहीरीमधून पाणी उपसा करून पिंपळवाडी विहीरीत सोडले जात असे. ते पाणी स्त्रियांना डोक्यावरून आणावे लागे. गावातील बहुतांशी कुटुंबाचा दुग्धव्यवसाय व ऊस तोडणी हा व्यवसाय असला आणि त्यावर त्यांचा

उदरनिर्वाह अवलंबून असला तरी त्यांचा खूप वेळ पाणी मिळविण्यासाठीच खर्च होत असे. पाण्यासाठी पुरूषांच्यापेक्षा महिलांचे खूप हाल होत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावापासून २ कि.मी. अंतरावर ग्रामस्थांच्या श्रमदानातून विहीर खोदण्यात आली. या विहीरीपासून ते गावापर्यंत व संपूर्ण गावातून जलवाहिन्यासाठी चर खोदाईचे काम ग्रामस्थांनी श्रमदानातून केले. गावच्या टेकडीवर २५,000 लिटरची साठवण टाकी बांधण्यात आली. पाणी शुध्दीकरणासाठी प्रमाणबध्द टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असून ग्रामस्थांना दररोज प्रतिमाणसी ७५ लिटर शुध्द पाणी मिळत असल्यामुळे ते खूप समाधानी आहेत.

**ब) नळजोडणी :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात नळयोजनाच नसल्यामुळे एकाही कुटूंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नव्हती. गावातील महिला डोक्यावरून व पुरूष कावडीने सार्वजनिक विहीरीवरून पाणी आणत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात विहीरीवरून नळयोजना आणल्यामुळे सद्या सर्वच्या सर्व (१0९) कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी आहे. या प्रत्येक नळाला तोटी बसविण्यात आली आहे. विशेष म्हणजे साठवण टाकीमधून गावाला सायफन पध्दतीने पाणी दिले जात असल्यामुळे वीजबीलाचीही मोठी बचत झाली आहे.

**क) <u>पाणीपट्टी</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात नळयोजनाच नसल्यामुळे खाजगी पाणीपट्टी घेतली जात नसे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाने ग्रामसभेमध्ये खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू.१000 निश्चित केलीच पण त्याचबरोबर प्रत्येक ग्रामस्थाने स्वतंत्र नळजोडणी घेत असताना ६ महिन्यांची आगाऊ पाणीपट्टीही भरली. ग्रामस्थांना पूर्वी डोंगर पायथ्यावरून डोक्यावरून पाणी आणावे लागे. त्यासाठी होणारा त्रास व खूप होणारा वेळ वाचल्यामुळे ते आता रू.१000 पाणीपट्टी अगदी खूषीने भरत असल्याचे दिसून आले. गावातील पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदाच वसूल केली जाते. पण जो वेळेवर पाणीपट्टी भरणार नाही त्यांची नळजोडणी बंद करावी असा नियमही केला.

५. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात १00 मीटर लांबीची गटारे बांधण्यात आली होती. पण आणखी ३00 मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. गावातील काही भागात गटारीच नसल्यामुळे त्या भागातील सांडपाणी सर्वत्र पसरल्यामुळे दलदल निर्माण झाली होती. गावात स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे गटारीची सफाई वेळोवेळी होत नव्हती. परिणामी गटारी तुंबल्यामुळे दुर्गंधी पसरत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व ग्रामस्थांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आल्यामुळे महिला, पुरूष व तरूणांनी एकत्र येऊन संपूर्ण गटारींची सफाई केली. गटारी नसलेल्या भागामध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी ग्रामस्थांनी चर खोदल्या. गावाची भौगोलिक रचना उताराची असल्यामुळे एका मुख्य गल्लीतील दोन्ही बाजूच्या गटारींच्या सांडपाण्याचा उपयोग रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांसाठी केला आहे. गावातील २५ कुटुंबानी व शाळेने सांडपाण्याचा उपयोग परसबागासाठी केला आहे. गावात नवीन १00 मीटर लांबीच्या गटारींचे बांधकामही केले आहे.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात स्वतंत्र ग्रामस्वच्छता कर्मचारी नसल्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत ग्रामस्वच्छता १५ ऑगष्ट, २६ जानेवारी व इतर काही सण उत्सवालाच केली जात होती. गावातील बहुतांशी लोकांचा पशुपालन हा व्यवसाय असल्यामुळे गावात सर्वत्र केरकचरा असे. गावात घराशेजारीच अनेक कुटुंबाच्या मालकीचा उकिरडा होता. गावात कोठेही कचरा कोंडाळी नसल्यामुळे ग्रामस्थ आपल्या घरातील केरकचरा रस्त्याच्या कडेला टाकत असत. गावातील रस्त्यामध्ये खाचखळगे असल्यामुळे त्यामध्ये पावसाचे पाणी साचत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांची ग्रामस्वच्छतेमध्ये आदर्श असणाऱ्या कांबळवाडी (ता.राधानगरी) या गावाला अभ्यासदौरा आयोजित केल्यामुळे व सर्व ग्रामस्थांचे वारंवार प्रबोधन केल्यामुळे ग्रामस्थांच्या मानसिकतेमध्ये खूपच बदल झाला. गावातील तरूण मंडळे, शाळा व महिलांच्या सहभागाने वारंवार ग्रामस्वच्छता कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. प्रबोधनामुळे गावातील ५२ कुटुंबे घरी कचरा कुंडी ठेऊन त्या भरल्यानंतर गावाबाहेर टाकतात. गावास कोणी पाहुणे किंवा पदाधिकारी भेट

देणार असतील तर निरोप मिळताच उत्स्फूर्तपणे संपूर्ण ग्रामस्थ एकत्र येऊन ग्रामस्वच्छता करतात.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण १०९ कुटुंबापैकी ५६ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये होती. गावात एकही सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे उर्वरित ५३ कुटुंबातील सदस्य उघडयावर शौचास जात होते. गावातील लहान मुलांना उकिरडयावर किंवा रस्त्याच्या कडेला उघडयावर शौचास बसविल्यामुळे दुर्गंधी निर्माण होत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून स्वच्छता व पर्यावरणाबाबत ग्रामस्थांचे विविध प्रकारे प्रबोधन करण्यात आले. बहुतांशी ग्रामस्थांनी स्वबळावर तर काहींनी कर्ज घेऊन शौचालये बांधली. जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावात ४९ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली. तर उर्वरित ४ गरीब कुटुंबासाठी सार्वजनिक शौचालये बांधण्यात आले. तसेच गावातील शाळा व अंगणवाडीमध्येही शौचालये बांधण्यात आली. साहजिकच संपूर्ण गाव हागणदारीमुक्त बंद झाल्यामुळे शासनाचा ५० हजार रू.चा निर्मलग्राम पुरस्कार गावाला मिळाला.

## ६. <u>महिला सक्षमीकरण :-</u>

अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिला सार्वजनिक कार्यक्रमामध्ये सहभागी होत नव्हत्या. या महिलांच्या जागृतीसाठी व सक्षमीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नव्हते. त्यामुळे त्यांना बाहयजगाची ओळख खूप कमी होती. गावातील महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नव्हती. शिवाय बहुतांशी महिलांच्याकडे आत्मविश्वासही कमी होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** महिला सक्षमीकरणावर भर देण्यात येऊन त्यांना क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात आले. तर महिला बचत गटांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचा गावातील बहुतांशी महिलांनी लाभ घेतला. त्यामुळे त्यांच्यात जागृती निर्माण होऊन व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत झाली.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खूपच कमी स्पर्धा होत असत. या स्पर्धांमध्ये विशेषता शाळकरी मुलीच सहभागी होत. गावातील महिला बहुतांशी कोणत्याच स्पर्धांमध्ये सहभागी होत नसत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला. गावातील महिलांच्यामध्ये मुक्त वातावरण निर्माण व्हावे, त्यांच्या सुप्त गुणांना संधी मिळावी म्हणून, उखाणे स्पर्धा, झिम्मा-फुगडी, डोक्यावर पाण्याने भरलेली घागर घेऊन धावणे यासारख्या अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. सुरूवातीला या स्पर्धेमध्ये महिलांचा प्रतिसाद कमी होता पण हळहळू तो वाढत गेला. गावातील विविध स्पर्धांमुळे महिलांच्यामध्ये उत्साही वातावरण निर्माण झाले.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** महिला स्वंयसहाय्यता बचत गटांची संकल्पना गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचली नसल्यामुळे गावात केवळ २ च महिला स्वयंसहाय्यता बचत गट होते. पण या बचत गटामार्फत कोणतेच काही कार्यक्रम आयोजित केले जात नव्हते. स्थापन झालेल्या या दोन महिला बचत गटांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव होता.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील प्रत्येक घराघरामध्ये जाऊन महिलांना एकत्रित केले. त्यांच्यासाठी बैठका आयोजित केल्या. गावातील महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्याबाबत प्रबोधन केले व त्यांना मदतही केली. या बचत गटातील महिलांच्यासाठी वारंवार विविध कार्यक्रम, प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. परिणामी गावात नवीन १२ महिला स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन झाले.

७. **<u>दुर्बल घटक</u> :-**

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** दुर्बल घटकातील लोकांना त्यांच्यासाठी शासनाच्या असणाऱ्या सोयी सवलतींची पुरेशी माहिती नसल्यामुळे ते अनेक सोयी सुविधापासून वंचित होते. गावातील बहुतांशी सर्वच कुटुंबातील लोकांचा मुख्य व्यवसाय ऊसतोड होता. जी कुटुंबे अतिशय गरीब होती त्यांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकासातील सहभाग अल्प असे. विशेष म्हणजे गावात अनुसूचित जाती जमातीतील एकही कुटुंब नव्हते.

• **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** जलस्वराज्य समितीने व सहाय्यकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व वर्गातील घटकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. गावातील दुर्बल घटकातील लोकांचे पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण याबाबत प्रबोधन करून त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध सोयी सुविधांची त्यांना माहिती दिली व त्याचा लाभही त्यांना मिळवून दिला. दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती व ग्रामविकासकार्यातील सहभाग वाढला. दुर्बल घटकापर्यंत शुध्द पाणी, शौचालये, गटारी वगैरे सोयी सुविधा पोहचल्या आहेत.

## ८. आर्थिक लाभ :-

• **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** पिंपळवाडी हे डोंगरमाथ्यावर वसलेले गाव असून हया गावाला कोणत्याही प्रकारचा राजकीय वरदहस्त नव्हता. त्यामुळे गाव अनेक सोयी सुविधापासून वंचित होते. विशेषता जलस्वराज्य प्रकल्प गावात येईपर्यंत गावात नळयोजनाच अस्तित्वात नव्हती. गावाला सामाजिक व राजकीय वलय नसल्यामुळे व ग्रामविकासासाठी जी एकजूट लागते ती नसल्यामुळे आतापर्यंत शासकीय अनुदान गावापर्यंत पुरेसे पोहचले नव्हते.

• **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामविकासाची गावाला एक संधी मिळाली. प्रबोधनामुळे गावामध्ये एकजूट निर्माण झाली. गावातील महिला व तरूण वर्गामध्ये जागृती निर्माण झाली.

**जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाला खालीलप्रमाणे अनुदान मिळाले**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | १,९९,५१0=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | २३,0६,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ५0,000=00 |
| ४. | लोकवर्गणी (१0%) | २,८0,000=00 |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | ५0,000=00 |
| ६. | प्रोत्साहन अनुदान | ५,00,000=00 |
| | **एकूण** | **३३,३५,५१0=00** |

# २२ . सरूड ( तालुका - शाहुवाडी )

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - डिसेंबर २००५ व हस्तांतरीत तारीख - सप्टेंबर २००९)**

## १ . <u>लोकसंख्या</u> :-

सरूड गावची लोकसंख्या ६७२३ असून त्यामुळे ३२३६ स्त्रिया द्या ३४८६ पुरूष आहेत . गावात एकूण कुटुंबांची संख्या १३४७ असून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संख्या २७२ आहे .

## २ . <u>ग्रामपंचायतीची माहिती</u> :-

सरूड ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे . ग्रामपंचायतीकडे ३ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ स्वतंत्र पाणी वितरण कर्मचारीही आहेत . पण ग्रामपंचायतीमध्ये संगणक सुविधेचा अभाव आढळला .

ग्रामपंचायत समिती १५ सदस्यांची असून त्यामध्ये ५ स्त्री सदस्य व १0 पुरूष सदस्य आहेत . ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर इतर मागासवर्गीय (ओ . बी . सी . ) प्रवर्गातील स्त्री कार्यरत असून त्यांचे शिक्षण बी . कॉम पर्यंत झाले आहे . तर उपसरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष कार्यरत असून त्यांचे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे .

## ३ . <u>अभ्यासदौरा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सरूड गावातील नागरीकांच्या प्रबोधनासाठी व्यापक स्वरूपात अभ्यासदौऱ्याचे आयोजन केलेले नव्हते . ग्रामस्थांना पिण्याचे पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण याबाबत जागृत करण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत किंवा इतर कोणत्याही समाजसेवी संस्थेमार्फत प्रयत्न केलेले नव्हते . गावामध्ये दरमहा ग्रामसभा आयोजित केली जात नव्हती . पण जेंव्हा ग्रामसभा भरे तेंव्हा ग्रामस्थांची उपस्थितीही कमी असे . ग्रामसभांना महिलांची उपस्थिती व निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग खूपच कमी होता . गावातील तरूण मंडळाचा ग्रामविकासातील व ग्राम प्रबोधनातील सहभागही समाधानकारक नव्हता . गावातील शाळा, महाविद्यालयाकडून काही प्रमाणात प्रबोधन व स्वच्छता कार्यक्रम राबविले जात .

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांच्या व महिलांच्या प्रबोधनावर अधिक भर देण्यात आला. सर्व ग्रामस्थांना लोकसहभागातून ग्रामविकास कसा होऊ शकतो हे समजण्यासाठी कांबळवाडी (ता.राधानगरी) या आदर्श गावाला अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले. या अभ्यासदौऱ्यामध्ये गावातील तरूण, महिला, ग्रामपंचायत व जलस्वराज्य प्रकल्प समितीतील पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. अभ्यासदौऱ्याचा परिणाम म्हणून ग्रामसभामधील स्त्री-पुरूषांची उपस्थिती वाढली. तसेच ग्रामस्वच्छता, लोकवर्गणी गोळा करणे, प्रबोधन कामामध्येही ग्रामस्थांची सहभाग वाढला. आरोग्याच्यादृष्टीने गावात शौचालयांची संख्या वाढली. तर महिला सक्षमीकरणाच्यादृष्टीने बचत गटांची संख्या वाढली.

४. <u>पाणी व्यवस्थापन</u> :-

**अ) पिण्याचे पाणी :-**

● **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सरूड गावामध्ये गावापासून २ कि.मी. अंतरावरील वारणा नदीवरून पाणी पुरवठा योजना राबविली होती. ही पाणी पुरवठा योजना जुनी असल्यामुळे जॅकवेल पडण्याच्या स्थितीत होते, कमी क्षमतेचा इलेक्ट्रिक मोटरपंप होता. तसेच पाईपलाईन गळती होत असल्यामुळे गावाला १२ महिने पुरेसा पाणी पुरवठा होत नव्हता. गावाची पाण्याची गरज भागविण्यासाठी गावात ३0 बोअरवेल खोदले असूनदेखील हातपंप नादुरूस्त, बोअरवेलला पाणी कमी होणे यासारख्या कारणामुळे ग्रामस्थांना पाण्याची टंचाई भासत असे आणि पाण्यासाठी महिलांचे खूप हाल होत होते. गावात जलशुध्दीकरण केंद्र नसल्यामुळे पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडरचा वापर केला जात असे.

● **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी २ कि.मी. अंतरावरील वारणा नदी हाच जलस्त्रोत निवडण्यात येऊन नदीवर नवीन जॅकवेल बांधण्यात आले. तसेच गावात २ लाख लिटरची साठवण टाकीही (जलकुंभ) बांधण्यात आली. नदीपासून गावापर्यंत व गावात बहुतांशी सर्व नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. गावातील सर्व लोकांचे पाण्याच्या वापराबावत चांगले प्रबोधन करण्यात आले. पाणी वितरण कर्मचाऱ्यांना पाणी शुध्दीकरणाबावत,

वितरणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. परिणामी ग्रामस्थांना नियमित, शुध्द व पुरेसे पाणी (प्रतिमाणसी ४० लिटरप्रमाणे) मिळू लागले.

ब) <u>नळजोडणी</u> ः-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील एकूण १३४७ कुटुंबामधील ९४७ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी होती पण ४०० कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे त्यांना पाण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या २१ सार्वजनिक नळावर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असे. त्यामुळे अनेकवेळा पाणी मिळविण्यासाठी भांडणे होत. सार्वजनिक नळांना पाणी कधी येणार हे निश्चित नसल्यामुळे ग्रामस्थ आपल्या घरातील जुन्या घागरी किंवा भांडी नंबर लावण्यासाठी अगोदरच नळावर नेऊन ठेवत असत. सार्वजनिक नळांचा वापर ग्रामस्थांच्याकडून काळजीपूर्वक केला जात नसल्यामुळे बहुतांशी सर्वच नळांना तोटया नसलेल्या आढळल्या. शिवाय बहुतांशी खाजगी नळांना देखील तोटी नसल्यामुळे पाणी वाया जात असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व ग्रामस्थांचे, महिलांचे प्रबोधन करून त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन स्वतंत्र नळजोडणी घेण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे गावातील ११८७(९४७+२४०) कुटुंबानी ग्रामपंचायतीच्या व जलस्वराज्य समितीच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद देऊन नव्याने स्वतंत्र नळजोडणी घेतली. गावातील १६० कुटुंबानी स्वतंत्र नळजोडणी घेतली नसल्यामुळे त्यांना १० सार्वजनिक नळजोडण्यावरून पाणी आणावे लागते. जलस्वराज्य प्रकल्पामुळे आता नियमित नळाना पाणी येत असल्यामुळे पूर्वी इतकी सार्वजनिक नळांवर गर्दी असत नाही. ग्रामस्थांचे चांगले प्रबोधन झाले असल्यामुळे आता सर्व सार्वजनिक नळांना व खाजगी नळांनाही तोटी बसविल्याचे आढळले.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.३६० होता तर सार्वजनिक नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.७५ होता. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा वसूल केली जात असे. ग्रामस्थांना नियमित व पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्यामुळे, त्यांचा आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे व इतर काही कारणामुळे पाणीपट्टी वसूली समाधानकारक नव्हती. ग्रामस्थांनी

पाणीपट्टी वेळेत न भरल्यास नळजोडणी रद्द करण्याची तरतूद असली तरी ग्रामपंचायत त्याची काटेकोर अंमलबजावणी न करता दाखले न देण्याचा मार्गाचा अवलंब करीत असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळजोडणी पाणीपट्टीचा वार्षिक दर सर्वानुमते ग्रामसभेत रू.४00 तर सार्वजनिक पाणीपट्टीचा वार्षिक दर रू.१00 निश्चित केला. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वार्षिक पध्दतीने वसूली करण्याचे निश्चित केले. ग्रामसभेमध्ये निश्चित केल्याप्रमाणे ग्रामस्थांनी नवीन नळजोडणी घेताना आगाऊ ६ महिन्यांची पाणीपट्टी भरल्याचे आढळले. पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यांची नळजोडणी रद्द करण्याची कारवाई काटेकोर पध्दतीने राबविण्याचे ग्रामसभेत ठरले आहे. ग्रामस्थांना नियमित, स्वच्छ व पुरेसे पाणी मिळू लागल्यामुळे ग्रामस्थ समाधानी असल्याचे आढळले.

## ५. <u>आरोग्य</u> :-

### अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात सांडपाण्याचा निचरा प्रामुख्याने गटारीद्वारेच केला जात असे. गावात एकूण १३00 मीटर लांबीच्या गटारी असून आणखी ३४00 मीटर लांबीच्या गटारींची आवश्यकता होती. गावातील काही भागात सांडपाणी जाण्यासाठी केवळ चर खोदण्यात आली होती. तर काही भागात कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर सर्वत्र पसरून दलदल निर्माण होत असे. ग्रामपंचायतीकडे केवळ तीन स्वच्छता कर्मचारी असल्यामुळे गटारींची स्वच्छता वेळच्यावेळी केली जात नसल्यामुळे अनेक ठिकाणी गटारी तुंबल्यामुळे दुर्गंधी व मच्छरांचा प्रादुर्भाव निर्माण होत असे. गावातील उकिरडयामुळे देखील गटारी तुंबल्या जात. त्याचाही आरोग्यावर विपरीत परिणाम होई.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सांडपाण्याचा योग्य पध्दतीने निचरा करण्यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन करून शोषखड्डे व परसबाग हे त्यांच्यासमोर पर्याय ठेवले. ग्रामस्थांना आपल्या घरासभोवताली गटारी तुंबणार नाहीत याची खबरदारी घेण्याचे आवाहन केले. गावातील उकिरडे गावाबाहेर नेण्याबाबतही ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यामुळे काही ग्रामस्थांनी त्याला प्रतिसाद दिला. गावातील तरूण मंडळे व ग्रामस्थांच्या सहकार्यातून ग्रामपंचायतीमार्फत गावातील गटार सफाई व गटारीसाठी

चर खोदण्यात आल्या. ग्रामपंचायतीच्या फंडातून व जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावात २१00 मीटर लांबीच्या गटारीचे बांधकाम करण्यात आले.

ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील साफसफाई व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीमार्फत पार पाडली जात होती. ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता कर्मचारी कमी असल्यामुळे मुख्य रस्त्यांची स्वच्छता २ ते ३ आठवडयातून एकदा तर संपूर्ण ग्रामस्वच्छता दीड ते दोन महिन्यातून एकदा केली जात असे. ग्रामस्थांच्यामध्ये स्वच्छतेबाबत जागृती नसल्यामुळे ते ग्रामस्वच्छता कार्यक्रमामध्ये सहभागी होत नसत. ग्रामस्थांचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे अनेक ग्रामस्थांच्या मालकीचे उकिरडे गावातच होते. गावात केवळ दोनच ठिकाणी कचरा कोंडाळी असल्यामुळे गावातील इतर भागातील ग्रामस्थ कचरा रस्त्याच्या कडेला उघडयावरच टाकत. हा कचरा वेळच्यावेळी उचलला जात नसल्यामुळे कचऱ्यातील सेंद्रिय पदार्थ कुजून दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात बैठका व कोपरासभा घेऊन ग्रामस्थांचे ग्रामस्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले. ग्रामस्थ आपले घर व परिसर स्वच्छ ठेऊन ग्रामस्वच्छता कार्यक्रमास हातभार लाऊ लागले. गावातील तरूण मंडळे, महिला व शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ग्रामपंचायतीकडून ग्रामस्वच्छता कार्यक्रम वारंवार राबविण्यात येऊ लागले. गावात ७ ठिकाणी कचरा कोंडाळया ठेवण्यात आल्या. ग्रामपंचायत कर्मचारी गावात साचणारा केरकचरा वेळोवेळी उचलून गटारीवर किटकनाशकांची फवारणी करू लागले.

ब) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील १३४७ कुटुंबापैकी ६८१ कुटुंबाकडे स्वतंत्र वैयक्तिक शौचालये होती तर १६ सार्वजनिक शौचालये होती. गावात ६६६ कुटुंबाकडे शौचालय नसल्यामुळे १६ सार्वजनिक शौचालये ही खूपच अपुरी पडत त्यामुळे बहुताशी लोक उघडयावर शौचास जात. उघडयावर शौचास जाण्याचा सर्वात जास्त त्रास महिला व वृध्द ग्रामस्थांना होत असे. उघडयावरील हागणदारीमुळे गावाच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला होता. गावातील उघडयावरील हागणदारी बंद व्हावी व घरोघरी शौचालय व्हावेत म्हणून ग्रामपंचायतीमार्फत प्रभावी प्रयत्न झाले नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व लोकांचे व्याख्यान, माहितीपट, पथनाटय व अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातून अभ्याससहलीद्वारे शौचालयाबाबत प्रबोधन केले. ग्रामस्थांना शौचालय बांधण्यासाठी श्रमदानातून खडड् काढून देणे व कर्ज उपलब्ध करून देणे यासारखी मदत केली. उघडयावर शौचास जाणाऱ्यावर दंडात्मक कारवाई केली त्यामुळे गावात नवीन ५४६ वैयक्तिक शौचालये बांधली गेली. ज्या ग्रामस्थांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे अशा लोकांसाठी नवीन सार्वजनिक १७ शौचालये बांधण्यात आली. यामुळे उघडयावरील हागणदारी बंद झाल्यामुळे गावातील रोगराई कमी होण्यास मदत झाली आणि याचाच परिणाम म्हणून गावाला २ लाख रू.चा निर्मलग्राम पुरस्कार मिळाला.

६. महिला सक्षमीकरण :-

अ) महिला प्रशिक्षण :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्यामध्ये जाणीव जागृतीचा अभाव असल्यामुळे त्यांचा सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग खूपच कमी होता. गावातील महिलांच्यामध्ये जागृती निर्माण व्हावी, त्यांच्यामधील सुप्तगुंणांचा विकास व्हावा यासाठी त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न केले नव्हते. एवढेच नव्हे तर गावातील महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या कल्याणकारी योजना व शासनाच्या विविध सोयीसवलीची माहिती नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात आला. गावातील महिलांना समभाव सचेतना, पंचायत राज्य, किशोरी मार्गदर्शन कार्यशाळा इ. प्रशिक्षणाबरोबरच व्यवसाय प्रशिक्षण देखील देण्यात आले. महिलांना दिलेल्या प्रशिक्षणातून त्यांच्यात जागृती निर्माण होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास व त्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत झाली आणि त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध सोयी - सवलतींची माहिती झाली.

ब) स्पर्धा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सरूड गावामध्ये सातत्याने विविध प्रकारच्या स्पर्धा होत. या विविध स्पर्धांमध्ये शाळेला जाणाऱ्या मुलींचा सहभाग अधिक होता. त्याचप्रमाणे महिलांचाही सहभाग होता पण त्यांचे प्रमाण खूप कमी असे. गावातील महिलांचा

स्पर्धेमधील सहभाग वाढावा त्यासाठी त्यांची मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले नव्हते. गावातील विविध स्तरातील, वयोगटातील महिलांच्यामध्ये मोकळेपणा निर्माण होण्यासाठी स्वतंत्र स्पर्धा किंवा कार्यक्रमांचे आयोजन केले जात नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील सर्व स्तरातील, वयोगटातील महिलांना सहभागी करून घेण्यासाठी विविध स्पर्धांचे खास करून आयोजन करण्यात आले. गावातील वयस्कर सुशिक्षित व अशिक्षित महिलांच्यासाठी उखाणे व झिम्मा-फुगडी यासारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गावात रांगोळी, संगीत खुर्ची, धावणे, निबंध व वक्तृत्व स्पधांचेही आयोजन करण्यात आले. सुरूवातीला महिलांचा स्पर्धेमधील सहभाग कमी होता पण हळूहळू तो वाढत गेला. विविध स्पर्धांमध्ये भाग घेतल्यामुळे व स्पर्धा जिंकून बक्षीसे पटकावल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास उंचावण्यास खूप मदत झाली.

ब) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिला बचत गट संकल्पना ब-यापैकी पोहचली असल्यामुळे गावात २१ महिला बचत गटांची स्थापना झाली होती. गावात महिला बचत गट असले तरी यांचा ग्रामविकासामध्ये सहभाग मात्र काहीच नव्हता. शिवाय गावातील सर्व महिला बचत गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात नसल्यामुळे त्यांच्यामध्ये समुदाय भावनेचा अभाव होता. गावातील महिला बचत गटांची संख्या वाढण्यासाठी विशेष असे प्रयत्न केले जात नव्हते. अस्तित्वात असणाऱ्या बचत गटापैकी काही महिला बचत गट तर फक्त कागदावरच होते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यामध्ये विविध प्रकारे जागृती करून त्यांना बचत गटाचे महत्व पटवून दिले. गावातील अगोदर स्थापन झालेल्या बचत गटातील महिलांना एकत्र करून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला व त्यांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत आणले. जुन्या बचत गटांना बळकटी देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. गावात नवीन बचत गट स्थापन करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे आणि प्रबोधनामुळे २९ महिला बचत गट स्थापन झाले व गावातील एकूण बचत गटांची संख्या ६० झाली. गावातील बचत गटातील बहुतांशी महिलांनी जलस्वराज्य प्रकल्पाद्वारे आयोजित केलेल्या अभ्यासदौऱ्याचा, प्रशिक्षणाचा व दिलेल्या बीज भांडवलाचा लाभ घेतला. त्यामुळे त्यांच्या आर्थिक, मानसिक व सामाजिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाली.

## ७. <u>दुर्बल घटक</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब, अपंग व अनुसूचित जाती जमातीतील लोकांच्यापर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती पोहचत नव्हती. गावातील दुर्बल घटकही गामपंचायतीमध्ये व ग्रामसभेमध्ये जाऊन विविध बावींची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत नव्हते. त्यामुळे त्यांच्यामधील अनेक लोक विविध सोयी सुविधापासून वंचित होते. सार्वजनिक कार्यक्रमात दुर्बल घटकांना मानसन्मान मिळत नव्हता.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावात प्रथमता दुर्बल घटकांची संख्या व त्यांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. गावातील दुर्बल घटकातील लोकांना एकत्र करून त्यांच्यापर्यंत विविध शासकीय योजनांची माहिती पोहचविली जाऊ लागली. त्यामुळे दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती व त्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला. तसेच दुर्बल घटकातील महिलांचे बचत गट स्थापन झाले. दुर्बल घटकातील लोकांना शौचालय बांधण्यासाठी शासकीय अनुदान मिळवून दिले. शिवाय या प्रकल्पामुळे दुर्बल घटकातील लोकांच्यापर्यंत शुध्द पाणी, रस्ते व गटारी सारख्या सोयी सुविधा पोहचल्या आहेत.

## ८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावाला राजकीय वरदहस्त असल्यामुळे शासनाच्या अनेक योजना व अनुदान पोहचले होते पण त्यामध्ये लोकसहभाग व लोकवाटा नसल्यामुळे त्या अनुदानाचा पुरेपुर किंवा योग्य वापर झाला नव्हता. ग्रामस्थांच्यामध्ये त्या सोयी-सुविधांच्याबद्दल आपलेपणा नसल्यामुळे त्या सुव्यवस्थित राहिल्या नाहीत. उदा. गटारी, रस्ते, सार्वजनिक इमारती इ.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** लोकसहभाग व पारदर्शी कारभार हया गोष्टींना महत्व दिलेले आहे. त्यामुळे शासनाचे कोणते अनुदान किती आले? ते कशासाठी खर्च करावयाचे याचे सर्व निर्णय ग्रामसभेतच घेतले जाऊ लागले.

जलस्वराज्य प्रकल्पकाळात विविध विकासकामासाठी गावाला प्राप्त झालेले अनुदान

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | जलस्वराज्य उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ४,४०,२५०=०० |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९०%) | ८९,११,०००=०० |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | ३,०७,२५०=०० |
| ४. | लोकवर्गणी (१०%) | १०,२३,५००=०० |
| ५. | निर्मल ग्राम पुरस्काराची रक्कम | २,००,०००=०० |
| ६. | प्रोत्साहन अनुदान (मंजूर रक्कम) | ७,००,०००=०० |
| | **एकूण** | **१,१५,८२,०००=००** |

## २३. निमशिरगाव (तालुका - शिरोळ)

**(जलस्वराज्य प्रकल्प मंजूर तारीख - मार्च २००५ व हस्तांतरीत तारीख - जून २०१०)**

### १. लोकसंख्या :-

निमशिरगाव गावची एकूण लोकसंख्या ४५१५ असून त्यामध्ये स्त्रियांची संख्या २०९५ व पुरूषांची संख्या २४२० आहे. गावात एकूण कुटुंबांची संख्या ७४७ असून त्यामध्ये १६८ दारिद्रय रेषेखालील कुटुंबे आहेत.

### २. ग्रामपंचायतीची माहिती :-

निमशिरगाव ग्रामपंचायतीची स्वत:ची इमारत असून त्यामध्ये शौचालयाची सुविधा आहे. तसेच संगणक सुविधदेखील आहे. ग्रामपंचायतीकडे २ स्वतंत्र स्वच्छता कर्मचारी व २ पाणी वितरण कर्मचारी आहेत.

ग्रामपंचायत समितीमध्ये एकूण १३ सदस्य असून त्यामध्ये ४ स्त्री सदस्य व ९ पुरूष सदस्य कार्यरत आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर खुल्या (ओपन) प्रवर्गातील पुरूष कार्यरत असून त्यांचे शिक्षण बी.ए.बी.एड. झालेले आहे. तर उपसरपंच पदावर

देखील भटकी जमात (एन.टी.) प्रवर्गातील बी.ए.बी.एड. पर्यंत शिक्षण झालेला उच्च विद्याविभूषित पुरूषच कार्यरत आहेत.

## ३. अभ्यासदौरा :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निमशिरगाव ग्रामस्थांच्यासाठी अभ्यासदौरा आयोजित केला नव्हता. ग्रामस्थांच्यामध्ये परिसर स्वच्छतेबाबत जाणीव जागृतीचा अभाव होता. गावामध्ये सार्वजनिक स्वच्छतेचे कार्यक्रम आयोजित केले जात नव्हते. जरी सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम आयोजित केले तरी ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळत नसे. ग्रामविकास उपक्रम (घर तेथे शौचालय, ग्रामस्वच्छता, गांडूळ खत प्रकल्प, ऑक्सिजन पार्क इ.) राबविण्याकडे ग्रामपंचायतीचेही दुर्लक्ष होते. गावातील तरूण मंडळे व महिला बचत गट यांच्यामध्येही ग्रामविकास कार्यक्रम राबविण्याबाबत उदासिनता होती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांची ग्रामसभेला उपस्थिती वाढली. गावातील तरूण मंडळे ग्रामविकासाच्या कार्यात सक्रिय सहभागी होऊ लागली. गावातील महिला मंडळ व बचत गटांचे सर्वेक्षण, ग्रामस्वच्छता, शौचालय बांधण्यासाठी प्रबोधन कार्यात चांगले सहकार्य मिळाले. गावात घर तेथे शौचालय या संकल्पनेवर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे प्रत्येक घरातील एक महिला बचत गटात असेल यासाठी प्रयत्न केले गेले.

## ४. पाणी व्यवस्थापन :-

### अ) पिण्याचे पाणी :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावामध्ये १.५ कि.मी. अंतरावरील विहीरीतून नळ पाणी पुरवठा योजना राबविली होती. या विहीरीतील जलस्त्रोत आटू लागल्यामुळे व गावाची लोकसंख्या वाढू लागल्यामुळे गावाला पाणी अपुरे पडून ३ दिवसातून एकदा पाणी पुरवठा होत असे. गावात दुसरी एक विहीर व चार विंधनविहीरी होत्या पण त्यांनाही पुरेसे पाणी नव्हते. गावात शुध्दीकरणासाठी केवळ टी.सी.एल. पावडरचा वापर करीत.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सर्वानुमते गावापासून ६ कि.मी. अंतरावरील वारणा नदीवरून पाणी पुरवठा योजना राबविण्याचे निश्चित करून नदीवर जॅकवेल बांधले. त्याचबरोबर गावात साठवण टाकी व फिल्टरहाऊसची सुविधा

उपलब्ध करून दिल्या. तसेच विहीरीचा गाळ काढला व विंधनविहीरीचे पुनर्भरनही केले. त्यामुळे गावाला नियमित, शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा होत असून प्रबोधनामुळे ग्रामस्थांनाही पाण्याचे महत्व पटल्यामुळे ते पाण्याचा काळजीपूर्वक वापर करीत आहेत.

ब) <u>नळजोडणी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात खाजगी नळजोडणी ४५५ होती तर सार्वजनिक नळजोडणी १२ होत्या. गावातील २९२ कुटुंबाकडे स्वतंत्र खाजगी नळजोडणी नसल्यामुळे त्यांना सार्वजनिक नळावर विसंबून राहावे लागे तसेच यामुळे ग्रामपंचायतीचे उत्पन्नही बुडे. ग्रामस्थांच्यामध्ये पाण्याबाबत जाणीव जागृतीचा अभाव अस्ल्यामुळे गावातील काही खाजगी व बहुतांशी सार्वजनिक नळांना तोटीच नसल्यामुळे पाण्याची नासाडी होत असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे पाण्याच्या वापराबाबत व स्वतंत्र नळजोडणी घेण्याबाबत प्रबोधन केले. गावात ६00 कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी असून १४७ कुटुंबाकडे स्वतंत्र नळजोडणी नसल्यामुळे त्यांच्यासाठी तात्पुरत्या ६ सार्वजनिक नळजोडणी जोडण्यात आल्या असल्या तरी खाजगी नळजोडणी नसलेल्या कुटुंबाचे उर्वरित प्रबोधन करून सार्वजनिक नळजोडणी हळूहळू बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांना पाण्याचे महत्व पटल्यामुळे सर्व खाजगी नळांना तोटी असून सार्वजनिक नळांचेही पाणी जपून वापरण्याचे प्रबोधन सुरू आहे.

क) <u>पाणीपट्टी</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** सुरूवातीला गावात खाजगी नळजोडणी पाणीपट्टी रू.३६0 होती. पण गावकऱ्यांना ३ दिवसातून एकदा पाणी मिळू लागले तेंव्हा ग्रामस्थांनी ग्रामसभेत वर्षाला (९महिन्याचीच) रू.२७0 पाणीपट्टी भरण्याचा ठराव केला. पण सार्वजनिक पाणीपट्टी मात्र रू.७५ ठेवण्यात आली. पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामार्फत वर्षातून एकदा जमा केली जात असे. गावातील पाणीपट्टी वसूली ७0% असून दिवसेंदिवस पाणीपट्टी थकबाकी वाढत होती. पाणीपट्टी वेळेत न देणाऱ्यांची नळजोडणी रद्द करावी असे ग्रामसभेत ठरले असले तरी त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून आले.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** खाजगी नळजोडणी वार्षिक पाणीपट्टी रू.४00 करण्यात आली तर सार्वजनिक पाणीपट्टी रू.१00 करण्यात आली. सदर पाणीपट्टी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमार्फत वर्षातून एकदा वसूल केली जाते. ग्रामस्थांना पाणी नियमित मिळू लागल्यामुळे गावातील पाणीपट्टी वसूली समाधानकारक आहे. शिवाय

पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर काटेकोर दंडात्मक कारवााई करण्याचेही निश्चित केले आहे.

## ५. <u>आरोग्य</u> :-

### अ) <u>गटारीची स्थिती</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी १५०० मीटर गटारीची सोय होती. पण गावातील काही भागात गटारच नसल्यामुळे तेथील सर्व सांडपाणी रस्त्यावर पसरत असे. सांडपाणी गटारीत तुंबल्यामुळे गावात दुर्गंधी, डासांचे प्रमाण जास्त व आजारी पडण्याचे प्रमाणही जास्त होते. गटारीची स्वच्छताही वेळोवेळी केली जात नव्हती.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थांचे स्वच्छतेबाबत प्रबोधन केले व ग्रामस्थांना स्वावलंबनाचे महत्व पटवून दिले. ग्रामपंचायतीमार्फत गटारी नसलेल्या काही भागात ५०० मीटर लांबीच्या गटारी बांधण्यात आल्या. ग्रामपंचायतीची आर्थिक क्षमता नसल्यामुळे जिथे गटारी बांधता येणार नाहीत तिथे किमान चर काढून सांडपाणी साचणार नाही याची काळजी घेतली जाते. तरूण मंडळे, शाळा, महिला बचत गटामार्फतही ग्रामस्वच्छता, गटार सफाई, कार्यक्रम वारंवार राबविले जात असल्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत झाली आहे. विशेषता माळभागामध्ये गटारी नसल्यामुळे ग्रामस्थ सांडपाण्याचा उपयोग परसबागेसाठी करीत आहेत.

### ब) <u>रस्तासफाई व कचरा व्यवस्थापन</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामपंचायतीकडे स्वच्छता कर्मचारी कमी व स्वच्छतेबाबत लोकजागृतीचा अभाव यामुळे गावातील रस्ते वेळोवेळी स्वच्छ केले जात नसत. शिवाय गावात दोनच सार्वजनिक कचरा कोंडाळया होत्या. ज्या भागात कचरा कोंडाळया नव्हत्या त्या भागात केरकचरा उघडयावरच टाकला जात असे. तो केरकचरा नियमित उचलला जात नसे. प्रत्येक घरामध्ये कचरा कुंडया नसल्यामुळे गावातील रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा व सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता असे.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामस्थ, तरूण मंडळे व शाळामध्ये स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करून ग्रामस्वच्छतेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केल्यामुळे त्यांचे सहकार्य मिळू लागले. गावात ७ ठिकाणी कचरा कोंडाळया

ठेवल्या व लोकांना घरी कचरा कुंडी ठेवण्याची सवय लावली. गावातील साचलेला कचरा वेळच्यावेळी उचलला जाऊ लागला. वैयक्तिक कंपोस्ट खड्डे व गांडूळ खताच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावली जाऊ लागली.

क) <u>शौचालय</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** ग्रामस्थांच्यामध्ये शौचालयाबाबत फारशी जागृती नसल्यामुळे गावातील एकूण ७४७ कुटुंबापैकी केवळ २४० कुटुंबाकडेच शौचालये होती. गावात केवळ ४ च सार्वजनिक शौचालय असल्यामुळे शौचालये नसणाऱ्या सर्व कुटुंबातील सदस्य उघडयावर शौचास जात. घरी शौचालय नसल्यामुळे व गावात शौचास जाण्यास योग्य जागा नसल्यामुळे महिलांचे फार हाल होत असे उघडयावरील हागणदारीमुळे गावात विविध आजारांचे प्रमाणही वाढले होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** प्रथमत: गावातील महिलांच्यामध्ये शौचालयाबाबत जागृती निर्माण करून शौचालय बांधण्यास प्रवृत्त केले. त्याचप्रमाणे ग्रामस्थांच्यामध्येही शौचालयाबाबत व्याख्याने, अभ्यासदौरे, माहितीपट, घोषवाक्ये, पथनाटये या माध्यमातून जागृती केली. ग्रामपंचायतीमार्फत, बॅकामार्फत, बचत गटामार्फत शौचालय बांधणाऱ्यांना कर्ज पुरवठयाची सोय केली. परिणामी गावातील ४८२ कुटुंबानी वैयक्तिक शौचालये बांधली. तर नवीन १६ सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. प्रत्येक शाळा, ग्रामपंचायत, अंगणवाडी व सार्वजनिक संस्थामध्येही शौचालय बांधल्यामुळे गाव १००% हागणदारीमुक्त होऊन गावाला केंद्रशासनाचा रू.२.५० लाखाचा पुरस्कार मिळाला.

## ६. <u>महिला सक्षमीकरण</u> :-

अ) <u>महिला प्रशिक्षण</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील महिलांच्या विकासासाठी विशेष असे प्रशिक्षणाचे आयोजन केले नव्हते. ग्रामसभेतील महिलांची उपस्थिती फारच कमी असल्यामुळे त्यांच्या शासकीय योजनांची व इतर माहिती पोहचत नव्हती होती. ग्रामसभेत किंवा सार्वजनिक कार्यक्रमात उपस्थित असणाऱ्या महिलांपैकी अपवाद वगळता इतर महिला चार चौघांत खुलेपणाने बोलायला किंवा आपले मत मांडायला तयार नसत. शिवाय सार्वजनिक

निर्णयप्रक्रियेत सहभागी होत नव्हत्या. ग्रामविकासातील पाणीपट्टी वसूली व देखभाल दुरूस्ती यासारखी स्वतंत्र जबाबदारी घ्यायला महिला तयार नसत.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्यासाठी शासकीय योजनांची माहिती, कायदेविषयक व व्यवसाय विषयक प्रशिक्षणाबरोबरच इतर विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले. याचा बहुतांशी महिलांनी लाभ घेतल्यामुळे ग्रामसभेत त्यांची उपस्थिती वाढून त्या ग्रामसभेत व सार्वजनिक कार्यक्रमामध्ये चारचौघांशी मोकळेपणाने बोलू लागल्या. आपले मतही धाडसाने मांडू लागल्या. महिला ग्रामविकासाबाबत ग्रामसभेमध्ये स्वतंत्र निर्णय घेऊ लागल्या व आपल्या निर्णयाबद्दल त्या ठाम राहू लागल्या. गावातील पाणीपट्टी वसूलीचा, देखभाल दुरूस्तीचा ठेका/जबाबदारी घेण्यास आता महिला पुढे येत आहेत.

ब) <u>स्पर्धा</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिलांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी विशेष असा प्रयत्न केला जात नव्हता. गावातील सर्व स्तरातील महिला सहभागी होऊ शकतील अशा स्पर्धांचे आयोजन केले जात नव्हते. गावात ज्या (स्त्री-पुरूष) जनरल स्पर्धा होत त्यामध्ये महिलांचा सहभाग फार कमी असे.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** सुरूवातीलाच महिलांसाठी स्वतंत्र कार्यक्रम घेऊन त्यांना विविध कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचे निश्चित केले. महिलांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी विशेष असे प्रयत्न केले. गावातील सर्व स्तरातील महिला सहभागी व्हाव्यात म्हणून, झिम्मा फुगडी, लंगडी, उखाणे, जात्यावरील गाणी, रांगोळी, वक्तृत्व इ. स्पर्धा आयोजित केल्या त्यामध्ये महिलांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्याचप्रमाणे संगीतखुर्ची, वक्तृत्व, निबंध, रांगोळी यासारख्या जनरल (स्त्री-पुरूष) स्पर्धेमध्येही आता महिला बिनधास्त सहभागी होत असल्याचे दिसून येते.

क) <u>बचत गट</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावात महिला बचत गटांची संख्या ३० असली तरी काही बचत गट निष्क्रिय झाले होते. गावातील सर्व बचत गटातील महिलांच्यामध्ये सांघिक भावनेचा अभाव होता. या महिला बचत गटांचा ग्रामविकास कार्यामध्ये सहभाग नव्हता. महिला बचत गटामार्फत गावातील इतर महिलांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले

जात नव्हते. बचत गटातील महिलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी फारसे प्रयत्न केले जात नव्हते.

- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील महिलांच्या सक्षमीकरणाला अधिक प्राधान्य देण्यात आले. सुरूवातीला महिलांच्या बैठका आयोजित करून गावात किती महिला बचत गट आहेत? त्यापैकी किती सक्रिय आहेत? याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर गावातील सुरू असणा-या बचत गटातील महिलांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले व इतर महिलांनाही बचत गट स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

या सर्वांचा **परिणाम** असा झाला की, गावातील जुन्या महिला बचत गटातील मरगळ जाऊन त्यांना एक नवीन उभारी आली. शिवाय गावात नवीन १७ महिला बचत गट स्थापन झाले. गावातील सर्व बचत गटांचा एक महासंघ बनवून त्यांच्यामार्फत सातत्याने महिला विकासात्मक कार्यक्रम राबविले जाऊ लागले. गावातील महिलांना दिलेल्या विविध प्रशिक्षणामुळे त्यांना बाहय जगाची ओळख झाली व विविध व्यवसाय विषयक माहिती मिळाली. जलस्वराज्य प्रकल्पाकडून मिळालेल्या बीज भांडवलातून अनेक महिलांनी शिवणयंत्र, म्हैसपालन, कोंबडया पाणी व्यवसाय करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावला.

## ७. दुर्बल घटक :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** गावातील गरीब व अनुसूचित जाती जमातीतील लोकांची ग्रामसभामधील उपस्थिती फार कमी असे. ग्रामविकास कार्यामध्ये किंवा गावातील सार्वजनिक कार्यक्रमामध्येही ते फारसे सहभागी होत नव्हते किंवा जरी उपस्थित असले तरी ते मोकळेपणाने आपली मते व अडचणी मांडत नव्हते. अजूनही अनेक दुर्बल घटकातील कुटुंबे आर्थिक कारणामुळे पाणी व शौचालय यासारख्या सुविधापासून वंचित होते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** गावातील गरीब व अनुसूचीत जाती जमातीतील लोकांचे प्रबोधन करून त्यांना जलस्वराज्याची माहिती दिल्यामुळे गावातील दुर्बल घटकातील लोकांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढली. जलस्वराज्याच्या विविध समित्यामध्ये दुर्बल घटकातील लोकांचा समावेश केला. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये दुर्बल घटकातील लोक सहभागी होऊ लागले. दुर्बल

घटकातील लोकांना विविध प्रशिक्षणाचा, पाणी, शौचालय, गटार व रस्ते या सोयी सुविधांचा लाभ होत आहे.

## ८. <u>आर्थिक लाभ</u> :-

- **जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी** निमशिरगाव गावच्या ग्रामपंचायतीला पाणी, गटार वगैरेसाठी अनुदान मिळाले होते पण त्याची माहिती गावातील लोकांना होत नसे. या अनुदानाचा वापर कसा करावा? याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार सामान्य लोकांना नव्हता. क्षमता बांधणी व महिला सक्षमीकरण या गोष्टीसाठी गावाला कधीही अनुदान मिळाले नव्हते.
- **जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर** ग्रामविकासासाठी आलेल्या सर्व अनुदानाची माहिती गावात डिजीटल बोर्ड, नोटीस बोर्डच्या माध्यमातून व ग्रामसभामधून ग्रामस्थांना दिली जाऊ लागली. अनुदानाच्या वापराबाबत ग्रामस्थांच्या मताचा आदर करून बहुमताने निर्णय घेण्यात येऊ लागले.

**गावाला खालील विविध गोष्टीसाठी अनुदान मिळाले त्याचा तपशील**

| अ.क्र. | अनुदान तपशील | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ (क्षमता बांधणी) | ३,७४,८00=00 |
| २. | उपप्रकल्प २ (गावकृती आराखडा शासन अनुदान ९0%) | १,१६,७८,000=00 |
| ३. | उपप्रकल्प ३ (महिला सक्षमीकरण) | १,८३,000=00 |
| ४. | जमा लोकवर्गणी (१0) | १३,३७,५१६=00 |
| ५. | प्रोत्साहन अनुदान | ६,९९,३00=00 |
| | **एकूण** | **१,४२,७२,६१६=00** |

## ❖ जलस्वराज्य प्रकल्पाच्यासंबंधी वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या बातम्या

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून व राज्य शासनाच्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाअंतर्गत इ.स.२००३ पासून संपूर्ण राज्यात जलस्वराज्य प्रकल्प कार्यान्वित होऊन त्याच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली. कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत मात्र सन २००४-०५ मध्ये या प्रकल्पाला मंजूरी मिळून तो कार्यान्वित झाला. या प्रकल्पाचे गावातील प्रत्येक नागरिकाला शुध्द व पुरेसे पाणी देणे, निर्णय प्रक्रियेत सर्वांना सहभागी आणि लोकांच्या सवयीमध्ये परिवर्तन करणे ही प्रमुख उद्दिष्टे होती.

कोल्हापूर जिल्हयामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली. प्रकल्पित गावांना क्षमता बांधणी उपप्रकल्पासाठी अनुदान मंजूर झाले. सुरूवातीला ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प समिती सहाय्यकारी संस्था व शासकीय अधिका-यांच्या मार्फत कोपरासभा व ग्रामसभा आयोजित केल्या जाऊ लागल्या. महिलांच्यासाठीही स्वतंत्र बैठका कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. यामुळे गावागावात एक विकासात्मक वातावरण निर्माण होऊ लागले आणि वर्तमानपत्रामधून गावातील बदलांच्या सकारात्मक बातम्याही प्रसिध्द होऊ लागल्या.

प्रकल्पाच्या पुढील टप्प्यामध्ये गावांना पाणीपुरवठा व इतर सोयी सुविधासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात अनुदान मंजूर झाले व प्रत्यक्षात कामालाही सुरूवात झाली. अर्थातच कोल्हापूर जिल्हयातील प्रकल्पित गावातील जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी कशी सुरू आहे. या बाबत शोधप्रबंधाच्या ४ थ्या आणि ५ व्या प्रकरणामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाने काय परिवर्तन झाले किंवा कोणत्या उणिवा दिसून आल्या याचा प्रत्यक्ष वस्तुनिष्ठ अभ्यास करून वैज्ञानिक पध्दतीने मांडणी केलेली आहे. पण याचबाबतीत वृत्तपत्रातून ज्या उलटसुलट बातम्या आल्या त्यातील काही बातम्यांचा येथे उल्लेख केलेला आहे.

१. **'बहिरेवाडीच्या जलस्वराज्य योजनेत गैरव्यवहार'**

[दै.लोकमत दि.२४-४-२००७]

या मथळयाखालील बातमीमध्ये प्रकल्पित गावातील काही ठराविक मंडळीच समितीतील इतर सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी पध्दतीने प्रकल्प चालवित आहेत. गावसभा न बोलविता गावसभा झाल्याचे खोटे प्रोसेडिंग तयार केले जात आहे.

तसेच पाईपलाईन काही ठिकाणी अर्ध्या फूटावर टाकली आहे अशा तक्रारी ग्रामस्थांनी केलेल्या असून याची चौकशी व्हावी अशी जिल्हाधिका-याकडे मागणी केली.

२. **'लोकवर्गणीअभावी तीन गावचे जलस्वराज्य प्रकल्प अडचणीत'**

[दै.तरूणभारत दि. २-४-०८]

या बातमीमध्ये जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी गावाला शासनाने मंजूर केलेल्या कृती आराखडयाच्या एकूण अनुदानाच्या १० टक्के रक्कम लोकवर्गणीच्या स्वरूपामध्ये भरणे आवश्यक असते. पण कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प सुरू असलेल्या एकूण ११५ गावापैकी हातकणंगले तालुक्यातील कबनूर व कोरोची तर भुदरगड तालुक्यातील पळशिवणे या तीन गावांनी शासनाने वेळोवेळी सूचना, नोटीसा व मुदतवाढ देऊनही लोकवर्गणी भरलेली नाही. त्यामुळे १५ एप्रिल २००८ पर्यंत जर या गावांनी लोकवर्गणी भरली नाही तर ही गावे या प्रकल्पातून वगळली जाणार आहेत. असे सांगितले आहे.

३. **'दहा फूट पाईप बिल मात्र वीस फुटांचे'**

[दै.पुढारी २५/१२/०८]

सदर बातमीमध्ये जिल्हयात प्रकल्प राबवित असताना जनमाणसातून कोणकोणत्या तक्रारी येत आहेत. याचा कोणत्याही गावाचा उल्लेख न करता ऊहापोह केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जलस्वराज्य प्रकल्प कालावधी १८ महिन्याचा असून त्याची चार टप्प्यात विभागणी केलेली आहे व प्रत्येक टप्प्यातील कामाच्या स्वरूपानुसार व पूर्ततेनुसार अनुदान रक्कम उचल करावयाची असतानाही अनेक गावामधील काम दुस-या व तिस-या टप्प्यात असतानाच रक्कम मात्र चारही टप्प्यांची उचलली गेली. पाईप कोणत्या कंपनीची असावी? पाईपलाईन किती खोल असावी? याबाबत निश्चित नियम असतानाही अनेक ठेकेदारांनी पाईप प्रत्यक्षात हलक्या प्रतीची वापरली आणि बिल मात्र चांगल्या दर्जाच्या पाईपचे घेतले. तसेच नियमानुसार एक मीटर खोल खुदाई करून त्यामध्ये पाईपलाईन टाकायची असते. पण बहुतांशी ठिकाणी पाईप अगदी कमी खोलीवर टाकूनही बिल मात्र एक मीटर खोल खुदाईचे घेतले आहे. तसेच प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारच्या तक्रारी राहू नयेत म्हणून शासनाने तांत्रिक सेवा पुरवठादारांची नियुक्ती केलेली असली तरी तेही जबाबदारीने वागत नसल्यामुळे या प्रकल्पांना आणखी मुदतवाढ दिली तरीही हा प्रकल्प पूर्ण होईल की नाही याबाबत शंका असल्याचे सांगितले आहे.

४.  'कुंभोजमध्ये जलस्वराज्य योजनेचा बोजवारा'

[ दै.सकाळ दि.१५ जानेवारी २०१० ]

या बातमीमध्ये जलस्वराज्य प्रकल्प १८ महिन्याचा असताना कुंभोजमधील प्रकल्पाच्या पूर्णतेला २ वर्षे जास्त लागल्याचे म्हटले आहे. तसेच जॅकवेलपासून ते पाणी साठवण टाकीपर्यंत ३२०० मीटर पाईपलाइन टाकण्यासाठी ३५ लाख ७० हजार रूपये खर्च करण्यात आले आहेत. पण तरीही या मुख्य पाईपलाईन  वरील एअरव्हॉल्व्हपैकी पाच एअरव्हॉल्व्हना आणि पाणी साठवण टाकीजवळही गळती राहिली असल्याचे म्हटले आहे. या गळतीबाबत तांत्रिक सेवा पुरवठादार व ठेकेदारांशी ग्रामपंचायतीमार्फत संपर्क साधला असतो ते उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे म्हटले आहे.

वरील बातम्याप्रमाणेच 'अध्यक्षाकडून जलस्वराज्यच्या अधिका-यांची खरडपट्टी' [दै.तरूण भारत दि.३/२/०९] 'बाचणीचा जलस्वराज्य प्रकल्प अपूर्णावस्थेत' [दै.लोकमत दि.२०-४-०९] 'जलस्वराज्य प्रकल्प कामाची चौकशी करा, साखरीत ग्रामस्थांच्या बैठकीत मागणी' [दै.पुढारी दि.१३-०९-०९] यासारख्या बातम्याही वृत्तपत्रामधून  वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या आहेत. पण या बातम्या प्रसिध्द झाल्यानंतर व जनतेतून मोठया प्रमाणात उठाव आणि शासनाकडून चौकशी झाल्यामुळे कितीतरी गावातील प्रश्न सुटून जलस्वराज्य प्रकल्प पूर्ण झाल्याचे खालील काही बातम्यावरून दिसून येते.

उदा. 'महाराष्ट्रातील सर्वात मोठा कवनूरचा जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्वाला आला.स्वच्छ शुध्द व मुबलक पिण्याच्या पाण्याचे ग्रामस्थांचे स्वप्न पूर्ण झाले'. [दै.सकाळ दि.६ मे.२०१०] 'कुंभोज येथील जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्वास' [दै.पुढारी दि.२५ फेब्रु.२००९]

वरील सर्व बातम्या व इतर प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या आढावा घेतला असता जलस्वराज्य प्रकल्प राबवित असताना व जलस्वराज्य समितीतील पदाधिकारी निवडत असताना झालेले वाद, लोकवर्गणी जमा करण्यामधील ग्रामस्थांची उदासिनता, ठेकेदाराकडून होणारी फसवणूक, कामाच्या दर्जाबाबत शंका, पैसेखाऊवृत्ती, शासकीय अधिका-यांच्यामधील हलगर्जीपणा वगैरे बाबी जरी समोर आल्या असल्या तरी आजपर्यंत राबविलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना त्याला मिळालेले यश व लोकांच्यामधील जागृती याची आणि जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वीतेची तुलना केली असता हा प्रकल्प पूर्वीच्या

योजनांच्या तुलनेत कितीतरी अधिक यशस्वी झालेला आहे. असेच म्हणावे लागेल. कारण या प्रकल्पामुळे गावागाावात ग्रामसभेबाबत झालेली जागृती, महिलांचे सक्षमीकरण, निर्मलग्राम योजनची यशस्वीता, तरूणांचा व दुर्बल घटकांचा ग्रामविकास कार्यातील वाढता सहभाग या बावी शक्य झाल्या.

या सर्वांचे फलित म्हणूनच जागतिक बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित असणा-या जगभरातील सर्व प्रकल्पामधून 'पीपल फस्ट ॲवार्ड' नावाने दिला जाणारा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार महाराष्ट्र राज्यातील जलस्वराज्य प्रकल्पाने पटकाविला आहे. [दै.सकाळ दि.२९/१/१0] त्याचबरोबर जलस्वराज्य प्रकल्प यशस्वी राबविण्याच्या बाबतीत कोल्हापूर जिल्हा परिषद राज्यात पहिली आणि आघाडीवर असल्याचे निर्दशनास आल्यानेच हा आदर्श अन्य जिल्हयांनी घ्यावा. म्हणून कोल्हापूर जिल्हा परिषदेला जलस्वराज्य प्रकल्प कसा राबविला. याची मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्याच्या सूचना प्रकल्प संचालक श्री.निपून विनायक यांनी दिल्या. (दै.सकाळ दि.२१-४-२0१0).

प्रकरण ६ वे

# गोषवारा

## प्रकरण ६ वे

# गोषवारा

'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प : समाजशास्त्रीय अभ्यास' हा संशोधन विषय शोधप्रबंधासाठी निवडला असून या शोधप्रबंधाची एकूण ७ प्रकरणामध्ये विभागणी केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये शोधप्रबंधातील प्रत्येक प्रकरणाचा अगदी थोडक्यात गोषवारा मांडलेला आहे.

शोधप्रबंधाच्या **<u>पहिल्या प्रकरणामध्ये</u>** संशोधकाने दुय्यम स्त्रोतांच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे भारतातील शेती व्यवसाय, वाढती लोकसंख्या यांची पाण्याची गरज आणि अलिकडील एक दोन दशकामध्ये पावसाचे घटते प्रमाण यांचा आढावा घेतला आहे.

गेल्या काही वर्षापासून भारताला भेडसावणारा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व शासनाने त्यावर योजलेले उपाय यांचा अभ्यास करीत असताना विविध तज्ञांनी पाणी प्रश्नाबाबत मांडलेली मते, पाण्याच्या भिषणतेची करून दिलेली जाणीव व पाणी योजना राबवित असताना भारतीय शासन यंत्रणेतील त्रुटींचाही विचार केलेला आहे.

महाराष्ट्र राज्यातील पिण्याचे पाणी व स्वच्छता हया प्रश्नाचा आढावा घेत असताना शासनाने स्वातंञ्यानंतरच्या काळात ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी आजपर्यंत केलेले प्रयत्न, राबविलेल्या योजनाा व त्यासाठी केलेला खर्च याचा आढावा घेण्यात आला तो थोडक्यात असा -

- सन १९६0 ते २00२ पर्यंत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर रू. १६,६00 कोटी खर्च.
- २८५00 ग्रामपंचायतीत ३.६0 लाख योजना
- १९९७ ते २000 काळात १६.६१ लाख शौचालये बांधली व ३0,000 किलोमीटर गटार बांधकाम केले.
- पिण्याच्या पाण्यासाठी २0,000 किलोमीटर लांबीच्या विंधन विहिरी खोदल्या.
- पिण्याच्या पाणी योजनेतील विविध यंत्रणेतील १७,४८0 कर्मचा-यांच्या पगारासाठी वर्षाला रू. १५३ कोटी खर्च.

वरील सर्व प्रयत्न करून देखील २000 साली महाराष्ट्र राज्यातील पाणी समस्या खालीलप्रमाणे होती.

- २८५०० ग्रामपंचायतीमधील ८६६८१ मनुष्यवस्त्यापैकी २५५०० वस्त्यांना पुरेसे पाणी (प्रतिदिनी, प्रतिमाणसी ४० लीटर) मिळत नाही.
- दरवर्षी सरासरी २०,००० वस्त्यांना पाणी टंचाईची झळ.
- दरवर्षी सरासरी ५५०० वस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा.
- दरवर्षी टंचाईच्या तात्पुरत्या उपाययोजनावर सरासरी रू.१०० कोटी खर्च.

- **वरील योजनेच्या अपयशाची कारणे -**

१. शासनावर अवलंबून राहण्याची जनतेची सवय.

२. सन १९६० नंतरच्या शासनाच्या पुरवठा आधारीत कार्यक्रमामध्ये जनतेची मागणी किंवा जनतेची गरज विचारात न घेता योजना दिल्या जात असल्यामुळे योजनांच्याबद्दल जनेतमध्ये आपलेपाणाची भावना नसल्यामुळे त्यांचा सहभाग मिळत नसे.

आजपर्यंत राबविलेल्या पिण्याच्या पाणी योजनांच्या यशापयशाचा आढावा घेऊन राज्यातील पिण्याचे पाणी व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने २७ जुलै २००० च्या शासन आदेशान्वये मागणी आधारीत व लोकसहभागातून ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेचे धोरण स्विकारले.

- **नवीन धोरणानुसार राज्यात सुरू असलेले प्रमुख कार्यक्रम -**

**अ) पाणी पुरवठा -**

१. स्वजलधारा

२. आपलं पाणी

३. शिवकालीन पाणी साठवण योजना

४. जलस्वराज्य

**ब) स्वच्छता -**

१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

२. संपूर्ण स्वच्छता अभियान

३. हागणदारी हटाव

४. निर्मलग्राम पुरस्कार

नवीन धोरणानुसार राज्यात शासनाने सुरू केलेल्या पाणी पुरवठयाच्या अनेक प्रकल्पापैकी जागतिक बॅकेने अर्थसहाय्य केलेला 'जलस्वराज्य' हा एक महत्वाचा प्रकल्प

आहे. संशोधकाने संशोधनासाठी 'जलस्वराज्य' हाच प्रकल्प घेतला असल्यामुळे या प्रकल्पाची थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

- **<u>जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी</u> -**

जागतिक बॅकेच्या सुचनेनुसार महाराष्ट्र शासनाने राज्यातील ठाणे, उस्मानाबाद व सातारा या तीन जिल्हयातील ३० पथदर्शी ग्रामपंचायतीमध्ये प्रथमतः हा प्रकल्प राबविला. प्रकल्प राबवित असताना आलेले अनुभव व अडचणी विचारात घेऊन त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून एकूण राज्यासाठी प्रस्तावित प्रकल्पाचा आराखडा ठरविण्यात आला.

१. <u>जिल्हयांची निवड व निकष</u> -

जलस्वराज्य हा प्रकल्प दि. ३१/१२/२००३ ते दि. ३०/०९/२००९ या पूर्वनियोजित कालावधीनुसार राज्यातील २६ जिल्हयात राबविण्यात आला. तथापि तो सर्व जिल्हयात एकदम सुरू झालेला नाही. या प्रकल्पासाठी जिल्हयांची निवड करीत असताना शासनाने खालील महत्वाचे निकष विचारात घेतलेले आहेत. ते म्हणजे जिल्हयातील पिण्याचे पाणी, टंचाईची तीव्रता व गुणवत्ता बाधित गावे, मागासवर्गीय व आदिवासींचे जिल्हयातील प्रमाण, जिल्हयात सुरू असलेले संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व यशवंत ग्रामसमृध्दी योजना इ.

राज्य शासनाच्या लोकसहभागावर आधारीत वरील योजनांच्या माध्यमातून त्या जिल्हयामध्ये झालेल्या कामाचे प्रमाण याचा संपूर्ण विचार करून गुणानुक्रमे पहिल्या टप्प्यात ९ जिल्हे व या जिल्हयांची प्रगती पाहून दुस-या टप्प्यात १७ जिल्हयांची निवड करण्यात आली.

२. <u>जलस्वराज्य प्रकल्पाचा उद्देश</u> -

- ✓ गावातील प्रत्येकाला शुध्द व पुरेसे पाणी नियमित मिळावे व स्वच्छता सुविधा मिळावी.
- ✓ वैयक्तिक , घरगुती व परिसर स्वच्छता सवयीमध्ये बदल करून गावातील लोकांचे आरोग्य सुधारणे.
- ✓ गरीब लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे.
- ✓ प्रकल्पामध्ये महिलांना सहभागी करून घेऊन त्यांचे सक्षमीकरण करणे. महिलांचा क्षमता विकास करणे.
- ✓ गावातील लोकांच्या गरजा जाणून घेऊन, निधीचा योग्य वापर करून गावपातळीवरील यंत्रणा कार्यान्वित करणे.

३ . <u>जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम</u> -

- निर्णय प्रक्रियेत गावातील नागरिकांचा क्रियाशील सहभाग आवश्यक .
- प्रकल्पामध्ये पारदर्शकता ठेवणे .
- प्रकल्पाचे नियोजन, व्यवस्थापन, अंमलबजावणी व देखरेख करणे वगैरे सर्व जबाबदारी ग्रामस्थांची राहील .
- गावामधील महिला, पिडीत व अनुसूचित जाती-जमातींचा प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यात समावेश असेल .

४ . <u>प्रकल्पातील टप्पे</u> -

जलस्वराज्य प्रकल्पाचे चार टप्प्यामध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे .

- नियोजन
- मूल्यमापन
- अंमलबजावणी
- देखभाल व दुरूस्ती

५ . <u>प्रकल्पचक्र</u> -

जलस्वराज्य प्रकल्पातील उपक्रमांची अंमलबजावणी एका ठराविक क्रमानुसार व टप्प्याटप्प्याने होते .

**गावपातळीवरील टप्पे**

| अ . क्र . | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ . | नियोजन | ६ महिने |
| २ . | अंमलबजावणी | ९ महिने |
| ३ . | देखभाल दुरूस्ती | ३ महिने |
| | एकूण | १८ महिने |

६ . <u>ग्रामपंचायत (गाव) निवडीचे निकष</u> -

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी गावांनी जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर संबंधित कार्यालयाकडून खालील निकषांच्या आधारे त्या गावांची निवड केली जाते .

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| १. | सद्याची पाणी उपलब्धता | २५ |
| २. | पाणी अशुध्दता (नैसर्गिक व मानवनिर्मित) | २५ |
| ३. | दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या प्रमाण | १० |
| ४. | मागासवर्गीय लोकसंख्या प्रमाण | १० |
| ५. | आदिवासी लोकसंख्या प्रमाण | १० |
| ६. | सद्याची पाणीपट्टी वसूली | ०५ |
| ७. | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, शिवकालीन पाणी साठवण योजना, महात्मा फुले जलअभियान, यशवंत ग्रामसमृध्दी इ. योजनेतील लोकसहभाग | ०५ |
| ८. | भूजल अधिनियम अंमलबजावणी | १० |
| | एकूण | १०० |

७. <u>जलस्वराज्य प्रकल्प अंमलबजावणीसाठी गाव पातळीवरील यंत्रणा</u> -

प्रकल्पासाठी गावाची निवड झाल्यानंतर त्या गावात ग्रामसभेमार्फत गावातीलच लोकांच्या विविध समित्या स्थापन करून प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाते त्या समित्या खालीलप्रमाणे.

- ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती
  उपसमित्या - अ) खरेदी समिती
  ब) हिशोब समिती
  क) देखरेख समिती
- महिला विकास समिती
- सामाजिक लेखा परिक्षण समिती
- बहुग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती
- आदिवासी पाडा व पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

**<u>दुस-या प्रकरणामध्ये</u>** संशोधकाने आपल्या 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प ः समाजशास्त्रीय अभ्यास' या संशोध्य अध्ययनाशी निगडीत आणि उपयुक्त असे जे ग्रंथ, एम.फिल.चे लघुशोधप्रबंध, सदर प्रकल्पाविषयी शासनाकडून वेळोवळी प्रसिध्द होणारी परिपत्रके, प्रकल्पाविषयीची शासनाकडून लेकराज्य या मासिकातून प्रसिध्द होणारी माहिती, इतर मासिके व वर्तमान पत्रातून येणारे वेगवेगळया तज्ज्ञांचे लेख व प्रसिध्द होणारी प्रकल्पाविषयीची माहिती अशा विविध स्त्रोताचा / लिखित साहित्याचा अवलंब केलेला आहे.

शोधप्रबंधाच्या **<u>तिस-या प्रकरणामध्ये</u>** संशोधनासाठी निवडलेल्या समस्येविषयी आणि संशोधन पध्दतीविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

**<u>अ) पध्दतीशास्त्र</u> -**

**१. अध्ययन विषयाची निवड -**

महाराष्ट्र शासनाने राज्याच्या स्थापनेपासून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी कोटयावधी रूपये खर्च केले. पण तरीदेखील शासनाला त्यामध्ये अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे सन २००२ पासून 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' हे नवीन घोषवाक्य घेऊन मागणी आधारीत व लोकसहभाग या धोरणानुसार शासनाने राज्यात स्वजलधारा, आपलं पाणी, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, संपूर्ण स्वच्छता अभियान व जलस्वराज्य प्रकल्प यासारखे अनेक प्रकल्प सुरू केले. शासनाने धोरणामध्ये बदल करून राज्यामध्ये अनेक प्रकल्प सुरू केल्यानंतर त्याला गावातील लोकांचा प्रतिसाद कसा मिळत आहे? गावातील पाणी व स्वच्छता वगैरे प्रश्न सोडविण्यामध्ये या प्रकल्पांना कितपत यश मिळत आहे? याचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने नमुना दाखल त्यापैकी 'जलस्वराज्य प्रकल्पाची' निवड केली आहे. हा 'जलस्वराज्य प्रकल्प' जरी महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये राबविला जात असला तरी अध्ययनाच्या सोईसाठी कोल्हापूर जिल्हा निवडलेला आहे.

**२. अध्ययन विषयाची उद्दिष्टये -**

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी २७ जुलै २००० च्या बदलत्या धोरणानुसार राज्यामध्ये स्वजलधारा, शिवकालीन पाणी पुरवठा योजना, आपले पाणी व जलस्वराज्य यासारखे अनेक प्रकल्प सुरू केले. त्यापैकी संशोधकाला 'जलस्वराज्य' हा प्रकल्प जिव्हाळयाचा व अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचा

वाटल्यानेच त्यांनी 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प : समाजशास्त्रीय अभ्यास' हा अभ्यासविषय निवडला आहे व हा अभ्यास करण्यासाठी काही महत्वाची उद्दिष्टये समोर ठेवण्यात आलेली आहेत ती खालीलप्रमाणे -

- जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सहभागी झालेल्या गावामधील प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या पूर्वीची व नंतरची परिस्थिती अभ्यासणे.
- जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील वाडी-वस्तीवरील लोकांना शुध्द व पुरेसे पाणी मिळाले का? याचा अभ्यास करणे.
- जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावामध्ये घर व परिसर स्वच्छता राखण्यास यश मिळाले का? हे पाहणे.
- जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाले का? याचा अभ्यास करणे.
- गावातील गरीब व दुर्बल घटक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होतात का? याचा अभ्यास करणे.
- जलस्वराज्य प्रकल्पातील शासनाची भूमिका अभ्यासणे.
- जलस्वराज्य प्रकल्पाचे यशापयश अभ्यासणे.

**३. गृहितकृत्ये -**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील २६ जिल्हयामध्ये 'जलस्वराज्य प्रकल्प' कशापध्दतीने राबविला आहे? त्याला कितपत यश मिळाले आहे? वगैरे बाबींचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने नमुना निवड पध्दतीने कोल्हापूर जिल्हयाची निवड केली व निरीक्षण आणि मुलाखत अनुसूचीच्या आधारे तथ्यसंकलित करून खालील कांही महत्वाची गृहितकृत्ये मांडली आहेत.

१. शासकीय योजनांच्याबद्दल ग्रामीण जनतेमध्ये जागृती आणि आपुलकी निर्माण करण्यास हा प्रकल्प यशस्वी झालेला आहे.

२. या प्रकल्पामुळे ग्रामसभांना बळकटी आलेली आहे.

३. गावातील गटतट, हेवेदावे कमी होऊन विकास कामात लोकांचा सहभाग वाढण्यास मदत झालेली आहे.

४. गावामध्ये शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा आणि स्वच्छता होण्यास मदत झालेली आहे.

५. या प्रकल्पामुळे गावातील महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत झालेली आहे.

६. या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी-शिक्षक, तरूण मंडळे, महिला बचत गट, सहकारी संस्थांचा मोलाचा वाटा आहे.

७. हा प्रकल्प परिपूर्ण करण्यासाठी शासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आहे.

**४. अध्ययन क्षेत्र -**

जलस्वराज्य प्रकल्प हा महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये राबविला जात आहे. पण संशोधक हा कोल्हापूर जिल्हयातील असल्याने जिल्हयातील निवडलेल्या विविध गावांशी संपर्क ठेवणे. श्रम, वेळ व पैशाच्या दृष्टीने सोयीचे असल्याने अध्ययन क्षेत्र म्हणून कोल्हापूर जिल्हयाची निवड केलेली आहे.

**ब) <u>तथ्य संकलन</u> -**

**१. नमुना निवड -**

संशोधकाने आपला अध्ययन विषय अतिशय वस्तूनिष्ठपणे अभ्यासण्यासाठी समाजशास्त्रामध्ये ज्या अनेक वैज्ञानिक अभ्यासपध्दती आणि अध्ययन तंत्रे उपलब्ध आहेत त्यापैकी नमुना निवडतंत्राचा अवलंब केलेला आहे. अभ्यासाला एक वैज्ञानिक रूप देण्याच्या आणि योग्य न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून नमुना निवड तंत्रातील सहेतुक यादृच्छिक नमुना निवड अभ्यासपध्दतीचा अवलंब करून तथ्यसंकलन केलेले आहे. या सहेतुक निवड पध्दतीचा अवलंब करून नमुना निवड केलेली आहे.

महाराष्ट्रातील २६ जिल्हयामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू असला तरी संशोधक स्वत: कोल्हापूर जिल्हयातील रहिवाशी असल्याने सोयीस्कर यादृच्छिक नमुना निवड तंत्राचा अवलंब करून कोल्हापूर जिल्हयाची निवड केली आहे. कोल्हापूर जिल्हयातील १२ तालुक्यामधील ११५ गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू आहे. या सर्व १२ तालुक्यातील ११५ गावामधून अभ्यासाला योग्य न्याय मिळावा यादृष्टीने २२%(२१.७३%) प्रमाणे २५ खेडयांची सहेतुक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली.

शासनाने जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबविण्यासाठी जी यंत्रणा निर्माण केलेली आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेमधील शासकीय अधिकारी, सहाय्यकारी संस्था पदाधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, जलस्वराज्य प्रकल्पाच्या प्रमुख तीन समितीचे पदाधिकारी, हिशोबनीस, ग्रामदूत याचबरोबर महिला आणि दुर्बल घटक हे सर्व घटक अभ्यासातील उत्तरदाते असून

ज्या घटकांची सदस्य संख्या अधिक आहे त्यांच्यामधून सहेतूक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने समप्रमाणात उत्तरदात्यांची निवड करून त्यांच्याकडून माहिती संकलित केलेली आहे.

**क) <u>तथ्यसंकलनाचे स्त्रोत</u> -**

संशोधकाने आपल्या अध्ययन विषयासंबंधी तथ्यसंकलनासाठी प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोताचा अवलंब केलेला आहे.

१. **<u>प्राथमिक स्त्रोत</u> ः-**

अध्ययन विषयाशी निगडीत मुलाखत अनुसूचीच्या आधारे आणि प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे तथ्य संकलीत करण्यात आलेली आहेत. याचप्रमाणे चर्चा आणि स्वैर मुलाखतीद्वारेही अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी छायाचित्राचाही वापर केलेला आहे.

२. **दुय्यम स्त्रोत ः-**

दुय्यम स्त्रोतामध्ये १.ग्रंथ २.शासकीय परिपत्रके ३.प्रकल्प अहवाल ४.माहिती पुस्तिका ५.संशोधन नियतकालीके ६.ग्रामपंचायत कार्यालय अहवाल ७.वृत्तपत्रातील लेख ८.अप्रकाशित शोधप्रबंध ९.इंटरनेटद्वारे मिळविलेली माहिती इ. लिखित साधन सामुग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**<u>शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये</u>** संशोधनासाठी निवडलेल्या कोल्हापूर जिल्हयातील २५ गावामधील जलस्वराज्य प्रकल्पाची अंमलबजावणी व प्रकल्पाबाबतच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे सविस्तर विश्लेषण केलेले आहे.

सदर प्रकरणामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाच्या सुरूवातीपासून ते अंमलबजावणीपर्यंत सहभागी असणारे शासकीय व स्थानिक पातळीवरील अधिकारी व इतर घटकांच्या विविध प्रतिक्रिया तसेच या प्रकल्पामुळे घडून आलेल्या परिवर्तनाविषयीची मते यांचा उहापोह खालीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

१. **<u>शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया</u> -**

कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये जलस्वराज्य विभागाकडे कार्यरत असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यापैकी प्रातिनिधिक स्वरूपामध्ये दोन अधिकाऱ्यांच्याकडून प्रकल्पासंदर्भात ज्या प्रतिक्रिया घेतल्या त्यापैकी महत्वाच्या प्रतिक्रिया अशा -

➢ **ग्रामस्थांच्या प्रतिसादाविषयी ः-**

जलस्वराज्य प्रकल्पाला ग्रामस्थांचा प्रतिसाद अतिशय समाधानकारक मिळाला असल्याचे दोन्हीही शासकीय अधिका-यांनी मत व्यक्त केले.

➢ **प्रकल्पाच्या कालावधीविषयी** ः-

जलस्वराज्य प्रकल्पाच्या निर्धारीत कालावधीबाबत (१८ महिने) दोन्ही अधिकाऱ्यांच्यामध्ये मतभिन्नता असल्याचे दिसून आले. त्यामध्ये एका अधिकाऱ्यांनी जलस्वराज्य प्रकल्पासाठी निर्धारीत कालावधी पुरेसा आहे असे सांगितले तर दुसऱ्या अधिकाऱ्यांने हा कालावधी ३0 महिन्यांचा असावा असे मत मांडले.

➢ **पाणीपट्टीविषयी** ः-

पाणीपट्टी १00% वसूल होण्यासाठी दोन्हीही शासकीय अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीनी १) महिला बचत गटाकडे पाणीपट्टी वसूलीचे काम दयावे, २) दर महिन्याला पाणीपट्टी वसूल करावी, ३) पाणी वापरासाठी वैयक्तिक मीटर पध्दतीचा अवलंब करावा व ४) पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर ताबडतोब कडक कारवाई करावी असे सांगितले.

२. <u>सहाय्यकारी संस्थाप्रमुखांच्या प्रतिक्रिया</u> -

कोल्हापूर जिल्हयामधील जलस्वराज्य प्रकल्पाकडे कार्यरत असणाऱ्या ९ सहाय्यकारी संस्थाप्रमुखापैकी ५ सहाय्यकारी संस्थाप्रमुखांच्या महत्वाच्या विषयावरील प्रतिक्रिया खालीलप्रमाणे -

➢ **ग्रामस्थांच्या प्रतिसादाविषयी** :-

जलस्वराज्य प्रकल्पाला प्रत्येक गावामधून ग्रामस्थांचा अतिशय चांगला प्रतिसाद असल्याचे ४ संस्थाप्रमुखांनी सांगितले तर एका संस्थाप्रमुखाने ग्रामस्थांच्या प्रतिसादाविषयी असमाधान व्यक्त केले.

➢ **प्रकल्पाच्या कालावधीविषयी** :-

यासंदर्भात ४ संस्थाप्रमुखांनी जलस्वराज्य प्रकल्पाच्या निर्धारीत कालावधीमध्ये वाढ करण्याची गरज असल्याचे सांगितले तर एका संस्थाप्रमुखांनी असणारा कालावधी पुरेसा असल्याचे सांगितले.

- **ऐक्यभाव वाढीविषयी :-**

ऐक्यभावाच्याबाबतीत ३ सहाय्यकारी संस्थाप्रमुखांनी जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबवित असताना ग्रामस्थांच्यामध्ये ऐक्यभाव वाढण्यास मदत झाली असल्याचे मत व्यक्त केले तर २ संस्थाप्रमुखांनी जलस्वराज्यमुळे ऐक्यभाव वाढीस फारसे यश आलेले नाही असे सांगितले .

- **लोकवर्गणीविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्पाच्या लोकवर्गणीमध्ये सर्व ग्रामस्थांचा सहभाग असल्याचे ३ संस्थाप्रमुखांनी सांगितले तर २ संस्थाप्रमुखांनी लोकवर्गणीमध्ये काही ग्रामस्थ सहभागी झाले नसल्याचे सांगितले .

३ . <u>ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती पदाधिकारी</u> -

संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावामधील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या ५० अध्यक्ष - सचिवांच्या विविध विषयावर ज्या प्रतिक्रिया दिल्या त्यापैकी महत्वाच्या प्रतिक्रिया -

- **महिलांच्या सहभागाविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्पाची गावामध्ये अंमलबजावणी करीत असताना महिलांचा सहभाग अतिशय समाधानकारक होत असे ५० पैकी ४८ पदाधिका-यांनी मत व्यक्त केले .

- **सहाय्यकारी संस्थांच्या सहकार्याविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबवित असताना ३८ पदाधिकाऱ्यांनी सहाय्यकारी संस्थेच्या सहकार्याबद्दल समाधान तर १२ पदाधिकाऱ्यांनी असमाधान व्यक्त केले .

- **प्रकल्पाच्या कालावधीविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्पासाठी निर्धारीत कालावधी (१८महिने) योग्य असल्याचे १३ पदाधिकाऱ्यांनी सांगितले तर ३७ पदाधिकाऱ्यांनी प्रकल्पाचा कालावधी वाढविण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले .

४ . <u>महिला विकास समिती पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया</u> -

संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावामधील महिला विकास समितीच्या ५० अध्यक्ष व सचिवांच्या विविध विषयावरील महत्वाच्या प्रतिक्रिया -

➢ **स्त्रियांच्या दर्जाविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबविला गेल्यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारण्यास मदत झाल्याचे महिला विकास समितीच्या ३५ पदाधिकाऱ्यांनी सांगितले. ०२ पदाधिकाऱ्यांनी या प्रकल्पाची स्त्रियांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली नसल्याचे तर १३ पदाधिकाऱ्यांनी काही प्रमाणात मदत झाल्याचे सांगितले.

➢ **राजकीय गटतटाविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्प गावामध्ये राबविला गेल्यामुळे गावातील राजकीय गटतट कमी झाल्याचे २८ महिला विकास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. ०५ पदाधिकाऱ्यांनी प्रकल्पामुळे गावातील गटतट कमी झाले नसल्याचे तर १७ पदाधिकाऱ्यांनी गावातील काही प्रमाणात गटतट कमी झाले असल्याचे सांगितले.

➢ **मानधनाविषयी :-**

जलस्वराज्य प्रकल्पाची गावामध्ये अंमलबजावणी करीत असताना महिला विकास समितीच्या सदस्यांना थोडेफार मानधन असले पाहिजे अशी ४० पदाधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली तर १० पदाधिकाऱ्यांनी मानधनाची आवश्यकता नसल्याचे सांगितले.

५. **सामाजिक लेखा परीक्षण समिती पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया** -

संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावामधील सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या ५० अध्यक्ष व सचिवांच्या प्रतिक्रिया

➢ **महिला सहभागाविषयी :-**

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या ३५ पदाधिकाऱ्यांनी जलस्वराज्य प्रकल्प कार्यात व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग समाधानकारक असल्याचे तर १५ पदाधिकाऱ्यांनी समाधानकारक नसल्याचे सांगितले.

➢ **जलस्वराज्य प्रकल्पाच्या पारदर्शकतेविषयी :-**

याबाबतीत ४४ पदाधिका-यांनी गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प राबवित असताना प्रकल्पाच्या कामात पारदर्शकता आढळली असे मत व्यक्त केले तर ६ पदाधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या कामातील पारदर्शकतेबाबत असमाधान व्यक्त केले.

➢ **प्रकल्पाच्या लाभाविषयी :-**

सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या ४४ पदाधिकाऱ्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाचा लाभ गावातील सर्व घटकांना मिळाला असल्याचे सांगितले तर ०६ पदाधिकाऱ्यांनी गावातील काही घटकांना प्रकल्पाचा लाभ मिळाला नसल्याचे सांगितले.

६. **<u>ग्रामदूतांच्या प्रतिक्रिया</u> -**

जलस्वराज्य प्रकल्प काळात ग्रामविकासाच्या प्रक्रियेत स्थानिक पातळीवर ग्रामस्थांना सल्ला व मार्गदर्शन निरंतरपणे उपलब्ध होण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्येक गावात ग्रामसभेमध्ये ग्रामदूतांची निवड केली जाते. अशा प्रत्येक गावातील २ ग्रामदूत याप्रमाणे संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावातील ५० ग्रामदूतांच्या ज्या प्रतिक्रिया आहेत त्या खालीलप्रमाणे -

➢ **ग्रामस्वच्छतेतील ग्रामस्थांच्या सहकार्याविषयी :-**

एकूण २५ गावामधील ४९ ग्रामदूतांनी जलस्वराज्य प्रकल्पकाळात ग्रामस्वच्छतेसाठी ग्रामस्थांचे चांगले सहकार्य मिळाल्याचे सांगितले तर केवळ एकच ग्रामदूताने ग्रामस्वच्छतेबाबत असमाधान व्यक्त केले.

➢ **सांडपाण्याच्या निचरा पध्दतीविषयी :-**

२५ गावामधील ४५ ग्रामदूतांनी गावातील सांडपाणी गटारीद्वारे गावाबाहेर सोडले जात असल्याचे सांगितले. ५ ग्रामदूतांनी सांडपाण्याचा शेतीसाठी व परसबागासाठी वापर केला जात असल्याचे सांगितले.

➢ **उघडयावरील हागणदारीविषयी :-**

२५ गावामधील ३४ ग्रामदूतांनी गाव हागणदारीमुक्त झाल्याचे सांगितले तर १६ ग्रामदूतांनी अद्याप काही प्रमाणात गावात हागणदारी असल्याचे सांगितले.

७. **<u>दुर्बल घटकांच्या प्रतिक्रिया</u> -**

जलस्वराज्य प्रकल्पाचे लाभ दुर्बल घटकांच्यापर्यंत पोहचले का? हे अभ्यासण्यासाठी संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावामधील दुर्बल घटकातील ५० उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियाः-

- **महिला बचत गटाविषयी :-**

अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामधील ५० उत्तरदात्यापैकी ३८ उत्तरदाते किंवा उत्तरदात्यांच्या कुटुंबातील महिला बचत गटात सहभागी होत्या त्या ३८ मधील २१ कुटुंबातील महिलांनी हया केवळ जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधनामुळे बचत गटामध्ये सहभागी झाल्याचे सांगितले.

- **वाढीव पाणीपट्टीविषयी :-**

दुर्बल घटकातील ५० उत्तरदात्यापैकी २५ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर किती पाणीपट्टी (वाढीव पाणीपट्टी) भरावी लागणार याची माहिती नसल्याचे सांगितले तर २५ उत्तरदात्यांनी वाढीव पाणीपट्टीबद्दल पूर्ण माहिती असल्याचे सांगितले.

- **मीटर पध्दतीविषयी :-**

दुर्बल घटकातील ५० उत्तरदात्यामधील ४२ उत्तरदात्यांनी मीटर पध्दती असली पाहिजे असे मत व्यक्त केले तर ८ उत्तरदात्यांनी मीटरपध्दतीला विरोध दर्शविला.

- **गावातील सुधारणाविषयी :-**

दुर्बल घटकातील ४७ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावात विविध सुधारणा झाल्याचे सांगितले तर ३ उत्तरदात्यांनी सुधारणा झाली नसल्याचे सांगितले.

८. **<u>महिला सक्षमीकरणाविषयी महिलांच्या प्रतिक्रिया</u>** -

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये महिला सक्षमीकरणावर अधिक भर दिला असल्यामुळे या प्रकल्पाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न व त्याचा महिलांना झालेला लाभ याचा संशोधकाने आढावा घेण्यासाठी २५ गावामधील ५० महिला उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया घेतल्या त्यापैकी काही महत्त्वाच्या प्रतिक्रिया ः

- **ग्रामसभामधील उपस्थितीविषयी :-**

निवडलेला ५० महिला उत्तरदात्यापैकी ३० उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीही व प्रकल्पानंतरही ग्रामसभांना उपस्थित राहत असल्याचे सांगितले तर १८ महिला उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पाच्या प्रबोधनामुळेच आपण ग्रामसभांना उपस्थित राहत असल्याचे सांगितले तर २ महिला उत्तरदात्यांनी ग्रामसभांना उपस्थित रहात नसल्याचे सांगितले.

➢ **पाणी व शौचालयाविषयी :-**

५० महिला उत्तरदात्यापैकी ४९ महिलांनी पाणी व शौचालयाचा पूर्णपणे प्रश्न सुटला असल्याचे सांगितले.

➢ **प्रशिक्षणाविषयी :-**

संशोधनासाठी निवडलेल्या ५० महिला उत्तरदात्यापैकी ३५ महिला उत्तरदात्यांनी विविध प्रशिक्षणाचा लाभ घेतल्याचे सांगितले. तर १५ महिलांनी प्रशिक्षण घेतले नसल्याचे सांगितले.

➢ **स्पर्धेतील सहभागाविषयी :-**

५० महिला उतरदात्यापैकी जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी केवळ ५ महिला उत्तरदात्या स्पर्धेत सहभागी होत होत्या पण जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर ३६ महिला उत्तरदात्यांनी आपण स्पर्धेमध्ये सहभागी होत असल्याचे सांगितले.

**शोधप्रबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये** संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावांना वारंवार भेटी देऊन ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती व सामाजिक लेखा परीक्षण समितीचे पदाधिकारी हिशोबणीस आणि ग्रामदुत यांच्याकडून मुलाखत अनुसूचीव्दारे माहिती संकलित केली तसेच गावात महिला सक्षमीकरणांतर्गत झालेल्या कामाची माहिती घेण्यासाठी प्रत्येक गावातील दोन महिलांच्याकडून आणि दुर्बल घटकांना मिळालेल्या लाभासंदर्भात माहिती घेण्यासाठी गावातील दुर्बल घटकातील दोन व्यक्तींच्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली. याशिवाय संशोधकाने गावातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या स्वैर मुलाखती घेऊन व काही प्रत्यक्ष निरीक्षणाव्दारे माहिती संकलित केली.

सदर संकलित केलेल्या माहितीव्दारे या प्रकरणात २५ गावातील जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची स्थिती व जलस्वराज्य प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतरची स्थिती याचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. यामध्ये सुरूवातीला गावाचे आकारमान लक्षात घेण्यासाठी लोकसंख्या, ग्रामपंचायतीमधील सोयीसुविधा, सरपंच, उपसरपंच वगैरेबाबत माहिती दिली व नंतर गावातील पाणी व्यवस्थापन, आरोग्य, महिला सक्षमीकरण, दुर्बल घटक व आर्थिक लाभ हया विविध घटकांचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे.

**शोधप्रबंधाच्या सातव्या प्रकरणामध्ये** 'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प : समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर वैज्ञानिक अभ्यास पध्दतीने आणि

वस्तुनिष्ठपणे अभ्यास करून जी तथ्ये संकलित केली, संकलित केलेल्या तथ्यांच्या विश्लेषणाच्या आधारे अभ्यासांती जे निष्कर्ष निदर्शनास आले ते सर्व निष्कर्ष सविस्तर रूपाात न मांडता जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत असणाऱ्या महत्वाच्या उद्दिष्टांशी निगडीत आहेत म्हणून त्या वेगवेगळया उद्दिष्टांचा फक्त उल्लेख करण्यात आलेला आहे. अर्थात ते निष्कर्ष खालील महत्वाच्या संदर्भातीलच आहेत.

- **निष्कर्ष -**

अ) पाणी व्यवस्थापनासंबंधी

ब) स्वच्छता आणि आरोग्यासंबंधी

क) महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकासंबंधी

ड) एकूण प्रकल्पासंबंधी

सदर शोधप्रबंधामध्ये संशोध्य अध्ययन विषयाचा अभ्यास केल्यानंतर जे निष्कर्ष प्राप्त झाले त्या निष्कर्षाचा अतिशय सुक्ष्म आणि वस्तुनिष्ठपणे अभ्यास केल्यानंतर वरील निष्कर्षामधील प्रत्येक मुद्दयांच्या संदर्भात ज्या त्रुटी, दोष किंवा या प्रकल्पांतर्गत विविध सहभागी घटकांच्यामध्ये समन्वयाच्या संदर्भात आणि गावपातळीवरील ग्रामस्थ, शासकीय अधिकारी आणि शासन यांच्याविषयीच्या असणाऱ्या अपेक्षा गृहीत धरून सदर शोधप्रबंधामध्ये महत्वपूर्ण शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

अ) पाणी व्यवस्थापनाविषयी

ब) स्वच्छता आणि आरोग्याविषयी

क) महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकाविषयी

ड) इतर शिफारशी

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या शिफारशी हया जलस्वराज्य प्रकल्प अधिक यशस्वी होण्यासाठी दृष्टीने ग्रामीण भागातील पाणी, आरोग्य, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि दुर्बल घटक यांच्यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने ग्रामस्थ, शासकीय अधिकारी आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये हया प्रकल्पाविषयी किती आपलेपणा वाटतो. हा प्रकल्प किती जिव्हाळयाचा आहे आणि हया संदर्भात ग्रामस्थ, शासकीय अधिकारी आणि शासन यांच्या नेमक्या भूमिका कशा असायला हव्यात आणि त्या भूमिकांच्यामध्ये योग्य पध्दतीने समन्वय साधने किती आवश्यक आणि गरजेचे आहे या संदर्भातीलही शिफारशी करण्याात आलेल्या आहेत.

प्रकरण ७ वे

# निष्कर्ष व शिफारशी


७.१ प्रस्तावना

७.२ निष्कर्ष

- ७.२.१ पाणी व्यवस्थापनासंबंधी
- ७.२.२ स्वच्छता आणि आरोग्यासंबंधी
- ७.२.३ महिला सक्षमीकरण व दुर्बल घटाकासंबंधी
- ७.२.४ एकूण प्रकल्पासंबंधी

७.३ शिफारशी

- ७.३.१ पाणी व्यवस्थापनाविषयी
- ७.३.२ स्वच्छता आणि आरोग्याविषयी
- ७.३.३ महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकाविषयी
- ७.३.४ इतर शिफारशी

## प्रकरण - ७ वे

# निष्कर्ष व शिफारशी

## ७.१ प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा , दुर्बल घटक व महिलांचे सक्षमीकरण व्हावे आणि विशेष म्हणजे स्वच्छता आणि आरोग्याच्या बाबतीत सुधारणा व्हावी म्हणून राज्यामध्ये 'जलस्वराज्य प्रकल्प' हा एक अभिनव उपक्रम सुरू केला. शासनाचा हा नवीन उपक्रम अभ्यासल्यानंतर संशोधकाला तो विषय जवळचा वाटल्याने या विषयावर पीएच.डी. साठी संशोधन करावयाचे ठरविले आणि अतिशय परिश्रमपूर्वक संशोधन पूर्ण केले.

'कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प ः समाजशास्त्रीय अभ्यास' हा संशोधनाचा विषय असून या विषयाला अनुसरून वैज्ञानिक अभ्यास पध्दतीने आणि वस्तुनिष्ठपणे जी तथ्ये संकलित केली त्यांचे विश्लेषण केले. या एकूण तथ्यांच्या विश्लेषणातून संशोधकाने अभ्यासाअंती आपल्या संशोधनातून जे निष्कर्ष मांडले ते सर्व एकत्रित न मांडता पाणी व्यवस्थापन, स्वच्छता व आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि दुर्बल घटक यासंबंधी स्वतंत्रपणे मांडून या विषयाचे महत्व स्पष्ट केले.

## ७.२ निष्कर्ष :-

### ७.२.१ पाणी व्यवस्थापनासंबंधी

१. संशोधनासाठी जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निवडलेल्या २५ गावापैकी पारदेवाडी (तालुका - भुदरगड) हे गाव वगळता सर्वच्या सर्व म्हणजे २४ गावांना नियमित शुध्द आणि पुरेसे पाणी मिळू लागले.

२. लोकांना पाणी टंचाईचे गांभीर्य आणि पाण्याचे महत्व समजल्याने त्याचा ते जपून वापर करू लागले.

३. जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीपेक्षा प्रकल्प सुरू झाल्यानंतर गावातील पाणीपट्टी वसूली समाधानकारक होऊ लागली.

४. विशेष म्हणजे पाणीपट्टी वसूलीचे काम पूर्वीपासून ग्रामपंचायतीकडेच होते. पण जलस्वराज्य प्रकल्पामध्ये हे काम गावातील महिला बचत गटाकडे असावे अशी अपेक्षा होती. तथापि रेंदाळ (ता.हातकणंगले) या गावामध्ये केवळ पाणीपट्टी बिल घरोघरी पोहचविण्याचे काम महिला बचत गटाकडे दिले आहे. परंतु इतर कोणत्याही गावाने

पाणीपट्टी बिल घरी पोहचविण्याचे किंवा वसूलीचे काम महिला बचत गटाकडे दिल्याचे आढळले नाही .

७ . २ . २ स्वच्छता आणि आरोग्यासंबंधी

१ . जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर ग्रामस्वच्छता अभियानामध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या २५ गावामधील तरूण मंडळे, महिला बचत गट, अंगणवाडी व शाळामधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्याबाबतीत महत्वाचे योगदान दिल्याचे आढळून आले .

२ . मुलांना लहानपणापासूनच स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लागाव्यात म्हणून अंगणवाडी व शाळामधून विविध प्रकारे प्रबोधन केले जात असल्याचे आढळले .

३ . जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत २५ गावामध्ये पाण्याचे महत्व व त्याचा वापर, स्वच्छता व आरोग्य आणि महिला सक्षमीकरण याचे लोकांना चांगले ज्ञान होण्यासाठी व्याख्याने, घोषवाक्ये, भित्तीपत्रके, प्रभातफेरी, माहितीपट, पथनाटय आणि गणेशोत्सवातील देखावे इ . मार्गांनी प्रबोधन करण्यात येत असल्याचे आढळले .

४ . संशोधनासाठी निवडलेल्या २५ गावामध्ये सर्व प्रकारच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर न करता ते सांडपाणी गटारीद्वारे गावाबाहेरील ओढा व नाल्यात सोडल्याचे आढळले .

५ . जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर स्वच्छता आणि आरोग्याच्या संदर्भातील प्रबोधनाचा प्रभाव पडून २५ गावामध्ये ११0९१ वैयक्तिक तर २७५ सार्वजनिक शौचालये बांधली . सर्वच्यासर्व गावे निर्मलग्राम झाल्यामुळे शासनाचे बक्षीस तर मिळालेच पण त्याचबरोबर गावातील रोगराईचे प्रमाणही कमी झाल्याचे आढळले .

७ . २ . ३ महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकासंबंधी

१ . संशोधकाने निवडलेल्या २५ गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर ५४४ नवीन महिला बचत गटांची वाढ होऊन ती संख्या ९४९ वर जाऊन पोहचली .

२ . जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत दिल्या गेलेल्या विविध व्यवसाय प्रशिक्षणाचा २५ गावातील ३५६७ महिलांनी लाभ घेतला असून त्यापैकी ५४७ महिला छोटा - मोठा व्यवसाय करीत असल्याचे आढळले .

३ . जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत मिळालेल्या बीज भांडवलाचा लाभ घेऊन २५ गावातील सर्वच बचत गटातील महिला प्रामुख्याने म्हैसपालन, शिवणकाम, शेळीपालन असे वैयक्तिक व्यवसाय करीत असल्याचे आढळले .

४. जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांच्यामध्ये धाडस व एकसंघपणा निर्माण झाल्याने कसबा सांगाव (ता.कागल) व भादवण (ता.आजरा) च्या महिलांनी गावात दारूबंदी यशस्वी केली.

५. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या प्रबोधनाचा व अभ्यासदौ-याचा प्रभाव म्हणून दुर्बल घटक, सर्वसामान्य महिला व पुरूषांची ग्रामसभेतील उपस्थिती वाढून ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियमध्ये ते सहभागी होऊ लागले हेच या प्रकल्पाचे यश म्हणावे लागेल.

### ७.२.४ <u>एकूण प्रकल्पासंबंधी</u>

१. जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी शासनाच्या मार्गदर्शनात्मक भूमिकेबाबत व सहकार्याबाबत ग्रामस्थांच्या आणि विशेषता महिलांच्या प्रतिसादाबद्दल शासकीय अधिकारी आणि जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यासाठी गावाला मदत व्हावी म्हणून निर्माण केलेल्या सहाय्यकारी संस्थेच्या भूमिकेबाबत ग्रामस्थ व शासकीय अधिकारी समाधानी असल्याचे दिसून आले.

२. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत २५ गावापैकी २४ गावामधील ग्रामस्थ आर्थिक व्यवहाराबाबत व प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत समाधानी असल्याचे आढळले.

३. जलस्वराज्य प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी महाराष्ट्र शासनाने जो १८ महिन्याचा कालावधी निश्चित केलेला आहे तो एकूण हया प्रकल्पाचा आवाका लक्षात घेता फारच कमी असल्याचे निदर्शनास आले.

## ७.३ <u>शिफारशी</u>

संशोधकाने निवडलेल्या संशोधन विषयाचा अभ्यास करून जे निष्कर्ष मांडलेले आहेत. त्या निष्कर्षाच्या आधारेच जलस्वराज्य प्रकल्पाच्या संदर्भात सर्व पातळीवर ज्या काही त्रुटी आढळल्या किंवा दोष आढळले ते विचारात घेऊन हा प्रकल्प सर्व पातळीवर यशस्वी व्हावा आणि शासनाचा या संदर्भात जो विकासात्मक हेतु आहे तो पूर्ण व्हावा हया उददेशानेच वेगवेगळया घटकांच्याबाबतीत खालील महत्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत.

### ७.३.१ <u>पाणी व्यवस्थापनाविषयी</u> :-

१. अनेक गावामध्ये एकच कर्मचारी पाणी पुरवठा कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी व

ग्रामपंचायत शिपाई म्हणून देखील काम करीत असल्याचे आढळले. पण एकच कर्मचारी सर्व भूमिकांना योग्य न्याय देऊ शकत नाही. म्हणूनच गावाच्या लोकसंख्येनुसार प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करणे गरजेचे आहे.

२. गावाला पाणीपुरवठा करणा-या टाकीची स्वच्छता वेळोवेळी केली पाहिजे.

३. प्रत्येक गावामध्ये पाणी शुध्दीकरणाची प्रगत व अद्ययावत सुविधा असणे गरजेचे असून त्यासाठी शासनाने अनुदान द्यावे. तसेच पाणी शुध्दीकरण केंद्र चालविण्यासाठी ग्रामपंचायतीने प्रशिक्षित कर्मचारी नेमावा.

४. प्रत्येक गावातील शाळांना, शासकीय कार्यालयांना व सहकारी संस्थाना इमारतीवरील पावसाचे पाणी साठवण योजनेची कडक अंमलबजावणी करण्याची सक्ती तसेच गावाच्या लोकसंख्येच्या निकषावर नालाबंडीग, वनराई बंधारे बांधण्याची व वृक्षारोपण करण्याची जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत अट घालावी.

५. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणा पुरेशी नाही तर त्यासाठी सेवाभावी सामाजिक संस्था, संघटना व व्यक्ती यांनी पुढे येऊन ग्रामीण पातळीवर जलसाक्षरता, पुनर्भरण, जलप्रदूषण, पाणलोटक्षेत्र विकास, पाण्याचा गैरवापर टाळणे, भूजल उपशावर बंदी घालणे इ. विषयावर गावामध्ये प्रबोधनात्मक चर्चा, परिसंवाद आणि कार्यशाळा आयोजित कराव्यात.

६. गावाची पाणी योजना दीर्घकाळ चालण्यासाठी ग्रामस्थांना नियमित, निश्चित वेळेत शुध्द व पुरेसे पाणी देणे, मीटर पध्दती राबविणे, पाणीपट्टी महिन्यातून किंवा जास्तीत जास्त ३ महिन्यातून महिला बचत गटांच्या माध्यमातून वसूल करणे व पाणीपट्टी वेळेत न भरणाऱ्यावर ताबडतोब कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच पाणीपट्टी १००% वसूल होण्यासाठी नियमित किंवा वर्षाची पाणीपट्टी अगोदर देणाऱ्यांना सवलत द्यावी.

७. स्वतंत्र नळजोडणी घेण्याबाबत ग्रामस्थांचे प्रबोधन केल्यास व सार्वजनिक नळजोडणी पूर्णपणे बंद केल्यास पाण्याची नासाडी थांबेल व ग्रामपंचायतीचे उत्पन्नही वाढेल.

### ७.३.२ स्वच्छता आणि आरोग्याविषयी

- **सांडपाणी**

१. गावातील सांडपाणी विहीर, तलाव व खाणीमध्ये मिसळणार नाही याची नागरिकांनी खबरदारी घेऊन पाण्याची जुनी स्त्रोते वापरात आणली पाहिजे.

२. महाराष्ट्र शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीला बंदिस्त गटारीसाठी व सांडपाण्यावर प्रक्रिया

करून त्या पाण्याच्या पुनर्वापरासाठी ९0% अनुदान दिल्यास व त्यामध्ये ग्रामस्थांनी १0% लोकवर्गणी जमा केल्यास गावातील रोगराईचे प्रमाण खूपच कमी होईल.

■ <u>स्वच्छता</u>

१. प्रत्येक ग्रामपंचायतीने गावाच्या आकारमानानुसार जागोजागी कचरा कोंडाळया ठेऊन त्या कचऱ्यापासून गावात एक आदर्श गांडूळखत प्रकल्प राबवावा.

२. गावातील शिक्षणसंस्था, तरूण मंडळे व महिला बचत गटांनी पुढाकार घेऊन गावात वृक्षारोपण व ग्रामस्वच्छता श्रमदानातून करावे तर प्लॅस्टिकबाबत जागृती, जलसंवर्धन, कचरा निर्मूलन, दारूबंदी इ. उपक्रम प्रबोधनाच्या माध्यमातून राबवावेत.

३. सार्वजनिक शौचालये, मुतारी व जनावरांच्या गोठयातील मलमूत्र गटारीत न सोडता ते शोषखड्डयात मुरविणे किंवा त्याची योग्य ती विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

४. गावातील सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यामध्ये प्लॅस्टिक कागद टाकणे, दारूच्या रिकाम्या बाटल्या टाकणे किंवा सिगारेट व बिडी ओढून त्याचे थोटक व गुटख्याच्या पुडया टाकल्याने शौचालये व मुताऱ्या तुंबून दुर्गंधी सुटते. त्यामुळे त्यांचा वापर होत नाही. म्हणून शौचालये व मुताऱ्या स्वच्छ ठेऊन त्याचा वापर वाढण्यासाठी व लोकांचे एकूण आरोग्यमान सुधारण्यासाठी गावात प्लॅस्टिक बंदी, दारूबंदी, धूम्रपानबंदी व गुटखा बंदीसारखे उपक्रम प्रभावीपणे राबवावेत.

### ७.३.३ <u>महिला सक्षमीकरण व दुर्बल घटकांविषयी</u>

■ **महिला सक्षमीकरण**

१. जलस्वराज्य प्रकल्पकाळात गावात सुरू असलेल्या महिला बचत गटांचे बळकटीकरण व नवीन बचत गटांची जी स्थापना झाली ते बचत गट कायमस्वरूपी सक्रिय राहण्यासाठी व त्यामध्ये सातत्याने वाढ होत राहण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

२. गावामध्ये स्थापन झालेल्या महिला बचत गटांना जलस्वराज्य प्रकल्पानंतरही शासनाने प्रेरणा व मार्गदर्शन केले पाहिजे.

३. प्रत्येक गावामध्ये पाणीपट्टी वसूलीचे काम महिला बचत गटाकडेच असले पाहिजे अशी शासनाने सक्ती केल्यास व बचत गटातील महिलांनीही धाडसाने ती जबाबदारी घेतल्यास गावाची पाणीपट्टी १00% वसूल होईलच पण त्याचबरोबर गावातील इतर महिला बचत गटही अशा स्वरूपाच्या कामाची जबाबदारी घेण्यास पुढे येतील.

४. जलस्वराज्य प्रकल्पकाळात स्थापन झालेली महिला विकास समिती ही केवळ प्रकल्प काळापुरतीच मर्यादीत न राहता ती पुढेही कार्यरत राहावी तसेच या समितीच्या माध्यमातून गावातील महिलांच्यामध्ये सांघिक भावना निर्माण करणे, महिलांच्या समस्यांची सोडवणूक करणे व त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती व लाभ मिळवून देणे ही कामे केली पाहिजेत, त्यासाठी शासनाने व ग्रामपंचायतीनेही महिला विकास समितीला सातत्याने प्रेरणा दिली पाहिजे.

▪ **दुर्बल घटक**

१. प्रत्येक गावातील आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या घटकांनी एकजूट करून शासनाच्या विविध विकासात्मक योजनांचा लाभ घेतला पाहिजे.

२. दुर्बल घटकातील सुशिक्षित लोकांनी त्यांच्यासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची माहिती करून घेऊन त्याचा लाभ स्वत: बरोबरच इतरांनाही कसा मिळेल यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

३. दुर्बल घटक आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्यासाठी त्यांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

४. राजकीयदृष्टया सबल होण्यासाठी व स्वत: चा विकास स्वत: करून घेण्यासाठी गावागावातील आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या घटकांच्यामध्ये एकजूट निर्मा ण होऊन त्यांच्यामधून एक चांगले नेतृत्व उदयास आले पाहिजे.

### ७.३.४ इतर शिफारशी

१. गावातील जागृत व जाणकार स्त्री-पुरूषांना घेऊन राळेगणसिध्दी, हिवरेबाजार (जिल्हा - अहमदनगर) यासारख्या ग्रामविकासामध्ये आदर्श ठरलेल्या गावांना भेटी दिल्या पाहिजेत व तेथील उपक्रमांची आपल्या गावात अंमलबजावणी केली पाहिजे.

२. ग्रामस्थांना जास्तीत जास्त बायोगॅस शौचालय बांधण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे इंधनासाठी होणारी वृक्षतोड थांबेल आणि पावसाचे पाणी मुरण्यासाठी मदत होईल.

३. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत सर्व गावातील अंतर्गत रस्ते जलवाहिन्यासाठी खणले गेल्याने ते उखडले जातात पण ते रस्ते परत दुरूस्त होत नाहीत म्हणून महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पांतर्गत रस्ते दुरूस्तीसाठी अनुदानाची स्वतंत्र तरतूद करावी.

# संदर्भ ग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची


- **ग्रंथ**

१. भोंगळे सुधीर, २००५, विकासवाटा, सुशांत प्रकाशन पुणे.

२. देसाई दत्ता, २००५, जलयुध्द की जलक्रांती ? लोकवाङ:मय गृह.मुंबई.

३. धाराशिवकर मुकूंद, २००५, दुष्काळ भेडसावतोय ? उपाय तुमचे - तुमचेच पाणी!

४. गौतम एस.जी.संपादक २००४, प्रश्न पाण्याचा, आपल्या सर्वांचा, साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर - १२.

५. घारे मुकूंद, २०००, सहभागीय पाणलोट क्षेत्र विकास हस्तग्रंथ, अफार्म प्रकाशन, पुणे.

६. हजारे आण्णा, २००२, माझे तीर्थ, राळेगणसिध्दी परिवार प्रकाशन, राळेगणसिध्दी.

७. जगदाळे अनिलराज, २००४, पेटलेले पाणी-पेटणारे पाणी, सुमेरू प्रकाशन, टिळकनगर डोंबिवली - पूर्व.

८. मिश्र अनुपम [ अनुवादक - प्रदिप भलगे ] २००३ तलावांची भारतीय परंपरा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

९. मोरवंचीकर रा.श्री.२००६, भारतीय जलसंस्कृती, सुमेरू प्रकाशन टिळकनगर, डोंबिवली पूणे.

१०. शहा सुरेखा, २००६, महाराष्ट्राचे जलनायक, सुमेरू प्रकाशन.डोबिंवली.

११. वारघडे सुरेशचंद्र, २००३ , हिवरे बाजारची यशोगाथा, हिवरेबाजार परिवार प्रकाशन, हिवरेबाजार.

१२. Ahuja Ram, 2001, Research methods Rawat Publication, Jaipur.

१३. Rajvaidya Neelima and Markanday Dilip Kumar, 2005, Water Kulbhushan Nagina. A.P.H. Publishing Corporation, New Delhi.

- **मासिके**

१. भांडवलकर आर बी जलव्यवस्थापन काळाची गरज योजना [जून २००७] प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय नवी मुंबई.

२. चौधरी संदिपकुमार, महिलांच्या सशक्तीकरणात शिक्षणाची भुमिका, योजना [डिसेंबर २००६] नवी मुंबई.

३. देशपांडे पदमभूषण, पाण्याच्या समान वाटपासाठी भूजल कायदा, लोकराज्य [मे.२००८] माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई.

४. धुमाळ विश्वास, प्रबोधनाचे यश, लोकराज्य ,[जून २००७] मुंबई.

५. कदम संजय, गावागावात सारं, निर्मलतेचं वारं, लोकराज्य [नोंव्हेंबर२००७] मुंबई.

६. कर्वे ग.ल.जलव्यवस्थापनातील नवे शोध, योजना [जून २००६] नवी मुंबई.

७. काळे दिलीप, जलसमस्या स्वरूप व उपाय योजना [ऑगस्ट २००६] नवी मुंबई.

८. खेडकर गोवर्धन, पर्यावरण प्रदुषणाचा विळख्यात, योजना [डिसेंबर २००६] नवी मुंबई.

९. महाले व भांदे, जलसाक्षरता आवश्यक, जलसंवाद ,[डिसेंबर २००८] दत्ता देशकर व प्रदिप चिटगोपेकर प्रकाशन, औरंगाबाद.

१०. मुळे सुरेखा, महिला विकासाची त्रिसूत्री, लोकराज्य, [नोव्हेंबर २००७] मुंबई.

११. पाटील आर.आर.ग्रामस्वच्छतेची नवी परंपरा, लोकराज्य,[नोव्हेंबर २००७]मुंबई.

१२. राजपूत धोंडीराम पाण्याचा थेंब थेंब वाचवू या, योजना [ऑगस्ट २००६] मुंबई.

१३. संजीवकुमार किमया लोकसहभागाची, लोकराज्य [जून २००७] मुंबई.

१४. सुर्वे जी.पी.जलसंस्कृती आणि नियोजन, लोकराज्य [जून २००७] मुंबई.

१५. ठाकरे सुधीर, स्वच्छतेचा वेलू गेला गगनावरी, लोकराज्य [जून २००७] मुंबई.

१६. वसंत सुनिला, ग्रामीण पेयजल व मलनिस्सारण, योजना [जून २००६] मुंबई.

१७. झेंडे आर.पी.[संपादक] मिणचे खुर्दच्या महिलांची जलक्रांती, जलसंपदा [ऑगस्ट २००८] कोल्हापूर. अक्षर मुद्रणालय, जिल्हा परिषद,कोल्हापूर.

१८. Chkravarti A.K.Drinking water supply and sanitation decade in India Indian Journal of public health (Jan -mar-1991).

१९. D'Souza A.L., the International drinking water supply and sanitation Decade, yojana (June1985).

२०. Sanitation M.4.social change (March 1989).

- **शासकीय प्रकाशन**

१. 'जलस्वराज्य'पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.

२. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, ग्रामस्थांसाठी प्रकल्प कार्यावाहीची मार्गदर्शिका, जलस्वराज्य [ सप्टेंबर २००६ ].

३. शासन निर्णय क्र. जस्वप्र. २००३/प्र.क्र.३५५३/ मंत्रालय मुंबई ४०००३२.

- **शोधप्रबंध**

१. कदम राजेंद्र धोंडीराम, 'जलस्वराज्य अभियान ः लोकसहभागादवारे बोरपाडळे गावचा विकास ः एक समाजशास्त्रीय अभ्यास' जून २००९, एम.फिल., यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक.

२. कोनवडेकर कविता, जलसंरक्षण योजनेचा प्रभाव ः कोल्हापूर जिल्हयातील शिवकालीन पाणी साठवण योजनेचा अभ्यास, जून २००७, २००७, एम.फिल.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर .

३. पाटील शोभा, 'ग्रामीण महाराष्ट्रातील पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे अध्ययन,' डिसेंबर २००६, एम.फिल.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४. रामपुरे शीला, 'ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि त्यांचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली आणि कोल्हापूर जिल्हयातील दोन निवडक गावांचा अभ्यास,' डिसेंबर २००६ एम.फिल. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- **वर्तमानपत्रे**

दै. लोकसत्ता

१. बेंबळकर मिलिंद,पाणीपुरवठा योजना बंद का पडतात, दि.१७/०८/०९.

२. घोरपडे अभिजीत, रंग ढंग पाण्याचे, [सदर] पाण्याला पर्याय दि. १६/१२/०७.

३. कुलकर्णी प्रभाकर भारत निर्माण : केवळ स्वप्नच? दि.३०/०४/०८.

- **घोरपडे अभिजीत, याचे मरणासन्न नद्या या सदरामधील विविध लेख.**

४. मासेमारीवर कु-हाड अन् आरोग्याच्या समस्या दि. ०८/०५/०८.

५. 'दहामाही - बारमाही ते जेमतेम पाचमाही' दि. १२/०५/०८.

६. नाले ओढयांचे अस्तित्व संपविण्याचा उद्योग, दि. १३/०५/२००८.

७. कारण नदी वाहतच नाही. १४/०५/२००८.

८. नद्याबाबत लढणा-या कार्यकर्त्यांना ताकद हवीय. १६/०५/२००८.

९. दुष्काळ आणि महापूरावरील विजयाचा मंत्र.१७/०५/२००८.

- **मरणासन्न नद्या या सदरासाठीचे विविध मान्यवर तज्ज्ञांचे लेख**

१०. विखे - पाटील बाळासाहेब, नदी व पाण्याच्या प्रश्नावरून यादवीचा धोका, दि.२०/०५/२००८.

११. पाटील एन.डी., नदीच्या दुरावस्थेबाबत निवडणूकीत जाब विचारा, दि.२१/०५/२००८.

१२. प्रभू सुरेश, दुर्दैवाने नद्या व पाणी हे प्राधान्याचे मुद्दे नाहीत. दि.२२/०५/२००८.

१३. हजारे आण्णा, नशेत बेहोश सरकार, अन नद्या काठच्या गावांचा -हास. दि.२२/०५/२००८.

- <u>दै.सकाळ</u>

१. संपादकीय लेख - ग्रामस्वच्छतेवरही विकारांची छाया, दि.२५/०७/२००७.

२. पाटील विश्वास, कुठे पाण्याचा अतिवापर ः कुठे टंचाईचे चटके, दि.१०/०३/२००८.

३. साळूंखे सर्जेराव, जलव्यवस्थापन एक आव्हान, दि.२७/१२/२०००.

- **दै.ॲग्रोवन**

१. चव्हाण सुनिल, चिमुकल्या सिक्कीममध्ये स्वच्छतेचे नवे शिखर. दि.१९/१२/२००८.

२. हागे गोपाल व शीख मनजीत सिंग, सामूहिक अभयदानातून साधली कोटींच्या गावक-यांनी प्रगती, दि.३०/०७/२००९.

३. मिश्र उमाशंकर [ अनुवाद - कोनकर अनिकेत ], राजूखेडी गावाने मिळविले विकास कामादवारे नवे स्वातंत्र, दि.१५/०८/२००९.

४. पाटील एकनाथ, पाणी नियोजन ः कल करे सो आज, दि.०७/०७/२००९.

- **दै. पुढारी**

१. अन्सारी खलील, जलसिंचन, दि.२२/०३/२००९.

२. भोंगळे सुधीर, पेटलेले पाणी, दि.२,९,२३/०३/२००८.

३. रक्तवान रा.ना.निसर्गदत्त पाण्याचे योग्य उपयोजन, दि.३०/०८/२००९.

४. टाकळकर अनिल, स्वच्छ सुंदर शहराचे मारेकरी, दि.२३/०३/२००८.

- **दै.लोकमत**

१. पाटील रमेश, बचत गटाची चळवळ, महिलांना देतेय उभारी, दि.२०/०८/२००९.

- **संकेतस्थळे**

✓ www. Jalswarajya @ mahawssd.gov.in.

✓ www.mahawssd.gov.in.

✓ www.Google.com.

# परिशिष्टे

१. छायाचित्रे

२. घोषवाक्ये

३. मुलाखत अनुसूची

qáÊâÎà˜þ – 1

²þàuàâjØàç

## पाणी, स्वच्छता व आरोग्य


जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी उन्हातान्हात पाण्यासाठी स्त्रीयांना करावी लागणारी वणवण (मिणचे खूर्द, ता. भुदरगड)


पुरूषांच्या बरोबरीने श्रमदान करताना महिला (पिंपळवाडी, ता. राधानगरी)


पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ग्रामस्थांनी बांधला वनराई बंधारा (करंबळी, ता. गडहिंग्लज)


जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत विहीर जलस्त्रोताचे बांधकाम सुरू असताना (देसाईवाडी, ता. पन्हाळा)


नवीन साठवण टाकीचे बांधकाम सुरू असताना (कुंभोज, ता. हातकणंगले)


शुद्ध पाणी,उत्तम आरोग्य !
जलशुद्धीकरण केंद्र (रेंदाळ, ता. हातकणंगले)


जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांना ओ.टी.टेस्ट करून दाखविताना पाणीपुरवठा कर्मचारी (रेंदाळ, ता. हातकणंगले)


जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून दारात आलेल्या पाण्यामुळे आंनदी दिसणारी महिला



जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची पिण्याचे पाणी स्त्रोताभोवतालची अवस्था
(सातार्डे, ता. पन्हाळा)



तलाव जलपर्णीमुक्त करण्यामध्ये तरूणांचा सहभाग
(रेंदाळ, ता. हातकणंगले)




ग्रामस्वच्छतेत महिलांच्या बरोबरीने पुरूषांचा सहभाग
(चव्हाणवाडी, ता. पन्हाळा)



ग्रामस्वच्छतेत शालेय विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग
(करंबळी, ता. गडहिंग्लज)

## महिला सक्षमीकरण



गारमेंट प्रशिक्षण घेत असताना महिला
(रेंदाळ, ता. हातकणंगले)



विणकाम प्रशिक्षण घेत असताना महिला
(सरूड, ता. शाहुवाडी)



सखी महिला बचत गटाचा सॅनेटरी नॅपकीन प्रकल्प
(रेंदाळ, ता. हातकणंगले)



ओम गुरूदेव महिला बचत गटाचा शेवया उद्योग
(सुळकूड, ता. कागल)



बीजभांडवलातून स्वतंत्र व्यवसाय करणारी अन्नपुर्णा बचत गटातील महिला
(सुळकूड, ता. कागल)



महिलांनी एकजूटीने दारूदुकानाला ठोकले टाळे
(करंबळी, ता. गडहिंग्लज)

## विविध उपक्रमातील महिला सहभाग



स्त्री-पुरूष अभ्यासदौऱ्यासाठी उत्स्फूर्तपणे सहभागी होताना
(करंबळी, ता. गडहिंग्लज)



सुळकूड (ता. कागल) गावातील स्त्री-पुरूष कवठेपिराण (ता. मिरज) या
या आदर्श गावाला भेट देऊन उपक्रम समजावून घेताना



धावण्याच्या स्पर्धेतील सहभागी महिला
(पिंपळवाडी, ता. राधानगरी)



भर पावसात रंगलेली झिम्मा फुगडी स्पर्धा (मिणचे खुर्द, ता. भुदरगड)



संगीत खुर्ची स्पर्धेचा मुक्त आनंद लुटणाऱ्या महिला
(करंबळी, ता. गडहिंग्लज)

महिला ग्रामसभा



रात्रीच्या महिला ग्रामसभेसाठी उपस्थित महिला वर्ग
(माले, ता. पन्हाळा)



जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी महिला सज्ज
(करडवाडी, ता. भुदरगड)



दुर्बल घटकातील महिला धाडसाने व विश्वासाने आपले मत मांडताना
(कोवाड, ता. चंदगड)

## प्रबोधनात्मक कार्यक्रम



विद्यार्थ्यांनाही जलसाक्षरता व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देताना
(रेंदाळ, ता. हातकणंगले)



ग्रामस्थांच्याबरोबर चर्चा करून उद्‌भव निश्चित करताना
(कडगाव, ता. भुदरगड)



'स्वच्छतेतून समृद्धीकडे' पथनाट्याद्वारे प्रबोधन
(रेंदाळ, ता. हातकणंगले)




'लेक वाचवा ' प्रबोधनात्मक नाट्य सादर करताना ग्रामस्थ
(आंबवडे, ता.पन्हाळा)




जलस्वराज्य प्रकल्पावरील जमाखर्चाचा पारदर्शी कारभार
(माले, ता. पन्हाळा)




प्रबोधनासोबत कायद्याचाही आधार
(भादवन, ता. आजरा)

# परिशिष्ट क्र. २

## जलस्वराज्य प्रकल्पित गावामध्ये प्रबोधनासाठी वापरात आणलेली

## विविध घोषवाक्ये

१. लोकांच्या योजनेत शासनाचा वाटा, लोकसहभागाने कमी होईल घाटा

२. समित्या तीन, टप्पे चार, जलस्वराज्यात आहे एकतेचे सार

३. पाणीपुरवठा योजना गावाची, देखरेख जबाबदारी सर्वांची

४. जलस्वराज्याचे गाव आमुचे, निर्णय आमुचे, राज्य आमुचे

५. आमचे गाव, आमचेच राज्य  हेच तर आहे जलस्वराज्य

६. सर्वानी मिळून निर्णय घेऊ, लोकवर्गणी जमवून जलस्वराज्य राबवू

७. टेकडयांना खोदवा चर, पाणीसाठयात पडे भर

८. झाडे लावा, झाडे जगवा, पाणी वाचवा, पाणी मुरवा

९. बॅकेत ठेवता पैसे, व्याज मिळे खास
जिरवता जमिनीत पाणी, भूजल वाढे झकास

१०. गाऊ आम्ही आनंद गाणी, स्वच्छ गाव, शुद्ध पाणी

११. छतावरचे साठवता पाणी, अधिक काळ पुरेल पाणी

१२. पाणी राखाल, तर आरोग्य चाखाल

१३. पाणी आडवा, पाणी जिरवा

१४. आपला विकास आपणच करू, जलस्वराज्याला संगे धरू

१५. जे जे राहीले वंचित, पाण्यावाचून अखंडीत |
ते ते करू पुलकित, सर्वाआधी ||

१६. पाणी हे जीवन आहे ... तर स्वच्छता आरोग्य आहे

१७. आधी ग्रामसभा महिलांची, मग बारी पुरूषांची

१८. तहानलेल्या विहिरीला छतावरचे पाणी पाजले
उन्हाळयातल्या गरजेला ते पुरेपुर पुरले

१९. पााणीपट्टी भरता वेळच्यावेळी, पाणी नियमित मिळे दारी
२०. दुष्काळाची टाळण्या आपत्ती, काळजीपूर्वक वापरा जलसंपत्ती
२१. पाणीपट्टी भरता चटकन ,पाणी मिळे पटकन
२२. कास धरता जलस्वराज्याची ,लाट येईल समृद्धीची
२३. सर्वांनी मिळून निर्णय घेऊ, पारदर्शकतेने खर्च करू
२४. स्वच्छ गाव, शुद्ध पाणी, हीच खरी आनंदाची पर्वणी
२५. आमच्या गावचा एकच नारा, स्वच्छ ठेवू परिसर सारा
२६. 'जल'म्हणजे पाणी 'स्व'म्हणजे स्वच्छता, जलस्वराज्यात हवी गावाची एकता
२७. जलस्वराज्याचा विचार कानी पडला, लोकसहभागातून गाव विकास घडला
२८. स्वच्छता हमारा नारा है, जलस्वराज्य गाव हमारा है |
२९. उपयोगात आणू सांडपाणी, परसबागा फुलवू अंगणी
३०. शाळा असो वा घर, स्वच्छता हाच परमेश्वर
३१. शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुवा ,
संसर्ग आणि रोगराई पळवून लावा
३२. हागणदारी मुक्त गाव, आरोग्य, समृद्धीला वाव
३३. घरोघरी एकच नारा, शौचालय त्वरीत करा
३४. सोनखत बहूमोल !ं का करता मातीमोल?
३५. घर असो वा शाळा, पाण्याचा अपव्यय टाळा
३६. थेंबे थेंबे तळे साचे, भूगर्भातील पाणी वाचे
३७. थेंब थेंब पाण्याचा, लाखलाख मोलाचा
३८. झाडे लावू कशासाठी? भरपूर पाऊस पडण्यासाठी
३९. पावसाचे पाणी, गाते शुद्धतेची गाणी
४०. पाण्याचे साचवू तळे, फुलवू जीवन मळे
४१. वृक्षांचे रोपण , कृष्णमेघांना आमंत्रण
४२. जलप्रदूषण थांबवा ,स्वच्छ पाणी मिळवा
४३. निसर्गाने दिले जीवन ,त्याचा वापर करा जपून
४४. पाणी वाहते भराभरा ,वाहता नळ बंद करा
४५. नव्या युगाचा मंत्र नवा ,पाणी आडवा ,पाणी जिरवा

४६. पाणी आहे संजीवनी मंत्र ,सांभाळा त्याच्या वापराचे तंत्र

४७. तुमचा छोटासा निर्धार, धरणी राहील हिरवीगार

४८. साहित्य खरेदीच्या वेळी महिलांनी यावे, विश्वासाचे वारे गावात जावे

४९. लोक सहभागाने जलस्वराज्याचे काम झाले मोठे...
महिलांच्या सहभागाने कमी झाले तोटे...

५०. पाणी मिळता दारी ... पाणीपट्टी भरणार खरी ...

५१. बचत गटांनी घेतले करवसूलीचे कंत्राट, वसूली झाली भन्नाट

५२. गावात राहूनही गाव न समजलं
गाव नकाशा करता, गाव सारं उमगलं

५३. गाव विकासाच्या कार्यासाठी ग्रामसभा भरली
महिलांच्या सहभागाने अर्थपूर्ण ठरली ...

५४. उतू नका मातू नका जलस्वराज्याचा वसा टाकू नका ,
लोकसहभागाचे कर्तव्य विसरू नका

५५. उघडया हागणदारीचा त्रास भारी ,
आता तरी संडास बांधा आपल्या दारी...

५६. महिला सक्षमीकरणाची संधी ही नामी, जलस्वराज्याची हीच हमी ...

५७. ग्रामपंचायत आमची न्यारी , लोकांना देते माहिती सारी ...

५८. स्वच्छतेचा ध्यास बरा | आरोग्याचा मंत्र खरा ||

५९. मागू नका मिळवा | हक्क शुद्ध पाण्याचा |
स्वच्छ परिसराचा | निर्मळ शरीराचा ||

६०. एकजुटीचा मंत्र खरा | अविश्वासाला नको थारा ||

६१. चोख आणि खुला व्यवहार | नको ढिलाई नको अपहार ||

६२. तुम्हीच वापरा शक्ती तुमची | तुम्हीच घ्या लाभ पुरा |
हाच जलस्वराज्याचा मंत्र खरा ||

६३. ग्रामसुधारणेचा मुलमंत्र | सज्जनानी व्हावे एकत्र |
संघटना होये शक्तीचे सूत्र | ग्रामराज्य निर्माण करी ||

६४. ऐसे होता गाव आदर्शपूर्ण | शहराहूनही नंदनवन |
सर्वाचे ठरील आकर्षण | सुंदर जीवन ||

६५ . डोंब साचते ,पडती डेरे | ठीक करावे मार्गी सारे |
शौचगृह ही नव्या प्रकारे | निर्मावी सर्वासाठी ||

६६ . या कोवळया कळयांमाजी | लपले ज्ञानेश्वर, रवींद्र , शिवाजी |
विकासता प्रकटतील समाजी | शेकडो महापुरूष ||

६७ . ऐसी घरादारांची सुंदरता | आपणाचे आणावी स्वत: |
कोणीही डोळे भरोनी पाहता | प्रसन्न होती अंतरी ||

६८ . स्वच्छ सुंदर परिसर , जीवन निरोगी निरंतर ...

६९ . ग्राम देवतेला आमची आन... स्वच्छ , सुंदर गाव आमची शान ...

७० . स्वच्छ घर ,सुंदर परिसर , शोषखड्डयाचा करूया वापर

७१ . जैसे आपण स्नान करावे | तैसे गावही स्वच्छ ठेवित जावे |
सर्वच लोकांनी झिजुनी घ्यावे | श्रेय गावाच्या उन्नतीचे ||

७२ . मिळोनी करावी ग्रामसफाई | नाली मोरी ठायी ठायी |
हस्ते परहस्ते साफ सर्वही | चहुकडे मार्ग ||

७३ . गावचे मार्ग विष्ठेने व्यापले | आड कोने घाणींनी भरले |
ठायी ठायी उकिरडे साचले |गाव वेढले गोदरींनी ||

७४ . कशाला वाटे लाज शौचालय दारी आहे आज

७५ . येथेच पंढरी येथेच काशी , आम्ही आहोत निर्मलग्राम वासी ...

# परिशिष्ट ३

## "कोल्हापूर जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्प: समाजशास्त्रीय अभ्यास"

## संशोध्य अभ्यासासाठी वेगवेगळया संबंधित घटकांच्याकडून तथ्ये संकलित करण्यासाठी तयार करण्यात आलेली मुलाखत अनुसूची

### १. शासकीय अधिकारी

**I)वैयक्तिक माहिती**

१)अधिकाऱ्याचे नाव

अ)वय ब)शिक्षण

क)प्रकल्पातील हुद्दा

**II)सामाजिक माहिती**

१) आपल्या जिल्हायात एकूण किती गावे आहेत ?

२) आपल्या जिल्हयामध्ये गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणकोणते प्रकल्प सुरू आहेत ?

- या योजनेपूर्वी इतर कोणते प्रकल्प सुरू होते ?
- सद्या या प्रकल्पापैकी कोणता प्रकल्प जास्तीत जास्त गावात लोकाभिमुख झालाआहे ?

३) महाराष्ट्रात जलस्वराज्य प्रकल्प अंदाजे केंव्हापासून सुरू झाला आहे ?

४) कोल्हापूर जिल्हयामध्ये या प्रकल्पाला कधीपासून सुरूवात झाली ?

५) आपल्या जिल्हयातील किती गावांनी या प्रकल्पासाठी अर्ज केला होता ?

६) अर्ज केलेल्या सर्वच गावांची निवड या प्रकल्पासाठी झाली का ?

अ)होय ब) नाही

- नसल्यास का नाही ?

७) या प्रकल्पाचा कालावधी किती आहे ?

अ)१२ महिने ब)१८ महिने क)२४ महिने

८) आतापर्यंत या निर्धारीत कालावधीत जिल्हयातील किती टक्के गावांनी हा प्रकल्प पूर्ण केला ?

अ)१00 टक्के ब)५0 टक्के क)२५ टक्के ड) कोणीही नाही

- ५० टक्के किंवा २५ टक्के गावांनी हा प्रकल्प पूर्ण केला असेल तर उर्वरीत गावांनी प्रकल्प वेळेत का पूर्ण केला नाही ?
- कोणीही नसल्यास त्याची कारणे कोणती ?

९) जलस्वराज्य प्रकल्पाचा कालावधी वाढला पाहिजे असे आपणास वाटते का ?

अ) होय ब) नाही

- होय असल्यास तो कालावधी किती असावा ?

अ)२४महिने ब) ३० महिने क)यापेक्षा जास्त

१०) या प्रकल्पास गावातील महिलांचा प्रतिसाद कसा आहे ?

अ)उत्तम ब)चांगला क)बरा

११) आपल्या निरीक्षणानुसार या प्रकल्पाच्या उद्दिष्टांप्रमाणे गावातील गरीब व दुर्बल घटकांना निर्णय प्रकियेमध्ये सहभागी करून घेतले जाते का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

१२)या प्रकल्पामध्ये सहभागी झालेल्या गावापैकी अंदाजे किती टक्के गावांनी प्रकल्प कालावधीत पावसाचे पाणी साठविण्याची नवीन सुविधा निर्माण केली आहे ?

- त्याचे स्वरूप

अ)तलाव खोदला ब)बंधारे बांधले क)साठविलेले योजना राबविली

१३)हा प्रकल्प राबवीत असताना सहाय्यकारी संस्थाच्या कामकाजावर आपण समाधानी आहात का ?

अ)आहे ब)नाही क)काही प्रमाणात

१४)या प्रकल्पामधून मध्येच काही गावे वगळली आहेत का ?

अ) होय ब) नाही

- होय असल्यास त्याची प्रामुख्याने कारणे कोणती ?

१५)शासनाने ग्रामीण भागासाठी राबविलेले आजवरचे इतर प्रकल्प आणि जलस्वराज्य प्रकल्प यामध्ये नेमका फरक काय आहे ?

## III) आर्थिक माहिती

१) या प्रकल्पांच्या धोरणानुसार लोकवर्गणीमध्ये सर्वच जनतेचा सहभाग आहे असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क) काही प्रमाणात

२) 'ग्रामपंचायतीसमोर पाणीपट्टी वसुली हा एक प्रश्न निर्माण झाल्याचे म्हटले जाते' या मुद्दयाशी आपण सहमत आहात का ?

अ)आहे ब) नाही क)काही प्रमाणात

- होयअसल्यास ही पाणीपट्टी १00 %वसुल होण्यासाठी ग्रामपंचायतींनी कोणत्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे असे आपणास वाटते ?

**IV)आरोग्य विषयक माहिती**

१) या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील लोकांचे आरोग्य सुधारणे हा एक शासनाचा महत्वाचा उद्देश आहे असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही

२)लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी खालीलपैकी कोणकोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे असे आपणास वाटते ?

अ)केरकचरा व जनावरांच्या शेण घाणीची योग्य ती विल्हेवाट

ब)सांडपाण्याची विल्हेवाट

क)असेंद्रिय पदार्थाची विल्हेवाट ड)शौचालयाची सुविधा इ)वरील सर्वच

३)केरकचरा व जनावरांच्या शेणघाणीची विल्हेवाट कशी लावावी असे आपणास वाटते ?

अ)वैयक्तिक कंपोष्ट खड्डे ब)सार्वजनिक कंपोष्ट खड्डे

क)बायोगॅस ड)वरील सर्व

- वरीलपैकी कोणत्या उपायाचा जास्तीतजास्त गावांनी अवलंब केला आहे ?

४)गावातील सांडपाण्याचा निचरा कसा करणे अधिक फायदेशीर ठरेल असे आपणास वाटते ?

अ)शोषखड्डे खोदून ब)परसबागासाठी वापर

क)गटारीद्वारे सोडणे ड)शेतीसाठी सांडपाणी

- वरीलपैकी कोणत्या उपायांचा जास्तीतजास्त गावांनी अवलंब केला आहे ?

५)असेंद्रिय पदार्थावर नियंत्रण कसे आणावे असे आपणास वाटते ?

अ)जमिनीत पुरणे ब)वापरावर बंदी घालणे क)दोन्हीही

६) खालीलपैकी कोणत्या उपायांचा जास्तीतजास्त गावांनी अवलंब केला आहे ?

अ)जमिनीत पुरणे ब)प्लॅस्टिक बॅगेवर नियंत्रण क) कोणत्याच नाही

७)खेडयातील लोकांच्या दृष्टीकोनातून कोणता शौचालय प्रकार अधिक फायदेशीर आहे असे आपणास वाटते ?

अ)शोषखड्डयाचे शौचालय ब)सेप्टिक टॅंकचे शौचालय

क)बायोगॅसचे शौचालय

- वरीलपैकी कोणत्या शौचालय प्रकाराचा अवलंब जास्तीत जास्त गावांनी केला आहे ?

८)या प्रकल्पातील अंदाजे किती टक्के गावे संपूर्ण हागणदारीमुक्त झाली आहेत ?

९)या प्रकल्पातील अंदाजे किती टक्के गावांनी घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले आहे ?

**V)राजकीय माहिती**

१)हा प्रकल्प राबवित असताना गावातील राजकीय गटातटाचा अडथळा येतो आहे असे आपणास वाटले का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

२)हा प्रकल्प राबवित असताना शासनाचा कल कसा आहे? असे आपणास वाटते ?

३)या प्रकल्पाबाबत आपण समाधानी आहात का ?

अ)होय ब)नाही

- असल्यास स्वरूप ?
- नसल्यास कारण ?

## २. सहाय्यकारी संस्था

**I)वैयक्तिक माहिती**

१)सहाय्यकारी संस्थेचे नाव-

२)संस्था प्रमुखाचे नाव-

अ)पद - **वय -**

**ब**)शिक्षण-

क)लिंग- स्त्री - पुरूष-

ड)विवहित- इ)अविवाहित-

ई)धर्म - उ)जात -

## II) सामाजिक माहिती

१)आपल्या संस्थेअंतर्गत जलस्वराज्य प्रकल्पातील किती गावे आहेत ?

२)जलस्वराज्यप्रकल्पासाठी आपल्या संस्थेचे किती लोक काम करतात ?

३)आपल्या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली किती गावातील जलस्वराज्य प्रकल्प पूर्ण झाले आहेत?

- वरीलपैकी किती गावांचा प्रकल्प निर्धारीत(१८महिने)कालावधीत पूर्ण झाला ?
- उर्वरीत गावांचा प्रकल्प किती टक्के झाला आहे ?

४)या प्रकल्पासाठी १८महिने कालावधी कमी आहे असे आपणास वाटते का ?

अ) होय ब)नाही

होय असल्यास हा कालावधी किती असावा असे आपणास वाटते ?

५)या प्रकल्पाला ग्रामस्थांचा प्रतिसाद कसा आहे ?

अ)उत्तम ब)चांगला क)बरा

६)या प्रकल्पाला महिलांचा प्रतिसाद कसा आहे ?

अ)उत्तम ब)चांगला क)बरा

७)जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांच्यामध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

- होय असल्यास त्याचे स्वरूप

८)या प्रकल्पातील महिलांच्या सहभागामुळे पाण्याच्या काटकसरीने व योग्य वापर होण्यास मदत होईल असे वाटते का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास त्याचे स्वरूप

९)या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील ऐक्य वाढण्यास मदत झाली का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

१०)या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण ग्रामस्थांना छतावरील पावसाच्या पाण्याच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले का ?

अ)होय ब)नाही

- होयअसल्यास आपल्याकडे असणाऱ्या गावातील अंदाजे किती कुटुंबानी लाभ घेतला?

११)पाण्याचा अतिरीक्त वापर व अपव्यय टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत असे आपणास वाटते ?

१२)आपल्या संस्थेअंतर्गत असणाऱ्या गावांनी हया उपाययोजना स्वीकारल्या आहेत का ?

अ)होय ब)नाही

- नसल्यास कारण

**III)आर्थिक माहिती**

१)जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावात बचत गटात अंदाजे सरासरी किती वाढ झाली ?

अ)२५टक्के ब)५0टक्के क)७५टक्के ड)१00 टक्के

२)या प्रकल्पामुळे महिलांचा गावातील विकास कामात सहभाग वाढला का ?

अ)होय ब) नाही

३)या प्रकल्पामुळे महिला आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होण्यास मदत झाली का ?

अ)होय ब) नाही

- होय असल्यास स्वरूप

४) या प्रकल्पातील लोकवर्गणीमध्ये गावातील सर्व लोकांचा सहभाग आहे असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

- नसल्यास त्याचे कारण

५)हा प्रकल्प वेळेत पूर्ण न होण्याचे कारण कोणते ?

अ)लोकवर्गणी ब)लोकांचा प्रतिसाद मिळत नाही

क)गावातील संबंधित यंत्रणेकडून प्रयत्न होत नाही

६)या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण ग्रामस्थांना गांडूळ खत प्रकल्प तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास किती कुटुंबानी लाभ घेतला?
- नसल्यास का नाही

७)हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पाणीपट्टी १00टक्के वसूल होण्यासाठी कोणत्या प्रभावी मार्गाचा अवलंब गावांनी केला पाहिजे असे आपणास वाटते ?

८)हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरूस्तीवर होणारा खर्च कमीत कमी होण्यसाठी काय करावे ?

९)हा प्रकल्प राबवित असताना आपल्याला काय अनुभव आला ?

## IV)आरोग्यविषयक माहिती

१)या प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील प्रत्येक घटकांपर्यंत स्वच्छ व शुद्ध पाणी पोहचले का ?

अ)होय    ब)नाही

- नसल्यास कोणता घटक या लाभापासून वंचित राहिला ?

२)या प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्या अधिकाराखालील सर्व गावे हागणदारीमुक्त झाली का ?

अ)होय    ब)नाही    क)बऱ्याच प्रमाणात

३)प्रकल्पातंर्गत गावे पूर्णपणे हागणदारी मुक्त होण्यास विलंब झाल्याने प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण झाला नाही असे आपणास वाटते का?

अ)होय    ब)नाही    क)काही प्रमाणात

४)प्रकल्प लाभार्थी गावांनी कचरा व्यवस्थापन केले आहे का ?

अ)होय    ब)नाही

- होय असल्यास कोणत्या पद्धतीने केले आहे ?
- नसल्यास का नाही ?

५)प्रकल्प लाभार्थी गावांनी सांडपाण्याचा निचरा कसा केला आहे ?

अ)शोषखड्डयात सोडला आहे    ब)परसबागासाठी

क)शेतीसाठी    ड)गटारीत

६)प्रत्येक गावांनी सांडपाण्याचे नियोजन कसे करणे फायदेशीर ठरेल ?

# ३. जलस्वराज्य कार्यालय

### (हिशोबनीस)

## I)वैयक्तिक माहिती

१)संपूर्ण नाव

अ)वय    ब)शिक्षण    क)लिंग    स्त्री - पुरूष

ड)विवाहित    इ)अविवाहित    ई)धर्म    उ)जात

## II)ग्रामपंचायतीची माहिती

१)गावाचे नाव    तालुका    जिल्हा

२)ग्रामपंचायत सदस्यांची माहिती

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद | लिंग | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

३)ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | लिंग | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामसेवक | | | |

४)ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | लिंग | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

५)ग्रामपंचायत पाणी वितरण कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | लिंग | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६)ग्रामपंचायतीची स्वत:च्या मालकीची इमारत आहे का ?

अ)आहे ब)नाही

७)ग्रामपंचायतीकडे संगणक आहे काय ?

अ)आहे ब)नाही

८)ग्रामपंचायतीत शौचालय आहे काय ?

अ)आहे ब)नाही

- असल्यास किती ?

९)सन २००१ च्या जनगणनेनुसार

अ)लोकसंख्या

| अ.नं. | लोकसंख्या | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | गावातील एकूण लोकसंख्या | | | |
| २ | अनुसूचित जातीची लोकसंख्या | | | |
| ३ | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | | | |

ब)कुटुबांची संख्या

| अ.नं. | कुटुबांचे स्वरूप | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | गावातील एकूण कुटुंबाची संख्या | |
| २ | अनुसूचित जातीतील कुटुबांची संख्या | |
| ३ | अनुसूचित जमातीतील कुटुंबाची संख्या | |
| ४ | दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या | |

क)गावातील साक्षरतेचे प्रमाण पुरूष -

स्त्री -

एकूण -

## III)जलस्वराज्य प्रकल्पाविषयी माहिती

१)आपल्या गावात जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोंतांचा व योजनांचा तपशील ?

अ)साध्या विहीरी ब)विंधन विहीर क)नळपाणीपुरवठा योजना

२)अस्तित्वातील स्त्रोतापासून मिळणारा एकूण पाणीपुरवठा ☐ लिटर्स

- प्रति दिन प्रती माणसी उपलब्ध पाणी पुरवठा ☐ लिटर्स
- गावातील खाजगी नळ जोडण्या व सार्वजनिक नळकोंडाळयांची संख्या

अ)नळकोंडाळी संख्या -

ब )घरगुती जोडण्या संख्या -

क)बिगर घरगुती जोडण्या संख्या-

३)प्रकल्पापूर्वी अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक खर्च किती होता?

४) गावाची एकूण वार्षिक पाणीपट्टी रक्कम -

५) गावाची एकूण वार्षिक वसूली रूपये -

६) गावाची पाणीपट्टीची एकूण थकबाकी रूपये -

७) गावासाठी/वाडीसाठी प्रस्तावित केलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाच्या मंजूरीची तारीख कोणती ?

८) सदर प्रकल्प पिण्याच्या पाण्याच्या कोणत्या स्त्रोतावर आधारलेला आहे?

९)गावापासूनचे त्याचे अंतर किती आहे ?

१०)प्रस्तावित प्रकल्पामुळे गावाचा/वाडीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटणार आहे काय ?

अ)होय ब)नाही

११)प्रस्तावित प्रकल्पाचे अंदाजपत्रक व आराखडे कोणी तयार केले आहेत ?

अ)जिल्हा परिषदेमधील अभियंता ब)महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता

क)ग्रामपंचायतीने खाजगी अभियंत्याकडून तयार करून घेतले

ड)अन्य घटकाकडून

१२)गावातील जलस्वराज्य प्रकल्पासाठी मंजूर झालेला कृती आराखडा

एकूण रक्कम - रूपये

१३)उपप्रकल्पास मिळालेले अनुदान

| अ.नं. | उपप्रकल्प कमांक | मिळालेले अनुदान | खर्च केलेले अनुदान |
|---|---|---|---|
| १. | उपप्रकल्प १ | | |
| २. | उपप्रकल्प २ | | |
| ३. | उपप्रकल्प ३ | | |

१४)जलस्वराज्य प्रकल्पाच्या प्रमुख समित्यांची माहिती

अ)ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद | स्त्री/पुरूष | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

ब)महिला विकास समिती

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद | स्त्री/पुरूष | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

क)सामाजिक लेखा परिक्षण समिती

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद | स्त्री/पुरूष | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१५)उपरोक्त समिती निवड झाली त्या ग्रामसभेची तारीख -

१६)ग्रामदूतांची माहिती

| अ.नं. | ग्रामदूताचे नाव | वय | स्त्री/पुरूष | शिक्षण | जातप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१७)गावातील महिला बचत गटांची माहिती

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी स्थापन झालेले बचत गट

| अ.नं. | सर्वसाधारण विभागातील संख्या | दारिद्रेरेषेखालील संख्या | अनु.जातीतील संख्या | अनु.जमातीतील संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर स्थापन झालेले बचत गट

| अ.नं. | सर्वसाधारण विभागातील संख्या | दारिद्र्य रेषेखालील संख्या | अनु.जातीतील संख्या | अनु.जमातीतील संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१८)महिला सबलीकरणांतर्गत घेतलेले व्यवसाय प्रशिक्षण

| अ.नं. | प्रशिक्षणाचे नाव | लाभार्थी संख्या | प्रत्यक्षात व्यवसाय चालू केलेल्या लाभार्थ्यांची संख्या | नोकरी करीत असलेल्या लाभार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१९)महिला सबलीकरणासाठी राबविलेले उपक्रम

| अ.नं. | उपक्रमाचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| | | |

२०)शौचालयाबाबत माहिती

| अ.नं. | शौचालयाचे स्वरूप | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीची शौचालय संख्या | जलस्वराज्य प्रकल्पानंतरची शौचालय संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक शौचालय | | | |
| २ | सार्वजनिक शौचालय | | | |

२१)गावामध्ये उपलब्ध असणारे इतर सार्वजनिक जलस्त्रोत

| अ.नं. | जलस्त्रोताची नावे | संख्या | प्रत्यक्षात वापरात असलेले | वापरात नसलेले | कशासाठी वापर |
|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक विहीरी | | | | |
| २ | विंधन विहीरी | | | | |
| ३ | तलाव | | | | |

२२)गावात राबविलेले विशेष उपक्रम

| अ.नं. | उपक्रमाचे नाव | जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी संख्या | जलस्वराज्य प्रकल्पानंतर संख्या |
|---|---|---|---|
| १ | कचरा कोंडाळी | | |
| २ | गांडूळ खत प्रकल्प | | |
| ३ | धोबी कट्टे | | |
| ४ | ऑक्सिजन पार्क | | |
| ५ | पाणी पुनर्भरण योजना | | |
| ६ | इतर | | |

२३)विविध समित्यांच्या बैठकीतील उपस्थितीची माहिती

अ)ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

| अ.नं. | बैठक दिनांक | उपस्थिती | | अनुपस्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

ब)महिला विकास समिती

| अ.नं. | बैठक दिनांक | उपस्थिती | | अनुपस्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

क)सामाजिक लेखा परीक्षण समिती

| अ.नं. | बैठक दिनांक | उपस्थिती | | अनुपस्थिती | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य | स्त्री सदस्य | पुरूष सदस्य |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

२४)जलस्वराज्य प्रकल्पकाळात घेतलेल्या ग्रामसभातील उपस्थिती

| अ.नं. | ग्रामसभा दिनांक | उपस्थित ग्रामस्थ | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरूष | |
| | | | | |

२५)हिशोबनीस म्हणून मिळणाऱ्या मानधनावर आपण समाधानी आहात का ?

अ)होय ब)नाही

●नसल्यास मानधनाविषयी आपली अपेक्षा किती आहे ?

१९) हया प्रकल्पामध्ये हिशोबनीस म्हणून काम करताना या प्रकल्पाच्या एकूण कामकाजा विषयी आपल्याला काय वाटते ?

# ४. ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती

**I)वैयक्तिक माहिती**

१)गावाचे नाव-

तालुका - जिल्हा-

२)संपूर्ण नांव -

अ)**वय** - **ब**)शिक्षण-

क)लिंग- स्त्री - पुरूष-

ड)विवाहित- इ)अविवाहित-

ई)धर्म - उ)जात -

ऊ)व्यवसाय-

**II)सामाजिक**

१)आपण ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कोणत्या पदावर आहात ?

अ) अध्यक्ष ब) सचिव

२)आपल्या समितीत एकूण किती सदस्य आहेत ?

३)आपल्या गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाची सुरूवात केंव्हा झाली ?

४)ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची निवड कोण करते ?

अ) जिल्हा परिषद ब) ग्रामपंचायत क) ग्रामसभा

५)समिती नेमण्यासाठी ग्रामसभेमध्ये कमीत कमी किती टक्के गणपूर्ती असणे आवश्यक असते ?

अ) १00 टक्के व ५0 टक्के महिला ब) ८0 टक्के व ५0टक्के महिला

क) ६0 टक्के व ५0 टक्के महिला ड) ४0 टक्के व ५0 टक्के महिला

६)आपल्या गावात यापूर्वी कधी शासनाने टॅंकरने पाणीपुरवठा केला होता का ?

अ) होय ब) नाही

७)आतापर्यंत आपल्या गावचे जलस्वराज्य प्रकल्पाचे किती टक्के काम पूर्ण झाले आहे?

८)आपणास लोकवर्गणी गोळा करीत असताना काय अनुभव आला ?

अ) चांगला ब) वाईट

९)जलस्वराज्य प्रकल्पासाठी किती टक्के लोक, लोकवर्गणीमध्ये सहभागी झाले ?

अ) १00 टक्के  ब) ७५टक्के  क) ५0टक्के  ड) २५टक्के

- १00 टक्के लोक लोकवर्गणीध्ये सहभागी झाले असतील तर त्यासाठी आपण कोणकोणत्या मार्गाचा अवलंब केला ?
- ७५ टक्के किंवा ५0टक्के लोक लोकवर्गणीमध्ये सहभागी झाले आहेत तर उर्वरीत लोकांना सहभागी करून घेण्यासाठी आपण काय प्रयत्न करणार आहात ?
- २५ टक्के एवढा अल्प प्रतिसाद मिळण्यामागील कारणे कोणती ?

१0)आपण समिती सदस्यांच्या बैठकीतील उपस्थितीबाबत समाधानी आहात का ?

अ) होय  ब) नाही

११) प्रकल्प कालावधीत आपणास मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या सहाय्यकारी संस्थेचे नाव?

१२)या सहाय्यकारी संस्थेच्या सहकार्याबाबत आपण समाधानी आहात का ?

अ) होय  ब) नाही

- होय असल्यास त्याचे स्वरूप
- नसल्यास का नाही

१३)या प्रकल्पास गावातील महिलांचा प्रतिसाद समाधानकारक आहे का ?

अ) होय  ब) नाही

- नसल्यास त्याच्यामागील कारण कोणते ?

१४)आपण शासनाच्या सहकार्याबाबत समाधानी आहात का ?

अ) होय  ब) नाही

- नसल्यास का नाही ?

१५)या प्रकल्पाला १८ महिने कालावधी पुरेसा आहे असे आपणास वाटते का ?

अ)होय  ब) नाही

- नसल्यास हा कालावधी किती असावा असे आपणास वाटते ?

अ)२४महिने  ब)३0महिने  क)यापेक्षा जास्त

१६)या प्रकल्पामुळे आपल्या गावास कोणकोणते फायदे झाले ?

१७)हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी आपणास कोणकोणत्या घटकांची मदत झाली ?

१८)आपणास या प्रकल्पामध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या आहेत का ?

अ) होय  ब) नाही

- असल्यास कोणत्या ?

## III)आर्थिक

१)आपल्या गावात पुरूष बचत गट आहेत का ?

अ) होय ब) नाही

- असल्यास किती ?
- नसल्यास का नाही?

अ) प्रयत्न केला नाही ब) लोकांनी प्रतिसाद दिला नाही

२)आपल्या गावात महिला बचत गट आहेत का ?

अ)होय ब) नाही

- असल्यास किती ?
- यापैकी किती बचत गटांनी बीजभांडवल व्यवसाय सुरू केला आहे ?

३)आपल्या ग्रामपंचायतीची पाणीपट्टी वसुली १००टक्के आहे का ?

अ)आहे ब) नाही

- नसल्यास आपण हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पाणीपट्टी १००टक्के वसूल होण्यासाठी कोणते धोरण राबविणार आहात ?

४)आपण ग्रामस्थांना पाणी देत असताना मीटर पध्दतीचा अवलंब करणार आहे का ?

अ) होय ब) नाही क) अजून निश्चित नाही

- होय असल्यास त्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद कसा आहे ?

अ) चांगला ब) बरा क) काही प्रमाणात

५)प्रकल्पानंतर आपण दुर्बल घटकांसाठी सार्वजनिक नळ (Public Stand)जोडणार आहात का ?

अ) होय ब) नाही

६)आपण पाण्याची बचत करण्यासाठी कोणकोणती खबरदारी घेणार आहात ?

## IV)आरोग्य विषयक

१)आपले गाव १००टक्के हागणदारीमुक्त झाले आहे का ?

अ)होय ब) नाही क) अंशत: राहिले आहे

२)आपल्या गावात जलस्वराज्य प्रकल्प सुरू होण्यापूर्वी अंदाजे किती टक्के शौचालये होती ?

३)सद्या शौचालय बांधण्याबाबत लोकांचा प्रतिसाद कसा आहे ?

अ)उत्तम आहे ब) चांगला आहे क) बरा आहे

४)शौचालय बांधण्यासाठी आपण ग्रामपंचायतीमार्फत ग्रामस्थांना काही आर्थिक किंवा वस्तू रूपाने मदत केली आहे का ?

अ)होय ब) नाही

- असल्यास त्याचे स्वरूप?
- नसल्यास का नाही ?
- सदर मदत आपण आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबानाच केली की सर्वच कुटुंबाना केली ?

५)लोकांना शौचालय बांधण्यास प्रवृत्त करण्यासाठी कोणकोणत्या मार्गाचा अवलंब केला ?

६)शासनाची शौचालयाची अट पूर्ण करण्यामध्ये प्रामुख्याने कोणती अडचण आली ?

अ)पैसा नाही ब) जागा नाही

क)गटातटाचे राजकारण ड) मानसिकता नाही

७)आपल्या गावामध्ये सांडपाण्याचा निचरा कसा केला आहे ?

अ)शोषखडयात सोडले ब)परसबागसाठी वापर

क)गटारीत सोडले ड)शेतीसाठी वापर

८)आपल्या गावामध्ये किती टक्के भागात गटारी आहेत ?

अ)१00 टक्के ब)७५ टक्के क)५0 टक्के ड)२५ टक्के

- १00 टक्के आहेत तर गटारीची ही सोय आपण कधी केली ?

  अ)जलस्वराज्यप्रकल्पापूर्वी ब)जलस्वराज्यप्रकल्पानंतर

- ७५%,५0% व २५ %असेल तर उर्वरीत गावात गटारीची सोय कधी करणार आहात ?

९) आपल्या गावामध्ये कचऱ्याची विल्हेवाट कशी केली जाते ?

अ)वैयक्तिक कंपोष्ट खते ब)सार्वजनिक कंपोष्ट खते

क)बायोगॅस ड)काहीही नाही

१0)आपल्या समितीमधील किती टक्के सदस्यांच्या घरी शौचालये आहेत ?

११)उर्वरीत सदस्यांच्या घरी शौचालय का नाही ?

१२)आपल्या समितीमधील किती टक्के सदस्यांनी स्वतंत्र असे सांडपाण्याचे नियोजन केले आहे ?

- उर्वरीत सदस्यांनी सांडपाण्याचे नियोजन का केले नाही ?

१३)पाणीपुरवठा/ग्राम स्वच्छता प्रकल्पाबद्दल आपल्याला काही आपले चांगले/वाईट अनुभव सांगावयाचे आहेत का ?

## ५. महिला विकास समिती

**I)वैयक्तिक माहिती**

१)समिती प्रमुखाचे संपूर्ण नाव

२)समिती सचिवाचे संपूर्ण नाव

अ)वय ब)शिक्षण

क)विवाहित ड)अविवाहित

इ)धर्म ई)जात उ)छंद

**II)सामाजिक**

१)तुमच्या गावात महिला मंडळे आहेत का ?

अ)आहेत ब)नाहीत

- असल्यास आपण त्याचे सभासद आहात का ?

अ)होय ब)नाही

२)होय असल्यास तुम्ही कोणत्या पदावर आहात ?

अ)अध्यक्ष ब)सचिव क)सदस्य

३)तुमचे महिला मंडळ केंव्हा स्थापन झाले आहे ?

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

४)जलस्वराज्याच्या महिला विकास समितीत कमीत कमी किती महिला सदस्य असल्या पाहिजेत ?

अ)५० टक्के ब)७५ टक्के क)१००टक्के

५)तुमच्या महिला विकास समितीमध्ये पुरूष सभासद आहेत का ?

अ)आहेत ब)नाहीत

६)तुमच्या महिला विकास समितीची निवड कोणी केली ?

अ)शासनाने ब)ग्रामपंचायतीने क)ग्रामसभेने

७)या प्रकल्पातंर्गत किती उपप्रकल्प आहेत ?

अ)एक ब)दोन क)तीन

८)तुम्ही कोणत्याही कार्यक्रमात/सभेमध्ये आपले विचार मांडू शकता का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास केंव्हापासून ?

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीपासून ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

९)आपल्या महिला विकास समितीतील सर्वच महिला कार्यक्रमात/सभेत बोलू शकतात का ?

अ)होय ब)नाही क)थोडया प्रमाणात

१0)महिला विकास समितीतील सदस्यांची बैठकीसाठी/कार्यक्रमासाठी उपस्थिती कशी असते ?

अ)समाधानकारक ब)असमाधानकारक

११)बैठकीमधील विविध विषयावरील चर्चेत सर्वच महिलांचा सक्रिय सहभाग असतो का?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

१२)आपल्या समितीमार्फत गावातील महिलांची अभ्यासदौरा कोठे आयोजित केली होता?

- आपण त्यामध्ये सहभागी झाला होता का

अ)होय ब)नाही

- अभ्यासदौऱ्यात आपणास कोणकोणते उपक्रम आवडले ?

१३)यापैकी आपल्या गावात कोणकोणते उपक्रम राबविले ?

१४)आपल्या समितीमार्फत महिलांच्या नेतृत्वगुण विकासासाठी विशेष असे उपक्रम राबविले का ?

अ)होय ब) नाही

- होय असल्यास कोणते ?

१५)तुमच्या समितीमार्फत महिलांच्या मनातील भिती,लाज संकोच दूर होण्यासाठी काही प्रयत्न केले का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणते प्रयत्न केले ?

१६)समितीमार्फत महिलांच्यामधील अंधश्रद्धा कमी करण्यासाठी प्रयत्न केले का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास त्याचे स्वरूप ?

१७)जलस्वराज्य प्रकल्पाच्या पहिल्या ग्रामसभेपासून महिलांचा प्रतिसाद चांगला होता का?

अ)होय ब)नाही

- नसल्यास तो प्रतिसाद चांगला मिळविण्यासाठी आपण काय प्रयत्न केले?

१८)तुम्ही गावातील सर्वच महिलांना एकत्र आणण्यासाठी विशेष असे कोणते उपक्रम राबविले ?

१९)या प्रकल्पामुळे महिलांना चांगली संधी प्राप्त झाली असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

२०)या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास मदत झाली असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

२१)या प्रकल्पामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला का ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

- नसल्यास अजून का नाही?

२२)या प्रकल्पाच्या लोकवर्गणीत सर्वच ग्रामस्थांचा सहभाग आहे का ?

अ)होय ब)नाही

- नसल्यास का नाही?

२३)या प्रकल्पामुळे आपल्या कुटुंबाला कोणता फायदा झाला ?

## III)आर्थिक

१)तुम्ही मिळवत्या आहात का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास स्वरूप

२)आपल्या गावात महिला बचत गट आहेत का?

अ)होय ब)नाही

३)तुम्ही महिला बचत गटात आहात का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास केंव्हापासून ?

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीपासून ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

- या बचत गटात तुम्ही कोणत्या पदावर आहात ?

अ)अध्यक्ष ब)सचिव क)सदस्य

४)आपल्या महिला विकास समितीतील अंदाजे किती टक्के महिला आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण आहेत ?

अ)२५ टक्के ब)५0 टक्के क)७५टक्के ड)१00 टक्के

५)तुमच्या गावात महिला बचत गट स्थापन करण्याविषयी प्रतिसाद कसा आहे ?

अ)चांगला ब)बरा

६)गावातील अंदाजे किती बचत गटांनी स्वतंत्र व्यवसाय चालू केले आहेत ?

- व्यवसायाचे स्वरूप

७)आपल्या या समितीमधील सदस्य अधिक सक्रिय होण्यासाठी मानधन असले पाहिजे असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास किती मानधन असावे ?

## IV)शैक्षणिक

१)आपल्या या समितीतील अंदाजे किती टक्के महिला साक्षर आहेत ?

२)तुमच्या गावामध्ये निरक्षर स्त्रियांचे प्रमाण काय आहे?

३)आपल्या समितीमार्फत गावातील निरक्षरता नाहीशी करण्यासाठी प्रयत्न केले का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणते प्रयत्न केले ?

४)समितीमार्फत गावातील साक्षर महिलांना प्रकल्पामध्ये सहभागी करून घेण्यासाठी काय केले ?

अ)निबंध स्पर्धा ब)वक्तृत्व स्पर्धा क)वादविवाद स्पर्धा

ड)रांगोळी स्पर्धा इ)खाद्यपदार्थ ई) इतर

५)या प्रकल्पासाठी गावातील शैक्षणिक संस्थाची मदत झाली का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास स्वरूप ?

## V)राजकीय

१)तुम्ही या समितीच्या कोणत्या पदावर आहात ?

अ)अध्यक्ष ब)उपाध्यक्ष ड)सचिव

२)तुम्ही स्वेच्छेने हे पद स्विकारले की कोणी आग्रह केला ?

अ)स्वेच्छेने ब)आग्रहाने

३)तुम्हाला नेतृत्व करण्यास आवडते का ?

अ)होय ब)नाही

४)तुम्ही आता स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य आहात का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणत्या ?
- नसल्यास आतापर्यंत कोणती निवडणूक लढविली आहे का ?

अ)होय ब)नाही

५)तुमच्या महिला विकास समितीत पुरूष सदस्य आहेत का ?

अ)आहेत ब)नाहीत

- नसल्यास कारण ?

६)ही समिती कोणाच्या नियंत्रणाखाली काम करते ?

अ)जिल्हा परिषद ब)पंचायत समिती क)ग्रामपंचायत

७)जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावातील गटतट कमी होण्यास मदत झाली असे आपणास वाटते ?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

८)तुमच्या गावाच्या विकासासाठी या प्रकल्पाचा एकूणच कसा उपयोग झाला/होऊ शकेल असे आपणास वाटते का ?

## VI)आरोग्यविषयक

१)तुमच्या घरी शौचालय आहे का ?

अ)आहे ब)नाही

- असल्यास कधी बांधले

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

२)तुमच्या जलस्वराज्य कार्यालयात शौचालय आहे का ?

अ)आहे ब)नाही

३)महिला विकास समितीमार्फत गाव हागणदारीमुक्त होण्यासाठी काय प्रयत्न केले ?

४)आपल्या या समितीमार्फत ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी कोणते उपक्रम राबविले ?

५)महिलांनी मनात आणले तर गाव स्वच्छ व सुंदर होऊ शकते या विधानाशी आपण सहमत आहात का ?

अ)सहमत आहे ब)सहमत नाही

- सहमत नसल्यास कारण

## ६. सामाजीक लेखा परीक्षण समिती

**I) वैयक्तिक माहिती**

१) संपूर्ण नांव -

अ)वय ब)शिक्षण

क) लिंग- स्त्री पुरूष

ड) विवाहित - इ)अविवाहित-

ई) धर्म - उ) जात-

ऊ) व्यवसाय

**II) सामाजिक**

१)तुम्ही सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या कोणत्या पदावर काम करत आहात?

अ) अध्यक्ष ब) सचिव

२)या समितीची निवड कोण करते?

अ) जिल्हा परिषद ब) पंचायत समिती क)ग्रामसभा

३) समितीत एकूण किती सभासद आहेत?

४) समितीत कमीत कमी किती सदस्य असणे आवश्यक असते?

अ) १0 ब) १२ क) १६ ड) १८

५) समितीमध्ये सदस्य म्हणून किती ग्रामपंचायत सदस्य आहेत?

६)या समितीमध्ये किमान किती टक्के महिला सदस्य असाव्या लागतात ?

अ) २० टक्के ब) ३० टक्के क) ४० टक्के ड) ५० टक्के

७) सध्याच्या समितीत किती महिला आहेत?

८) तुमच्या समितीत बांधकाम क्षेत्राचा अनुभव असलेले सदस्य किती आहेत?

अ)एक ब)दोन क) यापेक्षा जास्त

●त्यांचे शिक्षण व अनुभव सांगा

९)या प्रकल्पाचे लाभ समाजातील सर्व घटकांना मिळाले का?

अ) होय ब) नाही

●नसल्यास कोणाला नाही ? का नाही?

१०) या प्रकल्पाची माहिती गावातील सर्व घटकापर्यंत पोहचते का?

अ) होय ब) नाही क) काही प्रमाणात पोहचते

११) गावातील महिला, प्रकल्पाच्या सर्व कार्यात व निर्णय प्रकियेत सहभागी होतात का?

अ) होय ब) नाही

- नसल्यास कोणत्या कार्यात सहभाग नसतो?

१२)प्रकल्पाच्या कार्यात पारदर्शकता येण्यासाठी आपण काय प्रयत्न करता?

१३)आपल्या प्रकल्पाच्या कामाची प्रगती समाधानकारक आहे असे आपणास वाटते का?

अ) होय ब) नाही

- नसल्यास कोणत्या बाबतीत आपण समाधानी नाही?
- त्यासाठी आपण काय केले?

१४) आपल्या गावातील प्रकल्पाच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता कशी आहे?

अ) उत्तम ब) चांगली क) बरी

१५)तुमच्या गावात सहाय्यकारी संस्था, भूवैज्ञानिक,तात्रिंक सल्लागार व कंत्राटदाराच्या नेमणुकीचा निर्णय ग्रामसभेतच झाला आहे का?

अ) होय ब) नाही

- नसल्यास कोणाची नेमणूक ग्रामसभेशिवाय झाली असे आपणास वाटते?

१६) गावातील सर्व लोकांचा लोकर्वगणीमध्ये सहभाग आहे का?

अ) होय ब)नाही

१७) गावाचा कृती नियोजन आराखडा हा लोकांच्याबरोबर चर्चा करून बनविलेला आहे का?

अ)होय ब)नाही

१८) समिती प्रमुख या नात्याने या प्रकल्पामध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या आहेत का?

अ) होय ब) नाही

- असल्यास कोणत्या?

**III) आर्थिक**

१) तुमच्या समितीत हिशोब नोंदीच्या कामाचा अनुभव असलेले सदस्य किती आहेत ?

अ) एक ब) दोन क) सर्वच

- असल्यास त्यांचे शिक्षण व अनुभव

२)गावातील प्रकल्पाच्या अहवालात आर्थिक व्यवहाराबाबत त्रुटी आढळल्या काय?

अ) होय ब) नाही

- त्रुटी असल्यास त्यांचे स्वरूप
- त्यांवर समितीने काय उपाय सुचविले?

३)आपल्या गावातील पाईपलाईन,. बांधकाम याकामाबाबत समितीला काही उणिवा आढळल्या का?

अ) होय ब) नाही

- असल्यास त्या उणिवा कोणत्या व त्या कशा दूर केल्या?

४)सर्वच प्रकल्प प्रकियांचे तात्रिंक. आर्थिक व सामाजिक लेखा परीक्षण समितीने केले आहे का?

अ) होय ब) नाही

५)लेखापरिक्षक म्हणून काम करताना आपल्या समितीला सर्व बाबतीत पारदर्शकता आढळून आली का ?

अ)होय ब) नाही

- नसल्यास कोणत्या बाबतीत?

६)या प्रकल्पाविययी थोडक्यात आपले मत सांगा.

## ७. ग्रामदूत

**I) वैयक्तिक माहिती**

१) गावाचे नांव-

तालुका - जिल्हा -

२) संपूर्ण नांव -

अ) वय- ब)शिक्षण -

क) लिंग -स्त्री पुरूष -

ड) विवाहित - इ)अविवाहित -

ई) धर्म - उ) जात -

**II) सामाजिक**

१) आपल्या गावामध्ये एकूण किती ग्रामदूत आहेत ?

२) ग्रामदूत म्हणून आपण कोणाचा दुवा म्हणून काम करता?

३)आपण ग्रामदूत हे काम स्वेच्छेने निवडले आहे की इतरांच्या आग्रहाने निवडले आहे?

अ) स्वेच्छेने ब) इतरांच्या आग्रहाने

४)जलस्वराज्य या प्रकल्पामूळे महिलांच्यामध्ये जागृती झाली आहे असे आपणास वाटते का?

अ) होय ब) नाही

५)हा प्रकल्प सुरू झाल्यामुळे गावातील महिलांच्यामध्ये कोणकोणत्या सुधारणा झाल्या असे आपणास वाटते?

६)आपल्या गावामध्ये पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी किंवा साठविण्यासाठी काही उपाय योजले आहेत का?

अ) होय ब) नाही

- होय असल्यास कोणते?
- नसल्यास का नाही?

**III)आर्थिक**

१) तुम्ही ग्रामदूत म्हणून अर्धवेळ काम करता की पूर्णवेळ?

अ) अर्धवेळ ब) पूर्णवेळ

- जर अर्धवेळ असेल तर इतर वेळी कोणते काम करता?
- पूर्णवळ असल्यास आपणास मिळणाऱ्या मानधनावर समाधानी आहात का?

अ) होय ब) नाही

- नसल्यास मानधनाबाबत आपल्या अपेक्षा सांगा ?

२)आपण ग्रामस्थांना सेंद्रिय खत व गांडूळ खताच्या विविध पध्दतीची माहिती मिळवून दिली का?

अ) होय ब) नाही

- होय असल्यास त्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद कसा मिळाला?

अ)चांगला ब)अत्यल्प क) अजिबात नाही

**IV) आरोग्य विषयक**

१)आपल्या गावाचा भौगोलिक दृष्टया अभ्यास करून सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी आपण ग्रामपंचायती पुढे कोणते पर्याय ठेवले?

२)ग्रामपंचायत प्रकल्पानंतर सांडपाण्याचा निचरा कोणत्या पध्दतीने करते?

अ) गटारीद्वारे गावाबाहेर सोडते ब) शेतीसाठी वापर

क)सांडपाण्यावर प्रकिया करून पूनर्वापर करते

३)सांडपाण्याचा योग्य वापर करण्यासाठी आपण ग्रामस्थांना मार्गदर्शन केले का?

अ) होय ब) नाही

४) प्रत्येक कुटुंबाने सांडपाण्याचा उपयोग कसा करावा असे आपणास वाटते?

अ) शोषखड्डयात सोडावे ब) परसबागा कराव्यात

क) गटारीत सोडावे

५)आपल्या गावातील लोक अजूनही उघडयावर शौचाला जातात का?

अ) होय ब) नाही क) अगदी अल्प प्रमाणात

६)गावातील लोकांना जास्तीत जास्त कोणत्या प्रकारचे शौचालय बांधण्याचे आपण मार्गदर्शन केले आहे?

अ) शोषखड्डयाची शौचालये ब) सेप्टीक टॅंकची शौचालये

क) बायोगॅसची शौचालये

७)आपल्या गावामध्ये लोकांनी जास्तीत जास्त कोणत्या प्रकारची शौचालये बांधली आहेत?

अ) शोषखड्डयाची शौचालये ब) सेप्टीक टॅंकची शौचालये

क) बायोगॅसची शौचालये

८)आपण ग्रामस्थांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात म्हणून प्रबोधन केले आहे का?

अ) होय ब)नाही

●होय असल्यास त्याला कसा प्रतिसाद मिळाला?

अ) चांगला ब) अल्पसा क) अजिबात नाही

९)आपल्या गावामध्ये अजूनही शेण व केरकचरा टाकण्यासाठी गावातच घराशेजारी उकिरडे आहेत का?

अ) होय ब) नाही

१०)आपण गावातील लोकांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात म्हणून कोणकोणत्या प्रकारचे उपक्रम राबविले?

११) आपल्या गावामध्ये व्यायामशाळा आहे का?असल्यास किती?

१३)ग्रामदूत म्हणून काम करीत असताना ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत यांच्या संदर्भात आपल्या समोर अडथळे /प्रश्न निर्माण होतात असे आपणास वाटते का?

## ८. दुर्बल घटकासाठी प्रश्नावली

**I)वैयक्तिक माहिती**

१)कुटुंबप्रमुखाचे नाव

अ)वय ब)शिक्षण क)लिंग स्त्री/पुरूष

ड)विवाहित इ)अविवाहित ई)धर्म

उ)जात

**II)सामाजिक**

१)आपणास गावात चालू असलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाबाबत माहिती आहे का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

- होय असल्यास या प्रकल्पाच्या माध्यामातून गावातील कोणत्या महत्त्वाच्या समस्या सुटणार आहेत असे आपणास वाटते ?

२)तुम्ही तुमच्या गावामध्ये जलस्वराज्य हा प्रकल्प येण्यापूर्वी कधी ग्रामसभेला उपस्थित राहत होता का ?

अ)होय　　　　　　　　　　ब) नाही

३)हा प्रकल्प चालू झाल्यानंतर तुम्ही ग्रामसभेला उपस्थित राहाता का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

४)जलस्वराज्य या प्रकल्पापूर्वी आपल्या घरी स्वतंत्र नळजोडणी होती का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

- नसल्यास आपण पाणी कोठून आणत होता ?

अ)सार्वजनिक नळ　　　　　ब)विहीर　　　क)तलाव　　ड)इतर

५)जलस्वराज्य प्रकल्पानंतर आपल्या घरी स्वतंत्र नळ जोडणी घेतली का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

६)या प्रकल्पामुळे गावातील जुने पाण्याचे स्त्रोत (तलाव विहिर)सुधारले का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

- होय असल्यास त्याचे स्वरूप

७)या प्रकल्पामुळे आपणास गावात काही सुधारणा झाल्या असे वाटते का ?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

- होय असल्यास त्याचे स्वरूप

**III)आर्थिक**

१)आपला नोकरी/व्यवसाय करता काय?

अ)होय　　　　　　　　　　ब)नाही

२)होय असल्यास स्वरूप

३)आपल्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न किती आहे ?

४)आपल्या कुटुंबातील कोणी स्त्री महिला बचत गटात आहे का ?

अ)होय ब) नाही

- असल्यास केंव्हा पासून ?

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वीपासून ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

५)तुम्ही जलस्वराज्य या प्रकल्पाची लोकवर्गणी दिली आहे का ?

अ)होय ब)नाही

- नसल्यास का नाही ?

६)या प्रकल्पानंतर आपणास किती पाणीपट्‌टी भरावी लागणार आहे याची आपणास माहिती आहे का ?

अ)होय ब)नाही

७)पाण्याच्या नळाला मीटर बसवणे योग्य की अयोग्य ?

अ)योग्य ब)अयोग्य

- अयोग्य असल्यास का ?

## IV)आरोग्य विषयक

१)आपल्या घरी शौचालय आहे का ?

अ)आहे ब)नाही

- असल्यास केंव्हा बांधले आहे ?

अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

- नसल्यास आपण का बांधले नाही ?

अ)जागा नाही ब)पैसा नाही क)जागा व पैसा दोन्हीही नाही ड)इच्छा नाही

२)आपण शौचास जाऊन आल्यानंतर हात कशाने धुता ?

अ)पाण्याने ब)साबणाने क)राखेने ड)मातीने

३)आपण घरातील सांडपाण्याचा निचरा कसा करता ?

अ)बागेसाठी वापरतो ब)शोषड्डयात सोडतो क)गटारीत सोडतो

४)आपल्या घरी जनावरे (गाय, म्हैस वगैरे)आहेत का ?

अ)आहे ब)नाही

- असल्यास या जनावरांचे शेण व घरातील कचरा टाकण्यासाठी उकिरडा कोठे आहे ?

अ)गावात ब)गावाबाहेर

- जर गावात असेल तर उकिरडा गावाबाहेर असावा असे आपणास कोणी मार्गदर्शन केले नाही का ?

  अ)होय ब)नाही

५)गावांमध्ये चालू असलेल्या या प्रकल्पाबद्दल आपल्याला काय वाटते ?

## ९. महिला सबलीकरण

**I)वैयक्तिक माहिती**

१)संपूर्ण नाव

अ)वय ब)शिक्षण

क)विवाहित ड)अविवाहित

इ)धर्म ई)जात

उ)छंद

**II)सामाजिक**

१)आपल्या गावात महिला मंडळ आहे का ?

अ)होय ब)नाही

- असल्यास आपण महिला मंडळात आहे का ?

  अ)होय ब)नाही

- होय असल्यास आपल्या महिला मंडळाचे नाव काय?

२)आपल्या गावात जलस्वराज्य प्रकल्प सुरू आहे का ?

अ)होय ब)नाही

३)जलस्वराज्य प्रकल्पाबाबत आपणास काही माहिती आहे का ?

अ)होय ब)नाही

४)प्रकल्पामध्ये प्रमुख समित्या किती आहेत ?

अ)एक ब)दोन क)तीन

५)प्रकल्प येण्यापूर्वी आपण अंदाजे किती ग्रामसभांना उपस्थित राहिला होता ?

६)प्रकल्प आल्यापासून आपण किती ग्रामसभांना उपस्थित राहिला आहे ?

७)प्रकल्पापूर्वी आपण कधी निबंध किंवा वक्तृत्व यांसारख्या स्पर्धेत भाग घेतला होता काय?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणत्या ?

८)प्रकल्पानंतर आपण कोणत्या स्पर्धेत सहभागी झाला ?

९)प्रकल्पापूर्वी आपण व्यासपीठावर जाऊन विचार मांडले आहेत काय ?

अ)होय ब)नाही

१०)प्रकल्पानंतर आपण व्यासपीठावर जाऊन विचार मांडता का ?

अ)होय ब) नाही

११)प्रकल्पामुळे स्त्रियांचा पाण्यासाठी, शौचालयासाठीचा त्रास कमी झाला असे वाटते का ?

अ)होय ब)नाही

१२)प्रकल्पामुळेच सार्वजनिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळाली असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही

१३)प्रकल्पाच्या माध्यमातून आपल्या गावामध्ये झालेली सर्व कामे पारदर्शी व दर्जेदार झाली आहेत असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क)माहित नाही

१४)तुम्ही परिसरातील किंवा गावातील रस्ते,गटारी,वीज,पाणी यासारख्या समस्येबाबत आवाज उठविला का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणत्या कारणासाठी व कोणाविरूद्ध ?

## III)आर्थिक

१)आपल्या गावात महिला बचत गट आहेत का ?

अ)आहेत ब)नाहीत

- असल्यास किती -

२)आपण बचत गटात आहात का ?

अ)होय ब)नाही

- असल्यास बचत गटाची स्थापना केव्हा झाली ?

  अ)जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी ब)जलस्वराज्य प्रकल्पानंतर

- बचत गट नसल्यास कारण ?

  अ)बचत गटाचे महत्त्व माहित नाही ब)स्वत:ला आवडत नाही

  क)कुटुंबियांना आवडत नाही ड)आवश्यकता वाटत नाही

३)प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ आपण घेतला आहे का ?

  अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणते प्रशिक्षण घेतले ?
- आपल्या कुटुंबातील सदस्यांनी कोणत्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला ?

४)या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन एखादा व्यवसाय सुरू केला आहे का ?

  अ)होय ब)नाही

- असल्यास कोणता ?
- नसल्यास का नाही ?

५)आपण व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे का ?

  अ)होय ब)नाही

- असल्यास कोठून व किती ?

६)आपण आर्थिक व्यवहारासाठी कधी बॅंकेत जाता का ?

  अ)होय ब)नाही

- नसल्यास का नाही ?

७)आपल्या बचत गटातील महिलांची बैठक किती दिवसातून होते ?

  अ)आठ दिवस ब)पंधरा दिवस क)महिना ड)निश्चित नाही

८)तुमच्या घरी कधी बचत गटाची बैठक झाली आहे का ?

  अ)होय ब)नाही

९)बचत गटाच्या आर्थिक व्यवहारासंबंधाने (कर्ज,वर्गणी)गटातील इतर महिलांशी कधी मतभेद झाले आहेत का ?

  अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणत्या कारणासाठी ?

## IV)शैक्षणिक

१)तुम्हाला मुले आहेत का ?

अ)होय ब)नाही

२)तुमच्या मुलाला कोणत्या शाळेत पाठवायचे याचा निर्णय कोण घेते ?

अ)स्वत: ब)पती क)आम्ही दोघे (पती - पत्नी)

३)तुमच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी माहिती घेण्यासाठी तुम्ही स्वत: हून शाळेमध्ये जाता का ?

अ)होय ब)नाही

४)तुमच्या मुलांच्या शाळेतील पालकसभेला कोण जाते ?

अ)स्वतः ब)पती

- पती ऐवजी तुम्ही का जात नाही ?

५)तुमच्या मुलाने शाळेतील सहलीला जायचे की नाही हे कोण ठरविते ?

अ)स्वतः ब)पती क)दोघेही

## V)राजकीय

१)तुम्ही कधी निवडणूक लढविली आहे का ?

अ)होय ब)नाही

- होय असल्यास कोणती ?
- नसल्यास का नाही ?

अ)स्वत:ला आवडत नाही ब)पतीला आवडत नाही

२)या प्रकल्पामुळे गावातील गट - तट कमी झालेत असे आपणास वाटते का ?

अ)होय ब)नाही क)माहीत नाही

## VI)आरोग्य

१)आपल्या घरी शौचालय आहे का ?

अ)आहे ब)नाही

२)आपल्या गावात आता उघडयावर शौचास जाणे पूर्ण बंद झाले आहे का?

अ)होय ब)नाही क)काही प्रमाणात

३)वैयक्तिक स्वच्छतेसाठी आपण कोणती काळजी घेता ?

अ)दररोज आंघोळ ब)नखे वेळोवेळी काढणे

क)शौचास जाऊन आल्यावर साबणाने हात धूणे

४)तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी कोणती खबरदारी घेता ?

अ)गृह स्वच्छता ब)परिसर स्वच्छता

५)तुमच्या गावातील लोकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आतापर्यंत कोणकोणत्या उपक्रमात भाग घेतला आहे ?

६)पाणी स्वच्छता/हागणदारीमुक्त गाव या संकल्पनाच्या बद्दल आपल्या मनात काय विचार आहेत ?